Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-28**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**



**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***December-2021 Volume-12 Issue-28***


*On*

# *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*


| **Chief Editor**<br>**Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | **Editor**<br>Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |
|---|---|

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]**<br>**Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]**<br>**Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]**<br>**Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]**<br>**Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]** | **guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam**<br>**Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]**<br>**Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]**<br>**Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]**<br>**Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]** | **Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]**<br>**Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]**<br>**Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]**<br>**Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]**<br>**Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]** |


**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

**ONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| **1** | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना केलेले मार्गदर्शन<br>**प्रा. जाधवर एस. एस.** | 1-5 |
| 2 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास<br>**प्रा. डॉ. सोमनाथ संभाजी लांडगे** | 6-11 |
| 3 | महात्मा ज्योतिबा फूले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य<br>**डॉ. अरुण चांगदेव खर्डे , कु. अक्सा ज़फर काझी** | 12-13 |
| 4 | दिन दूबळयाचे कैवारी : महात्मा जोतीराव फुले<br>**प्रा. नरवडे श्रीराम** | 14-17 |
| 5 | छत्रपती शाहू महाराजांचे शेती विकासातील योगदान<br>**डॉ. संभाजी आनंदा मोरे** | 18-21 |
| 6 | दलित साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. बसवराज गेनबा बोरकडे** | 22-24 |
| 7 | महात्मा फुले: वाङ्मय आणि कार्य<br>**श्री पवार सोपान जयसिंग** | 25-27 |
| 8 | विचारवंत आणि सुधारक : शाहू महाराज<br>**प्रा. डॉ. हंडीबाग संदीप प्रचंडराव** | 28-30 |
| 9 | पत्रकार - डॉ. बाबासाहेब अम्बेडकर<br>**डॉ.सुब्राव नामदेव जाधव** | 31-32 |
| 10 | समाजविकासातील राजर्षी शाहु महाराज यांचे योगदान<br>**प्रा.तानाजी रामभाऊ बोराडे** | 33-34 |
| 11 | शिक्षा के क्षेत्र में अंबेडकर की विचारधारा<br>**Dr. Meenaxi B Patil** | 35-37 |
| 12 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे कृषी विषयक विचार<br>**प्रा. डॉ. नानासाहेब पंडितराव मनाळे** | 38-39 |
| 13 | कथाबंध' या कथासंग्रहातील आंबेडकर विचारसरणीच्या कथा - एक आकलन<br>**डॉ. ओमकार विनायक पोटे** | 40-43 |
| 14 | डॉ- बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार<br>**डॉ- प्रशांत भाऊसाहेब सोळंके** | 44-45 |
| 15 | महात्मा फुले यांचे कृषी क्षेत्रातील योगदान<br>**डॉ.रसिका महेंद्र म्हात्रे** | 46-47 |
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दलित कविता<br>**प्रा.डॉ. सोळंके चत्रभुज नारायणराव** | 48-49 |
| 17 | समाज सुधारक छत्रपति शाहू महाराज<br>**डॉ. अमोल गंगणे** | 50-52 |

| | | |
|---|---|---|
| 18 | डॉ.. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि शेतीविषयक विचार<br>**प्रा. अभयकुमार पाटील , प्रा. दादासाहेब रणदिवे** | 53-54 |
| 19 | महात्मा फुले का शैक्षणिक योगदान<br>**प्रा. डॉ. सी. जी. कडेकर** | 55-57 |
| 20 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य<br>**प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र** | 58-59 |
| 21 | डॉ. अम्बेडकर की चिंतन दृष्टि<br>**डॉ. रमेश विठोबा कांबळे** | 60-62 |
| 22 | छत्रपती शाहु महाराजाचे शेतीविषयक विचार<br>**डॉ.जयदीप रा. सोळुंके** | 63-64 |
| 23 | महात्मा फुले यांचे प्रेरणादायी विचार<br>**प्रा.विजयकुमार सुरेश राठोड** | 65-68 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक धोरण<br>**एन. एस. पाटील** | 69-71 |
| 25 | महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार<br>**मनिषा भिमराव शेळके प्रो. डॉ. एस.एम्. भोसले** | 72-74 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री – विषयक विचार<br>**श्रीमती सारिका उध्दवराव पडवळ** | 75-77 |
| 27 | सामाजिक क्रांतीचे अर्ध्वयू : डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>**-प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे** | 78-81 |
| 28 | डॉ. बाबासाहब आंबेडकर के अस्पृश्यता विरोधी विचार और कार्य<br>**वैशाली भगवानराव सिरसीकर** | 82-84 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान<br>**डॉ. फारुक अहमदसाब तांबोळी** | 85-88 |
| 30 | आधुनिक भारताचे शिल्पकार : फुले-शाहू-आंबेडकर<br>**प्रा. डॉ. चव्हाण चंद्रकांत संदीपान , हर्षल शशिकांत शिंगे** | 89-93 |
| 31 | महात्मा फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील कार्य<br>**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड** | 94-96 |
| 32 | शाहू,फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>**प्रा. जगताप शालन धर्मराज** | 97-99 |
| 33 | भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार<br>**वैभव रघुनाथ घाडगे** | 100-101 |
| 34 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>**प्रा.डॉ.रामकृश्ण ज्योतीबा प्रधान** | 102-104 |
| 35 | डॉ. आंबेडकरोत्तर दलित नेतृत्वाच्या राजकीय व्यवहाराची चिकित्सा<br>**प्रा. डॉ. कीर्तिकर वाल्मीक भीमराव** | 105-108 |
| 36 | छत्रपति राजर्षी शाहू महाराज - समाजसुधारक व विचारवंत<br>**शकुंतला रामभाऊ फाटक** | 109-113 |
| 37 | विचारवंत आणि सुधारक छत्रपती शाहू महाराज<br>**प्रा ज्ञानोबा त्रिंबक ढगे , प्रा. भरत वसंतराव जाधव** | 114-117 |

| | | |
|---|---|---|
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार आणि कामगार कायदेविषयक कार्य एक अभ्यास<br>**प्रा.मडके साधना हरिदास** | 118-120 |
| 39 | महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान<br>**प्रा.डॉ. शंकर शिवाजी मुंडे** | 121-128 |
| 40 | क्रीडा शिक्षणातील सर्वेक्षण पध्दती<br>**डॉ. प्रा. साखरे देवानंद लिंबराज डॉ. प्रा.चाऊस साजेद अमर** | 129-130 |
| 41 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृशिविशयक धोरण<br>**डॉ.रामराज पंडीतराव गावंडे** | 131-133 |
| 42 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता<br>**प्रा. गणेश मोहन बदले** | 134-136 |
| 43 | फुले आंबेडकरवादाचा स्त्रीवादी साहित्यावरील प्रभाव<br>**प्रा. डॉ. स्वाती घाटुळे** | 137-140 |
| 44 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यातील योगदान<br>**प्रा.समाधान पंडू पसरकल्ले** | 141-144 |
| 45 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर : एक ऐतिहासिक बदल घडवून आणणारा निर्णय<br>**अमृता विष्णू जोगदंड** | 145-148 |
| 46 | महात्मा जोतिराव फुले यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास<br>**प्रा.शेळके सी.एस.** | 149-152 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान<br>**श्रीमती: सारिका अरविंद गायकवाड** | 153-156 |
| 48 | सावित्रीबाई फुले आणि आधुनिक मराठी काव्यातील स्त्रीवाद: एक दृष्टिक्षेप<br>**कु.गायत्री आनंदराव भरनाळे डॉ.सविता वावगे** | 157-160 |
| 49 | उच्च शिक्षणातील ग्रंथालयाची भूमिका<br>**प्रा.आडसुळे एस.पी.** | 161-163 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा "सद्धम्म" विषयक दृष्टीकोन<br>**प्रोफेसर (डॉ.)मनोहर कुंभारे** | 164-167 |
| 51 | महात्मा फुले यांचे कृषी सुधारणा विषयक विचार<br>**प्रा.श्रीमंत तुकाराम कावळे** | 168-170 |
| 52 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजीक समता चळवळ<br>**डॉ. प्रमोद ना. घ्यार** | 171-174 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार<br>**डॉ बी एस राजोळे** | 175-177 |
| 54 | महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>**सहा प्रा डॉ माधव नरहरी कांबळे** | 178-181 |
| 55 | राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व कायदे<br>**महेश मुकुंद कुंभार** | 182-183 |
| 56 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य<br>**प्रा.डॉ.भास्कर मुरलीधर आहिरे** | 184-186 |

| | | |
|---|---|---|
| 57 | निवडक दलित कवियित्रींच्या कवितांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**ललिता मानसिंग गोपाळ** | 187-191 |
| 58 | राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. आवारे चंद्रसेन सावळाराम** | 192-194 |
| 59 | छत्रपती शाहू महाराज एक आदर्श राजा<br>**हनुमंत व्यंकटी घाडगे** | 195-197 |
| 60 | महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा साहित्यिक अभ्यास.<br>**डॉ. रामहरी मधुकर सूर्यवंशी** | 198-200 |
| 61 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री उन्नती संबंधीची भूमिका<br>**प्रा.महेंद्र पद्माकरराव देशपांडे** | 201-204 |
| 62 | छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक धोरण : एक चिंतन<br>**डॉ. मिनाक्षी प्रल्हादराव शिंदे** | 205-207 |
| 63 | मराठी काव्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ.तुळशीराम उकिरडे** | 208-212 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना केलेले मार्गदर्शन

**प्रा. जाधवर एस. एस.**
मराठी विभाग, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब

भारतरत्न् डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतातील एक महान विचारवंत , समाजसुधारक होऊन गेले. या महामानवाचा जन्म् 14 एप्रिल 1891 रोजी झाला. समाजात प्रचलित वर्णव्यवस्था अतिशय दाहक स्वरुपात होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही या प्रचलित व्यवस्थेने सोडले नाही. त्यांनाही त्याचे चटके सहन करावे लागले. म्हणूनच त्यांनी अतिशय पराकष्ठाने ज्ञानार्जनासाठी कठोर परिश्रम केले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी अखंडपणे ज्ञानसाधना केली. अमेरिकेतील कोलंबिया या जगप्रसिध्द् विद्यापीठातून त्यांनी 1915 साली एम. ए. ची व 1917 साली पीएच. डी. पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स्' आणि 'ग्रेज इन' मधून बॅरिस्टरची पदवी संपादन केली. अशा शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च् पदव्या डॉ. बाबासाहेबांनी संपादन केल्या.

डॉ. आंबेडकरांनी 1920 च्या दशकामध्ये भारताच्या सामाजिक आणि राजकिय पटलावर पदार्पण केले. पुढील चार दशके. 6 डिसेंबर 1956 रोजी त्यांचे महापरिनिर्वाण होईपर्यंत, त्यांनी विविध क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले. भारतातील ब्रिटीश साम्राज्याच्या शेवटच्या कालखंडात भारतात सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकिय परिवर्तन घडवून आणण्यात डॉ. आंबेडकर अग्रेसर होतेच, शिवाय स्वातंत्र्य् प्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणुन आणि इतर अनेक क्षेत्रातील विविधलक्षी कामगिरीतून डॉ. आंबेडकरांनी आधुनिक भारताच्या पायाभरणीसाठी आपले सर्वस्व् वाहून घेतले.

डॉ. आंबेडकरांच्या या साऱ्या ऐतिहासिक आणि अलौकिक कामगिरीला झालर होती विद्वतेची ते प्रकांड पंडित होते. या प्रज्ञासुर्याला दिशांचे बंधन नव्हते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र यांच्यापासून कायदा, इतिहास, मानवंशशास्त्र आणि धर्मशास्त्र यांच्यापर्यंत अनेक ज्ञानशाखांमध्ये भराऱ्या घेऊन त्यांनी त्यामध्ये मोलाची भर घातली. या शास्त्राप्रमाणेच विविध क्षेत्रात डॉ. आंबेडकरांनी भरीव अशी कामगिरी केली. अर्थतज्ज्ञ शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडित, पत्रकार, संसदपटू, समाजसुधारक, राजकीय मुत्सुद्दी आणि बौध्द् धम्मचक्रप्रवर्तक अशा भूमिकांमधून त्यांनी भारताच्या इतिहासावर आपला आगळा वेगळा ठसा उमटविला. 'डॉ. बाबासाहेब केवळ दलितांचे नेते म्हणून संबोधणे हे फार मोठे अन्यायकारक आहे. कोट्यावधी पददलितांचे ते तारणहार होते, उध्दारक होते. मात्र त्यांची कामगिरी तेवढ्यापुरती मर्यादित नव्हती. ते व्यापक मानवी हक्कांचे कैवारी होते. डॉ. आंबेडकर सर्वार्थाने राष्ट्रीय नेते होते. स्वातंत्र्य्, समता आणि बंधुत्व् या त्रयीवर आधारित जातिविरहीत, वर्गविरहित आणि लोकशाही प्रणीत नवसमाजाची निर्मिती हा त्यांचा ध्यास होता. म्हणूनच आधुनिक भारताच्या सामाजिक सदसदविवेकबुध्दिचा मानदंड म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर'.[1]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजपरिवर्तनाच्या अनेक महत्त्वाच्या कृत्यांमध्ये आधुनिक काळातील भारतीय स्त्रियांसाठी त्यांनी केलेले योगदान अनेक दृष्टीने महत्त्वाचे ठरते. ज्यांच्या जाणीवांची दिशा स्त्रियांच्या प्रश्नाच्या रोखाने सतत विचार अथवा कृती करत गेली, अशा काही विचारवंतांची एक परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. स्त्रियांच्या प्रश्नाच्या जाणीवेची सुरवात लोकहितवादी, म. फुले, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याने कृतीशीलतेची जोड मिळाली. स्त्री – शुद्रांना शिक्षण देण्याच्या विरोधात असणाऱ्या परंपरागत स्थितीशील उच्चवर्णीय संस्कृतीला त्यांनी जबरदस्त् धक्का दिला. या वर्गाच्या मक्तेदारीला आव्हान देऊन् त्यांनी स्त्री – शुद्रांच्या मनात प्रथमच आपल्या हक्कांची जाणीव करुन दिली.[2]

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकातील आगरकर, महर्षी कर्वे स्त्री शिक्षणासाठी परिश्रम घेतले. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठाची स्थापना केली. गांधीजींनीही स्वातंत्र्य् चळवळीत स्त्रियांना सामील करुन घेतलं. या परंपरेच्या पार्श्वभूमीवर आंबेउकरांनी केलेले कार्य हे खूप वेगळया व सार्वत्रिक पातळीवरचे आहे.मानवजातीच्या इतिहासाइतकाच स्त्रियांच्या अत्याचाराचा, अन्यायाचा छळाचा इतिहास पुरातन आहे. पुरुषसत्ताक व्यवस्था अस्तित्वात आली आणि स्त्रिायांच्या बंधनांना प्रारंभ झाला माणूस जसजसा प्रगत होत गेला, तसतशी बंधने अधिक वाढत गेली. जातीव्यवस्थेला जसा धर्माचा आधार दिला गेला. स्त्रियांचे आर्थिक अधिकार संपविण्यात आले आणि स्त्रीला परावलंबी बनविण्यात आले. नीतीमत्तेची आणि चारित्र्याची बंधने स्त्रियांसाठी कठोर करण्यात आली आणि लादण्यात आली. त्यातून स्त्रियांचे 'माणूस असणे' नाकारुन व्यवस्थेत दुय्यम स्थान देण्यात आले. त्यामुळे कुठल्याही अन्याय अत्याचाराच्या बळी स्त्रियाच ठरल्या. ज्या व्यवस्थेत पुरुष सत्ता अधिक ताठर कठोर बनते, तेथे स्त्रियांची गुलामी अधिक तीव्र होते. रक्तसंस्कार आणि वर्णसंस्कार टाळण्यासाठी स्त्रियांना अनेक नैतिक बाबी सांगत बंधणे घालण्यात आली. योनिशुचित्व् म्हणून बालविवाह, सतीची चाल, पुनर्विवाह बंदी, जरठकुमारी विवाह यासारख्या अनिष्ट प्रथांचा उगम झाला. पतीव्रतेची कल्पना गौरवाची ठरविण्यात आली. सतीप्रथेचे उदात्तीकरण केले गेले. सती न जाणाऱ्या स्त्रियांचे केशवपन करण्याची वाईट प्रथा आली. विवाह संस्थेत आणि कुटूंबसंस्थेत स्त्रियांची होणारी कुचंबणा शोषण जगभर सारखेच आहे. उपेक्षा, छळ, अन्याय, अत्याचार आणि चारित्र्याचा बागुलबुवा स्त्री जीवनाचा कठोरपणे संकोच करणारा आहे. विशेष म्हणजे त्याला धर्माचा आधार दिल्याने ते अधिक शोचनीय झाले आहे. या साऱ्यामधून स्त्री दुय्यमच ठरली नाही, तर तिला कुटूंबात, समाजात स्थानच उरले नाही. 'माणूस' म्हणून वागविण्या ऐवजी तिला पुरुषांनी साधन ठरविले. स्त्रियांना माणूस म्हणून वागविण्याची, समानतेने वागविण्याची आणि स्वातंत्र्य् देण्याची गरज होती. मनुस्मृतीने लादलेली बंधने स्त्रियांना वस्तू ठरविणारी, भोगवस्तू ठरविणारी होती. भारतीय स्त्रियांच्या या स्थितीसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनीतीस जबाबदार कोण? असा प्रदिर्घ लेख लिहला. त्यात ते मनुस्मृतीमधील काही भाग उध्दृत करतात. ते लिहतात

'2.213 पुरुषांना आकर्षित करुन भ्रष्ट करणे, हे स्त्रियांचे वैशिष्टये होय. ह्या कारणामुळे ज्ञानी लोक स्त्रियांच्या सान्निध्यात कधीच बेसावध नसतात.

2.214 स्त्रिया केवळ मूर्खांनाच वाममार्गाने नेतात, असे नसून ज्ञानी पुरुषांना सुध्दा काम आणि क्रोध यांचे गुलाम बनवितात.

2.215 वासना ह्या प्रबळ असल्यामुळे त्या ज्ञानी पुरुषाला सुध्दा गुलाम बनवितात म्हणून कुणीही आपल्या माता, भगिनी किंवा कन्या यांच्यासोबत एकांतात राहू नये.

9.14 स्त्रिया पुरुषांच्या सौंदर्याकडे लक्ष देत नाहीत किंवा त्यांच्या वयाकडे बघत नाहीत. हा पुरुष आहे एवढेच मनात आणून स्त्रिया पुरुषाच्या स्वाधीन होतात. मग तो सुंदर असो अथवा कुरुप असो.

9.15 स्त्रियांना कितीही ताब्यात ठेवले तरीही, त्यांना पुरुषांबद्दल असलेल्या त्यांच्या वासनेमुळे, त्यांच्या चंचल स्वभावामुळे, तसेच त्यांच्या निसर्गत: असलेल्या निर्दयीपणामुळे तथा त्यांच्या पतीचाही विश्वासघात करतात.

9.16 निर्मात्या ईश्वराने स्त्री निर्मितीच्यावेळी त्यांची रचनाच अशी केली की त्यांना ताब्यात ठेवण्याकरीता प्रत्येक पुरुषाने पराकाष्ठेचे प्रयत्न् करावयास पाहिजेत.

9.17 मनूने स्त्रियांच्या कामवासनेची तीव्र इच्छा, शृंगार, अपवित्र वासना, क्रोध अप्रामाणिकपणा, मत्सर आणि दुर्वर्तन बहाल केले.

मनूच्या दृष्टीने स्त्री किती नीच होती हे यावरुन दिसते.[3] ही भारतीय हिंदू स्त्रीची स्थिती मनूने केली. स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य देऊ नये, कारण अशा स्वातंत्र्याला ती लायक नसते. मुलीने, तरुण स्त्रीने, वृध्दस्त्रीने

स्वत्:च्या घरीही स्वतंत्रपणे काही करु नये. विवाह झाल्यावर पत्नी वेगळे होऊ शकत नसल्याने तिला घटस्फोटाचा अधिकार नाही. बालपणी पित्यावर, तरुणपणी पतीवर, पती निधनानंतर मुलावर अवलंबून असणारी स्त्री कधीही स्वतंत्र असू शकत नाही. ही मनूची स्त्रियासंबंधीची अन्यायी वृत्ती आहे त्यामुळे ‘स्त्री म्हणजे चैचीनची वस्तू समजली गेल्याने तिच्या शरीराला वस्त्रप्रावरणांनी व दागदागिन्यांनी शृंगारण्यात बऱ्याच धनाचा व प्रेमाचा व्यय् होतो.4 ही मनुप्रणित व्यवस्था असल्याने डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीतही स्त्रियांच्या प्रश्नांना, समस्यांना महत्त्वाचे स्थान दिले. स्त्रियासंबंधिचा पारंपरिक दृष्टीकोण संपावा आणि स्त्रियांना समान दर्जा मिळावा, यासाठी सतत स्पष्ट, परखड भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली. आपल्या सर्वच राजकीय, सामाजिक चळवळीत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात त्यांनी सहभागी करुन घेतले. स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा मुलाधार आर्थिक परावंबित्व् संपले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. स्त्री अविचारी पापाचरणी, चंचल असते, हेच चुकीचे आहे. स्त्री विवेकी असते म्हणून स्त्रियांना सर्व मानवी हक्क् मिळाले पाहिजेत, त्यासाठी त्यांनी आयुष्यभर् संघर्षात्मक् भूमिका घेतली. स्त्रियांच्या शिक्षणाकडे जाणीवपुर्वक लक्ष देण्याची अपरिहार्यता डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन करुन अधिक प्रगत विचार मांडला आहे. विविध क्षेत्रातील नोकरी धंद्यामध्ये पाश्चात्त्य् राष्ट्रांत स्त्री पुरुषांत स्पर्धा चालू आहे. त्याचे अनिष्ट परिणाम तिकडे दिसत असताना इकडे कशाला ही स्पर्धा , असे लोक म्हणतात. स्त्रियांचा एक प्रतिपक्ष उभा राहिला, तर त्यातून राष्ट्राचे भले होईल हे प्रतिपादन करताना ते म्हणतात, ‘अशा लक्ष्यातून योग्य् माणूस स्त्री अगर पुरुष योग्य् जागी येऊन राष्ट्राचा उभ्युदय होईल, हेच खरे आहे. सर शंकर यांनी स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा सांगितला. तो असा की, युरोप, अमेरिका, रशिया, चीन इत्यादी देशात स्त्रियांसाठी निराळी विद्यापीठे, शाळा व कॉलेज कमी होऊ लागली आहेत, तेव्हा हिंदुस्थानातही स्त्रियांच्या शिक्षणासाठी निराळया शाळा, निराळी कॉलेज नकोत. स्त्रियांचे शिक्षण पुरुषांच्या बरोबर एकत्र झाले पाहिजे. स्त्रियांचे व पुरुषांचे शिक्षण एकत्र होऊ नये , याला आधार देताना पुराणमतवादी लोक असे सांगतात की, स्त्रियांचा विनय आणि पुरुषांची नितीमत्ता शाबूत राखण्यासाठी वयाच्या 7 व्या वर्षानंतर शारीरिक व मानसिक स्थितीमध्ये पालट होऊ लागतो. म्हणून अशा वेळी मुला-मुलीना वेगळे ठेवणे आवश्यक् आहे. वेगववेगळे ठेवून नितीमत्तेचा परिपोष करण्याचा हा प्रकार आम्हास तरी मोठा विलक्षण दिसतो. एखाद्या तरुणास निती वनात. हिमालयासारख्या पर्वतात आसमंतात जर डांबून ठेवले, तर तो आजन्म् ब्रम्हचारी राहील. याबद्दल काही वानवा नाही. त्याचप्रमाणे एखाद्या नवयौवन स्त्रीस तुरुंगाच्या आत डांबून ठेवले व तिला कोणाचा संसर्ग होऊ दिला नाही, तर ती देखील आजन्म् साध्वी होऊ शकेल, पण अशाच्या नितीमत्तेची कवडी इतकीही किंमत आहे, असे आम्हास वाटत नाही. स्त्रियांच्या सहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात राहून जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही, अशी खबरदारी घेऊ शकते त्यांनाच आमच्यामते नीतिमान म्हणता येईल’5

स्त्री – पुरुषांच्या एकत्र शिक्षणाच्या पुरस्कारामागे स्त्री-पुरुषांच्या एकत्र सहवासाचा आणि नीतिमत्तेचा परिपोष घडविण्याचा हेतू आहे. स्त्री स्वातंत्र्याचा आणि समानतेचा पुरस्कारही त्यातून स्पष्ट होतो. स्त्रियांना सर्व हक्क् मिळावेत आणि त्यासाठी स्त्रियांना आत्मभान यावे, म्हणून डॉ. आंबेडकर सतत संघर्षात्मक् भूमिका घेतात. स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल, त्यावरुन एखाद्या समाजाची प्रगती मोजली जाते असे सांगून डॉ. आंबेडकर म्हणतात, ‘स्वच्छ राहण्यास शिका व सर्व दुर्गुणांपासून मुक्त् रहा. तुमच्या मुलांना शिक्षण द्या. हळूहळू त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा जागृत करा. ते थोर पुरुषहोणार आहेत, असे त्यांच्या मनावर बिंबवा. त्यांच्यातील हिनगंड नाहीसा करा, लग्न् करण्याची घाई करु नका. लग्न् म्हणजे जबाबदारी पार पाडण्याइतपत आर्थिकदृष्टया समर्थ झाल्याशिवाय त्यांच्यावर लग्न् लादू नका. जे लग्न् करतील, त्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, अती जास्त् मुले होणे,

हे दुष्ट कृत्य् आहे. आपल्या लहानपणी आपणाला मिळू शकली, त्यापेक्षा अधिक चांगली परिस्थिती आपल्या प्रत्येक मुलाला देणे. हे आई वडिलांचे कर्तव्य् आहे. सर्वात अधिक महत्त्वाचे म्हणजे लग्न् झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्यांच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे, मात्र गुलामासारखे वागण्यास खंबीरपणे तिने नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा. या उपदेशाचे तुम्ही पालन केले तर तुम्हा सर्वांना मान-सन्मान व कीर्ती प्राप्त् होईल.' 6

स्त्रीयांना केलेला हा उपदेश दलित स्त्रियांपुरता मर्यादित नाही , तर सर्व समाजातील स्त्रियांसाठीचा हा उपदेश आहे. स्त्रियांनी पतीचे गुलाम होण्यास नकार देऊन त्यांच्याशी मित्रांप्रमाणे सहकार्य केले पाहिजे. लवकर लग्न् न करणे आधिक मुले  न होऊ देणे. दुर्गुणापासून मुक्त् राहणे आणि समतेसाठी आग्रह धरणे महत्त्वाचे आहे. 'स्त्री'ला माणूस म्हणून मान-सन्मान मिळावा अशी स्पष्ट् भूमिका डॉ. आंबेडकर मांडतात. त्यामुळे बहूपत्नीत्त्वाच्या पद्धतीला त्यांचा विरोध होताच, पण पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांनी गुलामी स्विकारावी, अन्याय सहन कराव, छळ होऊ द्यावा हे त्यांना मान्य् नव्हते. त्यासाठी त्यांनी आग्रहपूर्वक 11 एप्रिल 1947 रोजी संविधान सभेत 'हिंदू कोड बिल' मांडले आणि 27 सप्टेंबर 1951 पर्यंत मान्य् न झाल्याने कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. कायदेमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची जी कारणे डॉ. आंबेडकरांनी दिली त्यातील दोन महत्त्वाची कारणे आहेत एक म्हणजे हिंदू कोडबिल मान्य् न करणे आणि दुसरे कारण म्हणजे इतर मागास जातींसाठी आयोग न नेमणे.

स्त्रियांच्या उन्नतीसाठी हिंदू कोडबिल आणण्याची आवश्यकता होती, मात्र सरकारने या बिलाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. 11 एप्रिल 1947 रोजी मांडलेले हिंदू कोडबिल 9 एप्रिल 1948 पर्यंत भिजत ठेवले. त्यानंतर ते बिल सिलेक्ट् कमिटीकडे पाठवून दिले. 1949 साली चर्चेला घेण्यात आले. फेब्रुवारी 49 मध्ये चार दिवस , मार्च 49 मध्ये एक दिवस, एप्रिल 49 मध्ये दोन दिवस चर्चा झाली. निर्णयाविना चर्चा संपली डॉ. आंबेडकर यासंबंधी म्हणतात '17 सप्टेंबर 1951  रोजी हे बिल पुन्हा चर्चेस आले असता खुद्द पंतप्रधान नेहरु यांनी त्यात कपात सुचविली. ही कपात भयंकर होती की, मुळ बिलाचे स्वरुपच बदलून गेले'. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा संताप अनावर झाला होता. देशातील सर्व स्त्रियांच्या हक्काचे बिल होते.तेच भिजत ठेवले. या बिलावर त्यांनी आपली भूमिका विस्ताराने 24 फेब्रुवारी 1949 च्या संविधान सभेत मांडली. तहकुबी आक्षेप आल्यानंतर दिलेले हे उत्तर् आहे. ते म्हणतात, 'मला गृहाला एवढेच सांगायचे आहे की, जर तुम्हाला हिंदू पध्दत्, हिंदू संस्कृती, हिंदू समाज टिकवायचा असेल, तर तुम्ही आवश्यक् असेल तेथे दुरुस्ती करण्याची कुचराई करु नका. हिंदू पध्दतीचे जे भाग जवळ जवळ मोडकळीस आले आहेत, त्याची दुरुस्ती करण्यापलिकडे सदर बिल अधिक काहीही करत नाही'7

कोणत्याही देशाच्या विकासाचे, समतोल विकासाचे मापदंड स्त्रियांच्या विकासावर अवलंबून असतात. म्हणूनच या देशातील कुमारी, विवाहिता, परित्यक्ता, विधवा, घटस्फोटीत स्त्रियांच्या संरक्षणाचा हक्क् आणि विकासाचा हेतू ठेवून हिंदू कोड बिलाचा आग्रह डॉ. आंबेडकरांनी धराला होता. या बिलाचे महत्त्व् प्रतिपादन करताना डॉ. आंबेडकर यांनी म्हटले आहे की, 'पार्लमेंट पुढील हिंदू कोड बिल ही एक महत्त्वपूर्ण घटना होती व ती या देशातील कोणत्याही अधिवेशनात विचारात घेतली नव्हती. एवढेच नव्हे, तर पार्लमेंटमध्ये यापूर्वी व पुढेही येणाऱ्या कोणत्याही कायद्याची बरोबरी हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही, इतके त्याचे महत्त्व् आहे. हिंदू समाजातील **वर्गा** – वर्गातील उच्च्नीच भेद व लिंगभेद तसेच कायम ठेवून केलेले कोणतेही निव्वळ् आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे कायदे म्हणजे घाण न काढता त्यावरच उभारलेले पत्त्याचे बंगले होत. ही तर घटनेची थट्टा आहे'.8

या बिलाचे महत्त्व् फार मोठं आहे हे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मान्य् केले. मात्र बिलाला पाठिंबा देऊन त्याचे कायद्यात रुपांतर होऊ दिले नाही, हे वास्तव् आहे.

**हिंदू कोड बिलातील तरतुदी खालीलप्रमाणे** :

1) वैवाहिक हक्काची भरपाई म्हणून पतीच्या संपत्तीमध्ये पत्नीचा हक्क्, मिळालेल्या स्त्रीधनावन पत्नीचा हक्क्,विधवा झाल्यावर संपत्तीचा वारसाहक्क्
2) स्त्रीला पतीपासून घटस्फोट मागण्याचा हक्क्, नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगीची तरतूद.
3) स्त्रीला दत्त्क निवडण्याचा , घेण्याचा हक्क् पारंपारिक दत्त्कविधान पध्दती निश्चित आपला मुलगा दत्त्क देण्याचा मातेस अधिकार देण्याची तरतूद.
4) अल्पवयीन मुलाचे पालकत्व् वडील हयात नसल्यास आईकड जाण्याची तरतूद निसर्गदत्त् पालकाने धर्मत्याग केल्यास अगर संसार त्याग केल्यास त्याचे पालकत्व् निसर्गदत्त् पालकांकडेच राहील ही तरतूद.
5) दत्तकास संपत्तीचा अर्धा हिस्सा आणि आईस संपत्तीचा अर्धा हिस्सा मिळेल. संपत्तीचा अर्धा हिस्सा तिच्याच ताब्यात राहून ती उपभोग घेईल.दत्त्क आपल्या मातेस संपत्तीच्या हक्कापासून वंचित करणार नाही.
6) द्विभार्या प्रतिबंध म्हणजेच एक पत्नीत्वाची तरतूद स्त्री जीवनाला स्थैर्य.
7) वडिलांच्या मिळकतीत मुलीला हिस्सा.
8) ज्यांना पारंपरिक पध्दतीने विवाह करायचा आहे, त्यांना मोकळीक मात्र वर्ण, जात, पोटजात या बाहेरिल व्यक्तीशी विवाह केला, तर तो कायदेशीर विवाह म्हणून मान्यता देणारी तरतूद.
9) स्त्रीला स्वत्:चा वारस ठरविण्याचा अधिकार.

या तरतूदीमुळे स्त्रियांना संपत्तीमध्ये हक्क् मिळाला आणि तिथे परावलंबित्त्व् संपविण्यास मदत झाली. द्विभार्या प्रतिबंध, वारसा हक्क्, दत्त्क विधान हक्क्, घटस्फोटाचा हक्क् आदींमुळे स्त्रीला गुलाम म्हणून दुय्यम दर्जाची वागणूक मिळणार नाही, उलट स्वतंत्र माणूस म्हणून जगण्याचा हक्क् मिळाला.

डॉ.आंबेडकरांनी आयुष्यभर् स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार केला. कुटुंब कुटूंबातील मुलांचा विकास, स्त्री-शिक्षण जबाबदारी, संपत्तीमध्ये स्त्रियांना वारसाहक्क्, स्त्रियांची शारीरिक-मानसिक-लैगिंक छळातून मुक्तता, द्विभार्या प्रतिबंध करुन स्त्रीसमानतेचा पुरस्कार, पडदा पध्दतीला विरोध आदीसंबंधी आपले विचार आणि कार्य याद्वारे डॉ. आंबेडकरांनी रणसंग्राम मांडला. संघटीत स्त्रीशक्तीच देशाच्या आर्थिक उन्नतीचा मार्ग निघू शकेल, असा विश्वास त्यांनी सतत व्यक्त् केला आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) बोल महामानवाचे अनुवाद संपादन डॉ. नरेंद्र जाधव, प्र.क्र. 14
2) संदर्भ स्त्री-पुरुष – डॉ अश्विनी धोंगडे , प्र. क्र. 22
3) तत्रेव खंड – 20 प्र. क्र. 403
4) तत्रेव खंड – 19 प्र. क्र. 202
5) तत्रेव खंड – 19 प्र. क्र. 202 , 203
6) तत्रेव खंड – 18 भाग- 2 प्र. क्र. 426, 427
7) भारताचे संविधान, संपादकीय संपा- प्रदीप गायकवाड प्र. क्र. 174
8) डॉ. बाबासाहेब आंबेडकर , लेखन व भाषणे खंड - 20 प्र. क्र. 421

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास.
# (A study of Economics thoughts of Dr. Babasaheb Ambedkar)

**प्रा. डॉ. सोमनाथ संभाजी लांडगे**
भूगोल विभाग,कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता.जि.बीड

**सारांश (Abstract)**

प्राचीन काळापासून भारतात अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली. अनेक परकीय देशांनी भारतावर राजकीय सत्ता प्रस्थापित केली. त्या त्या काळात फायदेशीर व नुकसानकारक विविध स्वरुपाचे आर्थिक बदल झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक थोर अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचे शिक्षण, लिखाण, भाषण, चर्चा, संशोधन कार्ये हे बहुतांश अर्थशास्त्र विषयाशी संबंधित आहे.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी दुय्यम स्वरुपाची माहिती वापरली असून ही माहिती अनेक ग्रंथ, शोधप्रबंध, नियतकालिके व दैनिकातून प्राप्त केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अर्थनिती व त्यांच्या अर्थनितीचे सद्यस्थितीतील महत्व तपासणे हे उदिष्ट्ये बाळगून सदर अभ्यास केला आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अर्थविषयक विचारापैकी प्राचीन भारताताचे व्यापारी संबंध, प्रशासन आणि अर्थनिती, राष्ट्रीय नफा, लहान जमीन धारण क्षेत्र, रुपयाचा उगम आणि विकास या ठळक घटकांचा अभ्यास केला आहे.

ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारने भारतीय जनतेची विविध करांच्या रुपाने खूप आर्थिक पिळवणूक केली असे बाबासाहेबांचे मत होते. ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेतील त्रुटीमुळे अर्थसंकल्पीय तुट प्रचंड प्रमाणात वाढली. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून डॉ. आंबेडकरांच्या मते लहान व विखुरलेली धारण क्षेत्र ही भारतीय शेतीची मुख्य समस्या आहे. भूमी, भांडवल व श्रम या घटकांचा संयोग योग्य प्रकारे घातला तर भारतीय कृषीचा विकास होऊन कृषी उत्पादकता वाढविण्यास मदत होईल. अतिरिक्त लोकसंख्येचा कृषीवरील भार कमी करण्यासाठी औद्योगिकीकरण हा उत्तम उपाय डॉ. आंबेडकरांनी सूचविला आहे. भारतातील जमिनीचे राष्ट्रीयीकरण करा आणि त्याचे पुन्हा विभाजन करा व कृषी उद्योग राष्ट्रीय उद्योग म्हणून घोषीत करा यामुळे सर्वांचा आर्थिक स्तर उंचावेल असे बाबासाहेबांचे मत होते. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतासाठी सुवर्ण विनिमय परिणामाऐवजी सुवर्ण परिणाम ही चलन पध्दती योग्य व आदर्श आहे. या पध्दतीमुळे अतिरिक्त चलनवाढ व भाववाढ यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक योगदान उल्लेखनीय असून भारताच्या सर्वांगीण विकासाकरिता त्यांचे आर्थिक विचार मार्गदर्शन ठरावेत.

**बीजसंज्ञा (Keywords)** भारतीय प्राचीन व्यापार, प्रशासन व अर्थनिती, वित्तीय व्यवस्था, जमीन धारण क्षेत्र, प्रांतीक विकेंद्रीकरण, चलन पध्दत.

## प्रस्तावना (Introduction)

भारत हा विविधतेने नटलेला व विसंगतीने फाटलेला देश आहे. येथे प्राचीन काळापासून आर्थिक विषमता खुप मोठ्या प्रमाणात आहे. यास अनेक सामाजिक, आर्थिक, राजकीय कारणे कारणीभूत आहेत. या सर्व करणाचा कमी–जास्त परिणाम प्राचीन, मध्ययुगीन, आर्वाचीन, स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय जनतेवर झालेला दिसून येतो. सर्व कारणे, परिणाम व उपाय यांचे संशोधनात्मक विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे.

## उदिष्ट्ये (Objectives)

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा परामर्श घेणे.
२) भारतातील आर्थिक स्थितीचा समाज व्यवस्थेवरील परिणाम विशद करणे.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे महत्व अभ्यासणे.

## संशोधन पध्दती (Research Methodology)

सदर संशोधनासाठी दुय्यम स्वरुपाची माहिती व सांख्यिकी (Secondary Information and data) वापरले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वच क्षेत्रातील कार्य व्यापक व बहुमुल्य आहे असे असले तरी येथे अभ्यासाची मर्यादा आर्थिक विचारापुरतीच पर्याप्त आहे. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक कार्य साधारणत: १९१३ ते १९५६ दरम्यानचे आहे. त्यांचे आर्थिक विचार एकाच ठिकाणी उपलब्ध नाहीत. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार संशोधन प्रबंध, ग्रंथ, भाषणे,

वृर्तमानपत्रातील लेख, परिसंवाद, परिषद, चर्चासत्र, विधयके या स्वरुपात उपलब्ध आहेत. याचा संशोधनासाठी आधार घेतला आहे.

**अल्प परिचय व योगदान (Brief History and contribution) :**

**कौटुंबिक जीवन (Family Life)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मुळ गाव महाराष्ट्रातील कोकण विभागातील 'आंबडवे' हे आहे. रामजी व भीमाबाई यांचे भीमराव हे १४ वे अपत्ये भीमराव आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील इंदौर जिल्ह्यात महू गावी झाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण ०६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथे झाले तर अत्यंसंस्कार मुंबई या ठिकाणी झाले. बाबासाहेबांच्या प्रथम पत्नीचे नाव रमाबाई तर द्वितीय पत्नीचे नाव सविता होते. बाबासाहेबांना पाच अपत्य होते.

**बशिक्षण (Education)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बी.ए. (डिसेंबर १९१२ मुंबई विद्यापीठ), एम.ए.(जून १९१५ कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका), पीएच.डी. (जून १९१७ कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका), एम.एस्सी (जून १९२१ लंडन विद्यापीठ, इंग्लंड), बार–ॲट–लॉ (जून १९२२ ग्रेजइन संस्था, लंडन), डी.एस्सी. (नोव्हेंबर १९२३ लंडन विद्यापीठ, इंग्लंड) या उच्च पदव्या प्राप्त केल्या. डॉ. आंबेडकरांनी ८ जूलै १९४५ रोजी मुंबई येथे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, २० जून १९४६ रोजी मुंबई येथे सिध्दार्थ महाविद्यालय, ६ जून १९५० रोजी औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची सुरुवात केली.

**लेखन कार्य (Writings)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी थॉट्स ऑन पाकिस्तान (१९४०) कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले (१९४५), शुद्र पूर्वी कोण होते (१९४६), दि अनटचेबल्स (१९४८), बुध्द आणि त्यांचा धम्म (१९५०) या महत्वपूर्ण ग्रंथसंपदा शिवाय अनेक महत्वाचे लेखन कार्ये केले.

**राजकीय योगदान (Political Contribution)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १३ ऑगस्ट १९२१ सक्तीचे मोफत शिक्षण घेण्याबाबत मध्यप्रांत कौन्सिलमध्ये ठराव पास करुन घेतला, १८ फेब्रुवारी १९२७ मुंबई विधिमंडळात निवड, १९ मार्च १९२८ मुंबई कायदे कौन्सिलमध्ये महार वतनासंबंधी विधेयक मांडले, १४ नोव्हेंबर १९३० लंडन पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांच्या प्रश्नांवर भाष्य, २९ जानेवारी १९३२ घटना सुधार पार्लमेंटरी समितीवर सदस्य निवड, १५ ऑगस्ट १९३६ स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना, १७ फेब्रुवारी १९३७ मुंबई असेंब्ली निवडणुकीत विजय, १९४० विधान सभेत महार वतन बील मांडले, १९ जुलै १९४२ ऑल इंडिया शेडूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, २० जुलै १९४२ मंजूर मंत्री पद कार्यभार स्विकारला, ऑक्टोंबर १९४७ भारताचे पहिले कायदा मंत्री शपथ, २६ नोव्हेंबर १९४६ संविधान सभेस सुपूर्द, २६ जानेवारी १९५० संविधान अंमलात आणले, २७ सप्टेंबर १९५१ हिंदू कोड बील संसदेत पास न झाल्याने कायदे मंत्रीपदाचा राजीनामा, ३० सप्टेंबर १९५६ रिपब्लिकन पक्ष स्थापनेचा निर्णय घेण्यात आला असे राजकीय योगदान होते.

**सामाजिक योगदान (Social Contribution)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक कार्य समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय, स्वाभिमान या मानवी मुल्यावर आधारित होते. २१ व २२ मार्च १९२० माणगाव परिषद, २० मार्च १९२७ महाड, चवदार तळ्याचा सत्याग्रह, १५ फेब्रुवारी १९२९ अमरावती–आंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह, १३ ऑक्टोंबर १९२९ पुणे–पर्वती मंदिर प्रवेश सत्याग्रह, ३ मार्च १९३० नाशिक–काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, ९ ऑगस्ट १९३० नागपूर–पहिली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद, २६ डिसेंबर १९३७ खेड (रत्नागिरी) चर्मकार परिषद, ३० डिसेंबर १९३७ पंढरपूर –अस्पृश्य वर्गाची परिषद, १४ ऑक्टोंबर १९५६ नागपूर–बौध्द धम्म दीक्षा घेतली. याशिवाय अनेक उल्लेखनीय सामाजिक कार्य बाबासाहेबांची आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार (Economic Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्र विषयाचा सखोल व सुक्ष्म अभ्यास केला. बाबासाहेब अर्थशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांनी भारतातील आर्थिक प्रश्नाबाबत मौलिख असे संशोधनात्मक विचार मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहुतांश शैक्षणिक कार्य हे अर्थशास्त्र विषयाशी संबंधित आहे. बी.ए., एम.ए. पीएच.डी., एम.एस्सी, डी.एस्सी. अशा सर्व उच्च शिक्षित पदव्या अर्थशास्त्र विषयातून प्राप्त केल्या आहेत. त्यामुळे त्यांना आर्थिक प्रश्नाची जाण अत्यंत सखोल व व्यापक स्वरुपाची होती.बाबासाहेबांचे आर्थिक विचार हे केवळ तत्कालीन स्वरुपाचे नाहीत. त्यांच्या आर्थिक विचारांना वैश्विक महत्व आहे. त्यांनी आपले आर्थिक विचार प्रामुख्याने संशोधन प्रबंध, लेख व भाषण, कमिशनला

दिलेल्या साक्षी आणि जाहीरनामा आणि विधेयक या स्वरुपात मांडले. यांचे अर्थशास्त्रीय विचार हे प्रामुख्याने शोध प्रबंधाच्या लेखन स्वरुपात आहेत. त्यांचे संशोधनात्मक कार्य खूप मोलाचे आहे.

**भारतीय प्राचीन व्यापार (Indian Ancient Trade)**

बाबासाहेब आंबेडकर १९१२ मध्ये मुंबई विद्यापीठातून बी.ए. पदवीधर झाले. पुढील शिक्षणासाठी १९१३ मध्ये अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए. पदवी शिक्षणासाठी गेले. कोलंबिया विद्यापिठाने २ जून १९१५ रोजी एम.ए. पदवी प्रदान केली. डॉ. आंबेडकरांनी एम.ए. पदवीसाठी कोलंबिया विद्यापीठाला प्राचीन भारतीय व्यापार या विषयावर शोध प्रबंध सादर केला. या शोध प्रबंधात मध्यपुर्वेशी व्यापार संबंध व ब्रिटीश कालीन भारतीय आर्थिक परिस्थिती याचे विश्लेषण केले आहे.

**ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती (Administration and Finance of the East India Company)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठाला १९१५ साली "Administration and Finance of the East India Company" ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि अर्थनीती या विषयावर प्रबंध सादर केला. या लघुशोध प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १७९२ ते १८५८ या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशासन आणि वित्तनिती धोरणातील बदलांची भारतीय जनतेवर कसा अन्याय झाला याचे आर्थिक विश्लेषण केले. ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटीश सरकार स्वत:चा कायदा करुन घेत होते. त्याची झळ मात्र भारतीय जनतेला सोसावी लागत होती. १७९२ ते १८५७ या काळात ईस्ट इंडिया कंपनी सरकारने म्हणजे ब्रिटीश सरकारने विविध प्रकारचे कर लावून भारतीय जनतेची पिळवणूक केली. जमिनीवरील कर खूप जाचक होता. शेतकरी या करामुळे कसा भरडला गेला आणि त्यांचे आर्थिक नुकसान कसे झाले व त्याचा परिणाम त्याच्या जीवनावर कसा झाला याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी केले. कंपनी सरकारने कंपनीचा विकास आणि विस्तार व्यापक स्वरुपात करण्यासाठी मोठया प्रमाणात कर्जे घेतली होती. महसूल आणि सरकारी कर्ज या स्वरुपात उभारलेल्या पैशाचा विनियोग फारच कमी प्रमाणात भारतीय जनतेच्या हितासाठी व विकासासाठी केला.

१८३४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापाराचा अधिकार नष्ट करुन ब्रिटीश जनतेला भारताशी व्यापार करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करुन ब्रिटीश सरकारची सत्ता प्रस्थापित करण्यात आली. कंपनी बरखास्त केली तेंव्हा कंपनी सरकारवर असलेल्या ६९३ लाख पौंड खर्चाचा भार भारतीय जनतेवर टाकून ब्रिटीश सरकारने भारतीय जनतेवर कसा अन्याय केला याचे विश्लेषण डॉ. आंबेडकरांनी केले. ब्रिटीश सरकारचे भारतातील आर्थिक कामगिरीचे मुल्यमापन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. 'भारताने इंग्लंडसाठी खूप मोठया प्रमाणात आर्थिक योगदान दिले. परंतु इंग्लंडचे भारतासाठी मात्र नगण्य आर्थिक योगदान राहिले. ब्रिटीश सरकारचे योगदान हे बिगर आर्थिक स्वरुपाचे आहे.'

**भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास (The National Dividend of India : A Historical and Analytical Study)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठात प्रोफेसर सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवीसाठी 'The National Dividend of India : A Historical and Analytical Study' (भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास) या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. १९१७ मध्ये त्यांना अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी प्रदान करण्यात आली. पीएच.डी. पदवीसाठी सार केलेला संशोधन प्रबंध पदवी प्रदानानंतर अकरा वर्षांनी १९२७ मध्ये इंग्लंडमधील किंग अँड कंपनीने 'The Evolution of Provincial Finance in British India' (ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती) या शिर्षकाने ग्रंथ प्रकाशित केला. शोध प्रबंधात ब्रिटीश केंद्र सरकार आणि त्यावेळची घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंध १८३३ ते १९२१ या कालावधीत कसे–कसे विकसित झाले याची मीमांसा केली आहे. १८३३ ते १९२१ या काळात ब्रिटीश भारतीय सरकारच्या वित्त व्यवस्थेचे संपूर्ण केंद्रीकरण झाले होते. कायद्याने राज्य, केंद्र सरकारचे मात्र कार्यकारी शासन घटक राज्यांचे असे स्वरुप होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रिटीश भारतातील प्रांतिक व्यवस्थेतील दोष याचे विश्लेषण केले. या व्यवस्थेत खर्चाचा अर्थसंकल्प करण्याचा अधिकार घटक राज्यांकडे होता, परंतु त्यासाठी लागणारा पैसा उभारण्याची जबाबदारी केंद्र सरकारची होती. घटक राज्य सरकारच्या मागण्या वाढत गेल्या. याचा परिणाम म्हणून केंद्र सरकारचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला. त्यामुळे केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट प्रचंड प्रमाणात वाढत गेली. या कारणामुळे १८७१ पासून केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प करण्याची पध्दत भारतात प्रथमच सुरु झाली. केंद्र व राज्य स्वतंत्र अर्थसंकल्प पध्दतीत १८७१ ते १९२१ या काळात केंद्र सरकार आणि घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधात अनेक

फेरबदल झाले. ही पध्दत अंमलात आणल्यानंतर सुरुवातीच्या काळात 'पुरविलेल्या रक्कमेपुरतेच अंदाजपत्रक' (बजेट बाय असाईनमेंट) असे घटक राज्यांच्या अर्थव्यवस्थेचे स्वरुप होते. वरील पध्दतीतील त्रुटी कमी करुन त्यानंतर 'उचलून दिलेल्या महसुलावर आधारित अंदाजपत्रक' (बजेट बाय असाईन्ड रेव्हेन्यूज) अशी पध्दत सुरु झाली. वरील दोन्ही पध्दतीत केंद्र सरकारने स्वत:च्या खर्चात बचत केली. परंतु घटक राज्यांच्या अर्थसंकल्पावरचा ताण वाढला. त्यांना उत्पन्न आणि खर्च यांच्यात मेळ साधण्यासाठी नवीन कर आकारणी करावी लागली. आधीच करांच्या बोजाखाली दबून गेलेल्या जनतेवर कराचा आणखी भार टाकण्यात आला. वरील दोन्ही पध्दतीमध्ये असलेले दोष लक्षात घेऊन 'महसुलाच्या हिस्सा वाटपावर आधारित' (बजेट बाय शेअर्ड रेव्हेन्यूज) पध्दत सुरु करण्यात आली. नव्या पध्दतीमुळे महसुली साधनांची केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांच्यात विभागणी करण्यात आली. केंद्र सरकार आणि घटक राज्ये यांनी गोळा केलेल्या महसुलाचा हिस्सा एकमेकांना द्यायचा अशी तरतुद करण्यात झाली. डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी वरील सर्व पध्दतीचे गुण– दोष विचारात घेऊन अभ्यास केला. डॉ. आंबेडकरांच्या मते, "पुर्वीच्या रचना सदोष किंवा कुचकामी ठरल्या गेल्या म्हणून नव्हेतर पुर्वीच्या वित्तीय व्यवस्थेला नवे स्वरुप देणे काळाची गरज ठरली."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रांतिक वित्ताची उत्क्रांती या संशोधनासंदर्भात प्रा. सेलिग्मन यांनी असे मत मांडले की, "भारतातील प्रादेशिक वित्ताबाबतच्या वस्तुस्थितीचे चित्रण आणि त्यातील बदलाचे तटस्थ विश्लेषण हे आंबेडकरांचे विशेष योगदान आहे. वित्ताच्या प्रश्नाशी संबंधित तत्वाचे एवढे तपशीलवार अध्ययन माझ्या पाहण्यात नाही." स्वातंत्र्योत्तर भारतात केंद्र सरकार आणि राज्ये सरकार यांच्यातील आर्थिक संबंध ठरविण्यासाठी वित्त आयोग सद्यस्थितीत निती आयोग नेमले गेले. वित्त व निती आयोगानी केंद्र व राज्य यांच्या धार्मिक संबंधाची पुनर्रचना केली. याचा मुलाधार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक योगदान आहे.

**भारतातील लहान जमीन धारण क्षेत्र व उपाय (Small Holdings in India and their Remidies)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कृषिविषयक आर्थिक विचार मांडले आहेत. १९१८ मध्ये "Small Holdings in India and their Remidies" (भारतातील लहान जमीन धारण क्षेत्र व उपाय) हा लेख The Journal of Indian Economic Society या नियतकालिकात प्रसिध्द झाला. भारतीय शेती हा अत्यंत महत्वाचा राष्ट्रीय उद्योग असून सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व सर्वाधिक आहे. कृषीचे अर्थव्यवस्थेत महत्व असले तरी कृषी उत्पादकता कमी आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे शेतीच्या धारण क्षेत्राचा आकार होय. डॉ. आंबेडकरांच्या मते धारण क्षेत्राचा आकार लहान तसेच ती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली ही भारतीय शेतीची समस्या आहे. शेतजमिनीचे विभाजन व विखुरीकरण याचा कृषी उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. या कृषी समस्येच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी असे विचार मांडले की, लहान व विखुरलेली जमीन धारण क्षेत्र ही भारतीय शेतीची मुख्य समस्या आहे. तेंव्हा जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी केवळ जमिनीचे एकत्रीकरण करणे पुरेसे नाही तर त्यांचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर धारण क्षेत्र करणे हे देखील महत्वाचे आहे. धारण क्षेत्र आहे का बिनकिफायतशीर आहे हे त्यांच्या आकारावर अवलंबून नसून इतर उत्पादन घटकांचे प्रमाण कितपत योग्य आहे. यावर अवलंबून असणे इतर उत्पादन घटक योग्य प्रमाणात उपलब्ध असतील तर मोठ्या धारण क्षेत्राप्रमाणेच लहान धारण क्षेत्र किफायतशीर ठरु शकतात. डॉ. आंबेडकरांच्या मते किफायतशीर धारण क्षेत्र म्हणजे 'भूमी, भांडवल व श्रम इत्यादी घटकांचा संयोग अशा प्रकारे होणे की, प्रत्येक घटकांचे प्रमाण व योगदान दुसऱ्या घटकांशी तुलना करता सर्वोच्च राहील.' जमिनीची उत्पादकता वाढविण्याचा खरा उपाय क्षेत्राचा आकार वाढविणे हा नसून भांडवल, श्रमिक व इतर उत्पादन घटकात वाढ करणे हा आहे. जमीन धारण क्षेत्र योग्य की, अयोग्य या संदर्भात उपभोगाऐवजी उत्पादनावर बाबासाहेबांनी भर दिला.

अतिरिक्त लोकसंख्या व भांडवलाची कमतरता या कारणानेच नाईलाजास्तव मजुरांचा वापर मशागतीसाठी अधिक करावा लागतो. अशावेळी श्रमिक आवश्यकतेपेक्षा जास्त असतात. उत्पादन घटकांच्या अयोग्य एकत्रीकरणामुळे कमी उत्पादकता आणि अकार्यक्षमता सिध्द होते. कृषी क्षेत्रावर अवलंबून असलेली अतिरिक्त लोकसंख्या तसेच भांडवलांचे प्रमाण वाढवून उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न केले तरी मजूर कमी लागतील आणि निष्क्रिय श्रमिकांच्या संख्येत भर पडेल. यालाच डॉ. आंबेडकरांनी 'निरर्थक आणि अनावश्यक श्रमिक' असे संबोधले. डॉ. बाबासाहेबांनी असे सुचविले की, श्रमिकांची उत्पादकता वाढवायची असेल तर अतिरिक्त श्रमिकांना कृषी क्षेत्रातून इतर क्षेत्रात सामावून घेणे हाच योग्य उपाय आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतीय शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी औद्योगिकीकरण हा उत्तम उपाय आहे असे मत मांडले. औद्योगिकीकरणामुळे कृषी क्षेत्रावरील भार कमी होईल. जमीनीचे विभाजन व तुकडीकरण नियंत्रित होईल. कृषी उत्पादकता, श्रमिकांची उत्पादकता, भांडवल गुंतवणुक, शेती करणाऱ्याचे उत्पन्न, बचत वाढेल आणि शेतकरी किफायतशीर धारणक्षेत्र निर्मितीकडे वळतील. जमिनीच्या तुकडी करणाला वारसा हक्क कायदा जबाबदार होता हे डॉ. बाबासाहेबांना मान्य नव्हते. तर त्यांच्या मते याला जबाबदार कारण म्हणजे जमिनीवर असणारा अमर्यादित लोकसंख्येचा भार हे होय. शेती हा एकमेव

व्यवसाय होता त्यामुळे जगण्यासाठी जमिनीचा लहानसा तुकडा आवश्यक होता. शेती किफायतशीर ठरते म्हणून किंवा राहणीमान खालच्या दर्जाचे आहे म्हणून शेती कसली जात नव्हती तर शेती व्यवसायापेक्षा दुसरा कोणताच व्यवसाय फायदेशीर उपलब्ध नव्हता. यामुळेच लहान धारण क्षेत्राला बाबासाहेबांनी पसंती दर्शविली याचा अर्थ असा नव्हे की, ते लहान धारण क्षेत्र एकत्रीकरणाच्या विरोधी होते.

डॉ. आंबेडकरांच्या मते पडीक जमीन भूमिहीन लोकांना शेती करण्यासाठी द्यावी. भूमिहीन लोकांचा धर्म, जात न पाहता किंवा असा भेद न करता पडीक जमीन द्यावी. बाबासाहेबांच्या मते सामुदायिक शेती पध्दत स्विकारली पाहिजे. यामुळे कोणी जमीनदार, कुळ किंवा भूमिहीन राहणार नाही. शेतीच्या मशागतीसाठी पाण्याचा पुरवठा जनावरे, अवजारे, खते, बी–बियाणे या स्वरुपात आर्थिक मदत सरकारने द्यावी. नियमानुसार कर सरकारने जमा करुन घ्यावा व राहिलेले उत्पन्न शेती करणाऱ्यामध्ये वाटले जावे. सामुदायिक शेती पध्दतीमुळे उत्पादकता आणि कार्यक्षमता कायम राहून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत होईल.

**“A study in the provincial Decentralization of imperial Finance in British India”**

एम.ए. आणि पीएच.डी. या दोन्ही पदव्या पूर्ण केल्या नंतर १९१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेहून (न्यूयार्क) इंग्लंडला (लंडन) निघाले. त्यांना ऑक्टोबर १९१६ मध्ये ‘लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्स’ येथे प्रवेश मिळाला. कोलंबिया विद्यापीठात अर्थशास्त्रात एम.ए. व पीएचत्रडीत्र पदवी पूर्ण केल्यामुळे त्यांना लंडन विद्यापीठाने बी.एस्सी. ऐवजी सरळ एम.एस्सी ला प्रवेश दिला. परंतु बडोदा संस्थानाची शिष्यवृत्तीची मुदत संपल्यामुळे व मुदत वाढ नामंजूर झाल्याने भारतात जाऊन कांही कालावधीनंतर परत येऊन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सवलत लंडन विद्यापीठाने दिली. डॉ. आंबेडकर आक्टोंबर १९१६ मध्ये एम.एस्सी व डी.एस्सी अभ्यासक्रम अपूर्ण ठेवून भारतात परतले. अपूर्ण अभ्यासक्रम लंडन जाऊन पूर्ण करयासाठी काहीच पैसे शिल्लक राहात नव्हते. अशात बाबासाहेबांना सिडन हॅम कॉलेज, मुंबई येथे प्राध्यापक म्हणून दोन वर्षासाठी नेमणुक मिळाली. ११ नोव्हेंबर १९१८ ते ११ मार्च १९२० पर्यंत प्राध्यापक म्हणून सेवा केली. अत्यंत काटकसर करुन पैसे जमा केले आणि ५ जूलै १९२० रोजी लंडनला गेले जून १९२१ मध्ये लंडन विद्यापिठाला एम.एस्सी. पदवीसाठी ‘A study in the provincial decentralization of imperial finance in British India’ या विषयावर शोध प्रबंध सादर केला आणि विद्यापीठाने तो स्विकारला. १९२१ साली त्यांना एम.एस्सी. पदवी प्रदान करण्यात आली.

**रुपयाचा प्रश्न : उगम आणि उपाय (The problem of the Rupee : Its origin and solution)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स’ येथे अर्थशास्त्रामध्ये डी.एस्सी. पदवी करीता १९१६ मध्ये प्रवेश घेतला. बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती मुदत संपल्यामुळे व मुदत वाढ नामंजूर झाल्याने ते परत भारतात आले आणि १९२० साली लंडनला परत गेले. ऑक्टोंबर १९२२ मध्ये डी.एस्सी पदवीसाठी “The problem of the Rupee : Its origin and solution”. (रुपयाचा प्रश्न : उगम आणि उपाय) हा संशोधन प्रबंध सादर केला आणि १४ एप्रिल १९२३ रोजी बाबासाहेब भारतात परत आले. नंतर नोव्हेंबर १९२३ मध्ये त्यांना डी.एस्सी पदवी प्रदान करण्यात आली. ही पदवी मिळविणारे बाबासाहेब हे पहिले भारतीय होते.

“रुपयाचा प्रश्न: उगम आणि उपाय” या विषयी लिहिलेल्या शोध प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय रुपयाची उत्क्रांती आणि भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती याची मीमांसा केली. भारताचा रुपया आणि इंग्लंडचा पौंड यांच्या संबंधाचा महत्वपूर्ण प्रश्न या अभ्यासात समाविष्ट होता. १८०० ते १९२० या कालावधीत भारतीय रुपयाची चलन म्हणून कशी जडणघडण होत गेली याचे सविस्तर विवेचन केले. त्या काळात भारतासाठी कोणती चलन पध्दती योग्य व आदर्श आहे. या संदर्भात वाद निर्माण झाला होता. भारतासाठी हे सुवर्ण परिणाम (Gold Standard) व सुवर्ण विनियम परिणाम (Gold Exchange Standard) या दोन चलन पध्दतीपैकी कोणती चलन पध्दत योग्य आहे हा वाद होता. सुवर्ण परिणामात सोन्याच्या नाण्यांचा चलन म्हणून वापर करण्यात येतो. तर सुवर्ण विनिमय परिमाणात कागदी नोटांचा चलन म्हणून वापर करण्यात येतो. डॉ. आंबेडकरांनी भारतासाठी आदर्श चलन पध्दती कोणती? या विषयी मुलगामी विचार मांडले.

प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ प्रा. किन्स यांच्या मते, भारतासाठी सुवर्ण विनिमय परिमाण ही योग्य चलन पध्दती आहे. यांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाण ही योग्य चलन पध्दती आहे. यांच्या मते सुवर्ण विनियम परिमाण हे लवचिक असल्याने भविष्यकालीन अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरेल. प्रा. किन्सच्या चलन पध्दतीला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला. कारण डॉ. आंबेडकरांच्या मते सुवर्ण विनिमय परिमाणात स्थैर्य राहू शकत नाही. या पध्दतीत लवचिकता हा गुणधर्म जरुर असेल. परंतु चलन निर्मितीवर आणि पुरवठ्यावर मर्यादा व नियंत्रण राहणार नाही. परिणामी अतिचलनाच्या पुरवठ्यामुळे चलनवाढ आणि भाववाढ यासारख्या समस्या निर्माण होतात. परिणामी रुपयाची किंमत कमी होईल आणि त्यातून

विनिमयाचे साधन म्हणून रुपयाचे स्थान अस्थिर होऊ शकेल. हे सिध्द करण्यासाठी बाबासाहेबांनी काही ऐतिहासिक पुरावे दिले. भाववाढीच्या समस्याने अनेकांना आर्थिक त्रास सहन करावा लागेल. त्यांना जीवन जगणे कठीण होईल. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या मते भारताला सुवर्ण विनिमय परिमाणाऐवजी सुवर्ण परिमाण ही चलन पध्दती योग्य आहे. या पध्दतीमुळे अतिरिक्त चलनवाढ व भाववाढ यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. भारतातील चलन आणि विल रॉयल कमिशनपुढे डॉ. आंबेडकरांनी १५ डिसेंबर १९२५ रोजी नमुद केले होते की चलन निर्मिती करणाऱ्या संस्थेवर अंकुश असण्याची आवश्यकता आहे. अन्यथा अनिर्बंध चलनपुरवठा आणि त्यातून भाववाढ होऊन आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चलन निर्मिती क्षमतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय बँकेची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. त्यानुसार १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व्ह बँकेची स्थापना करण्यात आली.

डॉ. आंबेडकरांच्या मते शोषण केवळ आर्थिक स्वरुपाचेच नसते तर सामाजिक, राजकीय, आर्थिक, वंशिक स्वरुपाचे देखील असते. भारतातील सामाजिक प्रश्न हे ऐतिहासिक काळापासून प्रामुख्याने जमिनीच्या अधिकारांशी संबंधित आहेत. जमिनीचा अधिकार उच्चवर्णीयांकडे राहिल्याने मागासवर्गीयांना जमिनीच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे या वर्गाचा किंवा समुहाचा विकास घडवून आणायचा असेल तर संपूर्ण भारतातील जमिनीचे राष्ट्रीयीकरण करा आणि त्याचे पुन्हा विभाजन करा व कृषी उद्योग सरकारी उद्योग म्हणून घोषित करा. यामुळे सर्वांचा आर्थिक स्तर उंचावेल.

## निष्कर्ष व शिफारशी (Conclusions and Recommendation)

### निष्कर्ष (Conclusions)

1. ब्रिटीश भारत सरकार व ईस्ट इंडिया कंपनीने भारताची आर्थिक लुट खूप प्रमाणात केली आहे.
2. लहान व विखुरलेली धारण क्षेत्र भारतीय कृषी उद्योगाची मुख्य समस्या आहे.
3. अतिरिक्त लोकसंख्येचा कृषी व्यवसायावरील भार कमी करण्यासाठी आद्योगिकीकरण हा उत्तम उपाय आहे.
4. कृषी व्यवसायास राष्ट्रीय उद्योगाचा दर्जा द्यावा.
5. आर्थिक चलनवाढ व भाववाढ यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुवर्ण परिणाम चलन पध्दत आदर्श आहे.

### शिफारशी (Recommendation)

भारतीय अर्थव्यवस्था आदर्श व समतोल विकसित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार अंमलात आणणे गरजेचे आहे.

### संदर्भ (Reference)


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ–दया पवार (निमंत्रक) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, डिसेंबर १९९३.
2. आर्थिक विचारांचा इतिहास–प्रा.ए.आर. रायखेलकर–पिंपळापुरे प्रकाशन, औरंगाबाद–जून २००५.
3. आर्थिक विचारांचा इतिहास–प्राचार्य डॉ. यू.बी. कोंडेवार–शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर (लातूर) ऑगस्ट २००५.
4. लोकराज्य–मनिषा पाटणकर (मुख्य संपादक)–माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई–ऑक्टोंबर २००६.
5. लोकराज्य–चंद्रेशखर ओक (मुख्य संपादक)–माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई–एप्रिल २०१५.
6. शिक्षण संक्रमण–कृष्णकुमार मा. पाटील (संपादक)– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–एप्रिल २०१६.
7. सकाळ दैनिक अंक–भीमा तुझ्या जन्मामुळे–एप्रिल २०१६.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा ज्योतिबा फूले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य

**डॉ. अरुण चांगदेव खर्डे[1] , कु. अक्सा ज़फर काझी[2]**

[1]अर्थशास्त्र विभाग प्रमुख एस.जी.आर.जी. शिंदे महाविदयालय, परंडा.

[2]संशोधक विदयार्थीनी एस.जी.आर.जी. शिंदे महाविदयालय, परंडा.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले हे महाराष्ट्रातील एक क्रांतीकारक पुरुष, ज्यांनी केलेले कार्य हे मूलतः मानवी समाजाच्या अभ्युदयासाठी केलेले आहेत, शतकानुशतके बहुजन व स्त्री वर्गाला शिक्षण देण्याचे अतिशय महत्वाचे कार्य केले. समाजपरिवर्तन व विकासाच्या दृष्टीनेशिक्षणाचे महत्व त्यांना पटले होते. समाजाचा शिक्षणाशिवाय विकास होणार नाही हे त्यांनी ओळखले होते.

'विद्येविना मती गेली, मति विना नीती गेली,
नितीविना गती केली, गतीविना वित्त गेले,
वित्तविना शुद्र रुचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले.'

शिक्षण हे जगण्याचे एक प्रमुख साधन आहे. मानवी समूहाच्या अभ्युदयासाठी शिक्षण ही प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. शिक्षणाने माणूस जागृत होतो. स्वाभिमानी होतो. म्हणून शिक्षण हे सुधारणेचे मूळ आहे. महात्मा ज्योतिबांच्या लक्षात ही गोष्ट आली आणि म्हणून त्यांनी ठरविले की, स्त्रियांना आणि शुद्रांना शिक्षण दिले पाहिजे. हा विचार अंमलात आणण्यासाठी त्यांनी पुणे येथे भिडयांच्या वाडयात १८४८ च्या ऑगस्ट महिन्याच्या आसपास मुलींची पहिली शाळा सुरु केली. या शाळेत महार, मांग, चांभार अशा अतिशुद्रांच्या मुली शिकु लागल्या. मात्र सनातन्यांना ही शाळा सहन होत नव्हती. शुद्रांना शिक्षण देणे हे धर्मशास्त्राच्या विरुध्द होते आणि मुलींना शिकविणे तर महापातक समजले जात होते. मुलींची शाळा सुरु ठेवणे हे मोठे कठीण काम होते. स्त्रियांच्या शिक्षणाला विरोध करणा-या मनुस्मृतीला आव्हान देत ते म्हणतात

आता तरी तुम्ही मागे होऊ नका । धिःकारुनी टाका मनुमता ।।
विद्या शिकताच पावल ते सुख । घ्यावा माझा लेख ज्योती म्हणे ।।

स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या त्रीसूत्रींवर विश्वास ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे महात्मा फुले हे पहिले पुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे' मार्टिन ल्युथर किंग' म्हणुन ओळखले जाते. कारण ते मानवतावादी विचार करणारे होते.

**संशोधनविषयाचीउद्दिष्टे:**

1. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
2. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यातील स्त्री शिक्षणाचा अभ्यास करणे.
3. महात्मा फुले यांच्या शेतकरी व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबाबत विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धति:** प्रस्तुत शोध निबंध हा द्वितीय साधनसामुग्रीवर आधारित असून यासाठी विविध ग्रंथ संकेतस्थळे, ग्रंथ मासिके, वर्तमानपत्र इ. अवलंब केलेला आहे.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार:**

महात्मा फुले यांनी हंटर आयोगाला दिलेल्या निवेदनात मुंबई प्रांतातील तत्कालीन प्राथमिक शिक्षणाबद्दल नाराजी व्यक्त केली होती. नव्वद टक्के खेडेगावात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. शेतक-यांच्या शिक्षणाबाबात तर भीषण दुरावस्था होती, आणि देशाचा विकास सुशिक्षितांवर अवलंबुन असतो. महात्मा फुले यांच्या शिक्षणाबाबत प्राथमिक मागण्या पुढीलप्रमाणे होत.

1. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे.

2. विद्यार्थ्यांनाशिष्यवृत्ती दयावी.
3. अस्पृश्यांचा वसाहतील स्वतंत्र शाळा सुरु करावी.
4. शिक्षकांना पुरेसे वेतन, प्रशिक्षण व प्रोत्साहन दयावे.
5. सर्वांना शेतीचे प्राथमिक ज्ञान दयावे.
6. अभ्यासक्रमात तांत्रिक, नैतिक, आरोग्य, शेतकी अन्य उपयुक्त कला यांचा समावेष असावा.
7. स्त्री, शुद्र व अतिशुद्रांच्या शिक्षणाकडे शासनाने लक्ष दयावे.
8. स्त्रिया, शुद्र व अतिशुद्रांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्वीकारावी.

शिक्षणामुळेच एक नवीन दृष्टी ही समाजाला देता येईल आणि समाजातील अंधश्रध्दा, रुढी, परंपरा व सामाजिक भेद दुर करता येईल. अंधश्रध्देमध्ये अडकलेल्या समाजाला ख-या अर्थाने आपल्या अस्तित्वाची जाणीव होईल आणि एक मुल्यधारा व वैचारिकता लोकांमध्ये परिवर्तीत झाल्याशिवाय समाजप्रबोधन व सामाजिक परिवर्तन घडून येणार नाही, याची जाणीव त्यांना होती.

**महात्मा फुलेंचे स्त्री शिक्षणाबाबतचे विचार:**

स्त्रियांच्या दुःस्थितीचे कारण म्हणजे हिंदु शास्त्रातीलस्त्रीयांच्या संदर्भातील तत्वे होती. या तत्वांचा पगडा स्त्री-मनावर व लोकमाणसावर पाडण्यात हिंदु शास्त्री प्रयत्न करीत होते. हिंदु शास्त्राच्या मते, स्त्रिया आणि शुद्र यांनी विद्येचा अधिकार नाही. स्त्री ही विश्वासास अपात्र, चंचल, अविचारी आहे, असे मानण्यात येई. स्त्रिलाशिक्षण दिले तर, ती कुमार्गास लागेल असा गैरसमज होता. म्हणूनच महात्मा फुले यांना स्त्रीशिक्षण अंत्यत मोलाचे आहे असे वाटत होते. म्हणून त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ स्त्रीशिक्षणापासुन केला. गृहीणीला शिक्षणाचे पाठ प्रथम दिले पाहिजे त्यामुळे कुटूंबात आपोआपच शिक्षणाचा प्रसार होईल. स्त्रियांची मानसिकता बदलण्यासाठी व तिला सक्षम स्त्री म्हणुन घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाहीहेमहात्मा फुले यांनी ओळखले होते. त्यामुळेच स्त्री शिक्षणाची सुरुवात त्यांनी आपल्या पत्नीला शिक्षण देऊन केली. इ.स. १९४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा सुरु केली. १७ सप्टेंबर १८५१ मध्ये रास्तेपेठेमध्ये दुसरी मुलींची शाळा काढली. या शाळा सुरु केल्यानंतर या शाळामध्ये अनुभवी शिक्षकांची चणचण भासू लागली. ही चणचण दुर करण्यासाठी व आदर्श असे शिक्षक, शिक्षिका तयार करण्यासाठी एक नॉर्मल स्कुल काढले. या नॉर्मल स्कूलमध्ये निरनिराळया जातीधर्माच्या मुला-मुलींनी प्रवेश घेतला. फातीमा शेख या शाळेची पहिली विद्यार्थीनी तसेच एकोणीसाव्या शतकातील भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका होय. या शिक्षणामध्ये त्यांनी अभ्यासक्रमात बाळशास्त्री कृत हिंदुस्थानचा इतिहास, मोडीवाचन, व्याकरण, शुध्द लिखान व ग्रंथावरुन व्याकरण करणे, भुगोल, युरोप, एशिया व हिंदुस्थानचे नकाशे, बाळबोध व मोडी अक्षर वळवने, गणित संख्या परिणाम आदि व्यवहार उपयोगी विषयांचा समावेश होता.

**सारांश:** महात्मा फुले यांनी शिक्षण हा समाजाचा तिसरा डोळा असे मानले होते. हजारो वर्षापासुन गुलामगिरीत असलेल्या स्त्रीयांना आणि अस्पृश्यांना समाजात मानाचे स्थान प्राप्त व्हावे. त्यांना समान दर्जा मिळावा, शिक्षणाचे दालन त्यांच्याकरीता खुले असावे. यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. महात्मा फुले हे एक महान समाजसुधारक होते. आजच्या घडीचा विचार करता नवा भारत व त्या भारतातील माणूस घडविण्यासाठी जरुरी असणा-या सामाजिक पुरुषार्थाची उभारणी महात्मा फुले यांनी आपल्या अविरत कष्टाने, धैर्याने व फार मोठया त्यागाने केली. ही उभारणी त्यांनी मानवी समानतेवर बंधुतेवर व व्यक्तीस्वातंत्र्यावर अधिश्ठीत अशी केली.

**संदर्भ:**


1. ना.ग. पवार, 'भारतीय समाज क्रांतीचे जनक- महात्मा फुले', पदमगंधा प्रकाशन, पुणे.
2. तानाजी ठोंबरे,'महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य', लोकवाडमय गृह, मुंबई
3. अ.रा. कुलकर्णी, 'महात्माजोतीराव फुले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य', डायमंड प्रकाशन, पुणे.
4. हंसदास यशवंत रामटेके, 'महात्मा फुले यांच्या वाडमयातील सामाजिक विचार', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद
5. श्रीराम गुंदेकर,'महाराष्ट्राचे शिल्पकार – महात्मा फुले',महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
6. धनंजय किर, 'महात्मा फुले समग्र वाडमय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# दिन दूबळयाचे कैवारी : महात्मा जोतीराव फुले

**प्रा. नरवडे श्रीराम**

समाजशास्त्र विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, लातूर

1827-1890 यादरम्यानच्या काळात शेतकऱ्यांचा मुलगा म्हणून आलेले अनुभव त्यांच्या लिखाणातून प्रकटपणे उमटलेले दिसतात. गोविंदरावांना मुलाच्या भविष्याविषयाच्या अपेक्षांवर शेजाऱ्या-पाजाऱ्यानी, पाणीपाडले आसले तरी ते पुण्यातील स्कॉटिश मिशनच्या हायस्कूलमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वाची उत्तम जडणघडण झाली, ब्राह्मण, प्रभू, क्षत्रिय कायस्थ,मुस्लीम, ख्रिस्ती अशी सगळया अठरापगड समाज घटकांतून आलेली मित्रमंडळी मिळून त्यांच्या विचारांच्या कक्षा सर्वसमावेशक झाल्या. थॉमस पेन यांच्या तत्त्वज्ञानाच्या राइट्स ऑफ मॅन या पुस्तकाचा त्यांच्यावर प्रभाव पडला.अशाच काळात साम्राज्यशाही विरुद्ध बंड खोरी करीत असणाऱ्या लहुजी मांगाच्या आखाड्यात जाऊन त्यांनी शक्तीसाधना केली.दांडपट्टयाचे प्रशिक्षण घेतले आणि इंग्रजी राजवट उलथून टाकण्याचे मनसुबे ते रचू लागले.

आशातच एका ब्राह्मण मित्राच्या वरातीत त्यांचा सनातनी ब्राह्मणांनी जेव्हा अपमान केला. तेव्हा त्या प्रसंगाने ज्योतिराव संतप्त झाले आणि नंतर अंतर्मुख झाले. तो पर्यंत फक्त मायभूमीच्या आणि राजकीय गुलामगिरीचाच विचार केला होता.

आता त्यांना जाणवले की समाजातील उच्चवर्णीयांची शूद्रातिशूद्रांना ज्या सामाजिक,आर्थिक, राजकीय,मानसिक, शैक्षणिक गुलामगिरीत ठेवले. त्या गुलामगिरीचे उच्चाटन झाले पाहिजे त्यातून निर्माण झालेले ज्योतिरावांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे व परखड ठरले. त्यांच्या कार्यामुळेच समाजात जागृती निर्माण झाली व समाजात परिवर्तन होण्यास मदत झाली. त्यामुळेच इंग्रजी सत्तेने त्यांचा गौरव केला म्हणूनच त्यांच्या विचारांचा परामर्श घेणे उचित ठरते.यामुळेच 11 मे 1988 रोजी मुंबईतील नागरिकांनी एक जंगी जाहीर सभा मांडवी कोळीवाडा येथे आयोजित केली. त्यात प्रतिष्ठित नागरिक, दुकानदार, कारखानदार, मजूर, शेतकरी मिळून 2500 लोक जमा झाले आणि ज्योतीबांचा यांचा गौरव म्हणून त्यांना 'महात्मा' ही पदवी बहाल केली. अशा थोर क्रांतीकारकांचे विचार खालील प्रमाणे मांडता येतील.

**राजकीय व प्रशासकीय विचार** :-

शेतकऱ्यांची नवी पिढी शिकून पुढे येत आहे, त्यांना न्याय हवा आहे, नवा रोजगार हवा आहे. पण त्यांना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी ही राजवट देत नाही अशी तक्रार ज्योतिरावांनी केली आहे. सरकार दरबारी गरीब शेतकऱ्यांची कोणी दाद घेत नाही. अगदी वरिष्ठ अधिकारी वगळता बाकी सगळा भरणा ब्राह्मणांचा असल्यामुळे नोकरशाहीला शूद्रातिशूद्र बद्दल आस्था वाटत नाही. उलट शेतकऱ्यांना त्यांचे अज्ञान व भाबडेपणा यांचा गैरफायदा हे नोकरशहा घेतात, त्यांना सर्वतोपरीने छळतात. इंग्रज अधिकारी त्या नोकरशहांना वेसण घालत नाहीत. ज्योतिराव म्हणूनच राणी व्हिक्टोरियाला विनवणी करतात.

"सत्ता तुझी राणी बाई हिंदुस्थानी जागृत नाही।
जिकडे तिकडे ब्राह्मणशाही डोळे उघडून पाही ॥
चहूकडे भट भाई कुणब्याची दाद नाही।
ज्योती म्हणे धाव घेई दूष्टा पासुनी सोडवाया ॥"

शेतकरी कष्टकऱ्यांची खरी परिस्थिती समजून घेण्याची पात्रताच काल व आजही सरकारमध्ये नाही भूतकाळ व भविष्यकाळाची शेतकऱ्यांची व कष्टकऱ्यांची चहूबाजूने होत असलेली कोंडी फोडण्यासाठीच. ज्योतिरावांनी "शेतकऱ्यांचा असूड" ह्या ग्रंथांमध्ये दिन दुबळयांचे दुःख वर्णिले आहे.

**स्त्रियांच्या उद्धारात फुले यांचे योगदान** :- महात्मा फुले यांच्या या काळात स्त्रियांना हीन, सुखाची व उपभोगाची वस्तू व चूल आणि मूल या विश्वाच्या बाहेर स्थान नसलेली एक दासी म्हणूनच तिच्याकडे पाहिले जात होते. अत्यंत वाईट समाजव्यवस्थेतील कुळचट विचारांमुळे स्त्रियांना हिनदर्जा दिला जात होता. या काळात स्त्रियांना शिक्षणाचा समाज अधिकारच देत नव्हता. स्त्रियांच्या शिक्षणामुळे शिक्षण भ्रष्ट होईल.अशी कल्पना समाजात रूढ होती.

जरठ विवाह,बालविवाह,सतीप्रथा, केशवपन यांना अशा प्रकारच्या अनेक समस्येत समाजव्यवस्थेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी चे फुले यांचे कार्य स्त्री उद्धाराचेच होते.

**स्त्री शिक्षणाचे जनक :-** स्त्री ही दोषांची व अज्ञानाचीखान असून तिला शिकवणे म्हणजे "वेड्याच्या हातात कोलीत देण्यासारखे होईल अशी समाजाची समजूत होती. मुलगी शिकली तर समाजाची पर्वा करणारच नाही. ती शाळेत गेल्यानंतर शिक्षण व्यवस्थेला काळीमा फासेल व तिची वाकडे पाऊल पडेल. पुस्तके वाचून धर्म नीतीचे व सद्‌गुणांचे पालन करणारच नाही याचीच कळकळ ज्योतिरावांना वाटली.

"जिच्या हाती पाळण्याची दोरी
ती जगाले उद्धारी"

असे म्हणत महात्मा फुले यांनी स्त्रियांना शिक्षणाची दारे उघडून दिली. त्या अगोदर देशात इस सन 1819 मध्ये अमेरिकन मिशन ने कलकत्ता येथे हिंदू मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. मिशन ने नंतर पुण्यात 1840 रोजी मुलींची दुसरी शाळा सुरू केली. परंतु या शाळा काही कारणाने बंद झाल्या नंतर मात्र 1848 मध्ये बुधवार पेठेतील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात जोतीरावांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. या काळात भिडे, सदाशिव हाटे, सखाराम परांजपे, जगन्नाथ हाटे,अण्णासाहेब चिपळूणकर, सदाशिवराव गोवंडे, मांडे बापू, बोरी विठ्ठल यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. या शाळेत दिनदुबळया, शूद्रातिशूद्र, स्त्रियांना शिक्षण मिळू लागले म्हणूनच त्यांना स्त्री शिक्षणाचे जनक म्हणतात. याच शाळेत मुलींना आपले हक्क व ज्ञान प्राप्त करून देण्यासाठी सावित्री ह्या स्वतःच्या पत्नीला स्त्री शिक्षिका म्हणून कार्य करण्यास तयार केले. म्हणूनच फुले यांनी मुलींना शिक्षण व स्त्रियांना शिक्षिका बनवण्याचे मोलाचे कार्य केले. यामुळे जोतीरावांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेड रोवली.

**सामाजिक कार्य :-**

1) विधवा विवाहाचा प्रयत्न
2) बाल हत्या प्रतिबंधक गृह 1863
3) बहुपत्नीत्वाला विरोध
4) जरठ विवाह अमान्य
5) केशवपन पद्धतीस विरोध
6) सती प्रथा विरोध
7) बालविवाह अमान्य
8) वाघ्या मुरळी प्रथेला विरोध (देवदासी)

हिंदू धर्मात स्त्रियांच्या अनेक समस्यांचा फार मोठा कलंक समाजाला लागलेला पाहून ज्योतिरावांचे मन हेलावून सोडले होते. शिक्षणाचा अधिकार स्त्रियांना नसल्यामुळेच त्यांना त्याच्या न्याय हक्काची जाणीव होणार नाही म्हणून शिक्षणाचे द्वार उघडले तरी त्यांच्या अनेक समस्यांमुळे स्त्रियांची होत असलेली मानसिक, शारीरिक, भावनिक व सामाजिक पिळवणूक थांबविण्यासाठी अहोरात्र प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे याची

जाणीवच फुले यांना आली होती. त्यामुळे त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार तर केलाच पण कुकर्मी समाजा पासून विधवा स्त्रियांना देण्यात येणारी वागणूक त्यांचे भोगी समाजा पासूनसंरक्षण करण्यासाठी विधवा पुनर्विवाहास मान्यता देण्यात यावी म्हणून कार्य केले.

विधवांना विशिष्ट प्रकारची वस्त्रे परिधान करावी लागत होती. केशवपन करावे लागत होते, सडके अन्न सेवन करावे लागत होते. सामाजिक, धार्मिक समारंभात सहभागी होण्यापासून त्यांना वंचित रहावे लागत होते आणि पुरुषांच्या नजरेतून आपला बचाव करण्यासाठी व अनैतिक संबंधाच्या जबरदस्ती पासून स्त्रिया स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न करत होत्या पण पुरुष प्रधान संस्कृतीत पुरुष जरी दोषी असला तरी समाजाच्या नजरेत दोषमुक्त पुरुष व दोषी स्त्री अशीच परंपरा रूढ होती. आर्थिक संपत्तीत तिला हक्क अधिकार नसल्यामुळे दळणकांडण करून आयुष्य जगावे लागत होते.

“मी लाडकी अण्णा तुमची लाडकी
मला कशी करता हो बेडकी”

बेडकी म्हणजे केशवपन केलेली स्त्री कुरुप अवस्था करून समाजाच्या नजरेतून आपला बचाव करण्यासाठी आई व वडील मुलीच्या केशवपनास सहमती देत होते आणि केविलवाण्या स्थितीत वडिलांकडे विधवा स्त्री विरोध करताना ज्योतिराव पाहत होते हे समाजाचे वास्तव दर्शन पाहणे फारच जिकरीचे होते त्याला विरोध करण्यासाठी चे पाऊल जोतीरावांनी उचलले व 8 मार्च1864 रोजी त्यांच्या कष्टाला यश आले गोरख यांच्या बागेत एका शेनवी जातीतील अठरा वर्षाच्या विधवेचे पुनर्विवाह,विधुराबरोबर घडवून आणला. बालविवाह मुळेच स्त्रियांना विधवांचे जीवन जगावे लागत आहे याची जाणीव फुलेंना झाली. म्हणूनच विधवा स्त्रियांचा पुनर्विवाहाचा जोरदार पुरस्कार त्यांनी केला. समाजाचा फारसा प्रतिसाद जरी मिळत नसला तरी समाजाच्या विचाराच्या विरोधात बंडखोरी करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतलेल त्यांच्या कार्यातून दिसून येते. बालविधवा पुरुषांच्या अनैतिक संबंधातून गरोदर राहत असत अशा वेळी समाजापासून स्वतःला वाचवण्यासाठी व आपले दुःख थांबविण्यासाठी अशी दुर्दैवी विधवा टोकाचे पाऊल उचलत हे याची जाणीव झाल्यामुळे 1863 मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन करण्यात आली हा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला आणि अशा पीडित स्त्रियांपैकी 1865 रोजी प्रतिबंधक ग्रहात एका स्त्रीने आपल्या मुलाला जन्म दिला. बहुपत्नीत्वाला विरोध करणे हे त्या काळात कठीण कार्य होऊन बसलेले होते. पुत्रप्राप्ती, संपत्तीचा वारस, या गोंडस नावाखाली एक पुरुष अनेक स्त्रियांबरोबर आपले वैवाहिक जीवन जगत एकाच पुरुषाला चार चार बायका व त्यानंतर होणारा संघर्ष ज्योतिराव फुले यांनी जवळून पाहिला आणि स्त्री शोषणाच्या विरोधात आपले पाऊल टाकले.जरठ कुमारी विवाह करणे ही एक प्रथा त्या काळी मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होती. 65 वर्षाचा पुरुष कमी वयातील मुली बरोबर विवाह करत असल्यामुळे विधवाविवाह, बालहत्या, केशवपन या समस्या समोर येत होत्या. सती प्रथेला विरोध ही प्रथा समाजात प्रचंड परिचित होती. आपल्या पतीबरोबर आपला जीवचिंतेत टाकनेपवित्र समजले जात होते त्यावेळी स्त्रिया विरोध करतात त्यांच्यावर जबरदस्ती केली जात होती.

शैक्षणिक कार्य

‘विद्येविना मती गेली
मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली
गतीविना वित्त गेले
वित्ताविना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले.’

महात्मा ज्योतिबा फुले यांनी 1873 साली “सत्यशोधक समाजाची स्थापना” करून दिनदुबळया व कष्टकरी समाजाला मनूच्या बंदिस्त धर्मग्रंथाच्या छायेत चूल आणि मूल या बंदिस्त कार्यातून जगाची खरी ओळख करून जग दाखवणाऱ्या माय माऊलीच्या उद्धाराची स्त्री शक्ती पुरुषांच्या शक्तीच्या बरोबरीची असते आणि तिचा अपमान होण्यापेक्षा समाजात ज्ञानाच्या ताकतीवर पुरुषाप्रमाणे स्त्रीला शिक्षण मिळावे म्हणून महात्मा फुले यांनी स्त्रियांना

शिक्षणाची दारे उघडण्याचे महान कार्य स्वतःच्या घरापासून म्हणजेच सावित्रीबाई फुले पासून सुरुवात केले. शिक्षण माणसाच्या मनात कुतूहल निर्माण करते. प्रश्न निर्माण करते ज्ञान हे कसल्याही व कोणत्याही दडपणाखाली नांदू शकणार नाही याची जाणीव स्त्रियांना करण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा फुले यांच्या विचारातून दिसून येते.

**दासी प्रथा :-**समाजात अनेक अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. त्यापैकी एक वाघ्यामूसळी प्रथा होय. देवस्थानाच्या नावाखाली आपली मुलगी देवाला दान अर्पण करण्याची अनिष्ट प्रथा सुरु आसलेल्या समाजात जोतीरावांनी हिंदु, मुस्लीम समाजात पुत्रप्राप्तीसाठी देवाला अथवा देवीला नवस बोलत व पहीला मुलगा अथवा मुलगी देवाला अर्पण करत असे या प्रथेला कडाडून विरोध करण्याचे कार्ये फुले यांनी केले.

**धार्मीक कार्य :-**

“थोडे दिन तरी मद्य: वर्ज करा।
तीच पैसा भरा। ग्रंथासाठी।।
ग्रंथ वाचताना मनी शोध करा।
देऊ नका थारा वैरभावा।।”

महाराष्ट्रात अनेक समाजाची लोक राहात होते. त्यांच्यात एक वाक्यता नव्हती महार, मांग, चांभार, ढोर, अशा दिन दलीत समाजावर अत्यंत शुद्र अतिशुद्राची वागणुक मिळत होती. त्यासाठी महात्मा फुले यांनी भरीव कार्य केले. समाजामध्ये आसणारा भेदभाव एक दुसऱ्याच्या स्पर्शाने होत आसलेला विटाळ सामाजिक, धार्मिक कर्यात मिळत नसलेली समान वागणुक लक्षात घेवून महात्मा फुले यांनी 1851 रोजी दलितांसाठी शिक्षण मिळाले पाहीजे म्हणून शाळा काढुन मंदीरावर खर्च करण्यापेक्षा शाळेवर खर्च करा हा संदेश समाजाला दिला व 1852 रोजी पूणे शहरात वेताळपेठेत अस्पृशासाठी शाळा सुरु केली आणि व्यवहारात सर्व समाजाला स्थान दिले. पाण्याची विहीर व हौद अस्पृश्य दलितांसाठी सार्वजनिक पाणवठे आणि मंदीरात प्रवेश मिळावा म्हणून 1868 रोजी स्वताच्या वाड्यातील पाण्याचा हौद खुला केला आणि म्हणुनच महात्मा फुले यांना दलितांचे व अस्पृश्यांचे कैवारी म्हणतात.दलित शिक्षणापासुन वंचित राहीला नाही पाहिजे म्हणुन शाळेची सुरुवात केलीच पण त्यांच्यासाठी स्वतंत्र वाचनालय स्थापन करुन पुस्तकातून मस्तक सुधारते हे सुधारणावादी क्रांतीकारक विचारक म्हणुन महात्मा फुले यांनी केलेले कार्य आज ही समाजासाठी फायद्याचेच आसल्याची जाणीव होते.

“निती हाच मानवी जीवनाचा आधार”

‘शेतकऱ्यांचा आसुड’ या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या दैयनिय दारीद्रय महात्मा फुले यांनी सांगीतले आहे. शेतक-यांच्या अनेक प्रश्नाला त्यांनी हात घातल्याचे व प्रस्तापित समाजव्यवस्थे विरोधी बंड करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फुले यांनी केल्याचे दिसुन येते म्हणुनच दिन दूबळयाचे कैवारी म्हणून त्यांना समाजात क्रांतीकारी समाजसुधारक म्हणुन ओळखले जाते.

**संदर्भ :-**

1) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ.अनिल कठारे
2) भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींचा इतिहास- डॉ.अनिल कठारे
3) भारतीय राजकिय विचारवंत – डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे
4) महात्मा ज्योतिराव फुले- पाप्युलर प्रकाशन, मुंबई
5) स्त्री स्वातंत्र्यवादीनी विसाव्या शतकातील परीवर्तन-खडपेकर विनया, पाप्युलर प्रकाशन, मुंबई
6) सत्यशोधकी साहित्य परंपरा आणि स्वरुप – डॉ.श्रीराम गुंदेकर

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# छत्रपती शाहू महाराजांचे शेती विकासातील योगदान

**डॉ. संभाजी आनंदा मोरे**
म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी ता. गगनबावडा जि. कोल्हापूर

शेती हा आर्थिक विकासाचा महत्त्वाचा घटक आहे .म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा मांडले गेले आहे. अनेक उद्योगांना देखील शेती व्यवसायावरच अवलंबून राहावे लागते कारण उद्योगांना लागणारा कच्चामाल पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य शेती व्यवसाय करीत असतो. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. शेती व्यवसायाचे महत्त्व फक्त भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही तर जागतिक दृष्टीने देखील त्याचे महत्त्व आहे. हे महत्त्व छत्रपती शाहू महाराजांनी ओळखले होते. म्हणुनच त्यांनी आपल्या कालखंडामध्ये शेती व्यवसायाला महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या कालखंडामध्ये जे शेती व्यवसायाशी निगडित महत्त्वपूर्ण निर्णय घेतले त्यासंबंधी सदरच्या पेपरमध्ये मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### कोल्हापूर संस्थानातील शेती

कोल्हापूर संस्थानातील जमीन काळी, पांढरी ,वालुकाश्म व रेतीची अशा प्रकारची होती. ही जमीन तीन प्रकारांमध्ये विभागली गेली होती.नदीपात्रजवळील जमीन काळी कसदार जमीन म्हणून ओळखली जायची. सह्याद्री पर्वतरांगाच्या उतारावरील जमीन लाल रंगाची जमीन होती. पन्हाळा गगनबावडा येथील तांबड्या रंगाची जमीन होती. येथे अनेक प्रकारची अन्नधान्याची पिके घेतली जात होती. येथील शेतकरी वेगवेगळी अवजारे शेती करण्यासाठी वापरत होता. पारंपरिक नागरी, कोळपा, तिफन, कुऱ्हाड व कुदळ या सारख्या अवजारांचा शेती कसण्यासाठी तो उपयोग करत होता. छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या काळात शेती व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी शेतीला पाणीपुरवठा,शेती आणि शिक्षण,शेतकी प्रदर्शन, अन्नधान्याची साठवणूक ,शेती आणि सहकार यासारख्या गोष्टींना महत्त्वाचे स्थान दिले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थान छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात आणि तद्नंतर सुजलाम-सुफलाम झाल्याचे दिसून येते.

### शेतीविषयक छत्रपती शाहू महाराजांचा दृष्टिकोन

छत्रपती शाहू महाराजांच्या हातात कोल्हापूर संस्थानाची सूत्रे आल्यापासूनच त्यांनी शेती व्यवसायाकडे लक्ष दिलें. शाहू महाराज इ. स. 1902 ला युरोप दौऱ्यावर गेल्यानंतर त्यांनी इंग्लंडमधील प्रसिद्ध असणाऱ्या रॉयल एग्रीकल्चर सोसायटी इंग्लंड चे' सभासदत्व स्वीकारले.[1] छत्रपती शाहू महाराजांना शेतीविषयक किती आवड होती हे त्यांनी दिलेल्या एका भाषणात दिसून येते,भारतातील जवळजवळ 80% लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत माझ्या राज्यातील सगळेच लोक शेती व्यवसायाशी निगडित आहे म्हणूनच माझा सर्व प्रयत्न शेतीत राबणाऱ्या सर्व लोकांच्यासाठी असेल.[2] राजर्षींच्या काळामध्ये क्षत्रिय लोक शेती व्यवसाय हा निकृष्ट दर्जाचा समजत होते. त्यांच्या मनातील हा विचार बदलण्यासाठी शाहू महाराजांनी कानपुर येथे भरलेल्या क्षत्रिय कृमी परिषदेमध्ये असा विचार मांडला की,माझ्या प्रिय शेतकरी बंधुनो मीही तुमच्यापैकीच एक आहे.माझेही पूर्वज शेतीच करत होते.मला तुम्ही अध्यक्ष बनविलात पण शेती हा पवित्र व्यवसाय आहे.शेतकरी एक बी शेतात पेरतो आणि त्यापासून हजारो बी पैदास करतो.त्यामुळेच शेती हा कधीच निकृष्ट व वाईट व्यवसाय नाही.[3] शेतीविषयी त्यांना फारच कळवळा होता म्हणून त्यांनी आपल्या युवराजाना परदेशात व आलाबादला शेतकी ज्ञान मिळवण्यासाठी पाठविले होते. शेती व्यवसाय

फायदेशीर बनविण्यासाठी त्यांनी शेतीबरोबरच पशुपालन व दुग्ध व्यवसायालाही चालना दिली त्यामुळे शेती व्यवसाय निकृष्ट नसून कसा चांगला आहे हे त्यांनी समाज मनावर बिंबविले होते.[4]

शेती व्यवसाय कसा चांगला आहे हे लोकांना पटवून देण्यासाठी त्यांनी इटलीतून काही अधुनिक तंत्रज्ञान कोल्हापूर संस्थानांमध्ये आणण्यासाठी प्रयत्न केले .जे लोक प्रत्यक्ष शेती करतात त्यांना इटलीत पाठविण्याची योजना त्यांनी केली होती.स्कॉटलंड आणि युरोपवर दौऱ्याच्या माध्यमातून शेतीसाठी काही आधुनिक तंत्रज्ञान भारतासाठी व कोल्हापूर संस्थांसाठी त्यांनी प्राप्त केले होते.[5] यातून शेती आधुनिक पद्धतीने केली पाहिजे हा त्यांचा विचार असल्याचे दिसून येते.

**राधानगरी धरण**

इ. स.1902 साली युरोपच्या दौऱ्यात शाहू महाराजानी तेथील देशस्थितीचे आणि समाजस्थितीचे बारकाईने निरीक्षण केले होते. युरोपातील लोकांनी निसर्गातील साधन संपत्तीचा प्रत्यक स्तोत्र मोठ्या कल्पकतेने आपल्या भौतिक प्रगतीसाठी वापरल्याचे पाहून ते प्रभावित झाले होते. आपल्याकडे असे का होऊ नये? आपण त्याचे अनुकरण का करू नये? असा विचार त्यांच्या मनामध्ये थैमान घालत होता.[6]

सह्याद्रीच्या माथ्यावर शेकडो इंच पाऊस पडतो त्यामुळे येथील नद्या दुथडी पावसाळ्यात भरून वाहतात आणि पावसाळा संपला की या नद्या कोरड्या पडू लागतात. सह्याद्रीत कोसळणाऱ्या पावसाचे पाणी अडवून काळयाभोर जमिनीत दिल्यास ही भूमी सुजलाम सुफलाम होईल हे त्यांनी ओळखले. इच्छाशक्ती असेल तर या जगात अशक्य ते काय आहे.अशा विचारात महाराजांनी राधानगरी धरणाचा पाया घातला.आपल्या जीवित कार्याचे स्वप्न साकार करण्यासाठी महाराज आपल्या सर्व शक्तीसामर्थ्यनुसार उभे राहिले होते.मायदेशी गेलेल्या कर्नल फेरीस या इंग्रज अधिकाऱ्यास लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात,आपण येथून निघून गेल्यावर मी सुमारे वीस बंधारे बांधले पण माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही म्हणून मी आता एक मोठा सिंचन प्रकल्प हाती घेणार आहे. संपूर्ण भारतात तो मोठा प्रकल्प असणार आहे.त्यासाठी मी माझी पूर्ण शक्ती पणाला लावणार आहे ही योजना यशस्वी व्हावी हीच माझी अंतरीची इच्छा आहे.[7]

**शेती क्षेत्रातील नवीन उपक्रम**

युरोपात शेती शास्त्रीय पद्धतीने करून अन्नधान्याचे उत्पादन आपल्यापेक्षा अनेक पटीने अधिक घेतले जाते हे महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते.तेव्हा आपल्या शेतकऱ्यांतही शेतकीतील आधुनिक ज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे या हेतूने महाराजांनी अनेक उपक्रम हाती घेतले. संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी 1912 साली त्यांनी कोल्हापुरात ंकिंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन केली.त्यासाठी एडवर्डच्या स्मरणार्थ जमा झालेला फंड सहा टक्के व्याजाने त्यांनी ट्रेझरी मध्ये ठेवला होता.[8] त्याच प्रमाणे कोल्हापुरात आधुनिक शेती अवजाराचे एक म्युझियम ही सुरू केले होते.

शेतकऱ्यांना सुधारित अवजारे,बी-बियाणे,रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती याचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका त्यांनी केल्या. शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव,ज्योतिबा यात्रा अशा प्रसंगी शेतकी प्रदर्शने भरवली जाऊ लागली. अशा प्रदर्शनांतून शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने,माहिती पत्रके आदीची मांडणी केलेले असे.त्याचबरोबर उत्तम पैदाशीच्या जनावरांचे ही प्रदर्शन भरवली जाई. काही प्रसंगी या शेतकी प्रदर्शना बरोबरच खास विज्ञान प्रदर्शन ही आयोजित केले जाई. आपल्या प्रजेमध्ये विज्ञानाविषयी गोडी उत्पन्न व्हावी असे महाराजांना वाटत असे. प्रजाजन विशेषतः शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने अशा प्रदर्शनाकडे यावा म्हणून त्यासोबत कुस्त्यांच्या दंगलीचे, मर्दानी खेळाचे सामने, हत्तीच्या झुंज यासारख्या करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात असे.[9]

शेतीच्या क्षेत्रात शाहू महाराज सतत नवनवीन प्रयोग करत असत भात, ऊस,भुईमूग ही नेहमीचीच पिके होती पण त्याशिवाय चहा, कॉफी,रबर,वेलदोडे,कोको यासारखी येथे कधीच न घेतलेली उत्पादने घेतली तर संस्थानाच्या शेतीचा कायापालट होऊन जाईल असे महाराजांना वाटत होते. त्यासाठी संस्थानातील पश्चिम भागात मुबलक पर्जन्यमान असणाऱ्या सह्याद्रीच्या रांगात उतार जमिनीवर त्यांनी चहा, कॉफी व रबर यांचे मळे तयार केले यापैकी चहाच्या मळयांचा प्रयोग अपेक्षेहून यशस्वी झाला. उत्कृष्ट दर्जाचा चहा कोल्हापूर संस्थानात उत्पादन होऊ लागला. लवकरच व्यापारी तत्वावर चहाचे उत्पादन सुरू होऊन पन्हाळा टी नंबर चार या नावाने तो संस्थांना बाहेर विशेषतः हिंदुस्थानातील राजेरजवाडे यांना पाठविला जाऊ लागला. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या तो खास आवडीचा चहा होता. आपल्याही संस्थानात चहाच्या लागवडीचा प्रयोग करावा असे त्यावेळी सयाजीराव यांना वाटू लागले.[11] शाहू महाराजांनंतर चहाच्या मळा या शेती उद्योगाकडे फारसे कोणी गांभीर्याने पाहिले नाही दुर्दैवाने कोल्हापूरचा पन्हाळा चहा कालौघात इतिहास जमा झाला.

शेती आणि शेतकी शिक्षण

शेतकी शिक्षणाची गरज विषेद करताना राजर्षी शाहू महाराज म्हणतात आपल्यातले बरेच लोक शेती करतात परंतु त्यांना शेतकी शिक्षणाची गरज वाटत नाही. येथे सध्या अशी एक चळवळ आहे की त्यांना शिक्षणाची गरजच वाटत नाही परंतु शेतीचे आधुनिकीकरण झाले असल्याने कोणीही व्यक्ती शेतीशी निगडीत पुस्तके वाचल्याशिवाय किंवा त्या विषयाचे ज्ञान आत्मसात केल्याशिवाय आपण शेतीत यशस्वी होणार नाही. येथील शेतकरी अशिक्षित व पारंपरिक पद्धतीने शेती करीत आहे. शिक्षणाशिवाय आधुनिक पद्धतीच्या वेगळया पद्धती आपणास आत्मसात करता येत नाही म्हणून त्यानी 1917 मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शेतकी शिक्षणाचे व पुस्तकांचे महत्त्व त्यांना फार महत्त्वाचे वाटत होते.20 जानेवारी 1913 च्या शासन ठरावानुसार शेतकी सुधारणा लेखक महादेव नारायण देवधर यांच्या पुस्तकाच्या 100 प्रती खरेदी करून ग्रामीण भागातील शाळेच्या लायब्ररीला वाटून द्याव्यात अशा पद्धतीचा ठराव त्यांनी शासन स्तरावर ठराव मान्य करून घेतलेला दिसून येतो.[12] यावरून शेतकी शिक्षणाचे महत्त्व त्यांना किती वाटत होते हे दिसून येते.

आधुनिक शेती शिक्षण घेण्यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील विद्यार्थ्यांना कर्जाची सुविधाही उपलब्ध केली होती. रामचंद्र धोंडू शेळके या गरीब विद्यार्थ्यास पाश्चिमात्य पद्धतीचे आधुनिक शिक्षण घेण्यासाठी त्यांनी अमेरिकेला पाठविले व त्याला पंधराशे रुपयचे कर्ज बिनव्याजी स्वरूपात दिले होते.[13] त्या वेळी विद्यार्थ्यांना शेती करावी लागत त्यामुळे त्यांना दिवसा शाळा जाणे अवघड होते अशा विद्यार्थ्यांना सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास शिक्षणाची सोय त्यांनी उपलब्ध करून दिली होती. जेणेकरून त्यांच्या शेतीचे नुकसान होऊ नये व त्यांना शेतकी शिक्षणही घेता येईल.[14] आपल्या राज्यातील जंगलाचा विकास व्हावा म्हणून शाहू महाराजांनी त्यावेळी आपल्या राज्यातील कामगारांच्या मुलग्याला डेहराडून येथे जंगल संवर्धनाचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले होते.आधुनिक शेतकी शिक्षण मिळावे म्हणून शाहू महाराजांचे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज यांनी 14 एप्रिल 1922 रोजी रामचंद्र बच्चाराम पंडित यांना कराडमधील लोकांना शेतकी शिक्षण देण्यासाठी परवानगी दिल्याचे दिसून येते.[15] अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कालखंडामध्ये शेतकी शिक्षणाचे महत्त्व पटावे म्हणून वेगळया मार्गाने प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**सारांश**

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक,धार्मिक व शेती विकासासाठी फार मोठे योगदान दिल्याचे दिसून येते.आपल्या संस्थानात शेती व्यवसाय हा महत्त्वपूर्ण व्यवसाय म्हणून शाहू महाराजांनी शेती व्यवसायाकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते.पाश्चात्य पद्धतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा

संस्थानातील शेतकऱ्यांनी वापर केला पाहिजे हा त्यांचा विचार दिसून येतो. शेतकऱ्यांनी कष्टा बरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला तर शेती शाश्वत स्वरूपाची होईल म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात वेगवेगळे प्रयोग केल्याचे दिसून येते.त्यामुळेच कोल्हापूर संस्थान छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात आणि तद्नंतर ही सुजलाम-सुफलाम झाल्याचे दिसून येते. याचे सर्व श्रेय छत्रपती शाहू महाराजांनाच द्यावे लागते.

**संदर्भ**

१) जाधव रमेश -लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी ,कोल्हापूर 1997.पा.311.

२) येडेकर शाम (संपादित)- राजर्षी शाहू महाराजांची भाषणे,मंगल प्रकाशन,कोल्हापूर 1971.पा.22.

३) डॉ.जयसिंगराव पवार-राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी प्रकाशन,कोल्हापूर 2001.पा.833.

४) येडेकर श्याम ibid, पा.33, 48.

५) संगवे विलास आणि खणे बि.डी.(संपादित) राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स, खंड चौथा,(1900-1905)शाहू रिसर्च इन्स्टिट्यूट,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. 1988.पा.335.

६) कित्ता-खंड 5,पा.72.

७) डॉ. जयसिंगराव पवार , idib,पा.202.

८) आर. ए.के.एस.1913- 14.पा.36.

९) संगवे विलास-ibid,खंड सहा,इंट्रोडक्शन पा.16, 24- 25.

१०) संगवे विलास- idib, खंड 4 ,इंट्रोडक्शन पा.6-7.

११ )येडेकर श्याम -op-cit,पा.9.

१२) संगवे विलास(संपादित)राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स,खंड 6,(1910 ते 1913 )शाहू रिसर्च इन्स्टिट्यूट शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.1994.पा.279.

१३)धटावकर भास्कर (संपादित)शाहू छत्रपती निवडक आदेश, (भाग एक) पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन मुंबई,1988.पा.92.

१४) देसाई संजीव पी.(संपादित) शाहू छत्रपतींचे निवडक आदेश,(भाग दोन) पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन मुंबई,1989.पा.51 ते 52

१५) ibid. पा.161.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# दलित साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. बसवराज गेनबा बोरकडे**
प्रभाकर पाटील एजुकेशन सोसायटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,वेश्वी , ता .अलिबाग, जि.रायगड.
rajuborkade@gmail.com

**प्रस्तावना:-**
भारतीय समाज हा जातीवाचक आहे .एक जात व साडेबाराचा पोटजातीच्या हजारो जातींच्या जंजाळात हिंदू समाजाला हजारो वर्षापासून जाणीपूर्वक अडकवून ठेवण्यात आलेले आहे. या जाती एवढ्या घट्ट आहेत कि भगवान गौतम बुद्ध नंतर परिवर्तनाची मोठी चळवळ सुद्धा येथे यशस्वी ठरू शकली नाही. अर्वाचीन काळात पहिला धक्का महात्मा फुले यांनी दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तर सामाजिक चळवळीत क्रांतीच घडवली. शतकानुशतके अंधारात राहणाऱ्या कोट्यावधी बांधवाना त्यांनी प्रकाशाच्या वाटेवर आणून सोडले व चालण्याचेही बळ दिले. हजार वर्षापासून जो सामान्य ज्ञान, सत्ता व संपत्तीचा अभावी गुलामी सोसत आलेला आहे अशा समाजास माणूस म्हणून उभे करण्याचा संकल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. त्यासाठी त्यांनी 'शिका, संघर्ष करा व संघटित व्हा' हा मूलमंत्र देऊन त्यांच्या चेतना निर्माण केली.

**गृहितके :-**

1. बौद्ध धर्मात असलेल्या स्वातंत्र्य ,समता व बंधुता अशा आधुनिक व लोकशाही व्यवस्थेत पोषक असल्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म निवडला.
2. आधुनिक भारतीय इतिहासातील सर्वात मोठे रक्तपातविरहित समाजक्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मदीक्षा मुळे घडून आली .
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आधुनिक मूल्यांनुरूप नव्या बौद्ध धर्माची मांडणी केली.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नव्या धर्मामुळे पैशाचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व वैचारिक जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडून आले.

**उदिष्ट्ये:-**

1. दलित साहित्य यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परीवर्तनवादीविचारांच्या अभ्यास करणे.
3. दलित समाज सुधारणा करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आलेल्या अडचणींचा अभ्यास करणे .
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या दलित साहित्य सुधारणाच्या चिकित्सक अभ्यास करणे .
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय दलितांना कायद्या मधून दिलेल्या अधिकारांचा अभ्यास करणे .

साठोत्तरी मराठी साहित्य प्रवाहात दलित साहित्य हा एक रसरशीत आणि वास्तववादी असा साहित्य प्रवाह म्हणून ओळखला जातो आज दलित साहित्य खूप विस्तारले असून त्यात विविधता हे आलेले आहे आज दिसणारा विशाल दलित साहित्याच्या प्रवाह आंबा कडे जाणे त्यांच्या निर्मिती प्रक्रियाच्या आढावा घेणे महत्त्वाचे ठरते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आणि त्यांच्या तत्त्वज्ञान आतूनच हे सत्य उगम पावल्याचे आपणास दिसते विशाल काय सांस्कृतिक व भौगोलिक विविधता असणाऱ्या भारताला घटनेच्या यात बांधून ठेवण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहेत तज्ञ जरी ती तज्ञ पत्रकार संपादक विधीत अज्ञान बंधनात राहून अन्याय अत्याचार आणि गुलामगिरी सहन करत होते त्या दलित समाजाला आत्मभान देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात घेऊन येऊन त्यांना त्यांचे अधिकार व हक्क परत मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान समाजसुधारक आहेत.

संघर्ष हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता आयुष्यभर त्याने संघर्ष केला जाती व्यवस्थेविरुद्ध संस्कृती विरुद्ध समाज व्यवस्थेविरुद्ध त्यांच्या संघर्ष अविरत सुरू राहिला जे जे वाईट आणि अन्य कार्यकर्ते त्या सर्वावर ग्राहकाने आणि चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे व त्या अंगीकृत करणे हा त्यांचा स्थायीभाव होता त्यांच्या संदर्भात योगेंद्र मेश्राम असे म्हणतात की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनातील सारी भाग प्राशन केले ते सूर्यासाठी प्रकार बनले तेजस्वी कणखर बनले आणि माणसाला माणूस न लेखणाऱ्या दृष्टी जुलमी रूढी परंपरा हिंदू संस्कृती व धर्म सत्ता याविरुद्ध ते तुटून पडले रणांगणावरील एखादी शूरवीरांच्या बाणाने ते आयुष्याच्या शेवटच्या

क्षणापर्यंत प्राणपणाने लढत राहिल्या का अर्थ युद्ध करा लढाई झगडा असा संदेश त्यांनी आपल्या दलित बांधवांना दिला हा माणूस दावा अन्यायाचा प्रतिकार युद्ध करा लढा झगडा असे संदेश त्यांनी आपल्या दलित बांधवांना दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान विचारवंत होते. त्यांनी दलित समाजाचे दुःख, वेदना त्यांचे कारण शोधले आणि त्यातून त्याना बाहेर काढण्याचे उपाय शोधला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजाचा उद्धारकर्ते आहेत. त्यांनी विषमतेविरुध्द लढा उभारला, माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेला त्यांनी नकार दिला. त्यांनी केलेले कार्य हे सहज सुलभ झाले नाही तर त्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष संबंधी योगेंद्र मेश्राम असे म्हणतात की, अत्यंत विविध परिस्थितीतून जात असताना त्यांच्या जीवन मार्गातील प्रतिवाद अडथाल्यानीच त्यांच्यामध्ये कमालीची जिद्द प्रचंड ताकद निर्माण केली.जीवनाच्या परिक्रमेतील प्रतिकूलतेने निर्माण केलेला डॉ. आंबेडकरातील चीड क्रोध व संताप हा सात्विक तितकाच स्वभाविक असल्यामुळे त्यांच्या मधील तो एका शक्तीचे रूप होता , परिस्थितीच्या आत्यंतिक भडिमार तंत्रिक विद्रोहीशाक्तीने भरले . विद्रोह सूर्य झाले .बंडखोर बनले. त्याच्या जीवनानेचअन्यायाची मनात भयंकर चीड निर्माण केली . प्रतिकाराची अफाट शक्ती पैदा केली आणि ते महान बंडखोर बनले. प्रतिकूलता , प्रतिवाद वा अडथळे सृजनाला पोषक ठरतात काय? सुजनसामान्यांना रडतात पण आंबेडकर मूक समाजाचा नायक झाली सारा बहिष्कृत भारत त्यांनी जागा केला.

**स्वातंत्र समता बंधुता यांचा पुरस्कार दलित साहित्य करते :–**

डॉ.बाबासाहेब आबेडकरांच्या मते समाज बलशाली होण्यासाठी तो समाज स्वतंत्र असला पाहिजे . व तिथे समता असली पाहिजे आणि त्या समाजात बंधुभाव असला पाहिजे. सामाजिक लोकशाहीचे तत्व म्हणजे आंबेडकरवादहोय. बाबासाहेंबाच्या मते राजकीय लोकशाहीत स्वतंत्रस हिरावून घेतली जातात आणी सामान्य माणूस केवळ गरजेपोटी, पोटाच्या भूकेसाठीगुलाम बनतो म्हणूनच राजकीय लोकशाही हि व्यक्तीच्या विकासासाठी घटक असते असे त्यांना वाटते .प्रत्येक माणसाला समान संधी उपलब्ध झाली पाहिजे त्याचा विकासामध्ये जात, धर्म, वंश, लिंगभेद आधी गोष्टी येत कामा नयेत असे बाबासाहेबांना वाटे म्हणूनच समता या तत्व्याचा पुरस्कार ते करतात .एकमेकाविषयी द्वेषभावना नसावी तर बंधुत्व्याची भावना असावी हा विचार बाबासाहेबांच्या आहे. बाबासाहेबांचे विचार भारतीय लोकशाहीला बळकटी देणारा आहे.

**मानवतावाद:-**

मानवतावाद म्हंटले कि भूतदया येते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावाद हृदयातून आलेला नव्हता तर तो बुद्धिप्रामाण्यावर उभा होता. विरोधासाठी विरोध अशी त्यांची भूमिका होती तर त्यांचा विरोध हा तत्त्वासाठी होता.तो विध्वंसक नव्हता तर विधायक होता. तो व्यक्तीविरुद्ध नव्हता तर प्रवृत्तीविरुद्ध होता. त्यांचे वैर ब्राह्मण व्यक्तीचे नव्हते तर ब्राह्मण वादाशी होते. ते अज्ञान अंधश्रद्धा, भेदभाव ,जातीयता, विषमता या सर्व शोषण व प्रवृतीच्याविरोधी होते . नवनिर्मितीसाठी, विधायक जनतेसाठी अशा विषमतेच्या जातीयतेचे ते कट्टर विरोधक होते. हाच त्यांचा मानवतावाद या हा बुद्धांचा मानवतावादीएकरूप आहे . मानवी विकासाचा ध्यास आहे .समग्र मानव जातीला पुढे घेऊन जाणारा तो मानवतावाद आहे .आज बाबासाहेबांना अपेक्षित असणाऱ्या मानवतावाद दलित साहित्याच्या मुळाशी असलेला आपल्याला दिसून येतो.

**जातिवाद व विषमतेला विरोध :–**

डॉ.बाबासाहेब आबेडकर हेजातिवाद आणि विषमतेला प्रचंड विरोध होते. त्या विरोधीच त्यांचा संघर्ष अविरत सुरु राहिला.त्यासाठी परंपरागत व्यवस्था त्यांनी धुडकावून देऊन नवी मूल्ये व स्वीकारले. जातिवाद, विषमतेत एक समाज दुसरा व्यक्तींचे हक्क अधिकार हिरावून घेतो ,त्यांच्यावर अन्याय ,अत्याचार करतो.त्यामुळे या व्यवस्थेला बाबासाहेबांचा विरोध होता. तो त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत राहिला .दलित साहित्यही बाबासाहेबांच्या विचारांचे समर्थन आपल्या साहित्यातून करताना दिसते .दलित साहित्यात ही जातीयता व विषम त्याला विरोधच आहे.

**बुद्धाचे तत्वज्ञान :–**

संपूर्ण मानव जातीला बुद्ध हवा आहे. ही गरज बाबासाहेबांनी बुद्धांचे तत्त्वज्ञान सांगून प्रतिपादन केली .महात्मा गौतम बुद्ध यांचे तत्त्वज्ञान साध्या सोप्या शब्दात लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. स्वतः बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला त्या. त्याचबरोबर बौद्ध धर्माची शिकवण महान असून ती मानव जातीच्या हिताची आहे. याचाही महत्त्व समस्त समाजाला पटवून दिले. महात्मा गौतम बुद्धांची अहिंसा आजच्या विश्वाला खूप आवश्यक आहे या संदर्भात आपल्या शब्दात मांडणी केले .

**आंबेडकर वाद :-**

आंबेडकरवाद हा मानवी मूल्यांवर आधारलेला मानवतावादच आहे . तो भक्कम अशा बुद्धिवाद आवर उभा आहे .बुद्धाचे तत्त्वज्ञान ही त्यांची मूळ बैठक असून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, विवेकनिष्ठ विद्रोह आणि विश्वात्मकता हीच त्यांची अंतिम धरणा असून तेच अंतिम ध्येय आहे .त्याचबरोबर विषमतेला, पिळवणुकीला , अन्यायाला व बुवाबाजीला, अंधश्रद्धेला ,ब्राम्हणशाहीला,भांडवलशाहीला, सामंतशाहीलानिकराचा विरोध आहे. डॉ. बाबासाहेबांना विवेक युक्त आणि विज्ञाननिष्ठ समाज हवाआहे . स्वातंत्र्य ,समता आणि बंधुता लोकशाही तत्त्वावर आधारित भारताचे स्वप्न ते पाहतात. थोडक्यात समाजातील अन्याय व विषमता जन्य परिस्थितीवर पोसल्या गेलेल्या प्रवृत्तीवर प्रहार करून माणसाला माणूसपण देऊन त्यांचे हक्क व प्रतिष्ठा त्यांना मिळवून देणे मानवी मूल्यांची जपणूक करणे हेच आंबेडकरवादाचे अंतिम ध्येय आहे हाच आंबेडकरवाद दलित साहित्यातून प्रकट होताना आपल्याला दिसतो. दलित साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जसे आहेत तसेच त्या साहित्यातून प्रकट होणारे विचारही डॉ.बाबासाहेबांच्या तत्वज्ञानातून आले आहेत.

**निष्कर्ष :-**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रमुख प्रेरणास्थान होते .
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार दलित साहित्याच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते .
3. स्वातंत्र्य ,समता, बंधुता या त्रियाचा पुरस्कार करताना दलित साहित्य दिसते.
4. दलित साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य आहे .

**संदर्भ ग्रंथ:-**

1. दक्षिण कोकणातील पुर्वास्पृश्यामधील बौद्ध धम्मदीक्षेनंतर परिवर्तन एक ऐतहासिक अभ्यास (इ.स.१९५६ ते २००६ )
2. प्रा. डॉ.विकास शंकर पाटील – 'डॉ.बाबासाहेब आबेडकर आणि दलित साहित्य ' आधार पब्लिकेशन अमरावती (२०२१) पृ.क्र.१२ – १४.
3. प्राचार्य, डॉ. पगारे म. सु ,दलित साहित्याच्या इतिहास, प्रशांत पब्लिकेशन. जळगाव २००५ .
4. डॉ. मेश्राम योगेंद्र,दलित साहित्य उद्गगम आणि विकास ,मंगेश प्रकाशन नागपूर, १९९८ .

# महात्मा फुले: वाङमय आणि कार्य

**श्री पवार सोपान जयसिंग**

सहशिक्षक विद्याभवन हायस्कूल, कळंब

एकोणिसाव्या शतकात समाज प्रबोधनाचे युग सुरू झाले आणि त्याचा परिणाम. व्यक्तिस्वातंत्र्य ,मानवतावाद ,वैज्ञानिकता ,सामाजिक ,व धार्मिक दास्यातून मुक्ततेचा विचार, लोकशाही इत्यादी बाबतीत विचार बळकट होण्यासाठी झाला. या शक्तीचे अग्रदूत म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले हे होते. एकोणिसाव्या शतकातील थोर कर्ते समाजसुधारक समतेवर आधारलेल्या समाजाची संकल्पना मांडणारे विचारवंत स्त्रियांसाठी शिक्षणाचा पाया घालणारे आद्यविचारवंत अस्पृश्यतेला प्रखर विरोध करून सामाजिक समता प्रस्थापित करणारे स्त्रियांसाठी व अस्पृश्य मुलांसाठी पुण्यामध्ये शाळा स्थापन करून शिक्षणाचा प्रवाह समाजातील गरीब लोकापर्यंत, तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यास फार कष्ट घेणारे, अंधश्रद्धांचे निर्मूलन करून समतावादी विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न करणारे ते म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले.

आद्यसमाजसुधारक थोर क्रांतिकारक विचारवंत महात्मा ज्योतिराव फुले यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक आदर्श गुण पैलू आहेत कवी, लेखक, विचारवंत ,धर्मचिकित्सक, शिक्षण महर्षी समाजकारणी ,समाजसुधारक आणि या देशातील असंख्य जनतेने सन्मानित केलेले भारतातील प्रथम महात्मा अशा असंख्य विशेषणाची ओळख ज्योतिराव फुले यांची आहे. कोणत्याही राजकीय अगर सामाजिक कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना ही ज्योतीबांनी समाजातील शूद्रादिशूद्र व स्त्रिया यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली. समाजातील अस्पृश्यतेच्या प्रश्नांसाठी मिमांसा करण्यासाठी आवश्यक असणारी सर्वस्पर्शी बुद्धिमत्ता, सखोल चिंतन करण्याची प्रवृत्ती आणि शूद्रातिशूद्रांबद्दलची प्रचंड कणव या त्यांच्या गुणांमुळेच समाजक्रांतीच्या प्रवाहात भविष्यकाळाचा अचूक वेध घेऊ शकले. शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ समाजातील सामान्य लोकांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार केला तर समतेच्या कल्पनेने निर्माण होणारा समाज सामाजिक समतेसाठी बंड करून उठतील या उद्देशाने त्यांनी शिक्षण व समता या साठी शूद्र व स्त्रियांना शिक्षण देण्याचे ठरविले त्या निश्चयाने त्यांनी शाळा काढण्याचा विचार अमलात आणला. सर्व जगाच्या दृष्टीने 1848हे वर्षे एक महान क्रांतिकारी ठरले. महात्मा फुले हे कार्ल मार्क्सच्या विचारांचे अभ्यासक होते .समाजातील सामाजिक क्रांती जर करावयाची असेल तर श्रीमंत-गरीब ही भेदभावाची निर्माण झालेली दरी कमी करण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे प्रभावी साधन आहे हे महात्मा ज्योतिबानी जाणले होते म्हणून त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात कामगिरी करण्यात प्राधान्य ,अग्रक्रम दिला. समाजातील अठराविश्वे दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या दीन दलित समाजातील मुली व मुलांसाठी शाळा सुरू केल्या अर्थात हे काम खूप महाकठीण एक प्रकारचे दिव्यच होते. जे आतापर्यंत कोणालाच जमले नाही ते महान कार्य ज्योतिबा फुले यांनी प्रयत्नपूर्वक केले.19 व्या शतकात स्त्री व शुद्ध यांच्यासाठी शाळा सुरू करण्याचे व चालवण्याचे प्रयत्न सफल झाल्याचे दिसून येईल या काळात महात्मा फुले या दांपत्याचे शैक्षणिक कार्य कितीतरी मोलाचे अलौकिक होते .महात्मा फुले यांची चतुसूत्री म्हणजे सदाचार, विवेक ,सहिष्णुता व न्यायप्रियता ही होती. मानवतेची पूजा हाच एक ध्यास होता. समाजातील माणसाचे अंतःकरण शुद्ध ,निर्मळ असावे त्यांने इतरांशी दयाळूपणाने वागावे व सत्याशी कास धरावी प्रामाणिकपणा समाजात ताठ मानेने जगण्यासाठी जनतेने निर्भीडपणा अंगी असणे आवश्यक आहे .महात्मा फुले यांच्या एकूणच विचारदृष्टी ,कार्यपद्धतीचा आणि त्यांच्यातील सुधारकांचा प्रत्यय आपणास येतो .जोतिरावांनी याच काळात समाज सुधारण्यासाठी आपली लेखणी प्रतिभाही समाज उत्कर्षासाठी झीजवली जोतिरावांनी ग्रांथिक स्वरुपात केलेले लेखन ही मराठी साहित्यातील अपूर्व देणआहे. महात्मा फुले यांनी आपल्या आयुष्यभरात विविध पातळीवर समाज हिताशी प्रेरक असे महान कार्य केले आहे.

समाजाच्या उत्कर्षासाठी ,उन्नतीसाठी त्यांच्यातील अज्ञानाचा अंधकार दूर करण्यासाठी अज्ञानी मूक समाजाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी तळमळीने प्रयत्न केले त्यांच्या या समग्र लेखना मधून मानवी समाजाला आवश्यक असणारे वाङमयीन साहित्य त्यांचे समग्र लेखन दृष्टीस येणे आवश्यक होते .समाजाने त्यांच्या साहित्यातील

मूल्येदर्शन ,विचार दर्शन समजून घेणे काळाची गरज आहे .महात्मा फुले यांनी आपल्या वाङमय लेखनातून समाजहितकारक मुल्ये रुजविली आहेत ही मुल्ये पारंपारिक आणि आधुनिक स्वरूपाची असतात त्यालाच नैतिक, सामाजिक आधुनिक ,तथा लोकशाही आजच्या परिभाषेत संविधानिक मुल्ये असे आपण म्हणतो .ही परिवर्तनीय स्वरूपाचची असून वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित आहेत. ही जी मूल्ये आहेत ती म्हणजे स्वातंत्र्य ,समता, बंधुत्व , न्याय, मानवता उदारता ,विज्ञाननिष्ठा ,प्रज्ञा ,करुणा ,धर्मनिरपेक्षता उद्बोधन या नावाने ओळखले जातात ही मुले कालसापेक्ष आणि परिस्थितीसापेक्ष परिवर्तनशील असून मानवी जीवनास व मानवी व्यवहारात योग्य संस्काराची बीजारोपण केले आहे.

महात्मा फुले यांच्या वाङमयातू साहित्यातून मानवी जीवन वादी मूल्य स्वीकारून लेखन व्यवहार केला आहे .सत्यशोधक समाजाने सामाजिक क्षमतेचा पुरस्कार केला. जातीयता निर्मूलन व्यक्तीस्वातंत्र्य, मानवता आणि बंधुता ही मूल्ये समाजात रुजविण्याचा प्रयत्न केला आहे महात्मा फुले यांनी समाजाला सत्यधर्माचे तत्वज्ञान सांगितले आहे .स्वावलंबन ,स्वाभिमानाचा मार्ग दाखविला गरीब व दलितांचे शोषण करणाऱ्या विरुद्ध ठोक पाऊल उचलले होते. सामाजिक सुधारणा यांचे प्रमुख साधन म्हणजे शिक्षण होय. त्यांनी वाङमयाच्या माध्यमातून ,शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील लोकांची सुधारणा घडवून आणली हे महत्त्वाचे कार्य महात्मा फुले यांनी केले आहे. समाज सुधारण्यासाठी अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अंधकारातून प्रकाशाकडे ,अंधश्रद्धेतून विज्ञानाकडे विषमतेकडे समतेकडे ,अन्यायाकडून न्यायाकडे , वैरत्वाकडून बंधुत्वाकडे, जातीयवादाकडून धर्मनिरपेक्षतिकडे इत्यादी घेऊन जाणारी मानवी मुल्ये समाज निर्माण करू शकतात .ही मुल्ये आपल्या समाज विकासासाठी वाङमयातून समाजापुढे आणले आहेत .अशा मूल्यविचारांची गरज ओळखून महात्मा फुले यांनी सामाजिक सुधारणेचे अग्रदूत असणाऱ्या व्यक्तिमत्त्व आणि आपली लेखणी मानवी कल्याणार्थ झिजवली आहे. अशी ही आधुनिक मानवाला समाजाला फुले यांनी आपल्या साहित्य लेखणीतून समाजमनात बीजारोपण केलेली आहेत. आपल्या वाङमय लेखनातूनही मुल्ये समाजातील लोकांच्या मनावर, आपल्या जीवनात उपयोगी पडावेत हा त्यामागचा हेतू होता. महात्मा फुले यांचे वाङमय हे जाणिवेने कनवेने लिहिलेले आधुनिक काळातील समाजासाठी परखडपणे लेखन केले आहे .महात्मा फुले यांच्या वाङ्याचा आणि विचारांचा एक अतूट अनुबंध आहे. सध्या या विचाराकडे फारसे विचारपूर्वक पाहिले पाहिजे होते परंतु तेवढे पाहिले गेले नाही हे वास्तव आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून त्यांच्या हातून निर्माण केलेले वाङमय ही अत्यंत महत्त्वाच्या दस्तऐवज आहे. महात्मा फुले यांचे व्यक्तिमत्त्व विचारवंत, प्रभावी लेखक असे होते .महात्मा ज्योतिराव फुले यांनी विपुल साहित्य लेखन केले आहे. ब्राह्मणांचे कसब(1869), गुलामगिरी(1873), शेतकऱ्याचा असूड (1883),सार्वजनिक सत्यधर्म(1891 ),तृतीय रत्न (नाटक1855), छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा(1869), इशारा (1885),अस्पृश्यांची कैफियत(1885), अखंडादी काव्यरचना , इत्यादी ग्रंथाचे लेखन मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे .साहित्यातून चिकित्सक विचार ,भाषाशैली ,परखडपणा ,तत्त्वनिष्ठा इत्यादींचा उलगडा होतो. वरील साहित्यातून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा ,सामाजिक कार्याचा विचार समाजापर्यंत पोहोचण्याचा महात्मा फुले यांनी प्रयत्न केला आहे.महात्मा जोतीराव फुले यांचे ब्राह्मणाचे कसब(1869) हा ग्रंथ याच वर्षी पुढे आला आहे. या ग्रंथाला महात्मा फुले यांचे खंडावादी काव्य म्हटले जाते .अभंगात्मक रचना या ग्रंथामध्ये लिहिले आहेत. त्यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. या ग्रंथातून फुले यांचे लेखन व विचारदृष्टीचा, प्रभावाचा प्रत्यय वाचकाला येतो. शूद्रातिशूद्र समाजावर कोणते संकट ओढवले हे तत्त्वज्ञान सांगणारा हा त्यांचा ग्रंथ म्हणजे ब्राह्मणाचे कसब होया.या ग्रंथांमध्ये नऊ भाग केलेले आहेत .या ग्रंथातून पुरोहितशाहीच्या कचाट्यातून शूद्रातीक्षुद्राना ज्ञान मार्गाकडे परावर्तित करणे हा या ग्रंथाचा मूळ हेतू आहे. गुलामगिरी (1873 )गुलामगिरी महात्मा फुले यांनी लिहिलेला ग्रंथ आहे .या ग्रंथात फुले यांच्या मानवतावादी दृष्टिकोन व्यक्त होतो .समाजातील अन्यायवृत्ती दोषयुक्त व्यक्तिमत्त्वाचे व त्यांच्या वृत्तीचे जोरदार खंडन केले आहे. प्रस्तुत ग्रंथामध्ये प्रचलित समाजरचना त्यांमधील चालीरीती, परंपरा, रूढी इत्यादी समाजातील लोकांवर होणारा परिणाम आपल्या शब्दात रेखाटलेला आहे.शुद्रादिशुद्राचे यांचे कष्टप्रद जीवन फुले यांनी स्वानुभवाच्या पातळीवर लेखन या ग्रंथात केले आहे.

शेतकऱ्याचा आसूड( 1883 )महात्मा फुले यांनी लिहिलेला शेतकऱ्याचा असूड हा ग्रंथ 1883 मध्ये प्रसिद्ध झालेला आहे .हा ग्रंथ शेतकऱ्याची वस्तुस्थितीदर्शक ग्रंथ अतिशय महत्वपूर्ण आहे. आपला भारत देश हा शेतीप्रधान

देश आहे. बहुतांशी लोक शेतीव्यवसाय करून आपला उदरनिर्वाह भागवतात. शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नाला केंद्रबिंदू मानून त्यांनी अभ्यास चिंतन करून विचारांची सुसंगत सुरेख मांडणी केली आहे. शेतकऱ्यांची समाजातील स्थान पराकोटीचे अज्ञान रूढीग्रस्त, आर्थिक , आर्थिक कुचंबणा, संकटे इत्यादी पैलू विषयी विषयी विचारमंथन जोतिरावांनी केले आहे. शेतकऱ्याची अधोगती त्यांचे कारणे याला उजाळा देण्याचा महान कार्य महात्मा फुले यांनी केले आहे .शेतकऱ्याची पूर्वस्थिती त्याचे होणारे शोषण त्यांचे अज्ञान त्यांच्या हालअपेष्टा व त्यावरील उपाय इत्यादी बाबतीत महात्मा फुले यांचे अनुभव विचाराने चिंतन शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात एकवटलेल्या आहेत. सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक हे जोतिराव फुले यांच्या साहित्यलेखनातील एक सुंदर व उत्कृष्ट कलाकृती आहे . धर्मविषयक कल्पना फुले यांनी या ग्रंथात मांडल्या आहेत. मनुष्यधर्म कशाने सुखी होईल .समाजातील लोकांनी सत्यवर्तन केल्याशिवाय मानव प्राणी जगात सुखी होणार नाही. सत्य सर्वांचे आधी घर ,सर्व धर्माचे माहेर, जगामाजि सुख सारे, खास सत्याची ते पोरे, सत्य सुखाला आधार ,बाकी सर्व अंधःकार अशा तऱ्हेने सार्वजनिक सत्यधर्मात धर्मसमान लेखणारा हवा यावर भर देण्यात आला म्हणजे सर्वधर्मसमभाव ही मुल्ये सांगण्याचा प्रयत्न ते करतात. फुले यांनी समता ,मानवता ,बंधुता, सत्यनिष्ठा इत्यादी मुल्ये ग्रंथात मांडलेली आहेत. अखंडादी काव्यरचना महात्मा फुले यांनी आपल्या पद्यात्मक रचनेला अखंड हे सार्थ नाव दिले. त्यांनी सातत्याने अखंड साहित्य लिहिले आहेत .या अखंडादी काव्यरचनेला एकत्र करून अभ्यासकांनी पुढे आणले आहेत. अखंडामधून प्रामुख्याने सर्वच मानवतावादी जीवन प्रवाही अशा मूल्याचे दर्शन आपणास घडते मानवता , धार्मिक, कर्मकांड ,शूद्रातिशूद्रांना उपदेश केला आहे. एकूणच अखंडामधून विविध प्रकारची ज्ञानमुल्ये मानवता मुल्ये अखंडादी काव्यारचनेत मांडले आहेत.महात्मा फुले यांच्या वाङमयाचे जाणवलेले वेगळेपण व त्यांच्या साहित्यातील असलेली आदर्शवत मुल्ये आपल्या साहित्यातून वाचकाच्या मनावर ठसा उमटविला आहे .सत्यशोधक समाजाची धुरा त्यांनी अधिक जोमाने सांभाळी. महात्मा फुले यांची दृष्टी व्यापक होती .त्यांचे वाङमय दूरदृष्टीचे आहे. सामान्य माणसाचा उद्धार करणारे आहे .प्रगती करणारे आहे म्हणून त्यांचे अस्सल वाङमय आहे .त्यांच्या आधुनिक नवविचार मानवतावादी प्रवृत्तीच लेण समाजजीवनात रुजविण्याचा ध्यास फुले यांनी आपल्या वाङमयातून केला आहे .पारंपारिक विचाराला छेद देत मानवी मूल्यांचे अधिष्ठान असलेले एकमेव वाङमय म्हणून महात्मा फुले यांचा गौरव करता येईल त्यांच्या साहित्यातून समता, स्वातंत्र्य ,बंधुता, न्याय, प्रेम, अहिंसा, वैज्ञानिकता, मानवता , सामाजिकता या सर्व मूल्यांचे प्रतिबिंब त्यांच्या वाङमयात उमटलेले आहे.

महात्मा फुले यांना जे समाज परिवर्तन अपेक्षित होते ते म्हणजे बहुजनांचे शिक्षण हे होते. महात्मा फुले यांनी आपल्या कार्याची सुरुवात ही स्त्रीशिक्षणाच्या कार्यानेच केली होती .तत्कालीन समाज हा मुलींना शिक्षण देण्याच्या विरोधात होता. स्त्रियांना विद्येचे दरवाजे बंद होते .समाजात असलेल्या बालविवाह ,सतीची प्रथा यासारख्या अनेक रूढी मुळे स्त्रियांवर अन्याय होत होते अशा परिस्थितीत स्त्रियांच्या उद्धारासाठी फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या कार्याची सुरुवात केली. स्त्री समस्यांचे मूळ अज्ञान आहे हे लक्षात घेऊन ज्योतिराव फुले यांनी इ.स.1848 मध्ये पुणे येथे भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली .या शाळेत महात्मा फुले स्वतः शिक्षकाचे काम करीत होते परंतु त्यांच्या कामाचा व्याप वाढल्यामुळे त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले शाळेत शिक्षिकेचे काम करु लागल्या इ.स.1851 मध्ये मुलींची दुसरी शाळा सुरु केली .समाजातील लोकांनी त्यांना विरोध केला तरीही ज्योतिराव फुले यांनी समाजाच्या विरोधाची पर्वा न करता स्त्री शिक्षणाचे मोलाचे कार्य जोमाने अविरत पुढे सुरू ठेवले होते म्हणून त्यांना भारतीय स्त्री शिक्षणाचे आद्यप्रवर्तक म्हणून गौरविले जाते. आधुनिक भारताला पहिला समाज क्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले हेच होत; कारण विचाराने व कर्तुत्वाने असामान्य होते .साहित्यिक ,विचारवंत व क्रांतिकारक ,समाज कार्यकर्ते होते. महात्मा ज्योतिराव फुले यांनी सामाजिक ,धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनात नवी मुल्ये नवे विचार, नव्या जाणिवा समाजमनावर रुजवण्याचा प्रयत्न केला .त्यासाठी अनेक ग्रंथ लिहिले स्वातंत्र्य ,समता, लोकशाही, मानवता ,विज्ञान या आदर्श मूल्यांची समाजात बीजारोपण करण्याचे काम सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले यांनी केले होते. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा फुले यांनी वैचारिक अधिष्ठान तर दिलेच आपल्या विचारांना कृतीची जोड देखील दिली .सत्यशोधक समाज ही संघटना स्थापन करून समाजाला एक नव्या जाणिवेने एकसंघ करण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा जोतीराव फुले यांचे वाङमय कार्य जेवढे विशाल अथांग ज्ञानाचा सागर आहे तेवढेच त्यांचे सामाजिक कार्यही खूप अलौकिक आणि क्रांतिकारक स्वरूपाचे आहे .

**संदर्भ**

1) शेतकऱ्याचा असूड- ले जोतीराव गोविंदराव फुले प्रस्तावना भास्कर लक्ष्मण भोळे
2) भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण- डॉ मीना मंगरूळकर
3) यांनी घडविला समाज - डॉ लीला पाटील

# विचारवंत आणि सुधारक : शाहू महाराज

**प्रा. डॉ. हंडीबाग संदीप प्रचंडराव**
समाजशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब

भारतीय समाजाची जडणघडण करण्यात महात्मा फुले, राजर्षी शाहु महाराज, भाऊराव पाटील, महर्षी कर्वे, वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. भारतीय समाजव्यवस्थेतील काही कर्मठ मंडळींनी सर्वसामान्य् जनतेवर कर्मकांडाचा प्रभाव पाडुन आपले वर्चस्व् प्रस्थापित केले होते. परंतु त्यांच्या या वर्चस्वाला झुगारुन देऊन भारतीय समाजाला त्या कर्मकांडातुन बाहेर काढण्यासाठी वरील विचारवंत व सुधारकांनी क्रांतीकारी कार्य केले आहे. समाजव्यवस्थेचे विकृत स्वरुप दुर करुन सामाजिक समता स्थापन करण्यासाठी राजर्षी शाहु महाराजांसारख्या एका समतावादी विचारवंताचा जन्म: कोल्हापूर संस्थानामध्ये इ.स. 16 जुलै 1874 रोजी झाला. पुढे त्यांनी इ. स. 1894 रोजी राजगादीवर येऊन आपल्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेऊन समाजाला योग्य् दिशा देण्याचे कार्य केले.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

1) शाहु महाराजांनी समाजासाठी केलेले कार्य अभ्यासणे.

2) शाहु महाराज हे कृतीशिल सुधारक होते.

**गृहीतके :-**

1) शाहु महाराजांनी केलेल्या कार्यातुन विकास झाला.

2) शाहु महाराजांमुळे समाजाचे परिवर्तन झाले.

**शोधनिबंधाचा उद्देश :-**

शाहु महाराजांमुळे समाजाचे मोठ्या प्रमाणात परिवर्तन होऊन समाजाचा विकास मोठ्या प्रमाणत झाल्याचे प्रस्तुत शोधनिबंधामध्ये पुढील प्रमाणे दिसून येते.

**धर्मनिरपेक्ष राज्य् :-**

शाहु महाराज हे राजदंड ही शोभेची वस्तु नसुन लोकसेवेचे ते एक साधन असलेले अलौकिक राजे होते. ते स्वत: हिंदु असतांना देखील कोल्हापूरच्या रविवार पेठ भागात मशिद बांधण्यास परवानगी दिली होती. कुराणग्रंथाच्या मराठी भाषांतरासाठी समिती नेमुन ग्रंथ प्रकाशनासाठी 25,000/- रु मंजुर केले होते. मिरजेच्या ख्रिश्चन् डॉक्टरांशीही त्यांची खास मैत्री होती. बहुजन समाजातील वकीलांना ज्या वकीलीच्या सनदा दिल्या होत्या त्यातील अनेकजण मुस्लिमधर्मीय होते. म्हणूनच त्यांचे राज्य् हे पुर्णपणे धर्मरिपेक्ष असलेले दिसून येते.

**सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण :-**

शाहु महाराजांनी शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. संस्थानात एकुण प्राथमिक शाळा 224 होत्या तर विद्यार्थी 15,000 होते. संस्थानाच्या एकुण उत्पन्नापैकी 3.75% एवढा शिक्षणावर खर्च होत असे. त्यावेळी फक्त् उच्चवर्णिय विद्यार्थीच शिकत असत. सर्वसमान्य् जनतेला शिक्षण मिळावे म्हणुन त्यांनी . इ. स. 25 जुलै 1917 रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा कायदाच करुन टाकला त्यासाठी त्यांनी 'गाव तेथे शाळा' धोरण राबविले. त्याचबरोबर तांत्रिक शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, सैनिकी शिक्षण यासाठी पण भरीव आर्थिक तरतुद केली.

**वसतिगृहांची निर्मिती :-**

इ. स. 1897 मध्ये दुष्काळ पडला तेंव्हा राजर्षी शाहु महाराजांनी सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह काढले. ते ब्राम्हणांपासुन ते शुद्रांपर्यंत सर्व जातीच्या विद्यार्थ्यांना खुले होते व तिथे फक्त् 2 रु दराने भोजन मिळे. या वसतिगृहात सर्व जातीचे विद्यार्थी राहु लागल्यामुळे काही उच्चवर्णीय जातीभेद पाळु लागले. परिणामी महाराजांनी प्रत्येक जातींसाठी स्वतंत्रपणे वसतिगृहांची व्यवस्था निर्माण करुन देऊन शिक्षणाच्या पवित्र कार्यात खंड पडु दिला नाही. त्यामुळेच कोल्हापुरला वसतिगृहाची जननी बनवून टाकले.

**अस्पृश्योध्दारक :-**

कोल्हापूर संस्थानामध्ये अठरापगड जातीचे लोक राहत होते. त्यातच अस्पृश्य् जातीच्या लोकांची बिकट आवस्था होती. त्यांची आवस्था बदलण्यासठी स्वतंत्र शाळा, वसतिगृहे, फी माफी, राजदरबारात त्यांना नौकऱ्या , शिष्यवृत्त्या, जातीवाचक आडनावे बदलने, कोल्हापूरचे भवानी मंदिर खुले केले. स्पृश्य्-अस्पृश्य् सहभोजने घडवून आणले इ.स. 1902 ला कोल्हापूर संस्थानातील सरकारी नौकऱ्यात 50 % जागा राखुन ठेवल्या, बलुतेदारांना आवडीनुसार व्यवसायास परवानगी अशा उपाययोजना केल्या. शाहु महाराजांनी गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूरात हॉटेल चालविण्यासाठी आर्थिक मदत केली. ते स्वत्: त्या हॉटेलमध्ये जाऊन चहा – फराळ घेत होते. त्यातुन त्यांनी अस्पृश्यतेची दाहकता कमी केली.

**कुलकर्णी वतन नष्ट् केले :-**

अनेक शतकापासुन पाटील व कुलकर्णी वतने होती. पाटील हा मराठा तर कुलकर्णी ब्राम्हण् असे. त्यांच्याकडून सर्वसामान्य् जनतेचा छळ होत असे हे लक्षात येताच त्यांनी कुलकर्णी वतनच नष्ट् केल्याचे दिसून येते.

**ब्राम्हणेत्तर् चळवळीतील वृत्तपत्रांना व ब्राम्हणेत्तर् लोकांना अर्थसहाय्य् :-**

केसरी, मराठा विश्ववृत्त्, समर्थ या वर्तमानपत्रांचे संपादक ब्राम्हण् असल्यामुळे ते सत्यशोधक चळवळीवर टिका करत असत. ब्राम्हण् – ब्राम्हणेत्तर् हा भेद नको म्हणून त्यांनी ब्राम्हणेत्र संपादकांना पुढे येण्याचे आवाहान केले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात अर्थसाहाय्य् सुध्दा केले.

**कलाकारांचे आश्रयदाते :-**

महाराजांना अनेक छंद जोपासण्याची आवड होती. ते स्वत: कुस्तीपटु होते म्हणुन त्यांनी पैलवानांना खुराक, गावोगावी तालमी, आखाडे उभारण्यास प्रोत्साहन दिले. तसेच लेखक, जलसाकार, शाहीर , कवी यांना आश्रय दिला. आपल्या कारकिर्दित कोल्हापूरला 'कलापुर' बनविले. म्हणूनच त्यांची कारकिर्द महाराष्ट्राच्या इतिहासाला उंच शिखरावर घेऊन जाणारी ठरली.

**स्त्री संरक्षणाचे कायदे :-**

शाहु महाराजांनी स्त्रियांच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे कायदे पास केले. स्त्रियांची समाज व कुटूंबाकडुन होणारी पिळवणूक थांबविण्याचा मोठा प्रयत्न् केला.इ. स. 1917 ला संस्थानात विधवा पुर्नविवाहास कायदेशीर मान्यता कायदा पास केला, स्त्रीचे विवाह योग्य् वय 14 तर पुरुषाचे विवाहायोग्य् वय 18 केले. स्त्रीशी क्रुरपणे वागणाऱ्यास 6 महिने कारावास व 200/- दंडाची तरतुद केली. स्त्री शिक्षणाला मोठ्या प्रमाणात प्रोत्सहान दिले.

**शेती व सहकार :-**

राजर्षी शाहु महाराजांनी संस्थानात मोठ्या प्रमाणात पाटबंधारे योजना हाती घेतल्या. 'राधानगरी' व 'काळम्मावाडी' धरणाची कामे केली. विहार व पाझर तलावांची कामे केली. शेतीत नव –नवीन प्रयोग होऊन

शेतकरी सुधारला जावा यासाठी नवीन बी, बियाणे, खते यावर भर देऊन शेतीपुरक व्यवसायाचा आग्रह केला. एकमेकांच्या सहकार्यातुन विकास होण्यासाठी इ. स. 1912 ला कोल्हापूर संस्थानात सहकार कायदा पास केला. म्हणून आज आपणाला सहकारी संस्था कोल्हापुरला जास्त् प्रमाणात दिसून येतात. शाहु महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर भाऊराव हिरे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर , डॉ. बापुजी साळुंखे यांनी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी कार्य केल्याचे दिसून येते. तसेच शासकीय योजना राबवितांना देखील शाहु महाराजांच्या केलेल्या कार्याचे या योजनांमध्ये प्रतिबिंब दिसते. सदरील शोधनिबंधामध्ये शाहु महाराज हे समाजातील प्रत्येक घटकांच्या विकासासाठी वचनबध्द् असलेले दिसतात. म्हणून आपल्याला ते एक सुधारक व विचारवंत असल्याची प्रचिती येते.

**संदर्भसुची :-**

1. महाराष्ट्रातील समाजसुधारक : विचारधारा व कार्य , डॉ. एस. एस गाठाळ, कैलास पब्लिकेशन्स्, औरंगाबाद.
2. समाजशास्त्रीय विचारांचे आधार: प्राचार्य डॉ.दादासाहेब मोटे, नक्षत्र पब्लिकेशन्स्,औरंगाबाद.
3. मुलभूत सामाजिक विचार: प्रा. ज्योती डोईफोडे,विद्या बुक्स्, औरंगाबाद.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# पत्रकार - डॉ. बाबासाहेब अम्बेडकर

**डॉ. सुब्राव नामदेव जाधव**
हिंदी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी

एक नन्हीं-सी किरन अनंत विश्वास और साधना के बल पर अंधेरे घरों में रोशनी देने के लिए कैसे सूरज बन जाती है, एक नन्हा-सा बीज कैसे विशाल वृक्ष बनने लगता है जो हजारों बेघरों का छांव देता है, एक नन्हीं-सी बूंद कैसे विशाल समुद्र का रूप धारण कर लेती है और असंख्य लोगों की सदियों की तृष्णा शांत करती है और बंबई सागर तट, महाराष्ट्र की भूमि पर कैसे एक अकेले कंठ की पुकार, लाखों-करोड़ों, मूक-दलित, दबे-कुचलों की ओजस्वी वाणी बन जाती, यदि इसे समझना है, पहचानना है तो हमें डॉ. अम्बेडकर की जीवन शैली, उनके गहन पांडित्य, उनके हिमालयी धैर्य को देखना चाहिए। यह एक नए मसीहा, एक नए बुद्ध के अवतरण की कथा हैं |

क्रमशः सन् 1920 और सन् 1927 में डॉ. अम्बेडकर ने नितांत साधनहीन होते हुए 'मूकनायक' और 'बहिष्कृत भारत' पाक्षिक पत्रों लेखन किया गया । इन पत्रिकाओं के अग्रलेखों में बाबा साहेब ने दलितों और बहिष्कृतों की तत्कालीन आर्थिक, सामाजिक एवं राजनीतिक समस्याओं को उजागर किया है। उनकी दयनीय दशा सामाजिक विसंगतियों पर क्षोभ व्यक्त करने तथा सवर्णों के अन्याय और शोषण का निर्भीकता से विरोध करने के लिए प्रेरित किया। यद्यपि 'बहिष्कृत भारत' और 'मूक नायक' में अग्रलेखों के अलावा सामयिक घटनाएं, आत्म परिचय, पत्र-व्यवहार, विचार-विनिमय आदि अन्य स्तंभ भी थे, जो समकालीन यथार्थ जगत के परिप्रेक्ष्य में उतने प्रासंगिक नहीं

उनकी लेखनी से निकला हर वक्तव्य संदेशात्मक होता था। इनसे दलित आंदोलन में उनकी उत्कट अभिरुचि और योगदान का पता चलता है जब देश में अस्पृश्यों की अपनी कोई आवाज नहीं थी। समस्त राजनीतिक दल और समाज सुधार संस्थाएं जिनकी लगाम सवर्ण हिंदू जातियों या संभ्रांत लोगों के हाथों में होती थीं। वे दलित जातियों को अपने-अपने राजनीतिक लाभों के लिए इस्तेमाल किया करने थे। वर्ण-व्यवस्था के अभिशापों के मूलोच्छेदन के लिए किसी भी दल, किसी भी नेता या समाज सुधारक ने इतना उल्लेखनीय कार्य नहीं किया।

अम्बेडकर की स्पष्ट धारणा थी कि अभी दलितों की सामाजिक हालत और मनस्थिति यह बात समझने के लायक नहीं कि सवर्णों द्वारा छेड़े गए आजादी के आंदोलन से उनका कितना सरोकार है, वे तो पहले ही पुरोहित वर्ग, तथा सवर्ण समाज द्वारा थोपी गई अस्पृश्यता, जातिप्रथा और गरीबी का भारी बोझ ढोकर पशुवत्, नरकतुल्य जीवन जी रहे हैं। अंग्रेजों ने भी उनके शोषण और दमन के चक्र को रोका नहीं, उसे और मजबूत और गतिशील बनाया है। इन सब विसंगतियों, विषमताओं, दुहरे शोषण के कुचक्र को तोड़ने के लिए ही अम्बेडकर ने पत्रिकाओं का संपादन-प्रकाशन किया। उन्होंने स्वतंत्रता आंदोलन में भाग नहीं लिया था, लेकिन वे दलित मुक्ति के लिए जूझते रहे।

**'मूकनायक' का संपादन**

'मूकनायक' पत्रिका के प्रथमांक में 31 जनवरी, 1920 को 'मनोगत' शीर्षक लेख में डॉ. अम्बेडकर ने जातीय और धार्मिक विषमता पर कटाक्ष करते हुए लिखा :

हिंदू धर्मावलंबियों व्याप्त यह विषमता जितनी अनोखी है, उतनी ही निंदनीय कारण यह है कि विषमता अनुरूप होने वाले व्यवहार का स्वरूप हिंदू धर्म के लिए शोभनीय नहीं कहा जा सकता। स्पष्ट है कि हिंदू धर्म में समाविष्ट होने वाली जातियां ऊंच-नीच की भावना से प्रेरित हैं। किंतु ध्यान में रखने लायक बात यह है कि इस मीनार में सीढ़ी नहीं है। और इसलिए एक मंजिल पर से दूसरी मंजिल पर जाने के लिए मार्ग नहीं है। जो जिस मंजिल में जन्म

लेगा उसे उसी मंजिल पर मरना है नीचे की मंजिल का आदमी चाहे वह कितना भी लायक हो, ऊपर की मंजिल में उसे प्रवेश नहीं मिलता है तथा ऊपर की मंजिल का आदमी, चाहे वह कितना भी नालायक हो उसे नीचे की मंजिल में ढकेल देने की ताकत किसी में नहीं है। यदि स्पष्टतः कहना है, तो यह कहना पड़ेगा कि जातियों में व्याप्त पारस्परिक ऊंच-नीच की भावना गुण-अवगुण पर आधारित नहीं है। उच्च जाति में उत्पन्न व्यक्ति में कितने ही दुर्गुण हों वह उच्च ही कहलाएगा। उसी प्रकार नीच जाति में उत्पन्न व्यक्ति कितना ही गुणवान् वह नीच ही रहेगा। दूसरे आपस में रोटी-बेटी का व्यवहार न होने ये आत्मीयता नहीं बढ़ती और एक जाति दूसरे से टूट जाती है। मूकनायक के अंक 2 में 14.2.1920 को 'स्वराज्य की समानता' के विषय में डॉ. अम्बेडकर ने लिखा: “साधारणतः राज्य शासन के दो उद्देश्य हैं, एक शासन तथा दूसरा संस्कृति । शासन अर्थात अनुशासन एवं शांति। शांति भंग दो प्रकार से हो सकती है, विदेशी आक्रमण से या आंतरिक असामंजस्य से। किसी भी राष्ट्र में वर्ग तथा गुट रहेंगे ही। यही नहीं, वर्गों तथा शक्ति के सामाजिक, आर्थिक, राजनीतिक व धार्मिक हित-संबंध परस्पर विरोधी होते हैं। ऐसे विरोध के कारण एक व्यक्ति अथवा वर्ग द्वारा अपने भले के लिए दूसरे व्यक्ति अथवा अन्य किसी तरीके से नुकसान पहुंचाना प्रारंभ कर दिया तो आंतरिक शांति भंग होने की संभावना होती है | शांति के अभाव में सामाजिक जीवन धोखे का होता है तथा मानव का नित्यप्रति का कार्य अवरुद्ध हो जाता है डॉ. अम्बेडकर की सोच आज भी निसंदेह सार्थक है जब अराजकता, आतंकवाद, अशांति को बढ़ावा मिल रहा है। भाई भाई का गला काट रहा है। मानवता नहीं, धार्मिक उन्माद और कट्टरता सिर उठा रहे हैं। सामाजिक और आर्थिक विषमताएं ज्यों की त्यों हैं। उनके रूप बदले हैं और सामाजिक परिवर्तन के नाम पर लूट खसोट जारी है। नेता, अभिनेता, नौकरशाह, व्यापारी मालामाल हुए हैं। 28 फरवरी 1920 के मूकनायक के तीसरे अंक में डॉ. अम्बेडकर ने लिखा कि “जो सामाजिक बंधन उच्च जाति के हिंदुओं के लिए पोषक हुए हैं, वे इस बहिष्कृत समाज के लिए इतने घातक बन गए हैं कि यह वर्ग नागरिकता से भी वंचित हो गया

1920 में ही उन्होंने लिखा कि “व्यक्तिगत स्वतंत्रता, व्यक्तिगत संरक्षण, व्यक्तिगत धन संपत्ति रखने का अधिकार, कानून की दृष्टि में समानता, सद्विवेक, बुद्धि के अनुरूप कार्य करने की स्वतंत्रता, भाषण की स्वतंत्रता तथा अपने अभिमत की स्वतंत्रता, सभा करने का अधिकार, देश के शासन कार्य में प्रतिनिधि भेजने का अधिकार, सरकारी नौकरी आदि प्राप्त करने का अधिकार किसी भी व्यक्ति नागरिक अधिकार होते हैं।”मनुवादी व्यवस्था में यह सब बहिष्कृत समाज कोप्राप्त नहीं थे। यह सब अस्पृश्यता और जाति भेद के कारण हुआ। जब स्वतंत्र भारत के संविधान की डॉ. अम्बेडकर ने संरचना की भारत 36 सभी नागरिकों को उन्होंने नागरिक अधिकार सुनिश्चित किए। बहिष्कृत समाज की प्रगति के अवरुद्ध मार्ग को उन्होंने खोला। उन्होंने सच्चे देशभक्त की तरह मूकनायक के छठे अंक में 10 अप्रैल, 1920 को संकेत दिया कि “हिंदुस्तान द्वारा पूर्ण स्वराज्य प्राप्त करने का पक्का निश्चय किए बिना पूर्ण स्वराज्य नहीं मिलेगा।" उन दिनों कांग्रेस का गरम दल पूर्ण स्वराज्य प्राप्ति के लिए अंग्रेजी उखाड़ फेंकना चाहता था, नरम दल ब्रिटिश साम्राज्य के अंतर्गत स्वराज्य मांगनेवालों की राजनैतिक जमात थी। लेकिन डॉ. अम्बेडकर ने सदियों से सताए लोगों को संगठित कर उन पर थोपे उए सामाजिक बंधनों को काटने के लिए सक्रिय कार्य 1920 को प्रकाशित मूकनायक के 10वें अंक में 'अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद' द्वारा नागपुर में 30 तथा 31 मई तथा | 1 जून, 1920 को आयोजित त्रिदिवसीय सम्मेलन की कार्यवाही, प्रतिनिधियों के भाषण और प्रस्ताव आदि का पूरा वृतांत है, जो दलित आंदोलन और अस्पृश्य में सामाजिक-राजनीतिक जागृति तथा अधिकारों के प्रति सजगता का परिचय देता है।

**संदर्भ :-**

1. भारतीय दलित आंदोलन की रुपरेखा – के.एल. चंचरीक, डॉ. धीर सिंह

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# समाजविकासातील राजर्षी शाहु महाराज यांचे योगदान

**प्रा.तानाजी रामभाऊ बोराडे**
विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम

**प्रस्तावना—**

राजर्षी शाहू छत्रपती म्हणजे एका प्रचंड वादळी वाऱ्याचे मानवरूप! रोगट आणि कुचलेल्या कर्मकांडाचे स्तोंभ माजविलेल्या आणि वर्गवर्चस्वाद्वारे सामाजिक गुलामगिरीची निर्मिती केलेल्या विचारांना लाथाडून स्वातंत्र, समता, बंधुत्वाच्या उदात्त विचारांना आणि श्वाश्वत मुल्यांना महाराष्ट्राच्या भुमित रूजविण्याचा प्रयत्न करणारा महापुरूष. छत्रपती घराण्यातील चौथे शिवाजी महाराज यांनी घाटगे घराण्यातील यशवंत नामक मुलास दत्तक घेतले तेच राजर्षी शाहू महाराज म्हणून ओळखले जातात. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या महापुरूषांचा हात आहे त्यापैकी फुले, राजर्षी शाहू महाराज, भाऊराव पाटील, शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कोल्हापुरातील कसबा बावडा येथे घाटगे घराण्यात झाला त्यांच्या वडिलांचे नाव श्रीमंत जयसिंगराव आण्णासाहेब घाटगे आणि आईचे नाव राधाबाई असे होते. राजर्षी शाहू महाराज १८८४ मध्ये दत्तक विधीने कोल्हापूरच्या गादीवर आले मात्र १८९४ पासून खऱ्या अर्थाने त्यांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतला. याचवेळी सामाजिक क्रांतीचे अग्रदुत महात्मा फुले यांनी स्वाभिमान व समतेचे बीज पेरले होते. त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. दलित पणाचे कोणतेही संदर्भ नसताना, केवळ संवेदना, बुध्दी बळावर त्यांनी समता, न्याय, बंधुता, जातीभेद उच्चाटन, अस्पृश्यता निवारण यासाठी ते जगले व लढले. समाजात समता, न्याय प्रस्थापित करायची असेल तर सर्वांसाठी शिक्षण खुले करणे गरजेचे आहे हे त्यांनी ओळखून शिक्षणाची दारे सर्वासाठी खुली केली, त्यासाठी विविध उपक्रम राबविले, शेती, उद्योगधंदे, व्यापार, अस्पृश्यता निवारण, कला, क्रिडा, आरोग्य, साक्षरता शिष्यवृत्ती, पाण्याची सोय, वसतीगृहाची निर्मिती इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रातही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

## राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक योगदान

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात शिक्षण हे एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. बहुजन शिक्षण हे एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. बहुजन समाजातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता अशा प्रकारची परिस्थिती महाराष्ट्रात होती त्यामूळे बहुजन समाजचा विकास झालेला नव्हता तेव्हा त्यांच्यात विकास घडवून आणायचा असेल तर शिक्षण देणे गरजेचे आहे त्यासाठी सर्वप्रथम कोल्हापूर संस्थानात १९१६ साली मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. त्यानुसार ६—१४ वयोगटातील मुला—मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यादृष्टीने त्यांनी चिखली येथे १८ मार्च १९१८ रोजी शाळा उघडली प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले एवढे करून ते थांबले नाहीत. तर त्यांची कडक अंमलबजावणीही केली. यातून राजर्षी शाहू महाराजाचा शिक्षणाविषयी व्यापक दृष्टीकोन दिसून येतो. त्यांच्या या कार्यामूळे बरेच लोक प्रेरित झालेत व त्यांनी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाची निर्मिती केली. स्वत: त्यांनी इ.स.१८५१ मध्ये कोल्हापूर येथे इंग्रजी शाळा देखील सुरू केली. १८८१ मध्ये या शाळेचे रूपांतर महाविद्यालयात झाले. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या सर्व मुलींना शिक्षण मोफत केले होते. आपल्या संस्थानातील मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांनी अर्थसाहय केल्याचे अनेक उदाहरणे आढळतात.

**स्त्रीशिक्षण—**

स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक होते. पारंपारीक समाज व्यवस्थेत स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे पारंपारीक सामाजिक वास्तव बदलण्यासाठी स्त्रियांना शिक्षीत करणे खुप गरजेचे होते. त्यामुळेच महाराजांनी महाराष्ट्रभर स्त्री शिक्षण राबविल्याचे दिसते. स्त्री शिक्षण द्यायचे म्हटले तर स्त्री शिक्षीका आवश्यक होत्या म्हणून त्यांनी १८८२ मध्ये स्त्रियांसाठी अध्यापक महाविद्यालये स्थापन केले. याच महाविद्यालयातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. अश्याच एका विद्यार्थीनिला त्यांनी मुंबईच्या ग्रॅड मेडिकल कॉलेजला पाठविले आणि तिला डॉक्टर केले. पुढे तिची नियुक्ती 'अल्बर्ट एडवर्ड मेमोरियल हॉस्पीटल' येथे केली. स्त्री शिक्षण विषयक शाहूची दृष्टी व्यापक होती. स्त्रीयांना पुरूषाच्या बरोबरीने शिक्षण मिळावे अशी त्याची मनिषा होती. शुद्रातिशुद्र मुलीच्या शिक्षणाकडेही शाहुंनी लक्ष पुरविले तसेच राज घराण्यातील स्त्रियांनाही चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले गेले पाहिजे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी आज्ञा काढली होती त्याच्या राहण्याची, जेवणाची व शिक्षणाची सोय केली होती. शाहू राजांच्या प्रयत्नामुळेच स्त्री साक्षरतेचे प्रमाण ०.१० टक्क्यावरून ०.३५ टक्क्यापर्यत वाढल्याचे दिसते. शाहूंच्या प्रयत्नाने कोल्हापूरातच व्ही.टी.पाटील यांनी ताराराणी विद्यापीठ ची स्थापना केली यामूळे कुटुंब व समाजाचा विकास घडून येण्यास मदत झाली.

**आरक्षण विषयक योगदान**

आपला देश खेडयांचा देश आहे. कृषीप्रधान आहे असे आपण नेहमी ऐकतो. पण खरतर आपला देश हा जातीपाचीचा देश आहे. इतर कोणत्याही देशात नसणारी एवढी विषमता, वेशद्वेष आपल्या देशाात आहे जातीचे भूत लोकांच्या मानगुटीवर बसले आहे. माणसाला माणुस म्हणून न बघता त्यांच्याकडे जातीव्यवस्थेच्या नजरेतून बघितले जाते याचा जातीव्यवस्थेमुळे माणसांच्या कर्तृत्वापेक्षा जातीला महत्व आले याचा प्रत्यक्ष अनुभव राजर्षी शाहू महाराजांनाही आला. समाजातील दलित बहुजन वर्गाला हिनतेची वागणूक मिळत होती. त्यांच्यावर अन्याय होत होता. अश्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी या धोरणाला विरोध केला. गरिबांना न्याय

मिळावा. त्यांना माणूस म्हणून जगता यावे यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील नोकऱ्यामध्ये मागासवर्गीयांकरिता ५० टक्के जागा राखीव म्हणून घोषित केल्या आज जे आरक्षण धोरण दिसते तीचा प्रारंभ राजर्षी शाहू महाराजांनी केला. म्हणूननच त्यांना आरक्षणाचे जनक म्हटले जाते. या त्यांच्या धोरणामुळे त्यांना, त्यांच्या कार्याला उच्च समाजाकडून मोठया प्रमाणात विरोध झाला तरी राजांनी आपले कार्य सुरू ठेवले यामूळे समाजातील गोर—गरिबांची मुले शिक्षण घेऊ लागली समजा विकसित होऊ लागला.

**आर्थिक धोरण**

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न केले आर्थिक विकास कार्यक्रमात शेतीला अग्रक्रम दिला. शेतीतील उत्पादन वाढल्याशिवाय शेतकऱ्याची स्थिती सुधारणार नाही आणि शेतकरी आर्थिकदृष्टया स्वावलंबी व स्वयंमपूर्ण बनल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असा राजर्षी शाहू महाराजांच्या विचार होता. या विचाराला डोळयासमोर ठेवून महाराजांनी शेतीच्या विकासासाठी प्रयत्न केले. शेतीला ओलिता खाली आणण्यासाठी प्रयत्न केले. बंधारे, कालवे, तलाव, विहीरी बांधण्यासाठी अर्थसहाय्य ही केले. यासोबत शेतीला केवळ पाणीपुरवठा असून चालत नाही तर त्यासाठी आधुनिक यंत्र, तंत्र, बियाणे, कीटकनाशके यांचीही गरज असते. म्हणून त्यांनी कोल्हापूर येथे १९१२ मध्ये शेती संस्था स्थापन केली. शेती सोबतच जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, बदक पैदास यासाठी प्रोत्साहन व आर्थिक मदतही केली. जनतेमध्ये सहकारतत्व रूजावे यासाठी १९१२ मध्ये सहकारी कायदा करून बलभीम सहकारी बॅक व अर्बन कॉ.ऑपरेटीव्ह बॅक स्थापन केली. तसेच उद्योग व्यवसायालाही उत्तेजन दिले. १९०५ पर्यत कोल्हापूरात सुगंधी औषधी तेलउद्योग, मधुमक्षीका पालन उद्योग, कास्टार्ग उद्योग, सुती कापड उद्योग यांना चांगले प्रोत्साहन व अर्थाजन केले. शेती व उद्योगधंद्याच्या विकासासाठी बाजारपेठेची गरज असते म्हणून १८९५ साली 'शाहुपुरी व्यापार पेठ' स्थापन करून तेथे व्यापारवेढया काढणाऱ्यांना मोफत प्लॉटस दिले. एकंदरीत आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी सर्वोतपरी प्रयत्न केले.

**स्त्री जातिच्या संरक्षणार्थ कार्य**

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांच्या कल्याणाकरिता स्वत:ला झोकून दिले होते. तत्कालीन काळातील स्त्रीवर्ग हा खूपच वंचित होता. मागासलेला होता. स्त्री जातीवर अनेक अन्याय, अत्याचार होत होते. बालविवाह, विधवाविवाह, प्रतिबंध, शिक्षणबंदी, पडदापद्धती यांसारख्या अनिष्ठ परंपरेमुळे स्त्री जीवन असहाय्य झाले होते. तेव्हा राजर्षी शाहू महाराजांनी विधवांचे केशवपण १९१७ च्या कायद्याने बंद केले. ज्या मुली लग्नानंतर विधवा होतात त्यांना समाजात अन्यायकारक वागणूक मिळते ती मिळू नये, त्याला प्रतिबंद यावा यासाठी आपल्या संस्थानात १९१७ च्या जुलै मध्ये विधवांच्या पुर्नर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. एवढेच नव्हे तर पुढे १२ जुलै १९२१ मध्ये आंतरजातीय विवाह कायदा ही संमत केला. यासोबतच क्रुरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोट व वारसाचा कायदा, देवदासी प्रथा, प्रतिबंध कायदा यासांरखे कायदे करून त्यांनी स्त्रियांना न्याय मिळवून दिला.

**सामाजिक न्यायविषयक धोरण**

राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्यायाची संकल्पना ही जात पात विरहित समतेवर आधारित होती. स्वत: राजर्षी शाहु महाराज जातीभेद, अस्पृश्यता पाळीत नव्हते. संस्थानातील सार्वजनिक ठिकाणी जातियता पाळण्यावर त्यांनी बंदी घातली यासंदर्भात संस्थानचे राजे म्हणून त्यांनी तसा वटहुकुमही काढला. समाजातील विषमतेतून मुक्तता करण्याचा हा एक प्रयत्न होता. म्हणून शाहूंनी तत्कालीन व्यवस्थेला दिलेला सामाजिक न्याय आजही मार्गदर्शक ठरतो. सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा विचार करता त्यांना अभिप्रेत असणारा सामाजिक न्याय मानवी विकासाशी व कल्याणाशी संबंधित होता. गावकुसाबाहेर व माणुसकीपासून दुर असलेल्या समाजाला घरात घेण्याचा आणि माणुसकीच्या धाकाने जोडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. हीच त्यांची सामाजिक न्यायाने ओतप्रत भरलेली भावना होती.

**संदर्भसूची**

१. किर धनंजय १९९२ राजर्षी शाहू मुंबई, पॉप्युलर प्रकाशन
२. जाधव रमेश २००२ लोकराजा राजर्षी शाहू छत्रपती पुणे सुरेश एजन्सी
३. पवार जयसिंगराव २००१ राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ कोल्हापूर महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी
४. पानसरे गोविंद १९९२ राजर्षी शाहू वसा आणि वारसा कोल्हापूर
५. डॉ.कांबळे नारायण २०११ राजर्षी शाहू नव्या दिशा नवे चिंतन औरंगाबाद

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# शिक्षा के क्षेत्र में अंबेडकर की विचारधारा

**Dr. Meenaxi B Patil**
Assistant Professor Department of Hindi BLDEA's SB Arts & KCP Science College Vijayapur
Karnataka - 586103
Email: meenaaxibpatil@gmail.com

डॉ. भीमराव रामजी अम्बेडकर आधुनिक भारत के निर्माताओं में से एक हैं। एक गरीब और वंचित परिवार में जन्मे डॉ. अम्बेडकर ने अपने जीवन में एक व्यक्ति के लिए कठिन मानी जाने वाली कई ऊंचाइयों को छुआ। उन्हें आधुनिक भारत के सबसे शिक्षित लोगों में माना जाता है। एक कुशल वक्ता, लेखक और प्रबुद्ध विद्वान के रूप में पूरे विश्व में प्रसिद्ध हैं। उनका अध्ययन का क्षेत्र केवल अर्थशास्त्र और कानून तक ही सीमित नहीं था, बल्कि शिक्षा, समाजशास्त्र, संविधान, राजनीति विज्ञान, धर्म और दर्शन जैसे विषयों पर भी उनका पूरा अधिकार था। इनका शैक्षिक दर्शन उनके शैक्षिक विचारों में परिलक्षित होता है। शिक्षा प्रगति और उत्थान का स्तम्भ है। यह समाज में जागरूकता और सामाजिक चेतना को बढ़ाता है। स्पष्ट है कि शिक्षा में पढ़ने, बोलने, सुनने और लिखने के माध्यम से दिया गया ज्ञान समाविष्ट है। शिक्षा लोगों के दैनिक कार्यों और आदतों और लोगों के बीच अंतर्संबंधों को मूर्त रूप देती है और प्रभावित करती है। अम्बेडकरजी स्वयं एक प्रसिद्ध शिक्षक थे। उन्होंने दलित समुदाय के छात्रों को शिक्षित करने के लिए बॉम्बे और औरंगाबाद में 'पीपुल्स एजुकेशन सोसाइटी' की स्थापना की। उनका शैक्षिक दर्शन उनके व्याख्यानों, विभिन्न पत्रिकाओं में प्रकाशित उनके लेखों और शिक्षण संस्थानों में उनके कार्यों में परिलक्षित होता है। उन्होंने कहा कि प्रत्येक शिक्षण संस्थान परिवर्तन समाज की संस्था होनी चाहिए। डॉ अम्बेडकर ने दृढ़ता से कहा कि शिक्षा समाज के लिए प्राथमिकता होनी चाहिए और व्यक्तियों के विकास के लिए उपयोग की जानी चाहिए। अंबेडकर ने कहा है कि "शिक्षा एक ऐसी वस्तु है जो समाज के प्रत्येक व्यक्ति तक पहुँचनी चाहिए। शिक्षा सस्ती से सस्ती हो, ताकि निर्धन से निर्धन व्यक्ति भी शिक्षा प्राप्त कर सके। ज्ञान प्रत्येक स्त्री- पुरुष के जीवन की बुनियाद है, जिसको प्राप्त करने का अधिकार सभी को है। तभी वह अपनी बुद्धि का विकास कर देश हित में अपने प्राणों का अर्पण कर सकेंगे।" महात्मा बुद्ध, ज्योतिबा फुले, साहू जी महाराज, प्रसिद्ध शिक्षाविद् प्रोफेसर जॉन डेवी, एल्विन सेलिगमैन और बुकर टी. वाशिंगटन का अम्बेडकर के जीवन पर बहुत प्रभाव था। वे जीवन भर शिक्षा से जुड़े रहे। हमारे समाज में शिक्षा का स्वरूप और प्रगति को समझने के लिए शिक्षा के प्रति उनके विचारों पर प्रकाश डालना बहुत आवश्यक है। शिक्षा के बारे में उनके मुख्य विचार

**सामाजिक उत्थान**

शिक्षा का मूल उद्देश्य व्यक्ति का सामाजिक, आर्थिक और राजनीतिक परिवर्तन लाना है। डॉ. अम्बेडकर जातिवाद, अस्पृश्यता, सामाजिक भेदभाव, सामाजिक असमानता, महिला असमानता आदि के कट्टर विरोधी थे। उन्होंने भारतीय समाज में मौजूदा सामाजिक असमानता और सामाजिक अन्याय को समाप्त करने और समानता, भाईचारा, सह-अस्तित्व और पारस्परिकता स्थापित करने के लिए शिक्षा को बहुत महत्वपूर्ण माना। उनका मानना था कि 'शिक्षा न केवल प्रत्येक मनुष्य का जन्मसिद्ध अधिकार है बल्कि सामाजिक परिवर्तन का एक हथियार भी है।' उन्होंने भारत में सभी और प्रत्येक नागरिक के लिए स्वतंत्र रूप से और अनिवार्य रूप से शिक्षा के मौलिक अधिकार को निर्धारित किया और प्रयास किया कि भारत का प्रत्येक व्यक्ति शिक्षा से वंचित न रहे।

**अम्बेडकर का प्राथमिक शिक्षा का दृष्टिकोण**

अम्बेडकर इस बात पर बहुत दृढ़ थे कि प्राथमिक शिक्षा दलितों को सार्वजनिक जीवन में प्रवेश करने के लिए आवश्यक आधार प्रदान करती है। शिक्षा एक सक्षम तंत्र है जिसके द्वारा एक व्यक्ति हमेशा के लिए साक्षर हो सकता

है। अंबेडकर ने पाया कि उस समय प्राथमिक शिक्षा ग्रहण करने वालों कि संख्या कम है तो उन्होंने चेतावनी दी कि प्राथमिक शिक्षा के बिना भारतीय समाज काफी हद तक एक अनपढ़ समाज बना रहेगा। उन्होंने उस समय के शिक्षा मंत्री से अनुरोध किया कि प्राथमिक शिक्षा पर अधिक पैसे खर्च करें ताकि कोई भी बच्चा प्राथमिक शिक्षा से वंचित न रहें। सरकार से आग्रह करते हुए छात्रों से फीस लेने के बजाय सरकार को उत्पाद शुल्क से एकत्रित धन को शिक्षा पर खर्च करने का सुझाव दिया। न केवल दलितों के लिए बल्कि समाज के सभी वर्गों के लिए शिक्षा क्षेत्र पर अधिक पैसा खर्च करने के पक्ष में एक मजबूत तर्क दिया। क्योंकि जिस देश का प्रत्येक नागरिक सुशिक्षित होता है वह देश प्रगति के दिशा में अग्रसर रहता है।

**अम्बेडकर द्वारा स्थापित शैक्षिक संस्थान**

अम्बेडकर ने दलितों के शैक्षिक सशक्तिकरण के लिए कई पहल की। 14 जून 1928 को उन्होंने डिप्रेस्ड क्लासेस एजुकेशन सोसाइटी, बॉम्बे की स्थापना की। जिसे मराठी में दलित एजुकेशन सोसाइटी के नाम से भी जाना जाता था। दलित एजुकेशन सोसाइटी के तहत, उन्होंने दलित समुदाय के हाई स्कूल के छात्रों के लिए पनवेल, ठाणे, नासिक, पुणे और धारवाड़ में छात्रावास स्थापित किए। 8 जुलाई 1945 को उन्होंने पीपुल्स एजुकेशन सोसाइटी, बॉम्बे की स्थापना की। पीपुल्स एजुकेशन सोसाइटी के तहत उन्होंने 1946 में सिद्धार्थ कॉलेज कला और विज्ञान, बॉम्बे की स्थापना की। इस संस्था के तहत कई शैक्षणिक संस्थाएँ स्थापित किए गए जैसे कि 1947 में सिद्धार्थ नाइट स्कूल, 1950 में मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद; सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स एंड इकोनॉमिक्स (1953), 1955 में मिलिंद मल्टीपर्पज हाई स्कूल और 1956 में सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ। अंबेडकर कहते हैं कि शिक्षा ही एक मात्र ऐसा सशक्त साधन है जिसके माध्यम से दलित समाज का उद्धार या उत्थान हो सकता है। इसलिए उन्होंने दलित समाज को सुशिक्षित होने के लिए आग्रह किया। कई शिक्षा संस्थानों की स्थापना की।

**महिला शिक्षा**

भारतीय शिक्षा व्यवस्था जाति पर आधारित प्रणाली थी। शिक्षा की अनुमति केवल उच्च जातियों को थी और शूद्र और अतिशूद्र जैसी निचली जातियों के लिए शिक्षा प्राप्त करने के लिए खुला अवसर नहीं था और यहां तक कि महिलाओं के लिए भी इसकी अनुमति नहीं थी। हिंदू धर्मशास्त्रों में विशेष रूप से मनुस्मृति ने विभिन्न निचली जातियों और महिलाओं पर प्रतिबंध लगाया था। अंबेडकर ने इसका खुला विरोध किया और महिलाओं को सुशिक्षित बनने को प्रेरित किया। 20 जुलाई 1942 को नागपुर में एक व्याख्यान देते हुए उन्होंने कहा कि "मैं समुदाय की प्रगति को महिलाओं की प्रगति की डिग्री से मापता हूं।" उनका कहना स्पष्ट था कि अगर देश की आधी आबादी अशिक्षित रहेगी, तो देश कभी प्रगति नहीं कर सकता। एक सच्चे देशभक्त और समाज सुधारक होने के नाते, डॉ अम्बेडकर महिला शिक्षा के प्रबल समर्थक थे। वह इस बात से अच्छी तरह सचेत थे कि समाज की प्रगति और देश के विकास के लिए महिलाओं का शिक्षित होना अत्यावश्यक है। उन्होंने देखा कि 'शिक्षा महिलाओं के लिए उतनी ही आवश्यक है जितनी पुरुषों के लिए। यदि आप पढ़ना-लिखना जानते हैं, तो बहुत प्रगति होगी।'

**दलित महिला शिक्षा**

अम्बेडकर ने दलित महिलाओं के लिए शिक्षा को दलित महिला सशक्तिकरण के साधन के रूप में देखा। यह उन्हें स्वतंत्र व्यक्तियों के रूप में जीने देता है। अम्बेडकर जानते थे कि दलित महिलाएं विशेष रूप से ग्रामीण प्रदेश की दलित महिलाएं जातिवाद,  और पितृसत्ता से पैदा हुई लैंगिक असमानता के कारण सभी प्रकार के भेदभाव और हिंसा से ग्रस्त थीं। 18 जुलाई 1927 को, अम्बेडकर ने लगभग तीन हज़ार महिलाओं की एक सभा को संबोधित किया, जहाँ उन्होंने दलित महिला सशक्तिकरण के लिए अपने दृष्टिकोण के बारे में एक ऐतिहासिक बयान दिया। उन्होंने एक समुदाय की प्रगति को महिलाओं द्वारा हासिल की गई प्रगति की डिग्री से मापा। शिक्षा सामाजिक मुक्ति का एक दर्शन है जो सभी के लिए समान अधिकार और शिक्षा के अवसरों की मांग करता है। इसका अर्थ है आत्म-सम्मान और आत्म-विकास। सामाजिक गुलामी, छुआछूत, जातिवाद, उत्पीड़न आदि की बुराइयों के खिलाफ एक सामाजिक क्रांति करने की शक्ति प्रदान करता है। इसके साथ-साथ जीवन में आर्थिक लाचारी और विषमताओं से लडने तथा उसे दूर करने के लिए हौंसला देती है।

**शिक्षा के माध्यम से सामाजिक मुक्ति में महिलाओं की भूमिका**

डॉ. अम्बेडकर ने शिक्षित महिलाओं को सामाजिक परिवर्तन लाने में महत्वपूर्ण भूमिका निभाने में सक्षम माना। एक माँ होने के नाते  वह परिवार में बच्चों के सबसे करीब होती है, और वह बच्चे की पहली शिक्षिका होती है।

वे अपने बच्चों में सकारात्मक मूल्यों और गुणों को शामिल कर सकते हैं। इसलिए उन्होंने महिलाओं को शिक्षित होने के लिए प्रेरित किया। महिलाओं से आग्रह करते हैं कि वे स्वच्छ रहना सीखें और सभी दोषों से मुक्त रहें। अपने बच्चों को शिक्षा दें। उनमें महत्वाकांक्षा जगाएं। उनके मन में यह विचार बीजांकुरित करें कि उनका भाग्य वे स्वयं बनाते हैं। उनकी लगन और मेहनत के बल पर उनका महान होना तय है। उनके मन में बसी सभी हीन भावनाओं को दूर करें।

डॉ. भीमराव अंबेडकर आधुनिक भारतीय राजनीतिक चिंतक, बुद्धिजीवी, मानवतावादी, दलितों के मसीहा तथा सामाजिक न्याय के संघर्षशील योद्धा थे। उन्होंने हिन्दुओं में अस्पृश्य मानी जानेवाली जातियों को संगठित करके उन्हें सामाजिक तथा राजनीतिक न्याय प्राप्त करने के लिए संघर्ष करने के लिए प्रेरित किया। असमानता को मिटाकर समता को स्थापित करने पर ज़ोर दिया। भ्रातुत्व को महत्व दिया। समाज को शिक्षित होने के लिए प्रेरित किया। महिलाओं को सशक्त, उच्च शिक्षा और रोजगार के अधिकार का समर्थन किया।

**संदर्भ ग्रंथ**

1. दलित दर्शन की वैचारिकी, बी. आर विप्लव
2. अस्पृश्यता, डॉ. भीमराव आंबेडकर
3. Google Book- Thoughts and Philosophy of Dr. B.R Ambedkar, C. D. Naik

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे कृषी विषयक विचार

**प्रा. डॉ. नानासाहेब पंडितराव मनाळे**
संशोधक मार्गदर्शक व इतिहास विभाग प्रमुख वसंतराव काळे महाविद्यालय,ढोकी ता.जि.उस्मानाबाद.

**प्रस्तावना :-**

भारतीय समाज जीवनाचा मूलाधार असलेली शेती ब्रिटीश पूर्व काळापेक्षा ब्रिटिश काळात अडचणीत आली. इंग्लंड मधील औद्योगिक क्रांतीचा भारतीय उद्योगधंदे व उद्योगावर विपीरीत परिणाम झाल्याने बेकार झालेले कारागीर शेतीकडे वळले. त्यामुळे प्रामुख्याने शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्याचा * शेतीविषयक कायद्यात बदल करावा लागला व DARA-Deccan Agriculturist Relief Act 1879 पास केला गेला.शेतकऱ्यांची सावकारापासून कायमची सुटका करणे व महसुलावर उच्च दर कमी करणे ही दख्खन दंग्याची दोन उद्दिष्टे असफल ठरली. ज्योतिबा फुले यांनी या उद्दिष्टाची पूर्तता न झाल्याने हा कायदा अयशस्वी ठरतो असा अभिप्राय दिला. मात्र यातून सावकारांवर बंधने घालण्यात आली हे नाकारता येत नाही. याशिवाय शेतकऱ्यांना या प्रकरणातून शोषणाविरुद्ध संघर्षाचा मंत्र मिळाला. नव्या परिवर्तनवादी विचारांचा क्रांतीमार्ग सापडला.

शेतकऱ्यांच्या धर्म भोळेपणाचा फायदा घेऊन पुरोहित वर्ग आयुष्यभर त्यांना लुबाडत असतो. जन्मापासून मृत्यूपर्यंत विविध विधी करावयास लावून मोठमोठ्या दक्षिणा लाटतात व आपली पोटे मोठी करतात अशी स्पष्ट टीका महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यांच्यावर केली. अज्ञानी लोकांना गुलामीची व अन्यायाची जाणीव होत नाही. ब्राह्मणी शिक्षणपद्धती व त्यांच्या झिरपण्याच्या सिद्धांतातून हे होण्याऐवजी उलट यासाठी पोषकच होती हे महात्मा फुले यांनी जाणले व प्रथमतः या अज्ञानी लोकांना शिक्षित करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिक्षणाविषयी उपयुक्त व्यवहारोपयोगी व पक्क्या पायावर आधारित शिक्षण असावे असे विचार मांडले. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतात आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करावा याशिवाय नगदी पिकांची लागवड करावी व शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता व्यवसायिक दृष्टिकोन अंगीकारावा यासाठी अगोदर स्वतः याबाबत प्रयोग केले व भरघोस उत्पन्न मिळवून दाखवले. त्यांनी आपल्या कृतीमधून शेतकऱ्यासमोर उदाहरण ठेवले यातून अनेक शेतकऱ्यांनी प्रेरणा घेतली. केवळ शेतीवर अवलंबून न राहता पूरक व्यवसाय म्हणून पशूपालन यावर भर द्यावा व उत्तम पैदास देणारी बेणी आणावीत, सेंद्रिय खतांच्या वापरातून शेतीची उत्पादकता वाढवावी अशा सूचना त्यांनी केल्या. पारंपारिक रीतीने शेती करत असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहिली. शेतीचे व्यापारीकरण करण्यासंदर्भात त्यांच्या सूचनांवरून त्यांची कृषीविषयक दूरदृष्टी व सूक्ष्म दृष्टी दिसून येते. शेतीसाठी पाण्याचे महत्व सांगताना महात्मा फुले यांनी 'इशारा' मध्ये म्हटले आहे की, "मनुष्याचे श्रम वगैरे ही कारणे आहेत खरी; परंतु ती मुख्य आहेत असे म्हणता येत नाही. त्यात पाणी हे मुख्य कारण असे समजले पाहिजे. याकरिता शेतकरी लोकास शेतकीच्या कामास पाणी असणे हे मुख्य आहे."

शेतकऱ्यांच्या दास्यत्व शोषक व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करणारी चळवळ महात्मा फुले यांनी सुरू केली. महात्मा फुले यांची विचारधारा, कृती ही शेती व शेतकरी यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यास कारणीभूत ठरली असे म्हणता येईल. शेतमाल बाजारात नेण्यासाठी शेतकऱ्यास जकातीच्या रूपाने कर भरावा लागे. दर तीस वर्षांनी शेतसाऱ्यात वाढ केली जाई. सरकार शेतऱ्यांकडून सारावसुली करते परंतु त्या करांमधुन शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था करत नाही. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शक सूचना केल्या. पुणे

नगर परिषदेत असताना त्यांनी केलेल्या सूचना शेती व शेतकऱ्यांमध्ये अमुलाग्र बदल घडवणाऱ्या ठरल्या. त्यातील काही पुढील प्रमाणे सांगता येतील-

1. शेतकरी महाविद्यालय काढावे.
2. शेतकी शाळातून आधुनिक शिक्षण द्यावे.
3. शेतकऱ्यांच्या मुलांना विदेशात पाठवून कृषीविषयक शिक्षण द्यावे.
4. शिक्षण हे श्रमप्रधान करावे.
5. ठिकठिकाणी तलाव-तळी बांधून घेण्यासाठी लष्कर व पोलीस दलातील शिपायांची मदत घ्यावी.
6. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करावा.
7. नगदी पिके घ्यावीत.
8. पूरक व्यवसाय म्हणून उत्तम जातीच्या पशुपालनावर भर द्यावा.

अशा अनेक सूचना महात्मा फुले यांनी केलेल्या दिसून येतात. सध्याच्या 'पाणी अडवा, पाणी जिरवा' घोषणेची देणगी महात्मा फुले यांनी यांच्या 'माती अडवा, आणि पाणी जिरवा' च्या माध्यमातून दिली. शेतीविषयक प्रदर्शनाचा वारसा त्यांनी सुरू केला असे म्हणता येईल. 2 मार्च 1888 रोजी ड्युक ऑफ कॅनॉट च्या सरकार सभेला ते शेतकऱ्यांच्या वेशात उपस्थित राहिले व भाषणातून खरी परिस्थिती पहावयाची असेल तर माझ्यासोबत खेड्यात चला असे सांगितले. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याकरिता ते कर्ज मुक्त होणे आवश्यक आहे. यासाठी त्यास आर्थिक साहाय्य देणे, शेतकऱ्याचा दर कमी ठेवणे, दुष्काळासारख्या परिस्थितीत प्रसंगी सुट देणे आवश्यक आहे. यासाठी अनुत्पादक खर्चाचे प्रमाण कमी करावे असा सल्ला महात्मा फुले यांनी दिला. त्यांचा हा सल्ला वर्तमानात ही किती महत्त्वपूर्ण आहे यावरून दिसून येते. मनू समर्थक संस्कृतीत स्वातंत्र्य, समता, मानवता, सामाजिक न्याय इत्यादी मुल्य नव्हती. महात्मा फुले यांनी त्यांच्या कार्य व विचारातून क्रांती दर्शी भूमिका सातत्याने मांडली या मूल्यावर आधारित नवी व्यवस्था स्थापनेची भूमिका त्यांच्या विचारातून आली. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची चळवळ ही शेतकऱ्यांची चळवळ केली.

**समारोप:-**

महात्मा फुले यांच्या काळापासून शेतकऱ्यांचे प्रश्न बदलत गेले सध्या ते अधिक गुंतागुंतीचे बनले आहेत. प्रश्न वाढले आहेत. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' व 'इशारा' द्वारे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतील असा स्पष्ट संकेत दिला होता व आज आपण ही परिस्थिती पहात आहोत. तन्मयतेने शेतकऱ्यांचा विचार करणाऱ्या महात्मा ज्योतिबा फुले यांचे समृद्ध कृषी संस्कृतीचे स्वप्न आजही अर्धवटच आहे असे म्हणावे लागेल. त्यांनी केलेले शेतकऱ्यांचे यथार्थ वर्णन, त्यांच्या प्रश्नाची मांडणी, शिक्षणाची आवश्यकता, त्यातून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक, अंधश्रद्धा यातून म्हणावी तशी शेतकरी वर्गात सुधारणा झालेली दिसत नाही. महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेल्या सूचनांचा विचार करता त्यांची प्रासंगिकता आजही टिकून आहे असे म्हणावे लागेल.

**संदर्भसूची**

1. बहुजन संस्कृतीचे जनक महात्मा ज्योतिबा फुले, लुलेकर प्रल्हाद जी, अक्षर वांग्मय प्रकाशन, नोव्हेंबर 2019 पुणे.
2. महात्मा ज्योतिराव फुले, बगाडे उमेश, श्री गंधर्व वेद प्रकाशन, पुणे.
3. सत्यशोधक कांचे शेतीविषयक विचार, शिंदे अरुण दर्या प्रकाशन, पुणे
4. आंबेडकरी चळवळीचा इतिहास, डॉ.गाठाळ एस एस, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद
5. महात्मा फुले साहित्य और विचार, संपा, नरके हरी, 28 नोव्हेंबर 1993, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती.

# 'कथाबंध' या कथासंग्रहातील आंबेडकर विचारसरणीच्या कथा - एक आकलन

**डॉ. ओमकार विनायक पोटे**
मराठी विभाग, प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे,कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वेश्वी. ता.अलिबाग, जि. रायगड.
email id - omkarpote1000@gmail.com

**प्रस्तावना**

युद्ध परिस्थितीमध्ये मराठी कथाविश्वात अमुलाग्र बदल झाले. पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळे मराठी नवा कथेचा रूपबंध, कथेचा आयाम, कथाविश्वातील वैचारिक जाणिवांचे प्रकटीकरण या समृद्ध जाणिवांनी मराठी नवकथा समृद्ध होऊ लागली. कथेकडे कथा म्हणून बघण्याचा दृष्टीकोन बदलू लागला. त्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरामुळे दलित लेखक समाजातील अन्याय व अत्याचार यावर प्रखरपणे कथा लेखन करू लागले. रोमँटिसिझम किंवा फिक्शनपेक्षा जे भोगले जे सोसले तेच लिहिले हा वास्तववाद दलित कथेतून पुढे येऊ लागला. त्यामुळे सर्वच दलित कथांमधून अन्याय व अत्याचाराचा कथारुपी रूपबंध मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रभाव या दलित लेखकांच्या लेखणीतून अधिक प्रखरपणे पुढे येऊ लागला. कथाबंध हा संपादित कथासंग्रह २० जून २०१९ रोजी शब्दालय प्रकाशनने प्रकाशित केला. यामधील कथांचे संकलन आणि संपादन डॉ. राजेंद्र डोंगरदिवे, डॉ.सूर्यकांत आजगावकर, डॉ.भटू वाघ आणि डॉ. विनोद कुमरे यांनी केले असून यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, महानगरीय तसेच मनोविश्लेषणात्मक अशा विविध कथांचा अंतर्भाव दिसून येतो. या कथासंग्रहामध्ये एकूण १५ कथा आहेत. त्यापैकी बुद्धाची शपथ, भूक, चौथी भिंत, झूमची दांडी आणि विऱ्हार अशा एकूण पाच दलित कथा या कथासंग्रहात दलित जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत. अण्णाभाऊ साठे यांची बुद्धाची शपथ, बाबुराव बागूल यांची भूक, उर्मिला पवार यांची चौथी भिंत, कुमार अनिल यांची झूमची दांडी तर प्रज्ञा दया पवार यांची विऱ्हार या या दलित कथा आंबेडकर विचारसरणी व्यक्त करणाऱ्या कथा दिसून येतात. त्यांचा वेध या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषय विवेचन**

कथाबंध या संपादित कथा संग्रहामध्ये विविध लेखकांच्या विविध दलित कथा असल्या तरी प्रत्येक कथेतून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. शिका, संघटित व्हा आणि लढा द्या हे बाबासाहेबांचे तत्वज्ञान सांभाळत अनेक दलित कथाकारांनी आपल्या कथांची मांडणी करताना दुःख, दारिद्र्यता, भूक, अन्याय, अत्याचार या समस्याविरोधी आपली ठाम भूमिका मांडलेली दिसते. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे हा बाबासाहेबांचा विचारच पददलितांना आत्मभानाची उभारी देणारा ठरला. या वैचारिकतेची पारंपारिक मूल्ये झुगारून नवतेकडे स्वच्छंदपणे आपले विचार मांडणाऱ्या या कथा आहेत . कथाबंध या कथासंग्रहातील पहिली कथा अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेली भूक नावाची कथा सर्वप्रथम युगांतर या अंकामध्ये १९५८ साली प्रसिद्ध झाली होती.

कथेमध्ये चिंचणी या गावचे वर्णन आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला तेव्हा या चिंचणी गावचा सर्व महारवाडा बौद्ध झाला होता. आपला उद्धारकर्ता जे करील तेच करायचे या विचारांनी सर्वांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. अन्याय, अज्ञान, दारिद्र्य, अपमान कोणीही सहन करायचा नाही असा मोठ्या व्यक्तींसह लहान बालकांच्या मनावरही पडसाद उमटला होता. म्हणूनच तर विलास उर्फ मास्तरच्या आईने त्याला मारल्यावर या विलाससह साहेबू, जगू, मोहन, विश्वास हे सर्व मित्र त्यांच्या त्यांच्या घरी न जाण्याचा निर्णय घेतात आणि मुंबईला जाण्याचा निर्धार करतात. त्यासाठी ते बुद्धाची शपथ घेतात. काही वेळाने त्यांचा डळमळीत होणारा निर्धार बुद्धाची शपथ घेतल्यामुळे मागे घेता येत नाही आणि ते मुंबईकडे वाटचाल करू लागतात.

चिंचणीपासून मुंबईतील वरळीपर्यंत जाताना त्यांना असंख्य अडचणी येतात. अनेक ठिकाणी त्यांच्या जीवावर बेतणारे प्रसंगही उभे राहतात. परंतु बुद्धाची शपथ घेतल्याने परतीचा रस्ता धरणे त्यांना शक्य नसते. अखेर त्यांचा निर्धार ते पूर्ण करतात. वरळीतील एका बागेत गिरणीमध्ये काम करणारे त्यांचे नातलग त्यांना सापडतात आणि त्यांचा जीव भांड्यात पडतो तसेच बुद्धाची शपथ पाळल्यामुळे निर्धाराचा व एकजुटीचा विजय होतो. अशा आशयाची ही कथा आहे. आईने मुलाला मारणे हे गैर निश्चितच नाही. परंतु चूक नसताना आईचा मार खावा लागला, ही अन्यायाची ठिणगी तत्कालीन लहान मुलांमध्येही कशाप्रकारे पेटून उठली याचे अतिशय ज्वलंत चित्रण अण्णाभाऊ साठे यांनी या कथेच्या माध्यमातून केले आहे. त्यामुळे या पूर्ण कथेवर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचा प्रभाव अत्यंत प्रखरपणे जाणवतो. या कथासंग्रहातील दुसरी कथा बाबुराव बागुल यांनी मरण स्वस्त होत आहे या कथासंग्रहामध्ये लिहिलेली कथा आहे. भागू कोळीण आणि तिची दोन लहान लेकरे भिका आणि सटवा अनेक दिवसांपासून उपाशी आहेत. भागू अनेक दिवसांपासून आजारी असून अंथरुणाला खिळल्याने गावच्या पाटलीणीकडून शिळे झालेले कालवण आणि वाळलेले भाकरीचे शिळे तुकडे खाऊन भिका आणि सटवाला भूक भागवावी लागते. परंतु एवढी दरिद्री आणि असहाय्य असताना सुद्धा ती धाकट्या सटवाला शेजारच्या ठकूकडे जाण्यास सुरुवातीला नकार देते. कारण ठकू ही बहुजन वर्गातील असते. ती आपल्या लेकराला म्हणते की, "तिच्याकडलं आपण खावू नयी. त्यामुळं जात जाती", हे भागूचे उदगार प्रस्थापित दलित समाजाप्रती बघण्याची हीन दृष्टी लक्ष वेधून घेते.

कथासंग्रहातील तिसरी कथा लेखिका ऊर्मिला पवार यांची चौथी भिंत ही गावकुसाबाहेरील कथा या कथासंग्रहातून संकलित केलेली आहे. या कथेतील मुख्य नायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी भारावलेले, समाजाप्रती आपले दातृत्व आणि औदार्य दाखवणारे पांडुरंग बेडेकर उर्फ नाना समाजाप्रती कर्तव्य भावनेने काही करू पाहतात आणि त्याच वेळेस घरापासून ते विभक्त होतात. पोस्टाची नोकरी केल्यानंतर सेवानिवृत्तीचा कार्यक्रम मुलांच्या आग्रहाखातर आयोजित केला जातो. त्यांची मुले आग्रहाने सर्व मोठ्या मंडळींना बोलावून नानांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित करतात. व्यासपीठावर ज्या ठिकाणी नाना बसतात त्याठिकाणी त्यांच्या समोर फुले आणि आंबेडकर यांच्या फोटोफ्रेम पाहून नानांना बहुजन समाजाप्रती काहीतरी करण्याची प्रेरणा मिळते. आजपर्यंत या बहुजन समाजासाठी काहीही न केल्याने आपली सर्व मिळकत नाना या समाजाला देणगीच्या रुपाने देऊन टाकतात. घरातील मुलांना हा विचार न पटल्याने त्याच रात्री मुले नानांना बाहेर राहण्याचा सल्ला देतात. गावाकडील नानांनी नाते तोडल्याने नाना वृद्धाश्रमाचा आश्रय घेतात. घरच्या व्यक्तींना पारखे झालेलो आपण आता वृद्धाश्रमात तरी आपल्याला आपल्या बरोबरीचे मित्र आपल्याला समजून घेतील अशी त्याची अपेक्षा असते. ज्या ठिकाणी त्यांना राहण्यासाठी रूम मिळते तिथे उर्वरित तीनही भिंतींवर हिंदू देवदेवतांचे अनेक फोटो लावलेले नानांच्या दृष्टीस पडतात. आपण कोण आहोत असा जर खुलासा केला तर कदाचित घरच्या प्रमाणे इथेही आपण बहिष्कृत ठरू असा विचार त्यांच्या मनात येतो. कथेचा शेवट मात्र उत्कंठावर्धक आहे. गावातील नानांची चुलती त्यांना भेटायला येते आणि नानांनी गावाकडे चालावे आणि तेथील बहुजन समाजातील शालेय मुलांना आपले ज्ञान द्यावे, यासाठी त्यांना ती आग्रह करते. गावच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये त्यांचे नाव छापून आणते आणि ती पत्रिका नानाच्या हाती देते. पत्रिकेवरील भगवान गौतम बुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले त्यांचे फोटो असलेले निळे पत्रक पाहून नाना भारावून जातात आणि चौथ्या रिकाम्या भिंतीवर ते निळे पत्रक अभिमानाने लावतात आणि आपण बौद्ध असल्याचे अभिमानाने जाहीरही करतात. माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे ही बाबासाहेबांची विचारसरणी या अंतिम टप्प्यातील नानांच्या बंडवाडी भूमिकेतून जाणवते. कथाबंध या संग्रहातील चौथी कथा लेखक कुमार अनिल यांची झूमची दांडी ही कथा पेशवाईत मेलेला पांढरा उंदीर या कथासंग्रहातून घेतली आहे. कथेचा बाज, रूपबंध यांची अत्यंत अनोख्या प्रकारे मांडणी लेखकाने केली आहे. कथेच्या शीर्षकावरूनच चित्रपटाच्या चित्रीकरणासंदर्भात ही कथा आहे हे लक्षात येते. फिल्मी दुनिया झगमगाटीची दुनिया आहे. कोल्हापूर येथे सुरू असलेल्या डॉक्युमेंटरीच्या चित्रीकरणामध्ये दलितांना दास्यत्वाची जाणीव करून देणारी ही कथा आहे. चित्रीकरणासाठी जो जमाव किंवा मॉब लागतो त्यांना भीमनगरातून आणले जाते. शांताबाई हा जमाव पुरवतात. हा सर्व जमाव बहुजन समाजातील आहे. या जमावाला बराच वेळ थांबवलं जातं आणि काम झाल्यावर जाण्यासही सांगितलं जातं. दुसऱ्या दिवशी या जमावाला बोलवायचे की नाही हे त्यांना सकाळीच सांगितले जाईल असे सांगितले जाते. यावरून या समाजाला ही व्यवस्था फारसे महत्त्व देताना दिसत नाही. या समाजाचे प्रातिनिधिक चित्रण कुमार अनिल यांनी या खात्याच्या माध्यमातून केले आहे.

या कथासंग्रहातील पाचवी कथा प्रज्ञा दया पवार यांच्या अफवा खरी ठरावी म्हणून या कथासंग्रहातील आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार अत्यंत प्रखरतेने लेखिकेने या कथेतून मांडलेले आहेत. दलित चळवळीतील

सक्रिय कार्यकर्ते दादासाहेब साळवे यांच्या दोन मुली, थोरली सुजाता आणि धाकटी करुणा. दोन्ही मुली दादासाहेबांकडून बौद्ध तत्वज्ञानाचे धडे घेतलेल्याहोत्या. सुजाता शांत, संयमी तर करुणा तडफदार आणि धडाडीची कार्यकर्ती. दोघींवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव असला तरी दोघींचे मार्ग वेगळे होते. करुणाला सुजाताची नेहमी असूया वाटे. सुजाताची पीएच.डी. सुरू असल्याने ती चळवळीकडे फारसे लक्ष देऊ शकत नव्हती. करुणा मात्र व्रतस्थपणे डॉ. वाघ सर यांच्या सिद्धार्थ युवक संघटनेशी जोडलेली असते. वाघ सर यांचे उपदेश आदेशाप्रमाणे ती स्वीकारत असते. परंतु मसूरी येथील बौद्ध धम्म परिषदेत ज्यावेळी करुणाला सागर शिलेदार भेटतो तेव्हा त्याच्या एकंदरीत व्यक्तिमत्वावर, त्याने मांडलेल्या धम्मविषयक तत्वज्ञानावर करुणा त्याच्यावर प्रभावित होते. त्यांच्यातील ओळखीचे प्रेमात रूपांतर होते.परंतु सागर शिलेदार हा हिंदू धर्मातील ब्राह्मण वर्गातील असल्याने सिद्धार्थ युवक संघटनेतील डॉ. वाघ सरांसह करुणा हिला आंतरधर्मीय विवाह करण्यास विरोध होतो. करुणा हिने विवाह करावा की न करावा यासंदर्भात बोलावलेल्या एका विशेष सभेमध्ये सागर शिलेदार याने स्वधर्म त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारावा अशी अट त्याच्यासमोर घातली जाते. त्यावेळी तिथे उपस्थित असणारी सुजाता करणाच्या बाजूने उभी राहते. केवळ बौद्ध धर्म स्वीकारला म्हणजे बौद्ध होता येते, या विचारांना छेद देऊन जाती व धर्मापलीकडे पाहिले पाहिजे असा नवा दृष्टिकोन ती उपस्थितांसमोर मांडते. अखेर सर्वांना करुणा व सागर यांचा विवाह मान्य करावा लागतो. अशी ही अत्यंत अभिजातवादी आंबेडकर विचारसरणी या कथेतून चित्रित होताना दिसते.

**ठळक निष्कर्ष -**

1. कथाबंध या संग्रहातील प्रस्तुत पाचही दलित कथांचे स्वरूप वेगवेगळे असले तरी प्रत्येक कथेमागे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीचे अनुकूल अधिष्ठान दिसून येते.
2. कथाबंध या कथासंग्रहातील बुद्धाची शपथ ही कथा अन्याय अत्याचार सहन करायचा नाही या विचारांची कास धरणारी आहे.
3. कथाबंध या कथासंग्रहातील बुद्धाची शपथ या कथेतून बाबासाहेबांनी ज्यावेळी धर्मांतर केले त्यावेळी त्याचा पडसाद लहान मुलांवरही कशा प्रकारे पडला, याचे ही कथा उत्तम वस्तुपाठ ठरते.
4. कथाबंध या कथासंग्रहातील भूक या कथेतील भागू कोळीण जरी परिस्थितीशरण असली तरी ती सहजपणे तिच्या धाकट्या सटवाला बहुजन समाजातील ठकू मावशीकडे जाण्यास विरोध करते आणि जातीयता पाळताना दिसते.
5. कथाबंध या कथासंग्रहातील चौथी भिंत या कथेतील पांडुरंग मेढेकर उर्फ नाना घराबरोबरच वृद्धाश्रमातही बहिष्कृत ठरले. स्वकीयांचे नाकारलेपण आणि परकीयांची जात धर्म जाणून घेण्याची उत्सुकता ही समाजातील असहिष्णुता कथाकारांनी मांडली आहे.
6. चौथी भिंत या कथेतील पांडुरंग मेढेकर कथेच्या उत्तरार्धात भगवान गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे फोटो असलेले निळे पत्रक चौथ्या भिंतीवर लावून प्रस्थापित व्यवस्थेत माणूस म्हणून जगण्याचा हक्क आपल्या कृतीतून व्यक्त करतात. हा विचार बाबासाहेबांच्या विचारसरणीचा प्रभाव आहे.
7. कथाबंध या संग्रहातील धूम की दांडी ही कथा चित्रीकरणाशी संबंधित असली तरी दलितांप्रती दास्यत्वची जाणीव व्यक्त करणारी आहे.
8. कथाबंध या संग्रहातील विऱ्हार या कथेतून बौद्ध धम्माविषयीचे नवे दृष्टिकोन लेखिकेने व्यक्त केले आहेत.
9. कथाबंध या संग्रहातील विऱ्हार या कथेतील सुजाता सामंजस्य मार्गाने तर करूणा ही बंडवाडी मार्गाने मार्गस्थ होताना दिसतात. पण तरीही दोघींच्या विचारांवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव खोलवर रुजलेला दिसतो.

**समारोप**

कथाबंध या संपादित कथासंग्रहातील बुद्धाची शपथ, भूक, चौथी भिंत, झूमची दांडी आणि विऱ्हार या पाचही दलित जाणिवेच्या कथांमधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मविषयक तत्वज्ञान तसेच माणसाला माणूस म्हणून जगता यावे म्हणून त्यांनी सांगितलेल्या त्रिसूत्रीविषयक अधिष्ठान प्रत्येक कथांमधून जाणवतो. प्रत्येक कथेचा अवकाश, रूपबंध वेगळा असला तरी कथेतील बहुजन समाजावर होणारा अन्याय आणि त्याविषयी धडपडू पाहणारा, आपले हक्क सिद्ध करू पाहणारा आणि परंपरेशी नवतेची सांगड घालणारा प्रत्येक पात्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीने प्रभावित झालेला दिसून येतो.

**संदर्भसूची –**

1. कथाबंध, सं. डॉ. राजेंद्र डोंगरदिवे, डॉ.सूर्यकांत आजगावकर, डॉ.भटू वाघ, डॉ.विनोद कुमरे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती - २० जून २०१९
2. साहित्यबंध, संपादक डॉ. सतीश कामत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, आवृत्ती - डिसेंबर २०१९

# डॉ- बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार

**डॉ- प्रशांत भाऊसाहेब सोळंके**
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धारुर

डॉ- बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारे राज्य हे सेवकांची भूमिका बजावणारे राज्य होते- त्यांच्या मते jktkyk ईश्वराचा अवतार मानणे चुकीचे आहे- तर राज्य हे ykdkuk lok n.kkj साधन आहे- त्या काळात दैवी सिद्धांत अस्तित्वात होता- या सिद्धांतानुसार परमेश्वराचा कोप झाल्यास आपले जीवन vfLFkj होईल अशी कल्पना त्या काळात अस्तित्वात होती- परंतु आंबेडकरांना gk दैवी सिद्धांत मान्य नव्हता- त्यांच्या मते राज्याची निर्मिती ही सामाजिक करारातून झालेली आहे- fulxkoLFkr जीवन जगत असताना लोकांना स्वतःच्या सुरक्षिततेचा प्रश्न होता- समाजामध्ये अन्याय] अत्याचार वाढला होता- जनतेला सुखी व शांततामय जीवन हवे होते- त्यासाठी लोकांनी एकत्र येऊन आपसात djkj करून सामाजिक करारातून राज्याचे निर्मिती केली- असे मत राज्याच्या निर्मिती विषयी डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले- डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार हे समता प्रस्थापित करणारे राजकीय विचार vkgr-

**उद्देश**

1- डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधी विचार अभ्यासणे
2- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यघटने संबंधी विचार अभ्यासणे
3- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यसंबंधी विचार अभ्यासणे

डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले घटना समितीतील Hkk"k.k उल्लेखनीय आहे- ते म्हणतात सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य समता व बंधुभाव यांना जीवनाचे सिद्धांत मानणारी जीवन प्रणाली gk;- स्वातंत्र्य व समता बंधूHkkokf'kok; oxG होऊ शकत नाही- भारतीय समाजात एका गोष्टीचा मोठा अभाव आहे ती म्हणजे समता- भारतीय समाज हा उतरंडी सारखा आहे काहींची उन्नती होते तर इतरांची अधोगती gkr-

**ग्रहीतके**

1- डॉ- आंबेडकरांनी राज्याला सेवक मानले
2- समता प्रस्थापित करणारी लोकशाही डॉ- बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत होती
3- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना संबंधी विस्तृत विचार मांडले

डॉ- बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीत विरोधकांचे व cg पक्षाचे अस्तित्व असणे आवश्यक आहे- संसदेमध्ये शासनाला v0gk.k देणारे व सतत धारेवर धरणारे विरोधक हवेत- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाही ही अतिशय संथ गतीने चालणारी प्रक्रिया आहे- त्यामुळे लवकर निर्णय घेता येत नाहीत त्यामुळे कार्यकारी मंडळास यश मिळत नाही.

लोकशाहीमुळे समता प्रस्थापित होईल त्याच प्रमाणे सर्व नागरिक धर्म] वंश] जात इत्यादी बाबतीत भेदभाव करणार नाहीत- म्हणजे समतेच्या तत्त्वावर आधारित राज्य निर्माण होईल अशी लोकशाही डॉ- बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होती- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते- ते घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते- डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते सार्वभौम सत्ता ही जनतेकडून प्राप्त झालेली आहे- त्यामुळे घटना समितीचे सभासद हे सार्वभौम समाजाचे प्रतिनिधी आहेत- प्रतिनिधींनी तयार केलेली ही घटना भारतीय लोकांphp आहे असे मत त्यांनी मांडले- भारतीय संविधान आकाराने मोठे आहे- कारण

भविष्यात पेचप्रसंग निर्माण होऊ नयेत तसेच संविधानातील संदिग्धता कमी व्हावी यासाठी घटना विस्तृत व व्यापक स्वरूपात तयार करण्यात आली आहे-

संघराज्य पद्धतीचे समर्थन डॉ- बाबासाहेब आंबेडकरांनी केले- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांनी t t e And Minor i t ie या ग्रंथामध्ये आपले राज्य संबंधी चे विचार मांडले आहेत- राज्य हे व्यक्तीच्या विकासाचे साधन आहे असे मत डॉ- बाबासाहेब आंबेडकरांनी ekMy- राज्याने नागरिकांना स्वतःचा विकास करून घेण्यासाठी हक्क प्रदान करावे नागरिकांना दिलेल्या हक्काचे संरक्षण राज्याने करावे असे मत डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले- त्याच प्रमाणे आज्ञाधारक पणा हा राज्याचा आधार असावा असे त्यांचे मत होते- राज्य टिकवण्यासाठी आज्ञाधारकपणा जनतेमध्ये असणे आवश्यक असते- त्यामुळे स्थिर शासन आपल्याला प्राप्त होऊ शकते- राज्यात राहणाऱ्या जनतेला राज्यसंबंधी आदर असला पाहिजे त्याचप्रमाणे राज्याच्या अन्यायकारी अज्ञा समोर समाजाने मान झुकवता कामा u;- अशा अज्ञान विरुद्ध नागरिकांनी घटनात्मक व सनदशीर मार्गाने लढा द्यावा राज्य gh समाजोपयोगी अनेक विविध कार्य करणारी जागृत संघटना आहे असे मत त्यांनी मांडले- थोडक्यात राज्याने नागरिकांच्या हक्कांची जपणूक विषमतेविरुद्ध कार्य केले पाहिजे व व्यक्तीचा आणि पर्यायाने समाजाचा विकास हा राज्याकडून झाला पाहिजे असे विचार आपल्या राजकीय विचारांमध्ये डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले.

**निष्कर्ष**

1- डॉ- बाबासाहेब आंबेडकर यांना लोकशाहीच्या माध्यमातून सामाजिक राजकीय आर्थिक समता प्रस्थापित करायची होती हे दिसून येते.

2- राज्य ही व्यक्ती विकासाचे साधन आहे लोकांच्या हक्कांचे संरक्षण राज्याने करावे असा विचार त्यांच्या राज्यविषयक विचारांमधून दिसून येतो.

3- राज्यघटना ही कायदेशीर तरतुदींचा आणि तत्त्वांचा सांगाडा आहे असे राज्यघटनेविषयी त्यांनी आपले मत ekMY;kp दिसून येते.

**संदर्भ सूची**

1- डॉ- बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचारधारा डॉ- शुभांगी राठी
2- भारतीय राजकीय विचारवंत प्राध्यापक डॉ- शुभांगी राठी
3- आंबेडकर प्रबुद्ध भारत की और - गेल ऑम्वेट
4- महामानव बाबासाहेब आंबेडकर मोहनदास ufe'kjk; 2013
5- डॉ- आंबेडकर जीवन दर्शन] विजय कुमार पुजारी] गौतम पब्लिकेशन दिल्ली

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले यांचे कृषी क्षेत्रातील योगदान

**डॉ. रसिका महेंद्र म्हात्रे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, पी. एन.पी. वरिष्ठ महाविद्यालय वेश्वी अलिबाग
rasikamhatre**83**@gmail.com

**प्रस्तावना:-**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून आजही ओळखला जातो.भारतीय जनता आजही उत्पन्नाचे आणि उदरनिर्वाहाचे साधन म्हणून शेती क्षेत्रावर अवलंबून आहे. १९ साव्या शतकात भारतात परिवर्तन आणि सामाजिक सुधारणा घडवून आणणारे विविध समाज सुधारक होऊन गेले. त्यात महात्मा ज्योतीराव फुले यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. फुले हे आद्य समाज सुधारक तर होतेच परंतू द्रष्टये व कृतीशील विचारवंत अशीही त्यांची ओळख आहे. त्यांनी धर्म,समता,शैक्षणिक,सामाजिक, राजकीय,आर्थिक व सांस्कृतिक संघर्ष अशा विविध क्षेत्रात स्वतःच्या विचारांचा ठसा उमटविलेला होता. विशेषतः महाराष्ट्र राज्यातील कृषी क्षेत्रातील त्यांचे विचार उल्लेखनीय आहेत. महात्मा फुले यांनी १८ व्या शतकात शेतीविषयक मांडलेल्या प्रश्नांना आज २१ व्या शतकातही आपण सामोरे जात आहोत म्हणूनच प्रस्तुत संशोधन पर लेखात महात्मा फूले यांच्या कृषिविषयक विचारांचा आणि शेतकऱ्यांनाआर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुचविलेल्या उपाययोजनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:-**

1. महात्मा फुले यांच्या शेतीविषयक विचारांचे अध्ययन करणे.
2. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी मांडलेल्या उपायांचा अभ्यास करणे .
3. महात्मा फुले यांची शेतीविषयक भूमिका समजून घेणे.

**संशोधन पद्धती:-**

महात्मा फुले यांनी मांडलेल्या कृषी विषयक विचारांचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक पद्धत वापरली आहे तसेच दुय्यम साधनांचा आधार घेऊन (संदर्भ ग्रंथ, संशोधनपर लेख, पुस्तके, नेट) लेखाची मांडणी केलेली आहे.

**पार्श्वभूमी:-**

पेशवाईच्या काळात सरंजामदार, पेंढारे, कर वसुली अधिकारी यांच्या जाचाला जनता त्रासलेली होती, शेतकऱ्यांवर नवे कर लादलेले होते. शेतकऱ्यांकडून वसूल केलेला पैसा शासन ऐतखाऊ वर्गावर खर्च करीत होता. शेतसारा वसूल करण्याचा अधिकार सावकार पाटील व मामलेदार यांना होता. सावकारी व्यवस्था अस्तित्वात होती, शेती ही सामूहिक मालकीची होती. इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. त्यानंतर भारतावर ब्रिटीशांचे राज्य अस्तित्वात आले. ब्रिटीशांनी शेती क्षेत्रात नवीन बदल केले असले, लोकोपयोगी योजना राबविल्या असल्या तरी त्यांनी भारतीय जनतेची आर्थिक पिळवणूक करण्याचे धोरण स्वीकारले.शेतसारा वाढविला, शेतीचे व्यापारीकरण झाल्याने बाजारपेठेत धान्याची उलाढाल करणारे कमिशन एजंट, आडते व सावकारीचे संकट निर्माण झाले. अशा प्रकारे चहूबाजूंनी नाडलेल्या शेतकऱ्याची वाताहत थांबविणे आवश्यक होते. शेतकरी आणि कृषी क्षेत्राची प्रगती साधल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही याची जाणीव फुले यांना होती म्हणूनच त्यांनी शेती विषयक आपले परखड विचार गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड व इशारा यांसारख्या ग्रंथातून मांडलेले आहेत.

**फुले यांची शैक्षणिक दृष्टी व शेतकऱ्यांची पिळवणूक**

विद्येविना मती गेली,मतीविना नीती गेली, नीती विना गती गेली,गती विना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले, या त्याच्या उक्तीतून शिक्षण नसेल तर सर्वांचीच कशी दुरावस्था झाली आहे याची कल्पना येते. शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून बाहेर काढायचे असेल तर शेतकर्यांनी शिक्षणाची कास धरली

पाहिजे हे त्यांनी सुचविले. तसेच शासनाने साम्राज्यशाहिचे धोरणात कोणत्याही स्वरुपाची सुधारणा न करता शेतकऱ्यांवरील सारा दार तीन वर्षांनी वाढविण्याचे आखलेले धोरण अन्यायकारक होते. शेतकऱ्यांवर लोकल फंड, दर सहा मैलावर जकात कर लावण्यात आला. देश दुष्काळाच्या समस्येला सामोरे जात असताना अन्नधान्याची व कच्या मालाची निर्यात करणे, शेतमालाची नाकेबंदी करणे, परदेशी सावकारांकडून शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून अधिक व्याजदर आकारणे अशा प्रकारे साम्राज्यशाहीद्वारे शेतकऱ्यांचे झालेले शोषण फुले यांनी उलगडून दाखविलेले आहे.

**फुले यांची ध्येय्य दृष्टी व विचारांचे समकालीन महत्व:-**

महात्मा फुले यांची ध्येय्य दृष्टी शासन व शोषण यांपासून स्वतंत्र असणारे बळीचे राज्य स्थापन करण्याची होती. शोषित शेतकऱ्यांची शोषणातून मुक्तता झाली तरच शेतकऱ्यांचे राज्य निर्माण होईल. फुले यांच्या विचारांमध्ये शेतकरी केंद्रबिंदू असून मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा विश्लेषणाचा आधार होता. पाणी अडवा, पाणी जिरवा ही घोषणा करून त्यांनी पाणी प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधले.

**शेतकऱ्यांच्या दुरवस्थेची कारणे:-**

शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक, सांस्कृतिक, सावकारशाही, नोकरशाही, साम्राज्यशाही धोरण, शेतीवरील अवलंबीतांचे वाढते प्रमाण,ब्रिटिशानी अवलंबिलेले खालसा धोरण,शेतीचा वाढता कर्जबाजारीपणा, आर्थिक ऐपत असलेला मोठा शेतकरी लोप पावत चाललेला आहे ,जिरायती व बागायती शेतीतील उत्पादनात होत असलेली घट, गायरान जागा कमी झाल्याने जनावरांची होणारी उपासमार त्यामुळे मजबूत बैलांची संख्या कमी होत आहे ही कारणे प्रामुख्याने फुले यांच्या शेतीविषयक स्पष्टीकरनातून लक्षात येतात.

**उपाययोजना:-**

महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी शेतकऱ्यांनी शिक्षणाची कास धरावी,शेतीमध्ये नवीन अवजारे व नवनवीन शेतीपद्धत अवलंबावी, शेतीचे आधुनिकीकरण करावे, जोडधंदा म्हणून पासुपालानाला चालना देणे, शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करणे, दुष्काळात वित्तपुरवठा करणे, वन्यप्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना गावठी बंदुका बाळगण्यास परवानगी द्यावी,कालवे धरणे बांधणे , आर्थिक संकट व नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी आर्थिक सहाय्य देणे, शेतीवरील कराचा दर कमी करणे,उत्तम दर्जाची गाई-म्हशींची पैदास करणे,शेतकी शाळा सुरु कराव्यात,ताब्यातघेतलेलीगावठाणेशेतकर्यांनापरतकरावीत, कंपोष्टखात पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून बंधारे बांधून वळवाचे पाणी शेतात मुरविले तर शेती सुपीक बनेल, झरे आठल्नार्याहिकाणी विहिरींचे बांधकामकरावे व त्यासाठी शासनाने बक्षिसे देऊन शेतकर्यांना प्रोत्साहन द्यावे, शेतकऱ्यांच्या मुलांना शालेयसाधनांचे वाटप करावे, यांसारखे उपाय उपाय सुचवून शेतकऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा उचावण्याचा प्रयत्न फुले यांनी केला.

**ठळक निष्कर्ष:-**

1. पाणी अडवा आणि पाणी जिरवा ही संकल्पना आजच्या काळातही उपयोगी आणि महत्वपूर्ण आहे.
2. महात्मा फुले यांनी शेती व शेतकरी यांचे केलेले विश्लेषण २१ व्या शतकातील शेतकऱ्यांसाठीही लागू आहे.
3. शेतकऱ्यांचासर्वांगीण विकास होण्यासाठी शेतकऱ्यांनीशिक्षित होणे आवश्यक आहे.
4. फुले यांच्या विचारांमध्ये शेतकरी केंद्रबिंदू असून मध्यम व कनिष्ठ शेतकरी हा विश्लेषणाचा आधार होता.

**संदर्भसूची:-**

1. महात्मा ज्योतिबा फुले, शेतकऱ्यांचा असूड आणि इशारा,1 आक्टोबर १८८५.

2. शेतकऱ्यांचा असूड, महात्मा ज्योतिबा फुले,मुक्तांगण प्रकाशन, सहावी आवृत्ती, १ जानेवारी २०१९.

3. Historicity Research Journal, Volume-2, Feb 2016, http:oldhistoricity.lbp.word

# डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि दलित कविता

**प्रा.डॉ. सोळंके चत्रभुज नारायणराव**
मराठी विभाग बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज
dr. cnsolanke@gmail.com

**प्रस्तावना (Abstract) :**
साठोत्तरी साहित्यात मराठी साहित्यात दलित साहित्य हा प्रवाह निर्माण होताना आपणास दिसून येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रेरणास्थान असून 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे ब्रिद दलित संघटनेचे दिसून येते. दलित साहित्य चळवळ आणि दलित मुक्ती ही प्रामुख्याने आपणास पहावयास मिळते. माणसाला माणुस म्हणून जगण्याचा हक्क मिळाला पाहिजे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हयातभर प्रयत्न केले. अन्याय, छळ, वेदना, अपमान सोसणाऱ्या दलितांच्या विद्रोहाच्या ठिणग्या पेटल्या. बाबुराव बागूल एके ठिकाणी म्हणतात, केवळ समाज सुधारल्याने अस्पृष्यता घालवयाची असेल तर केवळ समाज बदलून चालणार नाही तर राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन होणे आवश्यक आहे.[१]

दलित कवितेचे प्रेरणास्थान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. दलितांना आत्मसम्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन निर्माण होत असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी होय.

संत चोखामेळा यांनी दलितांची वेदना साकार केल्याचे त्यांच्या अभंगातून दिसून येते.

'ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा
चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा'[२]

असे अंत:करणाचे दु:ख चोखा मेळयाने आपल्या अभंगातून साकार केले. त्यांच्या शब्दाशब्दातून जे दु:ख झिरपत होते ते अंत:करणाला भिडणारे होते.

श्शतकानुशतके भोगाव्या लागणाऱ्या व्यथा वेदनांचे, दैन्य–दारिद्रयाचे, दु:ख आणि अन्यायाचे जे अनुभव घेतले तेच अनुभव दलित कवींनी आपल्या कवितेतून मांडलेले दिसूण येतात.

वामन निबांळकर त्यांच्या कवितेतून संस्कृती विषयीची तळमळ व्यक्त करताना लिहतात की,

'कोठवर फेडाल नेसू
माझ्या माय बहिणींचे
टाता तर तुमच्या अब्रुचे धिंडवडे
तुम्ही पाहणार तुमच्याच डोळयांनी
कारण तुमच्या संस्कृतीच्या चिंध्या
सडल्या, गळून पडायला लागल्या
म्हणून तुमच्या इज्जतीचे उघडे नागडे
प्रदर्शन उद्या होणार आहे'[३]

सभोवतालचे जीवन पाहून कवी अंतर्मुख झालेला दिसून येतो. पशुपेक्षा दलितांना हीन दर्जाची वागणूक दिली जाते ही खंत कवी व्यक्त करताना दिसतो.

ज. वि. पवार त्यांच्या नाकेबंदी या कवितेत म्हणतात,

'तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत हा'

दलित कवितेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गौतम बुध्द, आणि कार्ल मार्क्स यांच्या पासून प्रेरणा घेतली असली तरी विभूतीपूजक कधीच बनत नाही. विभूतिपूजा ही विवेकवादाला मारक ठरत असते.

बाबुराव बागूल त्यांच्या एका कवितेत म्हणतात,

'ज्यांनी चूक केली येथे जन्म घेण्याची
त्यांनीच ती सुधारली पाहिजे
देश सोडून अथवा भीषण युध्द करुन'[५]

हा देश आपला नाही. आपले असे आहे तरी काय? असा प्रश्न दलितांच्या मनात येतो आणि ते स्वाभाविक आहे.

राम दोतोंडे हा दलित कवी आपले दु:ख व्यक्त करतांना लिहतो,

'काही शेतकऱ्यांच्या शेतात
मीच बनविलेली
मोट असते विहिरीच्या आत
पिऊ शकत नाही मी पाणी
आडवी येते माझी जात'[६]

ही व्यवस्था इथल्या जात्यांध व्यवस्थेने निर्माण केली पाण्याला देखील हात लावू दिला जात नाही याचे दु:ख आपल्या कवितेतून व्यक्त करताना दिसतो.

भगवान सवाई यांच्या कविता विषमतावादी व्यवस्थेवर टिकासत्र सोडतांना दिसते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वरील निष्ठा ढळलेल्या स्वजातीतील लोकांवर आसूड ओढते.

'बाबा
तुला फक्त भाषणातच ठेवून तुझे परमप्रिय चेले
थंड लोखंडासारखे गंजून गंजून जाताहेत
स्वत:चीच बोटं जपण्यासाठी
हात पसरुन हिजडयासारखे'[७]

हिरा बनसोडे यांच्यासारखी कवयत्री दलित स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी लिहते—

लोक हो! तुमच्या न्यायालयात मी
फिर्याद आणली आहे
तुम्ही तरी मला न्याय द्याल का?

असा प्रश्न विचारला गेला आहे.

**समारोप :** दलितांच्या वाटयाला जे भोगायला आले त्यातून निर्माण झालेला विद्रोह दलित कवितेतून पहावयास मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो आत्मसम्मान, आत्मभान जागृत केला त्यासाठी अविरत संघर्ष केला म्हणून दलित साहित्यीक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा पाईक आहे. कोणताही मुलाहिजा न ठेवता दलित कवितेतून विद्रोहाचा अंगारा आपणास पहावयास मिळतो. नव्या पिढीच्या दलित कवितेच्या पातळीवर अनेक नव्या प्रश्नांचे केलेले चिंतन प्रत्ययास येते.

**संदर्भग्रंथ :**

०१ दलित साहित्य वेदना व विद्रोह — भालचंद्र फडके, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
०२ मला हवी असणारी पहाट — इंप्रेशन पब्लिशिंग हाऊस, बेळगाव.
०३ दंभस्फोट — प्रा. प्रकाशन मोगले, लोकविद्या प्रकाशन, परभणी.
०४ मुखवटे — डॉ. शिवाजी जवळेकर, संवाद प्रकाशन, लातूर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# समाज सुधारक छत्रपति शाहू महाराज

**डॉ. अमोल गंगणे**

वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर, तेहसील अंबाजोगाई, जि. बीड, महाराष्ट्र राज्य, ४३१५१९.

**गोषवारा:**

छत्रपति शाहू महाराज भारत में एक सच्चे लोकतंत्रवादी और समाज सुधारक के रूप में जाने जाते थे। वह आज भी कोल्हापुर के इतिहास में एक अमूल्य रत्न के रूप में प्रसिद्ध है। छत्रपति शाहू महाराज एक ऐसे व्यक्ति थे जो राजा होते हुए भी शोषित और शोषित वर्ग की पीड़ा को समझते थे और हमेशा उनके करीब रहते थे। उन्होंने दलित बच्चों को मुफ्त शिक्षा देने की प्रक्रिया शुरू की थी। गरीब छात्रों के लिए छात्रावास की स्थापना की और बाहरी छात्रों को आश्रय प्रदान करने का आदेश दिया।शाहू महाराज के शासन के दौरान, 'बाल विवाह' पर पूरी तरह से प्रतिबंध लगा दिया गया था। उन्होंने डॉ. बाबासाहेब अम्बेडकर को उनकी शिक्षा के साथ-साथ मूकनायक अखबार के लिए भी सहायता प्रदान की गई थी। उन्होंने चित्रकार अबलाल रहमान जैसे कलाकारों को शाही संरक्षण देकर प्रोत्साहित किया।छत्रपति शाहू महाराज एक प्रमुख समाज सुधारक थे। शाहू महाराज को बहुजनों का मुक्तिदाता कहा जाता है। बहुजन समाज के सभी मानदंडों, रीति-रिवाजों और परंपराओं को दरकिनार करते हुए, शाहू महाराजजी ने समाज के समग्र विकास के लिए अथक प्रयास किया। उनके अनेको कार्यो पर प्रकाश इस शोध से किया गया है।

**परिचय:**

छत्रपति राजर्षि शाहू महाराज एक महान शासक और एक महान समाज सुधारक के रूप में समाज में पूजनीय हैं। उनका चरित्र न केवल एक ऐतिहासिक व्यक्ति है बल्कि एक ऐसा चरित्र भी है जिसे हर किसी को किसी भी समय आदर्श माना जाना चाहिए। छत्रपति शाहू महाराजने उस समय के समाज की कई अवांछनीय रूढ़ियों पर आधुनिक और गहन सोच का कोप लेकर समाज में कई सकारात्मक बदलाव किए। यह स्वीकार करते हुए कि यदि समाज को सुधारना है, तोउन्होंने प्राथमिक और उच्च शिक्षा के लिए सुविधाओं का निर्माण करना शुरू कर दिया।छत्रपति शाहू महाराजको रायता का राजा लोकराज कहा जाता था। उनका समाजके प्रती शोषित, पिढीत, महिलांओं पर उपकार है।लोगों के मन में हर जगह शासक का भय देखा जाता है लेकिन साथ ही लोगों का प्यार, स्नेह और विश्वास अर्जित करने वाला शासक दुर्लभ होता है।

**शिक्षा के विचार औरआरक्षण की व्यवस्था:**

शाहू महाराज ने अथरपगड़ जातियों को आरक्षण देकर मुख्यधारा में लाने का प्रयास किया। इसके बाद डॉ. बाबासाहेब अम्बेडकर ने इस आरक्षण को संवैधानिक संरक्षण दिया।महाराज सरकार का आदेश है कि इस आदेश की प्राप्ति की तिथि से 50 प्रतिशत रिक्तियों को पिछड़े लोगों से भरा जाए। यदि कार्यालय में पिछड़े वर्ग के अधिकारियों की संख्या वर्तमान में 50% से कम है तो अगली नियुक्ति इस चरित्र के व्यक्ति द्वारा की जानी चाहिए। इस आदेश के प्रकाशन के बाद की गई सभी नियुक्तियों की त्रैमासिक रिपोर्ट प्रत्येक विभाग के प्रमुख को भेजी जाए। 1894 में जब ताज पहनाया गया तब शाहू महाराज मुश्किल से 20 वर्ष के थे। अगले 28 वर्षों तक, जब तक उनका निधन नहीं हुआ, उन्होंने कानून में लिखा और पिछड़े वर्गों और महिलाओं के लिए शिक्षा, उद्योग और श्रम से लेकर विविध क्षेत्रों में कई सुधारों को लागू किया। कृषि, अर्थव्यवस्था और बाजार, सिंचाई और बांध, अन्य। उनमें से किसी एक के साथ उनकी पहचान करना कठिन और अनुचित होगा, लेकिन यदि आवश्यक हो, तो उन्हें शैक्षणिक संस्थानों और नौकरियों में समाज के कमजोर वर्गों के लिए आरक्षण के अग्रदूत के रूप में होना होगा।हालांकि, युवाओं के लिए अध्ययन करना आसान नहीं था-खासकर महिलाओं के लिए - प्रचलित दृष्टिकोण या वित्त की कमी को देखते हुए। इसलिए, छात्रवृत्तियां स्थापित की गईं और छात्रों के लिए सामुदायिक आधार पर छात्रावास खोले गए। जैसे-जैसे शिक्षा के द्वार खुले, पीढ़ियों को लाभ हुआ। जैसा कि वे कहते हैं, कोल्हापुर में, वास्तव में पश्चिमी महाराष्ट्र में, एक भी पिछड़ा वर्ग परिवार नहीं है जिसका जीवन शाहू महाराज के सुधारों से अछूता हो।

**प्रथा और शाहू महाराजजी का कार्य:**

राजर्षि शाहू महाराजजीने अपने राज्य में गैर-ब्राह्मण आंदोलन का नेतृत्व किया और बाबासाहेब अम्बेडकर को समर्थन प्रदान किया। उन्हें एक सच्चा लोकतांत्रिक और समाज सुधारक माना जाता था। उनके कई सुधारों में कोल्हापुर राज्य में आरक्षण की व्यवस्था क्रांतिकारी मानी जाती है। उन्होंने जाति के बावजूद सभी के लिए अनिवार्य शिक्षा मुफ्त कर दी। उन्होंने जाति व्यवस्था के तीन प्रतिबंधों पर निशाना साधा। वह नियमित रूप से तथाकथित निचली जातियों द्वारा बनाया गया खाना खाते थे। उन्होंने अपने राज्य में अंतर्जातीय विवाह के खिलाफ कानूनों को समाप्त कर दिया। उन्होंने 22 फरवरी 1918 को 'बलूतेदारी प्रथा' को भी समाप्त कर दिया, जिससे किसी भी जाति द्वारा सामाजिक दासता को समाप्त करने वाले किसी भी कार्य को करने की अनुमति प्रदान की गई।

**राजश्री शाहू महाराजद्वारा कृषीमें सुधार:**

राजश्री शाहू महाराज ने किसानों की स्थिति में सुधार के लिए स्थायी उपाय किए। 1902 के सूखे के दौरान, उन्होंने किसान समुदाय की कठिनाई को पहचाना और कृषि गतिविधियों में समस्याओं को हल करने के लिए ईमानदार प्रयास किए। उन्होंने उसी वर्ष "बड़े पैमाने पर सिंचाई नीति" पेश की। इस नीति के लिए उन्होंने सिंचाई अधिकारियों को नियुक्त किया जिन्होंने अपने प्रांत के हर गांव की जांच की और सूखे की स्थिति की गंभीरता के अनुसार गांवों के लिए सिंचाई निधि की व्यवस्था की। उन्होंने सिंचाई की समस्याओं के समाधान के लिए कोल्हापुर शहर में 18 फरवरी, 1907 को राधानगरी बांध के निर्माण की भी पहल की। यह परियोजना 1935 में पूरी हुई थी। बांध छत्रपति शाहू के अपने विषयों के कल्याण के प्रति दृष्टिकोण का प्रमाण है और कोल्हापुर को पानी में आत्मनिर्भर बना दिया है।उन्होंने न केवल किसानों को सिंचाई उपलब्ध कराने के प्रयास किए, बल्कि तकनीकी उपकरण खरीदने के इच्छुक किसानों के लिए भी ऋण सुलभ कराया। उन्होंने किसानों को उनकी फसल की उपज और विभिन्न कृषि विधियों को बढ़ाने के लिए आधुनिक तकनीक सिखाने के लिए किंग एडवर्ड कृषि संस्थान की भी स्थापना की।
उन्होंने कई परियोजनाएं शुरू कीं जो उनके राज्य के नागरिकों को आत्मनिर्भर व्यवसाय विकसित करने में सक्षम बनाती हैं जैसे कि शाहू छत्रपति स्पिनिंग एंड वीविंग मिल, किसानों के लिए समर्पित बाज़ार और किसानों के लिए सहकारी समिति ताकि व्यापार में बिचौलियों की भागीदारी को समाप्त किया जा सके। उन्होंने हमेशा अपने विषय के लिए वृद्धी और विकास का माहौल बनाने का प्रयास किया।

**महिलाओं के प्रती कार्य:**

फुले से प्रेरित होकर, शाहू महाराज ने लड़कियों और महिलाओं के लिए स्कूलों की अवधारणा पर विस्तार किया और उन्हें हर अवसर पर महिलाओं को शिक्षित करने की आवश्यकता पर बात की, जैसा कि उनके जीवनी लेखक बताते हैं। वह जानता था कि एक रूढ़िवादी समाज को इस तरह की बातचीत और सार्वजनिक प्रवचन की जरूरत है। महिलाओं की शिक्षा उनके विवाह से टकराती है क्योंकि लड़कियों की शादी यौवन पर या उससे पहले कर दी जाती है। शाहू महाराज ने अनुनय-विनय के माध्यम से बाल विवाह को रोकने का प्रयास किया। जब औपनिवेशिक सरकार ने सहमति युग विधेयक पेश किया, तो उन्होंने इसका समर्थन किया, हालांकि उस समय के रूढ़िवादियों जैसे बाल गंगाधर तिलक ने इसका कड़ा विरोध किया।दूरगामी प्रभावों को देखते हुए दो अन्य पहलों का उल्लेख किया जाना चाहिए। 1917 में शाहू महाराज ने विधवा पुनर्विवाह को वैध कर दिया, जिसका उच्च जाति के हिंदुओं के भारी विरोध के साथ स्वागत किया गया। तीन साल बाद, उन्होंने देवदासी प्रणाली पर प्रतिबंध लगाने वाला एक कानून पेश किया, जो इस क्षेत्र में व्यापक रूप से प्रचलित था, जिसमें युवा लड़कियों को भगवान या मंदिरों में पारंपरिक रूप से चढ़ाया जाता था, जिससे उनका यौन शोषण और मानसिक उत्पीड़न होता था। देवदासी प्रथा अभी तक इतिहास नहीं है, लेकिन इसका श्रेय उन्होंने एक सदी पहले इसके खिलाफ कानून बनाया था।

**निष्कर्ष:**

राजर्षि शाहू महाराज की नीतियां समाज में सभी प्रकार के परिवर्तन लाने के लिए महत्वपूर्ण थीं।शाहू महाराज द्वारा किए गए शानदार काम पर फिर से गौर करने लायक है, खासकर अब, जब दलितों और पिछड़े वर्गों के खिलाफ क्रूर बर्बरता की कहानियां प्रचलित हैं। कुलीन वर्ग के लोगों की दृष्टि में बाइक चलाने या खाने के लिए दलितों पर हमला किया गया या मार डाला जाता है। दलित महिलाओं के साथ बलात्कार और अत्याचार नियमित रूप से होते हैं। राष्ट्रीय अपराध रिकॉर्ड ब्यूरो के अनुसार, एससी आबादी के आधे से थोड़ा अधिक वाले नौ राज्यों में 2019 में

अत्याचार के 84% मामले दर्ज किए गए।ऐसे समय में जब जाति वर्चस्व और धार्मिक असहिष्णुता ने भारत के विचार को विकृत कर दिया है, जब सत्ता का इस्तेमाल सांप्रदायिक हितों को आगे बढ़ाने के लिए किया जा रहा है, उनकी विरासत आगे का रास्ता रोशन करती है। अगले मई में उनकी मृत्यु के लिए एक शताब्दी होगी, लेकिन छत्रपति शाहू महाराज की प्रासंगिकता कम नहीं होती है, क्योंकि भारत में सामाजिक समानता एक अधूरी परियोजना है। उनके विचारोकोअभी अमलमें लाना जरुरी है।

**संदर्भ सूची:**

1. https://www.newsclick.in/shahu-maharaj-why-he-matters-today-much-century-ago
2. "Prabodhan Monthly Magazine (Marathi)."(1926), 64.
3. P.B. Salunke (Ed), chhatrapatiShahu the pillar of social democracy.
4. Pawar, J., ed. (2001). RajashreeShahuSmarakGranth. Maharashtra Academy of History, Kolhapur.
5. ShahuChhatrapatiby KeerDhananjay.
6. राजऋषि छत्रपति शाहू जी महाराज एक सिंहावलोकन पेपरबैक –इनके द्वारा DrVipin Kumar Singh.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि शेतीविषयक विचार

**प्रा. अभयकुमार पाटील[१] प्रा. दादासाहेब रणदिवे[२]**
[१]ग्रंथपाल, राजे रामराव महाविद्यालय, जत जि सांगली
[२]सहाय्यक प्राध्यापक, राजे रामराव महाविद्यालय, जत जि सांगली

**प्रास्तविक :-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वांगिण विचार जगासमोर येत आहेत. परंतु त्यांच्या आर्थिक आणि शेतीविषयक विचाराकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. स्विडनहॅम महाविद्यालय मुंबई येथे बाबासाहेब अर्थकरण या विषयाचे प्राध्यापक होते. बाबासाहेबांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून पदवी तसेच १९२३ मध्ये "द प्रॉब्लेम ऑफ रुपी" या प्रबंधास लंडन विद्यापीठास सादर केलेला प्रबंध "द इव्होल्शून ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया" यासाठी पीएच.डी मिळाली आहे. बाबासाहेबांचे जे दर्जेदार लिखाण आहे, यामध्ये १. एम. ए. ची पदवी संपादन करण्यासाठी १९९५ मध्ये कोलंबिया विद्यापीठास सादर केलेला "ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया हा प्रबंध. २. सन १९१८ मध्ये जनरल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक सोसायटीमध्ये प्रकाशित झालेला "स्मॉल होल्डींग" इन इंडिया ॲन्ड देअर रेमिडीज" हा लेख. ३. कोलंबिया विद्यापीठाकडून १९२५ मध्ये पीएच.डी मिळालेला प्रबंध "द इव्होल्शून ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया" ४. डी.एस्सी. साठी १९३२ मध्ये सादर केलेला "द प्रॉब्लेम ऑफ रुपी, इटस ओरिजिन ॲन्ड इटस सोल्यूशन" ५. ३ मे १९२९ मध्ये बहिष्कृत भारत पत्रिकेतील "खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी" हा अग्रलेख वरील अर्थशास्त्रीय लिखाण बाबासाहेब हे अर्थतज्ञ असल्याची साक्ष देते परंतु या विचारांचा मात्र आजपर्यंत म्हणावा तेवढा अभ्यास झालेला नाही. म्हणून आज या विचारांची गरज आहे.

**शेतीविषयक विचार :-**
डॉ. बाबासाहेब यांनी पदवी आणि पीएच.डी साठी जे प्रबंध सादर केलेले आहेत. यातूनच त्यांचे अर्थशास्त्रीय विचार स्पष्ट होतात. याशिवाय स्वतंत्र मजूर पक्ष,[१]
भारतीय शेतकरी कामगार फेडरेशन यांचे निवडणूक काळातील जाहिरनामे, भारतीय राज्यघटनेवरील भाषणे, बहिष्कृत भारत व मूकनायक या पत्रिकामधील लेखन यातूनही त्यांचे आर्थिक विचार प्रतिबिंबीत होतात. डॉ. बाबासाहेब भारतीय शेतीविषयक विचारांची मांडणी करीत असताना १९१८ मध्ये प्रसिध्द झालेल्या भारतातील लहान धारणक्षेत्रे आणि त्यावरील उपाय या लेखामध्ये ते म्हणतात. लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसवणारी एक गंभीर समस्या असून ही लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्याने ही समस्या अधिकच बिकट झाली आहे. शेती हा भारताचा पारंपारिक व्यवसाय असून शेतीवर सर्वाधिक लोकसंख्या अवलंबून आहे. तर दुसऱ्या बाजूला शेतीची उत्पादकता अल्प आहे.

**धारणक्षेत्राचा प्रश्न :-**
वारसा हक्कामुळे जमिनीचे तुकडीकरण होत असून यामुळे उत्पादकता घटत असल्याचा युक्तिवाद केला जात असताना बाबासाहेब हे सर्व नाकारुन वारसा हक्कामुळे जमिनीचे विभाजन होत नसून शेतीवर असणारा अतिरिक्त लोकसंख्येचा भार हेच प्रमुख कारण आहे असे स्पष्ट करतात. शेतकऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा कमी असतो म्हणून लोक लहान तुकडे करण्याचे धोका पत्करत नसून उपजिवीकेचे कोणतेही साधन नसल्याने त्यांना तसे करणे भाग पडते. दुसरा कोणताही मार्ग नसल्याने ते असे करतात असे बाबासाहेब निदर्शनास आणून देतात.
मोठे धारणक्षेत्र किफायतशीर व लहान धारणक्षेत्र अकिफायशीर हा युक्तीवाद चुकीचा असल्याचे स्पष्ट करताना बाबासाहेब सांगतात, किफायतशीर धारणक्षेत्र म्हणजे नुसते आकारमान नसून धारणक्षेत्रे आणि कार्यक्षम मशागत करण्यासाठी आवश्यक असलेली इतर सामग्री यांचा मेळ होय. लहान धारणक्षेत्र ही भारताची समस्या नसून भांडवल व इतर साधनसामग्रीचा तुटवडा ही खरी समस्या आहे हेच स्पष्ट करतात. या समस्येवर पर्याय देताना बाबासाहेब औद्योगिकरणामुळे शेती क्षेत्रातील बेकार श्रमिक उत्पादनाच्या प्रवाहामध्ये सामावले जातील. यामुळे जमिनीचे होणारे तुकडीकरण कमी होईल आणि भांडवल व इतर साधनांचा वापर वाढल्याने आपोआप जमिनीची उत्पादकता वाढेल.

**सामुदायकी शेती :-**
जमिनीची उत्पादकता वाढेल परंतु महसूलाचा प्रश्न निर्माण होईल. उत्पादनावर जमिन महसूल आकारणे अन्यायकारक असून सर्वांकडून सारख्याच प्रमाणात कर वसूल करणे योग्य नाही असे बाबासाहेब म्हणतात. परंतु काही विशिष्ट रक्कमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या जमीन महसूलात माफी मिळाली पाहिजे म्हणूनच जमिन महसूल संहितेचे १०७ वे कलम रद्द करुन जमीन महसूल प्राप्तीकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे बाबासाहेब म्हणतात. यासाठी बाबासाहेब सामुदायिक शेतीवर भर देतात. कुळ कायदे व जमिनीच्या एकत्रीकरणाने भूमिहीनांचे प्रश्न सुटणार नाहीत. तर पडक जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचे प्रश्न सुटतील. जमीनदारांचे उच्चाटन झाल्यानंतर शेतकऱ्याला जमिनीचे वैयक्तिक मालकी न देतात सरकारने जमिनीचे मालक व्हावे अशा पर्याय बाबासाहेब देतात. बाबासाहेब स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरनाम्यावरुन असे दिसते की, यंत्रप्रधान शेती, विस्तृत शेती, सहकारी व सामुदायिक शेती याचा त्यांनी पुरस्कार केला आहे. कारण शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतीची उत्पादकता वाढीसाठी यावर भर देणे गरजेचे आहे म्हणून शेती हा शासकिय उद्योग व्हावा असे बाबासाहेब म्हणतात. शासनाने सर्व जमिन ताब्यात घेऊन ज्यांची जमीन घेतली असेल त्यांना नुकसान भरपाई द्यावी नंतर गावातील जमिनीचे भाग करुन ते ग्रामस्थांना खालील अटीवर कसण्यासाठी द्यावेत.

१. सामुदायिक शेतीबाबतीत सरकारी मार्गदर्शक तत्वे व अधिनियम या शेतांना लागू करावेत.
२. जमीनदार कुळ, शेतमजून, जात-पात असा भेदभाव न करता सर्व ग्रामस्थांना या शेतात सामावून घ्यावे.
३. शेती उत्पादनाचा योग्य हिस्सा सरकारला देऊन उरलेले उत्पन्न ग्रामस्थांनी वाटून घ्यावे.

सामुदायिक शेतीला बाबासाहेब शासकिय समाजवाद संबोधतात परंतु सामुदायिक शेतीÙया बाबतीत शासनाला खालील अधिकार असावेत असे बाबासाहेब म्हणतात. अ. शेती उत्पादनावर शेतसारा, जमीनदारांना दयावयाची नुकसानभरपाई व सरकारने पुरविलेल्या भांडवलाचा वापर यासाठी सरकार कर बसवू शकेल. ब. सामुदायिक शेतीÙया अटीचा भंग करणाऱ्यास योग्य ती शिक्षा करणे.

**सहकार शेती** :-

विखुरलेल्या व धारणक्षेत्राÙया लहान आकारमानाÙया समस्येवर उपाय म्हणून त्यांना सहकारी शेतीही योग्य वाटत होती. छेटया शेतकऱ्यांना त्यांÙया विनाशापासून वाचविण्यासाठी बाबासाहेब सहकारी शेतीवर भर देतात. एका विशिष्ट आकाराची सहकारी शेती अस्तित्वात आल्यास त्यामुळे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क कायम राहतील. सहकारी शेतीमध्ये शेतकऱ्यास त्यांÙया धारण क्षेत्राला लागून असलेल्या धारणक्षेत्रास जोडल्याशिवाय जमिन कसता येणार नाही. सहकारी शेती हे जसे मोठ्या आकारमानाचे असेल तरच ते एकसंधही असेल म्हणून सहकारी शेतीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**खोती पध्दती :-**

खोती पध्दती ही कुलाबा, रत्नागिरी जिल्हात जमिन कसण्याची पध्दती होती. रयतवारी पध्दतीत जो प्रत्यक्ष जमिन कसतो त्यांÙयाकडून सरकार शेतीसारा वसूल करीत असे म्हणजे यामध्ये सरकार व कुळ याचा प्रत्यक्ष संबंध येत असे परंतु खोती पध्दती जमीन महसूल गोळा करण्यासाठी खोतीची नेमणूक केली होती हा खोत जमीन महसूल गोळा करुन सरकारला भरत असे परंतु हा खोत म्हणजे गावतला लहानसा सुलतान असे कारण शेतकऱ्याला सरकार देणे देवून खोती हक्काबद्दल वेगळे देणे द्यावे लागे. यामध्ये या खोताकडून शेतकऱ्यांचे शोषण केले जात असे. तर कधीकधी खोताकडून शेतकऱ्यांÙया जमिनी बळकावल्या जात असत. म्हणून रत्नागिरी येथील दलितवर्गीय परिषदेत बाबासाहेबांनी खोती विरुध्द आवाज उठवला होता. खोती प्रदेशातील शेतकऱ्यांचे होणारे शोषण थांबवून त्यांना माणूसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी खोती पध्दती समुळ नष्ट केली पाहिजे अशी स्पष्ट भूमिका बाबासाहेबांनी मांडली होती. खोती पध्दती जमीन महसूल संहितेत येत नाही हा स्वतंत्र विषय आहे, असे बाबासाहेब मानत असत जमीन कसणाऱ्यांना कुळांचे वहिवाटीचे हक्क मिळावेत व रयतवारी पध्दती आणावी यासाठी मुंबई विधीमंडाळात १९३७ मध्ये बाबासाहेबांनी खोती पध्दती रद्द करण्यासंबंधीचे विधेयक मांडले होते.

**डॉ. बाबासाहेबांचे जलधोरणविषयक विचार :-**

स्वतंत्रपूर्व १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब केंद्रीय मंत्रीमंडळात श्रम, सिंचन वीज खात्याचे मंत्री असताना त्यांनी केंद्र सरकार या जल व वीज धोरणाचा पाया घातला आहे. परंतु हे दोन्ही विषय विभागीय सरकारÙया अखरत्यारीतील असल्यामुळे अडचणीचे ठरणार होते. परंतु संपूर्ण देशा या विकासासाठी राज्याराज्यांमध्ये जाणाऱ्या नद्यातील पाण्याचे व्यवस्थापन विविध कारणांसाठी करणे आवश्यक आहे. व त्यासाठी एक राष्ट्रीय धोरण आवश्यक आहे. याचे महत्व बाबासाहेबांनी विभागीय व राज्य सरकारला समजावून दिले आहे.

सिंचन, वीज, रस्ते यासारख्या आर्थिक पायाभूत सोयीचे आर्थिक विकासातील अनन्य साधारण महत्व असल्याने या घटकांवर बाबासाहेब भर देतात. बाबासाहेबांÙया मते स्वस्त व मुबलक विजेशिवाय औद्योगिकरणाचा कोणताही प्रयत्न यशस्वी होवू शकत नाही. त्याचप्रमाणे सिंचन सुविधा विकसित केल्याशिवाय शेतीतील उत्पादकता व उत्पादन वाढविता येत नाही. बिहारमधील दामोदर प्रकल्पाÙया पूर्णत्वानंतर महानदी, सोने तसेच कोसी या प्रकल्पांची सुरुवात याचकाळात करण्यात आली. या प्रकल्पांÙया पूर्णत्वासाठी सर्वस्वी प्रयत्न बाबासाहेबांचे आहेत. त्यामुळे आंतरराज्य नदयांचे नियमन व विकास हा विषय बाबासाहेब राज्यघटनेमध्ये केंद्र यादीत टाकतात.

**समारोप :-**

स्वातं ोत्तर भारताची विकासाची अर्थनिती काय असावी याचे विवेचन बाबासाहेबांनी "स्टेटस् ॲन्ड मायनॉरिटीज" या ग्रंथात केले आहे. या संदर्भात त्यांनी गरिबी हटाव, विषमता निर्मुलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला आहे. अर्थव्यवस्थेÙया व प्रामुख्याने शेती विकासासाठी बाबासाहेबांनी जल संसाधन विकासाला महत्व दिले आहे. जल संसाधनाÙया विकासासाठी नवीन धोरण आखत त्या विकासातून तळागाळातील लोकांपर्यंत त्यांचे फायदे पोहचतील याची काळजी बाबासाहेब घेतात. जल अथवा धरण प्रकल्प विकसित करत असताना त्या क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येकाला त्याÙया फायद्यातील वाटा मिळाला पाहिजे, त्यामुळे १९४६ मध्ये केंद्रीय मंत्रीपद सोडत असताना दामोदर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकरी व बिगर कुटूंबांचे पुनर्वसन करण्यासाठी धोरण निश्चित करतात. बाबासाहेबांनी शेती संदर्भात विशेषतः छेटया धारणक्षेत्राÙया बाबतीत मांडलेले विचार आजÙया परिस्थितीज उपयुक्त ठरतात. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांÙया आधाराने जर राज्यकर्त्यांनी धोरणे आखली तर निश्चितपणे ग्रामीण भागातील शोषितांना त्यांचे न्याय हक्क मिळतील.

# महात्मा फुले का शैक्षणिक योगदान

**प्रा. डॉ. सी. जी. कडेकर**

शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा, ता लोहारा जी. उस्मानाबाद.

ज्योतिबा गोविंदराव फुले व्यक्तित्व भारत के संपूर्ण महिला वर्ग मे दैवत के रूप मे प्रसिद्ध है । लड़कियों के लिए पहला स्कूल महात्मा फुले ने स्थापन किया। भारत की मूल पुरोगामी तथा रूढ़िवादी शिक्षण पद्धति में लड़कियों के लिए स्कूल नहीं था। 11 अप्रैल 1827 मैं महाराष्ट्र के खानवाड़ी में ज्योतिबा का जन्म हुआ। 7 वर्ष की आयु में ज्योतिबा स्कूल गए तब हिंदू समाज के जातिगत भेदभाव का सामना ज्योतिबा को करना पड़ा। ज्योतिबा को स्कूल छोड़ना पड़ा। पढ़ने की बेहद उत्कंठा देखकर घर वालों ने 1941 में एक अंग्रेजी स्कूल में पुनः प्रवेश करा दिया। विलियम्स जोंस इन के द्वारा हिंदू धर्म की अंग्रेजी कृतियां गीता, पुराण, उपनिषद, के साथ ही रामानंद, रामानुज, कबीर, दादू , संत तुकाराम, तथा गौतम बुद्ध के साहित्य का अध्ययन किया ।

सामाजिक भेदभाव तथा विसंगतियों को केवल शिक्षा द्वारा ही दूर किया जा सकता है इस निर्णय पर वे पहुंच गए। शिक्षा का प्रसार पिछड़े वर्ग तथा लड़कियों में होना अत्यंत आवश्यक है इस प्रयत्न में ज्योतिबाजी जुट गए । वंचित वर्ग और स्त्री शिक्षा के लिए उन्होंने पिछड़े वर्ग की लड़कियाॅ और लड़कों को अपने घर पढ़ाना शुरू किया । 1951 में भारतीय इतिहास में प्रथम बालिका स्कूल पुणे में ज्योतिबा फुले ने शुरू किया । स्कूल में पढ़ाने के लिए महिला शिक्षिका नहीं थी । ज्योतिबा फुले ने अपनी पत्नी सावित्रीबाई फुले को एक मशीनरी स्कूल में पढ़ाने का प्रशिक्षण दिलाया इस तरह सावित्रीबाई फुले भारत की प्रथम प्रशिक्षित महिला शिक्षिका के रूप में कार्यान्वित हुई ।

विद्या विना मती गेली।
मति बिना नीति के गेली।
नीति विना गती गेली ।
गती विना वित्त गेले।
विद्या विना शुद्र खचले।
ईतके अनर्थ एका आविद्देने केल.

यह प्रसिद्ध पंक्तियां महात्मा फुले द्वारा लिखित है। शिक्षा के महत्व को इसमें अधोरेखित किया गया है । शिक्षा जीवन का महत्वपूर्ण आधार है। शिक्षा के बिना मति तथा नीति तथा गति की हानि होती है इसी कारण हमें वित्त प्राप्त नहीं होता और वित्त के बिना हम जीवन में प्रगति नहीं कर सकते इतना अनर्थ सिर्फ विद्या की अप्राप्ति के कारण होता है ऐसा महात्मा फुले मानना था। महात्मा फुले महाराष्ट्र के मार्टिन लूथर नाम से जाने जाते हैं।प्रथम ऊपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षिताना शिक्षाइस सूत्र का उपयोग शिक्षा पद्धति में महात्मा ज्योतिबा फुले करना चाहते थे। 3 अगस्त 1948 स्कोर पुणे के बुधवार पेठ में लड़कियों के लिए पहला स्कूल महात्मा ज्योतिबा ने खोला। भारत में अछूत लोगों के लिए स्कूल चाहिए यह विचार ज्योतिबा जी को बार-बार उत्तेजित करने लगा । सन 1948 से 1952 तक पुणे में सभी जाति धर्म के बच्चों के लिए जिनमें लड़के और लड़कियाॅं दोनों का समावेश था लगभग 18 स्कूल खोले गए। प्रौढ़ शिक्षा का स्कूल भी खोला गया। भारतीय समाज व्यवस्था में शुद्र दलित और बालिकाओं के लिए शिक्षा का द्वार खोलने वाले पहले महात्मा ज्योतिबा फुले थे। ज्योतिबा फुले ने शिक्षा प्रसार के लिए निम्नलिखित विचारों का पुरस्कार किया।

बालिका शिक्षा का प्रसार।
त्रिभाषा सूत्र का अनुसरण।
शुद्र जाता अछूत लोगों को शिक्षा में प्राथमिकता।
प्राथमिक शिक्षा निशुल्क तथा अनिवार्य।
प्रशिक्षित शिक्षकों की नियुक्ति।
छात्रालय जथा छात्रवृत्ति की सुविधा।
शिक्षा प्रणाली में परिवर्तन।
ग्रामीण छात्रों को शिक्षा में प्राथमिकता

आज सरकार ने जो नयी राष्ट्रीय शिक्षा नीति का स्वीकार किया है उसके मूल में हमें ज्योतिबा के विचार प्रगट होते हुए नजर आते हैं। जोतिबाने थॉमस पेन लिखित "राइट ऑफ मैन ",पुस्तक पढ़ी थी। पुस्तक पढ़कर भी बेहद प्रभावित हुए। जातिभेद , छूत अछूत का भेदभाव मानव निर्मित है, इस भेदभाव को दूर करने का एकमात्र साधन है शिक्षा। बहुजन समाज का अज्ञान, दलितों पर होने वाले अत्याचार, महिला के साथ दुर्व्यवहार अशिक्षा के कारण है। जोतिबा चाहते थे सभी को शिक्षा प्राप्त होगी तभी ऊंच नीच का भेदभाव जल्द ही समाप्त हो जाएगा।ज्योतिबाजी ने अपनी पत्नी सावित्री बाई को शिक्षा प्रदान कर प्रथम महिला शिक्षिका का पद प्रदान किया। शिक्षा प्राप्त करना महिलाओं का अधिकार है, उन्हें शिक्षा से दूर नहीं रखना चाहिए पुरुषों के समान शिक्षा प्राप्त कर सकती हैं अज्ञानता की दलदल से शिक्षा ही महिलाओं को संज्ञान बना सकती है। यहां क्रांतिकारी विचार पुरोगामी भारत में पहली बार ज्योतिबा फुले ने प्रस्तुत किए।

प्राथमिक शिक्षा प्राप्त करना यहां हर भारतीय बालकों का हक है प्राथमिक शिक्षा निशुल्क तथा अनिवार्य होनी चाहिए यह विचार प्रथम प्रस्तुत करने वाले ज्योतिबा फुले पहले भारतीय नागरिक है। प्राथमिक शिक्षा अनिवार्य करने से अधिक छात्र शिक्षित होंगे। इन छात्रों को अध्यापन करने वाले शिक्षक भी प्रशिक्षित होने चाहिए तभी वे छात्रों को उचित शिक्षा प्रदान करेंगे। आमतौर पर उच्च शिक्षित शिक्षक तथा अध्यापक उच्च शिक्षा के छात्रों को शिक्षा प्रदान करते हैं लेकिन ज्योतिबा फुले चाहते हैं कि प्राथमिक शिक्षा को अधिक महत्वपूर्ण होना चाहिए। ज्योतिबा फुले जानते थे जो शिक्षा पद्धति भारत में उपलब्ध है उसमें संपूर्णता परिवर्तन होना आवश्यक है। केवल कर्मचारी (कारकून) का निर्माण करने वाली शिक्षा पद्धति के बजाय कारोबारी तथा जीवन उपयोगी शिक्षा पद्धति का निर्माण होना चाहिए ऐसा ज्योतिबा फूले मानते थे । शिक्षा पद्धति में त्रिभाषा सूत्र का उपयोग होना चाहिए यह विचार ज्योतिबा फुले ने सर्वप्रथम प्रस्तुत किया। समाज के पिछड़े तथा गरीब वर्ग के छात्रों को शिक्षा प्राप्त होनी चाहिए इसलिए छात्रावास तथा छात्रवृत्ति का प्रबंध हो तभी ग्रामीण तथा पिछड़े वर्ग के छात्र शिक्षा प्राप्त कर सकेंगे यह विचार ज्योतिबा जी ने व्यक्त किया। सत्यशोधक समाज की स्थापना अनाथ बालक तथा महिलाओं के लिए शिक्षा का अवसर प्रदान किया। 24 सितंबर 1873 सत्यशोधक समाज की स्थापना की। शिक्षा सभी को समान समान मिलनी चाहिए। ऊंच-नीच, अमीर गरीब, छूत अछूत, ऐसा कोई भेदभाव शिक्षा में नहीं होना चाहिए ऐसा ज्योतिबा फुले मानते थे।

महात्मा ज्योतिबा जी के कार्या में समाज की विचारधारा काफी संकीर्ण थी। अनीति संकुचित भावना समाज वन पर हावी थी। उस समाज को प्रभावित करके ऊपर उठाने के लिए उनको शिक्षित करना यही एक उपाय था, यह कार्य बड़ी लगन के साथ ज्योतिबा फुले ने किया। अस्पृश्यता निवारण, स्त्री शिक्षा, सभी को समान शिक्षा, त्रिभाषा सूत्र, पिछड़े वर्ग के छात्रों को शिक्षा, बालिका शिक्षा इसके लिए विशेष प्रयास किया। शिक्षा महर्षि की उपाधि ज्योतिबा फुले को उचित लागू होती है। ज्योतिबा फूले स्त्री शिक्षा के प्रबल समर्थक रहे हैं। हजारों सालों से शिक्षा से वंचित दलित और नारी को शिक्षा प्रदान करने का भरकस प्रयास किया । जिसके कारण वे भारत में शिक्षा के अग्रदूत कहलाए गए। अपनी जीवनसंगिनी सावित्री के साथ समाज में अध्यापन का कार्य किया। इसके लिए उन्हें भारी विरोध का सामना करना पड़ा। सावित्रीबाई फुले को भी समाज ने काफी परेशान किया। उन पर कीचड़ पत्थर गोबर फेंका गया उन्हें हर तरह से परेशान किया। लेकिन उन्होंने अपना कार्य नहीं छोड़ा। ज्योतिबा फुले कहते जब नर नारी सामान है तो भेदभाव क्यों? माता जो संस्कार बच्चों पर करती है उसी में उन बच्चों का भविष्य निर्धारित होता है यही बच्चे हमारे देश की निव है यहां निव मजबूत करनी है तो हमें लड़कियों को शिक्षित करना आवश्यक है।

ज्योतिबा फुले का महान शैक्षणिक कार्य का गौरव शैक्षणिक विभाग में कैंडी इनकी अध्यक्षता में उनके कार्य का गौरव किया गया। 1951 में महात्मा फुले ने रात्रि स्कूल खोला। लेकिन उस समय के समाज को उनका यहां समाज सुधारक कार्य बेहद खटकता है, यही लोग महात्मा फुले की हत्या के लिए कुछ हत्यारों को भेज देते हैं। ज्योतिबा फूले नहीं समाज कार्य को अपना जीवन माना। पिछड़े असहाय मजबूर दलित लोग तथा अबला स्त्री जाति के लिए हर संभव वह कार्य किया जिससे उनकी परिस्थिति में सुधार आए इसी बात से प्रभावित होकर लोगों ने उन्हें 'महात्मा' की उपाधि से गौरवान्वित किया। महात्मा फुले ने शुद्र और आति शुद्रों को जाति उत्पीड़न से मुक्ति दिलाने के लिए उन्हें संगठित करके शिक्षा प्राप्ति में उनकी सहायता की। अपनी पत्नी सावित्रीबाई फुले तथा अन्य सहयोगियों की सहायता से उनके लिए स्कूल की स्थापना की। ज्योतिबा बहुत बुद्धिमान थे। उनकी शिक्षा नीति से तथा अभ्यासक्रम में प्रकट होने वाले विचार अवश्य ही भविष्य कालीन समाज में उत्पन्न होने वाले समस्याओं के समाधान

के साथ ही आदर्शवादी जीवन यापन करने के लिए मार्गदर्शक है। महात्मा ज्योतिबा फुले की शिक्षा नीति स्वतंत्रता और बंधुता पर भरोसा रखने वाली है। शिक्षा द्वारा ही समाज का अज्ञान मिटाकर वे आदर्शवादी समाज का निर्माण चाहते थे। कितने सालों से ब्राह्मणवादी विचारधारा से हमारे भारतीय समाज में शुद्ध तथा स्त्री वर्ग को शिक्षा के अधिकार से वंचित रखा था। अनेक रूढी परंपरा तथा कुरीतियों में अत्यंत दयनीय जीवनयापन करता हमारा समाज अज्ञानता के अंधेरे मे अपने अस्तित्व की पहचान खो चुका था। शिक्षा सभी को प्राप्त होनी चाहिए इस विचार को अपने जीवन का महत्वपूर्ण लक्ष्य मानकर ज्योतिबा फुले ने शिक्षा प्रसार के लिए स्कूल खोल दिए। क्यों को पढ़ाने के लिए अपनी पत्नी को प्रशिक्षिण देखकर उन्हें अध्यापिका बनाया। यह कार्य करते समय उन्हें अपने परिवार के विरोध का सामना करना पड़ा। इस तरह से महात्मा ज्योतिबा फुले भारतीय समाज में शिक्षा का द्वार खोल कर भारत में क्रांतिकारी विचारधारा का श्रीगणेश किया। महान क्रांतिकारी की मृत्यु 28 नवंबर 1890 पुणे में हुई। उनके बाद उनका यह कार्य उनकी पत्नी तथा उनके सहयोगी द्वारा आगे बढ़ा।

**संदर्भ ग्रंथ सूची।**

1.महात्मा ज्योतिबा फुले Hindi webdunia.com.

2. ज्योतिराव गोविंदराव फुले-विकिपीडिया

३. महात्मा फुले का शिक्षा दर्शन-rashtiryashisika.com

4. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार-डॉ. सुनंदा जामकर

5. महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य-तानाजी ठोंबरे

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्त्री उध्दाराचे कार्य

**प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र**
इतिहास विभाग कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर
Email:- kallyanwatane@gmail.com

**प्रास्ताविक :—**
महात्मा ज्योतिबा गोविंदराव फुले हे १९ व्या शतकातील अत्यंत महत्वाचे समाजसुधारक होते. १९ व्या शतकाला समाजसुधारणेचे युग म्हणून संबोधले जाते कारण महाराष्ट्र व देशात याच शतका प्रबोधनाच्या वैचारीक क्रांतीला सुरूवात झाली. देशात या शतकात अनेक समाजसुधारक होवून गेले त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव अग्रस्थानी आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावर थॉमस पेनच्या 'राईटस् ऑफ मेन' या ग्रंथाचा प्रभाव होता. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, व इतर मानवी हक्काची जाणीव झाली. स्त्री शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्यता निवारण व गुलामगिरी इत्यादी प्रथा नष्ट करण्यासाठी व समाजातील वाईट रूढी,परंपरा व अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सामान्य माणसाला नवयुगाची ग्वाही देणारे आधुनिक भारतातील पहिले समाज कांतीकारण म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले हे होते 'तृतीय रत्न ' हे नाटक लिहून शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळ आहे हा महत्वपुर्ण संदेश दिला. प्राथमिक शिक्षण सार्वजनिक व सक्तीचे असले पाहिजे अशी मागणी करणारे ते पहिले भारतीय होते. शिक्षणामुळे माणसाच्या जीवनात सुख, समृध्दी व सुयश प्राप्त होते. अशा शिक्षणाची दारे स्त्रीयांच्यासाठी उघडून त्यांच्या अंगणात ज्ञानाचा प्रकाश आणण्याचे ऐतिहासिक कार्य महत्मा ज्योतिबा फुले यांनी केले.

**स्त्री उध्दारकविषयक कार्य** :—
भारतात पुरूष प्रधान व्यवस्था असल्याने स्त्री म्हणजे पाप ही भावना होती. स्त्री म्हणजे चुल व मुल हीच तीची कार्यक्षेत्र मानले जात असे. स्त्रीयांना अशा अकांक्षा असू शकतात तिला स्वातंत्र्य व्यक्तीमत्व असू शकते हे मात्र मान्य केले जात नव्हते स्त्री शिक्षण घेवून शहणी झाली म्हणजे स्वत: बिघडेल, समाजाला बिघडवेल असा समज होता. जो समाज अंधश्रध्दे मध्ये अडकला होता, विवेक गहाण ठेवून जगणारा त्याला जागृत करणे, स्त्री शिक्षणा विषयी ओढ निर्माण करणे हे सोपे काम नव्हते. परंतू महत्मा फुले यांनी अत्यंत जिद्दीने व दृढ विश्वासने आपल्या कार्याला सुरूवात केली. स्त्रीयांची स्थिती मोठी विचित्र होती. अस्पृश्या प्रमाणे होती. स्त्रीलाही शिक्षणाचा अधिकार नव्हता. तीच्या स्वातंत्र्याचे समाजाने अपहरण करून टाकले होते. स्त्रील शिकण्याचा अधिकार नव्हता. या मतांचा पगड समाजावर घट्ट बसला होता. स्त्री पारतंत्र्यात, गुलामगिरीत, अज्ञानात व दु:खात खीतपत पडली होती. धर्माच्या नावाखाली सर्व चालले होते. समाजात बालविवाह, बहुपत्नीत्व, विधवा विवाहास बंदी, सतीची चाल अशा पाशात स्त्रीला जखडून टाकले होते. आर्थिक सामाजिक व धार्मिक गुलामगिरीची शृंखला तोडण्यासाठी शिक्षणा शिवाय उपाय नाही, अज्ञानाच्या अंधकारातून ज्ञानमय प्रकाशाकडे जाण्यासाठी ते म्हणतात :—

"विद्ये विना मती गेली !
मती विना निती गेली!
निती विना गती गेली!
गती विना वित्त गेले!
वित्ता विना शुद्र खचले!
ऐवढे अनर्थ एका अविद्येने केले !! "

समाजिक कार्याची पाया भरणी त्यांनी शिक्षणाने केली. भारतामध्ये स्त्री शिक्षणाचा पाया घातला. सर्व सुधारणांचे मुळ शिक्षण आहे असे त्यांचे मत होते. " जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उध्दारी " या तत्वाचे ते पाईक होते. स्त्री ही समाजाचे मुळ आहे. असे मानून महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन या सारख्या महत्वाच्या सामाजिक समस्ये वर भरवी कार्य केले.

**स्त्री शिक्षण :—** "
बोले तैसे चाले, त्यांची वंदावी पावुले ! " या उक्ती प्रमाणे महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाला सुरूवात केली. त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. व स्त्री शिक्षिका म्हणून त्यांची नेमणूक केली. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेत भिडे वाडयात मुलींची पहिली शाळा काढली. शुद्रातीशुद्र समाजातील मुलींसाठी पहिली शाळा होती. पुण्या सारख्या सनातनच्या शहरात मुलींची शाळा कढण्याचा धाडसी प्रयोग करून दाखविला. ही पहिली मुलींची शाळा बंद पडली म्हणून फुले यांनी इ.स.१८५१ बुधवार पेठेत मुलींची दुसरी शाळा सुरू केली. इ.स. १८५१ ला रास्ता पेठेत तिसरी व इ.स १८५२ ला चौथी मुलींची शाळा सुरू केले अशा प्रकारे स्त्री शिक्षणाला महाराष्ट्रात एक वेगळी दिशा लावून दिली.

**विधवा पुनर्विवाह** :—

भारतात आदय समाजसुधारक राजाराम मोहन रॉय यांनी सतीच्या चाली विरोधात आवाज उठवला. व कायदयाने सतीच्या चालीला बंदी घातली. समाजात बालविवाह मोठया प्रमाणात होत. एखादया स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाला तर विधवा पुर्नविवाहासाठी धडाडीचे प्रयत्न केले आणि तो सत्यात उतरविला. इ.स. १८६४ साली पुण्यातील गोखले बागेत एका विधवेचा पुनर्विवाह घडवून आणला.

**बालहत्या प्रतिबंधक गृह** :—

एखादया विधवा स्त्रीचे जर वाकडे पाऊल पडले तर तीची फार वाईट अवस्था होई. अशा विधवा स्त्रीयांना त्या काळात आत्महत्या या शिवाय पर्यायच नव्हता. अशा विचित्र अवस्थेतून विधवेची सुटक व्हावी म्हणून महात्मा फुले यांनी विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी व आपले मुल तेथे ठेवण्या साठी " बालहत्या प्रतिबंधक गृह " इ.स.१८६३ मध्ये आपल्या घरा शेजारी उघडले या वरून असे दिसते की सामाजिक परिवर्तने ही योगायोगाने घडून येत नसतात ती कृतीतून व निर्धारातून घडत असतात. काशीबाई या विधवेचा बालहत्या प्रतिबंधक गृहातील मुलगा यशवंत याला महत्मा फुले यांनी दत्तक घेतले.

**केशवपणा विरूध्द चळवळ** :—

उच्च वर्गातील ब्राम्हण समाजात केशवपणाची वाईट प्रथा होती. ब्राम्हण विधवा स्त्रीयांचे केस कापले जात असत. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जनजागृती करून १८८४ मध्ये तळेगाव येथे विधवांच्या केशवपणा संदर्भात नाभिकांचा संप घडवून आणला व नाभिकांनी येथे पुढे विधवेचे केशवपण करणार नाही असा निर्धार केला. या मुळे महात्मा फुले यांना वाईट चालीरिती,रूढी परंपरा यांना काही प्रमाणात पायबंद घालण्यास यश आले.

**सारांश** :—

१९ व्या शतकात भारतीय समाज अंधारात चाचपडत होता. ब्रिटीशांची सत्ता स्थापन होवून देखील सरकार भारतीयांच्या धार्मिक क्षेत्राात हस्तक्षेप करायला तयार नव्हते. भारतीय आदय समाजसुधारक यांनी सरकारला हस्तक्षेप करण्यास भाग पाडले. त्यातूनच सतीच्या चालीला कायदयानेच बंदी घातली गेली. महात्मा फुले यांनी स्त्रीयांना शिक्षण देवून न्याय हक्कासाठी लढण्याची जाणीव करून दिली. त्यांनी स्त्री शिक्षण, विधवा विवाह, बालहत्या इत्यादी क्षेत्रात भरीव कार्य केले. महात्मा फुले हे ग्रंथप्रामाण्य मानणारे नव्हते तर शब्दप्रामाण्य मानणारे होते. ते बोलके समाज सुधारक नसुन कर्ते सुधारक होते.कोणत्या मुळाशी जावून विचार करणारे होते म्हणून त्यांना महाराष्ट्राचे "मार्टिन ल्युथर " म्हणून ओळखले जाते.

**संदर्भ ग्रंथसूची :—**

१) फडके य.दी., महात्मा फुले वाङ:मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२) किर, धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन , मुंबई
३) खरात शंकरराव, सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी प्रकाशन ,पुणे २००६
४) भगत. रा.तु, शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर
५ ) भिडे पाटील थोरात , महाराष्ट्रातील समाजसुधारणेंचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. अम्बेडकर की चिंतन दृष्टि

**डॉ. रमेश विठोबा कांबळे**
हिन्दी विभागाध्यक्ष वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी, जि.उस्मानाबाद

समता, स्वतंत्रता और बन्धुत्व के आद्यार्य बाबासाहेब ने अपनी असाधरण प्रतिभा से मनुष्य के व्यवहार से उपज रही धुंधलाती सुबह को महसूस किया था, और उन्हें ज्ञात था कि, सूबह को र्निदोषित करने का एक मात्र साधन ज्ञान है, क्योंकि ज्ञान की सच्चाई मृत्यु की सच्चाई से कई गुणा सत्य है। उन्होंने शिक्षा के बारे में कहा कि ''शिक्षा एक दुधारी तलवार की तरह है। जो व्यक्ति चरित्रहिन और विनयरहित है, शिक्षित हुए भी एक पशु से अधिक भयावह है।'' शिक्षा, मनुष्य जीवन में सच्चे राही के समान है। शिक्षा के कारण ही मनुष्य को उसके स्वप्न का अर्थ प्राप्त होता है। और स्वप्न की बेदारी मनुष्य के कर्म का उत्तर है। वे अक्सर कहा करते कि, जिन लोगों को अपने दशा–दिशा में सुधार लाना है, उन लोगों को पढना और सोचना शुरु कर देना चाहिए। इसी तर्ज पर मार्च १९२४ में अपने कार्य का शुभारंभकर २० जुलाई १९२४ को ''बहिष्कृ हतकारिणी सभा'' नीवं डाली, जिसका उद्देश्य था 'दलित वर्ग के लिए शिक्षा प्रसार करना और पुस्तकालय, अध्ययन केंद्र तथा छात्रावास की सुविधा उपलब्ध कराना।' बाबासाहेब के इसी कर्म का फलित था कि ४ जनवीर १९२५ को अछूतों के लिए पहला छत्रावास शोलापुर में खूला।

डॉ. अम्बेडकर मनुष्य मन के प्रेरक और ज्ञान के अनुसंधान कर्ता थे। उन्हें यह ज्ञात था कि, ज्ञान की प्रखरता किसी भी प्रश्न का सप्रमाण उत्तर दे पाएगी। इसी कारण वे समाज की रचना मनुश्य के मन में उपजी प्रश्न तालिका के उत्तर के स्वरुप चाहते थे। जिससे मनुश्य को व्यवस्था के प्रति आस्था समझ में आए और हमारा समाज–विज्ञान और तकनीकी की ओर अग्रसर होकर स्वयं की स्थिति को समझकर जीवन बसर कर सके।

डॉ. अम्बेडकर उस यूग में पैदा हुए थे, जहाँ भारतीय समाज व्यवस्था पूरी तरह पतन की राह पर थी, समाज में कुष्ठित विचार धारा सरबुलंद थी, अंधविश्वास, मानव–मानव के बीच पशुवत व्यवहार, वर्ण व्यवस्था, जाति–पाँति के आधारपर कर्म व्यवथा और सवर्णो द्वारा जाति के आधारपर अवर्णो को अपमानित करने की बहुतायत स्पर्धा उस वक्त समाज में आम बात थी। ऐसे समय में किसी को भी ज्ञान,बुध्दि,समझ,अक्ल,इल्म,मनीषा जैसे आदि शब्दों से कोई वास्ता ही नही था। वैसे में बाबासाहेब ने समयावत धर्मान्ध कर्म को परिभाषित करते हुए कहा कि ''तो सोचो, सोचना जीवन का  धर्म है और फिर सोचे पर सविवेक चलते रहो, यही जीवन का धर्म है। उसकी गतिका धर्म है।'' उन्होंने मानव में ज्ञान को सर्वाधिक महत्त्व दिया है। ज्ञान ही वह सुंदर स्वप्न है जिससे मनुष्य अपने जीवन में प्रेम भाईचारा आदि को जन्म दे सकता है। वे अपने पिता के मित्र को ज्ञान की भूमिका मानव जीवन में कितनी महत्त्वपूर्ण है इसे बाताते हुए कहते हैं कि आईक वडील मुलांना जन्म देतात, त्यांच्या भविष्याला नाही, ही कल्पना आपण आता पूर्णपणे सोडून दिली पाहिजे, ''आई–वडिल निश्चितपणे आपल्या मुलांचे भवितव्य घडवू शकताता आणि आपण हा विचार एकदा मान्य केला तर खात्री बाळगा की आपल्याला लवकरच चांगले दिवस दिसतील, शिवाय जर मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणासाठी ही पाठ–पुरावा केला तर आपल्या प्रगतीचा वेग नक्कीच लक्षणीयरित्या वाढेल।'' इन चिारों में मानवी उत्थान की जो राह तराशी गई है वह पूर्णत: बुध्दि बलिष्ठता के सहयोग से प्रकृति ने जो मनुष्य को उसकी नायबीयत के प्रमाणपर मूहर लगता है। बुध्दि के बलपर बना हुआ समाज आदर्श–समाज की सही साक्षात् कराएगा उन्हें इस बातपर विश्वास था। समाज की व्याख्या मानवी व्यवहार के निष्कर्ष का नाम हैं। और मानवी व्यवहार धर्म के रास्ते अर्थ के सहयोग से कर्म की याग्यता निर्धारित करती है। डॉ. अम्बेडकर के अनुसार समाज वह है ''जिसमें समता, स्वतंत्रता व भ्रातृभाव का समन्वय हो।''

डॉ. अम्बेडकर एक मनीषी थे। उनका चिंतन संत कबीर के भाँति गंभीर और सटीक था। उनका कर्मवाद में विश्वास नहीं था बल्कि उनका कर्म के औचित्य पर विश्वास था। वे जो सोचते उसे हीं अपने व्यवहार में उतारकर सादरीकृत करते। उनका मानस उसी प्रवाह में प्रवाहित होता जो

सार्वजनीन को लाभदायक हो। वे ज्ञान की सीमा को विज्ञान की अपारता से तौलकर सत्य की परिभाषा करते थे। वे ज्ञान की सत्यता अथवा असत्यता को इस बात पर मानते थे कि वह कार्यसिध्दि अथवा अत्यता को इस बात पर मानते थे कि वह कार्यसिध्दि में कहाँ तक उपयोगी है। वे मानते है कि मनुष्य के ाान की साधना ही आध्यालिक प्रवाद को सुलझाने का मार्ग प्रशस्त कर सकता है। एक व्यक्ति को कभी—कहीं भी धर्म की आवश्यकता नहीं होती, लेकिन वहीं व्यक्ति जब एक से दो की समुहतामें आता है, अपने व्यवहार को अंजाम देता है तब चाहे—न—चाहे ज्ञानार्थधर्म की जरुरत पडती है। इसी बात को कहते वहुए 'अन हेलेशन ऑफ कास्ट' में लिखा है कि ''डॉ. अम्बेडकर धर्म को तर्क के आधार पर मानने पर जोर देते थे। वे धर्म की विज्ञानवादी व्याख्या करते थे, धर्म संहिता पत्थर की लकीर नहीं है जिसे बदला नहीं जा सके, वे ऐसा सोचते थे।''

डॉ. आम्बेडकर अपने बुध्दि के बल पर ही लोकण्यावस्था को निर्मल करने की नीति को मान्य करते थे, इसी तर्ज पर उन्हें सृजनात्मक राजनीतिज्ञ कहना अतिशयोथ्कत नहीं होगा। उन्होंने कभी राजनीति में श्रध्दा, भक्ति, एवं भावुकता को स्थान नहीं दिया, उनका मूल लक्ष्य था समानता की दृष्टिसे 'सबका साथ सबका विकास' इसी बुनियाद पर उन्होंने संविधान मं 'हम भारत के लोग' इस वाक्य से पहले की। वे बखुबी जानते थे 'सामाजिक लोकतंत्र ही राजलोकतंत्र' की रीढ की हड्डी है। समाज में से भेदभाव एवं पृथकता को दूर किए बिना देशाएकत्व की परिभाषा और देश का विकास असम्भव है। इसी नींव पर 'मजदुर किसान का राज्य' की संकल्पना को स्वरुपायित कर भारतीय संविधान में केन्द्रीकरण, धर्म निरपेक्षता, सुदृढ कार्यपालिका, राष्ट्रीयता और लोक कल्याणी सरकार आदि गुण समाविश्टकर लोकतंत्र को सुदृढ बनाया। बाबासाहेब का यह कार्यफलित ही है कि आज व्यक्ति 'स्व' में पूर्ण हैं

डॉ. आम्बेडकर की यह ज्ञान साधना ही थी कि, उन्होंने सामाजिक असमानता को अर्थ की गैरबराबरी के मूलार्थ में देखा, इसी कारण वे सामाजिक तथा आर्थिक समस्याओं को अनुसंधानपरक नजरिये से जाँचा परखा और सोदाहरण उसका विश्लेषण कर विश्व के सामने अर्थक्रांन्ति की दिशा में अपना बहुमूल्य योगदान दिया। उन्होंने अपनी नवीनतम क्रांतिधर्मिता के कारण अतिवादिताके परिमाण को समाज के सम्मुख पेश किया उनका मानना था कि 'कार्ल मार्क्स का समाजवाद आर्थिक तथा सामाजिक शोषण के विरुध्द एक क्रांतिकारी उपाय है।' कुल मिलाकर उनकी ध्यान विरेचनता बुध्दि के पथ को बहुतायत स्थान दिलाती है, जिससे मानवी भावना को समय की गहराई के साथ भविष्य की स्थिति को आकलित करना सम्भव हो।

**डॉ. आम्बेडकर की भाष्यता में भविष्य का रुप :—**

डॉ. आम्बेडकर का चिंतन और मनन मौलिक था। उनके चिंतन मनन का मुख्य आधार मनुष्य जीवन की जरुरतें थी। जिसके कारण उनके चिंतन में मानवतावाद की लहर अखण्डित रही है। उन्होंने कभी भी अपने सिध्दांत को अंगीकारने में जिद् नहीं की। जिद का करना वे ऐसे मानते थे जैसे मनुष्य के शक्ल से हटकर गधा बनना, क्यों कि जिद् गधे की सीफत है, मनुष्य की नहीं। वे कहते है कि ''मै अन्याय, अत्याचार, आडंबर तथा छल—कपट से घृणा फैलाने के दोषी है। वे अपने आलोचकों को यह बता देना चाहते थे कि उनकी घृणा की भावना वास्तव में उनकी शक्ति है। यदि वे उनके प्रति सच्चा प्रेम नहीं रखते तो हो सकता है, उनका संघर्ष अधूरा रह जाता।'' इस मतावंश में उनकी जिद् नजर नही आती बल्कि हृदय की सोहार्दयता, विशालता और सह्दयता की अनुभूति होती है।

उन्हें यह ज्ञात था कि, समाज मानवीव्यवहार के प्रति एक सीमा को सजाकर परिणाम के प्रति समार्पित हैं। समाज बहुआकांक्षी सबलता के प्रति अंकुश लगाने में असमर्थ होता है। इसी कारण डॉ. आम्बेडकर साहित्य और विज्ञान को एक मानते हुए अपने कल्पना शक्ति के तर्ज पर सूंदर — स्वच्छ जीवन—जगत के उद्घाटन करने को प्रोत्साहित किया है। जब मनुष्य में एक सूमधुर—कोमल और दयांक ध्वनि की व्यवहार्त जन्म लेगी तब सदाचार और नैतिकता आम दृष्टिगत होगी। डॉ. आम्बेडकर के जीवन रहस्य में सर्वाधिक महत्व ज्ञान की पारमिता थी। पुस्तक उनके सहचर के रुप में थी। न्यूयाँकर्क के सफर के दौरान उन्होंने २,००० पुरानी पुस्तके खरीदी और गोलमेज सम्मेलन के दूसरे दौर में ३२ बक्से पुस्तकों से भरी हुई भारत को भीजवाइ थी वे

अक्सर कहा करते थे कि ''मेरे जैसे व्यक्ति को जिसे समाज ने बहिष्कृत किया उसे इन पुस्तकों ने अपने ह्दय में स्थान दिया हैं।'' ७ अर्थात मनुष्य की ज्ञान की साधना ही जीवन को समझने में हमारी मदद करेगी।

**संदर्भ:—**


१. जगज्जेते, डॉ. भुषणकुमार उपाध्याय, विजय प्रकाशन, नागपुर, पृ.२०७.
२. महानायक बाबासाहेब डॉ. अम्बेडकर, मोहनदास नैमिशराय, धम्म ज्योति चॅरेटिबल ट्रस्ट दिल्ली, पृ.१६८
३. डॉ. आम्बेडकर : चिंतन और विचार, डॉ. राजेंद्र मोहन भटानागर, जगतराम एण्ड सन्स, दिल्ली, पृ.१४८
४. हिन्दू वर्ण व्यवथा में दलित, अरुणचंद्र दास, पृ.१७
५. जाति का उन्मूलन, डॉ. आम्बेडकर, पृ. १०
६. हिन्दू वर्ण व्यवथा में दलित, अरुणचंद्र दास, पृ. २१

# छत्रपती शाहु महाराजाचे शेतीविषयक विचार

**डॉ.जयदीप रा. सोळुंके**
भूगोल विभाग, श्री पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय,सिरसाळा ता. परळी वै. जि.बीड

महात्मा फुले यांनी शेतकरी सुखी तर जग सुखी हे सुत्र त्यांनी कधीच सोडले नाही. हे करताना ते स्वात:ला शेतकरी म्हणवुन घेण्यात धन्यता मानत तसेच ते आपल्या पुण्याजवळील मांजरी येथे असणाऱ्या शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करत असत. महात्मा फुले यांचा शेतीविषयक असणारा विचार जो होता तो शाहु महाराजांनी जसाच्या तसा स्विकारल्याचे दिसुन येते. शाहु महाराजांना असे वाटत होते की, भारतीय शेतकरी आर्थिक गुलामगिरीतुन बाहेर आल्याशिवाय त्याचे दारिद्रय संपणार नाही त्यासाठी त्यांनी कृषी विकसाच्या विविध योजना आखल्या.

**बीज संज्ञा** :जलसिंचन, पिकरचना, जोडव्यवसाय, जंगल संरक्षण कायदे, शेतीविषयक संशोध, वृक्ष लागवड, सावकारी पाशातुन शेतकऱ्यांची मुक्ती.

**उद्दिष्टे :**

1. राजर्षी शाहु महाराजांनी केलेल्या शेतीविषयक सुधारणांचा अभ्यास करणे
2. कोल्हापुर संस्थानातील शेतीविषयक धारेणांची माहिती होणे.
3. राजर्षी शाहु महाराजांचे शेती वि**षयक विचार समजुन घेणे.**

**जलसिंचनाची योजना :**

शाहु छत्रपती जेव्हा गादीवर आले व राज्यकारभार सुरू केला तेव्हा ते अवघ्या बावीस वर्षाचे होते तेव्हा राज्यात दुष्काळ पडला. १८९६ च्या दुष्काळाला शाहु महाराजांनी समर्थपणे तोंड देवुन एकही माणुस मरू दिला नाही व जनावराची देखील व्यवस्थित देखरेख केली व दुष्काळाचा सामना केला तेव्हा त्यांनी ठरवले की शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवण्याची व्यवस्था केल्याशिवाय शेतकरी सुखी होणार नाही. शाहु महाराजांनी शेतीला पाणीपुरवठा झाला तरच विकास होईल असे जाणवले कारण मे १९०२ मध्ये शाहु महाराज सातव्या एडवर्ड राज्यरोहण सोहळयासाठी इंग्लड व इतर युरोपीय देशाच्या दौऱ्यावर गेले. उदा. इंग्लडमध्ये त्यांना रॉयल ॲग्रिकल्चर सोसायटी ऑफ इंग्लड यांनी शेतीविषयक महाराजाची असणारी आवड पाहुन त्यांना संस्थेचे सदस्य करून घेतले तसेच त्यांनी इटलीमध्ये शेती व उद्योगाची पाहणी केली. स्कॉटलंडमधील अनेक शेती प्रकल्पाचा अभ्यास त्यांनी केला त्यांच्या हे लक्षात आले की संस्थानात शेतकऱ्याचा विकास हा जलसिंचनाच्या सुविधेशिवाय होणार नाही त्यामुळे लहान मोठया पाणीपुरवठयाच्या योजना तयार करणे आवश्यक आहे. शेतीला पाणीपुरवठा झाला पाहिजेत यासाठी महाराजांनी शंकर सिताराम गुप्ते यांच्या नियंत्रणाखाली विभाग सुरू केला. ३ फेब्रुवारी १९०२ रोजी महाजांनी अध्यादेश काढुन संस्थानातील तलाव विहीर व इतर जलाशयाची माहिती जमा करावी. त्यांनतर १९०६ सालापासून या बाबीकडे महारांजानी विशेष लक्ष दिले. महाराजांनी विहीरीची संख्या वाढावी यासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठाही करण्यात आला. महाराजांनी काही काही तलावाची दुरूस्ती उदा. भेडसगाव, भरकोळ तट काही तलाव बांधण्यात आले उदा.राजबाग, शिरोळे, शहापुर, वडगाव इ. शेतकरी विहीरीच्या पाण्यावर थोडीफार शेती बागायती करत होते हे महाराजांना सतत मनात दु:ख होते की शेतकऱ्यांना कायम पाणीपुरवठा होणे आवयक आहे. त्यासाठी करवीर संस्थानातील शेतीसाठी आपण काहीतरी केले पाहिजे.

करवीर संस्थानातुन ज्या नद्या वाहत होत्या त्यावर धरण बांधले पाहिजेत असे महाराजांना वाटत होते. या संस्थानात दुधगंगा, देवगंगा, वारणा, तुळसी, कासारी, कुंभी, भोगावती इ. नद्या वाहत होत्या या पैकी एका नदीवर धरण बांधले गेले पाहिजेत. महाराजांना वाटले यासाठी त्यांनी प्रसिध्द अभियंते सर विश्वेश्वरय्या यांचा सल्ला घेतला व त्यांनी भोगावती नदीवर धरण बांधण्याचे निश्चित केले. यासाठी त्यांनी फेजिवडे हे गाव धरण बांधण्यासाठी निवडण्यात आले. हे गाव भुदरगड तालुक्यात असुन कोल्हापुरपासुन ३० मैलावर आहे. या धरणासाठी तीन जागा निवडण्यात आल्या त्यापैकी पहिल्या ठिकाणच्या धरणापासुन खर्च जास्त होऊन फक्त ५०० एकर जमीन लागवडीखाली येणार होती म्हणुन ती रद्द केली दुसरी जागा तेथे खर्च जास्त होता दीड कोटी होता ते परवडणारे नव्हते म्हणुन तिसरी जागा ज्या ठिकाणी खर्च ३० लाख होऊन धरणाची लांबी २६०० फुट उंची १०० फुट व वीस हजार एकर जमीन पाण्याखाली येणार होती. ही जागा निवडण्यात आली. महाराजांनी धरणासाठी जी पाहणी केली व त्यांचा हेतु धरणासाठी येणारा खर्चाचा अर्थिकभार ब्रिटिश सरकारने उचलावा व जागा नजरेखालुन घालावी हा होता. यासाठी त्यांनी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॉमिस्टन यांना पत्र पाठवले. धरणाची बांधण्याची मनात तळमळ होती यासाठी त्यांनी १९०९ मध्ये मुंबईला आल्यानंर सरदार आश्रमामध्ये असताना धरणाचा अभ्यास करण्यासाठी कोल्हापुरचे रेसिडेन्ट मेजर वुडहाऊस यांना मुंबईत मुक्कमासाठी पत्र लिहतात. या धरणच्या कामासाठी योग्य ती मदत करण्याचे लेखी आश्वासन दिले. नोव्हंबर १९०९ मध्ये महालक्ष्मी राणीसाहेब यांच्या हस्ते कामला सुरूवात झाली. काम जोरात सुरू झाले त्यात पहिले जागतिक महायुध्द १९१४ साली सुरू झाले तरीही धरणाचे काम चालुच होते. १९१८ साली राधानगरी धरणाचे बांधकाम बंद पडले ते शाहु छत्रपतीच्या काळात सुरू होऊ शकले नाही त्याच्या मुलाने छत्रपती राजाराम महाराजांनी हा प्रकल्प पुर्ण केला व आपल्या पित्याचे स्वप्न पुर्ण केले.

२१ मार्च १९०८ रोजी शाहु छत्रपतीच्या जेष्ठ कन्या राधाबाई ऊर्फ अक्कासाहेब यांचा देवासाचे युवराज तुकोजीराव यांच्याशी विवाह झाला. या आनंददायी प्रसंगाची आठवण रहावी म्हणुन या धरणाजवळील नवीन वसाहतीला राधानगरी असे नाव दिले गेले.

**पिक रचनेत बदल :**

शेतकरी बाजरी, ज्वारी, मका, भात ही पांरपारिक पिके घेतो पाऊस व्यवस्थीत तर शेतकरी खुश जर पाऊस पडला नाही तर शेतकऱ्यांचे दारिद्रयात वाढ होते यासाठी महाजरांनी शेतकऱ्यांनी पारंपारिक पिक उदा. भात, ज्वारी, मका, बाजरी हे पिके घेण्याऐवजी

नगदी पिके घ्यावीत यात चहा, कॉफी, बटाटे, कापुस, रबर, ताग याचा समावेश होतो. यासाठी महाराजांनी प्रयत्नही केले. पन्हाळा व भुदरगड या भागात कॉफीची लागवड केली. त्याच बरोबर चाहाचीही लागवड केली. या बरोबरच या भागात वेलदोडे आणि कोको याची लागवड केली. अशा पध्दतीने शेतकऱ्यांकडे पैसा यावा यासाठी नगदी पिकाची लागवड करावी हे प्रत्यक्षात महाराजांनी कृतीतुन दाखवुन दिले.

**शेती आणि शेतकरी या संबंधी संशोधन :**

शेती व शेतकरी यांच्या संबंधी संशोधानाची कास धरल्याशिवाय प्रजेचे दारिद्रय दुर होणार नाही असे त्यांचे मत होते. याासाठी पारंपारिक पध्दतीने शेती करण्याऐवजी आधुनिक पध्दतीने शेती केली पाहिजे असे मत होते. उदा. मोटेने पाणी देणे यात बदल होणे आवश्यक आहे. तसेच ऊसाचा रस काढण्यासाठी घाणा वापरला जात होता तो वजनदार असल्यामुळे यात शेतकऱ्यांची बोटे सापडत व ते कायम अपंगत्व येत यात सुधारणा होणे गरजेचे आहे. यासाठी महाराजांनी १ जुन १८९५ रोजी आज्ञा प्रसिध्द केली त्यात शेतकऱ्यांच्या घाण्यात हात सापडणर नाही व त्यांना इजा पोहोचणार नाही अशी युक्ती १ जानेवारी १८९६ पर्यंत शोधुन काढली तर त्यांना चांगले बक्षीस देण्यात येईल.

**जोडधंद्याचा विकास:**

शेतकऱ्यांना दारिद्रयातुन वाहेर पडण्यासाठी जोड धंद्याचा विकास होणे आवश्यक आहे. हे त्यांच्या लिखाणावरून दिसुन येते. महाराज १४ मे १९०२ रोजी इंग्लड, युरोपच्या दौऱ्यावर गेले होते त्यासाठी १७ एप्रिल त्यांनी लॉर्ड हिल या ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्र पाठवुन त्यात लिहीले होते की, शेतकीच्या जनावरांची व कोंबडी, बदकांची पैदास, दुधदुभत्याची उत्पत्ती इत्यादी शेतकीचे धंदे लहान – मोठया प्रमाणावर ज्या ठिकाणी चालले आहेत असे एखादे स्थाळ पहावे असे मला वाटले. यावरून शेतकऱ्यांनी शेती बरोबर जोडधंदा करणे आवश्यक आहे. महाराजाना असे वाटत होते की पशुपालनामुळे दुध व तुपाची समृध्दी देशामध्ये होते त्यासाठी लक्ष देणे गरजेच आहे.

**जंगल संरक्षण कायदे :**

महाराजांनी जंगल संरक्षणाविषयी कायदे करताना जंगलातील जनतेचे उदरनिर्वाहाचे साधन जाणुन त्याच्यावर उपासमारीचा वेळ येणार नाही याची काळजी घेतली. महाराजांनी जंगलविषयक वाटहुकुम जो काढला त्यात गोरगरीब जनतेचा मानवतावादी दृष्टिकोनातुन विचार केला. उदा.ज्या ठिकाणी शेळया–मेंढया चारल्यामुळे जंगलाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. यावरून महाराजाचा गोरगरीब माणसाबद्दल असणारा दृष्टिकोन लक्षात येतो.

**झाडाची लागवड :**

फळझाडे व वनौषधी व इमारतीचे लाकुड पुरविणारे झाडे लावावी. फळझाडामध्ये जांभुळ, आंबा, फणस व काजुची लागवड करावी. शेतकऱ्यांना दारिद्रयातुन बाहेर यायचे असेल तर तांनी टॅपिआका या वनस्पतीची लागवड करून जरवी जरत या वनस्पतुपासुन शाबुदाना तयार करता येतो. या झालाची लागवड करून महाराजांनी लोकांना रोजगार पुरविला.

**सावकारांच्या कर्जातुन मुक्तता :**

भारतीय शेतकरी हा कर्जात जन्मतो, वाढतो व मरतो देखील ही भयानक हकिकत नाकारता येत नाही. सावकार शेतकऱ्यांना कर्ज देताना त्याची जमीन गहाण ठेवुन घेतात. शेतकऱ्याने कर्जाचे हप्ते फेडले तरी त्यांची नोंद ठेवीत नाहीत व थोडया वर्षानंतर शेतकऱ्यांची जमीन ताब्यात घेण्याचे काम सावकार करत होते. यासाठी महाराजांनी शेतकऱ्यांना दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्याचा धाडसी निर्णय १८९५ साली घेतला. १४ जुन १९१९ साली वटहुकुम काढुन कर्ज वसुली शेतकऱ्यांचे उभे पीक जप्त करण्याची पध्दती बंद केली. तसेच शेतकऱ्यांना कर्ज देताना दरबाराचे नियम पाळले पाहिजेत व हप्ताच्या पावती दिली पाहिजेत असा हुकुम ८ मार्च १९२२ ला काढला.

**उक्ती आणि कृती याची सांगड :**

महाराजांनी जेव्हा राज्यकारभार हाती घेतला तेव्हा त्यांनी शाळा, चावडी व दवाखाने याबरोबरच प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भेटी दिल्या. त्यांच्या बरोबर जेवण केले त्यांनी शेतऱ्यांबरोबर नांगर हाकलण्याबरोबर मोटही ओढली व शेतकऱ्यांबरोबर जीवाभवाच्या गप्पाही मारल्या हे सर्व करताना शेतकऱ्यांचे दारिद्रय त्यांच्या नजरेत भरत होते. त्यामुळे महाराजांनी शेतकरी सुखी होण्यासाठी उपाययोजना आखल्या म्हणजेच महाराजांनी उक्ती व कृती याची सांगड घातलेली होती. शाहु महाराजांनी संस्थानातील शेतकऱ्यांचे दारिद्रय स्वत: पाहिले होते व दारिद्रय दुर केल्याशिवाय शेतकरी सुखी होणार नाही यासाठी महाराजांनी शेतीत कायम सुधारणा होणे यात, जलसिंचन, पिकरचनेत बदल, संशोधन, जोडधंद्याचा विकास, झाडाची लागवड, जंगल संरक्षण व सावकाराच्या कर्जातुन शेतकऱ्यांनी मुक्ती हे उपाय सांगितले व त्यासाठी त्यांनी ते उपाय कृतीत उतरून दाखविले.

**संदर्भ :**

1. Late Shri P.B. Salunkhe, Principal Dr. M.G.Mali, Chhatrapti Shahu : The Pillar of Social Democracy.
2. प्रा.मीना कुलकणी, प्रा.व.शि. कुलकणी, श्रीशाहु छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन पब्लिकेशन, कोल्हापुर, १९७५
3. संपादक डॉ. विलास संगवे, शाहु संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर, राजर्षी शाहु छत्रपती पेपर्स खंड –१,४,५
4. धनंजय कीर, राजर्षी शाहु छत्रपती
5. डॉ. रमेश जाधव, लोकराजा शाहु छत्रपती
6. कृ.गो. सुर्यवंशी, राजर्षी शाहु – राजा आणि माणुस
7. शाम येडेकर, राजर्षी एक व्यक्तिदर्शन
8. प्रा.डॉ.कदम वि.र.आर्थिक विचारांचा इतिहास

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले यांचे प्रेरणादायी विचार

**प्रा. विजयकुमार सुरेश राठोड**
इतिहास विभाग महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय मुखेड तालुका मुखेड जिल्हा नांदेड

**प्रस्तावना :-**

शेतकरी आणि कामगार यांच्या कामगार यांच्या दुःखाचे दारिद्र्याचे निवारण करण्यासाठी चळवळ उभारणारे, चातुर्वर्ण व जातिभेदांवर कडाडून हल्ला चढविणारे व समानतेची मागणी करणारे, 'सत्यमेव जयते' या दिव्यमंत्राची घोषणा करणारे, पुरातन काळापासून चालत आलेल्या वहिवाटीची वाट बदलणारे, समग्र भारतात समाज क्रांतीची ज्योत पेटवणारे, जुने आचार - विचार जुन्या रूढी- परंपरा, जप-जाप्य, जादू-टोणा इ. खुळचट व भ्रामक समजुतीवर प्रथम हल्ला चढविणारे, व समाजाची पुनर्रचना करण्याकरिता कटीबद्ध झालेले पाहिले युगपुरुष क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले होत.

आधुनिक महाराष्ट्राचा कायापालट घडवून आणण्यासाठी ज्या अनेक महापुरुषांनी आपले जीवन खर्च केले त्यामध्ये ज्योतिराव फुले हे पहिले क्रांतिकारक महापुरुष होत १९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात इंग्रजी सत्ता प्रस्थापित झाली या परकीय सत्तेच्या आगमनामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय आर्थिक वाड्मयीन जीवनात हळूहळू परिवर्तन घडवून येण्यास सुरुवात झाली होती. महाराष्ट्रात एका नव्या युगाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. परंतु हा सामाजिक बदल उच्चभ्रू लोकांमध्येच होऊ लागला होता. बहुजन समाजाला या बदलापासून अलिप्त ठेवल्या गेले. ग्रामीण महाराष्ट्राचा गावगाडा पूर्वीच्याच सामाजिक चौकटीत जखडला गेला होता. हा समाज अंधारातच चाचपडत होत. गुलामगिरीचे जाळे शूद्र व अतिशूद्र समाजाच्या गळयाभोवती जखडले होते. तेव्हा त्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याकरिता त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यावर घाव घालने आवश्यक होते. त्यामुळे या वर्गाच्या उद्धाराच्या तळमळीतून प्रस्थापित व्यवस्थेशी झुंज देणाऱ्या क्रांतिकारक विचारांची गरज होती. ती महात्मा ज्योतिराव फुल्यांनी पुर्ण केली .

जोतीरावांचा किंवा जोतिबांचा जन्म पुणे येथे माळी कुटुंबामध्ये गोविंदराव चिमणाबाई यांच्या पोटी इ. स. ११ एप्रिल १८२७ मध्ये झाला. त्यांना राजाराम नावाचा एक भाऊ होता जोतिराव एक वर्षाचे असतानाच चिमणाबाई वारली. तेव्हा गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता मुलांच्या संगोपना करिता दाईची व्यवस्था केली. गोविंदरावांनी आपल्या मुलाला चांगले शिक्षण द्यायचे ठरविले. पण ही गोष्ट तेवढी सोपी नव्हती. कारण शिक्षण ही समाजातील मूठभर सवर्णांची मक्तेदारी होती. सरकारी शाळा नव्हत्या ज्या काही खाजगी शाळा होत्या त्यात सवर्णांच्या मुलांशिवाय इतरांना प्रवेश नव्हता. तरीसुद्धा गोविंदरावांनी जोतिरावांस मोठ्या कष्टाने प्रवेश मिळवून दिला. जोतिरावांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कटगुण होते. त्यांचे आजोबा शेरीबा होते ते स्वभावाने साधे व सरळ होते, परंतु कर्जबाजारीपणामुळे त्यांना मूळ गाव सोडून पुण्याला उपजिविकेसाठी जावे लागले. शेरीबाला राणोजी, कृष्णा व गोविंदा अशी तीन मुले होती. घरची गरिबी असल्याने या मुलांना काबाडकष्ट करावे लागले पुढेही तिन्ही मुले एका माळ्याकडे फुलांचा धंदा करू लागली. त्यामुळे पेशव्यांच्या दरबारात या मुलांना सजावटीचे काम मिळाले. त्यांच्या कामगिरीवर खुश होऊन माधवराव पेशवे यांनी या मुलांना ३५ एकर जमीन फुलांच्या उत्पादनाकरिता दिली., ते फुलांचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांना फुले हे नाव पडले. त्यांचे मूळ आडनाव हे गोऱ्हे होते.

**शिक्षण**

महात्मा फुले यांच्या काळात ब्राह्मणेतर समाजाला शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. त्या काळात आजच्यासारखे शिक्षण सार्वजनिक नव्हते. त्या काळात शिक्षणावर सवर्णांची मक्तेदारी होती. त्या काळात मराठी गावठी शाळा, पंतोजीच्या शाळा व ख्रिश्चन मिशन-यांनी सुरु केलेल्या शाळा प्रचलित होत्या. गोविंदरावांनी इ.स. १८३८ मध्ये जोतिबांना मराठी शाळेत घातले होते. ते अतिशय हुशार, बुद्धिमान व ऊत्साही असल्याने लवकरच शिक्षणात त्यांनी चांगली प्रगती केली. इ.स. १८३४ ते इ.स. १८३८ पर्यंत जोतिरावांनी मराठी शिक्षण पूर्ण केले. इ.स. १८४१ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी जोतिरावांना स्कॉटिस मिशन-यांच्या इंग्रजी शाळेत प्रवेश मिळाला. पुढे शस्त्रविद्या पारंगत लहुजी मांग यांच्याकडून जोतिरावांनी नेमबाजी दांडपट्टा चालविणे इत्यादी शिक्षण घेतले. परंतु मुठभर तरुणांच्या संघटनेने ब्रिटिश सत्तेला विरोध करणे सोपे नव्हते, हे जोतिरावांनी ओळखले व शस्त्रक्रांती करून ब्रिटिश सत्तेला नमविन्याचा मार्ग सोडून दिला. आणि सामाजिक क्रांतीद्वारे समाजाचे स्वरूप बदलण्याचे ठरविले.

लोकसेवेचे खडतर व्रत त्यांनी स्वीकारले, ते अखेरपर्यंत आपल्या हाती घेतलेल्या कार्याशी एकनिष्ठ राहिले. सामाजिक कार्य करीत असताना अनेक धर्ममार्तंड सनातनी मंडळींनी जोतीरावांची निंदानालस्ती मानहानी टिंगल-टवाळी केली परंतु फुल्यांनी हाती घेतलेल्या कार्यापासून क्षणभर देखील ढळले नाहीत. सामाजिक उद्धाराच्या कार्यामुळेच लोकांनी त्यांना इ.स.१८८८ मध्ये 'महात्मा' ही पदवी देऊन गौरव केला.

**ख्रिश्चन व इस्लाम धर्माचा अभ्यास** :-

ख्रिश्चन व इस्लाम धर्माचा वैज्ञानिक अभ्यासाचाही जोतिरावांवर प्रभाव पडला. त्यामुळे ईश्वरा चे खरे स्वरूप, धर्म, धर्मसहिष्णू वृत्ती इत्यादी कल्पना वाढीस लागल्या. पुढे सत्यशोधक समाजाच्या स्थापनेस त्याचा उपयोग झाला. मिशनरी शाळेत असताना मोरो विठ्ठल वाळवेकर आणि सखाराम परांजपे या दोन ब्राह्मण मित्रांशी जोतीरावांची मैत्री जमली. यावेळी इंग्रजी ग्रंथ समजण्या येवढ्या प्रगल्भ बुद्धीचे जोतिराव व त्यांचे मित्र झाले. या तरुणावर आधुनिक शिक्षणाचा आणि धर्मोपदेशकांचा परोपकार समाजकार्य आणि समूपदेशाचा खोलवर परिणाम झाला होता. या तरुणांची श्रद्धा हिंदू धर्मावरून उडाली आणि त्यांना ख्रिश्चन धर्माचे आकर्षण वाटू लागले. महात्मा फुलेंनी ख्रिश्चन व इस्लाम धर्माचा पौराणिक अभ्यास केला. त्यामुळे त्यांना या धर्मातील तत्त्वज्ञानाचे सार समजले. कोणताही धर्म परस्परांशी प्रेमाने वागावे आणि जगातील प्रत्येक मानव समान आहे. हेच सांगतो. या सारखे विचार महात्मा फुले यांना ख्रिश्चन व इस्लाम धर्माच्या धर्मग्रंथाच्या अभ्यासातून जाणवले होते.

**विचारवंतांचा प्रभाव :-**

शाळेत असताना ज्योतिरावांची मैत्री सदाशिव गोवंडे या हुशार व महत्त्वकांक्षी तरुणाशी झाली. या दोघांनाही छत्रपती शिवाजी महाराज व जॉर्ज वॉशिंग्टनच्या आत्मचरित्राचा चांगला अभ्यास केला. त्यांच्या विचारांनी ते प्रभावित झाले. या थोर पुरुषांच्या स्वदेश प्रेम वीरवृत्ती उदार दृष्टिकोनाने ज्योतिराव प्रेरित झाले. आणि मायभूमीच्या व देश बांधवांच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित करण्याचे त्यांनी ठरविले. त्याकरिता समाजाच्या सर्वच स्तरात वैचारिक क्रांती घडवून आणण्यासाठी ते तत्पर झाले. याशिवाय थॉमस पेन या नावाच्या विचारवंताच्या 'राइट्स ऑफ मेन' या ग्रंथातील उदात्त विचारांचा मोठा प्रभाव पडला. देशबांधवांच्या उद्धारासाठी संपूर्ण आयुष्य वेचण्याचे त्यांनी ठरवले. त्यांनी केलेल्या विविध सुधारणा पुढील प्रमाणे.

**स्त्रियांच्या उद्धाराचे कार्य** :-

महाराष्ट्रात या काळात स्त्रियांची स्थिती अतिशय हलाखीची होती. स्त्रियांना समाजात हिन दर्जा होता. स्त्री ही केवळ सुखाची व उपभोगाची वस्तू अशी कल्पना समाजात रूढ होती. स्त्री ही पुरुषापेक्षा कनिष्ठ मांडली जायची. चूल व मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. अतिशय दयनीय अवस्था स्त्रीची होती. स्त्री ही शिक्षणापासून पूर्ण वंचित होती. स्त्रीने शिकूनये ती शिकल्यास भ्रष्ट होते, शिक्षणही भ्रष्ट होते अशी भ्रामक समजूत समाजात रूढ होती. बाल विधवांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. पतीच्या मृत्यूनंतर स्त्रीने सती गेले पाहिजे असे बंधन होते. समाजात ज्येष्ठ विवाह ( १० वर्षाची मुलगी व ऐंशी वर्षाचा पुरुष ) असे अनिष्ट विवाह पद्धत रूढ होती. विधवा स्त्रियांची संख्या समाजात मोठी होती. अशा स्त्रियांना केशवपण करण्याची सक्ती केली जात असे. त्यांनी चांगले कपडे घालू नयेत. समारंभात फिरू नये असे निर्बंध होते. तेव्हा अशा स्त्रियांना परमार्थ साधनेत आयुष्य घालण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. अशा अवस्थेत महात्मा फुल्याना स्त्री जाती बद्दल कळवळा आला. स्त्री ही समाजाचे मूळ आहे. त्यामुळे तिच्या उद्धारासाठी व तिचे दुःख निवारण्यासाठी जोतिरावांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले. तसेच उच्च वर्णातील(सवर्ण समाजातील) स्त्रियांचीही स्थिती फार चांगली नव्हती. तेव्हा स्त्रियांचा कैवार घेताना जोतिबांनी जातीपातीचा विचार केला नाही. त्यामुळे सर्व जातीतील स्त्रियांचा उद्धार झाला.

**मुलींसाठी पहिली शाळा :-**

जोतिबांनी समाजक्रांतीचे पहिले शस्त्र म्हणून स्त्री- शिक्षण हाती घेतले. त्या काळात स्त्री शिक्षणा विषयी समाजात अनेक गैरसमजुती रूढ होत्या. स्त्रियांना शिक्षण देणे धर्माच्या विरुद्ध आहे. स्त्रियांना शिक्षण देणे हा त्या काळाच्या सनातनी लोकांना मोठा भ्रष्टाचार व महा घातक वाटे. त्यामुळे सनातनी मंडळींनी आरडा ओरड करण्यास सुरुवात केली स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म, समाज यांच्या विरुद्ध वर्तन करणे होय असे समजले जात. तेव्हा जोतिरावांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व ओळखले. याबाबतीत ते म्हणत, जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी तेव्हा एक माता हजारो शिक्षकांपेक्षा मोठे कार्य करू शकते. म्हणून प्रथम शिकली पाहिजे. स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण होय. पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीस दिल्यासारखे आहे परंतु एका स्त्रीला शिक्षण दिले तर एका कुटुंबाला शिक्षण दिल्यासारखे आहे. हे फुल्यांनी ओळखून प्रथम स्त्री शिक्षणाचे कार्य हाती घेतले. हा विचार प्रमुख माणूस स्त्री शिक्षणाला पुण्यात प्रारंभ केला.

महात्मा फुल्यांनी इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्यामध्ये महार, मांग, चांभार इत्यादी शूद्र व अतिशूद्र समाजातील स्त्रिया शिक्षण घेऊ लागल्या. मुलींना

शिकविण्याकरिता ज्योतीबांनी आपली धर्मपत्नी सावित्रीबाई हिला शिकवून तयार केले. तिने आपल्या पतीच्या कार्याला वाहून घेतले. सावित्रीबाई ही भारतातील पहिली स्त्री शिक्षिका होय. हे कार्य करताना सावित्रीबाईंना काही सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी त्रास दिला परंतु आपल्या कार्यापासून परावृत न होता. कार्य नेटाने सुरू ठेवले.

**विधवा पुनर्विवाह :-**

विधवा स्त्रियांवर चाललेले पशुतुल्य आत्याचार थांबावे म्हणून फुल्यांनी विधवा पुनर्विवाहाचा जोरदार प्रचार व प्रसार केला. या कार्याला देखील सनातन्यांनी विरोध केला परंतु पुढे हे फुले हे क्रांतिकारक असल्याने त्यांनी हे कार्य पुढे चालू ठेवले.

**बालहत्या प्रतिबंधक गृह :-**

त्याकाळी लहानपणीच स्त्रियांचे विवाह होत असत. त्यामुळे समाजात विधवांची संख्या प्रचंड होती. त्यामुळे अशा विधवांचे अनैतिक संबंध निर्माण होऊन समाजात नवअभ्रकांची बालहत्या होत असे. अशा स्त्रियांची विटंबना व समाजाकडून होत असे. तेव्हा अशा दुर्दैवी स्त्रियांची या जाचातून सुटका होण्याकरीता जोतीबांनी 'बाल हत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना इ.स. १८६३ मध्ये केली. त्यामुळे अनेक मार्गाकडे पाहून पडलेल्या अनेक स्त्रिया गुप्तपणे व सुरक्षितपणे बाल हत्या प्रतिबंधक गृहात येऊन प्रसिद्ध होऊ लागल्या. या नव अभ्रकांच्या पालनपोषणाची जबाबदारी बाल हत्या प्रतिबंधक गृह हे घेऊ लागले. अशा मुलांच्या संगोपनाची काळजी व सेवा, सुश्रुषा सावित्रीबाई करू लागल्या.

**अस्पृश्यांचा उद्धार :-**

१९ व्या शतकात अस्पृश्यांची स्थिती ही अतिशय हलाखीची होती. अस्पृश्यांना पशुतुल्य वागणूक दिली जात. शूद्र म्हणून पाणवठ्यावर पाणी भरता येत नव्हते, अस्पृश्यांना गावाबाहेर वस्ती करून राहावे लागे. गावातील उच्चवर्णीयांची आजन्म सेवाचाकरी करून पोटाची खळगी भरावी लागे. सवर्ण लोक अस्पृश्यांना शिवू देत नसत. अंगावर सावली पडून विटाळ होईल म्हणून त्यांना रस्त्यातून फिरता येत नव्हते. सार्वजनिक ठिकाणी त्यांना प्रवेश नव्हता. घाणेरडी व हलक्या स्वरूपाची कामे त्यांच्या वाट्याला आली होती. त्यामुळे अस्पृश्याच्या जीवनाला कसलाही अर्थ उरला नव्हता.

शिक्षणाचा प्रसार खालच्या वर्गात केला तरच सार्वत्रिक क्रांती होईल, या उद्देशाने जोतिरावांनी इ.स. १८५१ मध्ये अस्पृश्य मुलांकरिता पहिली शाळा काढली. शेकडो वर्षे अज्ञान, अंधकारात खीतपत पडलेल्यांना अस्पृश्यांना ज्ञानाचे दरवाजे उघडून देणारे म. फुले हे पहिले महाराष्ट्रीयन समाजसुधारक होते.

**सत्यशोधक समाजाची स्थापना** :-

उच्चभ्रू लोकांच्या जाचातून शूद्रांना मुक्त करण्यासाठी व स्वतःच्या मतलबासाठी तयार केलेल्या ग्रंथांच्या ज्ञानाद्वारे शूद्रांना लुबाडणाऱ्या मतलबी मंडळीचे चुकीचे अधिकार दाखवून देण्यासाठी व धर्माचे खरे स्वरूप पटवून देण्याकरिता म. फुल्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सामाजिक विषमता नष्ट करावयाची असेल तर कनिष्ठ वर्गाला हक्क मिळाले पाहिजे. परंतु हे हक्क संघर्ष केल्याशिवाय मिळणार नाही हे फुल्यांनी ओळखले. त्यासाठी बहुजन समाजाचे संघटन होणे गरजेचे आहे. म्हणून जोतीबांनी सत्यशोधक समाज स्थापन केला.

**शेतकऱ्यांची चळवळ :-**

हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे तेव्हा शेतकरी व कामगार यांच्या जीवनात आमूलाग्र बदल करण्याचे प्रमुख साधन शिक्षण होय. देशाची समृद्धी व भरभराट शेतकऱ्यावर अवलंबून आहे परंतु देशाचा कणा असलेला शेतकरी अज्ञान व कर्जबाजारीपणामुळे पळून गेला आहे. तेव्हा शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे वर्णन फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात केला आहे.

**निष्कर्ष :-**

जोतिराव फुले आयुष्यभर बहुजन समाजाच्या उद्धारासाठी चंदनासारखे झिजले. ते मानवतेचे महान पुजारी होऊन गेले. १९ व्या शतकात महाराष्ट्रात होऊन गेलेल्या समाजसुधारकांमध्ये ते पहिले समाजसुधारक होत. जोतिबांनी अनेक सुधारणांना जन्म दिला. शूद्रातिशूद्रांचे शिक्षण, स्त्रीयांचे शिक्षण, अस्पृश्यतेचे निवारण, शेतकरी, कामगार समाजाचे परिवर्तन, सावकारशाहीचे निर्मूलन अधर्म असत्य अत्याचार यांचे दुरीकरण दुरीकरण करण्यासाठी त्यांनी उभीह्यात खर्ची घातली. जोतीरावांच्या कार्याबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात. "हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकंन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे जोतिबा फुले होय. पंडित नेहरूंच्या मते "ज्या काळात महात्मा फुले स्त्री शिक्षणासाठी आणि अस्पृश्यता निवारण्यासाठी लढले ते दिवस असे होते की त्यांना कोणत्याही स्वरूपाची कोठूनही मदत मिळणे अशक्य होते". महात्मा गांधी म्हणतात की, "जोतिबा हे खरे महात्मा होते".

वरील विचारवंतांनी फुल्यांच्या कार्याविषयी केलेला गौरव पाहून पाहून आपणाला जोतीरावांच्या कार्याची कल्पना व महत्त्व लक्षात येते. जोतिबा एक खरेखुरे सुधारक होते. त्यांची कार्यावर निष्ठा होती. त्यांच्या ठिकाणी निर्भयता, धाडस, मानवता, बंधुभाव व समाजाच्या उद्धाराची तळमळ होती. जोतीबांनी आपली उभीह्यात बहुजन समाजाच्या उद्धाराकरिता घालविली. शिक्षणाने समाज बदलांची क्रांती करून दाखविली. म्हणूनच त्यांना आद्य समाजसुधारक असे म्हटले जाते.

**संदर्भ ग्रंथ** :-

1. डॉ. पाटील लीला :- भारतीय स्त्री जीवन, मेहता पब्लिशिंग हा पुणे १९९०
2. डॉ. बाबा सरोजिनी :- स्त्री शिक्षणाची वाटचाल, महाराष्ट्र राज्य शिक्षण १९६८
3. भागवत कमल :- स्त्रीवादी चळवळीची वाटचाल प्रागतिक पुस्तक प्रकाशन, पुणे १९८५
4. साखरे सीमा :- स्त्रीवादी चळवळीच्या प्रणेत्या ताराबाई शिंदे, सीमा प्रकाशन नागपुर
5. डॉ. अनिल कठारे :- महाराष्ट्रातील समाजसुधारक, विद्या बुक्स पब्लिकेशर्स औरंगाबाद २०१४
6. पू.ग. सहस्त्रबुद्धे :- महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २०११
7. धनंजय कीर :- महात्मा ज्योतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई.
8. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, प्राचार्य अण्णासाहेब गरुड /
9. प्राचार्य बी.बी. सावंत
10. डॉ. अनिल कठारे :- भारतातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा इतिहास प्रशांत पब्लिकेशन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक धोरण

**एन. एस. पाटील**
अर्थशास्त्र विभाग कला] वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस]जि सांगली

**प्रास्ताविक**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हंणजे निष्णात कायदेपंडित] धर्मकारण] राजकारण समाजकारण पत्रकारिता अश्या विविध क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाने ठसा उमठवणारे प्रतिभावंत व प्रख्यात अर्थतज्ञ असे अष्टपैलू म्हणून त्यांची ओळख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते. सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टिकोनातून त्यांनी अत्यंत दर्जेदार स्वरूपाचे अर्थशास्त्रीय लिखाण केलेले आहे. १९१५ साली त्यांनी कोलंबिया विद्यापीठातून एम. ए. अर्थशास्त्र ही पदवी संपादन करण्यासाठी ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी हा प्रबंध सादर केला तसेच डी. एस्सी. पदवीसाठी द प्रॉब्लेम ऑफ  रुपी : इट्स ओरिजीन अँड सोलुशन] पीएच.डी . साठी द इवोल्युशन ऑफ प्रोव्हिन्शिअल फायनान्स इन  ब्रिटिश इंडिया व एम.एस्सी. साठी अ स्टडी इन द प्रोव्हिन्शिअल डिसेंट्रलायझेशन ऑफ इंपिरियल फायनान्स असे महत्वपूर्ण ग्रंथ लिहून अर्थशास्त्रात मौलिक योगदान दिलेले आहे. भारत हा एक शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजहि अनेक लोकांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन शेती आहे. त्यामूळेच भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिकेंद्रितच राहिलेली आहे. शेतीमुळे आपल्या अन्न] वस्त्र] निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होतात. मात्र जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकरी आज गरीब व कर्जबाजारी बनलेला आहे. जागतिकीकरणांनंतर भारतात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्येचे हे सत्र अजूनही थांबलेले नाही. या पार्श्वभूमीवर शेतीची उत्पादकता व शेतकऱ्यांचे उत्पन्न कश्याप्रकारे वाढेल] शेतीपुढे निर्माण झालेल्या समस्या कमी करण्यासाठी कोणते उपाय आखले पाहिजेत यादृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे शेतीविषयक विचार मांडलेले आहेत. त्याची चर्चा करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय निवडलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दीष्टे –**

१) शेतीच्या समस्येबाबत डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांचा आढावा घेणे.

२) शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी सुचवलेले उपाय जाणून घेणे.

**अभ्यास पद्धती -** प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामुग्रीवर आधारलेला असून माहिती व आकडेवारी गोळा करण्यासाठी] संदर्भ पुस्तके] मासिके] वर्तमानपत्रे] इंटरनेट या साधनांचा वापर केलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार**

डॉ. बाबासाहेबांचे शेती क्षेत्राविषयीचे विचार अतंत्य मौलिक असे ते देशाला व शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे आहेत. त्यांच्या मते] शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र शेतीच्या विकासाकडे म्हणावे तेवढे लक्ष दिले जात नाही. शेती] शेतकरी आणि शेतीशी संबंधित अनेक घटकांचा विचार यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज] महात्मा फुले व शाहू महाराज यांनी सखोलपणे केलेला आहे. महात्मा फुलेंच्या विचारांना आणि शाहू महाराजांच्या कृतीला अर्थशास्त्रीय परिभाषेत बसवताना बाबासाहेबांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील  शेतीचे महत्व स्पष्ट केलेले आहेत. शेतीचा विकास झाल्याशिवाय खऱ्याअर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होऊ शकणार नाही याची जाणीव बाबासाहेबांना होती. भारतातील शेती व्यवस्था] तिचे आकारमान] शेतीपुढे निर्माण झालेल्या समस्या व त्यावरील उपाय या सर्वांवर प्रकाश टाकण्यासाठी सन १९१८ मध्ये ^द जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी* च्या अंकात "स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया अँड देअर रेमिडिएस" या नावाचा शोधनिबंध प्रसिद्ध केला. एवढेच न्हवे तर त्यांची मुंबई कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्यांनतर २४ फेब्रुवारी १९२७ रोजी विधिमंडळात अर्थसंकल्पावरील आपले पहिले भाषण हे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केले होते. या भाषणामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाणीव सरकारला करून दिली. शेतकऱ्यांवर भरमसाठआकारला जाणारा शेतसारा व तो वसूल करणारी अन्यायकारक यंत्रणा यावर कडाडून टीका केली. शेतकऱ्यांनी जागरूकपणे व एकजुटीने या समस्येला तोंड दिले पाहिजे म्हणून त्यांनी शेतकरी संघ स्थापन केला. तसेच सभा व परिषदांचे आयोजन केले. डॉ. बाबासाहेबांनी शेतीविषयक आपले विचार मांडताना शेतीच्या कमी उत्पादकतेच्या कारणे कोणती आहेत व उत्पादकता वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना अमलात आणल्या पाहिजेत या दोन्ही बाजूने आपली मते मांडलेली आहेत.

**धारणक्षेत्राचे लहान आकारमान**

लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसावणारी एक गंभीर समस्या आहे. शिवाय ही लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्यामुळे समस्या अधिकच बिकट होते. उदा. मुंबई इलाख्यात सरासरी धारणक्षेत्र ९ एकर तर पुण्याशेजारच्या पिंपाला सौदागर येथे १-२ एकर एवढे धारणक्षेत्र होते. ही धारणक्षेत्रे लहान तुकड्यात विभागलेली होती. म्हणजेच रत्नागिरी जिल्ह्यात २० गुंठ्याचे धारणक्षेत्र ३ तुकड्यात विभागलेले होते. ठाणे जिल्ह्यात १ एकर ९ गुंठ्याचे धारणक्षेत्र ६ तुकड्यात विभागलेले होते. तर सुरत मध्ये १ एकराचे धारणक्षेत्र १४ तुकड्यात विभागलेले होते. लहान धारणक्षेत्रे आणि विभाजन व तुकडीकरणामुळे शेतीचा उत्पादन खर्च वाढतो. तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी होते. डॉ. बाबासाहेबांनी या गोष्टीचा अतिशय सखोलपणे विचार केलेला आहे. त्यांच्या मते] लहान आकारमानाच्या व विखुरलेल्या जमिनी ही भारतीय शेतीची मुख्य समस्या आहे त्यामुळे जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी केवळ जमिनीचे एकत्रीकरण करून चालणार नाही. तर त्यांचे आकारमान वाढवून त्यांना किफायतशीर बनविणे महत्वाचे आहे. जमिनीच्या एकत्रीकरणामुळे धारणक्षेत्राचे आकारमान वाढेल परंतु लहान धारणक्षेत्राच्या समस्या सुटणार नाहीत. त्यासाठी आर्थिकदृष्ट्या किफायतशीर धारणक्षेत्र हा उपाय सांगितलेला आहे. किफायतशीर धारणक्षेत्र याचा अर्थ भूमी] श्रम व भांडवल हे सर्व उत्पादनाचे घटक योग्य प्रमाणात वापरून जमिनीची उत्पादकता वाढविणे] कार्यक्षम मशागतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व साधनसामुग्रीचा समन्वय साधून शेतीत अतिरिक्त उत्पादन निर्माण करणे होय. थोडक्यात] शेतकऱ्यांची दयनीय अवस्था दूर करण्यासाठी किफायतशीर धारणक्षेत्र ही संकल्पना बाबासाहेबांनी मांडलेली आहे.

**सहकारी शेती**

भारतीय शेतीची समस्या सोडविण्यासाठी डॉ आंबेडकरांनी सहकारी शेती हा एक उपाय सांगितलेला आहे ऑक्टोम्बर १९२७ मध्ये श्री एफ जी एच अँडरसन यांनी मुंबई प्रांतातील धारणक्षेत्राचे लहान आकारमान व विखुरलेली धारणक्षेत्र या शेती व्यवसायाला भेडसावणाऱ्या दोन समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी मुंबई कायदेमंडळात अल्पभूधारक मदत विधेयक मांडले- या विधेयकात दोन तरतुदी सुचविण्यात आलेल्या होत्या एक म्हणजे वारसाहक्काने होणाऱ्या मालमत्तेच्या विभाजनावर नियंत्रण व दुसरी एकसंघ धारणक्षेत्राची विक्री*-

डॉ बाबासाहेबांना हे विधेयक मान्य नव्हते कारण अँडरसनी सुचविलेल्या उपायांमुळे शेतीवर अवलंबून असणारे बहुसंख्य लोक भूमिहीन होऊन त्यांचे दारिद्रय वाढले असते तसेच वारसाहक्काने वडिलोपार्जित जमिनीचा मिळालेला लहानसा तुकडा देखील उपजिविकेसाठी महत्वाचा ठरतो थोडक्यात या विधेयकामुळे जमीनदारांचा फायदा तर लहान शेतकऱ्यांचा तोटा होणार होता यावर उपाय म्हणून डॉ आंबेडकरांनी सहकारी शेतीचा पर्याय सुचविला त्यांच्या मते] जमिनीचा मालकी हक्क अबाधित ठेवून लहान लहान जमिनीचे एकत्रीकरण करून सहकारी शेती अस्तित्वात आणली तर शेतीची उत्पादकता वाढेल] उत्पादन खर्च कमी होईल शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल व लहान शेतकरी भूमिहीन बनणार नाही.

**खोती पद्धतीचा अंत**

१७ सप्टेंबर १९३७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई कायदेमंडळात खोती पद्धत रद्द करण्याबाबतचे विधेयक मांडले- ही पद्धत मुंबई प्रांतातील ठाणे] कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांच्या काही भागात प्रचलित होती. उत्तर भारतातील जमिनदारी पद्धतीशी मिळतीजुळती अशी ही पद्धत असून शेतसारा गोळा करण्यासाठी या पद्धतीत शासनाने खोतांची नियुक्ती केलेली होती. यामध्ये प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या कूळांना कनिष्ठ भूधारक तर खोताला वरिष्ठ भूधारक समजले जाई. शेतसारा गोळा करून त्यातील ठराविक हिस्सा शासनाला देऊन उर्वरित हिस्सा स्वतःकडे ठेवून घेण्याचे स्वातंत्र्य खोतांना होते. स्वतःच्या स्वार्थासाठी खोतांकडून कूळांचेमोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असे. कूळांवरील अन्याय व अत्याचार वाढत जाऊन खोत व भूधारक यांच्यातील संबंध बिघडले. या पार्श्वभूमीवर लवकरात लवकर खोती पध्दती बंद व्हावी म्हणून बाबासाहेबांनी खोती अंताचे विधेयक कायदेमंडळात सादर करून एका अर्थाने भूधारकांच्या शोषणाला मूठमाती देण्याचा प्रयत्न केला. खोती अंतामुळे शासन व भूधारक यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होणार होते. शिवाय खोतांना वाजवी स्वरूपाची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी तरतूद आंबेडकरांनी आपल्या विधेयकात केलेली होती. डॉ. आंबेडकरांचे खोती अंताचे विधेयक म्हणजे स्वातोंत्रोत्तर काळातील जमीन सुधारणा कायद्याच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल आहे.

**सामुदायिक शेती**

भारतीय शेतीच्या तत्कालीन दुरावस्थेची जाण असलेलया डॉ. आंबेडकरांनी राज्य समाजवादामध्ये शेतीला सर्वाधिक महत्वाचे स्थान दिले आहे. डॉ. आंबेडकरांचे शेतीबाबतचे विचार व त्यांचा दृष्टिकोन आर्थिक समाजवादाच्या संदर्भात खूपच महत्वाचा आहे. शेतजमिनीची खाजगी मालकी रद्द करून त्याऐवजी सामुदायिक मालकी असावी असे त्यांचे मत होते. त्यासाठी बाबासाहेबांनी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली. त्यांच्या मते]

सामुदायिक शेती म्हणजे राज्यात उपलब्ध असलेल्या शेतीचे समान प्रमाणात वाटप करावे. शेतीसाठी लागणारे भांडवल] खते] बी-बियाणे हे राज्य शासनाने पुरवावे. आणि शेतीतून मिळणारे उत्पादन सरकारने सर्वांमध्ये समप्रमाणात वाटावे. त्यामुळे देशातील आर्थिक विषमता व दारिद्रय कमी होण्यास मदत होईल. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या स्टेट अँड मायनॉरिटीज या ग्रंथात शेती हा शासकिय उद्योग असावा असे स्पष्ट केले आहे. मूलभूत उद्योग आणि विमा व्यवसायाप्रमाणे सर्व जमिनी शासनाने स्वतःच्या ताब्यात घ्याव्यात व धर्म] जात असा भेद न करता भूमीहीन लोकांना कसण्यासाठी दयाव्यात. सामुदायिक शेतीचे व्यवस्थापन व अंमलबजावणी करण्यासाठी पुढील मुद्दे मांडले.

१) सामुदायिक शेतीबाबत शासनाने तयार केलेले नियम व मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे-

२) गावकऱ्यांना जमिनी कसण्यासाठी देताना धर्म] जात व इतर कोणताही भेद करू नये-

३) सामुदायिक शेतीसाठी लागणारे भांडवल] खते] बियाणे व अवजारे शासनाकडून पुरविली जावीत-

४) शेती उत्पादनातून शासनाचा हिस्सा दिल्यानंतर राहिलेले उत्पादन जमीन कसणाऱ्यांनी वाटून घ्यावे.

५) सरकारी नियमांचे उल्लंघन झाल्यास सभासदांना दंड व शिक्षा करावी-

थोडक्यात सामुदायिक शेतीच्या माध्यमातून आर्थिक] सामाजिक व राजकीय समता प्रस्थापित करणे हा बाबासाहेबांचा हेतू होता-

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार हे प्रामुख्याने स्वातंत्रपूर्व कालखंडातील आर्थिक समस्यांशी संबंधित आहेत. तरीदेखील त्यांच्या विचारांची सखोलता व दूरदृष्टीपणा आजच्या काळात अनुभवास येतो. शेती क्षेत्रातील मूलभूत समस्यांमुळे शेती फायदेशीर ठरत नाही. या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी बाबासाहेबांनी ज्या उपाययोजना सांगितल्या आहेत त्या आजच्या वास्तव परिस्थितीत क्रांतिकारक ठरणाऱ्या आहेत.

**संदर्भ सूची**

१) संपादक मंडळ] डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ] महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ] मुंबई - २५ डिसेंबर १९९३

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे] प्रकाशन समिती उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग] महाराष्ट्र शासन - २००५

३) डॉ. विजय कविमंडन] आर्थिक विचारांचा विकास] श्री.मंगेश प्रकाशन] नागपूर - १९९३

४) प्रा. रायखेलकर] डॉ. दामजी] आर्थिक विचारांचा इतिहास] विद्या प्रकाशन औरंगाबाद - २०११

५) डॉ. नरेंद्र जाधव] डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि तत्वज्ञान] सुगावा प्रकाशन पुणे - डिसेंबर १९९२

६) योजना] जून २००१ डिसेंबर २००२

७) लोकराज्य] ऑक्टोबर २००६

८) M. K. Dongre, Economic Thoughts of Dr. B. R. Ambedkar, 1974

९) http://www.storymirror.com

१०) www.esakal.com

# महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार

**मनिषा भिमराव शेळके[१] प्रो. डॉ. एस.एम्. भोसले[२]**
[१]संशोधक विद्यार्थीनी, अर्थशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
[२]संशोधक मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
.ईmanishashelake84@yahoo.com[१] bshivajim@gmail.com[2]

**संशोधनाचा गोषवारा :—**
महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात शेतकरी व शेतीविषयक आपले विचार मांडले आहे. सन १८५० ते १८९० या ३५ ते ४० वर्षाच्या कालखंडातील शेती व शेतकरी यांच्या प्रश्नांची दाहकता, शेती आणि शेतकऱ्यांची दयनीय अवस्था आणि त्यावर सुचविलेले उपाय यांची सविस्तर मांडणी केली आहे. ब्राम्हणवर्ग, सावकार वर्ग आणि ब्रिटिश शासनवर्ग यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक तसेच नैसर्गिक आपत्ती, जुन्या व परंपरागत शेती कसण्याच्या पध्दती यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान असे विचार मांडले. शेतकरी व शेती यांच्या सुधारणेसाठी उपाययोजना म्हणून लोकसंख्या नियंत्रण, शेतकरी व शेतकऱ्यांच्या मुलांना आधुनिक ज्ञान व कौशल्यात वाढ करणे, सुधारीत पाणीपूरवठयाच्या सुविधा, जमिनीची धूप थांबविणे, उच्च पैदास जनावरांचे संगोपण, शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर स्पर्धांचे आयोजन, शेती सुधारणे, शेती पूरक इतर व्यवसायांचा विकास असे अनेक उपाय सुचविले आहेत.

**प्रस्तावना :—**
महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म इसवी सन ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्हयातील 'कटगुण' या गावी झाला. ते थोर विचारवंत व समाजसुधारक होते. स्त्रियांच्या शिक्षणाचा व अस्पृश्य शिक्षणाचा पाया त्यांनी रोवला, रूढी—परंपरा, अंधश्रध्दा, जाती व्यवस्था, अज्ञान, यांच्या विळख्यात सापडलेल्या भारतीय समाजातील गरीब, दीन—दुबळया, शुद्र, शेतकरी यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले. सन १८८३ मध्ये शेतकऱ्यांच्या विदारक स्थितीचे चित्रण 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात अतिशय समर्पक शब्दांत मांडले. या ग्रंथातील काही पंक्ति पुढील प्रमाणे आहेत.

''विद्येविना मति गेली, मतिविना नीति गेली,
नीतिविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले''
(शेतकऱ्यांचा आसूड पृ. २६३)

शिक्षणाच्या अभावामुळे समाज्याचे किती नुकसान होते हे त्यांनी वरील पंक्तित सांगितले आहे. महात्मा फुले यांच्या मते शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. त्याला शेतकरी वर्गही अपवाद नाही. महात्मा फुले यांचे कृषी क्षेत्रातील कार्य, कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार यामध्ये महत्वाचे आहे. शेतकऱ्यांना नवी दिशा देण्यासाठी 'मांजरी' येथे नवीन तंत्रज्ञान राबवून त्यांनी कृषी विषयक प्रयोग केला ते म्हणतात ''शेती विषयक शिक्षणास अग्रक्रम दयावा, शाळेत शिक्षक नेमताना ज्या लोकांना जोडधंदे व शेतकी शिक्षण यांचे ज्ञान आहे, असे शिक्षक नेमावेत''. खरीप हंगामात शाळेला सुट्टी दयावी, शेतकऱ्यांच्या साक्षरतेसाठी रात्रशाळा उघडाव्यात, शेतकऱ्यांसाठी विविध प्रोत्साहानात्मक स्पर्धांचे आयोजन करून त्यांना बक्षिसे दयावीत असे महात्मा फुले यांना वाटत होते.

**संशोधनाची उदिष्टये :—**
१) महात्मा फुले यांनी शेतीविषयी मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे.
२) महात्मा फुले यांनी शेती समस्यांवरील सुचविलेल्या उपायांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :—**महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी जे उपाय सुचविले आहेत ते उपयुक्त आहेत.

**संशोधनाची अभ्यास पध्दती :—** सदर शोधनिबंधासाठी माहितीच्या दुय्यम स्त्रोताचा आधार घेतला आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, संशोधन लेख, इंटरनेट या साधनांचा समावेश होतो.

**महात्मा फुले यांचे शेतीविषयक व शेतकऱ्यांविषयी विचार :—**
१९ व्या शतकातील शेतकऱ्यांची त्यांचे अज्ञान आणि त्याहून होणारी त्यांची लुबाडणूक याचा सखोल अभ्यास करून महात्मा फुले यांनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' हे पुस्तक लिहिले आणि

त्यावर उपायही सुचविले. महात्मा फुले यांनी सन १८५० ते १८९० या ३५ ते ४० वर्षाच्या कालखंडातील महाराष्ट्रातील पुणे परिसरातील शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी विचार 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथात मांडले आहेत. शेतकरी आणि शेती अर्थव्यवस्था या बद्दल जवळून आलेला अनुभव, त्यातील अडचणी, पिळवणूक त्यांनी या ग्रंथात मांडली आहे. शेतकऱ्यांच्या अत्यंत हालाखीच्या परिस्थितीसाठी मुख्य तीन पिळवणुकीचा समावेश होतो असे फुलेंना वाटते ते पुढीलप्रमाणे —

१) धर्म आणि धर्माच्या ठेकेदारांकडून शेतकऱ्यांची केली जाणारी आडवणूक

२) सावकरांकडून शेतकऱ्यांची केली जाणारी पिळवणूक आणि

३) नोकरशाही कडून शेतकऱ्यांची केली जाणारी पिळवणूक यांचा समावेश होतो.

महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांनी सावकरांकडून घेतलेल्या कर्जावर वर्षानुवर्षे व्याज वसुली करून आणि शेवटी त्यांची जमीन लाटून / ताब्यात घेऊन शेतकऱ्यांची आणि त्यांच्या कुटुंबीयांची पिळवणूक केली जाते. ब्रिटिश शासन आणि कायदा याची अंमलबजावणी ब्राम्हण वर्गाच्या माध्यमातून होत होती. कुलकर्णी, महालकारी, मामलेदार, चिटणीस, दप्तरदार अशा विविध अधिकारी पदांवर ब्राम्हण वर्ग आणि त्यांना कायद्याचे ज्ञान असल्याने त्यांनी शेतकऱ्यांची गैर पध्दतीने पिळवणूक केली. १० डिसेंबर १८८२ त्यांचे मुंबई मधील 'भायखेडा' या ठिकाणी शेतकऱ्यांची स्थिती या विषयावर भाषण केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चित्तवेधक मांडणी करून त्यावर उपाय सुचविले. महात्मा फुले यांनी शेती, शेतीच्या कसण्याच्या पध्दती, शेतीची उत्पादकता यासंबंधी आपले विचार मांडले. भारतासारख्या शेतीवर अवलंबुन असणाऱ्या देशात शेतीला अनन्य साधारण महत्व आहे पण महात्मा फुले यांच्या मते ब्रिटिश सरकारने शेतीची कायमच उपेक्षा केली त्यामुळे भारतीय शेती मागासलेली राहिली. त्याने शेतकरी व शेतीच्या दैन्यावस्थेची काही कारणे सांगितली आहेत. शेतकऱ्यांच्या कुटुंबात एका पेक्षा अधिक विवाह केल्यामुळे मोठया प्रमाणात जमिनीचे विभाजन व तुकडीकरण झाले. लहान जमिनीत कसण्यासाठी अनेक शेतकऱ्याजवळ बैल, नांगर व शेती कसण्यासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री साठी मोठया शेतकऱ्यांवर अवलंबून रहावे लागत होते. जर शेती अवजारे, साधनसामुग्री उपलब्ध झाली नाही तर अनेक शेतकऱ्यांना आपल्या जमिनी मशागत करू न शकल्यामुळे विकाव्या लागल्या. यामुळे लहान शेतकरी भूमीहीन शेतमजूर झाले. रूढी परंपरा, धार्मिक विधी या नावाखाली आडाणी व अज्ञानी शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात पुराणिक पुरोहित या लोकांच्याकडून लूट करण्यात आली. लग्न, बारशे, तेरावा अशा जन्मापासून मृत्यूपर्यंत अनेक विधीसाठी मोठया प्रमाणात खर्च शेतकऱ्यांना करावा लागत होता. त्यामुळे काहीवेळा शेतकऱ्यांना जमीन विकून वेठबिगार म्हणून काम करावे लागत होते. भारतीय शेती उत्पन्नापेक्षा खर्च अधिक असूनही शेतकरी सावकारा कडून मोठया व्याजदराने कर्जे घेत होते. ही कर्जे वेळेवर परत आली नाही तर सावकार स्थावर मालमत्ता व शेतजमिन स्वत:च्या नावावर करून घेत असे. तसेच ब्रिटिश सरकारकडून दुष्काळाच्या काळात देखील शेतकऱ्यांच्या कडून शेतसारा सक्तिने वसूल केल्यामुळे शेतकऱ्याला दारिद्रय व उपासमारी याचा सामना करावा लागला. वाढल्या लोकसंख्ये मुळे जमिनीचे सातत्याने तुकडे व विभाजन होत होते. बांधा—बांधा वरून शेतकऱ्यांची भांडण तंटे होत होते. दरवर्षी जमीनी कमी होत असल्याने बागायती शेतीत सतत पिक घेतल्याने व विश्रांती न दिल्याने जमिनी नापीक बनत आहेत. तसेच जिराईत जमिनीत एकामागून एक पिके घेतल्याने जमिनी थकल्या आहेत असे निरीक्षण महात्मा फुले यांनी नोंदविले.

महात्मा फुले यांच्या मध्ये अशिक्षितपणा हा शेतीच्या व पर्यायाने शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे कारण आहे. तसेच शेतीवर अवलंबून असलेली अतिरिक्त लोकसंख्या शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारू शकत नाही. वारंवार पडणारे दुष्काळ, जमिनीची नापिकता, दैन्य—दारिद्रय, परंपरागत शेती करण्याच्या पध्दती, पाणी पूरवठयाच्या अपूऱ्या सोयी, शेतसाऱ्याची वसूली यामुळे भारतीय शेतीची उत्पादकता कमी होऊन शेतकरी कर्जबाजारी झाला होता यातून बाहेर पडण्यासाठी महात्मा फुले यांनी शेती व शेतकरी यांची दुरावस्था कमी करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या आहेत.

**महात्मा फुले यांनी शेतीविषयक समस्या कमी करण्यासाठी सुचविलेल्या उपाय योजना** महात्मा फुले 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथास म्हणतात ''श्रावण मासी कृषि प्रदर्शने, आश्वीन मासी शेत पिके आणि औते हाकण्याच्या स्पर्धाचे आयोजित कराव्यात'', शेतकऱ्यांच्या साठी परदेशी सहली आयोजित कराव्यात. शेती विषयक ज्ञान देशी भाषेत उपलब्ध करून द्यावे. शेतीनिष्ठ शेतकऱ्यांना पुरस्कार द्यावेत. शांततेच्या काळात सैनिकांचा वापर शेती सुधारणेसाठी करावा. पिकांची नासाडी, रान डुक्करे व इतर जनावरांनी करू नये म्हणून उपाय योजना कराव्यात. शेतीचे यांत्रिकीकरण होत नाही तोपर्यंत तरी पशुधन रक्षणासाठी गोवधबंदी करावी, जनावरांची संख्या कमी झाल्याने शेतीस खताचा पुरवठा कमी होतो. त्यामुळे जमिनीचे उत्पादन कमी होते. डोंगर उतारा वरील जमिनीची धूप थांबविणे तिचे संरक्षण करणे, महात्मा फुले यांनी

पाणी अडवा व पाणी जिरवा हा मंत्र फार पूर्वी दिलेला आहे. पावसाचे पाणी तलावाद्वारे साठवून तिचा वापर शेतीसाठी करावा. सरकारने अत्यल्प दराने शेतकऱ्यांना कर्ज पूरवठा करावा. शेतकऱ्यांना अंधश्रध्दा व इतर रूढी परंपरा यापासून दूर ठेवावे.

महात्मा फुले यांना वाटत होते की, शेतीवरील भार कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त लग्ने करू नयेत व कमी वयात लग्ने करू नयेत यासाठी सरकारने आवश्यक ते कायद्ये करावेत. शेती आर्थिक दृष्टया किफायतशीर होण्यासाठी शेतीला पुरेसा आणि सदर पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध असली पाहिजे याची जाणीव महात्मा फुलेंना होती. शेतीला मुबलक पाणीपूरवठा होण्याच्या दृष्टीने तळी आणि बंधारे बांधणे, जमिनीची धूप थांबविणे, विहीर खोदाव्यात हे उपाय सुचविले. शेतीवरचा भार कमी करणे, नोकरशाहीतील ब्राम्हणांचे वर्चस्व कमी करणे, आर्थिक विषमता वाढू नये यासाठी शेतकऱ्यांनी स्वत: व मुलांना शिक्षण दयावे. नोकरीत व शिक्षण क्षेत्रात शेतकऱ्यांची मुले असली पाहिजेत. शेती बरोबर इतर व्यवसायातूनही शेतकऱ्यांना उत्पन्न मिळावे आणि शेतीलाही उपयोग व्हावा यासाठी, पशूधन विकसीत करणे आवश्यक आहे असे महात्मा फुले यांना वाटते. जाती—जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या राखीव कराव्यात. शेतीतील नवनविन पध्दतीचा, नवनव्या गोष्टींचा प्रसार व्हावा, शेतकऱ्यांना त्याबद्दल ज्ञान व्हावे आणि त्याचा शेतकऱ्यांनी शेतीतील उत्पन्न वाढावे यासाठी उपयोग करावा म्हणून दरवर्षी शेती प्रदर्शने भरवावीत. शेतीबरोबर इतर व्यवसायातून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळावे यासाठी पशुधन विकसित करणे, चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास करणे, गोबंदी घालणे व चांगले बेणे आयात करणे. शेतीतील नवीन पध्दती व चांगल्या गोष्टी याचे ज्ञान मिळवण्यासाठी दरवर्षी शेती प्रदर्शने भरवून त्यांना बक्षिसे दिली जावीत.महात्मा फुले यांनी असे दाखवून दिले की, शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त महसूल गोळा करण्यासाठी शेतीवर कर बसविला जातो त्यामध्ये दर तीन वर्षानी सुधारणा करावी. शिक्षक हा शेतकरी/ कुणबी असावा जेणेकरून तो मुलांना शेतीविषयी गोडी लावेल. शेती उत्पन्नात वाढ होण्यासाठी कौशल्य वृध्दी अभ्यासक्रमावर महात्मा फुले यांनी भर दिला. आधुनिक काळात कृषी विद्यापीठे जी कृषी शिक्षण आणि विकासात महत्वाची कामगिरी करत आहेत, त्याचा विचार महात्मा फुले यांनी १९ व्या शतकातच व्यक्त केला होता. शेती सुधारणेसाठी शेतकऱ्यांच्या मुलांना विदेशी पाठवून नवीन तंत्रज्ञान व कौशल्य वृध्दी अभ्यासक्रम शिकवून दयावा. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी संकलित केलेला निधी त्यांना ज्ञान देण्याच्या कामी खर्ची करावा इ. अनेक उपाय महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्यांविषयी सुचविले आहेत.

**निष्कर्ष :** महात्मा फुले यांचा चौफोर दृष्टीकोन होता. शेती बरोबर शेतकऱ्यांचा सर्वांगीन विकास कसा झाला पाहिजे या दृष्टीने त्यांनी शेती सुधारणा सांगितल्या. शेतीतील सुधारणा बरोबरच उत्पादन वाढ करण्यासाठी आधुनीक शेती पध्दती व शिक्षण, तंत्रज्ञान याचा वापर कसा करावा याचे मार्गदर्शन दिले. शेतकऱ्यांमध्ये शेतीचे आधुनिकीकरण व प्रयोगशील वृत्ती घडवून आणण्यासाठी मौलिक असे विचार मांडले. ज्ञान व विज्ञानाच्या जोरावर समाजातील रूढी परंपरा, अंधश्रध्दा कमी करून समाज सुधारणा होण्यासाठी अत्यंत महत्वपुर्ण विचार मांडले.

**सारांश** भारतासारख्या शेती प्रधान देशात शेती क्षेत्रात भेडसावणाऱ्या विविध समस्या व त्यावरील उपाययोजना याबद्दल महात्मा फुले यांनी १२५ वर्षापूर्वी मांडलेले विचार आजही एकविसाव्या शतकात तितकेच महत्वाचे व दिशादर्शक असल्याचे दिसून येते. त्यांना कृषि अर्थशास्त्राचे अनुभवजन्य विवेचक असे म्हणणे पूर्णत: असमर्थनीय आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :—**

१) जोतिराव गोविंदराव फुले (नोव्हें. २००६), 'शेतकऱ्यांचा असूड' उपोदघात, (महात्मा फुले समग्र वाडमय), संपादक धनंजय कीर, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, सुधारीत सहावी आवृत्ती पृ. क्र. २६३

२) प्रा. रायखेलकर व डॉ. दामजी (२०११), आर्थिक विचारांचा इतिहास, विदया बुक पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

३) प्रा. डॉ. जे. एफ. पाटील व प्रा. आर. एस. म्होपरे, (जून २०२०), 'आर्थिक विचारांचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) Kerr, Dhananjay (1974), 'Mahatma Jotirao Phoole, Father of the Indian Social Revolution', Popular Prakashan Mumbai.

५) डॉ. रा. नु. आदे (२०१९), 'महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषय विचार, संशोधन लेख.

४) Anna K Patil (2020), 'Mahatma Phule's views on Agriculture, Research Get Article'

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री – विषयक विचार

**श्रीमती सारिका उध्दवराव पडवळ**
मुख्य् लिपीक, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्राचीन काळापासूनचा विचार केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपल्या देशातील महिलांना जगाच्या इतिहासाचा विचार करत अनेक समस्यांचा सामना करत गुलामीचे जीवन जगावे लागते. त्या जीवनाला मोठ्या प्रमाणावर मनुस्मृती सारखे ग्रंथ जबाबदार आहेत. म्हणून मनुस्मृतीचा अंत केल्याशिवाय भारतीय महिला सक्षम होणार नाहीत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृती दहन करुन स्त्री स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकले. त्यानंतर त्यांनी स्त्रीयांच्या हितासाठी, उद्धारासाठी हिंदू कोड बील आणले. त्याची हळूहळू अमलबजावणी करुन आज स्त्रीया सक्षम होताना दिसतात. त्यासाठी डॉ. आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार अभ्यासणे अवश्यक् आहे.त्यांचे कार्य हे केवळ दलित समाजापुरते मर्यादित नव्हते तर त्यांनी समाजसुधारणा बरोबरच महिलांच्या प्रगतीसाठी देखील कार्य केले.

स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी क्रांतीकारक कार्य केले. स्त्रियांच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार उच्च् होते. आणि म्हणूनच घटनेत त्यांनी स्त्री व पुरुष समान मांडले व समान अधिकार दिले. स्त्रियांना सर्व मानवी हक्क् मिळावे म्हणून आयुष्यभर् संघर्षत्मक् पवित्रा घेतला. स्त्रियांचे अधिकार व स्त्री शिक्षणासंदर्भात प्रगत विचार मांडले. स्त्रिला माणूस म्हणून सन्मान मिळावा आणि त्यांची स्पष्ट भूमिका होती. 11 एप्रिल 1947 रोजी संविधान सभेत हिंदू कोड बील मांडले 27 सप्टेंबर 1951 पर्यंत मंजूर न झाल्याने कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्याला महत्त्वाचे दोन कारणे होती. एक म्हणजे हिंदू कोड बिल मान्य् न होणे व मागासवर्गीयांसाठी आयोग न नेमणे होय. याचा परिणाम म्हणजेच आजचे कायदे हे स्त्रियांच्या हिताचे व संरक्षणाचे झालेले दिसतात. आणि आजही या कायद्यात बदल करुन स्त्रियांच्या हिताचे होत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

1) आंबेडकर पूर्व स्त्रियांची परिस्थीती अभ्यासणे.

2) डॉ. बाबासाहेबा आंबेडकरांच्या स्त्रीविषयक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

1) आंबेडकर पूर्व काळात स्त्रियांची स्थिती दयनीय होती.

2) डॉ. आंबेडकरांच्या विचार व कार्यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारत आहे.

**हिंदू कोड बिल :-**

स्त्री –पुरुष सामाजिक समतेच्या आंदोलनात फुले ,आगरकरांनी जेवढी भर दिली, तेवढीच भर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बीलाच्या रुपाने दिली. स्त्रियांना पुरुषाप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात समानता मिळावी यासाठी कायद्याची तरतुद केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अत्यंत दूरदृष्टीचे होते. देशातल्या तमाम हिंदू स्त्रियांच्या उध्दाराचे व्रत त्यांनी हाती घेतले. त्याचे उदाहरण म्हणजे हिंदू कोड बिल या बिलाला विरोध करणाऱ्यात डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभाई पटेल, महात्मा गांधी होते. या बिलाला पास करण्यास विरोध झाला तरी त्यातील कलमांनी आज कायद्याचे रुप घेतले आहे. यातून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. स्त्रिला पतीच्या व वडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क्

प्राप्त् झाला. तिला कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची संधी प्राप्त् होते. आज स्त्रिया आपल्या मर्जीने लग्न् करु शकतात. घटस्फोट घेऊ शकतात. एवढेच नव्हे तर स्त्री आपल्या मर्जीने आपल्या आपत्याला जन्म् देऊ शकते त्याला नाव देखील देऊ शकते. म्हणून आपल्या देशात नाना गुप्ता अशा स्त्रिया आपल्या अपत्याला जन्म्  देऊन माता होऊ शकतात. हिंदू कोड बीलामुळे पत्नीला पतीकडून पोटगी मिळू शकते.वडिलांच्या संपत्तीत मुलीला हिस्सा मिळतो. स्त्रीला दत्तक् निवडण्याचा हक्क् देखील मिळतो. स्त्रीला स्वत्:चा वारस ठरविण्याचा अधिकार असे अनेक अधिकार स्त्रियांना प्राप्त् करुन दिले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी .

12 डिसेंबर 1927 रोजी महाडच्या सत्याग्रहावेळी मोठ्या प्रमाणात अस्पृश्य् समाज जमलेला होता यामध्ये पाच हजार स्त्रिया होत्या येथे बाबासाहेबांनी स्त्रियांची वेगळी सभा आयोजित केली व ते म्हणाले, "तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म् दिला आहे. आम्हाला इतर लोक कसे जनावरापेक्षा कमी लेखतात हे तुम्हास ठाऊक आहे. काही ठिकाणी आमची सावली सुध्दा घेत नाहीत. इतर लोकांना कोर्ट कचेऱ्यामध्ये जागा मिळतात परंतु पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलीस खात्यातील शिपुर्ड्याचीही नौकरी मिळत नाही इतका आमचा हिन दर्जा आहे. हे सर्व तुम्हाला ठाऊक असताना तुम्ही आम्हास जन्मास का घातले? असा प्रश्न् तुम्हाला कोणी केला तर त्याचे उत्त्र तुम्ही काय देऊ शकता. या सभेत बसलेल्या कायस्थ् व इतर अस्पृश्य् बायांच्या पोटी जन्मलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलात काय अंतर आहे तुम्ही विचार करावयास पाहिजे की, ब्राम्हणाच्या स्त्रिया जेवऐ शिल आहे तेवढे तुमच्यातही आहे. ब्राम्हण् स्त्रियात जितेक पतिवृत्ये आहे तितके पतिवृत्ये तुमच्यातही आहेत. आणि तुमच्यात जितके मनोधैर्य करारीपणा, धमक आहे. तितकी ब्राम्हण् स्त्रियातही नाही. ब्राम्हण् स्त्रियांच्या  पोटी जन्मलेले बालक का सर्वमान्य् व्हावे व तुमच्या पोटी जन्मलेले बालक का अवमानीले जावे त्याला साध्या माणुसकीचा हक्क् का असू नये याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? मला वाटते तुम्ही त्याचा विचार केला नाही. तुम्ही जर विचार केला असता तर पुरुषांच्या आधी तुम्ही स्त्रीयांनी सत्यागृह केला असता. बाबासाहेबांनी या ठिकाणी अस्पृश्य् स्त्रियांना चेतविण्याचा व  त्यांच्यात स्वाभीमान जागविण्याचा प्रयत्न् केला होता. आणि त्यांना क्रांती करण्यासाठी उधुक्त् केले होते. ब्राम्हण् स्त्री व अस्पृश्य् स्त्री एकच असताना दोहोना मिळालेल्या मानवी स्वातंत्र्यातील बाबासाहेबांना फरकही सांगितला आहे.  बाबासाहेबांनी विषमवादी वर्णव्यवस्थेवर कठोर हल्ले तर केलेच परंतु त्याही बरोबर आपण स्त्रियाही हे कसे सहन करत आहात यावरही प्रहार केले व त्यांची कर्तव्ये काय आहेत याची जानीव करुन दिली  व जे अस्पृश्य् पुरुष समाजक्रांतीसाठी लढा देत आहेत यांच्या बरोबर स्त्रियांनीही सहभाग नोंदवावा.

त्यांच्या बरोबर कार्य करण्याविषयी बाबासाहेब स्त्रियांना आव्हान करतात. पतिच्या कामात पत्नीने भाग घेतला तर ते काम लवकर पुर्ण होईल असेच त्यांना सांगावयाचे होते. 14 ऑगस्ट् 1931 रोजी अस्पृश्य् वर्गाचे प्रतिनिधी म्हणून राउंडटेबल परिषदेला जान्यानिमित्त् बाबासाहेबांना निरोप देण्यासाठी समारंभ ठेवला होता. यावेळी बाबासाहेब स्त्रियांना उद्देशून म्हणाले आजपासूनआपणास आपल्या उन्नीसाठी आपल्या स्त्रियांसाठी विशेष जमातीच्या संघटनेने कार्याला लागले पाहिजे. आपल्या गळयाभोवती स्पृश्य् हिंदूने व सरकारणे गुलामगिरीचा पाश घातला आहे तो ताडकण तोडून आपले स्वातंत्र्य मिळवले पाहिजे.

बाबासाहेबांनी पुरुषाबरोबर स्त्रियांना प्रितिगामी व्यवस्थेच्या विरोधात लढण्यासाठी प्रोत्साहीत केले होते याचा परिणाम  बाबासाहेबांच्या हकेला प्रतिसाद देत अनेक स्त्रियांनी चळवळीत स्वत्:भाग घेतल्याचे दिसून येते. 20 जुलै 1942 च्या दलित स्त्रियांच्या परिषदेत बाबासाहेब म्हणतात.तुम्ही इतक्या 20-25 हजारांच्या संख्येने उपस्थित राहाल ही गोष्ट् 10 वर्षापुर्वी कल्पनाही करण्यासारखी नव्हती. स्त्रियांच्या संघटनेवर फार मोठा विश्वास ठेवणारा मी माणूस आहे. बाबासाहेबांचा स्त्रिशक्तीवर फार विश्वास होता. ज्या घरात सुधारणावादी स्त्री असेल ते घर प्रगतीपथावर जाण्यास वेळ लागणार नाही हे बाबासाहेबांनी जानले होते. स्त्रिया साजिक देशाच्या बळी पडल्या

होत्या म्हणूनच बाबासाहेब आपल्या पत्निविषयी म्हणाले माझ्या पत्निच्या स्वार्थ त्यागामुळे मला आजही स्थिती प्राप्त् झाली आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे त्यांच्या पत्निचा हात असतो हे बाबासाहेबांनी ओळखले होते. ज्या ज्या वेळी बाबासाहेब परदेशी वा वेगवेगळया कामगीरिनिमित्त् बाहेर जातात त्यावेळी मातोश्री रमाबाईने घर व्यवस्थित सांभाळले होते. जर बाबासाहेबांवर कुटूंबाची सर्वस्व् जबाबदारी असती तर समाजसेवेसाठी त्यांना किती वेळ दिला असता याचा अंदाज बांधता येणे शक्य् नाही. म्हणून बाबासाहेब आपल्या संघर्षमय जीवनामध्ये पत्निचा फार मोठा वाटा असल्याचे बोलून दाखवीत.

**निष्कर्ष् :-**

1) स्त्री शिक्षणातून स्त्रि उन्नती होऊ शकते.

2) सर्वसामान्य स्त्रीयांबरोबरच समाजाने नाकारलेल्या स्त्रियांना मान – सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्न् केले.

3) डॉ. आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांना आर्थिक सक्षम करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

4) भारतीय स्त्रियांना डॉ. आंबेडकरांनी संविधानातून कायद्याद्वारे महत्त्वाचे अधिकार प्राप्त् करुन दिले.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सुधारण – दिलीप सुखाडे

2) आम्ही ही इतिहास घडवला – उर्मिला पवार

3) मुकनायक – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

4) फुले – आंबेडकरी स्त्री चळवळ – मिनाक्षी मुन

5) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गाजलेले लेख.

# सामाजिक क्रांतीचे प्रणेते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**-प्रा. नानासाहेब महादेव गव्हाणे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर (स्वायत्त) -४१३००६.

डॉ.आंबेडकरांच्या क्रांतिकारी जीवितकार्यात राजकीय कार्याप्रमाणेच अस्पृश्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी जे चिंतन केले व सनदशीर संघर्ष केले, त्यांचे फार मोठे महत्वाचे स्थान आहे. खरे तर डॉ. आंबेडकर हे मूलतः अर्थतज्ज्ञच होते. पण हेही खरे आहे की, बाबासाहेबांचे जीवनकार्य बहुआयामी Multi-dimensional होते. त्यावरुन 'Genius' विषयी डॉ. जॉन्सन यांनी केलेल्या विधानाची सत्यता पटते. डॉ. जॉन्सन म्हणतात- 'True genius is a mind of large general powers, accidently determined to some particular direction, ready for all things, but chosen by circumstances for one'

परदेशात उच्चशिक्षणासाठी जाण्यापूर्वीच समाजशास्त्राबरोबरच अर्थशास्त्र व विशेषतः पब्लिक फायनान्स या विषयांचाही अभ्यास करण्याची मनिषा त्यांनी सयाजीराव गायकवाडांशी झालेल्या संवादात बोलून दाखविली होती व त्यानुसारच परदेशातील या संगात त्यांनी अर्थशास्त्राला प्राधान्य दिले होते. या अभ्यासाच्या आधारे त्यांनी सादर केलेला 'रुपयाचा प्रश्नः उद्गम आणि विकास' हा प्रबंध याच चिंतनाचे फलित आहे. या चिंतनात भारतीय अर्थशास्त्राचे जनक समजले जाणारे न्या. महादेव गोविंद रानडे, भारताचा आर्थिक इतिहास लिहिणारे रोमेशचंद्र दत्त, जॉन स्टुअर्ट मिल, मेजर विंगेट वगैरे पूर्वसूरींच्या विचारांचा मागोवा घेत असताना बाबासाहेबांनी त्यांच्याबरोबरच आपले मतभेदही नोंदविले आहेत. पुढे १९२३ साली प्रकाशित झालेल्या, वर उल्लेखिलेल्या 'रुपयाचा प्रश्नः उद्गम आणि विकास या प्रबंधात बाबासाहेबांनी, आधुनिक अर्थशास्त्रात क्रांती घडवून आणणाऱ्या प्रा. जॉन मेनार्ड केन्स् यासारख्या महान अर्थतज्ज्ञाने सुवर्णविनिमय परिणामाचा पुरस्कार करताना काढलेल्या बहुतेक सर्व निष्कर्षांचे खंडन केले आहे.

डॉ. आंबेडकर जगातील अग्रगण्य विद्यापीठातील सर्वोच्च अर्थतज्ज्ञपदावर पोहोचले आणि तरीही परदेशातून परतल्यावर स्वतःच्या आर्थिक उन्नतीचा मोह टाळून गरीब जनतेच्या कल्याणाला त्यांनी वाहून घेतले, अशी सामाजिक बांधिलकी मानणारा अर्थतज्ज्ञ विरळाच. पण, भारतानेच जिथे बाबासाहेबांच्या आर्थिक विचारांची दखल घेतली नाही तिथे बाहेरील देशांना त्यांच्या आर्थिक विचारांची गंधवार्ताही नसावी, हे स्वाभाविकच आहे. आज जगातील देश आर्थिक प्रश्नांमुळे जीवनमरणाच्या किनाऱ्यावर उभे आहेत. विश्वव्यापार संघटन WTO हे त्याचे प्रतीक आहे. आज आंतरराष्ट्रीय सामाजिक आर्थिक रचना मांडणाऱ्या अर्थतज्ज्ञांचा संपूर्ण अभाव आहे. अशावेळी पश्चिमी अर्थतज्ज्ञांनी या विषयातील ज्यांच्या क्षमतेविषयी विश्वास प्रकट केला आहे. त्या बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाची उणीव अधिकच तीव्रतेने भासते. त्यादृष्टीने डॉ. आंबेडकरांची अर्थशास्त्रीय ग्रंथसंपदा पाहण्यासारखी आहे. 'Administration and Finance of East India Company', 'The Evolution of Provincial Finance in British India', 'The Problem of the Rupee,' 'History of Indian Currency and Banking, (Vol.I) 'Miscellaneous Essays' इ.

भारतीय परिस्थितीच्या संदर्भातील हा आर्थिक विचार असला तरी एकूण अर्थशास्त्रीय मूलतत्वांचा त्याला आधार आहेच. म्हणूनच डॉ. आंबेडकरांचे अर्थचिंतन जागतिक कीर्तीच्या अर्थतज्ज्ञांच्या प्रशंसेला पात्र ठरले.असे असल्यामुळेच अस्पृश्यांची स्थिती हा त्याच्या जिव्हाळयाचा विषय तर होताच, परंतु अर्थशास्त्रीय दृष्टयाही त्यांच्या चिंतनाचा विषय होता. हे त्यांनी केलेल्या सूक्ष्म चिकित्सेवरुन लक्षात येते. अस्पृश्यांच्या गुलामगिरीचे स्वरुप म्हणजे 'सर्व गुलामगिऱ्यांचा अर्क' असे म्हटले होते. म्हणून बाबासाहेबांनी अस्पृश्यतेचे निर्मूलन करण्यासाठी धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा चार आघाडया दलितांच्या मुक्ति संग्रामात उघडलेल्या होत्या. अस्पृश्यांच्या

शापाचे वर्णन त्यांनी अनेक अंगांनी केले होते. त्यापैकी आर्थिक भूमिकेचा व आर्थिक प्रश्नांसंबंधी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा येथे विचार करावयाचा आहे. त्यासंबंधीची आंबेडकरांची भूमिका समजून घेण्यास पुढील तीन उतारे उपयुक्त उरतील. अस्पृश्यतेच्या प्रच्छन्न गुलामगिरीसंबंधी बाबासाहेबांनी म्हटले होते. "व्यक्तिस्वातंत्र्य हा भांडवलशाहीचा महामंत्र आहे. भांडवलशाहीने प्रत्यक्ष स्वरुपात दिसणारी प्रमजीविकांची वैयक्तिक (देहाची) गुलामगिरी जगाच्या पाठीवरुन नष्ट केली. अस्पृश्यतेच्या प्रच्छन्न रुपाने ही गुलामगिरी अजूनही या देशात वावरत आहे. अस्पृश्यतेच्या रुढीमुळे भांडवलशाहीच्या उघडया बाजारात त्यांना आपल्या श्रमशक्तीची विक्री करण्याला मज्जाव करण्यात येत आहे. कित्येक धनोत्पादक धंदयांची दारे त्यांना बंद आहेत. अस्पृश्य शेतकरी, कामकरी वर्गाला आपली श्रमशक्ती उघडया बाजारात विकण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. अस्पृश्य मजुरांना आधनिक भांडवलशाही उद्योगात प्रवेश करण्याला इतर स्पृश्य मजरांच्या बरोबरीने समतेचा हक्क मिळवावयाचा आहे. अस्पृश्य मजुरांना आधुनिक भांडवलशाही उद्योगात प्रवेश करण्याला इतर स्पृश्य मजुरांच्या बरोबरीने समतेचा हक्क मिळवावयाचा आहे. शास्त्रशुध्द समाजसत्तावादाच्या तत्वांचे पूर्ण ज्ञान असल्याची शेखी मिरविणाऱ्या हिंदी समाजसत्तावादयांनी अस्पृशांच्या चळवळीला 'मध्यमवर्गाची जातीय चळवळ' असे नाव देऊन विरोध करावा, याचे नवल वाटते."

"अस्पृश्यता विध्वंसनाला भांडवलशाहीचा विरोध नाही. अस्पृश्यता नष्ट होऊन या मजुरांना स्पृश्य मजुरांबरोबर उघडया बाजारात श्रमशक्ती विकता यावी, अशीच भांडवलशाहीची इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मजुरांच्या खड्या फौजेची संख्या वाढेल. स्पर्धा तीव्रता होऊन मजुरीचे दर कमी होतील. भांडवलशाही शासन संस्थेच्या सहाय्याने अस्पृश्यता घालवणे शक्य असल्यामुळे, अस्पृश्य वर्गाने सनदशीर मार्गाने राजकीय सत्ता अंशतः तरी हस्तगत करुन घेण्याचा प्रयत्न केल्यास कोणाही न्यायप्रिय व्यक्तीला त्यांच्याबद्दल हेवा देवा वाटण्याचे कारण नाही. आज अस्पृश्य वर्गाला राजकीय क्रांतीचे ध्येय आपल्या पुढे ठेवता येणार नाही. नवीन सुधारणा कायद्यान्वये हाती आलेल्या राजकीय हक्कांचा उपयोग करुन घेवून सनदशीर मार्गाने आपली सामाजिक आर्थिक आणि शैक्षणिक उन्नती होईल तितकी करुन घेणे हेच त्यांचे कर्तव्य आहे." आणखी एका अंगाने विचार करताना बाबासाहेब म्हणतात, 'अस्पृश्यतेचे निमूलन झाल्यावाचून शेतकरी कामकरी वर्गाच्या आर्थिक लढयाला संघटित तोंड लागणार नाही. हिंदी श्रमजीवी वर्गात धार्मिक, सामाजिक, आर्थिक वगैरे सर्व प्रकारच्या शृंखलांवाचून ज्यांच्याजवळ गमावण्यासारखे दुसरे काहीच नाही. असा जर कोणता गट असेल तर तो अस्पृश्य समाजच होय. हिंदू धर्माने शुद्र गणलेल्या स्पृश्य शेतकरी कामकरी वर्गाला आपण धार्मिक आणि सामाजिकदृष्टया पांढरपेशा वर्गापेक्षा हीन असलो तरी अस्पृश्यांपेक्षा आपला दर्जा उच्च आहे, या भ्रामक भावनेचे समाधान तरी लाभत असते. या भावनेचा त्याग करण्याला स्पृश्य शेतकरी कामकरी नाखुश असतो. नव्हे, त्या भावनेसाठी तो आर्थिकदृष्टया समान पातळीवर असलेल्या आपल्या अस्पृश्य कामकरी बांधवाचा वैरी बनतो.

बाबासाहेबांनी म्हटले आहे, अस्पृश्यतेचा प्रश्न हा वर्ग कलहाचा प्रश्न आहे. स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन समाजातील तो कलह आहे. एका माणसावर होत असलेल्या आगळिकीचा प्रश्न नव्हे. एका माणसावर होत असलेल्या अन्यायाचा प्रश्न एका वर्गाने दुसऱ्या वर्गावर चालविलेल्या अन्यायाचा प्रश्न आहे. हा वर्ग कलह सामाजिक दर्जासंबंधीचा कलह आहे. एका वर्गाने दुसऱ्या वर्गाशी वागताना आपले वर्तन कसे ठेवावे, यासंबंधीचा आग्रह धरला म्हणूनच हा कलह उपस्थित होतो. तसे जर नसते तर चपातीचे जेवण घातल्यामुळे तांब्या पितळे भांड्यात पाणी आणल्यामुळे, घोड्यावरुन वरात नेल्यामुळे ही भांडणे झाली नसती. जो अस्पृश्य चपाती खातो. उंची पोशाख करतो. तांब्या पितळेची भांडी वापरतो, घोड्यावरुन वरात नेतो. तो वरच्या वर्गाचे केणतेही नुकसान करत नाही. आपल्याच पदराला खार लावितो असे असताना वरच्या वर्गाला त्याच्या करणीचा रोष का वाटवा? कारण एकच आहे व ते हेच की, अशी समतेची वागणूक त्यांच्या मानहानीला कारणीभूत होते. तुम्ही खालच्या दर्जाचे अपवित्र आहात, खालच्या पायरीने तुम्ही राहिलात तर ते तुम्हांला सुखाने राहू देतील. पायरी सोडली तर कलहाला सुरुवात होते. ही गोष्ट

निर्विवाद आहे. वरील उदाहरणांवरुन आणखी एक गोष्ट सिध्द होते ती ही की, अस्पृश्यता ही नैमित्तिक - नित्याची आहे. हीच गोष्ट स्पष्ट भाषेत सांगायची म्हणजे हा स्पृश्य आणि अस्पृश्य या मधील कलह नित्याचा आहे. व तो त्रिकालबाधित असा राहणार आहे. कारण, ज्या धर्मामुळे तुम्हांला खालची पायरी देण्यात आली आहे तो धर्म वरच्या वर्गाच्या म्हणण्याप्रमाणे सनातन आहे. त्याच्यात कोणत्याही प्रकारचा फेरबदल कालमानानुसार होऊ शकत नाही. तुम्ही आज जसे खालचे आहात, तसे तुम्ही नेहमी खालचे राहिले पाहिजे. याचाच अर्थ असा की, स्पृश्य व अस्पृश्य यांच्या मधील हा कलह कायमचा राहणार आहे.'

'अस्पृश्योन्नतीचा आर्थिक पाया' या अग्रलेखात अस्पृश्यांनी आर्थिकदृष्टया स्वावलंबी कसे व्हावे, याची चर्चा करताना बाबासाहेब म्हणतात की, 'तुमच्या आर्थिक परावलंबी अवस्थेचा गैरफायदा घेऊन अस्पृश्यतेची बेडी तुमच्या पायात कायम राहावी यासाठी सवर्ण लोक प्रयत्न करतात. म्हणून शेती, विणकाम आदी जोडधंदे काढून त्यांनी आर्थिक स्वावलंबन केले पाहिजे'. उदा. बाबासाहेबांनी सुचविले आहे, ' सर्वच महार लोकांना शेतीवर उपजिवीका करता येईल इतके मोठे क्षेत्र सापडणे कठीण आहे. तेव्हा शेतीला जोडून दुसरा काहीतरी धंदा महार लोकांनी करणे आवश्यक आहे. महार जात ही धंदेवाईक जात नाही. अर्थात तिला जो धंदा करता येईल तो धंदा तिने करण्यास काही हरकत नाही. एवढी गोष्ट कबूल करणे प्राप्त आहे की, पैशाच्या व अनुभवाच्या अभावी श्रेष्ठ प्रतीचे किफायतशीर धंदे या जातीतील लोकांना करता येणे शक्य होणार नाही. शक्य झालेच तर एखादा कनिष्ठ प्रकारचा धंदा हाती घेता यईल. परंतु ब्राम्हण्याच्या भूताटकीने पछाडलेले महार लोक हीन धंदा पत्करण्यात तयार होतील, असे संभवत नाही. ज्या धंदयात स्पर्धा नाही किंवा जो अमूक एका जातीचा धंदा होऊन बसला नाही, असा एखादा धंदा करता येण्यासारखा असला तर तो करण्यास कदाचित महार लोक उद्युक्त होतील. आमच्या मते, अशाप्रकारचा एकच एक धंदा म्हणजे खादी विणण्याचा आहे. व महार लोकांना आमची शिफारस आहे की, तुम्ही खादी विणा"

अस्पृश्यांच्या आर्थिक उन्नतीबाबत बाबासाहेब आग्रही होते. कारण, मनुष्य आर्थिक स्थिती सुधारली किंवा राजकीय पदान्नती झाली की, समाजात त्याला आपोआप अधिक मान्यता प्राप्त होते. हा अनुभव युरोप-अमेरिकेत त्यांनी घेतला होता. आपल्याकडे ही गोष्ट इतकी सरळ नाही. तरी पूर्वीच्या काळी व्यक्तीला राज्यपद प्राप्त झाल्यानंतर त्याची व त्याच्या कुटुंबाची सामाजिक पदोन्नती तुरळक उदाहरणे उपलब्ध आहेत. परंतु जाती या नात्याने आर्थिक व सांस्कृतिक दर्जा सुधारला तर त्या जातीला पूर्वीहून अधिक सामाजिक मान्यता मिळू शकते, असे काही उदाहरणावरुन दिसते.महार-वतने, खोती, शेतमजुरांचे प्रश्न हाती घेऊन बाबासाहेबांनी अस्पृश्यांचा आर्थिक प्रश्न हाती घेतला. आर्थिक व अस्पृश्यता हे प्रश्न अत्यंत निगडीत आहेत म्हणून त्याचा विचार स्वतः बाबासाहेब करीत होते. ते म्हणत, 'मला असे वाटते की, माझा जन्म सर्वसाधारण जनतेची जबाबदारी घेण्यासाठीच असावा. मी देखील मजूर वर्गापैकी एक असून इंप्रूव्हमेंट ट्रस्टच्या चाळीत राहतो. इतर बॅरिस्टरांप्रमाणे मला देखील बंगल्यातून राहता आले असते पण माझ्या शेतकरी व अस्पृश्य बंधुंकरीता चाळीत राहून काम केले पाहिजे. याबद्दल मला केव्हाही वाईट वाटत नाही. मला मुंबईला येऊन अवघी चार वर्षे झाली अत्यंत हीन मानलेल्या समाजात जन्म झाल्यामुळे त्याच समाजासाठी जिवापाड मेहनत करणे मला भाग पडले आहे. तशात अस्पृश्य कामगारांना इतर कामगारांचे हक्क मिळवून देणे माझे कार्य आहे'.बाबासाहेबांना कल्पना होती की, खेडयापाडयात जे अस्पृश्य आहेत ते आर्थिक दृष्टीने असमान असल्यामुळे आर्थिक पिळवणुकीस तोंड देऊन सामाजिक बहिष्कारासारख्या सामाजिक संकटासही तोंड देत आहेत. त्यामुळे त्यांची आर्थिक मनी आर्थिक स्वावलंबनात आहे. लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत दारिद्रय व सामाजिक बहिष्कार ही अस्पृश्य शेतकऱ्यांचे दोन्ही दुःखे त्यांनी आपल्या निवेदनात सांगितली होती. त्यांनी सांगितले होते : 'अस्पृश्यांचे दारिद्रय ही त्यांच्या मार्गातील दुसरी मोठी धोंड आहे. मुंबई इलाख्यातील बहुतेक अस्पृश्य जनता परावलंबी आहे. काही जण स्पृश्य सनातन्यांच्या, तर काही जण मजूर म्हणून या लोकांच्या शेतावर खपून आपली पोटे भरतात.

बाकीच्यांचा उदरनिर्वाह, गावकीच्या नोकरीबाबत (बलुते) गावकरी लोकांकडून मिळणाऱ्या अन्नावर व धान्यावर होते. अस्पृश्यांनी जरा स्वाभिमान दाखविला की, हे सनातनी स्पृश्य गावकरी त्यांच्याकडून जमिनी घेतात. त्यांना आपल्या कामावरुन दूर करुन त्यांची रोजची मीठ-भाकरी बंद करतात'. बाबासाहेबांचे हे मूलगामी विचार अतिशय अभ्यसनीय आहेत.

**संदर्भ व सूची :**

१) फडके य.दि., 'आंबेडकरी चळवळ', पृ. क्र. ८८-८९

२) फडके य.दि., 'आंबेडकरी चळवळ', पृ. क्र. ८८

३) खरात शंकरराव,'डॉ. आंबेडकरांच्या सहवासात', पृ.क्र. १२९-१३०

४) गणवीर रत्नाकर, 'बहिष्कृत भारत', डॉ. आंबेडकरांचे अग्रलेख, पृ.क्र. ३८६

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहब आंबेडकर के अस्पृश्यता विरोधी विचार और कार्य

**वैशाली भगवानराव सिरसीकर**
डॉ. बाबासाहब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

प्रस्तावना :
वैश्विक स्तर पर भारत की विविधता मे एकता सर्वविदित है |किसी भी समाज या संस्कृती की पहचान उसमे व्याप्त मुल्यों मानसिकताओं और व्यवहार शैलियौ पर आधारित होती है |जैसेजपानी लोग अपने विनम्र व्यवहार के लिए जाने जाते है,अंग्रेज लोग अपने किताबो के प्रति लगाव के लिय जाने जाते है ,उसी तरह भारतीय लोग अपने जात-पात ,उच-नीच, पवित्र-अपवित्र की मानसिकताओ के लिए जाने जाते है । भारत मे धार्मिक भिन्नता के साथ अलग -अलग भाषा रस्मो रिवजो ,खान-पान,परिधान, जाती-उपजातीयाँदृष्टिगोचर होती है । किसी भी संस्कृती कुछ सकारात्मक-नकारात्मकउचित – अनूचित तत्व मौजूद होते हे । हिंदू संस्कृती की जाती व्यवस्था इसी नकारात्मकता को इंगित करती है ।भारतीय समाज हजारो जातीयो मैं बटा हुआ है । इन जातियो मैं एक दुसरे के प्रति द्वेश की भावना है ।यह देख भारत की विविधता मैं एकता की सर्वविदिता विवादास्पद सी प्रतीत होती है ।
इंसान ने अपनी चेतन-अवचेतन इच्छाए और जरूरतोको पूरा करने के लिए सामाजिक नियमो को स्थापित किया ।हिंदु संस्कृति में जातीप्रथा का निर्माण भीइन्ही चेतन-अवचेतन इच्छापुर्तीहेतू हुआ। हिंदू धर्म वेद,उपनिषद,मनुस्मृती मेंअस्पृश्यों पर पाबंदियों के प्रमाण मिलतेहै। भारतीय समाज मे सदियो से चली आ रही अस्पृश्यता मानव समाज के लिए भीषण कलंक है। ईसीअस्पृश्य समाज मेंडॉ. बाबासाहब आंबेडकर का जन्म हुआ। अपने बिरादरी की दुर्दशाको देख बाबासाहेब आंबेडकर को पिडाहोतीथी। अस्पृश्य समाज ने शोषण अत्याचार का कभी विरोध नही किया।डॉ. बाबासाहब आंबेडकरने अस्पृश्यता के खिलाफ आवाज उठाईlअस्पृश्योंकीसामाजिक,आर्थिक,राजनीतिक, शैक्षणिक उन्नती के लिए आजीवन प्रयास और कडा संघर्ष किया।

**शोध पत्र के उद्देश :**

1. अस्पृश्यता की अवधारणा क्या है ? उसके स्वरूप और व्यापकता को समझना।
2. डॉ. बाबासाहब आंबेडकर के अस्पृश्यता संबंधी विचार ऐंव कार्य संज्ञानमेंलेना।
3. इक्कीसवी सदी मेंअस्पृश्योंकी स्थिती और डॉ. बाबासाहब आंबेडकर के अस्पृश्यता विरोधी विचारों की उपयोगिता से अवगत होनाl

**शोधपत्र की परिकल्पनाएँ:**

1. अस्पृश्यता जाती आधारित छुआ- छूत की भावना हैंl इसका स्वरूप प्राचीन मध्ययुगीनऔर आधुनिक काल मेंअलग -अलग दिखाई देता है।भारत के हर क्षेत्र मेंइसकीव्यापकतादेखी जा सकती है।
2. डॉ. बाबासाहब आंबेडकर ने हिंदू धर्म में व्याप्त जातीप्रथा अस्पृश्यता का पैना और सटीक खंडन किया।
3. एक्कीसवी सदी मेंभी भारत में व्यक्ती की सामाजिक पहचान उसके बौद्धिक स्तर पर न होकर जाती आधारीत हैl व्यक्ती की इसी जाती आधारित पहचान को बदलने का प्रयास डॉ. बाबासाहब आंबेडकर ने किया।

**अस्पृश्यता की अवधारणा :**

भारतमें जातिप्रथा व अस्पृश्यता यहएक जटीलऔर निरंतर चली आ रही गंभीर समस्या है। हालाकी इसेअक्सर हिंदू धर्म से जोडकर देखा जाता है। सिंधूसंस्कृतीके लुप्त होने के बाद भारत मेंआर्योंका आगमन हुआ। आर्योंनेमूलभारतीयों को युद्ध मेंपरास्तकर उन्हे अपना गुलाम बनाया। आर्योंने भारतीय समाज को चार वर्णो में

विभाजित किया ।ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य औरशूद्र ।"उत्तर वैदिक कालखंड मे वर्णव्यवस्था जातीव्यवस्था मेंतब्दीलहूई।" वर्णव्यवस्था लचिलीथी। यह मनुष्य के कर्म पर आधारित थी। जातीव्यवस्था मनुष्य के जन्मपर आधारित थी ।

**अस्पृश्यता का स्वरूप :**

वैदिककाल में अस्पृश्यता का अस्तित्व नही था । लेकिन उत्तर वैदिक काल मेंजाती प्रथा और अस्पृश्यता का उगम हुआ ।अस्पृश्यों के घर गाव के बाहर होते थे । ताकिवेगाँवकी रखवाली कर सके । अस्पृश्यलोंगोको किसी भी प्रकार की संपत्ती रखने का अधिकार नही था । सोने-चांदी जेवर पहनना, स्वच्छ कपडे पहनना,घोडे या पालकी में बैठने पर पाबंदी थी। अस्पृश्यलोगोंकोस्पृश्यलोगोंको प्रणाम करना पडता था । भारत एक कृषीप्रधान देश है लेकिन, अस्पृश्योंको भूमी खरीदने का अधिकार नही था ।इसी जातीप्रथा और अस्पृश्यता का विरोध भगवान बुद्ध और महावीर ने किया । लोगों नेहिंदू धर्म की इन कुर्तियोसे तंग आकर बौध्द और जैन धर्म अपनाया ।मध्यकालीन भारत में जाती प्रथा और अस्पृश्यता का स्वरूप अधिक जटील होता हुआ दिखाई देता है । संत महात्माओ ने जातिप्रथा और अस्पृश्यता का विरोध किया । संत ज्ञानेश्वर,संततुकाराम,कबीर,नानक, चैतन्य आदी संतोने भारतीय समाज को रूढीवादी मानसिकता से बाहर निकालने का प्रयास किया । लेकीन मनुवादियोंने संतो को यातनायेंदी । उनका विरोध किया । अंग्रेजोको आगमन के बाद अस्पृश्य समाज की स्थिती में कोईसुधार नहीं आया |अंग्रेजो ने लोगो को सेना मे शामिल किया किया लेकिन स्पृश्य लोगोने इस का विरोध किया| उन्नीसवी सदी में महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, महर्षि शिंदे,रानडे इन समाजसुधारकोंने हिंदू धर्म की कुप्रथाओं का विरोध किया । समाज को एकताके सूत्र में बांधने का प्रयास किया । सनातनी ब्रहाणोंने नेसमाजसुधारको के विरुद्ध षड्यंत्र करउन्हे डराया धमकाया गया ।

**अस्पृश्यता की व्यापकता :**

"अस्पृश्यता भारतीय सामाजिक संस्कृती का एक विशिष्टऔर मुख्य लक्षण हैं।"[1]इसकी व्यापकता पुरेभारत वर्ष मेंदेखी जा सकती है । दुनिया भर में पाये जाने वाले इस्लाम, ईसाई,जैन, बौद्ध, शीख , पारसी सभी धर्मो को भारतीय भूमि पर फलने– फुलनेका अवसर मिला ,लेकिन भारत मे हिंदूओंकी बहुलता होने के कारण हिंदू धर्म का प्रभाव अन्य धर्मो पर दिखाई देता है ।"मुसलमानो मे भी शिया – सुन्नी, अरब - अजम के बीच उंच – नीच की भावनाऐं रही है ।"[2] इस्लाम की तरह बौद्ध, जैन ,इसाई धर्ममेंभी अलग-अलगपंथ दिखाई देती है । औरउसमेंभी उच – नीच की भावना देखने को मिलती है ।

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर के अस्पृश्यता विरोधी विचार और कार्य :**

उन्नीसवी सदी मेंअस्पृश्यों की सामाजिक व धार्मिक स्थिती अत्यंतशोचनीय ओरदयनीयथी। डॉ. आंबेडकर ने अस्पृश्योंको सामाजिक न्याय दिलाने के लिए महाडकेतालाब और नासिक के कालाराम मंदिर में प्रवेश के लिए आंदोलन किया । स्पृश्य समाज ने अच्छुतोंको सार्वजनिक स्थलोपर जाने से मनाई की थी।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने अस्पृश्यों के पतन उनमें शिक्षा का अभाव बताया । अस्पृश्योंमें शिक्षा के प्रचार-प्रसार के लिए बहिष्कृत हितकारणी सभा की स्थापना की ।डॉ. आंबेडकर कहते थे कि "मूर्खतापूर्णविश्वासो का कोई वैज्ञानिक प्रमाण और आधार नही है । भारतीय लोग दुनिया के उन्नत राष्ट्रोंकी की तुलना में बहुत पिछडे हुए है , क्योंकिवें पुनर्जन्म और मानवी जीवन पर नक्षत्रों के प्रभाव जैसे अंधविश्वासों और मान्यताओं का पालन करते है ।"[3] बहिष्कृत हितकारणी सभा के माध्यम से शिक्षा के प्रति जागृती और आर्थिक उन्नती और अस्पृश्योंको संघटित करने का कार्य किया ।इससभा की स्थापना का उद्देश अस्पृश्यों' को स्वाभिमानी और आत्मनिर्भर करनाथा ।'[4]अस्पृश्यसमाजकी राजनीतिकस्थितीसुधारणेकेलिये गोलमेज परिषद में डॉ. आंबेडकर ने भारतीय अस्पृश्य समाज की दयनीय स्थिती की चित्र प्रस्तुत कर अस्पृश्योंकी राजनैतिक समस्या का निवारण करनेके लिये,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ने स्वतंत्र लेबर पार्टी की स्थापना की । 1946 में संविधान प्रारुप समिती के अध्यक्ष के रूप में उनका चुनाव हुआ ।[5]संविधान में स्वतंत्रता,समता, बंधुता के सिद्धांतों के आधार पर अस्पृश्यता का अंत किया ।

**21 वी सदी मैं अस्पृश्यों की स्थिती:**

विडंबनाकीबातहैकि 21 वीसदीमें भी भारतीय समाज जातीय व्यवस्था को आदर्श मानती है ।चुनावों,नोकरीयों में आरक्षण के लिए आधुनिक युगमैं भी शादी के लियेजो विज्ञापन दियेजातेहैंउस्मे जाती में ही जीवनसाथी तलाश की जाती है। भारतके ग्रामीण इलाकों मे आजभी अस्पृश्य समाज के लोगों की बस्तियां अलग होती है। शादीयों,समारोह त्योहारों में अस्पृश्योंकीखानपान की अलगव्यवस्था की जाती है। हाल ही में राजस्थान और उत्तर प्रदेश मे अछुतों पर अत्याचारों की घटनाएं घटीत हूई ।इन घटनाओं को देख दिलदहल उठताहै और दिमाग सोचने पर मजबूर होता है, क्या भारत में लोकतंत्र मौजुद ओर मजबूत हैं?

**सारांश:**

मानवकामानवसे ही अमानवीव्यवहार देख जहन में सवाल उठना लाजमी हैं, की क्या सचमेंभारत की विविधता मेंएकता हैं ? वैश्विक स्तर पर भारत की इस गरिमा को बनाये रखने के लिये हमेंभारतीयसमाज मैं व्याप्त जाती प्रथा और उसमें निहितअस्पृश्यताको जड से खत्म करना होगा । यहतभी संभव हैं जबहम मनुवादी मानसिकताछोडडॉ. बाबासाहब आंबेडकर के मानवीयता,व्यक्तिगत अधिकार , सामाजिक समानता , महिलांओं और प्रजातंत्र का सन्मान इन विचारोंको आत्मसात करे।

**निष्कर्ष:**

1. अस्पृश्यताएक सामाजिक और मानसिक विकृती है।
2. डॉ. बाबासाहब आंबेडकर ने जाती प्रथा और अस्पृश्यताके खिलाफ बडाएवंसफलविद्रोहकिया।
3. इक्किसवी सदी मेंसैद्धांतिकतौरपर अस्पृश्यताखत्म होनेकी हैं, लेकीन व्यावहारिक और मानसिक तौरपर आज भी बरकरार है। डॉ. बाबासाहब आंबेडकरने अस्पृश्योंकी इसदशा को मिटानेके लिये अस्पृश्योंकी मानसिक दिशा को बदला। जिसकारण आज असपृष्यों की आथिर्क स्थिती मेपरिवर्तन हुआ|

**टिप्पणीयां :**

1. बी. आर. आंबेडकर, जातीसंस्थेचे उच्चाटन , राज प्रकाशन,अकोला.
2. महर्षी वि. रा. शिंदे , भारतीय अस्पृश्यतेचाप्रश्न , कौशल्य प्रकाशन, औंगाबाद 2003, पृ.क्र. 15
3. नानक चंद रत्तू, डॉ. बा. आंबेडकरकूछअन छुए प्रसंग,सम्यक प्रकाशन,नईदिल्ली, 2011, पृ.क्र. 170
4. धनंजयकीर ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलरप्रकाशन, मुंबई
5. य. दि. फडके आंबेडकरी चळवळ,श्रीविधा प्रकाशन, पुणे , 2007

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान

**डॉ. फारुक अहमदसाब तांबोळी**
मराठी विभाग, शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण ता. कळंब जि. उस्मानाबाद

आधुनिक महाराष्ट्राच्या सुरुवातीच्या काळामध्ये अनेक समाजसुधारकांनी समाज सुधारणेचा ध्यास घेतलेला दिसतो. यामध्ये डॉ. भाऊ दाजी लाड, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, दादोबा पांडुरंग तर्खडकर, बाबा पद्मनजी, जगन्नाथ शंकरसेठ उर्फ नाना शंकर सेठ, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले, छत्रपती शाहू महाराज, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायामूर्ती रानडे, पंडिता रमाबाई या सर्व समाजसुधारकांनी महाराष्ट्राची नव्हे देशाची पुरातन संस्कृतीला हादरा देवून नवीन संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न केला. पारंपारिक संस्कृतीने माणसाचं माणुसपण नाकारलं होतं. त्याला माणुसपण बहाल करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

आधुनिक कालखंडामध्ये जातीभेद निर्मुलनाची चळवळ सुरु झाली होती. त्या प्रयत्नामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मोलाचे योगदान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेली दलित चळवळ अन्य चळवळीपेक्षा महत्वपूर्ण आहे. या चळवळीने संपूर्ण समाजाचे लक्ष आपल्याकडे केंद्रित केले. दलित चळवळीच्या माध्यमातून दलित चेतनेचा, दलित जाणीवेचा हुंकार नव्यानेच मराठी साहित्यात अवतरित होऊ लागला होता. दलित चळवळीच्या माध्यमातून दलितांच्या जीवनांमध्ये परिवर्तनाची नवी पहाट उजडू लागली होती. हजारो वर्षांपासून 'माणुसपण' हरवलेला माणूस आपल्या हक्काची आणि अधिकाराची भाषा वापरू लागला. या चळवळीमुळे दलितांना नवे आत्मभान आणि माणुस म्हणून जगण्याचे आधिकार मिळत होते. आधुनिक भारताचे जनक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक, घटनातज्ञ, कायदेपंडित, इतिहास तज्ञ, नामवंत शिक्षणतज्ञ, पत्रकार इत्यादी बिरूदे लावली तरी हे व्यक्तिमत्व पूर्ण होऊ शकेल. याविषयी शंकाच येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चिंतनाचे विषय पाहिले तर आपल्या लक्षात असे येते की, त्यांचे व्यक्तिमत्व एका चौकटी बंदिस्त करता येण्याजोगे नाही. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन, राज्यघटना, पत्रकारिता, धर्म चिकित्सा, व्यावस्थापन शास्त्र, तत्वज्ञान अशा विविधांगी विषयावर ते लिहित व अधिकारवाणीने बोलत असत. यावरुन आपणास निदर्शनास येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार सर्वसमावेशक व व्यक्ती केंद्रित न होता. माणुस केंद्री विचार होता. जगातल्या सगळया विचारधारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला मान्यता देणारेच आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या चळवळीने शिक्षण, साहित्य, वाडमय, कला, दलित रंगभूमी, नाट्य आदी क्षेत्रात आंबेडकरी चळवळीने आपला दबदबा कायम टिकवलेला आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठी साहित्यामध्ये नवनवीन वाङमयीन प्रवाह निर्माण होऊ लागले. या प्रवाहाने आपली स्वताची जाणीव आणि नेणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या वाडमयीन प्रवाहामध्ये अत्यंत महत्वाचा प्रवाह व चर्चिला गेलेला प्रवाह म्हणजे दलित साहित्याचा प्रवाह होय. या दलित साहित्याच्या प्रवाहाच्या निर्मितीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रमुख प्रेरणा होती. ज्या महापुरुषाने मानवमुक्तीचे तत्वज्ञान मांडले त्या सर्व महापुरुषांना स्वीकारून ही चळवळ वाटचाल करीत आहे. यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, कार्ल मार्क्स, आगरकर, विठठल रामजी शिंदे, धोंडो केशव कर्वे इत्यादी समाजसुधारकांचा वसा आणि वारसा ही चळवळ समृद्धपणे पेलते आहे. दलित

साहित्य कथा, कादंबरी, नाटक, कविता आणि स्वकथन या साहित्य प्रकारांनी समृद्ध आहे. आशय आणि विषयाच्या अनुषंगाने हे साहित्य तत्कालीन साहित्यापेक्षा निराळे ठरले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, नकार, विद्रोह, नव्या क्रांतीची भाषा हे अंगभूत वैशिष्टय घेवून नवी वैचारिक मांडणी या साहित्यातून निर्माण झाली. साहित्यमूल्याबरोबरच जीवनमूल्य किती महत्वाचे आहेत, ही नवी दृष्टी दलित साहित्याने मराठी साहित्याला निर्माण करून दिली. अन्याय, अत्याचार, जगण्यातील दुटप्पीपणा, दुख, दारिद्रय , वेदना, नैराश्य, हतबलता हे मराठी साहित्यातून प्रथमच यायला लागले. पोटभर जेवण करून मनोरंजनासाठी साहित्य निर्माण करणाऱ्या पांढरपेशा वर्गाला नाकारून नव्या भूमिकेतून मराठी साहित्य समृद्ध व्हायला लागले. दलित अभिव्यक्तीची सुरुवात दलित कवितेने केली तर दलित आत्मकथनाने वेदनेचा व अभिव्यक्तीचा परमोच्चबिंदू गाठला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्ये स्पष्टता आहे. कोणताही विचार मांडण्याअगोदर त्याला संदर्भ दिल्याशिवाय त्यांनी मांडला नाही. भावना, समाजहित किंवा सत्तालोलूपीपणा या गोष्टीला विनाकारण महत्व न देता विचारावर श्रद्धा ठेवून ते नवीन मांडणी करताता. वैचारिकतेला कुठलीही तडजोड मान्य नसते. या वैचारिक बैठकीतूनच त्यांनी दलितांना 'माणुसपण' बहाल केले. या माणुसपण केंद्रित लिखानातून दलित चळवळीला नवे आत्मभान, आत्मविश्वास, स्वत्वाची जाणीव निर्माण व्हायला लागली. हजारों वर्षांपासून मुका झालेला समाज बोलू लागला नव्हे हक्क व अधिकाराची मागणी करू लागला. याच्या पाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वैचारिक मांडणीच कारणीभूत होती.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित साहित्याला योगदान**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली वृत्तपत्रीय चळवळ एक ध्येय घेवून वाटचाल करीत होती. झोपलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी ती निर्माण झाली होती. अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी त्यांनी वृत्तपत्र निर्मिती व लेखन केले होते. या वृत्तपत्रीय लेखांमधून समाजाला त्याची दशा व दिशा दाखवण्याचे काम त्यांनी केले. मराठी वर्तमानपत्रांमध्ये बाबासाहेबांन निर्माण केलेल्या वर्तमानपत्राची दखल घेतल्याशिवाय मराठी वर्तमानपत्रांचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. दलित- पीडित वर्गांचे प्रश्न, भटक्या-आदिवासींचे प्रश्न, स्त्री वर्गाचे प्रश्न याकडे प्रस्तापित समाजव्यवस्थेचे लक्ष दलित साहित्याने वेधले. त्यातून जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन निर्माण केला. पारंपारिक चालत आलेले साहित्य कमी -अपूर पडू लागले. साहित्यातून चालत आलेले तत्वज्ञान कुचकामी व निकामी भासू लागले. साहित्य आणि संस्कृतीचा नवा संघर्ष उभा राहिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार चिंतनाच्या प्रभावातून प्रचलित साहित्याच्या मर्यादा वारंवार निदर्शनास येऊ लागल्या.यातूनच दलित साहित्याने मराठी साहित्यातील साचलेपणा झुगारून देवून नव्या सांस्कृतिक जीवनाची सुरुवात केली.

दलित कविता, कथा, स्वकथन, कादंबरी, दलित रंगभूमी इत्यादी वाडमय प्रकाराने प्रस्थापित मराठी साहित्यातल्या सर्व वाडमय प्रकारांना हादरा दिला. हा हादरा एवढा तीक्ष्ण होता, की त्याने सर्वच प्रस्थापित साहित्याला कुचकामी करून टाकले. नवे प्रश्न, नव्या जाणीवा मराठी साहित्यात अवतरू लागल्या. याच्या पाठीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा महत्वपूर्ण होती. दलित साहित्याने मराठीतील प्रचलित सौंदर्यशास्त्राची संकल्पनाच बदलून टाकलली. मराठी साहित्यातील निर्मिती प्रक्रिया, प्रयोजन, आशय-विषय, अभिव्यक्तीचे स्वरूप, साहित्याचा आकृतीबंध, प्रतीके, प्रतिमा, तत्वज्ञान, मूल्यनिष्ठा इत्यादी संकल्पना मोडीत काढून नवीन संकल्पना निर्माण करण्यास भाग पाडले. या सर्व संकल्पना बदलण्याच्या पाठीमागे आंबेडकरी तत्वज्ञान महत्वपूर्ण होते. या साहित्याच्या निर्मितीने नवे समाजभान सांस्कृतिक भान मराठी साहित्याला दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानातून आजचे दलित नाटक जन्माला आले. तत्पूर्वी मराठी नाटकात दलितांचे जीवन चित्रीत केले गेले असे नाही परंतु दलितांविषयींच्या सहानुभूतीतून ते आलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व आंदोलनाने निर्माण केलेली मानसिकता, संघर्षान्मुखता, आस्तित्व आणि जगण्याच्या हक्काची आशा, रुढी, परंपरा, धर्मदास्य, जातीव्यवस्था, शोषण व्यवस्थेविरुद्धचा विद्रोह याचे प्रतिबिंब तत्कालिन मराठी नाटकात दिसून येत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानानंतर या गोष्टी प्रकर्षाने मराठी दलित रंगभूमीने मांडल्या आहेत. दलित आत्मकथने आता केवळ मराठीतच नाही, तर अन्य भाषेतही प्रसिद्ध होत आहेत. या आत्मकथनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी जीवनमूल्य व सांस्कृतिक मूल्य निर्माण केली. त्याचे अधिष्ठान आज प्रकर्षाने जाणवते. प्र.ई. सोनकांबळे, डॉ. शरणकुमार लिंबाळे, केशव मेश्राम, किशोर शांताबाई काळे इत्यादी आत्मकथने, स्वकथने आणि आंबेडकरी स्वकथने असा बदल होत गेलेला आहे. भारतभरातील उपेक्षित, वंचित बौद्ध माणसे आत्मकथने लिहित आहेत. नवी भाषाशैली, नकार, वेदना, बांधिलकी, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या जीवनमूल्याबरोबरच वाडमयीन मूल्य घेवून ही स्वकथने नवी दिशा देत आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून दलित कथा, जीवनविषयक जाणीवा मराठी कथेतून अविष्कृत करीत आहेत. पंरपरागत देव, धर्म आणि रुढी, परंपरेला नाकारणाऱ्या नवे मूल्य स्वीकारणाऱ्या माणसांची ही भाव स्पदंने आहेत. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी विद्रोह हे मूल्य स्वीकारणारी दलित कथा निर्मा व्हायला लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे त्यांच्यात बळ निर्माण झाले. या कथेमध्ये वामन होवळ, योगिराज वाघमारे, अर्जून डांगळे, केशव मेश्राम, अमिताभ, योगेंद्र मेश्राम, दिवंगत अविनाथ डोळस, रविचंद्र हडसनकर, शरणकुमार लिंबाळे इत्यादी कथाकारांचा उल्लेख करावा लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विसाव्या शतकातील कृतीशील समाजसुधारक होत. कोणत्याही प्रकारची रक्तरंजित क्रांती न करता आपल्या बुद्धिसामर्थ्याने समाजात बदल घडवून आणणारा महान यौद्धा होय. आपल्या समाजातील शिक्षित, लेखक, कलावंतांना सम्यक विचारांचा ठेवा देवून समाजप्रबोधनाचा मार्ग दाखवला. शोषित, पीडित समाजाचे दुख जगासमोर आणण्याचे आवाहन केले. म्हणूणच परिवर्तनवादी विचार दलित कथेतून अविष्कृत झाले.

दलित कवितेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुख्य प्रेरणा आहे. त्यांच्या विचारांचा परिणाम समाजावर झाला. त्यातूनच दलित कवितेचा जन्म झाला. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यासाठीचा संघर्ष दलित कवितेतून शक्य झाला. वेदना, विद्रोहाचा जागर दालित कवितेने आपल्या कवेत घेतले. गावकुसाबाहेरील जगणे मराठी कवितेने नाकारले होते. त्याला दलित कवितने शब्दरुप देवून दलित माणसांच्या व्यथा , वेदना अविष्कृत होऊ लागल्या. नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, राजा ढाले, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, ज.वि. पवार, दया पवार, इत्यादीनी सुरु केलेली चळवळ पुढे अरुण काळे, दिपक त्रिभूवन, माधव सुरकुंटे, सुरेश साबळे, राजेंद्र गोणारकर, कैलास भाले, संजयकुमार मांजरमकर इत्यादी नव्या पीढितल्या कविंनी आपल्या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या चळवळीला पाठबळ दिले आहे.

दलित कादंबरीतूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पाठबळच दिसते. दलित-सुवर्ण संघर्ष, दुखाचे चटके, भीषण दारिद्रय, जाती पोटजातीतील हेवेदावे, खेड्यातील वातावरण, गावकुसाबाहेरचे जगणे, अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, ग्राम व्यवस्थेतील नियम, राजकारणासाठी दलितांचा वापर, विद्रोह, सूड, परिवर्तन, सम्यक क्रांती, विज्ञाननिष्ठा, आंबेडकरी चळवळ, भाषेच्या बाबतीत रुढ संकेतांना धक्के, समाजातील दुटप्पी भूमिका घेणारे नेते, आरक्षणाचा वाद अशा वेगवेगळया विषयांवर कादंबरी लेखन झालेले दिसते. यामध्ये ेबाबुराव बागुल, न.रा. शेंडे, आण्णाभाऊ साठे, केशव मेश्राम, माधव कोंडविलकर, नामदेव ढसाळ, जी. के. ऐनापूरे इत्यादी कादंबरीकारांच्या

कादंबऱ्यातून महार, मांग, चांभार, आदिवासी, देवदासी, पारधी, तमासगिर, ढोर, वेश्या, मुरळी, मसणजोगी, अनाथ इत्यादी उपेक्षित जीवनाचे चित्रण दिसते.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या चळवळीमधून मराठी साहित्यामध्ये नवीन जाणीव निर्माण केली. त्यांच्या विचारांच्या वटवृक्षाखाली अनेक विचारवंत, तत्वज्ञ आणि साहित्यिक विसावले. भारतीय समाजाला योग्य दिशा देण्यासाठी व सम्यक क्रांतीची चळवळ जीवंत ठेवण्यासाठी आंबेडकर यांच्या विचारांचा पुरस्कार केला. सामाजिक कतृत्वाची जाणीव व जीवनमूल्य सांस्कृति मूल्य याला नवी परिमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिल्यामुळेच दलित साहित्य निर्माण होऊ शकले. डॉ. बाबासाहेब
आंबेडकर आणि दलित साहित्य एकच म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ**

१. महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास - डॉ. अनिल शिंगारे, डॉ. विठ्ठल घुले
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह – य.दि. फडके
३. महाराष्ट्रातील समाजसुधारक – डॉ. सतिश ठोंबरे
४. साहित्याचे सांस्कृतिक संचित – डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ.केशव तुपे
५. दलित आत्मकथन, स्वरूप, संकल्पना व सौंदर्य – डॉ. शिवदास सिरसाट

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# आधुनिक भारताचे शिल्पकार : फुले-शाहू-आंबेडकर

**प्रा. डॉ. चव्हाण चंद्रकांत संदीपान[1] हर्षल शशिकांत शिंगे[2]**

[1]वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय सोलापूर

[2] संशोधन विद्यार्थी, इतिहास विषय, मानव विद्याशाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ .

[1]chandrakant678@gmail.com [2] harshal_shinge@yahoo.com

**प्रस्तावना :**

फ्रेंच राज्यक्रांतीमुळे सरंजामी राजवटीतील संख्येने मुठभर असणाऱ्या धर्ममार्तंड व उमरावांच्या हातातून सत्ता बहुसंख्य असणाऱ्या तिसऱ्या वर्गातील सामान्यजनांच्या हातात गेली. या ऐतिहासिक क्रांतीमुळे मध्ययुगीन सरंजामी व्यवस्थेचा अस्त होऊन स्वातंत्र्य, समता व विश्वबंधुता या तत्त्वांचा अंगीकार करणारी आधुनिक समाज व्यवस्था उदयास आली. पुढील काळात फ्रेंच राज्यक्रांती जगभरातील चळवळींकरीता मार्गदर्शक ठरली. मॉन्टेस्क्यु, व्होल्टेअर, रूसो, डेनीस डिडरोट यासारख्या विचारवंत-तत्त्ववेत्त्यांनी फ्रेंच राज्यक्रांती निर्माण होण्यास पुरक अशी वैचारिक पेरणी केली. या विचारवंतांचा प्रत्यक्ष क्रांतीमध्ये सहभाग नव्हता[1]. त्यांच्या विचारांचा प्रभाव संपूर्ण क्रांतीवर उमटलेला दिसतो.

फ्रेंच राज्यक्रांतीपूर्व फ्रान्स प्रमाणेच भारतामध्ये संख्येने मुठभर असणाऱ्या सरंजामी ब्राम्हणी जातीवादी वर्गाच्या हातात सत्ता एकवटलेली होती. ही सत्ता जातीव्यवस्थेवरती पोषीत आणि स्थिरावलेली होती. भारतीय संदर्भात आधुनिकतेकडे जाणाऱ्या मार्गात जातीव्यवस्था अडथळा होती. त्याला सुरूंग लावून उध्वस्त केल्याशिवाय पर्यायच नव्हता. याकरिता अचुक मार्ग् शोधून फुले-शाहू-आंबेडकरांनी ब्राम्हणी वर्चस्व आणि त्यांनी पोसलेली जातीव्यवस्था यावरती थेट हल्ला केला. यासाठी यांनी केवळ वैचारिक सिद्धांत मांडला नाही. या विचारांवर आधारीत लोकशाही तत्वांच्या चौकटीत राहून प्रत्यक्षात मोठी जन चळवळ उभी करून त्याचे नेतृत्त्व केले. अशा व्यापक कार्याची तुलना जर फ्रेंच क्रांतीतील विचारवंतांच्या योगदानाशी केल्यास, फुले-शाहु-आंबेडकरांनी केलेले कार्य अधिक कठीण, आव्हानात्मक आणि संघर्षमय होते असे दिसते.

भारतातील मुख्य प्रवाह ब्राम्हण्यवादी प्रस्थापित, राज्यमान्य विचारवंत आणि इतिहासकारांच्या लेखणीतून फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे वर्णन दलितांची, दलितांच्या उद्धाराकरिताची चळवळ असेच आढळते. चळवळीच्या नेतृत्त्वाचे वर्णन दलित नेतृत्व, दलित उद्धारक अशा खुज्या आणि सिमित संज्ञाचा वापर केलेला आहे. प्रस्तुत अभ्यासामध्ये या चळवळीचा भारतातील बहुसंख्य असणाऱ्या निच मानल्या गेलेल्या व जातीव्यवस्थेला बळी पडून मुख्य प्रवाहाच्या बाहेर फेकल्या गेलेल्या सर्वांच्या हक्कांसाठी लढण्याकरीता निर्माण झालेली चळवळ या दृष्टिकोनातून त्याचा विचार करण्यात आलेला आहे. भारतास या चळवळीने आधुनिकतेकडे नेणाऱ्या कोणत्या बाबी आहेत हे जाणून घेण्याचा उद्देश्य आहे. हे करत असतांना चळवळीच्या वैचारीक योगदानावर भर देण्यात आलेला आहे.

**भारताचा राष्ट्रीय प्रश्न :**

धर्मशास्त्रांच्या अनुषंगाने भारतीय समाज, ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चातुर्वर्ण्य व्यवस्थेत विभागलेला आहे. धर्म आणि शिक्षण या मक्तेदारीमुळे ब्राम्हणास सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झाले आहे. राजसत्ता क्षत्रियांच्या हाती, आर्थिक सत्ता वैश्यांच्या हाती आहे. शुद्र, अतिशुद्र आणि अस्पृश्य हे वरील तीनही वर्णाचे सेवक आहेत. संख्येने हा वर्ग बहुसंख्य आहे तरी जातीवाद व अंधश्रद्धेच्या गुलामगिरीत अडकल्यामुळे या वर्गाला सत्तेत स्थान नाही. मनुष्य

म्हणूनही या वर्गास मुलभूत अधिकार प्राप्त नाहीत. जात ही जन्मजात असते, त्यामुळे पेशापण जातनिहाय जन्मजातच असतो. जातीव्यवस्थेमुळे लोकांचे भवितव्य त्यांच्या कौशल्य आणि कर्तृत्त्वावरून ठरत नाही तर ते प्रत्येकाच्या जातीने ठरते. या व्यवस्थेत गुणवत्तेपेक्षा जातीला अधिक महत्त्व प्राप्त आहे. अशी गुणवत्ता नाकारणारी व्यवस्था सदृढ आणि प्रगतीशील राहू शकत नाही. परिणामी ही व्यवस्था समग्र समाज आणि देशाच्या हितामध्ये अडथळा ठरते. ही व्यवस्था अल्पसंख्य सवर्णांच्या हितासाठी देशाची प्रगती अडवणारी ठरते. विषमता, अमानुषता, अन्याय आणि भेद निर्माण करणाऱ्या जातीसंस्थेचा अंत केल्याशिवाय या देशात स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधूभाव या तत्त्वांवर समाज निर्मिती करणे हाच खरा भारताचा राष्ट्रीय प्रश्न आहे[2]. फुले-शाहू-आंबेडकर यांनी भारताला आधुनिक राष्ट्र बनविण्याच्या दृष्टिने नेमका हाच निष्कर्ष काढला आणि आपली संपूर्ण शक्ती हे साध्य करण्याच्या कामी लावली.

**फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ आणि स्त्री मुक्ती :**

बोले तैसा चाले हे वाक्य या नेतृत्त्वांनी आपल्या केलेल्या कृतीतून सिद्ध केले. समाजात 50% असणाऱ्या स्त्रीयांची भूमिका चूल आणि मूल इथपर्यंतच मर्यादित होती. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शिकते, हे सर्वप्रथम ओळखून म. फुलेंनी सावित्रीबाईंना शिकविले. त्यांच्या मदतीने अस्पृश्य व मुलींकरीता शाळा काढली. हे आधुनिक भारताच्या इतिहासातील क्रांतीकारक पाऊल म. फुलेंनी उचलल्यामुळे प्रथम महिला शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंचा गौरव होतो. म. फुले यांनी विधवा विवाहास उत्तेजन दिले. भ्रुण हत्त्या रोखण्यासाठी सवर्णातील विधवा स्त्रीयांना होणाऱ्या अपत्यांसाठी आश्रम चालू केले. केशवफण विरूद्ध मुंबई येथे पहिला न्हाव्यांचा संप घडवून आणला. छ. शाहू महाराजांनी बाल विवाहावर कायद्याने बंदी आणली. आंतरजातीय विवाह कायदेशीर करणारा कायदा आणला. देवदासी प्रथा बंद करण्यासाठी कायदा केला[3]. हिंदु कोड बीलाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांना कौटूंबिक संपत्तीमध्ये समान हक्क बहाल केले. आज ते टप्याटप्याने लागू केले जात आहे. देशाची अर्धी लोकसंख्या स्त्रीयांची असून स्त्री ही पुरूषांच्या बरोबरीची आहे हे त्यांनी ओळखले. देशाच्या 50% लोकसंख्येस त्यांच्या न्याय हक्कांपासून वंचित ठेवणे हे कोणत्याही नैतिकतेत न बसणारे आहे. या स्त्रीयांना समान संधी देणे हे देशाला आधुनिकतेकडे नेणारे आहे.

**फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ आणि लोकशाही मुल्ये** :

आधुनिक भारतात म. फुले हे जातीअंताची चळवळ निर्माण करणारे आद्यप्रवर्तक आहेत[4]. छ. शाहू महाराज व डॉ. आंबेडकरांनी चळवळ तीव्र व व्यापक केली. भारतात उदयास आलेली आणि विकसीत झालेली चातुर्वर्ण्य त्याची पुढील अवस्था जातीवाद याला पोसणारा ब्राम्हण्यवाद जगातील सर्वात जुनी शोषण व्यवस्था होती. अस्पृश्य आणि त्यांची स्थिती समजल्यास हे स्पष्ट होते. अशा जुनाट आणि हिंसक शोषण व्यवस्थेच्या विरोधात लढा उभा करायचा एकतर तो त्याहीपेक्षा हिंसक असायला हवा अथवा विवेक व प्रज्ञेच्या मार्गावर जन चळवळ उभा करणारा असावा. असा इतिहास पाहिल्यास पर्याय दिसतात. आधुनिक विचारांची पेरणी करणारी फ्रेंच राज्यक्रांती, सर्वांकरिता समान अधिकार प्राप्त करून देणारी 'बिल ऑफ राईटस्' ची अंमलबजावणी करणारी अमेरीकन राज्यक्रांती आणि कष्टकऱ्यांचे राज्यनिर्माण करणारी रशियन राज्यक्रांतीचे अवलोकन केल्यास या रक्तहिन होत्या असे म्हणता येत नाही. या राज्यक्रांत्यांच्या प्रवासादरम्यान हिंसक मार्गांचा अवलंब झाला.

या अंगाने फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीची तुलना वरील क्रांतीशी केल्यास स्पष्ट दिसते फुले ते आंबेडकर ह्या कालावधीत हिंसेचा वापर केल्याचे उदाहरण आढळत नाही. मुळात ही संपूर्ण चळवळ अहिंसक मार्गांचा पुरस्कार व अवलंब करणारी होती. या चळवळीमध्ये विवेक, तर्कसुसंगत, वास्तव संवाद, वाद-विवाद, चर्चा इत्यादी लोकशाही मार्गांचा अवलंब केलेला आहे. हिंसेतून अराजकतेचा जन्म होतो. म्हणुन या चळवळीने लोकशाही तत्त्वांची कास धरून समग्र लढा उभा केला. आधुनिकवादाचे मुल्य चळवळीने स्वीकारून देशामध्ये केवळ राजकीयच नाहीतर

सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक जीवनातही लोकशाही मुल्ये रूजवण्याचे काम केले. हे देशाला आधुनिकतेकडे घेऊन जाणारे काम ठरते.

**जातीअंताचा लढा, शिक्षणाचे लोकशाहीकरण :**

जातीव्यवस्थेला मुळातून उपटून काढण्याच्या दृष्टिने त्याच्या मूळ सिद्धांताला धक्का देणे गरजेचे असल्याने फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीने सर्वप्रथम ब्राम्हणी वर्चस्वाला धक्का दिला. धर्मव्यवस्था आणि ज्ञानव्यवस्था हेच ब्राम्हणी वर्चस्वाचे मूळ होते. चळवळीने या दोन शक्तीकेंद्राचे लोकशाहीकरण करण्याच्या उद्देशाने संस्थात्मक कार्य केले. भारतातील अस्पृश्यांची पहिली शाळा म. फुले यांनी 1948 साली पुण्यात सुरू करून याची मुहूर्तमेढ रोवली[5]. तसेच मुलींची शाळा सुरू केली. छ. शाहू महाराजांनी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली राजाराम कॉलेज, शेतकऱ्यांच्या बौद्धिक विकासाकरिता एडवर्ड ॲग्रीकल्चरल इन्स्टीट्यूटची स्थापना करून अनेक संस्थांना आर्थिक मदत करून समाज जागृतीचे कार्य केले. जातीव्यवस्था नष्ट व्हावी या करीत जो वर्ग शिक्षण प्रवाहात आला नाही त्याला या प्रवाहात आणण्याकरीता वस्तीगृहांची निर्मिती केली[6].

डॉ. आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून हे कार्य अधिक व्यापक बनविले. भारतातील बहुसंख्य असणाऱ्या शुद्र, अतिशुद्र, अस्पृश्य आणि स्त्रीवर्गास ब्राम्हणी व्यवस्थेने शिक्षणाचा अधिकार नाकारला त्यांना अशिक्षित, अज्ञानी ठेवून त्यांच्यावर मानसिक गुलामगीरी लादली. अविद्या हीच सर्व वंचितांच्या दु:खाचे मुळ कारण आहे हे जाणून शिक्षणाची दारे सर्वांकरिता उघडून प्रज्ञावंत समाज घडविण्याचे कार्य या चळवळीने केले. हे आधुनिकतेकडे नेणारे कार्य आहे.

**शोषण विरोधी विपूल साहित्य निर्मिती :**

सर्वसाक्ष जगद्पती त्याला नकोच मध्यस्थी[7]. या भुमिकेतून ब्राम्हणी धर्मपीठावरील वर्चस्वाला हादरा देण्यात आला. ब्राम्हण्यवादाचा पर्दाफाश करण्यासाठी विपूल साहित्याची निर्मिती करण्यात आली. जातीवाद व त्यावर पोसणाऱ्या ब्राम्हण्यवादावर मुळातच घाला घालण्यात आला. तृतीय रत्न, ब्राम्हणांचे कसब यामध्ये भट कसे अशिक्षित शुद्रांचे शोषण करतात दाखवून दिले. सत्सार या ग्रंथात म. फुलेंनी भारतीय इतिहास हा ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर यांच्यातील संघर्ष आहे असे प्रतिपादन केले[8]. डॉ. आंबेडकरांनी या सिद्धांताला पुढे नेले. क्रांती-प्रतिक्रांती, रिडल्स इन हिंदूइझम, कास्ट्स इन इंडिया, देअर मेकॅनिझम, जेनेसिस ॲन्ड डेव्हलपमेंट, शुद्र पुर्वी कोण होते, अस्पृश्य पुर्वी कोण होते आणि ते अस्पृश्य कसे झाले इत्यादी ग्रंथात या विषयासंबंधी विचारांची मांडणी केली. जातीअंताच्या लढ्यासाठी जे साहित्य निर्माण करण्यात आले आहे यामध्ये ग्रंथ, वृत्तपत्र, पोवाडे, जलसे इत्यादी प्रकार आहेत. या दिशादर्शक विपूल साहित्यातून देशाला आधुनिकतेकडे नेण्याचे सामर्थ्य आहे.

या चळवळीमध्ये हे साहित्य निर्मिती करण्याचे धाडस नेतृत्त्वाने केले. त्यांनी विवेक, तर्क, प्रज्ञा या तत्त्वांवर ठेवलेल्या विश्वासामुळे आज हेच साहित्य खऱ्या अर्थाने नेतृत्वहीन चळवळीला योग्य मार्गाने नेण्यास मदत करीत आहे. जागतिक स्तरावर उपेक्षितांचे साहित्य सर्वप्रथम निर्माण करणारा म्हणून इटालीयन मार्क्सवादी विचारवंत, 'कल्चरल हेजिमोनी' ची संकल्पना निर्माण करणारा एन्टोनिओ फ्रान्सेस्के ग्राम्सीची ओळख आहे[9]. याच्यापेक्षाही अगोदर म. फुलेंनी हे कार्य भारतात केले आहे. आधुनिकतेचे हे लक्षण आहे. अन्यायाची, अज्ञानाची चादर पांघरून दिवसरात्र बिनघोर निद्रिस्त असणाऱ्या मानव समूहास खडबडून जागे करण्याचे, त्यांच्यात स्वत:च्या हक्कांसाठी निडरपणे लढा निर्माण करण्याची चेतना निर्माण करण्याचे कठीण व धोरणात्मक कार्य या साहित्यातून होत आहे. देशात जागरूक प्रज्ञावंतांची फळी निर्माण होत आहे. मानवमुक्तीच्या लढ्याचे साहित्य देशास आधुनिकतेकडे नेणारे आहे.

**संस्थात्मक आणि संघटनात्मक स्वतंत्र राजकारणास सुरूवात :**

म. फुल्यांनी या कामी सर्वप्रथम पाऊल उचलले. ब्राम्हणी व्यवस्थेला पर्याय निर्माण करण्याच्या कामी त्यांनी संघटनात्मक व संस्थात्मक कार्य करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. छ. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यास राजाश्रय दिला. राज्यपुरस्कृत 'अफरमेटीव ॲक्शन' चे धोरण अवलंबले. त्याअंतर्गत सवर्णांची मक्तेदारी संपवणारे वंचितांना शासकीय सेवेत 50% आरक्षण लागू केले[10]. आधुनिक भारताच्या इतिहासातील ते प्रथम राज्यकर्ते होते. महसूली कामातील अनुवंशीक सवर्ण नोकर वर्गास काढून त्या जागा गुणवत्तेच्या आधारावर भरती करण्याचे कार्य केले. डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारीणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष व शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. या राजकीय संस्थांच्या माध्यमातून भारतातील वंचितांच्या हक्कासाठी स्वतंत्र राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली. कष्टकरी, शेतकरी आणि कामगारांचे प्रश्न, स्त्रीया व मुलांचे प्रश्न यांना हाताळून न्याय व हक्क मिळवण्याचा स्वतंत्र लढा उभा केला. या सर्व लढ्याचे प्रतिबिंब डॉ. आंबेडकरांनी निर्माण केलेल्या राज्यघटनेत उमटलेले स्पष्टपणे दिसते. आज आधुनिक जगातील विषमता, विविधता आणि परस्पर विरोधी परिस्थितीतून मार्गक्रमण करणाऱ्या राष्ट्रांना चळवळीचे संघटनात्मक कार्य आणि त्याची फलनिष्पत्ती असणारी भारतीय राज्यघटना दिशा दाखविण्याचे अमुल्य कार्य करत आहे. भारताला आधुनिकतेकडे नेणारे हे संघटनात्मक कार्य आहे.

**भावनांवर आधारित राजकारणास नकार :**

जिथे विवेक, तर्क, प्रज्ञा यावर आधारीत चळवळ असते तिथे भावनावर आधारीत राजकारणास स्थान नाही. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ उपेक्षितांच्या, दारिद्र्यात अडकलेल्यांची असली तरी त्यात भावनांवर आरूढ होऊन आक्रस्ताळेपणाचे राजकारण दिसत नाही. वैचारिकदृष्ट्या हे प्रगल्भतेचे राजकारण देशाला आधुनिकतेकडे घेऊन जाणारे आहे.

**फुले-शाहू-आंबेडकर एक पुरोगामी चळवळ :**

फुले-शाहू-आंबेडकर यांनी तत्कालीन प्रतिगामी विचारांच्या विरूद्ध संघर्ष करून आपली बाजू सत्यपणे मांडली. हंटर कमीशन समोर म. फुल्यांनी देशात मोफत व सक्तीचे शिक्षणाची मागणी केली. शिक्षणाच्या लोकशाहीकरणामध्ये शासनाची भूमिका काय हे निश्चित केले. सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय चळवळीस महत्व देणारे द्वंद्व म. फुले व विष्णूशास्त्री चिपळूणकर, छ. शाहू व लो. टिळक आणि गोलमेज परिषदे दरम्यान उघड झालेला म. गांधी प्रणित काँग्रेस व डॉ. आंबेडकर यांच्यातील वादातून हे स्पष्ट होते. या मुख्य प्रवाहातील सवर्ण प्रणित राजकीय चळवळीने जातीवाद हा राष्ट्रीय प्रश्न आहे असे मानलेच नाही. त्यामुळे त्यांच्याकडून तिच्या अंताकरीता ठोस धोरण व कृतीआराखडा कधी निर्माण झालेले दिसत नाही. यादृष्टिने फुले-शाहू-आंबेडकर चळवळ खऱ्या अर्थाने पुरोगामी स्वरूपाची होती ती देशास आधुनिकतेकडे नेणारी आहे व राहणारच हे स्प्ष्ट दिसून येते.

**निष्कर्ष :**

आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये फुले-शाहू-आंबेडकर यांचे मानव हिताचे कार्य अतिशय महत्वपूर्ण आहे. दिनदुबळया, पद-दलित, वंचित, शोषित, पीडीत समूहापासून ते सवर्ण वर्गातील सर्व घटकांच्या हिताचे कार्य करणारे कृतीशील विचारवंत, मार्गदर्शक व मुक्तीदाते, फुले-शाहू-आंबेडकर हेच भारताचे नव्हे तर आधुनिक जगाचे खरे शिल्पकार आहेत.

**संदर्भ :**

1. Thomson David, Europe since Napoleon, Penguin Books, 1966, Great Britain Pg. 15.
2. जनता, दि. 11 जुलै, 1936.
3. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ २०१६, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, पान 1207-1222.

4. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, 2006, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र राज्य, पान 147.
5. कित्ता, पान 155.
6. कित्ता, पान 198.
7. महात्मा फुले साहित्य आणि चळवळ, 2006, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र राज्य, पान 198.
8. महात्मा फुले समग्र वाङमय, 2006, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पान 357-396.
9. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ २०१६, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, पान ५९.
10. Antonio Gramsci, Subaltern Social Groups: A Critical Edition of Prison Notebook 25 – edited and translated by Joseph A. Buttigieg and Marcus E. Green, Columbia University Press, 2021. https://progressivegeographies.com/2021/07/28/antonio-gramsci-subaltern-social-groups-a-critical-edition-of-prison-notebook-25-columbia-university-press-2021/.
11. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ २०१६, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, पान 1077.

# महात्मा फुले यांचे सामाजिक वशैक्षणिक क्षेत्रातील कार्य

**प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड**
समाजशास्त्र विभागप्रमुख, शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :**

महात्मा जोतीबा फुले यांनी आपले व्यक्तिमत्व स्वयंप्रेरणेने आणि आपल्या स्वत:च्या प्रयत्नांनी घडविले होते. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतिकारकाचा होता. महाराष्ट्राच्या समाजसेवेसाठी ध्येयाने भारावून जाऊन सर्व जीवन समर्पित करणारे ते थोर पुरुष होते. आधुनिक भारतातले पहिले समाजक्रांतिकारक म्हणजे महात्मा फुले होत. कारण ते सामान्यांतील असले तरी विचाराने व कतृत्वाने असामान्य होते. सामाजिक विषमतेविरुध्द महात्मा फुलेंनी बंड पुकारले. समतेसाठी त्यांनी शुद्रातिशूद्रांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. महात्मा फुले हे बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी अविरत झगडणारे ते खरे सुधारक होते. महात्मा फुलेंनी केलेल्या सामाजिक कार्यातून महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाला त्यांनी वेगळी दिशा दाखविली. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उध्दारासाठी ते चंदनासारखे झिजले, त्यांना अनेकांनी विरोध केला, त्यावेळी फुलेंनी हाल अपेष्टा सहन केले. परंतु आपल्या ध्येयापासून जोतीबा फुले कधीच विचलित झाले नाहीत.

महात्मा फुले यांनी भारतीय समाजाला फार जवळून अभ्यासले. त्यामुळे त्यांना भारतीय समाजातील विषमता लक्षात आली. या विषमतेचे निर्मूलन करण्यासाठी, बहुजन समाजाला अन्यायकारी व्यवस्थेतून मुक्ती मिळविण्यासाठी सामाजिक—सांस्कृतिक क्रांती अटळ होती. ही क्रांती महात्मा फुले यांच्या क्रांतीदर्शी तत्वज्ञानाने उभी राहिली. बहुजनांच्या शोषण मुक्तीसाठी महात्मा फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. महात्मा फुले यांनी केलेल्याकार्यामुळे बहुजन समाजात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात परिवर्तन झाले. भारतीय स्त्रियांना शोषण मुक्त करण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रियांना शिक्षण देण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आले. यामुळे समाजात सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाची सुरूवात झाली. यामुळे नंतरच्या काळात बहुजन समाजात क्रांतीकारी परिवर्तन झालेले दिसून येतात. परंतु अजूनही काही घटक संपूर्णपणे विकसित झालेले दिसून येत नाही. यासाठी पुन्हा महात्मा फुलेंच्या कार्याचा जागर होणे गरजेचे असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्यांचा अभ्यास करणे.
२. महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

या शोध निबंधात संशोधन विषय निश्चित करून त्या विषयावर कारणमीमांसा केली जाणार आहे. सबंधीत शोध निबंधात वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून दुय्यम साधनांचा वापर केला जाणार आहे.

**महात्मा फुले यांचे सामाजिक कार्य :**

ब्रिटिशांच्या राजवटीत भारतीय समाजातील बहुजनांचे झालेले शोषण, सामाजिक विषमता, सांस्कतिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात कोणत्याच प्रकारची संधी उरलेली नव्हती. प्रस्थापित समाजातून बहुजनांचे होणारे शोषण हे ब्रिटिश राजवटीपासून चालत आलेले होते. भारतीय सनातन व्यवस्थेने आणि मूल्यव्यवस्थेने कमालीची विषमता निर्माण केली होती. जात, वर्ण यांच्या आधाराने भेद निर्माण केले. त्यालाही धर्म जोडला गेला. जात, वर्ण हे धर्मने निर्माण केले असल्याचे भासवत भेदनीतीचा अवलंब केला. त्यामुळे शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या जीवनाचे अवकाश संपले, हे सर्व महात्मा फुले यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी समग्र बहुजनांच्या परिवर्तनासाठी सामाजिक सुधारणा चळवळीच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्यासाठी मूलगामी चिंतन मांडले आणि चळवळीला क्रांतीसाठी समाजलक्ष्यी बनवले. महात्मा फुले यांना चातुर्वर्ण्य, विषमता आणि ब्राम्हणांचे जन्मजात श्रेष्ठत्व मान्य नव्हते. स्त्री—पुरूष व संपूर्ण मानवजात समान आहे अशी त्यांची धारणा होती. परंतु नेमके हेच ब्राम्हण लोकांना मान्य नव्हते. म्हणूनच महात्मा फुले यांनी चातुर्वर्ण्य आणि सामाजिक विषमतेविरूध्द केलेले सर्वंकष बंड सर्वार्थाने ऐतिहासिक आणि महत्वाचे ठरते. परंतु महात्मा फुले हे ब्राम्हणांच्या विरूध्द नव्हते, तर ते ब्राम्हणांच्या ब्राम्हण्य विचारप्रवृत्तीच्या विरोधात होते. महात्मा फुले यांनी ब्राम्हणी व्यवस्थेकडून आलेल्या विचारधारेला कट्टर विरोध करून विषमतावादी, अन्यायकारी, लाचार असलेली व्यवस्थेविरूध्द बंड केले. यामुळे समग्र बहुजन समाजात बदल घडवून आणण्यासाठी फुलेंनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

महात्मा फुलेंनी समग्र बहुजन समाजाच्या उध्दारांसाठी सामाजिक कार्य केलेले आहेत. यामध्ये अनेक कार्याचा आढावा घेता येईल, ते पुढीलप्रमाणे आहेत.

**स्त्रियांची स्थिती** : १८ व्या शतकात स्त्रियांना समाजात कोणत्याही प्रकारचे स्थान नव्हते. सर्वत्र स्त्रियांचे शोषण होत होते. परंतु हे जेव्हा महात्मा फुले यांच्या लक्षात आले. बालविवाह, जरठ विवाह, असे अनेक समस्या स्त्रियांच्या होत्या. यामुळे प्रथम स्त्री मुक्तीसाठी जागृती केली. स्त्रियांना दर्जा मिळवून देण्यासाठी तसेच त्यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे व त्यांचे दु:ख निवारण्याचे कार्य केले. हे कार्य करीत असताना महात्मा फुलेंनी सर्व जातीतील स्त्रियांचा विचार केला आहे.

**विधवा विवाहाचा प्रयत्न** : समाजात बालविवाह, जरठविवाह, सतीप्रथा व केशवपन यासारख्या अनिष्ट प्रथा होत्या. या समस्येमुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत वाईट होते. स्त्रियांवर होणाऱ्या या अन्यायाविरूध्द लढा उभारून समाजात पुनर्विवाहाची प्रथा रूढझाली पाहिजे यासाठी महात्मा फुलेंनी चळवळ सुरू केली. यामुळे समाजात पुनर्विवाह करण्यास सुरूवात झालेली दिसून येते.

**बालहत्या प्रतिबंधक गृह** : बालपणीच स्त्रियांचे विवाह होत असल्यामुळे समाजात कुमारी अर्थात बालविधवांचे प्रमाण प्रचंड होते. त्यामुळे अशा विधवांचे अनैतिक संबंध निर्माण होऊन संतती जन्माला येत असे. अनैतिक संबंधातून बालविधवा गरोदर राहत असत. अशावेळी समाजापासून स्वत:ला वाचविण्यासाठी गरोदर राहिलेल्या विधवा जन्माला येणाऱ्या नवअर्भकाची हत्या करत असत. अशा या स्त्रियांची समाजात विटंबना होऊन छळ होत असे. अशा दुदैवी विधवा स्त्रियांची समाजाच्या जाचापासून सुटका करण्यासाठी महात्मा फुल्यांनी इ. स. १८६३ मध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. या बालहत्या प्रतिबंधक गृहात अशाच स्त्रियांनी अर्भकाला जन्म दिला की, ज्या स्त्रियांचे विवाह झाले नाही, परंतु त्या गरोदर होत्या. अशा महिलांनी या गृहात जन्म दिलेल्या अर्भकाचे पालनपोषणाची जबाबदारी फुले दाम्पत्यांनी घेतलेली होती.

**अनिष्ट प्रथेला विरोध** :महात्मा फुलेंच्या काळात बहुपत्नित्वाची पध्दत प्रचलीत होती. ब्राम्हण व श्रीमंत लोक ऐकापेक्षा अनेक स्त्रियांसोबत विवाह करीत असत. स्त्री व पुरूष समान असल्याने हा अन्याय आहे असे फुलेंना वाटत होते. त्यामुळे महात्मा फुलेंनी या प्रथेला कठोर विरोध करून बहुपत्नीत्व प्रथेचे समूळ निर्मूलन करण्याचे प्रयत्न केले. महात्मा फुलेंना बालविवाह हे अमान्य होते. जरठविवाह हे देखील अमान्य होते. फुलेंनी केशवपन पध्दतीस प्रखर विरोध केलेला आहे. समाजात याच शतकात सतीप्रथा प्रचलित होती. पतीच्या निधनानंतर पतीच्या चितेत उडी घेऊन जीवन सपंविण्याची प्रथा सतीप्रथा म्हणून ओळखली जाऊ लागली. अशावेळी स्त्रीवर जबरदस्ती केली जात असे. यामुळे महात्मा फुलेंना विधवा स्त्रियांवर होत असणारा हा अन्याय सहन झाला नाही. त्यांनी या प्रथेला विरोध केला. यामुळे काही काळानंतर ही प्रथा बंद झालेली दिसून येते.

**अस्पृश्यता निवारण** : महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्यातील महत्वपूर्ण कार्य म्हणजे अस्पृश्यांच्या उध्दारासाठी अस्पृश्यता निवारण करण्याकरीता केलेले सामाजिक परिवर्तनाचे कार्य महत्वाचे आहे. महात्मा फुलेंनी अस्पृश्यांना आपल्या वाडयातील पाण्याने भरलेला हौद इ. स. १८६८ मध्ये पाणी भरण्यासाठी खुला केला. तसेच त्यांनी इ. स. १८७३ मध्ये अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा काढला. त्यामुळेच पुढे भारत सरकारला अस्पृश्यता ही कायद्याने नष्ट करता आली.

**गुलामगिरीचे उच्चाटन** :

समाजात जाती व्यवस्था होती आणि या व्यवस्थेत उच्चवर्णीय लोक खालच्या बहुजन समाजाला गुलामगिरीत वागवित होते. महात्मा फुले यांनी लिहिलेल्या गुलामगिरी या ग्रंथात ते म्हणतात, स्वत:च्या स्वार्थासाठी ब्राम्हण लोकांनी जातीव्यवस्था निर्माण केली आणि आपल्यासाठी सुखसोयी व सवलती करून ठेवल्या. तसेच शूद्र आणि अतिशूद्रातील लोकांना गुलामगिरीच्या खाईत लोटून दिले, परंतु महात्मा फुलेंनी ब्राम्हण लोकांचे हे सर्व ढोंग सर्वप्रथम चव्हाटयावर आणले आणि शुद्र व अतिशूद्रांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांना शिक्षण देऊन जागृत केले. त्यामुळे या वर्गातील लोक सज्ञानी झाले. परिणामी ते गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करू लागले. महात्मा फुलेंनी विविध माध्यमातून समाज परिवर्तनासाठी सतत प्रयत्न करीत होते. यामुळे बहुजन समाजात ज्या काही अनिष्ट प्रथा व विषमता होती, कमी झालेली होती.महात्मा फुलेंनी दलित समाजाच्या उध्दारासाठी पारंपारिक समाजातील विषमतेविरूध्द लढा उभारून दलित समाजात परिवर्तन घडवून अणण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा फुलेंनी दलित समाजाचा पाण्याचा प्रश्न असेल, शिक्षणाचा प्रश्न असेल, पौढ शिक्षण असेल, दलित समाजासाठी स्वतंत्र शाळा असेल असे विविध कार्य महात्मा फुलेंनी दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले दिसून येतात. म. फुलेंनी तळागाळातील बहुजन समाजामध्ये असलेल्या व्यसनमुक्तीसाठी प्रबोधन करून समाजातील लोकांना व्यसनापासून मुक्ती मिळविण्यासाठी प्रयत्न केले. म. फुलेंनी बहुजन समाजातील निरक्षर असलेल्या लोकांना अंधश्रध्देपासून परावृत करण्यासाठी जाणीव जागृती केली. फुलेंनी समग्र समाजात असलेली अंधश्रध्दा लक्षात घेवून त्या लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन देण्याचे प्रयत्न केले. यामुळे हळूहळू समाजातील अनिष्ट प्रथा व अंधश्रध्दा सारख्या समस्येतून मुक्त मिळविण्यासाठी फुलेंनी फार मोठे योगदान दिले होते.

महात्मा फुलेंनी सामाजिक परिवर्तनातून जे कोणत्याही व्यक्तीला करणे शक्य नव्हते, ते त्यांनी करुन दाखविले. या करीता त्यांनी संघटनात्मक प्रयत्न करुन समता, स्वातंत्र्य, बंधुता या कार्यासाठी प्रयत्न केले. फुलेंनी यासाठीच सत्यशोधक समाजाची स्थापना केली. म. फुलेंनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा मानवता, बुध्दिप्रामाण्य व व्यक्तिस्वातंत्र्य या प्रमुख तत्वावर आधारित होता. म्हणून फुले असे म्हणतात की, सर्व मानव ही एकाच निर्मिकाची लेकरे असून त्या सर्वांना ईश्वरनिर्मित नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपभोग घेण्याचा समान अधिकार आहे. समाजातील प्रत्येक उपेक्षित माणसाला त्यांच्या विकासाची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात समानता असली पाहिजे, कोणत्याही ठिकाणी मक्तेदारी नसली पहिजे, अशा प्रकारची समाज व्यवस्था असणे गरजेचे आहे. यासाठीच फुलेंनी सामाजिक कार्याच्या माध्यमातून प्रयत्न केले होते.महात्मा फुलेंनी बहुजन समाजातील विविध जातीतील लोकांच्या उध्दारासाठी आपले आयुष्य समर्पित केलेले दिसून येते. कारण की, महात्मा फुलेंनी सावित्रीबाई फुलेंच्या समवेत समाजातील अनिष्ट प्रथेविरुध्द जाणीव जागृती निर्माण करुन ज्या काही कुप्रथा होत्या त्याचे उच्चाटन करण्याचे अनमोल कार्य केले. समाजातील तळागाळातील वंचित घटकाला शोषण व विषमतेपासून मुक्त करण्यासाठी सामाजिक चळवळ असेल, प्रस्थापितांच्या विरुध्द संघर्ष असेल, बंड केलेले असेल अशा अनेक माध्यमातून त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केलेले होते. परंतु आजच्या समाजव्यवस्थेचे चित्र बदललेले दिसून येतात.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य :**

महात्मा फुले यांनी आपल्या शिक्षण कार्याची सुरुवात इ.स. १८४८ मध्ये शूद्रातिशूद्रांसाठी मुलींची पहिली शाळा पुणे शहरात स्थापन करून केली. महात्मा फुल्यांच्या चिंतनशिल मनाने शिक्षणप्रसाराच्या कार्याला आरंभ करताना तो कोठे करावा हे नेमके हेरले. ज्यांच्या जीवनात शेकडो वर्षात अज्ञानाचा प्रचंड पाषाणवत पहाड निर्माण झाला होता; तो दलित, बहुजन समाज व स्त्रिया हेच राष्ट्र परिवर्तनाचे मुख्य संख्याबळ आहे याची अचूक जाणीव जोतीरावांना झाली. म्हणून अज्ञानाविरुध्दचा पहिला सुरुंग त्यांनी या क्षेत्रातच पेरलेला दिसून येतो.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' यासारख्या सुभाषितांनी गौरविल्या जाणाऱ्या भारतीय स्त्राची इंग्रजांचे राज्य स्थिर होण्यापूर्वी अशी स्थिती होती. म्हणूनच जोतीरावांनी आपल्या शैक्षणिक कार्याचा प्रारंभ स्त्री व दलित वर्गापासून केला. यातच त्यांची ध्येय्यावरील निष्ठा, विचारांची झेप व समाजसेवेसाठी झिजण्याची तयारी दिसून येते. फुलेंनी स्त्री शिक्षणाचा ध्यास घेवून स्त्रियांना चूल आणि मूल यामधून बाहेर काढून शिक्षणाचे प्रवेशद्वार उघडले. खऱ्या शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या जोतीरावांनी केवळ शाळा काढून समाधान मानले नाही. शिक्षणाचे प्रतिबिंब शिक्षण घेतलेल्याच्या दैनंदिन जीवनात पडले पाहिजे, शिक्षणाने जीवन अधिक समृध्द केले पाहिजे, दृष्टी व्यापक झाली पाहिजे, ज्ञानाची कदर केली पाहिजे, अशी अपेक्षा आपण शिक्षणापासून करीत असतो. जोतीरावांनी केलेल्या प्रदिर्घ प्रयत्नानंतर समाजव्यवस्थेत बदल होताना दिसून आलेले होते. समाजातील काही लोक शिक्षण घेण्यास पुढे येताना दिसून आले. महात्मा फुले यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळत असलेले दिसते. पिढयानपिढया उपेक्षितांच्या शिक्षणासाठी जोतीरावांनी जणू काही संघर्षच चेतविला होता. तुकारामांसारख्या थोर संताला ज्या भूमीमध्ये 'मी हीन जातीचा आहे,' असा उदगार काढावा लागला होता, त्याच भूमीत आज सावित्रीबाई व जोतीराव या कुणबी माळयाच्या घरातील तरुण मंडळीचा त्यांच्या कार्यामुळे लौकिक वाढत होता. खरे तर हे त्यांच्या कार्यामुळे त्यांना समाजात मिळालेला बहूमान होता.

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल सहानुभूती बाळगणारी काही मोजकी इंग्रज अधिकारी व सुधारक मंडळी होती; तरी परिस्थितीत फार मोठा बदल घडून आला होता असे म्हणता येणार नाही. कारण शूद्रातिशूद्रांच्या व स्त्रियांच्या शिक्षणाला जसा येथील परंपरावाद्यांनी ठामपणाने नकार दिला होता, तसाच प्रकार इंग्रज सरकार व इंग्रज अधिकारी यांच्याकडून घडत होता. जोतीरावांच्या काळात काही सुधारणावादी विचारवंत हिंदुस्थानात वेगवेगळया ठिकाणी मुलींच्या शाळा चालविण्याचा प्रयत्न करीत होते. तरीही कनिष्ठ वर्गातील मुलामुलींच्या शिक्षणाकडे आवश्यक तेवढे लक्ष सरकार देत नाही, याबदल काही जागृत वृत्तपत्रांतून नाराजी व्यक्त करण्यात आले. महात्मा फुलेंनी केलेल्या कार्यातून शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र असे बदल झाले. फुलेंच्या शैक्षणिक कार्यातील परिवर्तनामुळे दिनदलितांना शिक्षण मिळण्यास सुरुवात झालेली होती. शिक्षण ही जर एक असामान्य शक्ती आहे असे मानले तर या शिक्षणाने सर्वप्रकारच्या बंधनांतून मानवाची मुक्तता केली पाहिजे. ही बंधने धर्मसत्तेने, अर्थसामर्थ्याने, राज्यसत्तेने लादलेली असली तरी त्यांना तोडून टाकण्याची ताकद बंधनात अडकलेल्या स्त्री–पुरुषांना शिक्षणाने दिली पाहिजे. शिक्षणाची फलश्रृती सर्व प्रकारच्या समतेच्या आणि मानवी स्वातंत्र्य आणि हक्कांच्या लढयांची सिध्दता करण्यात आलेली आहे. अशा व्यापक उद्दिष्टांची महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याला बैठक होती. फुलेंनी बहुजन समाज, अस्पृष्य समाज, स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्यात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी कठोर परिश्रम घेतेलेले दिसून येते.

**निष्कर्ष :**

महात्मा फुलेंनी केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यावर अभ्यास करताना हे लक्षात घेतले पाहिजे. विविध स्तरावरील शिक्षणासंबंधी एक वैशिष्टयपूर्ण भूमिका महात्मा फुले वठवीत होते. आजच्या एखाद्या शिक्षण चालकाप्रमाणे किंवा शिक्षणतज्ज्ञाप्रमाणे केवळ चार भिंतीच्या आतील शिक्षणाने प्रश्न सुटतील यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्यामुळेच त्यांनी शिक्षणाबरोबरच धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याने झंझावात निर्माण केला. येथील धर्मव्यवस्थेची कठोर तपासणी करून जोतीरावांनी मानवतावाद हा आपला जीवनध्यास मानला. यावरून हे लक्षात येते की महात्मा फुलेंचे संपूर्ण कार्य हे मानवी कल्याणासाठीच होते, असेच म्हणावे लागेल. कारण की, सामाजिक विषमतेची गुलामगिरी आणि शिक्षणापासून वंचित असलेली समाज व्यवस्था यावर प्रखरपणे संघर्ष करून समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. यामध्ये महात्मा फुले यांच्या कार्याला विशेष महत्व प्राप्त झाले, कारण की, अनेक वंचित असलेल्या घटकाला परिवर्तनाची संधी मिळाली आणि त्यामुळे त्यांच्यात बदल ही झाला. म्हणून असे म्हणावे लागेल की, महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने बोलके सुधारक नव्हते, तर कर्ते समाजसुधारक होते.

**संदर्भ :**

१. कोंडेकर, भद्रे, शेटोडे (२०११), आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
२. ठोंबरे तानाजी (२००६), महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, लोकवाङमय गृह, मुंबई.
३. साळुंखे आ. ह. (२०१९), महात्मा फुले आणि शिक्षण, लोकायत प्रकाशन, सातारा.
४. लुलेकर प्रल्हाद (२०१९), बहुजन संस्कृतीचे जनक महात्मा जोतीराव फुले, अक्षरवाङमय प्रकाशन, पुणे.
५. कठारे अनिल (२०११),आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
६. गेल ऑम्व्हेट (२००९),जोतीबा फुले आणि स्त्री:मुक्तीचा विचार, लोकवाङमय गृह, मुंबई.
७. साळुंखे आ. ह. (२००९), महात्मा फुले आणि धर्म, लोकवाङमय गृह, मुंबई.
८. गाठाळ एस.एस. (२०१४), महाराष्ट्रातील समाजसुधारक:विचारधारा व कार्य, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद
९. भिडे जी.एल., पाटील एन.डी. (१९९७), महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# शाहू, फुले, आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**प्रा. जगताप शालन धर्मराज**
कर्मवीर मामासाहेब जगदाळे, महाविद्यालय, वाशी
jagtapshalan@gmail.com

**प्रस्तावना**

शिक्षणाच्या कार्यातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे महात्मा फुले, शाहू महाराज आणि आंबेडकर यांचे विचार प्रचारीत व प्रसारीत होत असतात. या तीनही महापुरुषांचे राजकीय, सामाजिक आणि सांस्क`तिक विचार आपल्याला सतत प्रेरित आणि प्रोत्साहीत करीत असतात. समाजाला शोषणमुक्त करण्यासाठी आणि त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी शिक्षणामध्ये दुसरे प्रभावी साधन नाही. शाहू, फुले, आंबेडकर यांच्यामते, शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा मुलमंत्र आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला सुशिक्षीत करुन त्याला शोषणमुक्त करता येईल, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

**उद्यीष्टे**

१½ महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
२½ राजर्षी शाहू यांच्या शैक्षणिक कार्य आणि विचारांचा सवीस्तर अभ्यास करणे.
३½ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंध हा द्वितीय साधनसामुग्रीवर आधारित आहे. यासाठी विविध मासिके, ग्रंथ दैनिक वर्तमानपत्र यांचा अभ्यास केला आहे.

**महात्मा ज्योतीराव फुले यांचे शैक्षणिक विचार**

बहुजन समाजाचे महाराष्ट्रातील पहिले उध्दारक महात्मा फुले यांनी आपल्या शेतकरयांचा आसुड या ग्रथांत विदयाहीन, दरिद्री व अज्ञानी बहुजण समाजाच्या हीन & दीन अवस्थेची मोजक्याच शब्दात मिमांसा केलेली होती. ते म्हणाले होते की,

"विदयेविना मती गेली ।
मतीविना नीती गेली ।।
नीतीविना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।।
वित्तविना शुद्र खचले ।
इतके सारे अनर्थ एका अविदयेने केले" ।।

देशातील ९७ टक्के समाज सामाजिक, गुलामगिरीची, दारिद्रिय, अज्ञान व अंधश्रध्दा यांच्या गर्तेत पडला होता. त्यांच्या या अवस्थेचे मुळ कारण एकच होते ते म्हणजे 'अविदया'. शिक्षणाचा अभाव या शिक्षणाच्या अभावामुळे शुद्रातिशुद्रांचा समाज शेकडो वर्षे विदयाहीन, धनहीन व सत्ताहीन राहीला होता. या अवस्थेत ब्राम्हण वर्गाच्याहाती विदयेची मक्तेदारी होती. परिणामी समाजात तोच वर्ग विदयासंपन्न, धनसंपन्न आणि सत्तासंपन्न होवून राहीला होता.

महात्मा ज्योतीराव फुले हे अन्यायी व्यवस्थेच्या, विरोधात उभे राहणारे पहिले क`तिशील नेते होते. त्यांनी देशातील शुद्रातिशुद्रांच्या वतीने १८८२ साली त्यांच्या मुलांबाळांसाठी हंटर कमीशन समोर सक्तीचे व मोफत शिक्षणाची मागणी केली. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन गोष्टींवर भरवसा ठेवणारे सामाजिक विषमतेवर आवाज उठविणारे महात्मा फुले हे महानपुरुष होते. फुलेंनी शिक्षणविषयक विचारांमध्ये स्त्रीशिक्षणाचा पाठपुरावा केला. कारण पुर्वीच्या काळामध्ये स्त्रीयांना शिक्षणासाठी पाठविले जात नव्हते. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमच उघडली जावी म्हणून त्यांनी स्त्रीशिक्षण ही मोहीम हाती घेतली. स्त्रीयांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून फुलेंनी प्रथम आपल्या घरापासून म्हणजे आपल्या पत्नीस शिक्षण देवून आदय शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्याचबरोबर त्रिभाषा सुत्राचा अवलंब त्यांनी ७७ वर्षापुर्वी केला होता. जनसामान्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा त्यासाठी खेडयापाडयातील जनतेला शिक्षण घेता

यावे म्हणून वस्तीग`हाची व्यवस्था करण्याची कल्पना महात्मा फुले यांनी मांडली. महात्मा फुले यांनी शिक्षणावर अधिक भर टाकला आणि शिक्षण हे कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता सर्वांना मिळावे. शिक्षणाचा प्रसार होवून ज्ञान व विचारांची व`ध्दी व्हावी यासाठी महात्मा फुले यांनी खुप मोठे योगदान दिले.

**राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार**

शाहू महाराजांना बालपणापासून लाभलेली संस्काराची शिदोरी विलक्षण प्रेरणादायी होती. न्याय, समता, बंधुभाव, नितीमत्ता, मानवता आणि सर्वधर्म समभाव ही कोणत्याही राजाला शोभेल अशी नीतिमुल्यांची शिदोरी राजर्षींना लाभलेली होती. त्यामुळे आपल्या संस्थानाचा कारभार करताना प्रेम, दया आणि शांतता यांच्या बळावर सारा समाज सुखी संपन्न आणि समर्थ कसा होईल याकडे महाराजांचे लक्ष होते. विशेषत% शिक्षणाच्या माध्यमातून समाजसुधारणा घडवून आणता येते या विचाराने राजर्षींनी सार्वत्रिक मोफत आणि अनिवार्य प्राथमिक शिक्षण प्रसारावर अधिक भर दिला. त्यांनी अज्ञान, अंधश्रध्दा आणि अनारोग्याने ग्रासलेल्या समाजाला सज्ञानी करण्यासाठी हाती बंडाचे निशान घेतले.

प्राथमिक शिक्षणापासून ते लोकशिक्षणापर्यंत राजर्षींच्या शिक्षणविषयक विचारांचे सुत्र हे मानव मंगलतेचे होते. याद`ष्टीने शाहू महाराजांना सर्व समाजाचे जीवन सर्व अंगानी फुलविण्यासाठी शिक्षण हे किती बलवान साधन आहे, हे पटवून दयायचे होते. शेतकरी कामगारांना स्वजीवनाच्या अंतीम धोरणाची विशाल क्षितीजे दाखवून दयावयाची होती. 'विदयेवीना मनुष्याचे जीवन पशुसारखे असते' हे त्यांनी सर्वांना पटवून सांगितले. तसेच शाहू महाराजांनी सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. जेव्हा सारे जगर पहिल्या महायुध्दाच्या उंबरठयावर उभा होते तेव्हा राजर्षी शाहुंनी 'गाव तेथे शाळा' या घोषणेबरोबर स्थापनेचा सपाटा सुरु केला. कारण राजर्षी शाहू महाराजांना सामान्य जनतेला शिक्षणदान करावयाचे होते. त्यांचे जीवनमान उंच पातळीवर न्यायचे होते. शिक्षणातून समानतेच्या एकाच भुमीवर आणायचे होते. धर्मभाबळेपणाला आणि स्थितीलशिलतेला झटकून सा.या समाजास गतिशील बनवायचे होते. राजर्षी शाहू महाराज लोकशिक्षणाचे प्रणेते होते. म्हणून जनमनात ज्ञानलालसा रुजविण्याचा प्रत्येक मार्गाने त्यांनी प्रयत्न सुरु केला होता. त्यांनी शिक्षण संस्थानाची निर्मीती, विदयार्थ्यांसाठी वस्तीग`हाची सोय, तसेच शिष्यव`त्या, पारितोषीके देणे, हे सर्व शैक्षणिक कार्य महाराजांनी केले. जनतेला शिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यांच्या मते, जोपर्यंत सर्वसाधारण जनता सुशिक्षीत होत नाही, तोपर्यंत राज्यांची प्रगती होणार नाही, असा शाहू महाराजांचा द`ढ निश्चय होता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षिणक विचार**

थोर राष्ट्रनेते भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, समस्त दलीत पतीथांचे मुक्तीदाते, आणि अस्प`श्यदवाराच्या कार्यातील राजर्षी शाहू महाराजांचे सहकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वंचित समाजाचे तारणहार असलेल्या आंबेडकर यांचा शिक्षणविषयक द`ष्टिकोन खुप प्रगल्भ आणि आधुनिक होता. ते स्वत% प्रतिकुल परिस्थितीतही खुप शिकले आणि शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, याचा जणू त्यांनी आदर्श घालून दिला. ज्ञानाअभावी व्यक्ती आणि समाजाचे नुकसान होते. तसेच एखादया समुहाला वा व्यक्तीला शिक्षण नाकारणे म्हणजे माणुस म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारुन त्यांच्या क्षमता मारुन टाकणे होय. अशी डॉ. आंबेडकर यांची धारणा होती. त्यांना उच्च शिक्षणादवारे समता, स्वातंत्र, बंधुभाव ही मानवी मुल्य स्वीकारलेला एक स्वाभिमानी आधुनिक समाज निर्माण करावयाचा होता. त्यांच्या शैक्षणिक चळवळींचा हाच खरा मुलाधार होता.

शिक्षण हाच जीवनाच्या प्रगतीचा मार्ग आहे, हे जाणून विदयार्थ्यांनी भरपुर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे, असे डॉ. आंबेडकर म्हणायचे. शिक्षणाचा पायाभूत विचार करताना ज्यांना शिक्षणाचे महत्व कळत नाही त्यांच्यासाठी सक्तीचा कायदा असावा, असे वाटत होते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. शिक्षणाने मानसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. यासाठी आंबेडकर यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघीनीचे दुध आहे'' तो जो पितो तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे ते समाज बांधवांना सांगत. तसेच 'प्राथमिक शिक्षण' हे सर्व शिक्षणाचा पाया आहे म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, विदयार्थी एकदा शाळेत दाखल झााले की, तो पुर्णपणे सुशिक्षीत, माहितीपुर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावा. आंबेडकरांच्या मते, समाजाच्या सर्व स्तरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौध्दिकद`ष्टया सशक्त होते. व्यक्तीला चांगला वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञाशिल आणि करुना हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादीत केली. शाळेमध्ये मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये. तर मुलांची मने सुसंस्क`त आणि गुणवत्तापुर्ण

बनवावीत. समाजाच्या हितासाठी या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजीक बांधीलकीची कर्तव्य योग्य व समर्थपणे पार पाडावीत अशा प्रकारचे शिक्षण असावे, असे आंबेडकर म्हणायचे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तीमत्व अनेकविध पैलूंनी व्यापलेले आहे. आपल्या व्यापक चिंतनातून त्यांनी समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विधीशास्त्र, धर्मशास्त्र, इतिहास या विषयांमध्ये मोठयाप्रमाणात तर्कशुध्द मांडणी केलेली आहे. भारतीय शिक्षणाच्या परिप्रेक्षात आंबेडकर यांनी शिक्षणशास्त्रात, मानवतावादी मुल्यवर्धीतकरण्यासाठी खुप मेहनत घेतली आहे. विदयार्थी, संशोधक, शिक्षक, प्राचार्य आणि शिक्षण संस्थेचे निर्माते असा आलेख त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात राहीला आहे. शिक्षणाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी त्यांनी "शिका, संघटित व्हा", संघर्ष करा हा महत्वाचा संदेश दिला. भारतातील बहुजण वर्ग अज्ञानात व गुलामगिरीत जगत होता. शिक्षणामुळे माणुस जाग`त होतो व त्याला त्याच्या हक्क व अधिकाराची जाणीव होते. त्यामुळे शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे त्यांचे मत होते. शिक्षण हा सर्वांचा अधिकार आहे. भारतीय राज्यघटनेत तसा कायदा केला. हजारो वर्षाची शैक्षणिक मक्तेदारी मोडून काढली. शिक्षणावर व्यक्तीची योग्यता ठरते. जातीवर नाही. हा विचार त्यांनी भारतीय समाजव्यवस्थेत रुजविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रचलित शिक्षण विषयक सिध्दांताचा प्रत्यक्ष जीवनाशी सहसंबंध जोडला. प्रचलीत सिध्दांतात काही बदल सुचविले. नवा शैक्षणिक सिध्दांत मांडला. संपुर्ण मानवजातीला शिक्षणाची गरज, महत्व व उपयुक्तता पटवून दिली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणविषयक द`ष्टिकोन सत्याशी भिडणारा आणि शाश्वत स्वरुपाचा होता. कार्यवाद, आदर्शवाद आणि निसर्गवाद या तीन सिध्दांताचा विचार केल्यास आंबेडकर यांनी या सिध्दांताच्या पलीकडे जावून सिध्दांत मांडला. आणि भारतीय शिक्षणप्रणालीत नवसिध्दांताची मांडणी केली. प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेत स्त्री & पुरुष असा भेद होता. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकरण्यात आला होता. डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षणविषयी द`ष्टिकोनाचे महत्वाचे दोन पैलु म्हणजे, शिक्षणासाठी स्त्री & पुरुष असा भेद असता कामा नये. आणि सर्वांना समान शिक्षण मिळाले पाहिजे. शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले पाहिजे. त्यांनी प्रचलित शिक्षणविषयक सिध्दांतात काही बदल सुचविले. नवा शैक्षणिक सिध्दांत मांडला संपुर्ण जातीला शिक्षणाची गरज, महत्व व उपयुक्तता पटवून दिली, अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार होते.

**समारोप**

महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाच्या तसेच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणविषय विचार मांडून समाजपरिवर्तन केले. फुले, शाहू आंबेडकर या त्रयींचा शिक्षण हक्काच्या लढयांची मोठी परंपरा आपल्या भारतात आहे. यांचा नामोल्लेख केल्याशिवाय महाराष्ट्रातील समाजकारण, राजकारण आणि शैक्षणिक धोरण पुर्ण होत नाही. समाजासाठी त्यांच्या शैक्षणिक सुधारणेसाठी त्यांनी आपले जीवन वाहून दिले आणि आपल्या अधिकारासाठी आपण लढले पाहिजे, सर्वांनी शिक्षण घेतले पाहिजे, हा सर्वांचा मानस होता.

**संदर्भ**

१½ राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,& डॉ. जयसिंगराव पवार.

२½ राजर्षी शाहू छत्रपती, जीवन व शिक्षण कार्य & प्राचार्य रा.तु.भगत, सिध्दराज प्रकाशन पुणे.

३½ https://mr.m.wikipedia.org.

४½ देशदुत Blog शिक्षणप्रेमी डॉ. आंबेडकर

# भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार

**वैभव रघुनाथ घाडगे**
इतिहास,संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :-**

भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकाराचा समावेश करण्यात आला तरी असला याची मागणी ब्रिटिशांच्या काळापासून होत आली आहे. 1928 साली सर्वप्रथम सर्वपक्षीय संमेलनात मूलभूत हक्कांची मागणी केली होती. नेहरु समितीनेही आपल्या रिपोर्टमध्ये मूलभूत हक्काची मागणी केली होती. 1931 मध्ये कॉंग्रेसने एका ठारावाद्वारे कॉंग्रेस मूलभूत हक्काचा समावेश असणारी घटना स्वीकारील असे मान्य् केले होते.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :-**

1) भारतीय संविधानातील मूलभूत हक्काविषयी संकल्पना स्पष्ट् करणे.

2) भारतीय संविधानातील मूलभूत हक्काचे कार्यक्षेत्र व त्याचे महत्व् जाणून घेणे.

**गृहितके :-**

1) भारतीय संविधानातील मूलभूत हक्कामुळे सामाजिक समता निर्माण झाली.

2) भारतीय संविधानातील मूलभूत हक्कामुळे समाजातील भेदभाव कमी करण्यास मदत होते.

**समतेचा अधिकार :-**

राज्य् कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्यांपुढे समान सरंक्षण नाकारणार नाही.

(2) राज्य् केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन कोणताही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही. (2) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन कोणताही नागरिक

क) दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने प्रवेश, अथवा

ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरता समर्पित अशा विहिरी, तलाव,, स्नान घाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर , याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व्, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही. (3) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**स्वातंत्र्याचा अधिकार :-**

**(2)** सर्व नागरिकांस,

क) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा,

ख) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा,

ग) अधिसंघ वा संघ बनवण्याचा,

घ) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुत्कपणे संचार करण्याचा,

ड) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा ,

**धर्मस्वातंत्र्याचा अधिकार :-**

(2) सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता व आरोग्य् यांच्या व या भागातील अन्य् उपबंधाच्या अधितेने सदसद विवेकबुध्दीच्या स्वातंत्र्याला आणि धर्म मुत्कपणे प्रतिष्ठापीत करण्याचा, आचरण्याच्या व त्याच प्रकारे करण्याच्या अधिकाराला सर्व व्यक्ती सारख्याच हक्कदार आहेत.

**शोषणाविरुध्द् अधिकार :-**

**(2)** माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारखा अन्य् स्वरुपातील **वेद** यांना मनाई करण्यात आली आहे आणि उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यक्तीक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.(2) सार्वजनिक प्रयोजनांकरता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही. व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन राज्य् कोणताही भेदभाव करणार नाही. चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास कोणत्याही कारखान्यात वा खाणित काम करण्यासाठी नोकरीस ठेवले जाणार नाही अथवा अन्य् कोणत्याही धोक्याच्या कामावर त्याची योजना केली जाणार नाही.

**सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार :-**

(2) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वत:ची विभिन्न् भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.

(2) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य् मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरुन प्रवेश नाकारला जाणार नाही.(9) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्याक असलेल्या सर्व समाजांना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

**निष्कर्ष् :-**

1. मूलभूत हक्कावर नागरिकांवर दावा करता यावा म्हणून त्यांना घटनेत स्थान देण्यात आले आहे.
2. कोणत्याही प्रकारच्या सत्तेवर मूलभूत हक्कांचे बंधन असावे म्हणून मूलभूत हक्कांना घटनेत सामावून घेतले आहे.

**संदर्भ सूची :-**

1) प्रा. व्ही. वी. पाटील (2009), 'मानवीहक्क्', के सागर पब्लिकेशन्स् पुणे- 411011
2) डॉ. राजशेखर सोलापुरे , मानवी हक्क् आणि समाज, अरुणा प्रकाशन लातूर 2014 पृ.क्र. 15
3) भारताचे संविधान , शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4) स्मिता जोशी, मानवी हक्क् व जबाबदाऱ्या , गणराज पब्लिकेशन, पुणे 2014

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ.रामकृष्ण ज्योतीबा प्रधान**
मराठी विभाग जयभवानी शि.प्र.मंहळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा.
ता.पाटोदा.जि.बीड.

प्रचंड बुध्दीमत्ता समाजासाठी आसीम त्याग करणारे, दलित समाजाला हक्क मिळवून देणारे,महाडचा सत्याग्रह, मनस्मृतीचे दहन,मंदिर सत्याग्रह, शेतक-याचा कैवारी,गोलमेज परिषद पुणे करार, स्वतंत्र. मजुर पक्ष,बहिष्कृत हितकारीणी सभेची स्थापना,दलित शिक्षण संस्थेची स्थापना,महिलासाठी कार्य, स्वंतत्र लढयात सहभाग अशा कितीतरी गोष्टी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या शिक्षणासाठी समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. शिका,संघटित व्हा, आणि संघर्ष करा असा गुरु मंत्र दिला अशा महामानावाचे शैक्षणिक विचार प्रस्तुत शोध निंबधातून मांडण्यात आले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे उच्चविद्याविभूषि शिक्षणतज्ञ होते, '' शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे जो ते प्राशन करेल तो वाघासारखा गुरगुरल्या शिवाय राहणार नाही '' असे शिक्षणाचे महत्व एका वाक्यात सांगितले आहे प्राचिन हिंदू समाजातील जातीच्या नियमानुसार कनिष्ठ जातीना शिक्षणाचा अधिकार होता त्यामुळे कनिष्ठ जातीची स्थिती जवळपास गुलामासारखीच झाली होती. शिक्षणामुळे कनिष्ठ जातीची स्थिती सुधारेल असा विचार करुन आंबेडकरांनी शैक्षणिक कामे केली.

डॉ.आंबेडकरांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करुन समाजाला जे शिक्षणाचे दान दिले ते जेवढे क्रांतीकारी आहे तेवढेच मागासवर्गियांच्या शिक्षणासंदर्भात बाबासाहेबांनी जे चितंन केले तेही तितकेच मुलगामी स्वरुपाचे आहे आंबेडकर म्हणतात '' सरकार ही एक जबरदस्त महत्वाची संस्था आहे. सरकार ज्याप्रमाणात मनात आणेल त्याचप्रमाणे सर्व घडून येईल. पण आपण हे विसरता कामा नये की सरकार कोणत्या गोष्टी घडवून आणेल. हे सरकारचे नौकरावर सर्वस्वी अवलंबून राहील. कारण, सरकारचे मत म्हणजे सरकारच्या नोकरांचे मत आपल्याला आपल्या हिताचे असे काही करवून घ्यायचे असेल, तर सरकारी नोकरीत आपला प्रवेश आपण करुन घेतला पाहिजे. नाहीतर आपली जरी हेळसांड होत आहे तशीच ती नेहमीच होणार आहे.ती न व्हावी हा जर आपला हेतू असेल, तर अस्पृश्य वर्गाच्या लोकांनी सरकारी नोकरीत आपला जास्त प्रमाणात शिरकाव होईल अशी व्यवस्था करावयास पाहिजे वास्तव बहिकृत लोकांनी प्राथमिक शिक्षणाचे दुर्लक्ष न करता उच्च शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे एक मुलगा बी.ए. झाल्याने आपल्या समाजास जो फायदा होईल तसा एक हजार मुले चौथी शिकली तरी होणार नाही.'' या ठिकाणी सरकार धोरणानुसार शिक्षणापध्दती आस्तीत्वत येते तर शिक्षणातून नौकरी साधता येते नौकरीतून आत्मभान जाग्रत होते तसेच याठिकाणी उच्च शिक्षणाचे महत्व ते आपणास सांगतात.

शिक्षणाविषयी ते म्हणतात '' सामान्य माणसाला शिक्षण सुलभ होईल अशी व्यवस्था केली पाहिजे. खालच्या वर्गाना उच्च शिक्षण ही फार खर्चाची बाब होता कामा नये. दुसरी गोष्ट अशी की, खालच्या वर्गाला वरच्या पातळीवर आणण्यासाठी त्यांना सवलती दिल्या पाहिजेत. पाच आणि दहा या संस्थान दोहोंनी गुणले तर गुणाकार दहा नि वीस होईल म्हणून पाचाला दोहोनी गुणून दहाला दहाने गुणले पाहिजे म्हणजे खालच्या वर्गाला भरपूर सवलती देवून त्यांना वरच्या वर्गाच्या पातळीवर आणले पाहिजे असे करणे म्हणजेच समता ''

या विचारातून त्याचे समतेचे युग कशा प्रकारे होते हे दिसून येते.

'' शिक्षण ही पवित्र संस्था आहे शाळेत मने सुसंस्कृत होतात शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र ते एक राष्ट्रीयतेचे, मानवतेच नि अज्ञान दूर करण्याचे उदात्त कार्य आहे. शाळेत समबुध्दीचे उदात्त, नि:पक्षपाती थोर मनाचे शिक्षक पाहिजेत शिक्षक वर्ग हा राष्ट्राचा सारथी आहे. कारण त्याच्या हाती शिक्षणाच्या नाडया असतात. वास्तव शिक्षक कोण असावा यासारखा, समाज सुधारनेच्या दृष्टीने पाहता दुसरा प्रश्न महत्वाचा नाही. ब्राम्हण खालच्या वर्गातील लोकांच्या तिरस्कार करतात. त्याच्या

बौध्दिक उत्कर्षाविषयी बेफिकीर असतात. त्यांना जनावरापेक्षा ते कमी लेखतात त्यांच्या कानी कपाळी सदैव ओरडताता की, शिकणे हे तुमचे काम नाही. तुमचे काम मोलमजूरी करणे शिक्षण हे ब्राम्हणंनीच करावे, म्हणून ब्राम्हणाच्या हाती शिक्षणाची सुत्रे देण्यात येवू नयेत 'अशा प्रकारचा विचार मांडतात तरुणांनी राजकीय पुढा-यांच्या मागे न फिरता आगोदर शिक्षण घेतले पाहिजे शिक्षण घेवून शहाणे झाल्यावर स्वतःचा मार्ग निवडावा ते म्हणतात. " विद्यार्थ्यांनी लायकी वाढविण्याचे कार्य करीत असताना राजकारणात भाग घेवू नये. वावलंबनाचा मार्गचोखाळावा. आपल्या आयुष्यात आपण पुढे आल्याशिवाय राहणार नाही असा निश्चय करुन तुम्ही व्यवहारी जगात उतरलात तरच काही यश मिळेल."

" माझे सर्व आयुष्य विद्यार्थी म्हणून जावे अशी माझी इच्छा होती ज्ञानाची भूक लागाव म्हणून मी पोटाची भूक मारुन अनेक ग्रंथ खरेदी केले. एखादी प्राध्यापकाची नोकरी पत्करुन ग्रंथ वाचणात सुखाने काळ कंठावा अशी माझी पहिली इच्छा होती परंतु सुदैवाने म्हणा अगर दुर्दैवाने म्हणा मला अस्पृश्यांच्या चळवळीत पडावे लागले. ना पैसा ना माणूस ना बुध्दीमत्ता अशी या समाजाची परिस्थिती आता या समाजाचे काम करणे मोठे कठीण आहे." आज देखील राजकारणी पुढा-यांच्या मागे युवकांचा लोंढा मोठया प्रमाणात जय जय करीत फिरताना दिसतो डॉ.आंबेडकरांनी काळाची पावले तेव्हाच ओळखली होती तरुण भरकटत जाउ शकतो म्हणून ते स्वतःचे उदाहरण देतात मी उत्तम नौकरी करुन आंनदत जीवन जगू शकलो असतो परंतु माझा समाजासाठी शिक्षणाचा फायदा कसा करता येईल याचा विचार करुन स्वतः ला अलेल्या संकटाचे विश्लेषन देखील त्यांनी युवकांना केले आहे.

" शिक्षण हे दुधारी शस्त्र असल्यामुळे चालविण्यास धोक्याचे असते चारित्रहीन आणि विनयहीन सुशिक्षीत माणूस हा पशुपेक्षा भयंकर असतो जर सुशिक्षीत मनुष्याचे शिक्षण गरीब जनतेच्या हितास विरोधी असेल तर तो समाजाला शाप ठरतो. अशा सुशिक्षितांचा धिक्कार असो. शिक्षणापेक्षा चारित्र अधिक महत्वाचे तरुणांची धर्मविरोधी प्रवृत्ती पाहून मला दुःख होते काही लोक म्हणतात धर्म ही अफुची गोळी आहे परंतु ते खरे नाही. माझा ठायी जे चांगले गुण वसत आहेत ते किंवा माझा शिक्षणामुळे समाजाचे जे काही हित झाले असेल ते माझा ठायी असलेल्या धार्मिक भावनेमुळेच होय. मला धर्म हवा आहे. धर्माच्या नावाने चाललेला ढोंगीपणा नको. " या ठिकाणी धर्मशिक्षणातून ढोंगीपणा बाजूला सारुन जे चांगले आहे ते स्विकारणे महत्वाचे आहे असे त्यांना वाटते. अमरावती येथे सुलोचना डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली दलीत वर्गाच्या स्त्रीयांच्या परिषदेत बोलताना ते म्हणतात " तुमच्या प्रगतीविषयी मला समाधान नि खात्री वाटते. स्वच्छ राहवयास शिका. दुर्गूनापासून दुर राहा. मुलांना शिक्षण दया. त्यांच्या मनामध्ये महत्वाकांक्षा जागृत करा तुम्ही जगात मोठेपणा मिळवू शकाल असे विचार त्यांच्या मनवर बिंबवा त्यांच्या मनातून न्यूनत्वाची भावना काढून टाका. लग्न करण्यास घाई करु नका. "

डॉ.आंबेडकरांनी या ठिकाणी समाजातील मनावर बिंबवनाच्या गोष्टींच्या उल्लेख करतात कारण त्यांना खात्री वाटते की म्हणून ते समाजाला संदेश देतात ते पुढे म्हणतात - " पुरुषाप्रमाणेच स्त्रियांनी ज्ञान मिळवावे व आपल्या आर्थिक उन्नती करुन घ्यावी अशी बृध्दाने स्त्रियांना मोकळीक दिली भारतीय स्त्रियांना स्वतंत्र आणि प्रतिष्ठा देणारे ती एक मोठी क्रांती होती " भारतीय स्त्रियांच्या अवनतीला आणि नाशाला जर कोणी कारण झाला असेल तर तो मनू होय. बुध्द नव्हे पुढे असे म्हणतात , " विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील शिक्षणाची पुनर्घटना करावी. आधुनिक जगातील गरजा पुरविणारे ते शिक्षण असले पाहिजे. विद्यापीठ हे ज्ञानाचे केंद्र असले पाहिजे. कारकून करण्याचे नव्हे" या त्यांच्या विचारातून आज विद्यापीठाचे काय निमार्ण करत आहेत यावर देखील प्रकाश पडताना दिसतो.

**निष्कर्ष** : १. स्वातंत्र, समता,बंधुता,धर्मनिरपेक्षता,अखंडता न्याय या गोष्टी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाच्या विचारातून दिसून येतात.

२.शिक्षण ही ख-या अर्थाने जीवनाच्या प्रगती करता महत्वाची बाब आहे.

३.स्त्री-पुरुष समता हे गुण डॉ.आंबेडकराच्या विचारातून जाणवतात.

४.शैक्षणिक विकास करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

५.सामाजिक व राष्ट्रीय एकात्मकता वाढीस लागते.

६. विद्यार्थ्यामध्ये सामाजिक, नैतिक मूल्ये चारित्रसंवर्धन करता येते. शैक्षणिक विचाराने लोकशाही बळकट करता येते.

**समारोप :**

बाबासाहेबांना उच्च शिक्षणाचे व्दारे समता,स्वातंत्र बंधुभाव हि मानवी मूल्ये स्वीकारलेला एक स्वाभीमानी आधुनिक समाज निर्माण करावयाचा होता. बाबासाहेबांच्या शैक्षणिक चळवळीचा हाच खरा मूलाधार होता. शिक्षण हा जीवनाचा प्रगतीचा मार्ग आहे. हे जाणून विद्यार्थ्यानी भरभूर अभ्यास करावा आणि समाजाचे विश्वासू नेते बनावे असे त्यांना वाटत होते. केवळ बाराखडया शिकविणे म्हणजे शिक्षण नव्हे तर मुलांची मने सुसंस्कृत करणारे दर्जेदार शिक्षणही शाळांनी दिले पाहिजे इतका सुक्ष्म विचार बाबासाहेबांनी प्राथमिक शिक्षणाबाबत केलेला आहे.

**संदर्भग्रंथ :**

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक आणि आर्थिक विचार - प्रा.गौतम
2. निकम,लोक साहित्य,प्रकाशन, औरंगबाद.
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकर - धनंजय किर
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विद्यार्थ्याना उपदेश, मार्गदर्शन व शिक्षण विषयक विचार -भाउ लोखंडे
5. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर - शंकर क-हाडे.
6. डॉ.आंबेडकर जीवन दर्शन- संपादन किशोर मकवाना.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. आंबेडकरोत्तर दलित नेतृत्वाच्या राजकीय व्यवहाराची चिकित्सा

**प्रा. डॉ. कीर्तिकर वाल्मीक भीमराव**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर

**गोषवारा :**

19 वे आणि 20 वे शतक हे राष्ट्रीय तसेच वैश्विक स्तरावर प्रबोधनाचे म्हणून ओळखले जाते या प्रबोधनाच्या माध्यमातून अनेक ठिकाणी सामाजिक, राजकीय, आर्थिक गुलामगिरीच्या विरोधात अनेक चळवळी झाल्या त्याच प्रमाणे भारतातही सामाजिक चळवळीच्या सुधारणांनी मोठ्या प्रमाणात वेग घेतला त्यातूनच वि. रा. शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, राजश्री शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड इत्यादी समाजसुधारकांनी सामाजिक समता प्रस्थापित व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. त्यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात उच्च शिक्षण घेऊन परत आल्यावर येथील सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होण्यासाठी दलित-बहुजन व अस्पृश्य समाजाला न्याय मिळावा या दृष्टिकोनातून त्यांनी आपले सामाजिक, राजकीय, आर्थिक विचार मांडले आहेत. त्यांच्या नेतृत्वाचा परिणाम म्हणून भारतातील दलित, बहुजन समाज आज सर्वच क्षेत्रावर अग्रेसर असलेला दिसून येतो परंतु आंबेडकरोत्तर दलित नेतृत्व डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय चींतनाप्रमाणे राजकीय व्यवहार करताना दिसून येत नाही सदरच्या संशोधन लेखात त्यासंबंधीचे चिकित्सा केली आहे.

**उद्दिष्टे :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय चिंतन समजून घेणे.
2. डॉ. आंबेडकरोत्तर दलित नेतृत्वाच्या राजकीय व्यवहाराची चिकित्सा करणे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय चिंतन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय चिंतन समजून घेण्यासाठी त्यांचे असलेले राजकीय विचार, त्यांना अभिप्रेत असलेले राजकीय सत्तेचे महत्त्व, डॉ. आंबेडकरांना अपेक्षित असलेली राजकीय व्यवस्था, लोकशाहीविषयक विचार, आर्थिक व सामाजिक विकासाबाबतचे त्यांचे चिंतन, लोकशाहीतील विरोधी पक्षाची भूमिका, कल्याणकारी राज्याच्या भूमिकेसाठी त्यांची असलेली आग्रही भूमिका, उदारमतवादी लोकशाहीविषयक विचार, राज्यघटना आणि एकंदरीतच भारताच्या विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी केलेले चिंतन या सर्व पैलूंचा अभ्यास केल्याशिवाय त्यांचे राजकीय चिंतन समजून घेणे शक्य नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय सत्तेला समाज परिवर्तनाचे साधन मानतात परंतु भारतासारख्या जातिव्यवस्था असलेल्या देशात शेवटच्या घटकापर्यंत राजकीय सत्ता जाणार नाही याची त्यांना जाणीव होती म्हणून भारतातील राजकीय सत्तेची न्याय व समान वाटप होणे हे गरजेचे आहे. त्यामुळे भारतातील वेगवेगळया प्रकारच्या सामाजिक, राजकीय ताकद असलेल्या शक्ती या दलित, बहुजन व अस्पृश्य समाजाला सत्तेचा वाटा मिळू देणार नाही त्यामुळे आधुनिक काळात राजकीय सत्ता ही सामाजिक विकासातील विषमतेचे केंद्रस्थान ठरू नये असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत होते. त्यामुळेच सत्तेच्या समतोल वाटपात बहुसंख्य हिंदूंच्या सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी व दलितांमध्ये आपल्या हिताच्या रक्षणाच्या दृष्टीने समान वाटा मिळावा यासाठी त्यांनी राजकीय क्षेत्रात राखीव जागा मिळाल्या पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी आपले राजकीय विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांनी पुणे करारात यासंदर्भात सविस्तर वेगळेपणाची भूमिका मांडली आहे.

**स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाची कार्यप्रणाली व राजकीय व्यवहार :**

स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्व आणि प्रस्थापित राजकीय पक्षाची केलेल्या तडजोडीचे राजकारण हेच खऱ्या अर्थाने आंबेडकरोत्तर दलित नेतृत्वाची मर्यादा ठरेल. तसेच डॉ. आंबेडकर यांच्या नंतर दलित चळवळीचे नेतृत्व करणारे वेगवेगळे राजकीय नेते यांनी एकसंघ राहण्याऐवजी विविध गटात विभाजित राहून सामाजिक राजकीय व आर्थिक विकासासाठी इतर पक्ष संघटना सोबत कशा प्रकारचा व्यवहार केला आहे याविषयी डॉ. आंबेडकरांच्या राजकीय चिंतनाची प्रतारणा केल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून सोडवल्या जात नाहीत याची खंत सर्वानाच दिसून येते. तसेच आज रिपब्लिकन पक्षात वेगवेगळे गट आपल्या राजकीय अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वेगवेगळया पक्षांसोबत आघाडी करताना दिसतात परंतु या वेगवेगळया आघाड्या केवळ राजकीय हितासाठीच आहेत. तसेच या सगळयांमुळे कोणतेही सामाजिक प्रश्न सुटलेले नाहीत तसेच कोणत्याही राजकीय पक्षाला दलितांचे प्रश्न सुटावेत असे कधीही वाटत नाही. दलितांचा मताचा आपल्याला केवळ फायदा कसा हेच प्रस्थापित राजकीय पक्ष पाहताना दिसतात. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातले राजकीय विचार प्रत्यक्ष साकार होत नाहीत.

दलित नेतृत्वाच्या राजकीय कार्यप्रणाली व राजकीय व्यवहारामुळे दलितांच्या सामाजिक हिताच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झालेले आहे. आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ आणि दलित नेतृत्व त्यांच्या व्यवहाराचा दृष्टीकोन पाहता असे दिसून येते की, राजकीय सत्ता प्राप्त करण्याच्या दृष्टीकोनातून दलित चळवळीत दलित राजकीय पक्ष दलित नेतृत्व यांना ज्या प्रमाणात राजकीय सत्ता उपभोगता आली त्याच प्रमाणात त्या सत्तेचा वापर समाजहितासाठी होऊ शकलेला नाही हे वास्तव आहे. कारण दलित राजकीय नेतृत्वाने वेळोवेळी राजकीय हितासाठी संकुचित असा दृष्टिकोन बाळगल्यामुळे प्रस्थापित राजकीय पक्षांनी त्यांना राजकीय सत्तेच्या स्वार्थापोटी आपल्याकडे वळवून घेऊन सत्तेचा काही भाग दिला परंतु त्या सत्तेचा वापर लोकांच्या हितासाठी योग्य त्या प्रमाणात करू दिला नाही व दलित राजकीय नेतृत्वाने या राजकीय सत्तेचा वापर समाजहितासाठी केलेला दिसून येत नाही. त्यामुळे दलित नेतृत्वाची राजकीय कार्यप्रणाली व राजकीय व्यवहारामुळे आज दलित-बहुजन व अस्पृश्य समाजाला मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते आहे. त्यामुळे दलित नेतृत्वाचे समाजाकडे दुर्लक्ष झाले, स्वातंत्रोत्तर महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाचा राजकीय व्यवहार सामाजिक व आर्थिक विकासाच्या मुद्द्यांऐवजी भावनिक मुद्याला महत्त्व देणारा राहिल्याचे दिसून येते, स्वातंत्र्यानंतर प्रारंभीच्या काळात आंबेडकरी चळवळीतील एन. शिवराज, दादासाहेब गायकवाड, खोब्रागडे, भैय्यासाहेब आंबेडकर यांनी निस्वार्थपणे पक्ष संघटनेच्या माध्यमातून सामाजिक हित जपण्याचा प्रयत्न केला पण रिपब्लिकन पक्षात अनेक वेळा राजकीय नेतृत्वात उभी फूट पडली त्यातूनच प्रत्येक नेता व प्रत्येक गट स्वतःच आपण बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक आहोत त्यामुळे आमचा गट व मीच राजकीय नेता आहे हे मानू लागला त्यामुळे बाबासाहेबांचे नाव हे पळणारे चलन आहे हे ओळखून प्रत्येक नेत्याने बाबासाहेबांचे नाव निळा झेंडा त्याला समोर करून अनेक आंदोलने केली पण या आंदोलनात बाबासाहेबांचे नाव व निळा झेंडा ह्याला मोठ्या प्रमाणात भावनिकेतची साद घालत. यामुळे बहुजन व दलित व अस्पृश्य समाजाच्या अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य सामाजिक मागासलेपण या प्रमुख समस्यांकडे मोठ्या प्रमाणात डोळेझाक झाली त्यामुळे दलितांचा सर्वांगीण विकास होऊ शकला नाही हे वास्तव आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील दलित पक्ष व संघटनांमध्ये सक्षम नेतृत्वाचा अभाव आणि रचनात्मक कार्याकडे दुर्लक्ष झाले आहे, डॉ. आंबेडकर यांनी सार्वजनिक कार्यास प्रारंभ करताना सामाजिक व राजकीय पक्ष यांची संघटनात्मक बांधणी प्रभावीपणे केली. संघटनेशिवाय आपण भरीव कार्य करू शकत नाही याची जाणीव बाबासाहेबांना असल्यामुळे बाबासाहेबांनी आपल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक विचाराला एक वैचारिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले आणि याच वैचारिक अधिष्ठानवर त्यांनी आपले कार्य पुढे नेले परंतु डॉ. आंबेडकर यांच्या पश्चात

त्यांच्या अनुयायांनी, स्वयंघोषित नेतृत्वांनी बाबासाहेबांच्या विचारांचे जे वैचारिक अधिष्ठान होते त्या अधिष्ठानाला आजच्या या नेतृत्वाने फाटा दिला. आहे त्यामुळे आज डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष आज गटाततटात विभागला आहे. त्यामुळे आज या प्रत्येक गटाकडे कोणतीही निश्चित धोरण, दिशा व रचनात्मक कार्याचा अभाव नसल्यामुळे दलित समाजाच्या, दलित राजकारणाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे रचनात्मक कार्य दलित पक्ष, दलित संघटना, दलित नेतृत्व करू शकले नाही हे वास्तव आहे. डॉ. आंबेडकर यांच्या राजकीय विचाराला समजून घेण्यात दलित नेतृत्व व पक्ष संघटनांना अपयश आल्यामुळे डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा अर्थ सोयीनुसार दलित नेतृत्व लावत आहे, बाबासाहेबांनी दलित समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा या भूमिकेतून राजकीय पक्ष, वेगवेगळया संघटनांची स्थापना करून संघटना वाढविण्यावर भर दिला डॉ. आंबेडकर यांच्या मते,राजकीय पक्ष वेगवेगळया संघटना या सामाजिक परिवर्तनाचे साधन आहेत त्यामुळे बाबासाहेबांनी राजकीय पक्ष-संघटना यांना एक वैचारिक अधिष्ठान ठरवून दिले. व त्या वैचारिक अधिष्ठानाच्या आधारावरच राजकीय पक्ष व संघटनांनी व्यवहार करावेत असे बाबासाहेबांना अभिप्रेत होते पण बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी त्यांची सामाजिक, राजकीय परिवर्तनाचे सिद्धांत समजून न घेता राजकीय सत्तेच्या महत्त्वाकांक्षेपोटी प्रत्येक कार्यकर्ता स्वतःचा वेगळा पक्ष गट स्थापन करू लागला व आपणच बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक आहोत या दृष्टिकोनातूनच राजकीय व्यवहारात सर्व तत्त्वाचा अर्थ लावत असल्यामुळे आज बाबासाहेबांच्या विचारांची प्रासंगिकता असतानाही राजकीय नेत्याच्या संकुचित दृष्टिकोनामुळे बाबासाहेबांचे विचार मागे पडण्यास दलित नेतृत्व व दलित राजकीय पक्ष अयशस्वी ठरल्याचे दिसून येते हे वास्तव आहे. दलित नेतृत्व आणि राजकीय सत्तेच्या लाभासाठी समाजहिता ऐवजी व्यक्तिगत हितालातच प्राधान्य दिलेले आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिक कार्यास प्रारंभ करण्यापूर्वी सामाजिक, राजकीय स्थितीचा सैद्धांतिक अभ्यास केला त्यामुळे बाबासाहेबांना भारतातील बहुजन, अस्पृश्य व दलित समाज शिक्षण, अर्थ, राजसत्ता यापासून वंचित आहे. या समाजाचा संपूर्ण विकास झालेला नाही त्यामुळे या गटाचा संपूर्ण विकास व्हावा यासाठी राजकीय सत्ता महत्त्वाची आहे त्यामुळे ती राजकीय सत्ता संपादन ही राजकीय पक्षाच्या माध्यमातून होऊ शकते म्हणून बाबासाहेबांनी "राजकीय सत्ता तुमच्या सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे" असे म्हटले होते. त्यामुळे समाज विकासाचे प्रभावी साधन म्हणून आज राजकीय सत्तेला महत्त्वाचे स्थान आहे परंतु डॉ. आंबेडकर यांच्या पश्चात त्यांच्या अनुयायांनी राजकीय सत्ता ही आपल्या स्वतःच्या विकासाचे साधन आहे याकडे लक्ष केंद्रित केल्यामुळे दलित राजकीय नेतृत्वाने राजकीय सत्तेच्या लाभापोटी समाजहिता ऐवजी व्यक्तिगत हिताला मोठ्या प्रमाणात प्राधान्य दिले आहे हे वास्तव आहे.

**निष्कर्ष :**

1. स्वातंत्र्यपूर्वकालीन महाराष्ट्राची सामाजिक व राजकीय परिस्थिती बदलण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय चिंतन उपयोगी पडलेले आहे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय चिंतन दलित नेतृत्व सर्व दलित संघटना साठी प्रेरणा दाई ठरल्याचे दिसून येते.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सत्ता संपादनाचा मार्ग हा संसदीय स्वरूपाचा असून तो मुख्यतः दलितांच्या राजकीय क्षेत्रातील राखीव जागांची जोडला गेलेला आहे.
4. राजकीय सत्ता संपादन करण्यासाठी बाबासाहेबांना दलित आदिवासी व इतर मागासवर्गीयांची व्यापक एकजूट व्हावी असे वाटते पण अद्यापही ते त्यांचे अनुयायी या विचारांच्या संदर्भात आजपर्यंत यशस्वी होऊ शकलेले नाही.

5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय चिंतनाचा आधार घेऊन प्रस्थापित झालेल्या राजकीय नेतृत्वाचा प्रत्यक्षात व्यवहार करताना कृती आणि युक्ती यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येते.
6. महाराष्ट्रात जातीअस्मितेच्या राजकारणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय तत्वज्ञानाला राजकीय नेतृत्व बगल देतांना दिसून येते.
7. महाराष्ट्रातील दलित नेतृत्वाच्या राजकीय भूमिकांमुळे, राजकीय व्यवहारामुळे महाराष्ट्रातील दलित समाजाच्या सर्वांगीण विकासाची संकल्पना मोठ्या प्रमाणात मागे पडली आहे.
8. महाराष्ट्रातील आंबेडकरोत्तर नेतृत्व व पक्ष यांचा राजकीय भूमिका नेहमीच संदिग्ध स्वरूपाची राहताना दिसून येते.
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सत्ता संपादनाचा दृष्टिकोन अभ्यासता बहुजनांच्या सामाजिक-राजकीय विकासासाठी सत्तासंपादन महत्त्वाचे आहे असे जनतेस वाटत असले तरी सुद्धा सत्ता संपादनाच्या शर्यतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांची समकालीन राजकीय नेतृत्वाने मोठ्या प्रमाणात फारकत केली आहे.
10. महाराष्ट्राच्या राजकारणात आंबेडकरी राजकारण हा महत्त्वाचा घटक असला तरी डॉ. आंबेडकरांच्या पश्चात दलित राजकारणात मोठ्या प्रमाणात चढ-उतार झालेली दिसून येते.

**संदर्भ :**

1. आचार्य धनंजय, आधुनिक भारत, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, जून 2006.
2. कसबे रावसाहेब, रिपब्लिकन पक्ष ऐक्य, वास्तव आणि भवितव्य, सुगावा प्रकाशन, पुणे, 1998.
3. कसबे रावसाहेब, आंबेडकरवाद: तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन, पुणे, 2004.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड. 5 महाराष्ट्र शासन, मुंबई, 1989.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड, 7,8,9 महाराष्ट्र शासन, मुंबई, 1989.
6. खैरमोडे चा. भ. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे चरित्र, खंड. 3-4 प्रताप प्रकाशन, मुंबई, 1964.
7. देशपांडे एम.डी. डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार, लोकवांगमयगृह, मुंबई, 2000.
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1993.

# छत्रपति राजर्षी शाहू महाराज - समाजसुधारक व विचारवंत

**शकुंतला रामभाऊ फाटक**
संशोधक शारीरिक शिक्षण विभाग कळंब

भारतीय समाज वर्णावर, जातीवर उभा आहे. पुरुषप्रधान संस्कृतीचा तो समर्थक आहे. ही व्यवस्थाच मुळात विषमता निर्माण करणारी, विषमतेचे समर्थन करणारी आणि विषमतेला धर्ममान्यता देणारी आहे. ही विषमता देवांशी, स्वर्गाशी, नरकाशी, पुनर्जन्माशी जोडली गेलेली आहे. स्वाभाविकच तिव्याविरुद्ध बंड होण्यास कितीतरी वर्षे जावी लागली. ज्यांना या विषमतेची झळ बसते त्यांनी बंड करणे स्वाभाविक आहे. तसे बंड झालेही. पण जो राजा आहे, ज्याला स्वतःला या विषमतेची झळ बसण्याची शक्यता नाही, अशांनी बंड करण्याचे तसे व्यावहारिक कारण नाही. महाराष्ट्रात मात्र करवीर संस्थानातील राजर्षी शाहू महाराज यांनी प्रतिगामी संस्थेविरुद्ध चौफेर बंड केले. ब्राह्मणी संस्कृतीच्या वरवंट्याखाली भरडल्या जाणाऱ्या आणि किड्या-मुंगीसारखे आयुष्य वाट्याला आलेल्या एका मोठ्या समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि प्रतिष्ठा देण्यासाठी बंड केले. एका राजाने बंड केले आणि समाजाची रचना परिवर्तन, बदल, सुसंस्कृतपणा, माणुसकी आणि न्यायाशी जोडली. समाज आतून-बाहेरून बदलण्यासाठी बंड करणारा, नवरचना करणारा महाराज म्हणून शाहूंचे नाव अजरामर आहे.

हिंदू समाजात दलित, महिला, भटके आदी वर्ग वर्षानुवर्षे पिळवणुकीचे साधन मानले गेले आहेत. ज्या समाजात निम्म्याहून अधिक संख्येने महिला असतील आणि त्या साऱ्याच्या साऱ्या गुलाम असतील, प्रतिष्ठा हरवलेल्या असतील, जाळण्याचे आणि केवळ भोगण्याचे साधन असतील तो समाज कधीच प्रगती करू शकणार नाही. भारत प्रगतीच्या बाबतीत सतत मागे पडला, कारण त्याने आपली निम्मी ताकद कुजवली, धर्माच्या नावाने नासवली, गुलाम समजून अडगळीत टाकली. कधी हुंड्यासाठी जाळली, तर कधी ती विधवा झाली म्हणून तिला पतीच्या चितेवर जाळून टाकली वा कधी तिचे मुंडन करून तिला अंधारात फेकून दिली. समाजाच्या जडणघडणीत, विकासात प्रत्येक घटकाचा सहभाग असावा लागतो आणि इथे तर या महत्त्वपूर्ण घटकांना पद्धतशीरपणे संपविण्याचा उद्योग वर्षानुवर्षे चालू होता. या उद्योगाचे नाव म्हणजे धर्म! या उद्योगाचे नाव म्हणजे स्वर्ग-नरक!

महिलेच्या वाटयाला हिंदू धर्मात जेवढ्या यातना आल्या होत्या तेवढ्या अन्य कोणत्या धर्मात आल्या नसाव्यात. ती एकाच वेळी देवी होती आणि पापयोनी होती. ती एकाच वेळी युगायुगाची माता होती आणि बलात्काराचे साधनही होती. संस्कृतीच्या ओझ्याखाली दबल्या गेलेल्या आणि धर्माच्या तसेच मनुस्मृतीच्या नखामुळे जखमी झालेल्या या महिलेला वाचविण्यासाठी तिला तिचे आयुष्य प्रतिष्ठेने जगू देण्यासाठी बुद्धापासून प्रयत्न सुरू झाले. महात्मा फुल्यांनी अशा सर्व प्रयत्नांना चळवळीचे रूप दिले. महिलासुद्धा माणूस आहे हे समजून घेण्यासाठी आपल्या संस्कृतीने शेकडो वर्ष खाल्ली आहेत. महिला, तिचे भावविश्व, तिची कर्तबगारी, तिचे जग तिचे मोठेपण आदींचा फुल्यांनी तपशीलवार विचार केला आणि भारतीय संस्कृतीच्या पोटात सुरुंग उडावा अशी गोष्ट केली ती म्हणजे पुण्यात महिलांसाठी शाळाच काढली. व्यवस्थेतील विकृतीने फसवून महिलांना बळजबरीने मातृत्व दिलेल्यांसाठी माहेर म्हणून स्वतःचे घरच खुले केले. महात्मा फुले आपल्या परीने प्रयत्न करत होते. त्यांच्याकडे धनसत्ता नव्हती. राजकीय सत्ता नव्हती. समाजाला शहाणे करत करत आणि प्रतिगाम्यांचे घाव झेलत झेलत त्यांना महिलांच्या मुक्तीची लढाई पुढे न्यायची होती. त्यांच्यानंतर आलेल्या राजर्षी शाहू महाराजांकडे धनसत्ता होती, राजसत्ताही होती. या दोन्ही सत्ता स्वतःसाठी, ऐषारामासाठी, नातेवाईकांच्याच उद्धारासाठी वापरावयाच्या काळात महाराजांनी त्या समाजाच्या उद्धारासाठी वापरावयाचे ठरविले. सामाजिक चळवळीची पूर्वपीठिका फुल्यांनी तयार केली होती. प्रतिगामी धर्माला उत्तर म्हणून सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना केली होती. सत्यशोधक चळवळ खेडोपाडी पोहोचविण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या असंख्य अखंडांतून महिलेची थोरवी गायली होती. एका अर्थाने वातावरण तयार होते. महाराजांनी या वातावरणाचा लाभ महिलांच्या मुक्तीसाठी आणि एकूणच समाजक्रांती करण्यासाठी करायचे ठरविले. दलित, दुर्बल, पीडित घटकांना जेव्हा चांगले जगण्याची उमेद प्राप्त होते, त्यांच्या कपाळावर उमटवलेले शूद्रतेचे शिक्के अस्पष्ट होऊ लागतात, महिलेला जेव्हा माणूस म्हणून मान्यता मिळते, जेव्हा

तिच्यासाठी शाळांचे दरवाजे, पुस्तकांची पाने उघडतात, तेव्हा तिला ज्ञानाच्या उजेडात जाण्याची संधी मिळते तेव्हा समाजक्रांती व्हायला लागते. महाराजांच्या काळात हे घडत होते. महाराज स्वतःहून तसे घडवत होते. त्यासाठी स्वतःचे सिंहासन वापरत होते. तिजोरीतील पैसा खर्च करत होते. प्रतिगाम्यांचे वार झेलत होते. निंदानालस्ती सहन करत होते. पण न डगमगता त्यांनी क्रांतीचे चाक फिरविले. चाक फिरू लागल्याने महार वतन रद्द झाले. दलितांना राखीव जागा मिळाल्या. गुन्हेगार समजल्या गेलेल्या समूहाला थेट राजवाड्यावर नौकऱ्या मिळाल्या. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसाहती स्थापन झाल्या. भंगी आडनाव असलेल्या माणसाला पंडित आडनाव मिळाले आणि महिला उच्चविद्याविभूषित झाल्या.

व्यवस्थेने दलितांना शूद्र मानले आहे. त्यांचा जन्मच सेवा करण्यासाठी आणि अपमानाचे चटके सहन करण्यासाठी झाला आहे. स्त्री तर त्यांच्यापेक्षा तिला ना स्वतःचा चेहरा, ना स्वातंत्र्य, ना अस्तित्व समाजात तिची संख्या निम्म्याहून अधिक, पण ती दिसायची एक तर चुलीत, मुलात किंवा रोज रोज सजविताना समाजात तिचे स्वाभिमानी अस्तित्व तसे अभावानेच आढळायचे. अशा काळात शाहू महाराजांनी महिलांना विकासाला पद्धतशीरपणे हात घातला. महिलांचा बालविवाह ही वर्षानुवर्षे चालत असलेली आणि धर्ममान्य बनवलेली प्रथा होती. तिची अनेक कारणे धर्ममार्तंडांनी सांगितली आहेत. बालविवाह आणि सतिप्रथा यांच्या विरोधी आवाज इतिहासाने काही वेळा ऐकले होते, पण त्यांची चळवळ होऊ शकली नाही. आवाज उठविणाऱ्यांची सत्ता गेल्यानंतर त्यांच्या सुधारणाही मागे पडल्या. हिंदू इतिहासकारांनी आणि त्यांच्या जोडीला काही इंग्रजी इतिहासकारांनी ज्याला वेडे ठरविले त्या महंमद तुघलकाने सतीच्या बाबतीत नियम केला होता. सती जाण्यापूर्वी सरकारची परवानगी आवश्यक असल्याचे फर्मान काढले होते. महंमद तुघलकाचा हा निर्णय तसा क्रांतिकारी होती, म्हणून प्रतिगाम्यांनी त्याला वेडे ठरविले असावे. अकबराने सती जाण्यास प्रतिबंध करण्याबरोबरच बालविवाहालाही आपल्या साम्राज्यात बंदी केली होती. लग्नासाठी मुलीचे वय चौदा आणि मुलाचे सोळा वर्षे पूर्ण असले पाहिजे, दोघांच्या वयात बारा वर्षांपेक्षा अधिक अंतर असू नये, वयाबाबत कोतवालाकडून दाखला मिळवला पाहिजे, असा कायदाच केला होता. लॉर्ड बेंटिंगने सतिप्रथेला बंदी घालणारा कायदा केला आणि तो क्रांतिकारक ठरला. या सर्व पार्श्वभूमीवर फुले, आगरकर, कर्वे आदींनीही प्रयत्न केले, पण शाहू महाराजांच्या काळात कळस गाठला जाणार होता. शाहू महाराजांनी बालविवाहाला आणखी एक धक्का देण्याचे ठरविले. ज्या काळात मुलीचा विवाह बयाच्या दहाव्या-बाराव्या वर्षी सर्रास होत असे त्या काळात महाराजांनी लग्नासाठी मुलीचे वय चौदावर आणि मुलाचे वय अठरावर नेले. १२ जुलै १९१९ ला महाराजांनी कोल्हापूर इलाख्यातील विवाहासंबंधीचा कायदा गॅझेटियरमध्ये प्रसिद्ध केला. या कायद्यात खरोखरच एक क्रांतिकारी गोष्ट होती ती म्हणजे अठरा वर्षाचे वय पार केलेल्या मुलीला स्वतःच्या निर्णयानुसार लग्न करण्याची तरतूद होती. आपल्याला आवडेल तो जोडीदार तिने निवडला आणि लग्न केले तर ते कायदेशीर ठरणार होते. लग्नाच्या बाबतीत महिलेला एका अर्थाने पूर्ण स्वातंत्र्य देणारा हा कायदा होता. बालविवाहाचे प्रयोजनच मुळात स्त्रीचे स्वातंत्र्य मारण्यासाठी असते. स्त्री शहाणी झाली, स्वतः निर्णय घेऊ लागली की प्रतिगामी व्यवस्था कोलमडायला लागते. तिने आंतरजातीय विवाह केला की जातिव्यवस्था हादरायला लागते. ते होऊ नये म्हणून बालविवाह असतो. स्त्री ही नुसतीच मुले जन्माला घालणारी नाही, तर जाती टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका करणारी आहे, असा प्रतिगाम्यांचा सिद्धान्त आहे. जाती टिकाव्यात यासाठी बालविवाह असतो. काही कळण्याच्या आतच विवाह झाला की मुलगी चूल आणि मूल यात गुरफटते. जाती संपवायला, स्वत:साठी स्वातंत्र्य मागायला तिच्याकडे वेळ कुठला असणार या सर्व गोष्टी लक्षात घेता महाराजांनी महिलांना दिलेले लग्नाचे, जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य क्रांतिकारी ठरते. त्यांनी ज्या काळात हा कायदा केला तो काळ नजरेसमोर आणला की या कायद्याचे महत्त्व आणखी पटायला लागते. एकीकडे लोकमान्य टिळकांसारखे मोठमोठे पुढारी संस्कृती टिकविण्याच्या नावाखाली सामाजिक बदलाला विरोध करत होते, तर दुसरीकडे शाहू महाराज स्त्री उद्धाराच्या, महिला मुक्तीच्या भावनेने सर्व संकटांचा सामना करत आपला पुरोगामी कार्यक्रम पुढे नेत होते. केवळ बालविवाहाला प्रतिबंध करूनच ते थांबले नाहीत, तर त्यांनी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. पतीच्या निधनानंतर पत्नीचे आयुष्य अतिशय जिकिरीचे बनते. कुटुंबात आणि बाहेर तिला प्रतिष्ठा राहत नाही. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत ती भाग घेऊ शकत नाही. बहुतेक वेळा पतीच्या निधनाबद्दल पत्नीलाच जबाबदार धरले जाते. ती पांढऱ्या पायाची होती म्हणून असे घडले, असे वेदशास्त्रांचे ठेकेदार सांगू लागतात. पुनर्विवाहास परवानगी नसल्याने तिचे

सारे आयुष्यच अंधारमय बनते. समाज नीट चालायचा असेल, त्याचे आरोग्य टिकायचे असेल, तर विधवांचा विवाह झाला पाहिजे, त्यांना नवे जीवन दिले पाहिजे, असे शाहू महाराजांना वाटले आणि १९१७ मध्ये त्यांनी विधवांच्या विवाहास मान्यता देणारा कायदा केला. अशा महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आपली क्षत्रिय जात भ्रूणहत्या, व्यभिचार इत्यादी पापापासून मुक्त राहील असा विश्वासही महाराजांनी १९१९ ला कानपूरमध्ये झालेल्या क्षत्रिय परिषदेमध्ये व्यक्त केला होता. घरातील महिलांना पडद्याआड ठेवणे, विधवाविवाह नाकारणे आणि सहभोजन नाकारणे याला भारतीय खूप महत्त्व देतात, पण ते बरोबर नाही. पडद्यामुळे महिलांमधील शौर्यादी गुणांचा नाश होतो. राजमाता जिजाबाईसाहेब, महाराणी ताराराणीसाहेब, महाराणी सती अहिल्याबाई, महाराणी कमलाबाई आदी क्षत्रिय स्त्रियांनी राज्याचा गाडा हाकला आहे आणि रणांगणावर जाऊन शत्रूबरोबर लढायाही मारल्या आहेत. हे काम पडद्यात राहून केवळ अशक्य होते, असेही शाहू महाराजांनी म्हटले आहे. स्त्रीला स्वातंत्र्य दिले तरच तिचे कर्तव्य फुलते, कुटुंबापासून रणांगणापर्यंत ती शौर्य गाजवू शकते अशी धारणा या स्वातंत्र्यामागे होती. पडदापद्धतीचा महाराजांनी निषेध तर केलाच, शिवाय या पद्धतीचे तोटे सांगितले विधवाविवाहास बंदी घातल्यामुळे होणारे सामाजिक दुष्परिणाम सांगितले. विधवाविवाह कसा आवश्यक आहे हे त्यांनी आपल्या संस्थानात तर सांगितलेच, पण संस्थानाबाहेरही त्यांना संधी मिळेल तेथे या गोष्टीचा उहापोह केला.

महिलांसाठी तयार केलेले सर्वच कायदे त्यांच्यापर्यंत पोहोचतात असे नाही. सध्या हुंडाबंदीचा कायदा आहे, पण हुंड्याची पद्धतही सर्रास चालू आहे. बालविवाह प्रतिबंध कायदा आहे, पण बालविवाह मोठ्या प्रमाणात होतात. कायद्याचा वचक निर्माण होत नसल्याने आणि कायदा राबविणारी यंत्रणाच गाफील, बेजबाबदार असल्याने कायदा आंधळा-पांगळा बनतो. असे आंधळे कायदे संख्येने कितीही असले तरी त्यांचा परिणाम शून्य होतो. हिंदू संस्कृतीत महिलेचे कार्यक्षेत्र कुटुंबापुरते सीमित केले आहे. कुटुंबासाठी हरप्रकारचे कष्ट सोसूनही तिला प्रतिष्ठा नसते. बऱ्याच महिलांना कुटुंबात नाना प्रकारचा छळ होतो. या छळाबद्दल महिला तक्रार करू शकत नाहीत. अशा तक्रारी करणे म्हणजे कुटुंबाची प्रतिष्ठा रस्त्यावर नेल्यासारखे आहे हेही तिच्या मनावर बिंबवले आहे. छळ सहन न होणाऱ्या महिला परसबागेतील विहिरीत उडी मारून आत्महत्या करतात. काही अन्य मार्गाने जीवनाचा शेवट करतात. चार भिंतींच्या आड चालणाऱ्या या घटना एक तर समाजाला दिसत नाहीत किंवा संबंधितांची ती खासगी बाब आहे, आपण कशाला नाक खुपसा म्हणून त्याकडे दुर्लक्ष होते. वर्षाला शेकडो-हजारो महिला छळाला कंटाळून मरतात, बऱ्याच जणी जगण्यातही मरणच भोगत असतात, याची महाराजांना कल्पना होती. अतिशय बारीकपणे त्यांनी कुटुंबव्यवस्थेचा आणि तेथील ताणतणावाचा अभ्यास केला होता. कुटुंबात होणाऱ्या छळाला प्रतिबंध बसावा म्हणूनही महाराजांनी कायदा केला. हिंदू शास्त्रकारांनी कुटुंबातील पुरुषांना कुटुंबाचे शासन करण्याचा परवानाच दिला आहे. हा परवाना घेऊन स्त्रियांना वाटेल तसे वागवले तरी चालते अशी अनेकांची समजूत झालेली आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा बसावा म्हणून क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा करण्यात येत आहे. या कायद्यातील शिक्षा समाजाला कडक वाटतील, पण कायद्याची दहशत बसवण्यासाठी आणि सुधारणा घडवून आणण्यासाठी ते आवश्यक आहे.

स्त्रियांबरोबर क्रुर वागण्याचे असे किती तरी व्यवहार आहेत की ते इंडियन पिनल कोड अंतर्गत येवू शकत नाहीत. छळ इतका की, स्त्रियांना आपल्या जन्माविषयी वाईट वाटू लागते या सर्व गोपी व्याख्या तयार केली आहे. सुधारलेल्या समाजातील कृ होणार आहे. श्रीला कुरपणे वागविणा यांना सहा महिन् रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देण्याची तरतूद या कायद्यात आहे असे सांगितले

पुनर्विवाहाला परवानगी देणारा फायदा झाला तरी म्हणजे काही मोडण्याची पद्धत आपल्या समाजात जातीनिहाय वेगवेगळय पद्धतीने चालू होती. मागास जातीत घटस्फोट देण्याचे म्हणजे काडीमोडण्याचे काम जातपंचायतीकडे असते. काही मोडणे हा शब्द साधा आहे, पण स्याबाबतची कृती मात्र गुंतागुंतीची आहे. पतिपत्नीला एकत्रित संसार करायचा नसेल तर जातपंचायत काडीमोड करते. (काडीचे दोन तुकडे करते). याच वेळेला या पद्धतीत पंचांची लहर महत्वाची ठरते. खीवर अन्याय होण्याचीही शक्यता असते. एखादे प्रकरण दीर्घकाळ चालवले जाते. पंच सांगतात तेच नियम ठरतात. ते देतील तोच न्याय ठरतो. (अधिक माहितीसाठी वाचा भटक्यांचे लग्न, लेखक उत्तम कांबळे). हे सर्व टाळण्यासाठी महाराजांनी ११ जुलै १९९९ला काडीमोड कायदा केला. ख्रिश्चन, पारशी

समाज सोडून अन्य सर्व जातीजमातीला हा कायदा लागू केला. (मुस्लिमांतील तलाक मान्य केला गेला होता.) २ ऑगस्ट १९९९ला कायदा अंमलात आला. कायदा होणे आणि तो अंमलात येणे यात दोन तीन आठवडयांचाच फरक आहे हेही या ठिकाणी लक्षात येईल. आपल्या नवन्याला महारोगासारख्या अर्जर रोगाने गाठले, तो नपुंसक आहे. दोन वर्षांहून अधिक काळ आपल्याला शय्यासोबत दिली नाही तरी पत्नीला घटस्फोट मागण्याचा हक्क आहे, असे कायद्यात नमूद करण्यात आले आहे. पुरुषप्रधान व्यवस्थेत पती कसाही असला तरी चालतो. महिलेचे एकदा का लग्न झाले तर रोग्याबरोबर, म्हातान्याबरोबर संसार केलाच पाहिजे असे येथील व्यवस्था सांगत होती. स्त्रीला विकार झाला तर मात्र तातडीने तिला घटस्फोट देणे योग्य अशीही अलिखित व्यवस्था होती. ती सर्व मोडण्याचा शाहू महाराजांनी प्रयत्न केला. केवळ परंपरागत व्यवस्था सांगते म्हणून एखाद्या स्त्रीला अमानुष वागणूक मिळू नये, ती आयुष्यातून उठू नये, अप्रतिष्ठित होऊ नये यासाठी त्यांनी खोलवर विचार केला होता. देवदेवतांना मुली वाहण्याची परंपरा आपल्याकडे वर्षानुवर्षे आहे.

स्वातंत्र्यानंतर ५०-६० वर्षांत अनेक वेळा कायदे झाले, पण ही प्रथा काही संपलेली नाही. प्रथा संपविण्यासाठी आवश्यक असणारी तीव्र राजकीय इच्छा नाही आणि राज्यकर्तेही धार्मिक अंधश्रद्धांनी बरबटलेले असल्याने कायदे प्रभावी ठरू शकत नाहीत. देवा-धर्माच्या नावाने महिलांची विटंबना व्हावी हे शाहू महाराजांना मान्य नव्हते. देवाला सोडलेल्या महिलांचे आयुष्य अतिशय हलाखीचे असते. तरुण असेपर्यंत त्या देह विकतात, मुंबई, पुण्यात जाऊन वेश्याव्यवसाय करतात. तारुण्यानंतर भाकरीचा प्रश्न निर्माण होतो. शरीर रोगांचे आगर बनलेले असते. देवदासींच्या मुलांना बाप मिळत नाही. ज्यांच्यापासून संतती निर्माण होते ते आपले नाव देवदासींच्या मुलाला देत नाहीत. आईलाही प्रतिष्ठा नाही, मुलांनाही नाही. आयुष्यभर आणि पिढ्यान् पिढ्या देवदासीच्या वाट्याला केवळ हेटाळणी, केवळ उपेक्षा येते. देवाच्या नावाखाली हे सर्व दाबून टाकले जाते. देवाच्या बाईच्या वाट्याला हे असेच येणार हेही गृहीत धरलेले असते. बाई देवाची, पण तिला प्रतिष्ठा नाही, असा हा प्रकार आहे. देवदासींच्या मुलांचा बाप नाही आणि मुलगा म्हणून कुणाच्या मालमत्तेत वाटाही नाही. शाहू महाराजांनी देवा-धर्माच्या फसव्या कल्पना बाजूला ठेवून या विषयाला हात घातला. देवदासीपासून जन्माला आलेल्या अनौरस संततीचा खोलवर विचार केला. ज्यांच्यापासून मुले जन्माला आली अशांच्या मालमत्तेत वाटा देण्याचा कायदा केला. खरे तर असा कायदा द्विजासाठी होता, पण तो देवदासी, मुरळी, जोगतिणीच्या मुलांसाठीही महाराजांनी लागू केला. समाजातील सर्वात उपेक्षित, दुर्लक्षित आणि वर्षानुवर्षे अंधश्रद्धांमध्ये भरडल्या गेलेल्यांपर्यंत महाराज पोहोचले होते. देवदासी किंवा अन्य महिलांचा भोग घ्यायचा, पण जन्माला येणाऱ्या संततीची जबाबदारी मात्र पार पाडायची नाही असा हा प्रकार होता. केवळ देवदासीच नव्हे तर अन्य महिलांच्या अनौरस संततींनाही या कायद्याचा लाभ झाला. एक सुसंस्कृत समाज निर्माण होण्याचे स्वप्नही या कायद्यामागे होते.

देवदासी प्रथेला आळा घालणे तसे अवघड काम आहे. एक तर समाजाची आणि धर्माची मान्यता या प्रथेला होती. देवदासीला थेट देवाशीच जोडण्याचा प्रयत्न असल्यामुळे तिच्यावर आपण अन्याय करतो आहोत असे अन्याय करणाऱ्यांना वाटत नाही आणि आपल्यावर अन्याय होतो असे देवदासी झालेल्या महिलेला वाटत नाही. आपण इतरांपासून वेगळया आहोत, महत्त्वाच्या आहोत, देवसमोरच्या नैवेद्यातील वाटेकरी आहोत, लोक आपल्या पाया पडतात, धार्मिक सभा-समारंभात आपल्याला मान मिळतो, आपली चिता पेटवायला मंदिरातील विस्तव मिळतो (पूर्वी असा विस्तव मिळायचा), आपण काय चारचौघींसारख्या नाही अशी देवदासीची असल्यामुळे तीही सहजासहजी पडायला तयार नसते. देवीला मोडल्यानंतरही जनकराण्यातील मालवरील असतो. तो हक्क महाराजांनी केला. हा करण्यामागचा उद्देश नीट समजून घेतला पाहिजे, जगण्याचे साधन अबाधित राहते म्हणून एखादी श्री देवदासी होऊ नये ही यामागची भूमिका होती. देवदासी प्रथेला संपविण्याची भूमिका होती. देवदासी झाल्यानंतर एखाद्या महिलेला त्या प्रथेतून बाहेर काढून तिचे पुनर्वसन करणे आणि देवदासी हो नये म्हणून प्रयत्न करणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. रोग झाल्यावर उपचार करणे आणि रोग होऊच नये म्हणून काळजी घेणे यासारखे हे आहे. रोग होऊच नये यासाठी महाराज अधिक काळजी घेत होते आणि गरजेनुसार रोगावर उपचारही करत होते. रोग होऊ नये याची पूर्वकाळजी घेणे हेच अधिक शहाणपणाचे आहे. एखादी अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी महाराज प्रबोधनाचा •मार्गही स्वीकारायचे. पण त्याने उपयोग झाला नाही तर बेधडकपणे कायदाही करायचे. महाराजांनी आपल्या

संस्थानातील बलुतेदारी रद्द झाल्याचे जाहीर केले, पण तरीही काही लोक बलुतेदारी मागायचेच. शेवटी महाराजांनी ५ जुलै १९१९ला एक हुकूम काढला. शिमग्याला बैते देणे हे रयतेच्या मर्जीवर अवलंबून आहे. सरकारी कामगारांनी अगर इतरांनी कोणावर जुलूम केल्यास संबंधित शिक्षेस पात्र होईल असा तो हुकूम होता. अनौरस संतती व जोगतिणी यांच्याविषयीही महाराजांना १७ जानेवारी १९२०ला कायदा करावा लागला.

पुरुषप्रधान आणि जातीवर आधारित असलेल्या समाजात महिलेला प्रतिष्ठा नसतेच. ती केवळ छळाचा विषय राहत नाही, तर सातत्याने टिंगलटवाळीचा विषयही बनते. पूर्वी एखाद्या टोळीचा नायकाचा अपमान करायचा असेल तर त्याची स्त्री पळवून नेली जायची. स्त्री गेली की पुरुषाची प्रतिष्ठा गेली असे मानले जायचे. आजही भांडणात एखाद्याला अप्रतिष्ठित करायचे असेल तर आई, बहीण, पत्नी यांच्या नावाने शिवी हासडली जाते. अशा शिवीला येथील धर्माने, संस्कृतीने किंवा धर्माच्या ठेकेदारांनी विरोध केला नाही. महिलांची विटंबना करण्याचे अनेक सणवार आपल्याकडे आहेत. धार्मिक मुलामा दिल्याने त्यातील गांभीर्य कुणाच्या लक्षात येत नाही. कधी मनोरंजन म्हणून, कधी भोग म्हणून, तर कधी पुरुषी अहंकार म्हणून महिलांची अप्रतिष्ठा होत असते. पूर्वी शिमग्याच्या सणाच्या दिवशी महिलांना अश्लील, बीभत्स, अर्वाच्य शिव्या देण्याची प्रथा होती. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या महिलांना आणि घरात राहणाऱ्या महिलांनाही अशा शिव्या दिल्या जात. लज्जा उत्पन्न होईल अशा शिव्या दिल्या जात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अकारण शिव्या दिल्या जात. रंगपंचमीच्या दिवशी रस्त्यावर खेळला जाणारा रंग आणि त्यातून घडणाऱ्या भानगडी हा स्वतंत्र विषय असायचा. शिमगा आला की महिलांची पंचाईत व्हायची. कोण कशी शिवी देईल, असे सांगता यायचे नाही. महाराजांनी ही अनिष्ट प्रथा तातडीने बंद करण्यासाठी १९ मार्च १९२१ ला जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि हुकुमाविरुद्ध कोणी वर्तन केल्यास त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल, असे सांगितले. व्यवस्थेने वेगवेगळ्या कारणांनी काढून घेतलेली महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा अतिशय पुरोगामी प्रयत्न होता. कर्नाटकात ओकळी आटा (रंगांचा खेळ) नावाचा सण असतो. या सणाच्या दिवशी तरुण देवदासींच्या अंगावर पारदर्शक कपडे घातले जातात. तिच्यावर रंग उडवला जातो. तिची विटंबना केली जाते. महिलेची अप्रतिष्ठा करणारा हा खेळ आजही काही खेड्यांत खेळला जातो. तो बंद करावा असे स्वातंत्र्यानंतरही कोणाला वाटत नाही. देवाच्या नावाखाली महिलेची अप्रतिष्ठा होते हेही कोणी समजून घ्यायला तयार नाही. शाहू महाराजांनी मात्र एका निकोप, निरोगी समाजासाठी अशा प्रथांविरुद्ध कायद्याचे हत्यार उगारलेले दिसते.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# विचारवंत आणि सुधारक छत्रपती शाहू महाराज

**प्रा ज्ञानोबा त्रिंबक ढगे[1] प्रा. भरत वसंतराव जाधव[2]**
राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग म.वि.प्र. समाज,नाशिकचे क.का.वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगाव ब.
ddnyanesht@gmail.com

आधुनिकमहाराष्ट्राचीजडणघडण करण्यासाठी अनेक महापुरुषांनी आपल्या कार्यातून,विचारातूनबांधणी केलेली आहे. लोककल्याणकारी धोरणे कशी राबवावीत, जनतेला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या उभे करण्यासाठीराज्यकर्ता,विचारवंत म्हणून कसे कार्य करावे याचे उदाहरण म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती यांचा कार्यकाल! शतकापूर्वी करवीर राज्याच्या गादीवर आरुढ झाल्यानंतर या थोर राजाने आपल्या कारकीर्दीत बहुजन समाजासाठी आरक्षणाच्या निर्णया सारखे अनेक क्रांतीकारक निर्णय घेतले.शिक्षण आणि वसतिगृह बाबत क्रांतिकारी कार्य केले.शेती, उद्योग, सहकार, विपणन, आदि क्षेत्रात केलेले कार्य दीपस्तंभा सारखे आहे. त्यांनी घेतलेले निर्णय. काढलेले कल्याणकारी हूकुम आणि त्याची केलेली प्रभावी अंमलबजावणी, तसेच राजकारण आणि प्रशासनाची धुरा कशी सांभाळावी हे आजही मार्गदर्शक आहे. ते राज्यकर्ते होतेच शिवाय ते एक कृतीशील विचारवंत,चिकित्सक अभ्यासक, समाजशील चिंतक, समाजसुधारक, धर्मसुधारक आणि चळवळीचे नेते म्हणून सुद्धा त्यांच्या कार्याकडे बघावे लागते.

**समाजिक सुधारणा आणि कृतिशील विचार.-**

छत्रपतीशाहू महाराजांचा जन्म 26 जून 1874 रोजी झाला. आणि त्यांचा मृत्यू 6 मे 1922 रोजी झाला. छत्रपती शाहूंचा इसवीसन 1894 एप्रिल महिन्यात करवीर गादीवर राज्याभिषेक झाला. ई.स.1894 ते 1922 पर्यंत शाहूमहाराज म्हणजे 28 वर्ष राज्यकारभार केला. या काळात महाराजांनी आरक्षणाचा जाहीरनामा, कुलकर्णी वतन जप्तीचा आदेश, प्राथमिक शिक्षण सक्तीचे आदेश, अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी मुक्त प्रवेश, दुष्काळ निवारण, शेतकऱ्यांची काळजी, असे अनेक हुकुम-निर्णय हे वेळेच्या काळात क्रांतिकारक तर होतेच.छत्रपती शिवाय शाहूंच्या या हुकुमाचा प्रभाव फक्त कोल्हापूर संस्थांना पुरताच मर्यादित न राहता तो पुढे भारतातील सामाजिक जीवन बदलणारा ठरला. शाहूमहाराजांनी शंभर वर्षांपूर्वी दिलेले हुकुम, वटहुकूम, घेतलेले निर्णय, आज काळाच्या कसोटीवर उतरलेले आहे,एक समाज क्रांतिकारक राजा, लोकशाही निष्ट पत्रकारांचा पाठीराखा, हिंदी शास्त्रीय संगीताचा एक पुरस्कर्ता, मराठी रंगभूमीचा एक शिल्पकार, मल्ल युद्धाचा एक आश्रयदाता, आधुनिक महाराष्ट्राचा एक भाग्यविधाता, भारतातील हरित क्रांतीचे अग्रदूत, आणि सामाजिक ,आर्थिक, राजकीय, प्रशासकीय लोकशाहीचा एक संस्थापक ठरले आहे.

**शिक्षण प्रसार आणि वस्तीगृहउभारणी:-**

महात्मा फुले यांच्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या सामाजिक सुधारणेच्या कार्यात शिस्खाणाल प्रमुख स्थान दिले होते. "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सदी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. अशी त्यांची विचारसरणी होती. महाराजांनी वसतिगृहांची सुवर्णभूमी निर्माण करण्यासाठी स्वतंत्र मराठा वसतिगृहांची स्थापना केली, 25 सप्टेंबर 1901 विक्टोरिया मराठा वस्तीगृहाच्या इमारतीचा शुभारंभ करण्यात आला, 47 हजाराची देणगी दिली आणि जमीन पण दिली, याशिवाय रुपये पाचशे पन्नास चे वार्षिक अनुदानही सुरू केले,

त्याचप्रमाणे जैन वस्तीग्रह अप्रील 1901 मध्ये दिगंबर जैन वस्तीग्रह, एका जैन मंदिरात सुरू केले, या वसतिगृहासाठी विक्टोरिया मराठा वस्तीग्रह समोरील एक प्रचंड विस्तार असलेला माळ महाराजांनी दिला, तसेच मुस्लिम बोर्डिंग, शाहू महाराजांच्या प्रेरणेने मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची, 15 नोव्हेंबर 1906 रोजी स्थापना करण्यात आले, दसरा चौकाजवळील पंचवीस हजार चौरस फूट जागा या सोसायटीला दिलीच, शिवाय इमारत बांधण्यासाठी पाच हजार पाचशे रुपयाची देणगी दिली, लिंगायत वस्तीग्रह, 1907, अस्पृश्य वस्तीग्रह, 14 एप्रिल 1908, दैवज्ञा बोर्डींग, 1914, श्री नामदेव वस्तीग्रह, शिंपी समाजासाठी महाराजांनी एक शुक्रवार पेठेतील वाडा खरेदी केला, व त्या ठिकाणी 2 एप्रिल 1911 युवराज राजाराम महाराज यांच्या हस्ते या वस्तीगृहाची सुरुवात करण्यात आली, पांचाळ ब्राह्मण समाज वस्तीग्रह, ब्राह्मण सदृश्य पांचाळ ब्राह्मणांसाठी 1912 साली दसरा चौकातील मुस्लिम बोर्डिंग च्या मागे असलेल्या जागेत महाराजांनी या वसतिगृहाची स्थापना केली, सारस्वत ब्राह्मण वस्तीग्रह, वीस मे 1915, त्याचप्रमाणे कायस्थ प्रभू वस्तीग्रह, इंडियन क्रिश्चन वस्तीग्रह, अरे समाज वस्तीग्रह अर्थात गुरुकुल, वैश्य समाज वस्तीग्रह, इंदुमती राणीसाहेब वस्तीग्रह, वैदिक विद्यालय व वस्तीग्रह, सहा जुलै 1920 रोजी बिंदू चौकातील इमारत या वस्तीगृह दिली, याठिकाणी वेदोक्त प्रमाणे धर्मविधी करण्याचे शिक्षण ब्राह्मणेतर समाजाला देण्यास सुरुवात केली,

**जातीभेद निर्मूलन-**

जाती निर्मूलनासाठी संघर्ष.--शाहू महाराज वेदोक्त प्रकरणाने जखमी झालेले असतानाच. जातिसंस्थेविरुद्ध बंड करून उठले मुळेच वर्णव्यवस्थेच्या अमानुष गुलामगिरीचा फडशा पाडू लागला. सनातनी ब्राह्मण वर्गाकडून सामान्य ब्राम्हण इतरांचा जो धार्मिक, आर्थिक व सामाजिक छळ होत होता. तो पाहून महाराजांचा क्रोध अनावर होऊन. जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रसंगी आपले राज्य देखील पणाला लावण्याचा चंग बांधून जातिनिर्मूलन साठी प्रयत्न केले. शाहू महाराजांनी संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासलेल्या जाती जमातींसाठी पन्नास टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय 26 जुलै 1902 रोजी घेऊन प्रत्यक्ष अमलात आणण्यास सुरुवात केली. जाती निर्मूलनासाठी शैक्षणिक, प्रशासकीय, व अखेरचा बडगा म्हणून कायदेकानून उपक्रम राबविले. त्यावेळी करवीर राज्यात अस्पृश्य जातींची लोकसंख्या खूप मोठ्या प्रमाणात होती. हलकी -सलकी कामे करावी लागत. कोकणात तर कोकणी माणसास जर अस्पृश्यांचा स्पर्श जर झाला तरी त्याला कठोर शासन करण्यात येईल. अस्पृश्यांना माणसाप्रमाणे जगू देत नव्हते. लोकांच्या खाजगी व सार्वजनिक जीवनातील अस्पृश्यतेचे उच्चाटन होण्यासाठी अस्पृश्य लोकांना आपल्या खाजगीत निमुन घेतले. माहूत, कोचमन, टपाल वाला. घोडेस्वार, मोटारीचे ड्रायव्हर, क्लीनर, पोलीस अशा विविध प्रकारच्या सुरुवातीस नोकऱ्या दिल्या. तसेच सरकारी कचेऱ्या, दवाखाने, शाळा, सरकारच्या मदतीवर चालणाऱ्या शाळा, पाणवठे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला,

**शेती सुधारणा-**

शाहू महाराजांनी राज्य सूत्रे धारण करून दीड पावणे दोन वर्ष होतात न होतात तोच त्यांच्यावर नैसर्गिक प्रकोपाला तोंड देण्याची वेळ आली, दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली, दुष्काळग्रस्तांची अवस्था अत्यंत हलाखीची होऊ लागली, जनावरे पाण्यावाचून मरू लागली, तेव्हा शाहू महाराजांनी शेतकरी जगला पाहिजे, त्याची जनावरेही जगायला हवीत, 1896 च्या दुष्काळाने महाराष्ट्रात असा धुमाकूळ घातला, की गावेची गावे ओस पडू लागली, तेव्हा शाहू महाराजांनी गावकरी व दरबार यांच्या एक मेलाने तोही प्रश्न सोडविण्याचा शाहुंनी प्रयत्न केला, ज्या विहिरी आटल्या होत्या, त्या विहिरींतील गाळ काढला, गावाची तळी लांब, रुंद व खोल करण्यास उद्युक्त केले, राधानगरी सारखे धरण बांधून पाण्याचा कायमचा प्रश्न सोडविला, तसेच जनावरांसाठी चारा छावणी सुरू करून त्यांचे संगोपन केले, संस्थानाची जंगले चराईसाठी खुले केले, राजर्षी शाहू महाराजांनी राधानगरी धरण बांधून पाण्याचा प्रश्न सोडविला, त्याच प्रमाणे जेव्हा वारणा खोऱ्यातील, सरूड सांगाव, च्या पाटलाची पोर मॅट्रिक पास झाल्याचे ऐकून शाहू महाराजांना अक्षरशा आनंदाचे उधाण आले, तेव्हा त्याला बोलावून घेतले, मॅट्रिक पास झालेल्या त्या पांडुरंग

चिमणाजी पाटील पोराने बहुजन समाजापुढे एक नवा आदर्श घालून दिला, तेव्हा पुढील कार्याची दिशा निश्चित करण्यासाठी महाराजांनी त्याला काही प्रश्न विचारले, जसे तू कोणत्या खानावळीत जेवत होतास? ब्राह्मणांच्या खानावळीत जेवत होता तर ती खानावळ का सोडलीस? चांगली होती ना? असे अनेक प्रश्न विचारून त्याच्याकडून माहिती घेतली, तेव्हा त्याने सांगितले की खानावळ चांगली होती, पण आम्हा मराठ्यांना पत्रावळी त वाडीत असे, आणि ब्राह्मणांच्या मुलांना ताटात वाडीत, जेवण झाल्यानंतर पत्रावळी आम्हालाच उचलून शेन गोळा फिरवावा लागे

**ब्राह्मणेतर चळवळ-**

महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे केंद्र कोल्हापूर बनले. सत्यशोधक समाजाचे रुपांतर ब्राह्मणेतर चळवळीत झाले, याचे नेते होते छत्रपती शाहू महाराज. त्यांच्या तालमीत भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे, खंडेराव बागल. आदि दिग्गज ब्राह्मणेतर नेते तयार झाले. हि चळवळ राजकीय ,शेती, सहकार तसेच विधिमंडळ कामकाजात अग्रेसर राहिली. या चळवळी च्या माध्यमातून ब्राह्मणेतर समजाला न्याय देण्याचा त्यांचे राजकीय हक्क अबाधित राखण्याच्या पर्यंत मोठ्या प्रमाणात केला. पुरोगामी महाराष्ट्रात बहुजन समाजाच्या हाती सत्ता येण्यामध्ये या चळवळीचा सिंहाचा वाटा आहे.

**उद्योग निर्मिती:-**

राजर्षी शाहू महाराजांनी अठराव्या शतकात जेव्हा औद्योगिक क्रांतीचा प्रसार सर्व युरोपभर झाला, त्यातून पूर्वीची समाज रचना बदलून गेली, नव्या कारखानदारी तून भांडवलशाहीचा उदय झाला, त्याचबरोबर या कारखान्यात राबणाऱ्या कामगार वर्गाचाही उदय झाला, एवढेच नव्हे तर कामगारांची पिळवणूक रोखण्यासाठी वर्गीय तत्त्वज्ञानही याच सुमारास निर्माण झाले, त्यातून कामगारांच्या कल्याणासाठी राजकीय लढे उभारले गेले, परिणामी राज्य सत्यही कामगार वर्गाचा सहभाग वाढला, याच प्रेरणेने शाहू महाराजांनी कामगार चळवळीत प्रेरणा दिली, तसेच कामगार वर्गास ऐक्याचे आव्हान करून 10 नोव्हेंबर 1918 रोजी, मुंबईच्या परळ भागात बोले, वडेकर आधी कामगार पुढाऱ्यांनी शाहू महाराजांची एक मोठी सभा आयोजित केली होती, सुमारे दहा हजार कामगार व पददलित लोक त्याप्रसंगी हजर होते, युरोपातील कामगार वर्गाचा आदर्श नजरेसमोर ठेवून, आपल्या देशातील कामगार वर्गाने ही संघटित व्हावे आणि पिळवणूक करणाऱ्या भांडवलशाहीला वठणीवर आणावे, मुद्दा समोरच्या कामगार वर्गाच्या मनावर मी बहुतांना महाराज म्हणाले, पाश्चात्य देशात भांडवल वाले व मजूर, असे दोन वर्ग आहेत, भांडवलदार लोकांची, मजूर दार लोकांवर बेसुमार सत्ता चाले, पण आता मजूर दार लोकांनी आपले संग बनवले पाहिजे, ज्याप्रमाणे गवताच्या एकेका काडीची ताकद जास्त नसते, पण अशा अनेक काड्यांचा वेट वळला, तर त्याने हा हतीलाही बांधता येते, म्हणून कामगार वर्गाने स्वावलंबी व्हा, आपले सुव्यवस्थित संग तयार करा, तसेच कामगार हा मूळचा शेतकरीच होय, अशा माध्यमातून कामगारांचे संघटन केले.

**स्त्रीउद्धारक:-**

छत्रपती शाहू महाराज यांनी केवळ बहुजन समाज नाहीत तर ज्यांचे ज्यांचे शोषण होते होते त्यांची बाजू घेतली.पडदा पद्धती, बाल विवाह, सक्तीचे वैधव्य, आंतरजातीय विवाहास प्रतिबंध, देवदासी,इत्यादी स्त्री दास्य मुक्तीसाठी त्यांनी आपले विचार मांडले, स्त्रियांच्या मुक्तीसाठी प्रयत्न केले,अनेक महत्वपूर्ण कायदे पारित केले. हुकुम सोडल्याचे दिसते.

छत्रपती शाहू महाराज ज्ञानी राज्यकर्ते होते. मानव च्या प्रगतीच्या आड येणाऱ्या अनेक समस्यांना ते स्वतः भिडले,मानवी जीवनातील सामाजिक, धार्मिक, आदि क्षेत्रांतील अज्ञाना वरती नेमकेपणाने बोट ठेवून त्या दिशेने कार्य केले अनेकांना तन मन धन देऊन प्रेरित केले. पुरोगामी आणि प्रगतीशील महाराष्ट्र उभा केला.महाराष्ट्राला नवा आचार विचार दिला. सर्व राज्यकर्त्यांना राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठ घालून दिला.आधुनिक भारताच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांचाकार्ये, धोरणे, हुकुम आजही मार्गदर्शक आणि कल्याणकारी स्वरूपाचे असल्याचे अभ्यासांती कळते.

**संदर्भ-**

1. प्राचार्य रा ,तू ,भगत. शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज. सिद्धराज प्रकाशन -पुणे 1999.
2. श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांचे चरित्र - अ.बा.लठ्ठे, बेळगाव, 1925
3. विसाव्या शतकातील महाराष्ट्र - य.दि.फ़डके, प्रथमआवृत्तीपुणे, 1989, खंड 2,
4. राजर्षी शाहूमहाराजांची भाषणे - (संपादक)भ.बा.जाधव, पहिलीआवृत्ती, कोल्हापूर, 1971
5. राजर्षी शाहूछत्रपती:एक समाज क्रांतीकारक राजा - धनंजयकीर, पहिलीआवृत्ती, मुंबई, 1979
6. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ - (संपादक)पी.बी.साळूंखे, मुंबई, 1976
7. संपा. डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रा. गं.बा. सरदारांचे निवडक लेख प्रबोधनातील पाऊल खुणा, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे,१९९७
8. कुंभार नागोराव, विचारशलाखा-शाहुमहाराज विशेषांक, वर्ष 5 वे, अंक- 20 वा, एप्रिलतेजुन 1992
9. मोरेदिनेश, अधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, 1818-1960, के.एस.पब्लिकेशन,पुणे,प्रथमअवृती 2006

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार आणि कामगार कायदेविषयक कार्य एक अभ्यास

**प्रा. मडके साधना हरिदास**
समाजशास्त्र विभाग शि.म.ज्ञा.मोहेकर महाविद्यालय,कळंब
Email - sadhanamadake1980@gmail.com

**प्रस्तावना –**

18 व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. आणि समाजात भांडवलदार आणि कामगार असे दोन वर्ग उदयास आले. भारतात जसजसा औद्योगिक विकास होत गेला त्याप्रमाणे कामगारांची संख्या सुद्धा वाढत गेली. जास्तीत जास्त नफा कमवण्याच्या उद्देशाने भांडवलदार वर्गाकडून कामगारांचे शोषण होऊ लागले परिणामी भांडवलदार वर्ग अधिक श्रीमंत होत गेले व कामगारांची स्थिती मात्र दयनीय होत गेली. समाजात एक प्रकारची आर्थिक विषमता निर्माण झाली. त्यांना कारखान्यात काम करत असताना कोणत्याही सुविधा दिल्या जात नव्हत्या. कोणत्याही प्रकारचे कायदेविषयक संरक्षण नव्हते. कामाच्या ठिकाणी अपघात झाला तर विमा संरक्षण नव्हते. स्वच्छतेच्या सुविधा नव्हत्या. हक्काच्या रजा नव्हत्या. चोहीबाजूंने कामगारांचे शोषण होत होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कामगारांबद्दल आस्था होती. जिव्हाळा होता. कामगारांनी स्वाभिमानशून्यतेचे जीवन नाकारले पाहिजे, शोषणाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे, अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. कामगार आणि कामगारांशी संबंधित अनेक बाबींविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य फार मोलाचे आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व –**

भारतातील कामगार, कामगार चळवळ, कामगार विषयक कायदे, स्त्री कामगारांविषयीची आत्मीयता, कामगारांचे होत असलेले शोषण थांबले जावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फार मोलाचे कार्य केले. या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी, त्यांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास व्हावा, सद्यस्थितीत कामगारांना त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी त्यांचे विचार मार्गदर्शक ठरावेत यासाठी उपरोक्त संशोधन विषय महत्त्वाचा ठरेल.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगार आणि कामगार विषयक कार्याचा अभ्यास करणे.

2) कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कायद्यांचा अभ्यास करणे.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्य त्यांचे विचार आजच्या कामगार वर्गाला कसे मार्गदर्शक ठरतील याचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधन या विषयासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती व तथ्य संकलनासाठी पूर्णपणे दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. यात विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे विश्लेषण –**

द्रव्यरूपाने व वस्तू रूपाने मिळणाऱ्या मोबदल्यात शारीरिक व मानसिक श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस कामगार अशी संज्ञा आहे. भांडवलदार वर्गाने चालविलेल्या छोट्या- मोठ्या कारखान्यात श्रम करून मिळेल त्या मोबदल्यात आपली उपजीविका करणारा श्रमिकांचा वर्ग कामगार वर्गात अंतर्भूत केला जातो. पूर्वीपेक्षा आज कामगारांच्या स्थितीमध्ये थोड्या प्रमाणात सुधारणा झाल्याचे पहावयास मिळत आहे. विविध कामगार संघटनांच्या प्रयत्नातून कामगारांना कायदेविषयक संरक्षण प्राप्त झाले आहे .यात समान काम समान वेतन, कामाचा योग्य मोबदला, कामाचे तास, रजा, सुट्ट्या, भविष्य निर्वाह निधी, विमा संरक्षण इत्यादी अनेक सवलती मिळाल्या आहेत. या सवलती मिळण्यामागे काय कारणे होती? त्या मिळवून देण्यासाठी कोणाचे योगदान होते? हे जाणून घेत असताना एक महान व्यक्तिमत्व, युगपुरुष,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या कार्याचा आढावा घेणे अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार आणि कामगार कायदे विषयक कार्य –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय ,आर्थिक, सामाजिक इत्यादी विविध क्षेत्रातील कार्य हे असामान्य आहे .पण त्या कार्याबरोबरच त्यांचे कामगार आणि त्यांच्या उत्कर्षासाठी केलेले कायदे, कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी केलेले कार्य हे उल्लेखनीय व महत्वपूर्ण आहे. 19 ऑगस्ट 1936 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'स्वतंत्र मजूर पक्षाची' स्थापना केली. या पक्षाची ध्येयधोरणे कुठल्याही एका जातीसाठी नव्हती तर सर्व कष्टकरी यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांसाठी होती. स्वतंत्र मजूर पक्षाचे धोरण स्पष्ट करण्यासाठी दलित वर्ग कर्मचारी परिषद फेब्रुवारी 1938 ला मनमाड येथे झाली. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कामगार विषयक धोरण स्पष्ट केले तसेच ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत असे प्रतिपादन केले .मार्च 1938 ला मुंबई येथे झालेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक अन्याय, अत्याचार ,आर्थिक विषमतेविरुद्ध कामगारांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे असे कामगारांना आवाहन केले.15 सप्टेंबर 1938 च्या ट्रेड डिस्प्युट बिलाच्या संदर्भात कॉन्सिल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या अधिकारांचा जोरदार पुरस्कार करून मालकाने लागलेली विविध बंधने याचा कडाडून विरोध केला. याच पार्श्वभूमीवर 7 नोव्हें. 1938 ला स्वतंत्र मजूर पक्ष आणि गिरणी कामगारांनी जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद डांगे, परूळेकर, मिरजकर इत्यादी कामगार नेत्यांनी संप केला या संपात कामगार संघटनेचा विजय झाला.

1937 साली कोकणातील बहुजन कामगारांचे शोषण थांबविण्यासाठी खोती पद्धत नष्ट करण्यासंबंधी बिल मांडले.1938 मध्ये सावकारी नियंत्रण विधेयक तयार केले. बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला. कामगारांसाठी सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. सप्टें. 1945 ला कामगार कल्याण योजना सादर केली जी 'लेबर चार्टर' म्हणून प्रसिद्ध आहे. 14 एप्रिल 1944 ला बाबासाहेबांनी कामगारांसाठी भरपगारी रजेचे विधेयक मंजूर केले. तसेच किमान वेतन कायदा 1948 ची निर्मिती केली. औद्योगिक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणारे लवाद यंत्रणा उभारण्याची तरतूद केली. 31 जानेवारी 19 44 रोजी खान कामगारांसाठी 'कोळसा खाण कामगार फंडाची' स्थापना करणारे विधेयक मांडले. तसेच 'मिका माईन्स लेबर वेल्फेअर फंडाची' स्थापना करण्यासंबंधीचे बिल मंजूर केले. इंडियन माइन्स 1945 नुसार स्त्री कामगारांच्या मुलांसाठी पाळणा घराची व्यवस्था करण्याचे व्यवस्थापकावर बंधनकारक केले. भारतीय खान कायदा 1946 तयार करुन स्त्री कामगारांना खाणीत जमिनीच्या आत मध्ये काम करण्यास व रात्रपाळीत काम करण्यास बंदी केली. 21 फेब्रुवारी 1946 ला कायदेमंडळात दि इंडियन ट्रेड ॲक्ट आणून ट्रेड युनियन ला मान्यता देणे व्यवस्थापकाला सक्तीचे करण्यासंबंधीचे विधेयक मांडले. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री व कायदे मंत्री असताना कामगारांच्या कल्याणाच्या विविध योजना आणून त्यांना कायदेविषयक स्वरूप प्राप्त करून दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार कल्याणाचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा केला. कामगारांचे होत असलेले शोषण त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध लढा देऊन कामगारांना खरा न्याय मिळवून दिला. आणि हे करत असताना त्यांना त्यांच्या पदाचा खूप उपयोग झाला. कारण ब्रिटिश कालखंडात म्हणजेच 1942 ला ते मजूर मंत्री होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ते पहिले कायदामंत्री होते. पदावर असताना त्यांनी कामगारांच्या हिताचे अनेक ठराव मांडले व ते मंजूर करून घेतले. त्यात प्रामुख्याने खाणीतील कामगारांना घरी जातेवेळी स्नान करून जाता यावे म्हणून त्यांनी कारखान्यात स्नानगृह असावे अशी तरतूद केली. स्त्रियांना प्रसूतिपूर्व व प्रसुतीपश्चात सुट्टी, निवृत्ती निर्वाह योजना, स्त्रियांना रात्रपाळी बंद, उद्योगाच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग, कामगार विषयक संघटना उभारण्याचा अधिकार, समान काम समान वेतन, बालकामगार व कामगारांच्या मुलांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण, कामाचे तास, कामगारांसाठी स्वस्त घरे, भरपगारी रजा ,आजारी रजा, वृद्धत्व पेन्शन, अपघाती नुकसान भरपाई ,नोकरभरतीची कायदेशीर तरतूद, वर्षातून सलग 240 दिवस काम करणाऱ्या करणाऱ्या हंगामी कामगारांना

नोकरीत कायम करणे, कामगार संघटना प्रतिनिधींना मालकाकडून मान्यता देणे इत्यादी अनेक बाबींचा समावेश होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांच्या कल्याणासाठी विविध योजना आखल्या व कायदे केले. कष्टकरी, मजूर ,शोषित ,पीडित समाजाच्या उद्धारासाठी राज्यघटनेत विविध तरतुदी केल्या व सर्वांनाच कायदेविषयक संरक्षण प्राप्त करून दिले.

**निष्कर्ष -**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्य हे अत्यंत सुधारणावादी व मानवतावादी होते.

2) तत्कालीन परिस्थितीत मालक भांडवलदार वर्गाकडून कामगारांचे होत असलेले शोषण, त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडून कामगारांची परिस्थिती सुधारावी यासाठी विविध कायदे करून कामगारांना कायदेशीर संरक्षण प्रदान करून त्यांना जगण्याचा हक्क प्रदान केला.

3) पुरुष कामगारांबरोबरच स्त्री कामगारांच्या प्रश्नांकडे सुद्धा जाणीवपूर्वक लक्ष देऊन त्यांच्याशी संबंधित समस्या दूर व्हाव्यात यासाठी कायद्यात तरतुदी करून स्त्रियांना देखील कायदेविषयक संरक्षण प्रदान केले.

**शिफारशी -**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक कार्य समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा, त्यांच्या विचारांचा अभ्यास होऊन ते आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि त्यांच्या विचारांवर संशोधन कार्य करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन तसेच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची -**

1) विश्वामित्र शर्मा, 'भारतरत्न' राजपाल प्रकाशन दिल्ली

2) प्रा. अशोक नाईकवाडे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' विद्याभारती प्रकाशन औरंगाबाद

3) नलिनी पंडित 'आंबेडकर' ग्रंथाली प्रकाशन मुंबई

4) धनंजय कीर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'

5) ज्ञानराज काशिनाथ गायकवाड 'महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर' अमन प्रकाशन कानपूर

6) वर्तमानपत्रे आणि इंटरनेट वेबसाईट्स

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान

**प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे**
डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे - कोलाड, ता.रोहा, जि.रायगड.
shankarmunde40@gmail.com

**प्रस्तावना**

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे 'या राज्यात फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे म्हणतात. विषयाच्या अनुशंघाने मी 'महात्मा फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान' हा विषय निवडला आहे. त्यानुसार मी माझ्या विषयाची मांडणी करून विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

एकोणिसाव्या शतकातील थोर समाजसुधारक कृतिशील, विचारवंत आणि मानवतावादाचा उपासक म्हणून महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांचे नाव समोर येते. विषमतेच्या विरोधात बंड करणार आणि सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा याद्या समाजसुधारक म्हणून जोतीबांचा यथार्थ गौरव केला जातो. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची जोपासना करण्यासाठी सत्याचा आग्रह धरणारे लोकांना सत्याच्या मार्गावर चालण्यासाठी चालना देणारे त्यांच्यासाठी सत्याशोधक समाजाची स्थापना करणारे, आधी केले मग सांगितले या तत्वावर चालणारे जोतिबा हे केवळ एक चालते बोलते समाजसुधारकाच नव्हते तर अन्याया विरुद्ध, शोषणा विरुद्ध झगडणारे, पेटून उठणारे एक खंदे वीर होते.

महाराष्ट्राच्या समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. जनसमाजतील शूद्रातिशूद्र, स्त्रियांच्या जीवनातील अज्ञान आणि दारिद्र्य दूर करण्यासाठी त्यांना पटवून सांगणारे, अज्ञान, दुःख, दारिद्रय हे ईश्वर निर्मिती नाही तर त्याची पाळेमुळे समाजव्यवस्थेत आहे. हे साधारण पटवून सांगणारे असे महात्मा फुले हे आधुनिक जीवनाचे आद्य समाजसुधारक आहेत. तसेच ते आधुनिक मराठी साहित्याचे जनक आहेत. कारण त्यांनी नाटक, कविता, अभंग, अखंड, निबंध, प्रबंध इत्यादी विविध वाङ्मय प्रकार लिहून आधुनिक साहित्याचा पाय घातला. न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर या समाजसुधारकांपूर्वी कितीतरी अगोदरपासून ज्योतिबांचे कार्या सुरूझालेले होते. त्यासाठी त्यांना मिळालेली प्रेरणा, त्यांच्या जीवनात आलेल्या व्यक्ती, त्यांनी वाचलेली पुस्तके, त्यांचा सविस्तर आढावा पुढे घेतला जाणार आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव पडून प्रेरित झालेल्या व्यक्तीचा त्याच्या कार्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न या लेखात केलेला आहे. ज्योतीबांच्या एकूण कार्याचा त्यांनी लिहिलेल्या समग्र साहित्याचा परिणाम किंवा त्याचे योगदान आधुनिक मराठी साहित्याला कसे मिळाले हे त्यांच्या कार्यातून आणि त्या त्या साहित्यप्रकारातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

कोणत्याही व्यक्तीचे योगदान पाहायचे झाल्यास त्याच्या जन्मापासून किंवा त्याच्या जन्मापूर्वीच्या इतिहासापासून ते अगदी त्याची जीवनशैली कशी घडत गेली, त्याच्या जीवनात आलेली स्थित्यंतरे, मृत्यूपर्यंतचा त्याचा जीवनप्रवास त्यांचा आढावा घेणे म्हणजे त्या व्यक्तीने समाजाला दिलेले योगदान असते. योगदान विविध प्रकारचे असते. साहित्याचे, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक शारीरिक इत्यादी. ती व्यक्ती कोणत्या क्षेत्रात कार्य करते, त्या क्षेत्राचा प्रभाव त्याच्या जीवनशैलीवर पडलेला असतो. तर काही वेळेला ती व्यक्ती बहुआयामी सुद्धा असते. एकाच वेळी ती विविध क्षेत्रात कार्य करत असते. पण योगदान मात्र एखाद्या वैशिष्ट्या पूर्ण क्षेत्रात मर्यादित असते. कारण सर्व क्षेत्र एकमेकांशी संलग्न असतात. त्यामुळे एका विशिष्ट क्षेत्रात प्रावीण्या मिळेल असे नाही. एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे असा त्याच्या कार्याचा प्रवास सुरु असतो. पण जेव्हा ती व्यक्ती नावारूपाला येते तेव्हा तिच्या यशाचा आढावा घेताना मागे, भूतकाळात जावे लागते. यालाच त्या व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास म्हटला जातो. इतिहास म्हणजे भूतकाळ उज्वल बनवायचा असेल तर वर्तमानात अधिक चांगले कार्य करून जगाता आले पाहिजे, वर्तमान क्षणिक असतो पण त्यावरच भूतकाळ आणि भविष्यकाळ आधारलेला असतो. थोर व्यक्तीच्या योगदानाचा

विचार करताना त्यांचे चारित्र्य, आत्मचरित्र्याचा अभ्यास करावा लागतो. त्यातूनच त्यांच्या समग्र जीवनाचा त्याच्या कार्याचा आढावा घेता येतो.याच पद्धतीचा अवलंब करून महात्मा ज्योतिबा फुले यांचे मराठी साहित्याला मिळालेले योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

**महात्मा जोतीराव फुले यांचा पूर्वेतिहास - थोडक्यात परिचय :-**

ज्योतिरावांचे पूर्वज गोऱ्हे या उपनावाने सातारा जिल्ह्यापासून पंचवीस कि. मी. दूर असलेल्या कटगुण सारख्या गावात राहत होते. त्यांचे पणजोबा चौगुले होते. चौगुले म्हणजे ग्रामाधिकारांच्या दप्तराची ने-आण करणे. त्यावेळी समाजात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. पाटील गावाचे रक्षण करायचे , कुलकर्णी गावाचा कारभार (आर्थिक) पाहायचे, त्यांना सारावसुली गोळा करण्यास, तसेच कापनीच्या हंगामाच्या पिकाची पाहणी करण्यास कुलकर्णीना सहाय्य करण्यास चौगुले मदत करायचे त्याशिवाय लोहार, सोनार, कुंभार, चांभार इत्यादी कुशल कारागीर आपल्या कौशल्याने वस्तू बनवायचे. रोज तेच तेच काम करून ते कुशल कारागीर झाले आणि त्यांना त्याच नावाने ओळखू लागले. कुंभार म्हणजे मडकी बनवणारा, चांभार म्हणजे चपला बनवणारा. आज त्यांना 'जात' म्हणून संबोधले जाते. तेव्हा वस्तू विनिमयाचे पद्धत होती. वास्तूच्या बदल्यात वस्तू देऊन खरीदी करणे. चलन व्यवस्था नव्हती. त्यामुळे आठवडी बाजार असायचे या आठवडी बाजारात हे कारागीर आपल्या वस्तू विकायला यायचे. त्यामुळे देण्या घेण्याच्या व्यवहार (व्यापार) इथे केला जायचा.

ज्योतिरावांचे पणजोबा चौगुले त्याची मिळकतही जेमतेम होती. त्यावर सर्व कुटुंबाची जबाबदारी होती. तरीही आपले काम इमानेइतबारे करायचे, कोणत्याही आपल्या फायद्यासाठी फसवायचे नाही हे त्यांचे तत्त्व होते. त्यामुळे पूर्ण करण्यात बरोबर काम करताना त्यांना त्यांच्या सांगण्यानुसार खोटे बोलायला फसवायला सांगायचे. सारा गोळा करताना शेतकऱ्यांकडून अधिक सारा गोळा करायचा वगैरे या गोष्टी त्यांना मान्य नसायचे यावरून त्यांचे सारखे खटके उडू लागले आणि एक दिवस त्यांनी आपली चौगुले ही नोकरी सोडली. उदरनिर्वाहासाठी दुसरा व्यवसाय करणे आवश्यक होते म्हणून ते काटगुण त्यांचे मूळ गाव सोडून पुरंदर यात खानवडी गावात आले. तेथे त्यांना एक मुलगा झाला त्याचे नाव शेटीबा ठेवले. आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा त्यामुळे लाड केले गेले अती लाडाने तो बिघडू गेला वडिलांनी मिळविलेली थोडीफार संपत्ती होती की उधळून बसला पुन्हा उदरनिर्वाहाचे हाल होऊ लागले. पुढे त्यांना पुरंदर सोडून पुण्यात येऊन राहावे लागले. शेटजींचे लग्न होऊन त्यांना तीन मुलगे झाले. रानोजी, कृष्णा, गोविंद. तसेच ते आधुनिक मराठी साहित्याचे जनक होतेअसेच म्हणावे लागेल. विविधांगांनी लिहिलेल्या त्यांच्या साहित्यकृतीचा आढावा घेतला असता त्यांनी आधुनिक मराठी साहित्याचा पाया घातलेला दिसतो.

**गुलामगिरी :-**

ज्योतिबा एकदा ब्राह्मण मित्राच्या लग्नाला वरातीत चालले असताना एका सनातनी ब्राह्मणाने त्यांना ओळखले व एका कनिष्ठ वर्गातील एका माळयाच्या मुलाने ब्राह्मण मुलाच्या लग्नाच्या मिरवणुकीत चालण्याचे धारिष्ट कसे झाले असे ओरडले. जाती-वाती ची भाषा मर्यादा सोडून त्यांना बोलला हा अपमान ज्योतिबांना सहन झाला नाही.लग्नाच्या मिरवणुकीतून ते घरी आले.पण मनात मात्र तेच विचार त्यांनी आपले विचार वडिलांना बोलवून दाखवले. वडील जुन्या वळणाचे असल्याने ते ज्योतिबांना म्हणाले आज तू ब्रिटिशांच्या राजवटीत आहेस म्हणून त्यांनी (ब्राह्मणांनी) तुझा अपमान करुन सोडले पण हेच कृत्य तू पेशवांच्या राजवटीत केले असतेस तर त्यांनी तुला हत्तीच्या पायाखाली दिले असते. वडिलांच्या बोलण्यावरून त्यांना समजले आपण शूद्र, जुन्या रितीभाती मुकाट्याने पाळाव्यात ब्राह्मणांच्या विरोधात जाऊ नये, हे मत वडिलांचा त्यांना पटण्यासारखे नव्हते. कारण त्यांनी शिवाजी, वॉशिंग्टन, मार्टिन ल्युथर यांच्या जीवनापासून स्फूर्ती घेतली होती. त्यांना वाटायचे मी सुशिक्षित आहे, चांगले काय आणि वाईट काय हे मला समजते शिक्षणाच्या बाबतीत मी आणि ब्राह्मण एकाच शैक्षणिक पात्रतेचे मग मी कमी दर्जाचा कसा.मानवता हा एकच धर्म आहे मग असं जातीभेद धर्मभेद का?

यातून त्यांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ इ.स. १९७३ साली लिहिला.गुलामगिरी मग ती धार्मिक, सामाजिक, आर्थिक अथवा कोणत्याही स्वरूपाची असो ज्योतिबांना त्याचा तिटकारा होता.

त्यांच्या या ग्रंथाची सुरुवातच होमरच्या काव्याने केली आहे.'ज्यादिवशी मनुष्य दास होतो, त्या दिवशी त्याचा अर्धा सद्‌गुण जातो'.हा ग्रंथ प्रश्नोत्तर स्वरुपात त्यांनी लिहिला आहे.त्यात सोळा प्रकरणे आहेत.

ज्योतिबांना गुलामगिरीची प्रथा भारतातूनच नव्हे तर संपूर्ण जगातून समूळ नष्ट व्हावी असे वाटत होते.

आपल्या समाजातील शूद्र बांधवांची ब्राह्मण लोकांच्या गुलामगिरीतून मुक्तता केली पाहिजे. हे सांगण्यासाठी त्यांनी पौराणिक कथांमधील मत्स्य, कच्छ, वराह, नृसिंह, वामन, परशुराम याचे दाखले दिलेले आहेत. आर्य भारतात वायव्येकडून आले, त्याआधी त्यांचे व मूळचे रहिवाशी यांचे सारखे संघर्ष चालू होते.शेवटी नृसिंह वामन अवतार घेऊन शत्रूचा नाश करावा लागला.तसेच समाजात जेव्हा दयाचार बोकाळतो तेव्हा कपटनीतीनेच त्यावर आळा बसवावा लागतो.असा पौराणिक दाखले देऊन ज्योतीबांनी ब्राह्मण कसे शूद्रांनी शूद्रांना फसवत होते ही परिस्थिती पेशवाईचा अस्त होईपर्यंत तशीच होती.इंग्रजांनी शिक्षणाची दरवाजे सर्वांना उघडे करून दिले.त्याचा फायदा ब्राह्मणांनीच जास्त घेतला.शूद्रांनी त्याचा फायदा हवा तसा घेतला नाही.पुढे इंग्रज दप्तरी, उच्च पदावर इंजिनियर, डॉक्टर, शिक्षक, पत्रकार, पंडित, पुरोहित इत्यादी पदावर ब्राह्मणच होते. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला वाटू लागले की हेच खरे सत्तधारी आहेत. त्यामुळे शेतकरी कष्टकरी वर्गावर अन्याय होत होते पण त्याविरुद्ध आवाज उठविण्याचे धारिष्ट शेतकऱ्यात, सर्वसामान्यांत नव्हती त्यामुळे अन्याय सहन करणे हा एक मार्ग तर दुसरा मार्ग इंग्रज सरकारने समाजाला शिक्षण देऊन त्यांना सरकारी नोकरीत सामावून घेणे त्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही आणि त्याचा फायदा बहुजन समाज शूद्रातिशूद्र स्त्रियांनी घेतला तरच त्यांची या सनातनी ब्राह्मण या गुलामगिरीतून सुटका होणार आहे हेच ज्योतीबांनी गुलामगिरी या ग्रंथातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.पुढे या ग्रंथांचा उपयोग अमेरिकेत निग्रो गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी वापरला. तसेच आधुनिक मराठी साहित्यात मार्क्सवादी विचारसरणीचा वापर नारायण सुर्वे यांनी आपल्या काव्य लेखनासाठी करून गिरणी कामगारांच्या समस्या मांडण्यासाठी केलेला दिसतो.यावर ज्योतीबांच्या विचाराचा पगडा असलेला दिसतो.काही कामा निमित्ताने त्यांना मुंबईत यावे लागत असे, त्यावेळी त्यांनी गिरणी कामगारांची हाल पाहिले होते.दहा-बारा तास काम करणे, वेतनवाढ नाही वगैरे पण जोतिबांचे लक्ष शूद्रातिशूद्र आणि स्त्रियांच्या दास्यत्वा कडे होते. त्यांना बाहेर काढण्यासाठी त्यांचे प्रयत्न होते

१९८० नंतरच्या अस्तित्वात आलेल्या संवादांची संकल्पना यात ग्रामीण, दलित, देशी, जनवादी, साम्यवादी फुलेवादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी या सर्वच साहित्य प्रवाहांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**नाटक :-** ज्योतीबाने १८५५ मध्ये तृतीय रत्न हे लहानसे नाटक लिहिले या नाटकाची सुरुवात त्यांनी अशी केली आहे

विद्येविना मती गेली | मती विना नीती गेली |
नीतीविना गती गेली | गतीविना वित्त गेले |
वित्त विना शुद्र खचले | हे सारे अनर्थ एका अविद्येने केले |

हे अनर्थ दूर करायचे असेल तर शुधानिशूद्रांना, स्त्रीयांना शिक्षण देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे ज्योतिबा ' शिक्षणाला ' माणसाचा तिसरा डोळा समजतात आतापर्यंत हा समाज शिक्षणापासून वंचित राहिला का हे ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या निदर्शनास त्यांनी आणून दिले. खालच्या जातीच्या लोकांना शिक्षण देण्यात ब्राह्मणांचा अडथळा कसा येतो ते सांगितले ज्योतिबांना माहीत होते आज ना उद्या इंग्रजी भारतातून जाणार आहेत ते असेपर्यंतच कनिष्ठ वर्गाला, स्त्रियांना शिक्षण देऊ शकतो ते गेल्यानंतर स्थिती पूर्वीप्रमाणेच होईल जोतिबांच्या प्रयत्नांना यश आले. त्यावेळेचे इंग्रज अधिकारी लॉर्ड मेकॉले यांनी ' झिरपण्याचा सिद्धांत ' मांडला त्या सिद्धांतात त्यांनी सांगितले शिक्षण प्रथम समाजातील पहिल्या वर्गाला म्हणजे ब्राह्मणांना दिले जाईल नंतर ते शिक्षण हळू हळू झिटपत झिटपत पुढे शेवटी सुद्धा पर्यंत पोहोचेल ज्योतिबांना हे मान्य नव्हते कारण हे शिक्षण शिरपून येण्यात किती वेळ जाईल हे सांगता येत नाही.

ज्योतीबांनी आपल्या नाटकाला ' तृतीय रत्न ' हेच नाव का दिले असा प्रश्न पडतो पण विचारांती हे नाटक वाचल्यानंतर समजते ज्योतिबांना ' रत्न ' हा शब्द नेत्र डोळे या अर्थाने वापरलेला आहे. आधुनिक शिक्षण हा आपला तिसरा डोळा आहे. विद्येचे महत्त्व पटून देण्यासाठी त्यांनी नाटक हा साहित्यप्रकार वापरला आहे.

नाटक हा एकमेव साहित्य प्रकार एक श्राव्य आहे. प्रत्यक्ष घटना रंगमंचावर पाहतो कानाने एक तो त्यामुळे त्याचा प्रभाव जास्त पडतो त्यामुळे त्यांनी पहिला प्रयत्न नाटक लिहिण्याचा केला प्रत्यक्ष रंगमंचावर नाटक सादर केले की नाही याचा पुरावा सापडत नाही. पण लिखित सहिता मात्र आजही उपलब्ध आहे.

नाटकाची परंपरा पाहता मराठी साहित्यात मराठी रंगभूमीचा प्रारंभ १८४३ साळी विष्णुदास भावे यांनी केला.पण मराठी लाख नाट्यलेखन अठराशे १८५६ साली प्रथम झालेले दिसते ते गो. म. माडगावकर यांच्या ' व्यवहारात उपयोगी नाटक ' या पाचप्रवेशी नाटका पासून झाली असे मानले जाते.पण खरे पाहता जोतिबांचे तृतीय रत्न हे नाटक १८८५ साली लिहिले आहे. त्यामुळे लिखित मराठी नाटक म्हणून ' तृतीय रत्न ' सांगता येईल पहिले मराठी नाटककार म्हणून ज्योतिराव फुले यांचेच नाव घेतले पाहिजे. वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांनी हे नाटक प्रथम लिहून आपल्या वाड;मय लेखनाला प्रारंभ केला यानंतर ज्योतीबांनी नाट्यलेखन केलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांच्या ग्रंथसंपदे मध्ये ' तृतीय रत्न ' हे एकमेव नाटक सापडते.

**पवाडा :-**

इ.स.१८६९ साली ज्योतीबांनी शिवछत्रपतींचा पवाडा लिहिला तो प्रसिद्ध झाला यापूर्वी अर्वाचीन मराठी साहित्य छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर, कर्तृत्वावर अनेक पवाडे रचले गेले गायले गेले.

ज्योतीबांनी महाराजांवर पवाडा रचला प्रस्तावनेत त्यांनी लिहिले आहे की या पवाड्यांची रचना आपण कशी केली आणि त्यावेळी आपल्या डोळयासमोर वाचक वर्ग होता तर तो कुणबी, महार ,मांग, माळी या लोकांच्या उपयोगी पडावा या हेतूने हा पवाडा रचला आहे. पवाड्यात त्यांनी शिवाजी महाराजांचा भावपूर्ण शब्दांत गौरव केला आहे. कुणब्यांचा शुद्र राजाचा गौरव करून शूद्रातिशूद्र क्षेत्र्याचा स्वाभिमान चेतविला आहे. ज्योतीबांनी आपले पद्यलेखन राजांच्या पवाड्याने करावी ही शूद्रांना भूषण वाटावे याला मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

ज्योतीबांनी महाराज्यांच्या पोवाड्यात त्यांच्या पूर्वजांच्या इतिहासापासून सुरुवात करून ते अगदी त्यांच्या शेवटपर्यंत च्या घटना त्यात आल्या आहेत. पवाडा लांबू नये कंटाळवाणा वाटू नये म्हणून त्यांचे आठ भाग केले आहेत एकाच विषयाची घटनांची पुनरावृत्ती टाकली आहे. साधी-सोपी मराठमोळी सर्वसामान्यांना समजेल अशी भाषा वापरली आहे. ज्योतिबानी महाराजांचा पराक्रम,सांगण्यासाठी पवाडा हाच वाडमय प्रकार निवडला कारण पवाडा हा जनमानसाची एक दम पकड घेणारा सामर्थ्य शाली रचनाप्रकार आहे पवाडा गाणारे हे शाहीर असतात ते गावची जत्रा, गावचा बाजार अशा गर्दीच्या ठिकाणी जाऊन गात असतात. त्यामुळे त्यातून समाज प्रबोधन होते. आपल्या राजांचा पराक्रम सर्वसामान्यांना समजतो. पवाड्यामध्ये वीररस असतो. तसेच तत्त्व,विचार ,नीती ,बोध, चिंतन, ध्यास याही गुणांचा समावेश केलेला असतो. तसेच उत्स्फूर्तता आटेकरपणा,चैतन्य आणि आवेग या वैशिष्ट्यांचा समावेश असतो . महाराजांचा पवाडा रचण्या मागची ज्योतिबाची संकल्पना हीच होती की प्रतिकूल परिस्थितीत असतानाही त्यावर मात करून आपल्या अंगाच्या गुणांनी त्यांनी सर्वसामान्य जनतेच्या मदतीने आणि सहकार्याने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

पुरण कालपासून वर्णसंघर्ष आहेच ब्राह्मणांकडून क्षत्रियांना उपनयनविधी करण्याचा ( जान्हवे घालण्याचा) अधिकार नाकारला पण शिवाजी महाराजांनी एका कुणब्याला जान्हवी देऊन तुम्ही क्षत्रीय आहात हा आत्मविश्वास दिला. त्यांच्यातील सत्व आत्मविश्वास आणि क्षात्रतेज प्रज्वलित केले आणि शूद्रातिशूद्रांना स्त्री-पुरुषांना छळणाऱ्या यवनांना

काळाप्रमाणे (यमा सारखा) धाक बसविला. असा अब्राह्मणी दृष्टिकोन ज्योतिरावांनी शिवाजी महाराजांचा पवाडा रचून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ब्राह्मणांचे कसब :-**

जोतीरावांची वाङ्मय निर्मिती ही बहुतांशी सहेतुकच आहे ' ब्राह्मणांचे कसब ' लिहून महात्मा फुले यांनी मराठीत स्वतंत्र सामाजिक खंडकाव्य याचा पाया घातला या काव्या द्वारे त्यांनी जनद्रोही प्रवृत्तीच्या काळया कारवाया चव्हाट्यावर मांडण्याची धाडसी कार्य या पद्याने केले आहे.या खंडकाव्य मागचा उद्देश तिहेरी आहेत. पहिल्या हेतू शूद्रातिशूद्रांना त्यांच्या दुरवस्थेची कारणे सांगून त्यांच्या मध्ये प्रबोधन करणे दुसरा हेतू बहुजन समाजातील सुरक्षित तरुणांना आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देणे आणि तिसरा हेतू मागासलेले जाती-जमातीतील शिक्षण प्रसार केल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही. या खडक काव्याचे वैशिष्ट्य आहे की याची रचना नऊ खंडात केली आहे. वाघ्या मुरळी गोंधळ पोवाडा आणि अभंग यांचा उपयोग यात केलेला दिसतो. ज्योतिबा शूद्रांना आवाहन करतात की ज्या घटनांमुळे तुम्ही शुद्ध झाला आहात त्यांचा शोध घ्या ज्या खेटरांची ( पादुकांची) पूजा करतात त्या खेटरांची पादुकांची पूजा करता त्या खेटरांची त्या ब्राह्मणांची पूजा करा (खेटरांचा भार) या खंड्काव्यात ज्योतिबा ची लेखणी अधिक आक्रमक झालेले दिसते भाषाही तिखट,धारदार आहे. एकीकडे अन्यायाविरोधात प्रतिकार करण्यासाठी पेटून उठा मुकेपणाने अन्याय सहन करू नका ही तुमची चूक आहे याची जाणीव त्यांनी सुधारणा करून दिली एकूणच जोतिबांची तळमळ दिसून येते. ज्योतीबांच्या याच प्रेरणेतून पुढच्या कालखंडातील अनेक अनेक दलित लेखकांनी आपली आत्मकथने लिहीलेली दिसतात त्यात स्त्रियांचाही समावेश आहे. **उदा.** दया पवार यांचे ' बलुत ', लक्ष्मण माने ' उपरा ', शरणकुमार लिंबाळे ' अक्करमाशी ', शांताबाई काळे ' माझ्या जन्माची चित्तरकथा '

हे ज्योतीबानी मराठीला दिलेले योगदान नच समजावे लागेल कारण हीच प्रेरणा घेऊन बाबासाहेबांनी जोतिबांचे लिहिलेले कार्य पुढे चालू ठेवले आणि त्यांनी शूद्रांना प्रेरित केले शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे बाबासाहेबांचे ब्रीद वाक्य ही प्रेरणा त्यांना ज्योतिबा पासूनच मिळालेली आहे.

**शेतकऱ्यांचा आसूड :-**

जोतीरावांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ इ. स.१८८३ मध्ये लिहिला पण त्याच्या हयातीत तो प्रसिद्ध होऊ शकला नाही. मात्र या ग्रंथाचे लिखाण पूर्ण झाल्यावर त्याची एक प्रत गव्हर्नर जनरल व एक प्रत सयाजीराव गायकवाड यांना पाठविली. ज्योतिबांना हा ग्रंथ लिहिण्यामागची प्रेरणा त्यांना इंग्लिश संस्कृत प्राकृत ग्रंथ व आताच्या शूद्रातिशूद्रांच्या दीनवाणी परिस्थिती पाहून सुचला असे जरी त्यांनी सांगितले असले तरी ज्योतिबांना शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीची जाणीव होती कारण ज्योतिबा स्वतः पुणे, मुंबई ,ठाणे, जुन्नर ,ओतूर इत्यादी ठिकाणी जाऊन तेथील शेतकऱ्यांना शूद्रांना भेटून त्यांची परिस्थिती जाणून घेतली त्यामुळे या ग्रंथातील बरेचसे लिखाण वर्णनात्मक आहे. त्यांनी स्वतः पाहिलेले वर्णन ते करतात जशी टाळी एका हाताने वाजत नाही तसेच शेतकऱ्यांच्या या स्थितीतील ब्राह्मण शासनच कारणीभूत नाही तर काही प्रमाणात स्वतः शेतकरी ही कारणीभूत आहे. हे त्यांना दाखवून दिले पटवून दिले ज्योतिबा कोणतीही समस्या सांगून सोडत नाही तर त्यावर उपाय सुचवतात तसेच त्यांनी या ग्रंथात शेतकऱ्यांच्या अवनत स्थितीचे विदारक चित्र रेखाटून ही स्थिती कशी सुधारायची यावर त्यांनी उपाययोजना ही सुचविली आहे.त्यासाठी ते शेतकऱ्यांना सांगतात जमिनीची धूप थांबवण्यासाठी शेतात बांध घाला, धरणे, पाठ, बंधारे बांधून पाणी आडवा जिरवा गुरांची योग्य निगा राखा ते तुमच्या हातात आहे. ते तुम्ही करा दुसऱ्या बाजूने इंग्रज सरकार जे शेतकऱ्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने कायदे करत आहे त्याचा फायदा घ्या आपल्या मुलांना शेतीविषयक ज्ञान द्या त्यासाठी त्यांना परदेशात पाठवा सरकार अनुदान देते त्याचा फायदा घ्या

सावकार व्यापारी यांच्यावर करडी नजर ठेवा.फसवणूक होत असेल तर पोलिसांच्या निदर्शनास आणून दाखवण्यात घाबरू नका जोतिबांनी दोन्ही बाजूंनी प्रयत्न करून शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला आहे. याच संकल्पनेतून पुढे महात्मा गांधीजींनी खेड्यांकडे चला अशी घोषणा केली. खेडी सुधारली तर देशाची अर्थ व्यवस्था सुधारेल अशी गांधीजींची ही धारणा होती ही एका अर्थी पुढील पिढीसाठी सुधारित शेती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न गांधीजींनी केलेला दिसतो.

**सत्सार अंक १ व सत्सार अंक २ :-**

ज्योतिरावांनी इ स १८८५ मध्ये ' सत्सार ' हे नियतकालीक सुरू केले पहिल्या अंकाला सर्वांनी या हिंदू मुसलमान व ख्रिस्ती लोकांनी चांगला प्रतिसाद दिला पुढे हे नियतकालीक असेच चालू ठेवावे असे सांगितले.ज्योतीबांनी आपले विचार मांडण्यासाठी नियतकालीचा उपयोग केला याचे कारण दैनंदिन जीवनातील रोजच्या घडामोडी ताज्या बातम्या लगेच पोचविण्याचे प्रसार माध्यम म्हणजे नियतकालिक घराघरात पोचणारे प्रत्येक व्यक्ती ऐकू शकते, वाचू शकते, सांगू शकते यातून समाज प्रबोधन कमीत कमी वेळेत अधिक लोकांपर्यंत आपले विचार पोहोचू शकतील असे ज्योतिबांना वाटले. पहिल्या अंकात त्यांनी ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज यांची भूमिका भिन्न जातीतील स्त्री- पुरुषांच्या संबंधातून जन्मलेल्या संततिचे सामाजिक स्थान आणि आर्यभटाची धर्मकल्पना ,स्थल-काल, परिस्थितीचा विचार करून त्यांनी हे लिखाण केलेले आहे. ब्राह्मोसमाज प्रार्थना समाज हे विश्व धर्माची शिकवण देतात बघूभावाची शिकवण देतात पण आपल्या धार्मिक कार्यात,दैनंदिन व्यवहारात महारमांगांना बरोबरीचे स्थान मात्र देत नाहीत धार्मिक सामाजिक कार्यात त्यांना समजावून घेत नाहीत मग अशा संस्थांची निर्मिती मूठभर लोकांसाठीच केलेली आहे या संकुचित विचारावर भाष्य केले आहे. या संकल्पनेतूनच त्यांनी शुद्र अतिशुद्र स्त्रिया एकूणच सर्वांसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केलीस असावी. दुसरा विचार भिन्न जातीतील स्त्री-पुरुषांच्या संबंधातून जन्मलेल्या संततीची सामाजिक स्थान काय असेल त्या संततिने नेमके कोणत्या धर्माचे आचरण करावे असा प्रश्न सर्वसामान्यांना पडत असेलच कारण इंग्रजी राजवटीत वैचारिक स्वातंत्र्य होते शिक्षणामुळे तरुण पिढी तयार होत नव्हती स्त्रियाही शिक्षण घेऊन नोकरी करू लागल्या होत्या. त्यामुळे शहरी भागात जनव्यवस्था प्रकर्षाने जाणवत नव्हती. त्यामुळे प्रेमविवाह सर्रास होत होते त्यात ब्राह्मण - महार इंग्रज-मराठा असे विवाह होत होते. महाराष्ट्रात समाजव्यवस्था ही पितृसत्ताक पुरुष प्रधान होती. त्यामुळे मुलाला वडिलांचे नाव मिळत असते. डॉ. श्री.व्यं . केतकर यांची ब्राह्मण कन्या १९३० ही कादंबरी याच आशयाची आहे. तो किती अगोदर ज्योतीबांनी मांडला होता.आजही मुलीचे लग्न जमवताना मुलीच्या आईचे कूळ, जात याची विचारपूस केली जाते. आज आपण एकविसाव्या शतकात आहोत जातिभेदाच्या कितीतरी पुढे गेलो आहोत. आजची तरुण पिढी शिक्षण, करिअर, पैसा यांना महत्त्व देते ग्रामीण भागात आजही जात व्यवस्था पाळली जाते. उच्चवर्णीयांनी कनिष्ठ वर्गातील मुजोशी विवाह केला असेल तर समाज त्या संपूर्ण घराला बहिष्कृत करते.

याची प्रेरणा आत्मकथन लिहिण्याचा दलित लेखकांना मिळालेली दिसते.

' आर्यभटाची धर्म संकल्पना ' या लेखात ज्योतीबांनी आर्य ब्राह्मणांनी शुद्राच्या अज्ञानी अडाणीपणाचा फायदा घेऊन ग्रंथांना ईश्वर माना असे सांगितले.

**सत्सार अंक 2 :-**

या अंकात ज्योतीबांनी रमाबाई रानडे व ताराबाई शिंदे यांचा गौरव केला आहे.

रमाबाईंचा लेख ' कुऱ्हाडीचा दांडा ' ' गोत्यास काळ ' या मथळयाखाली लिहिला आहे. यात त्यांनी रमाबाईंनी केलेले धर्मांतर त्यातून त्यांचे सामाजिक कार्य दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ताराबाई शिंदे यांची ' स्त्री पुरुष तुलना ' हे पुस्तक लिहिले या दोन्ही स्त्रियांवर काही समाजघटकांनी दुसऱ्या नियतकालिका मधून टीका केला त्यांना उत्तर

देण्यासाठी हा लेख लिहिला. पुढच्या काळात स्त्रियांनी साहित्याच्या विविध प्रकारात लेखन केलेले आहे. सुरुवातीला कथा हा साहित्यप्रकार निवडून, बांधव आदी कथा लिहिलेल्या असतात. त्यामध्ये काशीबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के, क्षमादेवी राव यांनी तर समाजातील कोळी, कोष्टी, कष्टकरी स्त्रियांवर आधारित कथा लेखन केलेले दिसते. हे ज्योतीबांनी, सावित्रीबाईंनी स्त्रीयांना शिक्षण देण्यासाठी आपले आयुष्य वेचले त्याचेच फळ आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

'इशारा' जोतीरावांची पुस्तिका इ. स. १८८५ मध्ये प्रसिद्ध झाली. या पुस्तकाच्या प्रारंभी संत कबीरांचा दोहा आहे. शूद्रातिशूद्र व स्त्रियांच्या दुःखाचे स्वरूप दाखविण्यासाठी त्यांनी दोहा प्रकार निवडला.यातून ज्योतीबांच्या विचारांवर समाजाकडून काही प्रतिक्रिया आल्या आहेत त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी त्यांनी 'इशारा' ही पुस्तिका लिहिली आहे. पहिली मत जातिभेद असला म्हणून आपल्या इष्ट हेतूस तो बिलकुल आडवा येत नाही. या मताने त्यांनी खजना केले आहे. ते असे ब्राह्मण आणि शूद्र या दोन्ही जातीतील व्यक्ती मध्ये कष्ट करण्याची ताकद पाहिली तर शूद्र कष्टाळू आहेत. समाजातील सर्व निम्नस्तरीय कामे ते करतात. अगदी ब्राह्मणाच्या घरात, शेतात काम करतात. अगदी त्यांच्या घरी एखादे ढोर जनावर मेले तर त्याला गाढण्यापर्यंतचे काम ते करतात. त्याचा मोबदला देतातच असे नाही, दिला तरी त्याच्या मर्जीनुसार. हाच विचार पुढच्या काळात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेला आहे. त्यांनी ब्राह्मणांना सरळ सरळ प्रश्न विचारला आहे, तुमच्या घरी ढोरे मेले तर स्वतः का नाही त्याला पुरत, त्यासाठी शूद्राला का बोलावता, त्या बदल्यात मोबदला देता का, बाबासाहेबांनी ब्राह्मणांना सांगितले मी तुम्हाला मोबदला देतो तो हे काम तुम्ही करून दाखवा. स्पष्ट वक्ते पणा हा गुण बाबासाहेबांना ज्योतिबां कडूनच मिळाला. कारण बाबासाहेबांनी जोतिबांना आपले गुरु मानले आहेत.

दुसरा प्रश्न इशारामध्ये विचारलेला आहे. शेतकऱ्यांची स्थिती सुधारली की नाही?

याचे उत्तर देताना ज्योतिबा म्हणतात देश, काल, परिस्थितीवर अवलंबून असते. शेतीही त्यावेळी पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर केली जायची. त्यामुळे सुका दुष्काळ, ओला दुष्काळ दोघांनाही शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत असे. सुका दुष्काळ पडला की गुरेढोरे मरून जात, शेतकरी स्थलांतर करीत, त्याच्या जमिनी सावकार, पाटील हडप करीत. ओल्या दुष्काळात घरे-दारे, माणसे वाहून जातात. नैसर्गिक आपत्तीतून वाचले तर कुणबी म्हणून दुसऱ्याच्या शेतावर काम करीत पिकावर अधिकार धान्याचा मालकाचा शेतकऱ्याची परिस्थिती सुधारली ती ब्रिटिश राजवटीत शिक्षणाचा प्रसार, शेतकऱ्यांना विविध सोयी दिल्या, जीवनाला स्थैर्य मिळाले काही शेतकऱ्यांची स्थिती सुधारली आहे. मुख्यतः सावकाराच्या ब्राह्मणांच्या फसवणुकीपासून थोडीफार सुटका झालेली आढळते.

**सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक :-**

जोतीरावांच्या शेवटचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर १८९१ मध्ये प्रसिद्ध झाला. हिंदूधर्म सत्तेवर जरी ज्योतीबांनी वारंवार टीका केली असली तरी मनुष्यमात्राच्या जीवित दाखल्यांसाठी धर्म भावनांची आवश्यकता आहे. अशी त्यांची धारणा होती. माणसाने नास्तिक नसावे तसेच आपल्या धर्माविषयी थोडी तरी जाण ठेवावी म्हणून जोतिबांनी सत्यशोधक समाजातील आपल्या अनुयायांच्या मार्गदर्शनाखाली आपला उजवा हात पक्षाघाताने निकामी झालेला असताना धीर न सोडता डाव्या हाताने हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी स्त्री-पुरुषांनी एकत्र कसे वागावे, सर्वसामान्य जनतेने आपले दैनंदिन व्यवहार सांभाळून त्याचे वाचन व मनन करावे यासाठी साध्या सोप्या सुटसुटीत भाषेत हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांचे धर्मनिष्ठा ही सत्य नीतीवर आधारलेली आहे. भावभक्तीने केलेले कोणतेही काम पूर्ण होते हा त्यांचा विश्वास हिंदू धर्मात जन्मापासून ते मृत्यूपर्यंत विविध विधी करावे लागतात त्यापैकी काही मोजकेच विधी करावेत यात जन्म, नामकरण, लग्न, अंत्यविधी, श्राद्ध इतकेच करावे त्यांची धर्म जिज्ञासा निकोप

तत्त्वाला धरून होती.त्यांची धर्मकल्पना विश्व धर्माची आहे. मानवतावादाकडे वळलेली आहे हेच त्यांनी यात सांगितले आहे.

**योगदान:-** ज्योतीबांच्या समग्र साहित्याचा आढावा घेतला असता असे आढळते की, जोतिबांनी साहित्याच्या विविध प्रकारात लेखन केले आहे. ते पुढच्या काळात रूढ झाले. संत वाङ्मय यापासून अभंग, दोहे प्रकार घेतले पण त्यांचे अनुकरण मात्र केलेले दिसत नाही. प्रत्येक कृतीमागे त्यांची स्वतःची निष्ठा, कळकळ प्रत्ययास येते. हेच विचार पुढच्या पिढीने घेऊन लेखन केलेले दिसते. हेच खरे यांचे योगदान आहे म्हणूनच लोकांनी त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली.

**समारोप :-**

महात्मा ज्योतिबा फुले महाराष्ट्रातील समाज परिवर्तन चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत शूद्रातिशूद्र व सर्व वर्गातील स्त्रीयांसाठी कार्य केले. त्यांना शेवटपर्यंत साथ दिली ते त्यांची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी. त्यांच्या नंतरही ज्योती ज्योतिबांचे उर्वरित कार्य पूर्ण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. जोतिबांचे व्यक्तिमत्व विविधांगांनी नटलेले होते. ते दृष्टी समाजसुधारक होतेच तसेच ते आधुनिक मराठी साहित्याचे जनक होते. कारण त्यांना गद्य-पद्य, नाटक, निबंध, अरवड अशा विविध प्रकारांतून लेखन केलेले आहे. आधुनिक मराठी साहित्याचा पाया घातलेला दिसतो. 'अखंड' हा नवीन साहित्य प्रकार आलेला दिसतो. त्यामुळे खर्‍या अर्थाने महात्मा ज्योतिबा फुले यांनी वाङ्मयाला दिलेले योगदान म्हणावे लागले. 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' त्यांच्या विचारसरणीचा वारसा घेऊन पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्मीयांसाठी मोलाचे कार्य केले. भारतीय संविधानात स्त्रियांना, शूद्रांना, अनुसूचित जाती-जमातीला जागा मिळवून दिल्या. भारतीय संविधानाचे ते शिल्पकार ठरले. हे सर्व गुरु मुळेच शक्य झाले कारण बाबासाहेब ज्योतिबांना आपले गुरु मानत असत. गुरु नेहमी आपला शिष्य आपल्यापेक्षा मोठा होईल याकडे पाहत असतो तेच बाबासाहेबांनी सार्थ करून दाखविले. भले आज जातीव्यवस्था समाजातून समूळ नष्ट झाली नाही पण त्यांना मानाने जगता तरी येते, आपली मानवी हक्क मांडता येतात, आपले विचार मांडण्याचा अधिकार मिळाला. ज्या स्त्रिया चूल आणि मूल करून घरात बसत होत्या त्या आज पाहिले तर असे एकही क्षेत्र नाही तिथे स्त्रिया कार्यरत नाही. खऱ्या अर्थाने जोतिबांचे जीवन कार्य सार्थक झाल्यासारखे वाटते त्यांना लोकांनी दिलेली महात्मा महान असा आत्मा खरोखर सार्थ आहे.

**संदर्भग्रंथ व टिपा : -**

१) संपादक - हरी नरके : आनंद यादव - महात्मा फुले गौरव ग्रंथ पृष्ठ ६१४
२) धनंजय कोरे - महात्मा ज्योतिराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृष्ठ १ ते ८
३) धनंजय कोरे - महात्मा ज्योतिराव फुले पृष्ठ २२
४) महात्मा ज्योतिराव फुले पृष्ठ १३९
५) गं.बा. सरदार - महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार. ग्रंथाली प्रकाशन मुंबई
६) महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार - पृष्ठ ४४
७) महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार - पृष्ठ ५४
८) महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार - पृष्ठ ७६, ७७, ८१, ८२, ८४, ८५, ८७, ८९, ९०, ९२
९) महात्मा फुले - व्यक्तित्व आणि विचार - पृष्ठ १९९
१०) संपादक धनंजय कोरे / स. ग. मालशे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई - महात्मा फुले समग्र वाङ्मय

# क्रीडा शिक्षणातील सर्वेक्षण पध्दती

**डॉ. प्रा. साखरे देवानंद लिंबराज[१] डॉ. प्रा.चाऊस साजेद अमर[२]**
[१]शा. शिक्षण महाविद्यालय कळंब
[२]शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण.

**प्रस्तावना**

शिक्षण आणि शारीरिक शिक्षणातील संशोधन पध्दती ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शारीरिक शिक्षण संशोधनाच्या अभ्यासातून यथार्थ स्थिती समोर येते. संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. त्यामध्ये ऐतिहासिक संशोधन पध्दती, प्रायोगिक संशोधन पध्दती आणि वर्णनात्मक संशोधन पध्दती या तीनही पध्दती संशोधन कार्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या पध्दतीशिवाय संशोधन पध्दतीचे एकूण चार पध्दती आहेत त्यामध्ये सहसंबंध पध्दती, व्यक्ती अभ्यास पध्दती, तुलनात्मक कार्यकारण पध्दती आणि सर्वेक्षण संशोधन पध्दती इत्यादीचा समावेश आहे. संशोधनात सर्वेक्षण पध्दतीस अन्यन्य साधारण महत्व आहे. सामाजिक सर्वेक्षणात सामाजिक विज्ञानाच्या अध्ययनाची एक पध्दती मानली जाते. सामाजिक सर्वेक्षणाद्वारे केवल सामाजिक समस्यांचेच संशोधन केले जाते असे नाही तर सामाजिक समस्येचे निराकरण करणे हे सुध्दा सर्वेक्षण संशोधन पध्दती एक प्रभावी संशोधन पध्दती म्हणून परिचित आहे. वर्तमान अवस्था, यथार्थ सद्य स्थिती या संशोधनासाठी जी संशोधन पध्दती वापरली जाते ती म्हणजे सर्वेक्षण संशोधन पध्दती होय. वर्तमान स्थितीची माहिती मिळवून या माहितीच्या आधारे संशोधन निष्कर्शापर्यंत जाता येते म्हणून ही पध्दती सर्वात लोकप्रिय आहे.

## माहिती संकलनाची साधने

संशोधन कार्य करीत असतांना संशोधकाला संशोधन निवडी पासून संशोधन कार्याची परिपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. संशोधन कार्यात माहिती संकलनाची साधने अत्यंत उपयुक्त घटक आहेत. कारण या साधनाशिवाय संशोधन कार्य पूर्ण होवू शकत नाही. संशोधन साधने किंवा माहिती संकलनाची साधने अनेक आहेत त्या साधनाचा वापर करून आपणास संशोधन कार्यास गती देता येते. संशोधन साधने किंवा माहिती संकलनाची साधने पुढील प्रमाणे आहेत.

### निरीक्षण

संशोधन कार्यात निरीक्षणाला अत्यंत महत्व आहे. संशोधन प्रक्रियेतील एक प्रभावी साधन आहे. तथ्यांना संकलित करण्यांचा एक प्राथमिक स्त्रोत म्हणून याकडे पाहिले जाते. संशोधन कार्यात माहिती संकलनासाठी वापरले जाणारे निरीक्षण तंत्र होय. निरीक्षण करणे हे मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. संशोधन कार्यात निरीक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. निरीक्षणाच्या नोंदी घेवून संशोधन कार्यास गती देता येते. निरीक्षणाच्या दोन पध्दती आहेत सहभागी निरीक्षण आणि असहभागी निरीक्षण या माध्यमातून संशोधनाचे कार्य सुरळीतपणे पार पाडले जाते.

### अनुसूची किंवा पडताळासूची

संशोधनात अनुसूची किंवा पडताळासूचीला अन्यन्य साधारण महत्व आहे. अनुसूचीद्वारे आवश्यक तथ्यांचे संकलन करण्यात येते. अनुसूचीची व्याख्या करतांना प्रदीप आगलावे म्हणतात, अनुसूचीमध्ये अध्ययन विषयीशी संबंधित प्रश्नाची एक सूची असते, म्हणून त्याला अनुसूची असे म्हणतात. अनुसूचीचे प्रकार अनेक आहेत त्यामध्ये निरीक्षण अनुसूची, मुलाखत अनुसूची, मूल्यांकन अनुसूची, संस्था सर्वेक्षण अनुसूची, प्रलेखीय अनुसूची इत्यादी प्रकार आहेत. त्यापैकी कोणत्याही पध्दतीचा उपयोग करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येते.

### मुलाखत

माहिती संकलनाचे महत्वाचे साधन म्हणून मुलाखत उपयोगात आणली जाते. संशोधनात मुलाखतीचा उपयोग जास्त प्रमाणात होतो. डॉ. लीना देशपांडे म्हणतात, प्रतिसादकाला तोंडी विचारण्याच्या प्रश्नांचा संच म्हणजे मुलाखत होय. मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीला प्रश्न

विचारून त्याची नोंद करण्यात येते. आणि माहितीची नोंद घेवून संशोधन निश्कर्ष काढण्यात येतात.

**पदनिश्चयन श्रेणी**

संशोधन कार्यात पदनिश्चयन श्रेणीला अन्यन्य साधारण महत्व आहे. पदनिश्चयन म्हणजे एखादा प्रसंग किंवा घटना यांचा दर्जा ठरविणे होय. इतर घटकाची तुलना करण्यासाठी उपयुक्त ठरते.

**शोधिका**

माहिती संकलनाचे महत्वाचे साधन म्हणून शोधिका उपयोगात आणली जाते. संशोधनात शांधिकेचा वापर संशोधक करतांना दिसून येतात. शोधिकांमध्ये स्व:ताचे निरीक्षण करून स्वत:बद्दल माहिती घ्यावी लागते. शोधिकांमध्ये प्रश्नांच्या किंवा विधानांच्या रूपाने माहिती विचारून नोंद केली जाते त्या नोंदीवरून निश्कर्ष काढण्यासाठी त्याचा उपयोग होतो. संशोधन कार्यासाठी शोधिका हे साधन अतिशय प्रभावी आहे.

**कसोटी किंवा चाचण्या**

संशोधन कार्यात कसोटी किंवा चाचणीला अत्यंत महत्व आहे. या साधनाचा वापर संशोधन कार्यात होतांना दिसून येतो. संशोधनातील परिणाम जाणून घेण्यासाठी या चाचण्या घेतल्या जातात. या चाचण्यामध्ये विचारण्यांत येणारे प्रश्न हे लघूत्तरी, वस्तूनिष्ठ आणि निबंधवजा अशा अनेक प्रकारची असतात. योग्य प्रश्नाचा वापर करून संशोधन कार्य पूर्ण करण्यात येते.

**प्रश्नावली**

संशोधन प्रक्रियेतील सर्वात महत्वाचे साधन म्हणून प्रश्नावलीचा उपयोग केला जातो. संशोधन कार्यात प्रश्नावलीला अन्यन्य साधारण महत्व आहे. जीवन जगत असतांना आपणास कोणताही प्रश्न पडला की लगेच आपण आपल्या जवळच्या व्यक्तीला विचारुन घेतो त्यांच्या उत्तराने समाधान न झाल्यास आपण इतरांना विचारून घेतो. प्रश्नावलीसाठी भेटण्याची आवश्यकता नाही. संशोधन कार्यासाठी तज्ञ मार्गदर्शकांकडून प्रश्नावली तयार करून ती टपालाने संबंधितांना पाठविण्यांत येते आणि वाट पाहिली जाते त्यानंतर त्यांनी टपालाने ती भरून पाठवून देतात आणि संशोधकाला पुढील संशोधन कार्यास गती मिळते. प्रश्नावलीचे अनेक प्रकार आहेत त्यामध्ये संरचित प्रश्नावली, बंदिस्त प्रश्नावली, मुक्त प्रश्नाली, चित्रमय प्रश्नावली, मिश्रीत प्रश्नावली इत्यादींचा वापर करून संशोधक आपल्या संशोधन कार्यास गती देतात.

**निश्कर्ष**

सर्वेक्षण संशोधन पध्दती माहिती संकलान्या साहित्याला अत्यंत महत्व आहे. वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यांत आला तर या साधनांचा उपयोग करण्यांत येतो. या साधनाच्या माध्यमातून संशोधन कार्य दर्जेदार होतो. माहिती संकलनाची साधने म्हणजे पडताळा सूची, पदनिश्चयन श्रेणी, शोधिका, चाचण्या, प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण या साधनाचा योग्य उपयोग करून संशोधन कार्य दर्जेदार करता येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. डॉ. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. डॉ. लीना देशपांडे, संशोधन मार्गदर्शक मालिका, पुष्प चौथे, सर्वेक्षसण: एक संशोधन पध्दती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
३. प्रा. श्रीपाल जर्दे, शारीरिक शिक्षण संशोधन, तंत्र व पध्दती, चंद्रमा प्रकाशन, कोल्हापूर.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक धोरण

**डॉ.रामराज पंडीतराव गावंडे**
सहयोगी प्राध्यापक लोक प्रशासन विभाग यशवंत महाविद्यालय, नांदेड. महाराष्ट्र
E-mail : ramrajgawandencc@gmail.com

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एक नाव नसुन तो एक विचार झालेला आहे. इतकेच नाही तर ती एक आज सशक्त चळवळ बनली आहे. विसाव्या शतकातील सर्वात बुध्दीमान, महामानव, बोधीसत्व, विश्वरत्न, युगंधर, युगपुरुष, युगप्रवर्तक, कायदे पंडीत, तत्वज्ञानी, शिक्षणतज्ञ, समाज सुधारक, सर्व क्षेत्रातील तज्ञ असणारा या जगातील एकमेव इतिहास घडविणारा नव्हे इतिहास बदलविणारा, भारतरत्नच नव्हे तर विश्वरत्न परमपुज्य डॉक्टर भीमराव उर्फ बाबासाहेब रामजी आंबेडकर यांचा जन्म भारतातील जन्मसत्तेने शुद्र ठरविलेल्या अस्पृश्य समाजातील सर्वसामान्य महार कुटूंबात पिता रामजी सुभेदार आणि माता भिमाबाई या, उभयंताच्या पोटी १४ एप्रील १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महूगांव येथे सैनिकी छावणीमध्ये झाला. अस्पृश्यतेचे चटके आणि अवहेलना या अनिष्ठ बाबींना आंबेडकरांना बालवयापासुनच सामोरे जावे लागले. पराकाष्टेची जिद्द आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सर्व प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली आणि पुढे संपुर्ण हयातभर म्हणजे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण होईपर्यंत त्यांनी विविध क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले.

आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये डॉ.आंबेडकरांचे विविध क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्वाचे आहे. तरी परंतु असे असुनही आपल्या एकुणच सार्वजनिक आणि राष्ट्रीय जिवनात त्यांचे ऐतिहासिक योगदान केवळ तो अस्पृश्य समाजाचे असल्यामुळे विचारात घेतले जात नाही ही या भारत देशाची एक फारमोठी शोकांतिका आहे. त्यांच्या विषयी अस्पृश्यांचे दलितांचे पुढारी आणि वस्तुस्थिती नाकारता येत नाही म्हणुन फार तर भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार एवढीच त्यांची ओळख दर्शविली जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरासारख्या हिमालयालाही लाजवेल अशा उत्तुंग दैदिव्यमान व्यक्तीमत्वाचे अनैक पैलु अभ्यासानंतर आपल्या लक्षात येतात. त्यामध्ये आर्थिक तत्वज्ञान, राष्ट्र उभारणी आणि राष्ट्रविकासातील आर्थिक योगदान त्यांनी कामगाराकरीता आणि एकूणच मानव जातीच्या विकासासाठी, कल्याणासाठी केलेले दैदिव्यमान कार्य आणि त्यांची अव्दितीय कामगीरी बघीतली असता आपोआपच आपण त्यांच्यापुढे नतमस्तक होऊन जातो.

**शेती आणि समस्या :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मुलात अर्थशास्त्राचे अभ्यासक होते. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक शेती हा आहे. शेती क्षेत्रावर अवलंबुन असणारी फार मोठी लोकसंख्या आणि प्रत्यक्ष लागवडी खाली असणारी अल्प जमीन ही समस्या होती आणि आजही ती कायम आहे. ही समस्या दूर करण्यासाठी औद्योगिकरण हा महत्वाचा उपाय सुचविलेला होता. शेतीवर आधारित लोकसंख्या सातत्याने वाढत जाणार आहे. पण शेत जमीनीचे धारण क्षेत्र तेवढेच राहणार आहे. त्यामुळे फार मोठी बेरोजगारी वाढेल. आजही बेरोजगारी ही सर्वात मोठी समस्या झाली आहे. ही समस्या दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. सामुदायिक शेतीमुळे अल्पभुधारक शेतकऱ्यांची अडचण दुर होईल. शेतीमालाला हमीभाव दिला पाहिजे. शेती ही निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे, निसर्गाच्या लाहरीपणामुळे नैसगिक संकट कायम आहे. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी जलसिंचनावर भर दिलेला आहे. नदीजोड प्रकल्प हा त्यांच्याचं विचारांची फलश्रूती आहे.

**शेती, शेतकरी व शेतमजुरांसाठी योगदान :**

महात्मा ज्योतीराव फुले यांच्यानंतर शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या हिताचा जर कोणी विचार केला असेल तर तो डॉ.बाबासाहेब आंबेडेकरांनी या देशात शेतीवर अवलंबुन असणाऱ्या ७० टक्के लोकांच्या भल्याचा विचार बाबासाहेबांनी केलेला दिसुन येतो. शेतकऱ्यांकडून वसुली केला जाणारा शेतसारा, शेतीला उद्योगाचा दर्जा, शेतीचे धारण क्षेत्र, शेतीची न्युन उत्पादकता, शेती कसण्याची जुनाट व परंपरागत पध्दत, लोकसंख्या वाढीमुळे शेतीवर पडणारा भार, सरकारच्या मालकीची शेती, सहकार शेती, भांडवल व पाणी पुरवठ्याची गरज इत्यादीच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक लढे उभारले, चळवळी केल्या, शेतकऱ्यांचे खऱ्या अर्थाने संघटन उभे केले. २४ फेब्रुवारी १९२७ साली मुंबई कौन्शीलचे सदस्य म्हणुन त्यांनी विधीमंडळात अर्थसंकल्पावरील आपले पहिले भाषण

केले. त्यांचे ते पहिले भाषण दलितांच्या प्रश्नावर नव्हे तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर होते हे सगळ्यांनी ध्यानात घेतले पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय बहुआघामी, व्यासंगी व्यक्तीमत्व म्हणून प्रसिध्द आहेत, त्यांच्या अभ्यासाच्या, चिंतनाच्या आवाक्याचा विचार करता भारताच्या कृषीक्षेत्राचाही त्यामध्ये समावेश करता येईल. आजही भारतात ६ लाख ४० हजार खेडी आहेत. बहुसंख्य समाज (६० टक्के) आजही शेतीवरच अवलंबुन आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्व आजही वादातीत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेती प्रश्नाला हात घातला तो, सप्टेंबर १९१८ च्या जर्नल्स ऑफ दी इंडिया इकॉनॉमीक्स सोसायटीच्या अंकात “Small Holdings and their Remidies” हा लघुशोध प्रबंध लिहून या शोधनिबंधात त्यांनी शेतीचे होणारे तुकडीकरण, त्यांचे दुषपरिणाम, तुकड्यांचे एकत्रीकरण, विस्तारीकरण आणि स्थायीत्वासाठी उपाय अशी मांडणी केल्याचे दिसुन येते. सोबतच भुमीकर, भुराजस्व, अल्पभुधारक, शेतमजुर, जमीनदारी व्यवस्था, सिंचन, खोत पध्दती, बहुउद्देशीय प्रकल्प, शेतीला स्वस्त व विपूल विजपुरवठा, पावर ग्रीड, कर्जपुरवठा, सामुहिक शेती, सहकारी शेती, शेतकरी संघटन, जमीनीचे पुर्नवितरण, सामाजिक आर्थिक न्याय, इत्यादी बाबीची आग्रही भुमिका डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी मांडल्याचे दिसुन येते.

**भारतातील शेती विकासाआड येणाऱ्या विविध समस्या :**

डॉ.आंबेडकरांनी शेतीच्या विकासाच्या आड विविध समस्यांचा अत्यंत सखोल अभ्यास केलेला आहे. त्यांनी कृषी क्षेत्रातील काही मुलभुत समस्या खालील प्रमाणे आधोरेखित केलेल्या आहेत.

१. शोषणाधारित, जमिनदारी पध्दत.
२. शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त दबाव.
३. जमिनीचे झपाट्याने होणारे तुकडीकरण.
४. शेतीवरील अत्याधिक अवलंबित्व.
५. धारण क्षेत्राच्या अकिफायतशिर आकार.
६. औद्योकिरणाची क्षीणगती.
७. शेतकऱ्यांचे निरंतर दैव्य व ऋणग्रस्तता.
८. शिक्षणाचा अभाव दैववादी प्रवृत्ती.
९. परंपरागत, जुनाट व शेतीमधील मागासलेले तंत्रज्ञान.
१०. निसर्गावरील शेतीचे अवलंबीत्व, सिंचनाच्या सोयीची कमतरता.
११. शेतीत गुंतवणुकीकरीता स्वत:चे भांडवल नसणे.
१२. शेतीला कर्ज पुरवठ्याची शासकीय व्यवस्था नसणे.
१३. सिंचनासाठी विजेच्या सोयीची कमतरता.

**डॉ.आंबेडकरांनी शेती विकासासाठी दोन प्रमुख बदलांची मागणी केलेली दिसुन येते.**

१. जमीनदारी पध्दतीचे निर्मुलन.
२. कृषी उद्योग – कृषी हा राज्य उद्योग असेल.
३. शेतीचे औद्योगिकरण.
४. विद्युत ऊर्जा पुरवठा.
५. सिंचन, पाणी पुरवठ्याची शास्वत सोय.
६. शेतीचे यांत्रीकीकरण.
७. सहकारी शेती.
८. शेतीचे तुकडीकरण विखुरीकरण रोखण्यासाठी कायदे करावेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक लिखाणात एक उल्लेखनिय विचार म्हणुन भारतीय शेतीचा विचार करावा लागतो. बाबासाहबांनी कृषी उद्योग हा भारताचा एक राष्ट्रीय महान उद्योग मानला आहे. या सर्वश्रेष्ठ राष्ट्रीय उद्योगाच्या दयनिय अवस्थेच्या अनेक कारणांपैकी लहान आकाराचे धारण क्षेत्र त्याचे तुकडीकरण व विखुरलेली स्थिती ही महत्वाची कारणे सांगीतलेली आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सामुहिक शेतीचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या मते अल्पभुधारकाच्या समस्या, सोडविण्याचा अनमोल मार्ग म्हणजे सामुहिक शेती असून इटली, फ्रान्स व इग्लंडमध्ये सामुहिक शेतीचे तत्व उपयुक्त ठरले आहे. ते भारतातही उपयुक्त आहे. डॉ.बाबासाहब आंबेडकरांनी महार वतन पध्दत

बंद करण्याची गरज व्यक्त केली. कारण या पध्दतीमुळे या समाजातील माणसांची महत्वकांक्षा मारली जात आहे. खोती ही जमीन कसण्याची अन्यायकारक पध्दती असुन खोतीमुळे केवळ आर्थिक गुलामगिरीच नव्हे तर सामाजिक गुलामगिरी लादली जात आहे. त्यामुळे खोती पध्दती नष्ट करण्यासाठी त्यांनी १६ नोव्हेंबर १९३६ ला मुंबई प्रांताच्या कायदे मंडळात 'खोती पध्दती निर्मुलन विधेयक' मांडले.

बबासाहेबांनी राज्य समाजवादाच्या संकल्पनेत शेती हा राज्याच्या अखत्यारितील व्यवसाय आहे असे मत मांडले. शेतीला सर्वकाळ, मुबलक आणि समान प्रमाणात पाणी पुरवठ्यासाठी जल व्यवस्थापणाची गरज व्यक्त केली असुन पाणी तिव्रतेवर मात करण्यासाठी नदीजोड प्रकल्पांची संकल्पना मांडली होती. एकंदरीत अल्पभुधारकांना न्याय, तुकडीकरण प्रतिबंध, खोती पध्दतीचे समुह उच्चाटन, कुळांचे अधिक व शारिरीक शोषण थांबविण्यासाठी खंडाचे दर नियीमत करणे, कुळांना संरक्षण व मालकी हक्क बहाल करणे ई. महत्वपुर्ण उपाय योजना बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतलेली आहे.

भारताच्या किर्तीवंत सुपुत्रामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रस्थानी आहे. बाबासाहेब हे एक थोर विचारवंत होते. त्यांचे राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील योगदान उल्लेखनिय आहे. त्यांनी अर्थशास्त्राज्ञ समाजशास्त्राज्ञ, कायदातज्ञ, शिक्षणतज्ञ, पत्रकार, संसद सदस्य आणि याही पलीकडे जाऊन समाज सुधारक व मानवाधिकारांचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनिय आहे. विशेष बाब म्हणजे ते आपल्या देशाच्या इतिहासातील पहिले सर्वश्रेष्ठ व जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणुन चलन पध्दती, शेती, औद्योगिकरण, खाजगी सावकार, प्रतिबंधक विधेयक, सार्वजनिक आयव्यथ पाया भारणी इत्यादी विषयांवर विचार मांडले असुन त्यांचे भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या स्थापनेत मोलाचे योगदान आहे. बबासाहेबांचे शेती विषयक विचार अनमोल असुन ते विचार शेती व शेतकरी कष्टकरी, शेतमजुर यांच्या जिवनात नवचैतन्य व नवपरिवर्तन घडवून आणणारे आहेत. त्यांनी शेती विषयक मांडलेले तत्कालीक विचार हे आधुनिक काळात ही अत्यंत उपयुक्त असुन स्वातंत्र्योत्तर काळात कृषी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी याच कार्यक्रमाच्या आधारावर उपाय केलेले दिसुन येतात. राज्य समाजावादाच्या संकल्पनेत देशाची आर्थिक रचना कशी असावी यावर भर दिला असुन त्यांनी शोषणविरहीत आर्थिक संरचनेसाठी भांडवलशाही झुगारुन सासदीय लोकशाहीला स्थान दिले आहे. भारतीय शेती व ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक स्थिती बदलण्याचा एकच प्रभावी व खात्रीशीर मार्ग महणुन औद्योगिकरणाचा स्विकार केला.

**संदर्भ :**


1. प्रा.देवेन्द्र देशमुख, श्रीमती अंजली जोशी (अनुवाद) 'रुपयाचा प्रश्न त्यांचा उद्गम व उपाय' पिनिमय प्रकाशन, मुंबई, २०११.
2. अनंत पैलुचा सामाजिक योध्दा, दलितेतरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर.
3. प्रा.भास्कर भोजने, फेसबुक पेज.
4. आंबेडकर बी.आर. भारतीय राज्यघटना.
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे खंड–२.
6. डॉ.आंबेडकर विचारमंथन, डॉ.वा.ना.कुबेर.
7. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता

**प्रा. गणेश मोहन बदले**
सहाय्यक प्राध्यापक तत्वज्ञान विभाग जिवनदीप शैक्षणिक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी (दळखण) ता. शहापूर, जि. ठाणे.
ganeshmbadle@gmail.com

**गोषवारा :—**

शिक्षण क्षेत्राात अमूलाग्र परिवर्तन घडून आलेले आहे. असे असले तरीही समाजातील काही घटकांपर्यंत शैक्षणिक सुविधा न पोहचल्याने आजही भारतातील काही भागांतील समाज अशिक्षितच राहिला आहे. परिणामी शिक्षण नाही तर शहाणपण नाही. त्यामूळे वाढती बेरोजगारी वाढते दारिद्रय यामुळे अज्ञान व अंधश्रध्देच्या गर्तेत सापडलेला समाज आजही त्यातून बाहेर पडलेला नाही. अनेक विचारवंत तथा समाजसुधारकांनी अज्ञान दुर होवून संपूर्ण भारतीय समाज सुशिक्षित व्हावा यासाठी अनेक प्रयत्न केले प्रसंगी हया समाजसुधारकांना तत्कालिन समाजाकडून अपमानास्पद वागणूक मिळाली त्यांच्या विचारांना कोणीही लगेचच स्विकारले नाही तर त्यांना आपले विचार समाजात पसरवण्यासाठी संघर्ष करावा लागला. लोकांना शिकून शहाण होता याव यासाठी संघर्ष करुन संघटीत करण्याचे काम एकंदरीत सर्वच समाजसुधारकांनी केले. अशा विविध विचारवंतांपैकीच एक समाजातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचावे असा विचार करुन सर्वप्रथम आरक्षण ही संकल्पना मांडणारे थोर विचारवंत तथा समाजसुधारक म्हणजे राजर्षी शाहू महाराज आहेत प्रस्तूत शोध निबंधात शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार वर्तमानकाळात कसे उपयूक्त आहेत हे प्रस्तुत लेखात मांडले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे** :—

१) शैक्षणिक क्षेत्रातील झालेले बदलांचा अभ्यास करणे.
२) शैक्षणिक धोरण आणि उपयुक्तता यांचा अभ्यास करणे.
३) शाहू महाराजांचे शैक्षणिक विचारांचे अभ्यास करणे.

संशोधन साहित्यांचे अवलोकन आणि तथ्य संकलन

प्रस्तुत शोध निबंधात संकलन करण्यात आलेली माहिती ही प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांच्या आधारे केली आहे. संदर्भ गंथ्र प्रकाशित — अप्रकाशित मासिके, वृत्तपत्र तसेच शासकीय मासिके यांचा आधार घेऊन माहिती प्राप्त करण्यात आली आहे.

**प्रस्तावना :—**

शिक्षण ही सातत्याने चालणारी प्रकीया आहे. माणूस हा बुध्दिजीवी प्राणी असून तो सतत ज्ञान मिळवण्यासाठी धडपड करत असतो. हया ज्ञानाच्या लालसेमुळेच माणूस आयुष्यभर काही ना काही शिकतच असतो. आज शैक्षणिक क्षेत्रात नव नवे बदल घडून येत आहेत. नवनविन विचारसरणीचा उदय व विकास होत आहेत. माणूस जन्मल्यापासून मरेपर्यंत काही ना काही शिकतच असतो. पूर्विच्या काळी शिक्षण घेण्याचा अधिकार केवळ मूठभर उच्चवर्णिय मंडळींनाचा होता भारतीय समाजात पूर्वी चार्तुवर्ण व्यवस्था अस्तित्वात होती ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र असे चार वर्णांनी युकत अशी चार्तुवर्ण व्यवस्था असल्याचे सर्वांनाच ज्ञात आहे. ह्या वर्ण व्यवस्थेमुळे क्षुद्र व स्त्रिया यांना शिक्षणाची काय गरज आहे. क्षुद्रांना तर शारीरीक कामे करायची असतात त्यासाठी शिक्षणाची काय गरज व स्त्रियांना तर केवळ घरकाम व घरातील पोर—बाळ व इतर मंडळींचा सांभाळ करायचा आहे त्यासाठी त्यांना शिक्षणची काहीही गरज नाही असे मत प्रतिपादीत झाले पूढे स्त्रियांनी चौकटीबध्द जीवन जगावे व क्षुद्रांनी संवर्णांपूढे जाऊ नये म्हणून स्त्रीयांचे व क्षुद्रांचे शिक्षणाचे हक्कच काढून घेण्यात आले व स्त्रीशिक्षणाचा विरोध झाला. स्त्रियांना व क्षुद्रांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आला. पूढे

कालानुरुप शिक्षित व अशिक्षित असे समाजात दोन गट पडले. हा भेदभाव नाहिसा व्हावा व एकंदरीत स्त्रियांना व क्षुद्रांनाही समान संधी मिळावी ह्यांनाही शिक्षण घेता यावे यासाठी अनेक विचारवंत तथा समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. त्यापैकी काही थोर समाजसुधारकांनी स्वत:ला ह्या लढ्यात पूर्णत: झोकून दिले. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीया व कनिष्ठ वर्गाला देखील शिक्षण घेता यावे यासाठी अनेक प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांना अखेरीस यश प्राप्त झाले व स्त्रियांना तसेच ज्या समाजाला शिक्षणाचा हक्क नाकारुन शिक्षणापासून वंचित ठेवले गेले त्या सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली. प्रस्तुत लेखामध्ये ह्या सर्व विचारवंतांपैकी शैक्षणिक कार्यसम्राटांपैकीच एक महणजेच राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक क्षेत्राातील योगदान व विचार यांचे मंथन करीत आहे.

**शाहूमहाराजांचे शैक्षणिक विचार :—**

सामाजिक समता ह्या तत्वाचे पुरस्कर्ते म्हणून ज्यांची ओळख करुन दिली जाते अशा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आरक्षण संकल्पनेचा जनक मानले जाते. याचे कारण म्हणजे शाहू महाराज एक शैक्षणिक विचारवंत असून ते दिन दलित व शोषित वर्गाचे कैवारी म्हणूनही ओळखले जातात. सामाजिक विषमता कमी होण्यासाठी समाजातून गरिबी, असमानता, अस्पृश्यता व निरक्षरात समूळ नष्ट झाले पाहिजेत असे प्रखर मत त्यांनी मांडले व त्यावर प्रयत्नही केले. त्यांनी स्त्रि शिक्षण व तळागाळातील व्यक्तींच्या शिक्षणासाठी अपार प्रयत्न केले. प्राथमिक, माध्यमिक, उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण सर्वांना मिळावे यासाठी खेडोपाडी विविध शिक्षण संस्था स्थापन केल्या भारतातील ५० टक्के लोकसंख्या आजही खेडोपाडी राहते व त्यांच्या पर्यंत शैक्षणिक सुविधा पोहचू न शकल्यामुळे त्यांचा शिक्षणाचा हक्क त्यांना मिळवता येत नाही.स्त्रियांच्या सर्वांगिण व्यक्तीमत्व विकासासाठी व स्रियांना स्वसंरक्षण करता यावे यासाठी स्त्रिशिक्षणावर त्यांनी भर दिला. त्यांचे विचार आपल्याला पुढील मुद्दयाआधारे सांगता येतील:

1. सामाजिक शिक्षणातून समाजपरिवर्तन होईल यासाठी संपूर्ण समाजाच्या शिक्षणावर त्यांनी भर दिला.
2. सर्वांना शिक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी गरजेनुसार मदत मिळावी यासाठी आरक्षण जाहिर केले.
3. प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले.
4. शिक्षण प्रसारासाठी वतनी शिक्षकयोजना सुरु केली.
5. शिक्षकांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार प्रशिक्षणाची सोय सुविधाा उपलब्ध करुन दिली.
6. उच्चशिक्षणावर अधिक भर दिला त्यासाठी विदेशी शिक्षण तांत्रिकशिक्षण यासाठी विशेष शिष्यवृत्तीची योजना सुरु केली.
7. स्त्रिशिक्षणावर भर दिला व स्त्रिशिक्षणाला चालना मिळाली.
8. वसतिगृहांची सोय व सुविधा केली.
9. उपेक्षीतांना तथा शिक्षणापासून वंचित राहिलेल्या समाजाला शैक्षणिक सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन दिल्या.
10. राजर्षी शाहू महाराजांनी मल्लविद्येला लोकशिक्षणाचे महत्वपूर्ण अंग मानले मल्लविद्या, कुस्ती, दांडपट्टा व इतर मर्दानी खेळ खेळल्याने व्यक्तीची प्रकृती उत्तम राहते त्यामूळे अंगमेहनीच्या खेळात रस घेतला पाहिजे.
11. प्रत्येकाला शिक्षण मिळावे यासाठी गाव तेथे शाळा अशी संकल्पना रुढ केली. प्रत्येक गावाच्या ठिकाणी शाळा सुरु केल्या.
12. समाजातील वंचित व उपेक्षित घटकात शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यामध्ये त्यांच्या शिक्षणात आर्थिक घटक अडसर ठरु नये. यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी शिष्यवृत्तीची

योजना आखली. शेतकरी, शेतमजूर, समाजातील बहूजनांच्या मुलांना शिक्षणांसाठी खास शिष्यवृत्ती योजना सुरु केली.

13. आश्रमशाळा सुरु केल्या पूर्वीच्या काळी ज्याप्रमाणे गुरुगृही राहून शिक्षण घेतले जाई त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी कलानिपुण होत असे. ऋषी गृही आश्रमात राहून संपूर्ण शिक्षण घेत त्याने मूल परिपूर्ण होवून पूढे त्याला स्वबळावर जगता येते. हाच आदर्श डोळयासमोर ठेवून आश्रमशाळा सुरु केल्या आश्रम शाळेची सुरुवात १९२०मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूरात केली. महाराजांचा हा दृष्टिकोना सामाजिक हिताच्या दृष्टिने अत्यंत महत्वूपर्ण ठरला.

14. शेती बरोबरच व्यापार व उद्योगधंदे तसेच उच्चप्रतीचे उद्योग केल्याने सामाजीक प्रगती होवू शकते हा दूरदृष्टिकोन महाराजांनी डोळयासमोर ठेवून तशी ठोस पाऊले उचलली. व्यावसायीक शिक्षणसाठी १९१२ रोजी जयसिंगराव टेक्निकल इंस्टिट्यूटची स्थापना करुन त्यात समाजातील सर्व मूलांना तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली.

15. स्त्रियांच्या मानसिक विकासासाठी स्त्रियांनाही शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. स्त्रिया व अस्पृश्यांनाही शिक्षण मिळाले तरच सामाजिक प्रगती होईल असा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून स्त्रिशिक्षण व अस्पृश्य समाजाच्या उध्दारासाठी त्यांना शिक्षण घेता यावे यावर अधिकाधिक भर दिला. तसेच शिकून अस्पृश्य समाजाला व स्त्रियांना स्वत:चा व समाजाचा उध्दार करता येईल हा त्यांचा दूरदृष्टिकोन होता.

**निष्कर्ष :—**

विविध शैक्षणिक विचारवंत व समाजसुधारकांनी शिक्षण घेवून सामाजीक सुधारणा व्हावी यासाठी अनेक प्रयत्न केले वेळप्रसंगी त्यांना संघर्षही करावा लागला तथा सामाजिक मानहानीही सहन करावी लागली परंतू तरीही हे समाजसुधारक डगमगले नाहीत. त्यांनी आपले सामाजिक कार्य अखंडपणे चालूच ठेवले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी त्याकाळी जे शैक्षणिक विचार मांडले तत्कालीन समाजाच्या उध्दारासाठी जे प्रयत्न केले ते आजही कालबाह्य झालेले नाहीत. आजदेखील तेच विचार सामाजिक प्रगतीसाठी अत्यंत उपयूक्त आहेत. त्याकाळी स्त्रियांना तसेच बहूजन समाजाला शिक्षणाची जी सोय व सुविधा राजर्षी शाहू महाराज यांनी उपलब्ध करुन दिली त्याच सुविधा भटके कामगार, मागासवर्गीय, गरीब लोकांना आजही उपयुक्त आहेत त्यामूळे सामाजिक समतोल राखण्यास मदत होत आहे. आजही शिष्यवृत्तीची समाजउध्दारासाठी व प्रगतीसाठी नितांत गरज असल्याचे आपल्याला दिसून येते. पैशाअभावी ज्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते अशांना शिष्यवृत्ती योजनेमूळे आर्थिक परिस्थिती कमकूवत असली तरी मनाप्रमाणे उच्चशिक्षण घेता येवू लागले आहे. ज्यांना निवा—याची सोय नाही त्यांच्यासाठी वसतीगृह, गुरुकुल अशा माघ्यमातून त्यांची गरज पूर्ण होत आहे त्यामूळे राजर्षी शाहू महाराजांच्या ह्या संकल्पना कालबाह्य झालेल्या नसून आजही समाजोपयोगी आहेत.

**संदर्भसूची :—**

1. शैक्षणिक तत्त्वज्ञान आणि शैक्षणिक समाजशास्त्र .डॉ.के. यु. घोरमोडे / डॉ.कला घोरमोडे. — विद्या प्रकाशन, नागपूर
2. शिक्षणाचे तत्वज्ञान व समाजशास्त्रीय आधार— प्रा. डॉ. सौ. रमा फुके — श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
3. शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य— डॉ. के. यु. घोरमोडे, डॉ. कला घोरमोडे— विद्या प्रकाशन, नागपूर

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# फुले आंबेडकरवादाचा स्त्रीवादी साहित्यावरील प्रभाव

**प्रा. डॉ. स्वाती घाटुळे**
इतिहास विभाग ऐ.आर.बुर्ला महीला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर

आजच्या संगणकीय युगात विज्ञानाच्या जोरावर मानवाने गरूड झेप घेतली असली तरी पाठीमागे वळून पाहिले तर महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याने विसाव्या शतकातील अनेक सामाजिक चळवळींना खंबीर विचारांचे पाठबळ पुरविल्याचे चित्र डोळयासमोर येते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी लोकोत्तर कार्य केले तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला डॉ. आंबेडकर यांनी आपल्या कार्याचा, विचारांचा जनमानसावर ठसा उमटवला. आपल्या देशातील आजच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक ध्येय धोरणावर त्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. फुले-आंबेडकरवादी साहित्याचा केंद्रबिंदू मानवता आहे. मानवतेपेक्षा काही एक मोठे न मानणारे व माणसाला मूलभूत जीवन स्वातंत्र्य देऊ पाहणारी आचार विचारधारा या साहित्यातून प्रकट होते. फुले-आंबेडकरवादी साहित्य हे वास्तववादी आणि जीवनवादी आहे. हे साहित्य वेदनेचे आणि याचनेचे साहित्य आहे. फुले - आंबेडकरवादी साहित्य म्हणजे जे वंचित, उपेक्षित, शोषित आहेत त्यांच्यामध्ये आत्मभान निर्माण करणारे साहित्य. या साहित्यातून न्याय, बुद्धिप्रामाण्यवाद, समता, बंधुता, मानवतावाद प्रकट होतो. समान हक्क, समान दर्जा, समान स्वातंत्र्य हे स्त्रीवादी तत्व फुले-आंबेडकरवादी तत्त्वाचा भाग आहे. हाच विचार जागतिक स्त्रीवादी साहित्यातूनही दिसून येतो. फुले-आंबेडकरवाद हा स्त्रीमुक्ती व स्त्रियांच्या मनात मानवतावादाची बीजे पेरणारा आहे. त्यामुळेच शतकानुशतके खच्चीकरण करणाऱ्यांना जाब विचारण्याची हिंमत स्त्रीमध्ये आली. डॉ. आंबेडकरांनी जागतिक पातळीवरील महिला विषयी प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करून, स्त्रियाविषयी समताधिष्ठित जाणिवा आत्मसात करून आयुष्यभर स्त्री सुधारणेचा, स्त्रीमुक्तीचा पाठपुरावा केला. प्रस्तुत शोधनिबंधात स्त्रीवादी साहित्यावर फुले-आंबेडकर वादाचा पडलेला प्रभाव याविषयी माहिती पाहणार आहोत.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

1) स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय?
2) स्त्रीवादी साहित्यातून प्रकट झालेल्या स्त्रीवादी विचारधारा
3) स्त्रीवादी साहित्यावर पडलेला फुले-आंबेडकर वादाचा प्रभाव

**निष्कर्ष**

**स्त्रीवादी साहित्य म्हणजे काय**

स्त्रीवादाचे मूळ स्त्रियांच्या मूलभूत हक्क प्राप्तीत आहे. स्त्रियांना मतदानाचा अधिकार, पुरुषांच्या संपत्तीत अधिकार यासारख्या हक्कासाठी पाश्चात्त्य देशातील स्त्रियांनी अनेक चळवळी केल्या. त्यातूनच स्त्रीवादाचा उदय झाला असे म्हणता येईल. स्त्रियांना समान हक्क, स्त्री-पुरुष उच्चनीच भेद दूर करणे, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव विकसित करणे यासारख्या स्त्रियांच्या हक्काच्या मागणीतून स्त्रीवादी चळवळी निर्माण झाल्या. त्यातूनच स्त्रीवादाचा उदय झाला. स्त्रीवादाची संकल्पना केवळ स्त्री स्वातंत्र्यपूर्ती मर्यादित नाही तर आदर्श समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुष या दोघांनीही स्वसामर्थ्याने पुढे येण्याचे, आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची जाणीव ज्या साहित्यातून स्त्रियांनी व्यक्त केलेली आहे अशा साहित्याला स्त्रीवादी साहित्य म्हणावे लागेल.

पुरुषसत्ताक व्यवस्थेची हुकूमशाही व स्त्रियांची गुलामगिरी संपुष्टात आणल्याशिवाय खरी स्त्री-पुरुष समता निर्माण होणार नाही अशी म. फुले यांची विचारधारा होती. ही विचारधारा जागतिक स्त्रीवादी साहित्यातून दिसून

येते. फुले आंबेडकरांनी स्त्रीची आत्मशक्ती जागृत करून तिचे जीवन प्रकाशमान केले. वर्षानुवर्ष दुय्यमत्व घेऊन जगणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध स्त्री बंड करून उठली. तिच्या आत्मशोधाचा आविष्कार विचारातून, कृतीतून, बोलीतून, लेखनातून व्यक्त करू लागली. त्यातून स्त्रीवाद या संकल्पनेचा आणि स्त्रीवादी साहित्याचा जन्म झाला. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांनी आपले प्रश्न, दुःख, अन्याय-अत्याचार याला वाचा फोडली.

**स्त्रीवादी साहित्यातून प्रकट झालेल्या विचारधारा**

फुले-आंबेडकर वादाचा प्रभाव जागतिक साहित्यावरही पडला. मार्गारेट फुल्लचे 'वुमेन इन द नाईंटीथ सेंचुरी', जॉन स्टुअर्ट मिल या विचारवंताचे 'द सब्जेक्शन ऑफ वुमन', सीमान द बोव्हा यांचा 'द सेकंड सेक्स' यात स्त्रीवादी विचारधारा प्रखरतेने जाणवतात. यात त्यांनी One is not born woman rather one becomes a woman असे म्हंटले आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेतील पुरुष हा महत्वाचा केंद्रबिंदु तर स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थान नसते. म्हणूनच स्त्रीने सर्व बंधने झुगारून एक सक्षम व्यक्ती म्हणून जगण्याचा हक्क मिळवायला हवा अशी भूमिका त्यांनी यात मांडली आहे. स्त्री पुरुष समानता आल्याशिवाय वर्गलढा पूर्ण होणार नाही असे प्रतिपादन ही त्या करतात. १९१९ मध्ये व्हर्जिनिया वूल्फ या लेखिकेचा A ROOM ONES OWN हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथामध्ये त्यांनी समाज व्यवस्थेत स्त्रियांना बंदिस्त करून ठेवल्यामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वाला वाव मिळाला नाही असे मत मांडले. सर्व क्षेत्रात पुरुषांची सत्ता असल्यामुळे स्त्रिया मुक राहिल्या. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळाले नाही असे मत मांडले. जर्मन ग्रियर यांचा द फिमेल युनक, केट मिलेट यांचा सेक्युअलस पॉलिटिक्स, मेरी उलस्टोन क्राफ्ट चे A indication of the Rights of women या ग्रंथातून ही स्त्रीवाद प्रभावीपणे मांडलेला आहे. स्वातंत्र्य, समता, शिक्षण या सर्वच गोष्टींचा स्त्री संदर्भात विचार होऊ लागला. आपल्यालाही पुरुषाप्रमाणे व्यक्ती स्वतंत्र असावे हा विचार अत्यंत प्रगल्भपणे या ग्रंथातून मांडला आहे. त्यावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या फुले-आंबेडकर वादचा प्रभाव जाणवतो.

स्त्रियांचे मराठी साहित्यातील योगदान ही महत्त्वपूर्ण आहे. 1975 नंतर स्त्रीवादी साहित्य प्रवाह निर्माण झाला. त्यात सानिया, गौरी देशपांडे, अंबिका सरकार, आशा बगे, प्रिया तेंडुलकर अशा लेखिकेचा निर्देश करता येईल. मराठी दलित साहित्यात त्यांचे योगदान या दृष्टीने उल्लेखनीय आहे. उर्मिला पवार, हिरा बनसोडे, कुमुद पावडे, रजनी ठाकूर आदी लेखकांची नावे या संदर्भात घेता येतील. दलित स्त्री साहित्यात व्यक्त होणाऱ्या स्त्रियांचे शोषण भीषण स्वरूपाचे आहे. ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, रजनी ठाकूर यासारख्या कवयित्रीनी दलित स्त्रियांच्या दुहेरी शोषणावर प्रकाशझोत टाकलेला आहे. दलित स्त्रियांनी केवळ स्त्रीवादी दृष्टीने समाजाकडे न पाहता बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या नव्या दृष्टीने समाज व्यवस्थेकडे पाहण्याचा प्रयत्न केला .स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनातून बाबासाहेबांच्या जातीअंताचा संदर्भ सापडतो हे मान्य करावे लागेल. फुले-आंबेडकर स्त्रीवादाचा कलात्मक अविष्कार रजनी ठाकूर यांच्या 'ज्वाला' या कवितासंग्रहात आढळतो. स्त्रियांना कुटुंबात धर्म आणि धर्म ग्रंथाचे अवडंबर माजवणाऱ्या मूलतत्त्ववादी अशा दोन पातळीवर संघर्ष करावा लागतो. या पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या संघर्षाचे मूळ या कविता संग्रहातून दिसून येतो.

सामाजिक चौकटीत ताराबाई शिंदे यांच्यासारखी स्त्री बंदिस्त होती. परंतु त्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात उतरतात तेव्हा त्यांचे जागृत आत्मभान उसळू लागते. तिचे आत्मभान स्त्री पुरुष तुलना या ग्रंथांमधून ताराबाईच्या भाषेत फुटून ओसंडून बाहेर पडताना दिसते. काशीबाई कानिटकर यांच्या चरित्रातील त्यांची कृती, त्यांचा विचार धाडसी वाटतो. आत्मभान आलेल्या स्त्रीच्या स्त्रीतत्वाच्या जपवणूकीची धडपड वाटू लागते. आमच्या आयुष्यातील काही आठवणी पासून उर्मिला पवार यांच्या आयदान पर्यंत स्त्रियांच्या आत्मभानाचा विकास कालानुक्रमे बघता येईल.रवींद्र शोभणे यांच्या पांढर व पडघम या कादंबरीतून अनेक व्यक्तिरेखांच्या कृतीतून आणि बोलण्यातून फुले-आंबेडकरी विचारधारा प्रकटताना दिसतात. जातिभेद व अस्पृश्यता नष्ट व्हायचे असेल तर घाणेरडे धंदे

वंशपरंपरागत पद्धतीने करण्याची रूढी नष्ट केली पाहिजे या बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव पडघम आणि पांढर कादंबरीतून दिसतो.

**फुले-आंबेडकर वादाचा स्त्रीवादी साहित्यावर पडलेला प्रभाव**

समान स्वातंत्र्य, समान हक्क, समान दर्जा ही स्त्रीवादी त्रिसूत्री आहे. या वाटेने स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह सुरू आहे. या प्रवाहाची बीजे फुले-आंबेडकरांच्या विचारात नक्कीच सापडतात. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रियांनी आपले प्रश्न, आपले दुःख अन्याय-अत्याचार यांना वाचा फोडली जागतिक स्त्रीवादी साहित्यात असणारी पुरुष प्रधान संस्कृती, विरोधी नकार, न्याय हक्कासाठी केलेला विद्रोह, शिक्षणातून होणारी क्रांती हे सर्व फुले-आंबेडकरवादी विचारांचे फलित आहे. एकोणिसाव्या शतकात स्त्री ही सांस्कृतिक केंद्रबिंदू बनल्यामुळे स्त्रियांसाठी शैक्षणिक व सामाजिक धोरणे आखण्यास सुरुवात झाली. स्त्री जीवन सुधारले व उंचावले पाहिजे ही विचारसरणी निर्माण झाली. स्त्री क्षमतेची जाणीव झाली. देशाची प्रगती साधायची असेल तर स्त्रियांना सहभागी केले पाहिजे हे विचार दृढ झाला. ही विचारसरणी स्त्रियांना सन्मानाने वागणूक व सामाजिक प्रतिष्ठा देणारी होती. त्यामुळे स्त्रीविषयक विचारांना जगभरात गती मिळाली.

आज स्त्री स्वयंभू, स्वतंत्र, सबल आहे. ही स्फूर्ती तिला फुले-आंबेडकरवादी विचारांच्या क्रांतीने लाभली. या क्रांतीने संवेदनशील मनात मानवतावादाची बीजे पेरली आहेत. महात्मा फुले यांनी स्त्रीला जीवनाची मुळाक्षरे शिकवली. तिच्या हातात लेखणीची तलवार दिली. तिच्या पायातल्या अवजड श्रृंखला गळून पडल्या. ज्योतिराव फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य क्रांतिकारक ठरते. त्यांनी स्त्रियांना केवळ शिक्षणच दिले नाही तर स्त्रियांचा आत्मसन्मान वाढवला. स्त्रियांकडे माणूस म्हणून पाहिले, त्यांचे आत्मभान जागे केले. अनेक स्त्रियांना वैचारिक बळ पुरवले. त्यामुळे ज्योतिबा फुले हे अलीकडच्या स्त्रीवादी विचारांनी वाटचाल करणाऱ्या सर्व स्त्रियांचे प्रेरणास्तोत्रे ठरतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीच्या जीवनाची दिशाच बदलली. स्त्रीची आत्मशक्ती जागृत करून तिचे जीवन प्रकाशमान केले. म्हणून शतकानुशतके खच्चीकरण करणाऱ्यांना जाब विचारण्याची हिंमत स्त्रीमध्ये आली. डॉ.आंबेडकरांनी जागतिक पातळीवरील महिला विषयक प्रश्नांचाही सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांनी स्त्री सुधारणेचा, स्त्रीमुक्तीचा पाठपुरावा केला.शोषित स्त्रियांना भारतीय घटनेच्या व लोकशाहीचा रूपाने माणूस म्हणून जगण्याचा व पुरुषाप्रमाणे विविध क्षेत्रात वावरण्याची संधी दिली. त्यामुळे भारतीय समाजातील सर्व स्त्रियांनी स्मरण करावे असे बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आहे. स्त्री समानतेचे, स्त्री स्वातंत्र्याचे वारे त्यांच्या मनात वाहत होते. फुले-आंबेडकर हे संपूर्ण स्त्री जातीचे कैवारी ठरतात.

**निष्कर्ष-**

फुले-आंबेडकरवादी साहित्य हे समतेवर आधारित असणारे साहित्य असून ते व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे आहे. फुले-आंबेडकरवादी साहित्यात सर्व प्रकारची विषमता नाकारलेली असूनती न्यायावर आधारित आहे. ही स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या तत्वावर आधारित समाज निर्माण करण्यासाठी सर्व साहित्य लिहिले आहे.सर्व स्तरातील स्त्री दुःखांचे कड अधोरेखित झाले आणि होत आहेत. स्त्री सुशिक्षित झाल्यामुळे तिला स्व हक्काची जाणीव फुले-आंबेडकरांच्या विचारातून मिळालेली आहे हे नाकारता येत नाही. स्त्री शिक्षणातून झालेली जागृती आणि आलेले आत्मभान हे फुले शाहू आंबेडकर या विचारातून आलेली आहेत. कुटुंब, विवाह, समाजातील स्त्रियांना स्वातंत्र्य समान हक्क अशा विचारातून स्त्रीवादी साहित्य निर्माण झालेले आहे. भारतीय पातळीवर दुर्लक्षित समाज घटकांना अभिव्यक्त होण्याची प्रेरणा या चळवळीने दिली. स्वतःचा शोध, सामाजिक बांधिलकी, नकार, विद्रोह, आत्मभान आणि आत्मशोध, प्रबोधनाचे विचार प्रवाह, बहुजन समाजातील विचारधारा तसेच परिवर्तनाच्या चळवळीतून या

साहित्याचा उदय झाल्यामुळे हे साहित्य जिवनाची बांधिलकी मानणारे आहे. जीवनातील वास्तव प्रश्नांना हे साहित्य समोर जाते. म्हणून व्यापक अर्थाने हे साहित्य जीवनवादी आहे.

**संदर्भ-**


1. कसबे रावसाहेब, आंबेडकर वाद तत्त्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन पुणे, 2004
2. खापर्डे डी.के. आधुनिक सामाजिक सांस्कृतिक क्रांतीचे प्रणेते महात्मा फुले, पुणे: मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, 2007
3. नरके हरी, महात्मा फुले साहित्य और विचार, महाराष्ट्र शासन, 1993
4. फडके भालचंद्र, फुले-आंबेडकर शोध आणि बोध
5. पानतावणे गंगाधर, दलित साहित्य: प्रेरणा, प्रवृत्ती व प्रवाह
6. कांबळे सरोज, जाती व्यवस्था आणि भारतीय स्त्री मुक्तीची दिशा

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे साहित्यातील योगदान

**प्रा.समाधान पंडू पसरकल्ले**
मराठी विभाग, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा जि. उस्मानाबाद.४१३६०६

**प्रास्ताविक**:
संतांची व समाजसुधारकांची भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकामध्ये अनेक महान समाजसुधारक जन्मास आले. या समाज सुधारकांनी समाजव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी व उन्नतीसाठी वेगवेगळया माध्यमातून समाजकार्य केले. यामध्ये महात्मा ज्योतिराव फुले ,राजश्री शाहू महाराज ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यासारखे अन्य नामवंत समाजसुधारक भारताच्या पावन भूमीत जन्मास आले .समाजाच्या उन्नतीसाठी वेगवेगळया मार्गाचा अवलंब करून समाजामध्ये एकता ,समता ,बंधुभाव निर्माण करणाऱ्या समाजसुधारकांमध्ये महात्मा ज्योतिराव फुले यांचे योगदान तितकेच महत्त्वाचे आहे.

महात्मा ज्योतिराव फुले हे महाराष्ट्रातील एक कर्ते समाजसुधारक होऊन गेले. त्यांचा पिंड हा कृतिशील क्रांतिकारकाचा असल्यामुळे त्यांनी सामाजिक विषमता , ,जातिभेद, स्पृश्य-अस्पृश्यता नष्ट केली.या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील समाज सेवेसाठी अग्रणी व ध्येयवेडे समाजसुधारक म्हणून महात्मा ज्योतिराव फुले यांचा उल्लेख करावा लागतो. बहुजनांच्या उन्नतीसाठी पुढाकार घेऊन प्रगती साधणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले यांनी कृतिशील आणि क्रांतिकारक मार्गाचा स्वीकार करून समाजातील विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश राजवटीच्या काळामध्ये भारतीय समाज सामाजिक अन्याय ,अत्याचार , असमानता ,जातिभेद परस्पर शोषण यांच्या अधिपत्याखाली मोठ्या प्रमाणामध्ये दडलेला होता .एकीकडे इंग्रज राजवटीच्या परिणामामुळे मोठ्या प्रमाणामध्ये जुन्या रुढी परंपरा अन्याय अत्याचाराविरुद्ध बंडाची निशाणे उभारली जावू लागली. व दुसरीकडे रुढी परंपरेला टिकून ठेवण्याची प्रक्रियाही तितक्याच तीव्रतेने होत होती.या परिणामातूनच सामाजिक संघर्ष वाढून परिस्थिती अधिक स्फोटक होत चालली या सर्व घटनाक्रमाचा परिणाम महात्मा ज्योतिराव फुले सारख्या समाजसुधारकाला जाणवला या सर्व परिणामातून समाजव्यवस्थेला मुक्त करण्याची प्रेरणा घेऊनच शोषित पीडित अस्पृश्यांच्या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. यावरूनच महात्मा ज्योतिराव फुले हे कर्ते आणि दृष्टये समाज सुधारक होते असे म्हणता येते.आजचाआधुनिक काळ हा विज्ञान-तंत्रज्ञानाचा काळ असल्याने आज यांत्रिक व तांत्रिक प्रगती झाली मात्र मानसिक विचारांची प्रगती म्हणावी तेवढी झाली नाही. या सर्व बाबीचा विचार केला तर आजच्या आधुनिक काळामध्ये देखील समाजसुधारकांनी केलेल्या कार्याचा, व त्यांच्या साहित्याचा विचार अभ्यासणे अधिक उपयुक्त ठरते.

**उद्दिष्टे.**

1. महात्मा ज्योतिराव फुले यांचे साहित्यातील योगदान अभ्यासणे.
2. महात्मा फुले यांच्या साहित्यातील विचार समजून घेणे.

**गृहितके.**

1. विषमता मुक्त समाजनिर्मितीसाठी महात्मा फुले यांचे साहित्यातील योगदान उपयुक्त व प्रेरणा देणारे ठरते.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचाआधार घेण्यात आला आहे. त्यात दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, क्रमिक पुस्तके ,मासिके, इंटरनेटवरील माहितीचा समावेश करून सदर शोधनिबंधाचे वर्णनात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात आले आहे.

ज्योतिराव फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा विचार करताना त्यांच्या राजकीय सामाजिक शैक्षणिक योगदाना बरोबरच त्यांचे साहित्यविषयक योगदानही आधुनिक पिढीला अतिशय महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. हे प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी बहुजन समाजाला अज्ञान दारिद्र्य आणि जातीभेदापासून बाहेर काढण्यासाठी शिक्षण हेच महत्त्वपूर्ण माध्यम मानले.त्यांनी 1848 साली पुण्यातील बुधवार पेठतील भिडे वाड्यामध्ये पहिली मुलींची शाळा काढून स्त्री शिक्षणाला सुरुवात केली.सनातनी लोकांकडून त्यांना सतत विरोध होतअसतानाही अस्पृश्य मुलांसाठी पुण्यातील वेताळ पेठेत शाळा काढून त्यांना शिक्षणासाठी परावृत्त केले. गौतम बुद्ध,संत तुकाराम, संत कबीर यांच्या महान साहित्यविचारांचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी ,जातिभेद ,अंधश्रद्धा,भेदभावाची रुढीवादी भिंत नष्ट करण्यासाठी साहित्यातून मानव मुक्तीचा संदेश दिला आहे.सर्व अज्ञानाचे मूळ हे शिक्षणामध्येच दडलेले आहे. राष्ट्राचा, समाजाचा ,कुटुंबाचा विकास घडवायचा असेल तर शिक्षण हेच प्रभावी साधन आहे, शिक्षणाला अधिक महत्त्व देताना महात्मा फुले म्हणतात..

" विद्ये विना मती गेली,
मतीविना निती गेली,
निती विना गती गेली
,गतिविना वित्त गेले
वित्त विना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले."1

समाजव्यवस्थेतील शूद्र अतिशूद्र मानल्या जाणाऱ्या व्यक्तीचे जीवन गुलामगिरीने व दुःखाने ग्रासलेले आहे. या सर्वांचे कारण अविद्या आहे हे शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथामधून दाखवून दिले आहे फुले यांचा संदेश म्हणजे एक क्रांतिकारक विचाराबरोबरच नविन तत्वज्ञान मांडणारा विचार आहे. सत्यशोधक चळवळीला दुःख दैन्यावस्थेमधून बाहेर पडण्यासाठी लोकशिक्षण हाच मुख्य उपाय आहे .शिक्षणाच्या माध्यमातून अज्ञान दूर करण्याचे महान कार्य ज्योतिराव फुले यांनी त्यांच्या एकंदरीत साहित्यामधून केले आहे. त्यांच्या साहित्यविषयक योगदानाचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

महात्मा फुले यांनी सामाजिक ,शैक्षणिक ,राजकीय, आर्थिक, शेती विषयक विचारांना साहित्याच्या माध्यमातून शब्दबद्ध करून मराठी साहित्याला एक दिशा दाखवून दिली आहे. त्यांच्या एकंदरीत साहित्यकृतीचा विचार करताना त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यकृतींचा परामर्श पुढील प्रमाणे सांगता येतो.

- तृतीय रत्न.
- गुलामगिरी.
- शेतकऱ्याचा आसूड.
- ब्राह्मणाचे कसब
- सत्सार अंक 1.
- पवाडा शिवाजीराजे भोसले यांचा
- इशारा
- अस्पृश्याची कैफियत
- सार्वजनिक सत्यधर्म
- अखंड.
- सत्सार अंक 2

अदी साहित्य प्रकारामध्ये लेखन करून मराठी साहित्याला वैभवशाली परंपरा उपलब्ध करून दिली आहे. साहित्यामधूनही भट ब्राह्मण आपल्या मतलबी धर्माच्या थापा मारून अज्ञान शुद्रास कसे फसवतात, व ख्रिस्ती उपदेशक आपल्या निपक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शुद्रास खरे सांगून त्याला सत्य मार्गावर कसे आणतात. या सर्व बाबी आत्मसात करून महात्मा फुले यांनी 1855 मध्ये पहिले मराठी साहित्यातील स्वातंत्र्य सामाजिक 'तृतीय रत्न ' हे नाटक लिहिले . धूर्त ब्राह्मणांच्या वाईट प्रवृत्ती समाजासमोर मांडण्यासाठी धाडसी कार्य सर्वप्रथम 'ब्राम्हणांचे कसब 'या ग्रंथातून महात्मा फुले यांनी केले. हा ग्रंथ त्यांनी महाराष्ट्र देशातील कुणबी, माळी ,मांग, महार यांना परम प्रीतीने नजर केला आहे. त्यावरून त्यांची सत्यशोधकी सर्वसमावेशक दृष्टी लक्षात येते. हा ग्रंथ प्रकाशित झाल्यावर महात्मा फुले यांच्या" पुणेकर स्नेहाने आग्रह करून त्या चोपडीच्या काही प्रती एकंदर सर्व शाळा खात्यातील मुख्य अधिकाऱ्यांनी विकत घ्याव्यात म्हणून त्याने मजकडून त्या सर्व अधिकाऱ्यास सूचना पत्रे पाठवली परंतु त्यातून एकाही अधिकाऱ्याने भटांच्या भयावस्थ एकसुद्धा चोपडी खरेदी करून आपल्या नावास बट्टा लावून घेतला नाही."2.यावरून तत्कालीन समाज व्यवस्थेवर ब्राह्मण वर्गाचा किती पगडा होता हे दिसून येते. या सर्व घडामोडीतून "ज्योतीरावांची वाड मय निर्मिती ही बहुतांशी सह हेतुकच आहे. शुद्रातिशूद्राच्या दुरावस्थेची कारणे विशद करून त्यांचे प्रबोधन करणे, समाजातील सुशिक्षित तरुणांना आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देणे ,आणि मागासलेल्या जाती जमातीत शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्याखेरीज त्यांची स्थिती सुधारणार नाही ही गोष्ट सरकारला पटवून देणे अशा तिहेरी उद्देशाने त्यांनी आपले ग्रंथलेखन केले आहे."3यावरून महात्मा फुले यांनी सत्यशोधक हेतू नजरेसमोर ठेऊनच साहित्याची निर्मिती केली आहे, हे स्पष्ट होते.

फुले यांनी "तृतीय रत्न" "ब्राम्हनाचे कसब "सार्वजनिक सत्यधर्म ' याबरोबरच "शेतकत्याचा आसूड' या ग्रंथाची निर्मिती करून कनिष्ठ व मध्यम प्रतीच्या शेतकरी जीवनातील दुःखमय अवस्थेचे चित्रण साकार केले आहे. जातीय व्यवस्थेच्या आडून आर्थिक शोषण करणाऱ्या उच्च वर्गीयांच्या चित्रणाबरोबरच शेतकरी आणि उच्चवर्गीय यांच्यामध्ये होणारा लढा हा आर्थिक स्थरासंबंधी आहे, हे जाणूनच महात्मा ज्योतिराव फुले यांनी अज्ञान दूर करण्यासाठी सर्वप्रथम शिक्षण अधिक गरजेचे आहे ,व हे सर्वांनी घेतले पाहिजे यासाठी प्रयत्नशील राहून शिक्षणाची दारे सर्वसामान्य अस्पृश्य शोषित पीडित वर्गासाठी खुली केली. अज्ञान हे शोषनाचे मूळ आहे. शोषणापासून मुक्त व्हायचे असेल तर शिक्षण अति महत्त्वाचे आहे. हा विचार महात्मा फुले यांच्या एकंदरीत साहित्यकृतींमधून परावर्तित होताना दिसून येतो. गुलामगिरी मधून स्वतंत्र , हक्क,अधिकाराची जाणीव करून दिली.अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजव्यवस्थेतील अस्पृश्य जातीतील समुहाच्या व्यथा आणि वेदना 'अस्पृश्यांची कैफियत' या अप्रकाशित ग्रंथातून पहावयास मिळते. सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ सत्यमेव जयते हे बीजसूत्र घेवून साकारलेला ग्रंथ असून यातून महात्मा ज्योतिराव फुले यांचा सत्यशोधक हेतू पाहावयास मिळतो.क्रांतिकारक विचार आणि परीवर्तन घडवून आणण्यासाठी 'सार्वजनिक सत्यधर्म 'हा समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो.

संत तुकारामांच्या अभंगाचा विस्तृत व गाढा अभ्यास असल्यामुळे अभंगाच्या धर्तीवर महात्मा फुले यांनी अखंड काव्य प्रकाराची निर्मिती केली. या अखंडामधून अर्धपोटी उपाशी राहून शेतमजुरी करणाऱ्या स्त्री संदर्भात विवेचन केले आहे. यामध्ये भटीन आणि शेतकरी स्त्री यांच्या जीवनशैलीची तुलना केली आहे. कष्ट करून ब्राह्मणासह सर्वांना अन्नधान्य पुरविणाऱ्या स्त्रीयांना कुळंबिन असे हेटाळणी ने म्हटले आहे.

" कोंबडा आरव होता प्राप्त काळी ll बसे जाते पाळी शूद्रजाया,ll
गाण्याचा धिंगाणा भ्रतार उठतोll बईलास नेतो चरावयाll
अरुणोदय होता करी शेणकुर llवाही पाट्यावर केरासह ll
धूर्त आर्य तिला म्हणे कुळंबिनll गुणाचे कमी ना जोती म्हणे "ll

शूद्र स्त्रियांच्या संदर्भातील हा कृतघ्नपणा आहे ,असा भाव व्यक्त होताना दिसतो. फुले यांनी अखंडामधून स्त्रीवादी साहित्याचेच नव्हे तर ग्रामीण भागातील स्त्रीयांच्या विदारक जीवनाचे हुबेहूब चित्र रेखाटले आहे. स्त्रियांचा पहाटेपासून चा दिनक्रम आणि तिला करावी लागणारी कष्टाची कामे शुद्रंच्या घरी सडासमार्जन, तुळशी वृंदावन, वेणी-फणी करायला वेळ नसतो. खुरपंन पीक मळणी मातेऱ्यातून कांडून कुटून कण्या काढणे अशा प्रकारची कष्टदायक कामे शूद्र स्त्रीया करतात. जे लोक कामाचे मूल्य जाणत नाही, दुसऱ्याच्या जीवावर ऐश आरामात जिवन जगतात,आणि जे कामचुकार दांड कुंभाडी आहेत त्यांना श्रम करणाऱ्या स्त्रीयांना कुळंबिण म्हणण्याचा अधिकार कसा पोहचतो. यासंदर्भातील विचारामधूनच स्त्री शिक्षण , बालहत्या, प्रतिबंध गृह, केशवपन बंदी अदी उपक्रम स्त्रीयांसाठी हाती घेतले. अशाप्रकारे महात्मा ज्योतिराव फुले यांनी सामाजिक शैक्षणिक राजकीय विचारा मधून साकार केलेल्या अनेक साहित्यकृतीपैकी कुळंबिन सारख्या अखंडामधून शूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्रीच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा अखंडधून घेतला आहे. यावरून महात्मा ज्योतिराव फुले यांचे साहित्यातील योगदान स्पष्ट होताना दिसते.

**समारोप**

महात्मा फुले यांचे साहित्य हे विषमता मुक्त समाज निर्मितीचे तत्वज्ञान आहे. मानव आणि त्यांच्या सुखाचा शोध एकंदरीत महात्मा फुले यांच्या साहित्यामधून व्यक्त होतो. मानव मुक्तीचा जाहीरनामा म्हणून त्यांचे लेखन महत्त्वाचे ठरते. श्रेष्ठ मानवी मूल्य व त्यांचा जागर प्रामुख्याने त्यांच्या लेखणीने घडवून आणला आहे. समकालीन सामाजिक वास्तव आणि इतिहासगत सांस्कृतिक संघर्ष उलगडून दाखविण्याचे महान कार्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या साहित्याने केले आहे.

महात्मा फुले यांनी निर्माण केलेल्या साहित्यकृतीचा आढावा घेतल्यास त्यांचे साहित्यातील योगदान अधिक महत्त्वपूर्ण ठरणारे आहे. एक मूलगामी विचारवंत लेखक म्हणून विस्तृत स्वरूपात साहित्यसंपदा आणि केली. अस्पृश्य बहुजन समाजाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी वृत्तपत्रांमध्येही लेखन केले. एक क्रांतिकारी व सुधारणावादी लेखक या भूमिकेतून साकार झालेली महात्मा ज्योतिराव फुले यांची साहित्यसंपदा निश्चितच आधुनिक पिढीला मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरणारी आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

1. महात्मा फुले:- शेतकऱ्यांचा आसूड ई-बुक पृष्ठ क्रमांक 9
2. धनंजय किर , डॉ.मालशे श.ग.आणि य. दी. फडके-: संपादकीय महात्मा फुले समग्र वाडमय, मुंबई आवृत्ती सहावी आवृत्ती 2006 महाराष्ट्र राज्य साहित्यआणि सांस्कृतिक मंडळ मुंबई पृष्ठ क्रमांक 192
3. गं. बा. सरदार:- महात्मा फुले व्यक्तिमत्व आणि विचार- ग्रंथाली प्रकाशन, मुंबई पृष्ठ क्रमांक 89
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद,अक्षरदीप संपादकीय मराठी अभ्यास मंडळ महात्मा फुले अखंड :- कुंळबीन एज्युकेशनल पब्लिशर्स,पहिली आवृत्ती 2013 पृ. क्र.147.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे धर्मांतर : एक ऐतिहासिक बदल घडवून आणणारा निर्णय

**अमृता विष्णू जोगदंड**

संशोधक विद्यार्थ्यांनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 20 व्या शतकातील भारतीय समाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे एक प्रमुख प्रणेते होते. शेकडो वर्षे धर्माच्या नावाने दडपलेल्या तळागाळातील लोकांमध्ये स्वत्:च्या हक्कांची जाणीव निर्माण करुन ते मिळविण्यासाठी संघर्ष करण्यास त्यांनी त्यांना प्रवृत्त केले आहे. एक जीवनपध्दती म्हणून धर्माचा स्वीकार केला गेला. पण धर्म नाकारला तर काय होऊ शकते या गोष्टीची चर्चा अनेक विचारवंतांनी केली आहे. 'धर्म अगदीच नको हे टोक, धर्माशिवाय सगळे निरर्थक हे दुसरे टोक, धर्म राहिला तरी हरकत नाही पण धर्माचा गैरवापर नको असे म्हणणारा मधला विचार अशा गोष्टीचा आसपास धर्माचा विचार फिरत राहिला'. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य म्हणजे सामाजिक क्रांतीचे एक महाकाव्य् होय, या महाकाव्यातील आशयस्त्रोत म्हणजे मानवतावाद होय. हा मानवतावाद रुढार्थाने कोणत्याही धर्म वा धर्म शास्त्राशी संबंधित नाही. तो अभिजात संस्कार आणि परिणत प्रज्ञेने विकसित झाला आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर हे पारंपारिक धर्मश्रध्देला छेद देऊन नव्या धर्मश्रध्देचा संस्कार स्विकारणे होते. पण दुदैवाने आम्ही धर्मांतर म्हणजे एक धर्म सोडणे व दुसरा स्विकारणे असा त्याचा अर्थ लावला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे धर्मांतर केले त्याचा अन्वयार्थ विरोधकांनी व अनुयायांनी योग्य् असा लावला नाही.

**गृहितके :-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक धर्मांचा अभ्यास करुन बौध्द् धर्माचा स्वीकार केला.

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरामुळे अनेक महत्त्वपूर्ण बदल घडून आले.

**उद्दिष्टे :-**

1) हिंदू धर्माचे आकलन करुन घेणे

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मविषयक भूमिका समजून घेणे.

3) बौध्द् धम्माच्या स्वीकारामुळे दलितांवर झालेला सामाजिक, राजकीय , आर्थिक, धार्मिक, मानसिक बदलांचा अभ्यास करणे.

**विषय प्रवेश :-**

डॉ. बाबासाहेब आंबडकरांच्या धर्मांतराला दोन पैलू होते.पहिला हिंदू धर्माचा धिक्कार व दुसरा बौध्द् धम्माचा स्वीकार हा होय. यापैकी पहिला पैलू हा काही प्रमाणात प्रभावी ठरला आहे. हिंदू धर्माचा त्याग केल्यामुळे या धर्माने लादलेल्या मानसिक बेड्यातून दलितांची मुक्तता झाली. खेड्यातील आर्थिक जीवन अजूनही जुन्या रुढीशी निगडीत आहे. बौध्द् धम्माच्या स्वीकाराने एक नवीन अस्मिता त्यांना प्राप्त् झाली आणि तिच्यामधून त्यांच्या चळवळीचे सामर्थ्य ही अनेक पटीने वाढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या बौध्द् धम्म् हा भारतातील पारंपारिक बौध्द् धम्मापेक्षा पुष्कळ् वेगळा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लिखाणात धर्म आणि धम्म् असा फरक केला आहे. (1)

**धर्मांतराची घोषणा :-**

13 ऑक्टोबर 1935 रोजी येवला (जि. नाशिक) येथे मुंबई इलाखा दलित परिषद भरली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सवर्ण हिंदूच्या जुलूमातून सुटका करुन घेण्यासाठी अस्पृश्यांनी धर्मांतर करावे असे आवाहन केले. ते म्हणाले की, 'मी हिंदू म्हणून जन्माला आलो कारण कुठे जन्माला यावे हे माझ्या हाती नव्हते पण मी हिंदुत्वाचा कलंक घेऊन कदापि मरणार नाही'. येवले परिषदेमध्ये जो ठराव पारित झाला होता त्यात म्हटले होते की, माणसांची आणि द्रव्याची अपरिमित हानी सोसून मुंबई इलाख्यातील अस्पृश्य् वर्गाने महाड येथे चवदार तळयावर सत्याग्रह केला. गेल्या सहा वर्षापासून काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सतत संघर्ष सुरु आहे. परंतु स्पृश्य् हिंदुचे यत्किंचितही मतपरिवर्तन झाले नाही. म्हणून अस्पृश्य् वर्गाची ही परिषद असा ठराव पास करीत आहे की, आता हिंदूची मनधरणी करण्याचे धोरण सोडून देण्यात यावे. सत्याग्रह करुन आपले सामर्थ्य व्यर्थ वाया घालवू नये तर आता यापुढे स्पृश्य् हिंदूपासून आपल्या समाजाचा तुकडा पाडून आपल्या समाजास स्वतंत्र करावे आणि हिंदुस्थानातील अन्यधर्मियात मिसळून समानतेचे व मानाचे स्थान मिळविण्यासाठी झटावे. (2)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचा विचार करताना प्रथमत: धर्मांतर म्हणजे काय? याचा अर्थ माहित असणे आवश्यक् आहे. धर्मांतर म्हणजे बदल, विधायक बदल, जुन सोडून नव्याचा स्वीकार उच्चतेकडे होणारा विधायक प्रवास होय. याचा सरळ व साधा अर्थ नवीन जीवन मार्गाचा स्वीकार करणे होय. (3)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केल्यानंतर 21 वर्षांनी धर्मांतर केले. 14 ऑक्टोंबर 1956 रोजी दीक्षा घेतल्यानंतर त्याप्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणतात, आम्ही हिंदू धर्म त्यागाची चळवळ 1935 पासून येवले येथे एक ठराव करुन हाती घेतली. मी हिंदू धर्मात जन्मलो तरी मी हिंदू धर्मात मरणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती आणि ती मी खरी करुन दाखविली.

**बौध्द् धम्माची निवड :-**

काही देशी विदेशी बौध्द् भिक्खू व प्रतिनिधी आंबेडकरांना भेटले व त्यांनी आपल्या कसोटीला उतरणारा व आपल्या समाजाला मानवता देणारा बौध्द् धर्म हा जगात एकमेव धर्म आहे तो आपण स्वीकारावा अशी नम्र विनंती केली. दि. 23 आक्टोंबर 1935 च्या दैनिक त्रिकाळने आंबेडकरांना म्हटले होते की, आपण इस्लामी अगर ख्रिस्ती धर्म स्वीकारत नाही असे आंबेडकरांनी जाहीर केले व बुध्दधम्म् हा लोकशासित धर्म असल्यामुळे तो आपल्याला पटत असल्याचे त्यांनी सांगितले. (4) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचा मुख्य् उद्देश जाती विरहीत समतामुलक शोषणमुक्त् समाज निर्माण करण्याचा होता. या उद्देशापर्यंत जाण्यासाठी बौध्द् धम्म् हा एक राजमार्ग आहे. अशी त्यांची ख्याती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे जात वर्ण विरोधी भूमिका मांडली होती. ती अशी , हिंदू धर्माची इमारत चातुवर्ण्य कल्पनेवर उभी आह. त्यामुळे हिंदू समाज व्यवस्था विषमता पोषित आहे. बुध्दांचे तत्त्वज्ञान चार्तुवर्ण्य व्यवस्था जातिभेद नाकारीत आहे म्हणून ते बाबासाहेबांना आवडले. (5)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ब्रम्हदेशीय पूज्य् भिक्खु चंद्रमणी महास्थावीर यांच्या हस्ते 14 आक्टोंबर 1956 रविवार विजयादशमी दिवशी दीक्षा घेतली व उपस्थित जनसमुदायाला दिली. (6)

**बौध्द् धम्म् स्वीकाराचा परिणाम :-**

**मानसिक बदल :-**

बौध्द् धम्म् स्वीकाराचा बौध्दजनांवर फार चांगला व खोल असा परिणाम झाला. त्यांच्या मनात मोठे परिवर्तन झाले. हे मानसिक परिवर्तन होय. "मी बौध्द् धम्माचा स्वीकार केला आहे. मी आता बौध्द् आहे, मी महार नाही, अस्पृश्य् नाही, हिंदू नाही, मी आता माणूस झालो . मी वरिष्ठ हिंदूच्या बरोबरीचा माणूस झालो. मी सर्वसमान

झालो. मी आता हीन नाही, कनिष्ठ नाही माझ्या बौध्द् धम्म् स्वीकाराबरोबर माझे अस्पृश्यत्व् नष्ट झाले . माझ्या पायातील शृंखला तटातट तूटून गेल्या. मी इतरांसारखा माणूस झालो. मी आता समता, बंधुता या तत्त्वांच्या जगात आलो. मी आता वरिष्ठ हिंदूचा गुलामी चाकर नाही. गुलामी कामाचे ओझे वाहणारा मी आता कायमस्वरुपी नोकर नाही. मी स्वतंत्र झालो आहे. मुक्त् झालो आहे. मी आता स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक झालो आहे". (7)

**बौध्द् जनांनी हिंदू देव – देवतांचा त्याग केला :-** धर्मांतरानंतर बौध्द् जनांनी हिंदू देवदेवतांचा सर्वस्वी त्याग केला होता. त्याला सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषणेपासूनच झाली. बौध्द् धम्माची दीक्षा घेतल्यानंतर बौध्दजनांनी हिंदू देवतदेवतांचा सर्वस्वी त्याग केला. हिंदू देवतांपुढे नवस बोलणे, अभंग, भजने, ओव्या म्हणणे बंद केले. हिंदू फोटो ऐवजी गौतमबुध्द् आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो लावू लागले. जागोजागी बौध्द् विहार बांधण्यात आले आणि मोठा धार्मिक बदल घडून आला.

**विवाह विधीतील बदल :-** बौध्द् विवाह विधी एक आदर्श विवाह विधी समजण्यात येते. यशस्वी गृहस्थी जीवनासाठी पार पाडावयाच्या कर्तव्याची वर व वधुला शपथ देण्यात येते. विवाहावेळी कुंडली पाहणे बंद केले. पंचांग वेळ पाहणे बंद केले.

**धार्मिक सण/ उत्सवात बदल :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 13 आक्टोंबर 1935 या दिवशी हिंदू धर्म सोडण्याची घोषणा केली व 14 ऑक्टोंबर 1956 रोजी नागपूर येथे अशोक विजयादशमी दिवशी त्यांनी बौध्द् धर्माचा स्वीकार करुन लाखो बौध्द् बांधवाना बौध्द् बांधवाना बौध्द् धर्माची दीक्षा दिली. तेव्हापासून प्रत्येक दिवशी अशोक विजयादशमी हा दिवस दलित बांधव मोठ्या प्रमाणात धर्मचक्र परिवर्तन दिन म्हणून साजरा करु लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व महापरिनिर्वाण दिन बौध्द् बांधव साजरे करु लागले. बौध्द् धर्मात पौणिमेला फार महत्त्व् आहे म्हणून काही लोक दर पौर्णिमेला उपवास करतात व त्रिसरण – पंचशीलाचे पठण करतात. (8)

**धर्मांतरामुळे राहणीमानात झालेला बदल :-** धर्मांतरामुळे बौध्द् जनांनी गावकी, बलुतेदारी , वतनदारी, वेठबिगारी आणि येसकरीची सर्व गलिच्छ्‍ व पारंपारिक कामे सोडून देऊन नव्या व्यवसायाचा स्वीकार केला नवे व्यवसाय, छोटे धंदे, शेती यासारखी काम करुन उत्पन्नात बदल झाला व राहणीमानातही बदल झाला.

**पोषाखातील बदल :-**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजसुधारणेची चळवळ हाती घेण्यापुर्वी अस्पृश्य् समाजाला प्रेतावरची फेकून दिलेली कफने अंगावर कपडे म्हणून वापरावी लागत होती. मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायात चांडाळ व श्वपच् (अस्पृश्य्) जातीबाबत म्हटले आहे की, "कुत्री आणि गाढवे हेच त्यांचे धन, प्रेतावरील कपडे हेच त्यांची वस्त्रे". (9) परंतु धर्मांतरानंतर पोषाखात बराच मोठा बदल झाला. आता कपड्यावरुन तरी दलित दिसत नाही. त्याला दलित म्हणून ओळखणे कठीण आहे.

**आहारातील बदल :-**धर्मांतरानंतर आणि बाबासाहेबांच्या भाषणातली प्रबोधनामुळे अस्पृश्यांनी मृत प्राण्याचे मांस खाणे , भाकरी मागणे हळूहळू बंद केले. आता बौध्द् कुटूंबातील लोक ढोरांचे मांस खाणे बंद केले आहे. ज्याची आर्थिक परिस्थिती बरी आहे असे बौध्द् लोक मसालेदार,रुचकर आधुनिक पध्दतीने डायनिंग टेबल, खुर्च्याचा उपयोग करुन जेवण करतात. लग्नसमारंभात विविध पदार्थ बनवले जातात.

**ताडी, दारु इत्यादी व्यसने बंद झाली :-** धर्मातरापुर्वी अस्पृश्य् समाज ताडी, दारु, अफु, गांजा पीत होता. धर्मांतरानंतर दलितांमध्ये दारु पिण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

**अंधश्रध्दा व बौध्दामधील परिवर्तन :** पूर्वी आजारी माणसाच्या गळयात अथवा दंडावर मांत्रिकाकडून गंडे, दोरे, दिले जात असे. देवीला कोंबडे बकरे कापण्याचा नवस केला जात असे. अंगारे, धुपारे, मुहूर्त, शुभ-अशुभ, करणी, भूतखेत, पिंडदान इत्यादी अंधश्रध्दाचा मोठ्या प्रमाणात पगडा होता. आता सध्या बौध्द् समाजातील अंधश्रध्दा मोठ्या

प्रमाणावर कमी झालेली आहे. देवावरचा व भूतावरचा विश्वास उडाला आहे. पित्रपाट पिंडदान आता हा समाज करत नाही.

**निवारा व इतर सोयीयात झालेले बदल :-**धर्मांतरापूर्वी बहुसंख्य् समाज हा गावाबाहेर झोपड्यामध्ये राहत असे परंतु आता मातीची, विटाची , पत्र्याची , सिंमेट, कॉक्रीटची घरे बांधून हा समाज गावात व शहरात राहू लागला आहे. कार. मोबाईल, दुचाकी यासारख्या सोयीसुविधा आहेत.

**शैक्षणिक क्रांती झाली :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अधिक महत्व् दिले आहे. "शिका , संघटित व्हा संघर्ष करा" असे त्यांनी सांगितले होते. याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर बोध्द् समाजावर झाला. धर्मांतरानंतरचे दलित वर्गाचे शिक्षणाचे प्रमाण लक्षणीय आहे. पदवीधराची संख्या वाढत आहे. विद्यापीठाचे कुलगुरु, प्राचार्य, नियोजन आयोगाचे सदस्य्,शासकीय विभागात संचालक, न्यायाधीश अशा मोठमोठ्या पदांवर या धर्मांच्या व्यक्ती कार्यरत आहेत. बौध्द् धर्मातील लोकांची गुणवत्ता सिध्द् होत आहे. (10)

**आर्थिक बदल :-** प्राचीन काळापासून मानवाचे जीवन आर्थिक साधनांशी निगडीत आहे. धर्मांतरामुळे बौध्द् समाजामध्ये शैक्षणिक क्रांती झाली आणि आर्थिक पत मोठ्या प्रमाणात सुधारली.

**राजकीय बदल :** धर्मांतरानंतर विविध ठिकाणातून बौध्द् समाजातील लोकांनी राजकिय प्रतिनिधित्व् मिळवून आपल्या परीने राजकीय चळवळीस योगदान दिल्याचे आढळते.

**निष्कर्ष :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ध्यास भारतीय जनता बुध्दिवादी करण्याचा होता. आर्थिक, राजकिय, स्वातंत्र्यापेक्षा मानसिक स्वातंत्र्य म्हणजे निनिश्वरवादी करणे होय. जो निनिश्वरवादी असतो तोच सेक्युलरवादी म्हटला जातो तोच बुध्दिवादी बनतो. सर्व प्राणीमात्र समान आहेत ही दृष्टी त्याला लाभते. तो सर्वांच्या कल्याणाचा विचार करतो. म्हणून बुध्दिवादी जनतेची अर्थात स्वतंत्र मत असलेल्या लोकांची संख्या वाढावी असे बाबासाहेबांचा ध्यास होता. म्हणून बाबासाहेबांनी दिलेला बौध्द् धम्म् हा सर्वांच्या उन्नतीचा मार्ग आहे असे म्हटले तर वावगे ठरु नये.

**संदर्भ सूची :-**

1. Keer Dhananjay, Dr. Ambedkar, Life and Mission, Popular Prakashan, Bombay 1971 page No. 107 to 110
2. आंबेडकर (डॉ) बाबासाहेब लेखन व भाषणे, खंड 18 वा, भाग 1 पृ.430 ते 413
3. महास्थवीर संघरक्षित, डॉ. आंबेडकरांची धम्मक्रांती, त्रिरत्नग्रंथमाला, पुणे, पृ.क्रं 1 ते 19
4. खैरमोडे चां.भ., डॉ. बी. आर. आंबेडकर चरित खंड 6, पृ. 88
5. फडके बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री.विद्या प्रकाशन, पुणे 2000 पृ. 258
6. धम्मदीक्षा पत्रक दि.29/09/1956
7. खरात शंकरराव, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर", इंद्रायणी साहित्य् प्रकाशन, पुणे15 मे 1990, पृ. 211
8. खोब्रागडे दिपककुमार (मुख्यसंपादक) दिक्षाभूमी गौरवग्रंथ, खंड 2, बहुजन साहित्य् प्रसार केंद्र, नागपूर दि. 10 मार्च 2013, पृ.635
9. गुप्ता राजाराम, मनुस्मृती, पुस्तक् महाल प्रकाशन, अध्याय 10 वा पृ. 155
10. खोब्रागडे दिपककुमार (मुख्यसंपादक) दिक्षाभूमी गौरवग्रंथ, खंड 2, बहुजन साहित्य् प्रसार केंद्र, नागपूर दि. 10 मार्च 2013, पृ. 42

# "महात्मा जोतिराव फुले यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास"
# (A Study of Economics Thoughts of Mahatma Jotirao Phule)

**प्रा.शेळके सी.एस.**
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता.जि.बीड

**प्रस्तावना :**
महात्मा फुले यांना आधुनिक महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाज सुधारक व समाज क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जाते. अनेक अर्थांनी ते क्रांतीकारक होते. त्यांनी शेतकरी, कष्टकरी, बहुजन समाज, दलित महिला यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडली. सनातनी विचारावर टिकेचे आसुड ओढले. आर्थिक विषमता, शोषण, पुरोहित वर्गाचे वर्चस्व, अस्पृश्यता, जातीभेद, केशवपन, विधवा विवाह, कर्मकांड, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य स्त्री शिक्षण यासारख्या सामाजिक सुधारणा करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. म्हणून त्यांना सामाजिक क्रांतीचे अग्रदुत असे म्हटले जाते. सामाजिक समता, धार्मिक, सहिष्णुता, आर्थिक न्याय, शोषणमुक्ती यासाठी फुलेनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण, शिक्षण, साहित्य अशा अनेक क्षेत्रामध्ये ज्या महापुरुषांनी नवे विचार व नवी मूल्ये रुजविली यामध्ये महात्मा फुले हे अग्रस्थानी होते. शिक्षण हे सर्वांगिण विकासाचे प्रवेशद्वार आहे अशी त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी शुद्र व अतिशुद्र मानल्या जाणाऱ्या स्त्रियांना शिक्षण खुले करुन दिले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या चळवळीपासून जोतिरावांनी घेतलेली प्रेरणा प्रबळ होती. मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक गुलामगिरीत जखडलेल्या समाजाची गुलामगिरीतून सुटका केल्याशिवाय समाजाची सुधारणा शक्य नाही हे त्यांनी जाणले होते. अशा या महान समाजसुधारकाला महाराष्ट्रात नव्हे तर संपूर्ण भारतात ओळखले जाते.

महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' व 'शेतकऱ्याच्या आसूड' ही महत्वपूर्ण पुस्तके लिहिली, याच पुस्तकातून त्यांच्या सामाजिक विचाराबरोबर आर्थिक विचारांची देखील मांडणी झालेली दिसून येते. त्यांच्या या अविस्मरणीय कार्याबद्दल १८८८ मध्ये जनतेकडून त्यांना 'महात्मा' ही पदवी प्रदान करण्यात आली.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१)महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांचा आढावा घेणे.

२)महात्मा फुले यांच्या शेती सुधारणाविषयक विचारांवर प्रकाश टाकणे.

३)महात्मा फुले यांच्या शेतकऱ्यांचे शोषण, श्रमप्रतिष्ठा, कामगार, व्यवसाय, पीक संरक्षण, कर इत्यादी विषयक विचारांचा अभ्यास करणे.

४)महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार विशद करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे. संबंधित विषयाच्या अभ्यासासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शासकीय प्रकाशने, मासिके, त्रैमासिके, संशोधनात्मक लेख, महात्मा फुले समग्र वाड्मय, संकेतस्थळे इत्यादीचा आधार घेवून संकलित माहितीचे विश्लेषण केले आहे.

**महात्मा फुले यांचे आर्थिक विचार :**

महात्मा फुले हे अर्थशास्त्र नव्हते. तरी सुध्दा त्यांनी आपल्या लिखानातून आर्थिक प्रश्नांची जाणीव करुन देण्याचे कार्य केले. अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकाससंबंधी काही विचार मांडले. त्यापैकी काही प्रमुख विचार पुढीलप्रमाणे आहेत.

**शेतीविषयक विचार :**

भारत हा कृषीप्रधान देश असून भारताच्या व भारतीय माणसाच्या आर्थिक विकासामध्ये शेतीला महत्वाचे स्थान आहे. ज्या राष्ट्रातील लोकाचा मुख्य व्यवसाय शेती असतो. त्या राष्ट्राचा विकास शेती विकासावर अवलंबून असतो. म्हणून महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत, अधिकाऱ्यासारख्या सवलती देणे, शेतीवरील शेतसारा कमी

करणे, दुष्काळी परिस्थितीत तो माफ करणे यासारखे उपाय त्यांनी सुचविले. हे सर्व करण्यासाठी शासनाचा अनुत्पादक खर्च कमी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.

महात्मा फुले यांच्या मते शेतकरी, सैनिक व प्रशासकीय अधिकारी या तीन घटकावर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो. परंतु या तीन घटकापैकी शेतकऱ्यांची अवस्था फारच वाईट होती. त्यांना निकृष्ठ प्रतीचे जीवन जगावे लागत होते. सैनिक व प्रशासकीय वर्ग चांगल्या प्रतीचे जीवन जगत होते. प्रशासकीय वर्गाला सवलती होत्या आणि अधिकारही होते. अधिकारी वर्ग प्रति महिना रु. १५ पेक्षा जास्तीचा खर्च चैनीवर करत होता तर इंग्रज सैनिकांचे उत्पन्न शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या दहापट जास्त होते. याऊलट देशाचा महत्वाचा आधारस्तंभ असणाऱ्या शेतकऱ्यांची मात्र दयनीय अवस्था होती. शेतकऱ्यांच्या घरातील आठ—नऊ माणसे काबाड कष्ट करुन मिळणाऱ्या उत्पन्नातून शेतसारा व कर्जाची रक्कम जाता एका माणसाला दरमहा रु. ३ एवढे देखील उत्पन्न शिल्लक राहत नव्हते. महात्मा फुले यांच्या मते शेतकऱ्यांचा जन्म दारिद्र्यात व कर्जात होतो, दारिद्र्यात व कर्जात वावरतो आणि त्यातच त्यांचा अंतही होतो. संस्थानिकांचा अंत, जमिनीचे विभाजन व तुकडीकरण, ब्रिटनमधून वस्तूंची केली जाणारी आयात, शेतकऱ्यांचे विविध मार्गांनी केले जाणारे शोषण व पिळवणुक यासारख्या कारणामुळे शेतकऱ्यांच्या दारिद्र्यात व कर्जात वाढ होत गेली असे महात्मा फुले यांचे मत होते.४

**शेती सुधारण्यासाठी उपाय :**

भारतातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीसुधारणा झाली पाहिजे. त्यासाठी महात्मा फुले यांनी पुढील उपाय सुचविले.

१)शेतीसाठी योग्य रितीने पाणी पुरवठा करावा.

२)सरकारी मदतीशिवाय व मार्गदर्शनाशिवाय विहिरी खोदून, शेतीला पाणी पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तेजनार्थ बक्षीसे द्यावीत.

३)जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी विहिरी, नदी, नाले व तलाव यातील गाळ आणि खते शेतकऱ्यांना मोफत द्यावीत.

४)शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण देणे.

५)खेड्यापाड्यातून कृषी रक्षक योजना राबविली पाहिजे.

६)शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा करावा.

७)मध्यस्ताकडून शेतकऱ्यांची फसवणुक होऊ नये यासाठी सरकारने व्यवहारावर नियंत्रण ठेवावे.

८)जमिनीची सुपिकता टिकून ठेवण्यासाठी बांधबंदिस्त करणे.

**शोषणविषयक विचार :**

शेतकऱ्यांचे विविध मार्गाने होणारे शोषण हेच शेतकऱ्यांच्या दुरवस्थेला कारणीभूत होते असे महात्मा फुले यांचे मत होते. ब्रिटीशांच्या मुक्त व्यापाराच्या धोरणामुळे ग्रामीण भागातील कारागीरी, हस्त व्यवसाय, कुटीर उद्योग बंद पडले. त्यामुळे शेतकऱ्यांची दुर्दशा झाली. शेतकऱ्यांना मुलांची लग्ने, सरकारी कर भरणे, सण, समारंभ साजरे करणे, जुने कर्ज फेडणे इत्यासाठी सावकाराकडून २५ ते ४० टक्के व्याजाने कर्ज घ्यावे लागते असे. हे कर्ज घेण्यासाठी घर, जमीन, भांडे तारण म्हणून ठेवावे लागत असत. मुदतीत कर्जफेड केली नाही तर तारण ठेवलेल्या संपत्तीवरील शेतकऱ्यांच्या हक्क संपुष्टात येत असे. अशा प्रकारे सावकाराकडून शेतकऱ्यांचे शोषण होत असे. शेतसारा भरण्यासाठी, पोटाची खळगी भरण्यासाठी शेतकऱ्यांना गुरेढोरे विकावी लागत असत. शेतीच्या तारणावर सरकारकडून कर्ज घेतले तेव्हा सरकार व अधिकाऱ्यांनी खोटी गहाणखते तयार करुन शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडल्या. न्याय मिळावा म्हणून कोर्टात गेले असता तेथे वकिलांनी शेतकऱ्यांकडून जास्तीची फी वसूल केली.

धार्मिक विधी आणि कर्मकांडाच्या नावाखाली शेतकऱ्यांना लुटण्याचे कार्य ब्राम्हण वर्ग करीत असे. या संदर्भात महात्मा फुले यांनी असे म्हटले आहे की, 'असले निसं:ग दांडगे भिकारी दुसऱ्या एखाद्या देशात अथवा जातीत सापडणे शक्य नाही.' १० जून १८७८ साली कॉकरेल या ब्रिटीश अधिकाऱ्याने केलेल्या पाहणीत असे दिसून आले की, एका शेतकऱ्याने सावकाराकडून १० रु. चे कर्ज घेतले होते. त्यानंतर पुढच्या दोन वर्षात कर्जफेड म्हणून ११० रु. दिले, तरी त्याच्या नावावर २२० रुपये बाकी होती. म्हणजेच शेतकऱ्याला ३३ पट रक्कम भरावी लागत होती. याशिवाय ब्रिटीश भारतातील कच्चा माल स्वस्त भावाने खरेदी करुन आपल्या देशात नेत असत व पक्का माल तयार करुन अधिकच्या दराने भारतात विकला जात असे. यातूनही भारतीय शेतकऱ्यांचे शोषण केले. एवढेच नाही तर

१८८०–८१ या वर्षात ब्रिटीश भांडवलदारांना ५ कोटी रुपये देण्यात आले होते. ही देखील शेतकऱ्यांची एक प्रकारची लुट होती.

**श्रम प्रतिष्ठेसंबंधी विचार :**

आज समाजात जो माणूस काम करत नाही त्याला प्रतिष्ठित समजले जाते. पण जो माणूस दिवसभरातील बारा तास तोंडात माती जाईपर्यंत काबाड कष्ट करतो. आपल्या बरोबर इतरांच्या पोटाचीही काळजी करतो त्या माणसाला समाजात काडीचीही प्रतिष्ठा नसते. परंतु अशा श्रमाला समाजात प्रतिष्ठा मिळायला पाहिजे असे महात्मा फुले यांचे मत होते. श्रमाचा व मानवी जीवनाचा, श्रमाचा व देशाच्या संस्कृतीचा, श्रमाचा आणि शिक्षणाचा संबंध जोडून श्रमाला महत्व देणारे आणि त्याआधारे सामाजिक प्रतिष्ठेचा निकष बदलून शुद्र, अतिशुद्र व भूमिहीन यांच्या जीवनाला सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारे महात्मा फुले हे महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील थोर विचारवंत होते.

**कामगारासंबंधीचे विचार :**

कामगारांचे शोषण सरकारी अधिकारी आणि ठेकेदार कसे करतात याची जाणीव महात्मा फुले यांना होती. महात्मा फुले यांचे मुंबईतील स्नेही नारायणराव लोखंडे यांनी गिरणी कामगारांच्या उन्नतीसाठी व त्यांच्या कष्टमय परिस्थितीत बदल घडवून आणण्याचे ठरविले. लोखंडे यांनी कामगारांच्या समस्यांचा, अडचणींचा व कष्टांचा बारकाईने अभ्यास केला. महात्मा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा उध्दार करण्याचे काम करण्यास सुरुवात केली. १८७५ मध्ये गिरणी कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सरकारने एक मंडळ नेमले. या मंडळाला असे दिसून आले की, मुलांना दिवसभर अतिकष्टाची कामे करावी लागतात. स्त्रियांना दरदिवशी जास्त तास काम करावे लागते. परंतु या मंडळाने वरील बाबींची दखल घेतली नाही. महात्मा फुले यांच्या प्रयत्नामुळे कामगारांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे काम ‘दीनबंधू’ या साप्ताहिकाने केले. बरेच कामगार ठेकेदारीचे काम करीत असत. त्यामुळे त्यांचे वेतन ठरलेले नसायचे. कामगारांना संघटीत करण्यासाठी १८८० मध्ये नारायणराव लोखंडे यांनी ‘मिल हँड असोसिएशन सोसायटी’ स्थापन केली. ही भारतातील कामगारांची पहिली संस्था होय. या संस्थेमुळे फॅक्टरी कमिशनवर कामगारांचा प्रतिनिधी घेण्यात आला. दारुची दुकाने बंद करण्याची मागणी करण्यात आली. आठ वर्षाच्या आतील मुलांना कामावर ठेवू नये. स्त्रियांना कामात सवलती द्याव्यात. कामगारांना मध्यंतरी विश्रांतीची सुट्टी देण्यात यावी असे मत मांडण्यात आले. या सर्वांच्या पाठीमागे महात्मा फुलेच होते. अशा प्रकारे त्यांनी कामगारावरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला.

**व्यवसायविषयक विचार :**

इंग्लंडमध्ये १७ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे भारतातील लोहार, विणकर, बारा बलुतेदार यांचे व्यवसाय बंद पडले. ब्रिटीशांनी भारतातील शेतीमध्ये तयार झालेला माल कमी दराने खरेदी केला. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च भरुन निघणे ही अवघड झाले. अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांना शेतीबरोबर जोड व्यवसाय करण्यासाठी सरकारने आपल्या खजिन्यातून पैसा खर्च करावा. त्यामुळे भारतातील व्यावसायिकांना त्यातून पैसा खर्च करावा. त्यामुळे भारतातील व्यावसायिकांना विविध जातीच्या चांगल्या शेळ्या, मेंढ्या यांची खरेदी करुन त्यांची पैदास वाढविणे शक्य होईल. याशिवाय शेळी व मेंढी पालनाच्या व्यवसायातून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी खत उपलब्ध होईल. त्यामुळे शेती सुपिक होवून शेती उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. तसेच लोकरीपासून उत्पन्न प्राप्त होईल. शेतकऱ्यांची आर्थिक गरज म्हणून त्यांना गोरक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे. असे केल्यास शेतीबरोबर शेतकऱ्यांचा व्यवसाय वाढीस चालना मिळून शेतकऱ्यांचा फायदा होईल असे महात्मा फुलेंनी सूचित केले होते.

**शिक्षणविषयक विचार :**

माणसाच्या आर्थिक विकासामध्ये शिक्षणाचे महत्व सांगणारे महात्मा फुले हे एकमेव विचारवंत होते. त्यांनी स्वत: शाळा काढून शिक्षण देण्याचे काम केले. त्यांच्या मते शिक्षण हा आर्थिक विकासाचा पाया आहे. भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांना व त्यांच्या मुलांना विविध प्रकारचे शिक्षण दिले पाहिजे. शेतकऱ्यांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. जेणेकरुन त्यांची फसवणुक होणार नाही, त्यांचे शोषण कोणी करणार नाही. वरिष्ठांना शिक्षण दिले म्हणजे ते झिरपून कनिष्ठापर्यंत पोहोचते या सिध्दांताचा महात्मा फुले यांनी धिक्कार केला. शेतकऱ्यांच्या मुलांना शेती संबंधित शिक्षण द्यावे. शिक्षणाचे साहित्य मोफत द्यावे. सुशिक्षित मुलांना विदेशातील शेतकीशाळा सरकारी खर्चाने दाखवून आणाव्यात. शेतसाऱ्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी करावा असे प्रतिपादन महात्मा फुले यांनी केले.

**करविषयक विचार :**

ब्रिटीश राजवटीत कर हा सरकारी उत्पन्नाचा महत्वाचा मार्ग होता. कर आकारत असताना शेतकऱ्यांची सोय बघितली जात नव्हती. आवश्यकतेनुसार जुलमी स्वरुपाचा कर आकारला जात होता. हा कर भरण्यासाठी बऱ्याच वेळा शेतकऱ्यांना स्वत:च्या जमिनी विकाव्या लागल्या. एवढेच नव्हेतर दर ३० वर्षांनी शेतसाऱ्याचे दर बदलत असत. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांच्याकडून लोकल फंड नावाचा कर वसूल केला जात असे. दर सहा मैलावर शेतमाल विक्रीच्या जकाती बसविल्या जात असत. मीठावर कर आकारला जात होता. शेतकऱ्यांच्या उत्पन्नातून सर्व प्रकारचा कर वजा जाता दरमहा दरमाणसी केवळ ३ रुपये इतके अल्प उत्पन्न मिळत असे. याउलट परदेशातून येणाऱ्या मालावर मात्र कर बसविला जात नव्हता. कारण तो माल ब्रिटिशांचा होता. शेतकऱ्यांच्या कर आकारणीमध्ये अशा प्रकारचा भेदभाव केला जात होता. म्हणून महात्मा फुलेंनी असे म्हटले होते की, गोऱ्या व काळ्या कामगार आणि अधिकारी यांच्यावर होणारा खर्च कमी करुन, त्यांचे पगार कमी करुन भारतीय शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण दिले नाही, त्यांच्यावरील शेतसारा, जकात कमी केला नाही तर या जुलमाचे भयंकर परिणाम ब्रिटीश सरकारला भोगावे लागतील असा ईशारा महात्मा फुले यांनी दिला होता.

**अर्थसंकल्पविषयक विचार :**

महात्मा फुले यांनी अर्थसंकल्पाचे वाचन करुन विधायक सूचना केल्या. सन १८७९–८० या वर्षाच्या अर्थसंकल्पावर चर्चा करताना ५० रु. देवून एक कर्मचारी नेमण्याऐवजी ३० रु. व २० रु. देवून दोन कर्मचारी नेमावेत अशी त्यांनी सुचना केली. अधिक लोकांना रोजगार मिळावा अशी यामागे त्यांची भूमिका होती.

**पीक संरक्षणविषयक विचार :**

शेतीमधील पिकावरच भारतीय शेतकऱ्यांची उपजिविका अवलंबून होती. त्यामुळे पिकांचे संरक्षण करणे खुप महत्वाचे होते. त्यासाठी रानटी जनावरांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना जुन्या मोडक्या बंदुका द्याव्यात. याशिवाय पीकांचे संरक्षण करण्याचे काम काळ्या पोलीस खात्याकडे सोपवावे. पोलीसांच्या कुचराईमुळे पीक संरक्षण योग्य न झाल्यामुळे शेतीचे नुकसान झाल्यास पोलीसांच्या पगारातून भरपाई करण्यासंबंधीचा कायदा तयार करावा असे महात्मा फुले यांचे मत होते.

**सारांश :**

महात्मा फुले यांनी त्या काळात शेतकऱ्यांच्या विकासाच्या दृष्टीने मांडलेले विचार आज देखील सत्य आणि उपयुक्त असल्याचे दिसून येतात. शेती, शेतकरी, कामगार, व्यवसाय, शिक्षण, शोषण, श्रमप्रतिष्ठा या सर्व दृष्टीने महात्मा फुले यांनी मांडलेले आर्थिक विचार आजही कालबाह्य ठरत नाहीत. तर सरकारला विविध प्रकारच्या विकास योजना आखण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. एवढा जिवंतपणा त्यांच्या विचारातून दिसून येतो. एवढेच नाहीतर त्यांचे नाव न घेता भारताच्या विविध क्षेत्राच्या विकासाचा विचारच करता येत नाही. एवढी दूरदृष्टी त्यांच्या विचारामध्ये हाती.

**संदर्भ ग्रंथ :**

१. Ahuja H.L. 1979- A Textbook of modern Economics. New Delhi: S. Chand & Company Ltd.
२. Dhananjay Keer (1997)- Mahatma Jyotirao Phule :Father of Indian Social Revolution - Popular Prakashan, Bombay.
3- Deshpande G.P. (Ed.) 2002- Selected Writings of Jyotirao Phule, New Delhi : Leftword Books.
४. प्राचार्य डॉ. यू.बी. कोंडवार– आर्थिक विचारांचा इतिहास–शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर (लातूर) ऑगस्ट २००५.
५. प्रा. रायखेलकर, प्रा. दामजी–आर्थिक विचारांचा इतिहास–विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, जून २०११.
६. प्रा.डी.बी. इंगळे–आर्थिक विचारांचा इतिहास–अरुणा प्रकाशन, लातूर, फेब्रुवारी २०११.
7- महात्मा फुले समग्र वाङ्मय–श्री. धनंजय कीर, डॉ. स.मं. मालशे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान

**श्रीमती: सारिका अरविंद गायकवाड**
कर्मवीर काकासाहेब वाघ कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत.

**प्रस्तावना:**
भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी झाला. जन्म महू इंदोर मध्यप्रदेश येथे झाला .रामजी मालोजी सकपाळ व आई भिमाबाई व पत्नी रमाबाई आंबेडकर.शिक्षणाची विशेष आवड असणारे अर्थशास्त्र विषयात एम.ए व विद्यावाचस्पती कोलंबिया विद्यापीठातून घेतले अस्पृश्य व अस्पृश्यता निवारण यावर विविध माध्यमातून लेखन केले सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या निराशेला दूर केले जनतेचा अधिकार मिळवून दिला आंबेडकरांनी सतत जातीपातीच्या भेदभावाला संपवून याकरता कठोर परिश्रम घेतले भारतीय समाजात जातीपातीच्या भेद भावामुळे पसरलेल्या दुराचाराला संपवण्यात आपली मोलाची भूमिका बजावली. जातीपातीच्या भेदभावाने भारतीय समाजाला संपूर्णतः विस्कळीत आणि अपंग बनविले होते .त्याला पाहता आंबेडकरांनी दलितांच्या हक्कांची लढाई लढली आणि देशातील सामाजिक स्थितीत बऱ्याच प्रमाणात बदल केला. 1919 पासून दलित मुक्ती चळवळीला सुरुवात झाली .त्यातून मूकनायक हे वृत्तपत्र सुरु केले .तेव्हा ते दलित जनतेचे पुढारी म्हणून ओळखले जाऊ लागले विविध सहकार यांचा सहवास त्यांना त्या कार्यात लाभला. दलितांच्या अधिकारांसाठी युद्धातील योद्धा प्रमाणे डॉक्टर आंबेडकरांची वाढत गेली. आंबेडकरांनी सरकारी लॉ कॉलेजचे प्रधानाचार्य म्हणून कार्य केले. दोन वर्ष या पदावर त्यांनी काम केलं यामुळे डॉक्टर आंबेडकर मुंबई स्थायिक झाले. त्यांनी या ठिकाणी मोठे घर बांधले. त्यांनी खाजगी पुस्तकालय उभारली यात पन्नास हजारांपेक्षा जास्त पुस्तके होती .त्यांनी हु वेअर द शुद्रास म्हणजेच शूद्र कोण होते . त्यांनी दलित वर्गाच्या एकसंघ असल्याची व्याख्या केली त्यांचे विचार व म्हणणे असे होते की अस्पृश्य समाजातील लोक देखील समाजाचा एक भाग आहे आणि ते सुद्धा समाजातील अन्य सदस्यांना सारखेच समान व सामान्य माणसा आहेत. त्यांनी महिलांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला स्वतःही समाजाकडून बरच दलित असल्याचा अपमान व अनादर यांना तोंड दिले आहे. परंतु त्यांनी कधीही हिंमत हारली नाही खचून गेले नाहीत. विपरीत परिस्थितीत त्यांनी स्वतःला आणखीन मजबूत केले आणि सामाजिक व आर्थिक रूपाने देशाच्या प्रगती आपले महत्वपूर्ण योगदान दिले.

**संशोधन पद्धती:-** प्रस्तुत संशोधन हे दुय्यम स्रोतांवर आधारित असून या संशोधन लेखनासाठी वर्तमानपत्र ,इंटरनेट, संदर्भ ग्रंथ शोध निबंध मासिके इत्यादी दुय्यम स्रोतांचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

1) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर दलित क्षेत्रातील समाजासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

2) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे साहित्यक्षेत्रातील कार्याचा अभ्यास करणे.

3) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची समाज व लोककल्याणासाठी चे विविध उपक्रम व योजना व चळवळींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहिते:-**

1) दलित समाज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण चळवळ साहित्यक्षेत्रातील योगदान यांचा अभ्यास करणे.

2 ) बहुजन समाजातील लोकांसाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

3) समाजातील स्त्रियांसाठी किंवा महिलांसाठी केलेल्या सुधारणांचा अभ्यास करणे.

**विश्लेषण:-**

समाजाने बहिष्कृत केलेल्या माझ्यासारख्यांना थोर ग्रंथांनी जवळ केले मला जगात त्यांचा इतका परमस्नेही दुसरा कोणी नाही डॉक्टर आंबेडकर म्हणतात. जगामध्ये मध्ये किंवा समाजामध्ये परिवर्तना खेरीज अन्य कोणतेही स्थायी तत्व नाही. दलित समाज हा मागासलेला समाज समूह होता. हजारो वर्षांपासून या समूहांवर अन्याय आत्याच्या होत होते छळ, कपट, दास, दैन्य या आयुधांच्या द्वारे या समाजावर सतत आसूड गेले गेले. समाजामध्ये लोकांना अतिशय हीन वागणूक देत असत अनुसूचित जाती जमाती सतत शोषणाच्या शिकार ठरल्या होत्या. म्हणून आर्थिक शारीरिक मानसिक शोषणा द्वारे माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावलेलिही माणसे पशुवत जीवन कंठत होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात आपल्या या देशात उपेक्षितांचा दलितांचं फार मोठं जग आहे. हे विसरू नका. त्यांचं दुःख त्यांची व्यथा नीट समजून घ्या. आंबेडकरांनी आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन समृद्ध करण्यात प्रयत्न केले. त्यातच खरा मानव धर्म आहे. धम्म तत्वज्ञान यांतून तत्व विकसित केले. दलितांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास साहाय्य केले. आमूलाग्र समाज परिवर्तन घडवून आणले शिक्षणामुळे आणि ज्ञान मुळे दलितांना आपल्या अस्तित्वाचा मार्ग कळू लागण्याइतपत शहाणपण लाभले. चळवळीने जीवनात व पर्यायाने साहित्यातही परिवर्तन येते. अनेक वेळा त्यांनी समाजाच्या उद्धारासाठी व कार्यासाठी विषारी अपमानाची घोट पचवले आहेत. दलितांना मानवतावादी हक्क असावेत याबाबत ते म्हणतात की मला न्याय पाहिजे भीक नको. 1917 सालि अस्पृश्यता निवारणाचा ठराव पास केला. त्याला विशेष प्रतिसाद मिळाला नाही. 1920 मध्ये मूकनायक वर्तमानपत्र सुरू झाले. बाबासाहेब सर्व मुक दलित जनतेचे नायक झाले व त्यांनी समाजातील बांधवांच्या भावना आपल्या शब्दांतून व लिखाणातून प्रखरपणे मांडल्या. बाबासाहेबांचा वृत्तपत्रीय प्रवास दलितांच्या सामाजिक समान हक्कांना आणि मानवतेला न्याय देणारा आहे. त्यांनी त्यांच्या चळवळीशी काढलेली चार वृत्तपत्रे चांगली पूरक ठरलेली दिसून येतात. 1920 मध्ये त्यांनी मूकनायक त्याचबरोबर बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत अशी चार वृत्तपत्रे सुरु केली. त्यांनी स्वतः संपादन करण्या ऐवजी संपादनाचे काम आपल्या सहकाऱ्यांकडून करून घेतले. या वृत्तपत्रांमधून त्यांनी केलेल्या कार्याची माहिती व समाजाविषयी भाषणे यामधून येत असत. त्यांची पत्रकारिता समाजाच्या दृष्टीने खूप महत्वाची होती.

दलित साहित्याची सुरुवात साधारणता 1960 नंतरच मानली जाते. डॉक्टर आंबेडकर म्हणजे दलितांच्या व्यथा वेदनांना वाचा फोडणारी प्रेरक शक्ती होती. दलित साहित्य म्हणजे अस्सल जीवनाचे दर्शन घडविणारे होते. साहित्य जीवन आहे आणि जीवनासाठी साहित्य आहे हे आपोआपच दलित साहित्याने सिद्ध केली. कलेसाठी कला या कृत्रिम भूमिके ऐवजी जीवनासाठी कला ही अस्सल अनुभूती रुजविण्यात दलित साहित्य यशस्वी ठरले. दलित साहित्याने जीवन व जीवनाचा आदर्श दाखवून दिला. मानव व माणूस समूह त्यांचे जगणे भोगणे दुःख वेदना मानवता ही सर्वच ठिकाणी केंद्रवर्ती असली पाहिजे. ही भूमिका दलित साहित्यतून मिळाली. दलितांना डॉक्टर आंबेडकर यांच्या रूपाने प्रेरणा देणारी एक जीवनदायिनी मिळाली. माणसाच्या आणि माणसाच्या जगण्याचा भाव भावना आणि दुःखाचा विचार घेऊन दलित साहित्य शब्द रूप झाले. दलित साहित्य आंबेडकर यांच्या विचार प्रणालीने मनुष्य तत्वाची प्रतिष्ठा जोपासली जाते. ही प्रतिष्ठा फक्त अस्पृश्यांची किंवा दलितांची जोपासली जावी किंवा एकांकी भूमिका दलित साहित्याची नाही, तर दलित म्हणून जी कोणी व्यक्ती अन्यायाला सामोरी जाते त्या व्यक्तिचे किंवा समूहाचे शोषण अथवा पिळवणूक होत असेल किंवा जो समूह तळागाळात अडकलेला आहे व त्यामुळे त्यांचा आक्रोश सुरू आहे. त्यांच्या मुक्तीसाठी दलित साहित्याचा जन्म आहे. अमेरिकेतील काळा निग्रो किंवा भारतातील अस्पृश्य असो किंवा धर्म सूत्रांच्या वरवंट्याखाली भरडली जाणारी सर्वच जातिधर्मातील स्त्री जात असो या सर्वांना माणुसकीची ओळख दलित साहित्य तून होऊ शकते. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या. म्हणजेच तो आवाज उठवेल. डॉक्टर आंबेडकरांनी स्वतंत्रपणे सांगितले नाही, परंतु दलित साहित्याला डॉक्टर आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान आहे. नकार आणि विद्रोह या दलित साहित्याच्या दोन महत्त्वाच्या भूमिका मानल्या जातात. दलित साहित्य जीवन अनिष्ट असल्याने श्रेष्ठ साहित्य कृती प्रमाणेच श्रेष्ठ दलित साहित्यही मराठी साहित्य समृद्ध केल्याचे दिसते. मर्यादित अनुभव विश्वात वावरणाऱ्या मराठी साहित्याच्या कक्षा दलित साहित्याने समर्थपणे रुंदावल्या आहेत. गावकुसाबाहेर राहणाऱ्या आणि वर्षानुवर्ष पददलित ठेवल्या गेलेल्या एका प्रचंड समाजाचे दुःख, दैन्य, वेदना, क्रोध, कारुण्य इत्यादींनी दिल्या. जीवन अनुभवांचा जिवंत प्रवाह मराठी साहित्यात आणण्याचे कार्य दलित साहित्याने केले. दलित समाज हा शोषित समाज असून चातुर्वर्ण्य धिष्टीत निर्मितीने पाचवा वर्ण वर्ग अस्पृश्यांचा समजून त्यांना हिणवले गेले व गुलामगिरीत दबलेल्या पिडलेल्या

नाडलेल्या या दलित समाजाची जागृती या साहित्यातून मोठ्या प्रमाणावर झाली. त्यांनी गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची भूमिका पार पाडली. गांधीजींशी अस्पृश्यांच्या बाजूने युक्तिवाद केला., खंडन-मंडन घडवून आणले तसेच भारताची राज्यघटना लिहिली बौद्ध धम्मात प्रवेश केला. विविध ग्रंथ लिहिले दलित जनतेला दिशा दाखवली, स्त्रियांना अस्तित्वाची आणि आत्मभानाची जाणीव करून दिली. गुलामी नोंदवणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. दलित नेते आणि दलित चळवळ समाज जागृतीसाठी सक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे. दलित चळवळीला खूप विरोध झालेला दिसतो. बाबासाहेबांना विरोध करणाऱ्या मध्ये सावरकर गांधी राजगोपालचारी होते. गांधीजींच्या सोबत झालेला पुणे करार हा दलित चळवळीतील विजयाचा एक महत्त्वाचा भाग मानला पाहिजे.दलित साहित्य आणि चळवळीला सर्वत्र प्रतिष्ठा आणि लौकिक प्राप्त प्राप्त झाला आहे. घटनेच्या संदर्भातही दलित साहित्य आणि चळवळीचे योगदान भविष्यकाळात फार मोठी असणार आहे याची जाणीव असायला हवी. आणि त्या संदर्भात त्या अनुषंगाने दलित चळवळीला वाटचाल करावयाची आहे. आंबेडकरांच्या चळवळीचे भान ठेवून दलित साहित्य आणि चळवळीला योग्य ती दिशा देता येणे आवश्यक आहे आंबेडकरांच्या समग्र मानव मुक्तीची आणि लढ्याची निगडित आहे महत्वाचे म्हणजे त्याच्या मागचा विचार करता कार्ल मार्क्स, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू मानवांनी विचारवंतांनी समाजसुधारकांनी दलित चळवळीला फार मोठी योगदान दिले आहे. दलित चळवळ किंवा आंबेडकर यांची विचारधारा समग्र क्रांतीच्या दिशेने वाटचाल करताना, सत्तेत सहभागी होऊनही पिठाचा नामविस्तार  होऊनही अपेक्षित परिवर्तन होत नसल्याचे दिसून येते. दलित साहित्याला डॉक्टर आंबेडकरांच्या तत्व विचारांचे अधिष्ठान आहे. साहित्य हे वैचारिक क्रांतीचे समर्थ साधन असू शकते हा डॉक्टर आंबेडकर यांनी मांडलेला विचार कार्ल मार्क्सच्या विचारान सारखाच आहे. बहुजन समाजाला शिक्षित करण्याचे साहित्य हेच एकमेव समर्थ साधन आहे.

धर्मांतराची घटना हा दलित साहित्याचा एक निर्णायक बिंदू आहे. मराठी साहित्यावरही दलित साहित्याचा प्रभाव पाडला. धर्मांतराच्या घटनेने दलितांच्या लेखणीला आणि वाणीला नवीन पंख फुटले. हिंदू धर्माचा त्याग केला केला आणि बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे चातुर्वर्ण्यावर आधारलेल्या समाजव्यवस्थेचा दास्यातून अस्पृश्यांची सुटका झाली. आणि नवबौद्ध म्हणून नवी ओळख झाली. सामाजिक व्यवस्थेने त्यांच्यावर हलकी सलकी हिन कामे सोपवलेली होते. त्यामुळे अस्पृश्य समाज माणूसपणाला पारखा झालेला होता. गावकीची म्हणून सांगितली जाणारी कामे डॉक्टर आंबेडकर यांच्या सांगण्यावरून सोडून दिली होती. स्वाभिमान आणि सुधार या सांगण्याने अस्पृश्यांची अस्मिता जागृत झाली. 'शिका संघटित' व्हा संघर्ष करा या कृती प्रेरणेने अस्पृश्यांना नवीदिशा मिळाली होती. समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांना मुळे त्यांना माणूसपणाचा हक्क लाभला. त्यासाठी त्यांना झटावे लागले आणि त्याची सुरुवात डॉक्टर आंबेडकरांनी महाडच्या लढा द्वारे केली. दलित तरुण पिढीला वस्तुस्थितीचे भान आले. इंग्रजांनी लादलेल्या राजकीय गुलामगिरी पेक्षा चातुर्वर्ण्यधिष्टीत समाजव्यवस्थेने लादलेली सामाजिक गुलामगिरी भयंकर होती. आंबेडकर यांनी मनुस्मृतीचे दहन केले. चवदार तळयाच्या सत्याग्रहाने आणि मनुस्मृतीच्या दनाने दलित समाजाला आत्मबळ दिले. दूरगामी दृष्टी दिली. भूमिका विद्रोहाची आणि निषेधाची होती. दृष्टी सामाजिक परिवर्तनाची होती दलित साहित्याने हि तीच भूमिका स्वीकारलेली होती. दलितांनी दलितांनी विषयी दलितांसाठी लिहिले विद्रोही साहित्य म्हणजे दलित साहित्य अशी संकल्पना रूजत गेली. दलितांनी विषयी जे लिहिले गेले असेल ते आणि अथवा  दलितेतरांनी दिलेले होते ते सहानुभूतीचे साहित्य होते. डॉक्टर आंबेडकरांच्या दलित मुक्ती आंदोलनामुळे तिला हादरे बसू लागले. सहानुभूती ऐवजी अनुभूतीच्या अभिव्यक्तीची प्रेरणा प्रभावी ठरली. अस्मिता जागृत झालेले आत्मभान झालेले दलित आपल्या जीवन अनुभवांची अभिव्यक्ती करू लागले. दलितांनी दलितांन विषयी लिहिलेल्या साहित्याचा प्रवाह सुरू झाला. दलित जीवनाच्या व्यथा दलित साहित्यतून प्रकट होऊ लागल्या. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात दलित मुक्ती संग्राम सुरु झाला. तेव्हा दलितांना आपल्या जीवन संघर्षाचे भान आले. दलित समाज संघर्षात उभा राहिला. आणि स्वतःच्या संघर्षाची कथा लिहू लागला. आंबेडकरांच्या विचार प्रणालीनुसार देव,धर्म आत्मा, परमात्मा , पुनर्जन्म तसेच पूर्वजन्म इत्यादी कल्पनांना दलित साहित्याने नकार दिला. समाजात स्थान नसल्यामुळे आणि वर्णव्यवस्थेने बहिष्कृत केल्याने दलित साहित्याने ही व्यवस्थाच नाकारली.  प्रस्थापित मराठी साहित्यात दलितांच्या जीवन अनुभवांना दखलच नसल्यामुळे दलित साहित्याने प्रस्थापित साहित्यासाठी नकार दिला. मी इथे जन्म घेतला म्हणून जात मिळाली लिहू लागलो तेव्हा देशातल्या सर्व व जगातल्या सर्व दलित उपेक्षित वंचितांचा झालो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मार्क्सवादाला

विरोध होता. पण तो तत्वतः नव्हता. व्यवहारात होता. मार्क्सवादी क्रांतीचा मार्ग हिंसेच्या रक्तपाताचा आहे. बुद्धाचा मार्ग हा अहिंसेचा आहे. एवढेच करता विरोध नव्हता तर श्रमजीवी वर्गाची सत्ता निर्माण झाली की सामाजिक अन्यायास पुन्हा वाव मिळतो. डॉक्टर आंबेडकर सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. त्यांना कोणत्याही प्रकारची हुकूमशाही मान्य नव्हती. म्हणून त्यांचा मार्क्स वादाला विरोध होता.दलित साहित्याचा प्रवाह अधिक रेखीव होऊ लागला. तेव्हा दलित साहित्यिकांत दोन विचारांचे गट निर्माण झाले होते. दलित साहित्याच्या निर्मितीमागे मात्र आंबेडकरांची आंबेडकरी तत्व विचारांची प्रेरणा असली पाहिजे अशी आग्रही भूमिका घेऊन मार्क्सवादाला विरोध करणारा एक गट तर आंबेडकरांच्या विचार व तत्त्वांना स्वीकारून मार्क्सवादाकडे अंशत कल असणारा गट परंतु यथावकाश दलित ही संज्ञा व्यापक अर्थाने रुढ होत गेली आणि दलित साहित्याचा उल्लेख आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य असाच होऊ लागला. अस्मितादर्श नियतकालिके द्वारे दलित साहित्याला भक्कम व्यासपीठ प्राप्त करून दिले. दलित साहित्य हे आंबेडकर वादा चेच अपत्य आहे. प्रेरणा तत्व म्हणून दलित साहित्याची नाळ महाडच्या क्रांतीकारी संग्रमाशी जोडलेली आहे. डॉक्टर आंबेडकर यांच्या विचारांचा उदय झाला नसता तर लढाऊ वर्ग म्हणून दलित समाजाला ओळख लाभली नसती. क्रांतिकारी दलित माणूस जन्माला आला नसता आणि दलित साहित्य ही जन्माला आले नसते. दलित साहित्याचे क्रांतिकारकत्व विद्रोह, विज्ञान, निष्ठा व विश्वमयता या त्रिसूत्री आहे. दलित साहित्याच्या निर्मितीची प्रेरणा परदेशात नसून ती आपल्याच देशातील वर्षानुवर्ष शतकानुशतकांच्या समाज व्यवस्थेतच आहे.

**समारोप:-** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी साहित्य क्षेत्रात केलेलं काम व दलित समाजासाठी केलेल्या सुधारणा यांचा अभ्यास दलित साहित्यातून आपल्यासमोर आहे. आंबेडकरांनी सतत जातीपातीच्या असलेल्या भेदभावाच्या भावनांना संपवण्यासाठी कठोर परिश्रम घेतले. विस्कळीत झालेला समाज त्यांना एकत्रित आणण्यासाठी त्यांनी आपल्या दलित साहित्यातून मोठी भूमिका बजावली आहे. व त्यासाठी कार्य ही केले आहे. विविध चळवळी यांच्या माध्यमातून दलित समाजाला संघटित करण्यासाठी प्रयत्न केले. विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी दलितांना विषयीच्या भावना मांडल्या .व दलितांच्या प्रश्नांना वाचा फोडली. अस्पृश्य समाज देखील हा समाजातील एक घटक असा आहे म्हणून त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देण्यात आंबेडकरांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी कधीही हिंमत हारली नाही खचून गेले नाही कठीण कठीण परिस्थितीत समाजाला मजबूत बनवण्याचे काम त्यांनी केले देशाच्या प्रगती त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. अनुसूचित जाती जमाती ज्या शोषणाच्या शिकार ठरल्या होत्या ज्यांना समाजामध्ये अतिशय हीन वागणूक दिली जात होती अशा समाजासाठी आंबेडकरांनी आपल्या चळवळीतून व साहित्यातून त्यांचे जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बाबासाहेब सर्व दलित जनतेचेच नायक झाले. समाज बांधवांच्या भावना आपल्या विविध लिखाणातून प्रखरपणे मांडल्या. त्यांच्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून दलितांना सामाजिक समान हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न केले व त्यासाठीही वृत्तपत्रे चांगलीच पूरक ठरली. दलित साहित्य हे जीवनाचे दर्शन घडविणारे होते. साहित्य हे जीवन आहे. आणि जीवनासाठी साहित्य आहे हे साहित्यातून सिद्ध झाले. दलित साहित्य चा जन्म दलित मुक्ती साठीच आहे. दलित साहित्याला डॉक्टर आंबेडकरांच्या विचारांचे अधिष्ठान आहे.

**संदर्भ:-**

1) डॉ.मधुकर मोकाशी, ग्रामीण दलित साहित्य चळवळ आणि समीक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन.

2) डॉ.सदा कऱ्हाडे, दलित साहित्य आणि चिकित्सा, स्वरूप प्रकाशन

3) डॉ. संपत गायकवाड, दलित आत्मकथने भाषिक समाज भाषा आणि भाषाव्यवहार ,प्रज्ञा प्रबोधन प्रकाशन ,सांगली.

4) डॉ, यशवंत मनोहर, समाज आणि साहित्य समीक्षा, सुगावा प्रकाशन पुणे.

5) डॉ नंदा मेश्राम, दलित कादंबरी स्वरूप व समीक्षा, डिंपल प्रकाशन.

6) डॉ, म, सु, पगारे, साहित्य लोक ग्रामीण आणि दलित, दिलिपराज प्रकाशन.

7) डॉ, म, सु, पगारे, दलित साहित्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन,

8) https://mr.m.wikipedia.org

9) https://www.bookganga.com

10) https://maharashtratimes.com

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# सावित्रीबाई फुले आणि आधुनिक मराठी काव्यातील स्त्रीवाद : एक दृष्टिक्षेप

**कु.गायत्री आनंदराव भरनाळे[१] डॉ.सविता वावगे[२]**
[२]मार्गदर्शक प्राध्यापक विभागप्रमुख, मराठी विभाग श्री.मुक्तानंद महाविद्यालय,गंगापूर,औरंगाबाद
[१]संशोधक विद्यार्थिनी, श्री.मुक्तानंद महाविद्यालय,गंगापूर,औरंगाबाद
email ID gayatribharnale@gmail.com

**प्रस्तावना :**
आधुनिक कालखंड हा सर्वच घटकांसाठी एक क्रांतीचा कालखंड मानला जातो. आधुनिक कालखंडातील ही क्रांती सर्वच सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक अशा सर्व घटकांमध्ये या कालखंडाने अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. आधुनिक कालखंडात साहित्यातही नवविचार, नवप्रेरणा नव्या जाणिवा यांचा एक वर्ग उदयास आला. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर घडलेल्या विविध घटना, विविध क्रांती, महायुद्धे यांचा परिणाम ज्याप्रमाणे इतर सर्व क्षेत्रावर झाला, तसाच तो साहित्यावर सुद्धा झाला. प्राचीन आणि अर्वाचीन अर्थात आधुनिक कालखंडातील साहित्य यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत जाणवते, ती याच कारणाने, असे म्हणावे लागेल. आधुनिक साहित्य हे विविध प्रेरणा मग ती स्वातंत्र्याची असो, साक्षरतेची, सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक सुधारणेची प्रेरणा असो, या आणि अश्या अनेक प्रेरणांचे द्योतक या कालखंडातील साहित्य निर्मिती आहे.

**विषय प्रवेश :**
प्राचीन कालखंडातील साहित्याच्या निर्मितीमागे असणारी प्रेरणा, स्वरूप, साहित्यनिर्मिती मागची कारणे, स्थल काल या नुसार त्या त्या साहित्यात बदल पहावयास मिळतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेली औद्योगिक क्रांती, रशियन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती दोन्ही महायुद्धे या आणि अशा कित्येक घटनांचा परिणाम सर्व क्षेत्रावर जसा झाला तसाच तो साहित्यावर सुद्धा झाला आहे.

मराठी साहित्याचा विचार करता या साहित्यामध्ये सुध्दा प्राचीन आणि अर्वाचीन अर्थात आधुनिक साहित्य यांच्या स्वरूपामध्ये अमुलाग्र बदल जाणवतात. त्या त्या कालपरत्वे परिस्थिती नुसार या साहित्यातही तफावत जाणवते. मराठी साहित्यावर आधुनिक कालखंडाचा परिणाम, नवसाक्षर वर्गातून आलेले नव नवीन विचार प्रवाह, त्यांच्यातील सुधारणावादी दृष्टिकोन, तत्कालीन स्थिती गतिविषयी निर्माण झालेली जाणीव जागृती, ब्रिटिशांचा अंदाधुंद राज्यकारभार, भारतातील अनेक अनिष्ट चालीरीती, परंपरा निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, स्त्री आणि क्षुद्र यांना मिळणारी हीन वागणूक, समाजात असणारे त्यांचे दुय्यम स्थान या आणि अशा अनेक वास्तववादी समस्या या समाजसुधारकांनी आपल्या साहित्यातून जगासमोर आणल्या.आपल्या कृतीला लेखणीची जोड देऊन मराठी साहित्य सार्थ रूपाने समृद्ध केले आहे. साहित्यात हे सर्व विषय नव्यानेच येऊ घातलेले होते,यातून जगभर जाणीव जागृती करण्यासाठी आवश्यक ते आधारभूत घटक म्हणून या साहित्याकडे पाहण्याची दृष्टी ही वास्तव बनली. जगाचे लक्ष या साहित्याने आपल्याकडे वेधले, ते त्या साहित्याच्या वास्तवाने.

आधुनिक कालखंडातील साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी न राहता त्यातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे काम तत्कालीन साहित्यिक मंडळींनी आपल्या लेखणीतून त्याचबरोबर कृतीतून केलेले पहावयास मिळते. परकीय आणि स्वकियांच्या जाचात अडकलेला भारतीय समाज, त्यांच्या व्यथा, घटकांची होणारी पिळवणूक जुलमी कायदे,प्रथा, परंपरा अनिष्ट चालीरीती या सर्वांना उजेडात आणण्याचे कार्य तत्कालीन साहित्यिक मंडळींनी केले आहे. आधुनिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कालखंडातील साहित्यिक यांच्या लेखणीला कृतीची जोड होती. फक्त साहित्य निर्मिती करून ही मंडळी थांबत नाहीत तर, अन्याय, अत्याचाराच्या विळख्यात सापडलेल्या भारतीय समाजाला प्रकाशाचा मार्ग या मंडळींनी दाखवला आहे. भारतीय समाजाला ' तिमिरातूनी तेजाकडे ' नेण्याचे कार्य ख-या अर्थाने या मंडळींनी केले आहे. आधुनिक कालखंड हा वैचारिक सुधारणावादी कालखंड म्हणून ओळखला जातो. मराठी साहित्याचे या वैचारिक जडणघडणीत मोलाचे योगदान आहे. साहित्यामध्ये महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान या कालखंडातील सुवर्ण अक्षरांनी लिहिले जावे असे आहे. आधुनिक कालखंडाला मग ते सामाजिक, राजकीय आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक असो अथवा साहित्यिक हा उजळून टाकण्याचे महान कार्य या त्रिमूर्तीनी आपल्या लेखणी आणि कृतीतून केलेले पहावयास मिळते. फुले, शाहू, आंबेडकर यांच्यातीलच एक महत्वाचा दुवा म्हणजे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले या आहेत. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यिक योगदान अभ्यासताना, त्याला उजाळा देताना सावित्रीबाई फुलेंचे साहित्यिक योगदानही अग्रक्रमाने घेणे महत्त्वपूर्ण ठरते. सावित्रीबाई फुलेंच्या सामाजिक, शैक्षणिक योगदानाच्या बरोबरीने त्यांचे साहित्यिक योगदान प्रकाश झोतात येणे फार आवश्यक आहे.

**सावित्रीबाई फुलेंच्या काव्यातील स्त्रीवाद :**
सावित्रीबाई फुलेंचे सामाजिक शैक्षणिक कार्य तर आपण जाणतोच. सर्व जगभर या कार्याची महती गायली जाते. सावित्रीबाई फुलेंच्या साहित्यिक योगदानाबद्दल मात्र हव्या त्या प्रमाणात जनजागृती झालेली पहावयास मिळत नाही. सावित्रीबाई फुलेंच्या कालखंडाचा विचार करता त्यांचे त्या कालखंडातील साहित्यिक योगदान अत्यंत वास्तव प्रकट

करणारे असे असून सुद्धा ते अजूनही फार कमी प्रमाणात आपल्या पर्यंत आलेले आहे, असे म्हणावे लागेल.आधुनिक भारतातील स्त्रीवाद त्यांच्या मोजक्या परंतु अत्यंत बोलक्या अशा वास्तवाचे भयावह चित्र प्रकट करणाऱ्या आपल्या दोन काव्यसंग्रहातून त्यांनी चित्रित केलेले दिसते. याच अर्थाने त्यांना आधुनिक काव्याच्या जननी असे म्हणतात. ' मूर्ती लहान पण कीर्ती महान ' असे हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत. पहिला काव्यसंग्रह ' काव्यफुले ' आणि त्यांचा दुसरा काव्यसंग्रह ' बावन्नकशी सुबोध रत्नाकर ' हे दोन सावित्रीबाई फुलेंचे काव्यसंग्रह तत्कालीन परिस्थीतिचे फार विदारक सत्य समोर आणताना दिसतात. आधुनिक कालखंडाचा विचार करता स्त्रीवादी साहित्याचा उगम हा सावित्रीबाई फुलेंचे काव्य आहे, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. भारतीय समाजातील तत्कालीन स्त्रीवाद यापूर्वी आधुनिक कालखंडातील साहित्यात कुठेही पहावयास मिळत नाही. ब्रिटिश राजवट, पेशवाई उच्चवर्णीयांनी स्त्री आणि क्षुद्रांची केलेली बिकट अवस्था त्यांच्या साहित्यातून त्या व्यक्त करताना दिसतात.

सावित्रीबाई फुलेंचे काव्य दिसायला जरी आकाराने लहान असले, तरी त्यांच्या प्रत्येक कवितेमध्ये एक गहन आणि फार भयावह सत्य प्रकट करणा-या या कविता आहेत. सावित्रीबाई फुलेंच्या कवितेतून त्या वेळची अत्यंत बिकट परिस्थिती व्यक्त करणारी स्त्री समोर येते. त्या वेळच्या पारतंत्र्याच्या, गुलामीच्या जोखडात अडकलेली स्त्री त्यांच्या काव्याचे प्रतिनिधित्व करते. ' आधुनिक कालखंडातील स्त्रीवाद डोळयापुढे आणणारी उगवती पहाट 'असा त्यांच्या काव्याचा गौरव केला तर तो रास्त ठरेल, कारण आधुनिक मराठी कालखंडातील स्त्रीवादी संकल्पनेची बीजे त्यांच्या साहित्यातून जगासमोर आली आहेत. सावित्रीबाईंच्या खूप अल्प परंतु अत्यंत बोलक्या अशा या काव्यातून प्रखर असे वास्तव या रूपाने समोर आले आहे. सावित्रीबाई फुले या काव्याची खरी क्रांतिज्योती आहेत. आपल्या अत्यल्प परंतु विदारक काव्यातून सत्य समोर आणत आधुनिक भारतीय स्त्रीवादी विचारांची मशाल घेऊन जाताना त्या दिसतात.

आधुनिक भारतीय स्त्रीवादीसाहित्याच्या त्या जननी आहेत. सावित्रीबाई फुलेंच्या प्रत्येक कवितेचा अगदी बारकाईने अभ्यास केला असता असे लक्षात येईल की, त्यांची कविता ही स्त्री आणि क्षुद्र यांचे तत्कालीन जीवन रेखाटताना दिसते. सावित्रीबाईंनी जे स्वतः अनुभवले, त्याचे पडसाद त्यांच्या साहित्यावर अर्थात त्यांच्या काव्यावर पडलेले दिसतात. आधुनिक कालखंडात महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यिक योगदान ज्या प्रमाणे महत्त्वाचे ठरते,तसेच आधुनिक भारतीय स्त्रीवादी साहित्याचा विचार करता सावित्रीबाई फुलेंचे हे साहित्यिक कार्य फार मोलाची भूमिका बजावताना दिसते, याच अर्थाने त्यांच्या विचारांचा,त्यांच्या वास्तवाचा, स्वतः साक्ष असलेल्या या साहित्याचा यथोचित गौरव होणे क्रमप्राप्त आहे. आज आपण स्वातंत्र्याची पंच्याहत्तर वर्षे ओलांडलेली आहेत, तरी देखील सावित्रीबाईंच्या काव्याची, त्यांच्या इतर साहित्यांची साधी ओळखही आम्हाला नाही, ही फार मोठी शोकांतिका आहे. एक संशोधक या नात्याने त्यांच्या वैचारिक सुधारणावादी धोरणांचा हा काव्यारुपी परिचय करून देणे महत्त्वाचे वाटते.

**आधुनिक मराठी काव्याच्या जननी :**

' काव्यफुले ' हा सावित्रीबाई फुलेंचा पाहिला काव्यसंग्रह १८५४ मध्ये प्रसिद्ध झाला. या त्यांच्या पहिल्याच काव्यसंग्रहात वेगवेगळे विषय त्यांनी हाताळले आहेत. यामध्ये आत्मपर कविता, निसर्गपर, सामाजिक संदेश देणा-या, वेगवेगळे उपदेशपर कविता आहेत. आधुनिक कालखंडात मराठी काव्यात खरी क्रांती घडवून आणली ती सावित्रीबाई फुलेंनी.सावित्रीबाई फुलेंना आधुनिक मराठी काव्याच्या जननी संबोधले जाते, ते अगदी सार्थ आहे, कारण आजच्या काळाचा विचार करता त्या कालखंडामध्ये एका स्त्रीने स्त्रीचे प्रश्न, तिच्या वेदना, तिची होणारी हेळसांड, एक माणूस म्हणून तिला असणारा मानसन्मान, तिला मिळणारी हिन, तुच्छ वागणूक तत्पूर्वी साहित्यात, विशेषतः मराठी काव्यात कुठेही पहावयास मिळत नाही म्हणून मराठी साहित्याच्या जननीचा सावित्रीबाई फुलेंना मिळणारा मान, हा रास्त आहे. मराठी काव्याचा चेहरा बदलवून टाकणा-या सावित्रीबाईंच्या कविता आहेत. वरकरणी साध्या, सरळ वाटणा-या त्यांच्या कविता तत्कालीन जीवनाचे फार भयावह वास्तव उलगडताना दिसतात. आधुनिक कालखंडात त्यांनी आपल्या काव्यात आणलेले विषय तत्पूर्वी मराठी काव्यात कुठेही पहावयास मिळत नाहीत. सावित्रीबाईंच्या काव्यातून समोर आलेला स्त्रीवाद,तत्पूर्वी आधुनिक मराठी काव्यात कुठेही आढळत नाही. उपेक्षित, दुर्लक्षित घटक म्हणून सतत अवहेलना होणारी स्त्री तत्पूर्वी आधुनिक मराठी काव्यात कुठेही पहावयास मिळत नाही. हे सर्व पाहता सावित्रीबाई फुले या आधुनिक मराठी स्त्रीवादी विचारांच्या जननी आहेत, असे म्हणावे लागेल.सावित्रीबाई फुले यांचा दुसरा काव्यसंग्रह ' बावन्नकशी सुबोध ' हा आहे. हा काव्यसंग्रह १८६१ मध्ये तयार झाला आणि १८६२ मध्ये म्हणजे महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर तो प्रसिद्ध झाला. महात्मा ज्योतीराव फुले यांच्याकडून आपल्याला कार्याची प्रेरणा कशी मिळाली, देश,विदेशाचा प्राचीन काळापासून सामाजिक इतिहास या दीर्घ काव्यातून सावित्रीबाईंनी मांडला आहे. इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व या काव्यसंग्रहात त्यांनी सांगितले आहे.

' काव्यफुले ' या काव्यसंग्रहात ४१ कविता आहेत. वेगवेगळ्या भागात त्यांचे वर्गीकरण करता येते. निसर्ग, सामाजिक, बोधपर, आत्मपर, प्रार्थना, काव्य विषयक इतिहास पर स्फुट अशा या कविता विभागता येतील. सर्वप्रथम निसर्गविषयक कवितांमध्ये 'पिवळा चाफा ' ही कविता फक्त निसर्ग आणि त्याच्या घटकांचे वर्णन करून थांबत नाही तर निसर्गातील घटकांचा रूपक म्हणून मानवी जीवनात जाणीव जागृतीचे काम सावित्रीबाई या ठिकाणी करताना दिसतात. निसर्गातील या विविध घटकांचा मेळ मानवी जीवनाशी घालून ही जाणीव जागृती त्या करतात.

' काव्यफुले ' या काव्यसंग्रहातून आणखी एक कवितेचा उल्लेख आवर्जून करावा लागेल,ती म्हणजे ' फुल जाईचे ' ही कविता वरकरणी पाहता निसर्गवर्णन वाटेल,परंतु या कवितेचा मतितार्थ लक्षात घेता तत्कालीन अतिशय हीन दर्जा

असलेली स्त्री आणि क्षुद्र यांच्या मनातील भावना जणू काही सावित्रीबाईंनी ओळखून आपल्या काव्यात व्यक्त केल्या आहेत. या कवितेच्या काही ओळींवरून हे लक्षात येते,

" करी आग्रह
मला फुल ते
जवळी घेई
मजशी तोडून
रीत जगाची
कार्य झाल्यावर
फेकून देई
मजला हुंगुन "

प्रस्तुत कवितेच्या काही ओळींमधूनच त्या मागचा मतितार्थ लक्षात येतो. जाईच्या फुलाच्या माध्यमातून सावित्रीबाई तत्कालीन स्त्री आणि क्षुद्र यांच्या मनातील भावना जणू व्यक्त करीत आहेत. जगाची ही रीत आहे की, आपले काम सध्या करेपर्यंत लोक तुम्हाला वाव देतात. तत्कालीन स्त्री आणि क्षुद्र यांना अशीच वागणूक मिळत होती. स्त्री आणि क्षुद्र हे घटक फक्त उपभोग्य वस्तू म्हणून वापरले जात असत. एक माणूस म्हणून त्यांना कसलेही स्वतंत्र अस्तित्व नव्हते. पुरुषी सत्तेत तिला फक्त दास्यत्वाची भूमिका पार पाडावी लागे. चूल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र होते. क्षुद्र वर्गाला सुद्धा अश्याच प्रकारची हीन वागणूक मिळत असे. कष्टाची अंगमेहनतीची कामे त्यांच्या कडून करून घेतली जात. या आणि अशाच जाचक दृश्यांचे दर्शन सावित्रीबाई फुलेंच्या प्रत्येक कवितेतून घडते. सावित्रीबाई फुले यांची कविता तत्कालीन स्त्रीजीवनाचे हीन दीन चित्र समोर आणते. स्त्री ही पुरुषाच्या हातातले बाहुले बनलेली होती. पुरुष तिचा हवा तेंव्हा, हवा तसा वापर स्वतःच्याच मनमर्जीप्रमाणे करीत असत. तिच्या इच्छा आकांक्षा यांना त्या ठिकाणी कवडीमोल भावाने कोणी विचारत नसे. सावित्रीबाई फुले यांची पुढची कविता याचेच एक उदाहरण म्हणावे लागेल. त्यांची ' जाईची कळी ' ही कविता ती कळी म्हणजे स्त्री. तीला स्वतःचे अस्तित्व मात्र शून्य, तिची किंमत होती ती पुरुषांच्या पायाशी. संसाराचा सर्व गाडा ओढणे, पुरुषांची मर्जी सांभाळणे, आपले संपूर्ण आयुष्य यात वाहून नेणारी स्त्री म्हणजे जणू ती जाईची कळीच.

सावित्रीबाई फुले यांची कविता ही वैचारिक दृष्टचा फार विदारक, वास्तव उलगडताना दिसते. तत्कालीन बहुपत्नीत्व प्रथा हा सुद्धा त्यांच्या कवितेतून न सुटलेला मुद्दा आहे. सावित्रीबाई फुले यांनी ' फुलपाखरू आणि फुलाची कळी ' या कवितेतून अशाच एका अबलेची जणू कहाणी मांडलेली आहे, असे वाटते. ती फुलाची कळी म्हणजे एक स्त्री आणि फुलपाखरू म्हणजे एक पुरुष असे रूपक याठिकाणी त्यांनी योजीलेले दिसते. एका निसर्गपर कवितेतून अशा प्रकारचा सामाजिक संदेश त्यांनी दिला आहे.

" चव घेऊनी करि दूर ती
तिजकडे ते जरा न पाही
तीला टाकुनी दुसरीकडे
जावयास त्या लाजही नाही
कोण कोठली कळी फुलांची
जुनी विसर नवीन पाही
रीत जगाची उच्छल ही
पाहूनिया मी स्तिमित होई "

वरील उदाहरणावरून स्त्रीला असणारी वागणूक, तिचे स्थान कसे दुय्यम होते हे स्पष्ट होते. अशा प्रकारचे विदारक सत्य सावित्रीबाईंनी आपल्या कल्पकतेचा वापर करून निसर्गातील रुपकांचा वापर करून ही दुस्थिती आपल्या समोर आणली आहे. अशी ही जगाची रीत पाहून मी सुद्धा स्तब्ध झाले आहे, असे त्या म्हणतात. सावित्रीबाई फुलेंच्या काव्यातील भयावह वास्तव तत्पूर्वी अधूनिक मराठी काव्यात एकही कवयीत्रीच्या काव्यात कुठेही आढळत नाही. माणूस म्हणून माणसाला कुठल्याही आधारावर न विभागता त्यांना समानतेची, सर्वांना स्वातंत्र्याची चळवळ सावित्रीबाईंनी आपल्या कार्यातून त्याच बरोबर आपल्या काव्यातून पुढे नेली. सावित्रीबाई आपल्या अनेक कवितेतून अशा प्रकारचे संदेश देतात. मानव आणि सृष्टी, क्षुद्रांचे दुखणे या आणि अशा अनेक कवितांमधून त्यांनी क्षुद्रांवरील अन्याय अत्याचार आणि त्यात होरपळलेला क्षुद्र वर्ग यांचे चित्रण केले आहे. आपल्या अनेक कवितेतून अंधश्रद्धा, निरक्षरता अज्ञान इंग्रजीचे महत्त्व त्यांनी पटवून दिले आहे.सावित्रीबाई यांची काव्यसंपदा अल्प परंतु अत्यंत बोलक्या स्वरूपाची आणि तत्कालीन स्त्रीवाद यांचे ते उगमस्थान म्हणावे लागेल. सावित्रीबाईंनी कविता ही कृतीतून समोर आलेली आहे.सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचे अत्यंत महत्त्वाचे असलेले हे घटक स्त्री आणि क्षुद्र हे त्यांच्या साहित्याचा महत्त्वाचा भाग आहेत. आपल्या संपूर्ण हयातभर त्यांनी कार्य केले ते स्त्री सुधारणा आणि क्षुद्र यांच्या उद्धारासाठी. सावित्रीबाई फुले यांनी स्वतः कार्य करताना घेतलेले हे अत्यंत वाईट अनुभव त्यांच्या साहित्याच्या रूपाने आपल्या समोर त्यांनी मांडले आहेत. सावित्रीबाई फुलेंच्या या साहित्यातील योगदानाची हवी त्या प्रमाणात दखल घेतलेली दिसत नाही, ती घेणे आज खरोखर काळाची गरज आहे, कारण आधुनिक कालखंडातील मराठी साहित्यातील हे अत्यंत मोलाचे योगदान आहे. एका अर्थाने आधुनिक मराठी स्त्रीवाद त्यांच्या लेखणीतून लेखनबद्ध झालेला आहे.

सावित्रीबाई फुलेंच्या ' बावन्नकशी सुबोध रत्नाकर ' या काव्यसंग्रहात जोतिबांच्या विषयी त्या भरभरून लिहितात. सावित्रीबाईंचे प्रेरणास्थान असणारे ज्योतिबा आणि उभयंतानी उभारलेल्या सामाजिक कार्याविषयी त्या या काव्यसंग्रहात लिहितात. प्राचीन, मध्ययुगीन कालपासून ते तत्कालीन सामाजिक इतिहास त्यांनी या काव्यसंग्रहात मांडलेला आहे. यात आंग्लाई, पेशवाई, इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व पटविणा-या त्यांच्या कविता आहेत. ' पेशवाई ' या कवितेत त्यांनी तत्कालीन स्त्री आणि क्षुद्र यांच्या अन्यायाचे आणखी एक उदाहरण समोर आणले आहे. क्षुद्र वर्गाला मिळणारी हीनतेची वागणूक सर्वपरिचित आहे. याचेच एक उदाहरण त्यांच्या या कवितेच्या चार ओळीमधून लक्षात येते,

" पुढे पेशवाई तिचे राज्य आले
अनाचार देखी अती क्षुद्र भ्याले
स्वथुंकी थूंकाया गळा गाडगे ते
खुणा नाश या ढुंगणी झाप होते "

पेशवाईच्या राजवटीतील अतिशय हीन, अनिष्ट अशी ही चाल. वरील उदाहरणावरून स्पष्ट होते की, भारतीय समाज तत्कालीन रूढी, परंपरा यांच्या विळख्यात कसा सापडलेला होता. या आणि अशा कित्येक जाचक प्रथा परंपरा स्त्री आणि क्षुद्र यांच्यावर लादलेल्या होत्या .

सावित्रीबाई फुलेंचे साहित्य आजही फार अंशी जगाला अपरिचित आहे, त्यांनी साहित्यात दिलेल्या या योगदानाची हवी तेवढी दखल घेतलेली नाही, हे वास्तव त्यांच्या साहित्याचा अभ्यास करताना समोर येते." बावन्नकशी सुबोध रत्नाकर " या काव्यसंग्रहात शेवटी त्या समस्त जगाला एक आवाहन करताना दिसतात, ते असे

" जरी यातले थोडके ज्ञान आले
तरी या श्रमाचे खरे चीज झाले "

आपण यातले थोडे जरी ज्ञान घेतले तरी सावित्रीबाई त्यांच्या कायचे चीज झाले असे शेवटी सांगतात. या सर्व बाबींचा विचार करता सावित्रीबाई या आधुनिक मराठी स्त्रीवादी काव्याच्या जननी आहेत आणि त्यांच्या साहित्याचा प्रचार आणि प्रसार होणे, या कारणास्तव प्रस्तुत शोधनिबंध सादर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

१)महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याला उजाळा देताना सावित्रीबाई फुले यांचे साहित्यिक कार्य विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते.

२)सावित्रीबाई फुलेंच्या साहित्यीक कार्याचा प्रसार आणि प्रचार योग्य प्रमाणात होणे गरजेचे आहे.

३)सावित्रीबाई फुलेंच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याइतकेच त्यांचे साहित्यिक कार्य मोलाचे आहे.

४)सावित्रीबाई फुले या आधुनिक मराठी स्त्रीवादी साहित्याच्या जननी आहेत.

५)सावित्रीबाई फुले यांची कविता स्त्रीवादी दृष्टिकोनातून महत्त्वाची भूमिका पार पडते.

**संदर्भग्रंथ :**

१)संपा. माळी, मा. गो. सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती जुलै २०११.

२)चिडगोपकर, अलका. सावित्रीबाई फुले : साहित्य आणि कर्तृत्व,. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ति १५ ऑगस्ट २०१४.

३)प्रा.पवार, ना. ग. सावित्रीबाई फुले : अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ति २५ फेब्रुवारी २००४.

४)गवारे, विजय शिवराम. राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले व आजचे स्त्री वास्तव, सुधीर प्रकाशन, वर्धा, प्रथमावृत्ति ३ जानेवारी २०२०..

५)संपा. नरके, हरि. सावित्रीबाई फुलेः समग्र वाङमय, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, प्रथमावृत्ति २०१८.

# उच्च शिक्षणातील ग्रंथालयाची भूमिका

**प्रा.आडसुळे एस.पी.**
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण  ता.कळंब जि.उस्मानाबाद.

**प्रस्तावना :**

उच्च शिक्षणाचे महत्व अबाधित आहे. पण त्यातील विविध घटकांना काळानूरुप अद्यावत राहणे अनिवार्य ठरत आहे. यातील शिक्षक आणि विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रम ठरविणारी यंत्रणा जितकी महत्वाची आहे तितकेच ग्रंथालयांना देखील महत्व आहे. ग्रंथालय वाचन साहित्याच्या बरोबरीने इतर महत्वाच्या सेवा देखील पुरवत असतात. उच्च शिक्षणातील ग्रंथालय अद्यावत राहण्यासाठी विद्यापीठ पातळीवर यु.जी.सी.सारख्या संस्था विविध प्रशिक्षण आणि रिफ्रेशर, ओरिएंटेशन कोर्सेस आयोजित केले जातात. माहिती जलदगतीने वापरकर्त्यापर्यंत पोहोचवता यावी यासाठी माहिती शोध तंत्रे आणि माहितीचे व्यवस्थापन इत्यादी गोष्टीत ग्रंथपालांनी प्राविण्य मिळवावे.

**उच्च शिक्षण :**

देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध सेवा पुरविण्यासाठी कुशल मनुष्यबळ लागते. उच्च शिक्षित व्यक्तींची आवश्यकता असते यासाठी उच्च शिक्षणात अभ्यासक्रमाची निर्मिती केली जाते. आणि प्रशिक्षण दिले जाते. शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तीत्वामध्ये घडून येणारा टिकावू स्वरूपाचा बदल. असा बदल युवा आवस्थेतील शिक्षणाच्या माध्यमातून घडविता येणे शक्य आहे. व्यक्तीच्या शारिरीक मानसिक, व बौध्दीक जडनघडणी मध्ये शिक्षणाचा वाटा खूप मोठा आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांवर संस्कार रुजविले जात असतात. अशा संस्कारक्षम शिक्षणामध्ये ग्रंथाचे योगदान खूप महत्वाचे आहे. त्यामूळे ग्रंथालयाचे प्रबांधन व जागृती होवून ग्रंथालयाची भूमिका उच्च शिक्षणात महत्वाची असून ते निश्चितच व्यक्तीचे व्यक्तित्व घडवीण्यास प्रेरक ठरते.

उच्च शिक्षण घेत असताना मुल तारुण्यावस्थेत पदार्पण करित असताना भावनेचा समतोल राखत येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला तोंड व प्रश्नांना प्रतिक्रिया द्यावयाची असतात.त्यामुळे या वयातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सत्कर्म व मुल्य आधारित शिक्षण प्रेरणादायी, प्रबोधनात्मक साहित्याचे वाचन करण्यास संधी व प्रोत्साहन देऊन त्या पध्दतीने शिकविले गेल्यास भविष्यातील उत्तम संस्कारक्षम नागरिक घडविण्यात उच्च शिक्षण महत्वाची भूमिका पार पाडू शकते. उच्च शिक्षणात विद्यार्थ्यांची बौध्दीक भूक भागविण्यासाठी ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथरूपी खाद्याची वेगवेगळी व्यंजने उपलब्ध करून देणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांना आवडेल असे साहित्य उपलब्ध झाल्यास विद्यार्थी अधिकाधिक वेळ ग्रंथालयात घालून आपले ज्ञानरुपी गाठोड्याचे रुप अधिक विस्तारण्याचा प्रयत्न करेल. ज्यामुळे त्यांचे भविष्य उज्वल घडू शकेल.

**उद्दिष्टे :**

**उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यात वाचणाची आवड निर्माण करणे -** आधुनिक शिक्षण पध्दतीमध्ये अध्ययनासाठी विविध साधनांचा वापर केला जात असतो तर बऱ्याचदा अभ्यास हा केवळ परिक्षेसाठीच केला जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना संपूण्र विषयाचे ज्ञान प्राप्त होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांना विषयासह प्रबोधनात्मक, मनोरंजनातून ज्ञानरंजन व्हावे, विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी उद्बोधन वर्ग, व्याख्याने, चर्चासत्रांचा अवलंब करून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करता येणे शक्य आहे.

**शब्दसंग्रह समृध्दीमुळे अभिव्यक्ती कौशल्य विकासीत होते -** उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ अक्षर ओळख असून चालत नाही तर शब्दांचा अर्थपूर्ण बोध होणे आवश्यक असते. यासाठी वाचकांनी अधिकाधिक वाचन करीत राहिल्यास त्यांचा शब्दसाठा तर वाढतोच परंतू कोणत्या प्रसंगी कोणत्या शब्दाचा प्रयोग कोणत्या अर्थासाठी केला जावा याचाही बोध होऊन जेव्हा त्यांना आपल्य प्रतिक्रिया इतरांना द्याव्या लागतात. तेव्हा आपले मत ते शब्दसंग्रहाच्या माध्यमातून योग्यच शब्दांचा वापर करुन प्रभावीपणे मांडू शकतात त्यामुळे त्यांच्यात अभिव्यक्ती कौशल्य विकासीत होण्यास ग्रंथालय वाचन साहित्याचा फार मोठा उपयोग होत असतो.

**ग्रंथ म्हणजे ज्ञान साहित्याचे संग्रहन असल्याची जाणीव विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे -** ग्रंथालयात उपलब्ध असलेले साहित्य केवळ ग्रंथाचा साठा नसून त्या ग्रंथात वेगवेगळया विषयावरचे अथांग ज्ञान साठवून ठेवलेले असते. त्यामुळे अभ्यासकांना पाहिजे त्यावेळी पाहिजे त्या विषयावरचे वेगवेगळया तज्ञांचे ज्ञान ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचनासाठी सहज उपलब्ध होऊ शकते.

**वाचनाने ज्ञान वाढत असल्याची जाणीव करुन देणे -** महाविद्यालयीन जीवनात उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचेच ग्रंथ वाचून चालत नाही किंवा परिक्षेसबंधीच वाचन करण्यापेक्षा सर्वांगीन अध्ययनासाठी अभ्यासक्रमाव्यतीरीक्त तरी ग्रंथाचे वाचन करावे लागत असते. त्यामुळे वाचनाची आवड निर्माण होते. वेगवेगळया ग्रंथाचे वाचन केल्याने व्यक्तीचे ज्ञान अधिकाधिक समृध्द होत असल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला अधिकाधिक वेळ ग्रंथालयात व्यतीत करावा.

**आधुनिक ज्ञानसाधनांचा वापर करण्यास प्रोत्साहीत करणे -**ग्रंथालय व माहिती विभाग पंरपरागत ज्ञान स्त्रोतासोबतच आधुनिक ज्ञानसाहित्याचा वापर करून आपल्या वाचकांना माहिती उपलब्ध करून देत आहे. आधुनिक काळात उच्च शिक्षणाचा सर्वाधिक भर संशोधनावर आधारीत असून कोणत्या विषयावर कोण - कोणते संशोधन होत आहे. त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना स्वयंआध्यनास उपलब्ध करून देण्यात येतो. त्यामुळे जगातील कोणतीही माहिती इंटरनेटच्या एका क्लीकवर उपलब्ध होत असून ती सेवा विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून उपलब्ध करून दिली जाते.

**अवगत ज्ञानाची पडताळणी करण्याची संधी उपलब्ध करून देणे –** ग्रंथालयामध्ये सर्व विषयावरचे अद्यावत ज्ञानसाहित्याचा संग्रह केला जात असतो शिवाय एका विषयावरच्या अनेक तंज्ञांचे प्रकाशित साहित्य उपलब्ध असते. अशावेळी आपण मिळवलेली माहितीचा तथ्यांश / विश्वसनियता शोधण्यासाठी अश्या साहित्याचा वापर केला जातो व त्याची पडताळणी करणेही शक्य होत असते.

**महत्व -**ग्रंथालयाचे महत्व व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यातही महत्वाचे असते. विशेषत: उच्च शिक्षणात जेव्हा विद्यार्थी परीपक्वतेकडे वाटचाल करीत असते. अशावेळी व्यावहारिक, समाजाभिमुख, मूल्यधारीत शिक्षण मिळाल्यास त्याचा परीणाम व्यक्तीच्या व्यक्तीमत्वावर होऊन व्यक्तीला परीपक्व बनविण्यास फार मोठा आधार बनत असतो. ग्रंथालयातून उच्च शिक्षण घेत असतांना अभसक्रमाशिवाय व्यक्तींच्या व्यक्तीमत्व विकासास पूरक अनेक संदर्भग्रंथ उपलब्ध असतात. ज्या वाचकाने व्यक्तीच्या विचारात परिवर्तन होऊन त्यांचे विचार अधिकाधिक परीपक्व होण्यास मदत होत असते. शिवाय मासिके, वर्तमानपत्र, ई-जरनल, ई-बुक, इंटरनेटच्या माध्यमातून मिळणारी माहिती या सर्व साहित्याच्या वापर व्यक्तीचा ज्ञानसाठी तर वाढतोच पण व्यक्तीच्या विचार शक्तीलाच चालना मिळून व्यक्ती अधिकाधिक अद्यावत राहण्याचा प्रयत्नांमध्ये यशस्वी होवू शकतो. त्यामुळे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापेक्षाही उच्च शिक्षणात ग्रंथालयाचे महत्व अधिक असते. त्याचबरोबर उच्च शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना प्राध्यकांचे व्याख्यान एकूण सुध्दा विषय कळेलच असे नसते. त्यातही काही विद्यार्थी प्राध्यापकांचे व्याख्यान सुरु असतांना टीपने घेतात तर काही फक्त श्रवण करतात त्यामुळे विषय संदिग्ध राहण्याची शक्यता अधिक असते. अश्यावेळी त्यासंबंधीत ग्रंथाचे वाचन केल्यास घेण्यात आलेल्या दिपनांचा अर्थ लागणे सोयीचे व सहज होते.

**उपयोग -** उच्चशिक्षणामध्ये ग्रंथालयाचा उपयोग फार मोठ्या प्रमाणात होत असतो. आज अनेक ग्रंथालय संगणिकृत झाले असले तरी ग्रंथालय असे ज्ञानसाहित्याचे ज्ञानात अधिकाधिक भरच पडत असते. शिवाय उच्च शिक्षण घेत असतांना जो अभ्यासक्रम विद्यार्थी शिकत आहे. त्या अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले सर्व अभ्यास व अभ्यासपूरक साहित्य ग्रंथालयात उपलब्ध असते. बऱ्याचदा एखाद्या विषय व्याखनातून कळला नसेल तर तो ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रंथवाचनातून समजून घेतला जातो. तसेच एकाच विषयावरचे अनेक तज्ञांचे ग्रंथ संदर्भासाठी ग्रंथालयात उपलब्ध असतात. त्याचाही उपयोग विद्यार्थी करू शकतात. शिक्षणाचा मुळ उद्देश व्यक्ती जो अभ्यासक्रम शिकत असते त्यासंबंधीची परीक्षा पास करणे हा तर असतोच. परंतू त्या अभ्यासक्रमासंबंधी सहाय्यक असणारे ज्ञान सुध्दा अभ्यासकाला असावयास हवे, त्यामुळे वेगवेगळया लेखकांची समजेल उमजेल अशी भाषा असणाऱ्या लेख्कांची ग्रंथसंपदा निवडीची संधी वाचकांना ग्रंथालयात उपलब्ध असते. याशिवाय त्या विषयासंबंधीची अद्यावत माहितीसुध्दा वर्तमानपत्र, मासिके, संदर्भसाहित्याच्या माध्यमातून एकाच ठिकाणी व एकाच छताखाली उपलब्ध होत असल्याने ते मिळवण्यासाठी खर्च होणारा वेळ, श्रम व पैसा सुध्दा वाचतो. ग्रंथालयात बसून वाचकाची सवय जडल्यास अभ्यासक केवळ अभ्यासक्रमाशी संबंधीत ग्रंथच वाचत नाही तर अनेक प्रेरणादायी, व्यक्तीमत्व विकासास पूरक अध्ययन साहित्याचे वाचन करीत असतांत. त्यामुळे उच्चशिक्षणास ग्रंथालयाची भूमिका ही विद्यार्थी ज्ञानर्जनाच्या दृष्टीने नेहमीच सकारात्मक असावी लागते. वाचकांच्या कोणत्याही मागणीला प्रतिसाद देण्याचे काम ग्रंथालया सेवकांना करावेच लागते. त्यामुळे सेवकांनासुध्दा ग्रंथालयातील संपूर्ण ज्ञान साहित्याची माहिती ठेवून ती वाचकांपर्यंत पोहचिवण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. म्हणून ग्रंथालय सेवकांच्या सहकार्याने विद्यार्थी घडविण्यात ग्रंथालयाचे फार मोठे योगदान असते.

**निष्कर्ष –**

1. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीत्व विकासास पूरक साहित्य उपलब्ध होते.
2. अभ्यासक्रमाची पूर्ती होण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती ग्रंथालयात उपलब्ध असते.
3. अभ्यासक्रमाच्या ग्रंथासह संदर्भग्रंथाचा वापर विद्यार्थ्यांना करता येतो.
4. वाचक व ग्रंथालय सेवकांना अद्यावत रहावे लागते.
5. वाचकांच्या मागणीला पूर्ण प्रतिसाद हेच ग्रंथालय सेवकाचे समाधान असते.
6. उच्च शिक्षणात ग्रंथालयाला महत्वाचे स्थान असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अद्यावत माहिती प्राप्त होते.

**संदर्भग्रंथ –**

1. कुंभार, राजेंद्र. महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये. नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, मे 2007.
2. जैन, प्रकाश आणि इतर सुलभ ग्रंथालयशास्त्र, नागपूर : विश्व पब्लिशर्स ऍन्ड डिस्ट्रिब्युटर्स, 2006-2007.
3. पवार एस. पी. आणि इतर ग्रंथालय व माहितीशास्त्र सु.3री आ.कोल्हापूर : फडके प्रकाशन, सप्टेंबर 2009
4. पाटील ए.एन. (संपा) उच्च शिक्षण प्रणालीची सद्यस्थिती : जळगाव प्रशांत पब्लिकेशन.

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा "सद्धम्म" विषयक दृष्टीकोन

**प्रोफेसर (डॉ.)मनोहर कुंभारे**
प्राध्यापक व विभागप्रमुख, पाली प्राकृत वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
kmanohart71@gmail.com

**सारांश (Abstract)**

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा सद्धम्मविषयक दृष्टीकोन अतिशय वैज्ञानिक आणि नैतिक मूल्यांवर आधारित आहे. तो धर्म तसेच अधम्म संकल्पनेच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. डॉ आंबेडकरांच्या दृष्टीकोनातून सद्धम्म म्हणजे मानवतेचे परिपालन आहे.स्वातंत्र्याचे अर्थान्वियन आहे. कर्म सिद्धांताचे समाहरन आहे. अनित्य, अनात्म आणि दुःखवादाचे सत्यापन आहे. अनात्मवाद आणि अनिश्वरवादाचे सिद्धांत आहे. सामाजिक आणि आध्यात्मिक चेतनेचे परिस्फूरण आहे. ते जीवनाच्या पवित्रतेचे सूचक आहे. निर्भयतेचे आंगण आहे. प्रमाणिकतेचे व्रत आहे. समतेचे प्रशस्त द्वार आहे. धम्मविज्ञान चेतानेचे समीकरण आहे. अहिंसेची अपरिमित परिधी आहे. चरित्राची कसोटी आहे. नैतिकतेचे मूल्यांकन आहे. निर्वाण साधनेचे मार्गक्रमण आहे. खरेतर धम्म म्हणजे सर्वांगीण चेतानेने परिपूर्ण समाजरचनेचा सूत्रधार आहे. जी समाजरचना प्रज्ञा, शील, करुणा आणि मैत्री या सद्धम्माच्या नैतिक आदर्शवर प्रतिपन्न आहे. तसेच समता, स्वतंत्र, बंधुता आणि सामाजिक न्याय या संविधानिक मूल्यांवर आधारित संजरचनेच्या निर्मितीचाच दृढसंकल्प आहे.

**महत्त्वपूर्ण शब्द(Keyword)-**डॉ बाबासाहेब आंबेडकरांची-धर्म, धम्म, अधम्म व सद्धम्म संकल्पना.

## चर्चा (Discussion)

### प्रस्तावना(Introduction)

डॉ बाबासाहेब आंबेडकर "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथात सद्धम्म संकल्पनेची मांडणी करतांना- धम्म, अधम्म व सद्धम्म अशी मांडणी करतात. यामध्ये धम्म म्हणजे काय? अधम्म म्हणजे काय? सद्धम्म म्हणजे काय? धम्म आणि धर्म यामध्ये काय फरक आहे? या सर्वांची मांडणी करतांना मनुष्याला दुर्बल बनविणाऱ्या ब्रह्मा, देव, ईश्वर, यज्ञयाग, कर्मकांड, अंधश्रद्धा, धर्मग्रंथ इत्यादी सर्व काल्पनिक अनुमानावर आधारित धर्मरूपी अधर्मावर घणाघाती प्रहार करतांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा वैज्ञानिक दृष्टीकोन तसेच संपूर्ण विश्वाला धम्मराज्य बनविण्याचा सिहनांद आपल्या दृष्टीपथास पडतो.

**धम्म म्हणजे काय?**[१]

१)जीवन-पवित्रता राखणे म्हणजे धम्म.

२)जीवनात पूर्णता साधने म्हणजे धम्म.

३) निर्वाण प्राप्त करणे म्हणजे धम्म.

४) तृष्णा-त्याग म्हणजे धम्म.

५) सर्व संस्कार अनित्य आहेत असे मानणे म्हणजे धम्म.

६)'कर्म'हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे हे मानणे म्हणजे धम्म.

**अधम्म म्हणजे काय?**[२]

१) दैवी चमत्कृतीवर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म.

२) ईश्वरावर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म.

३) ब्रह्म- सायुज्यावर विश्वास म्हणजे अधम्म.

४) आत्म्यावर विश्वास म्हणजे अधम्म.

५) यज्ञयागावर विश्वास म्हणजे अधम्म.

६) काल्पनिक अनुमानवर विश्वास म्हणजे अधम्म.

७) धम्मग्रंथांचे केवळ पठण म्हणजे अधम्म.

८) धर्मग्रंथ दोषरहीत असे समजणे म्हणजे अधम्म.

**सद्धम म्हणजे काय?**[३]

(क) सद्धम्माचा उद्देश

१) मनाची मलिनता दूर करणे.

२) जग हे धम्मराज्य बनविणे.

**धम्म हा तेव्हाच सधम्म असतो जेव्हा तो सर्वांना ज्ञानाचा मार्ग मोकळा करतो**[४]**.**

१) धम्माला सद्धम्माचे रूप येण्यासाठी त्याने प्रज्ञेला उत्तेजन दिले पाहिजे. जेव्हा धम्म विद्या सर्वांना मोकळी करतो तेव्हा तो सद्धम्म होतो.

२) धम्म जेव्हा विद्या पुरेशी नाही, कारण त्यामुळे केवळ पोकळ निर्माण होते, असे शिकवितो तेव्हा त्याला सद्धम्मरूप प्राप्त होते.

३) धम्म जेव्हा प्रज्ञेची आवश्यकता शिकवितो तेव्हा तो सद्धम्मरूप प्राप्त करतो.

**धम्माला सद्धम्मरूप प्राप्त होण्यासाठी त्याने मैत्रीला उत्तेजन दिले पाहिजे**[५]**.**

१) केवळ प्रज्ञा पुरेशी नसून तिच्यासमवेत शीलही असले पाहिजे असे धम्म शिकवितो तेव्हाच तो सद्धम्मरूप प्राप्त करतो.

२) धम्म जेव्हा प्रज्ञा आणि शील ह्यांच्याशिवाय करुणेची आवश्यकता प्रतिपादन करतो तेव्हाच तो सद्धम्मरूप प्राप्त करतो.

३) जेव्हा धम्म करूणेपेक्षा मैत्रीचे अधिक महत्त्व प्रतिपादन करतो तेव्हाच तो सद्धम्मरूप प्राप्त करतो.

**धम्माला सद्धम्मरूप प्राप्त होण्याआठी त्याने सामाजिक भेदाने उत्पन्न झालेले निर्बंध नाहीसे केले पाहिजेत**[६]**.**

१) धम्माला सद्धम्मरूप प्राप्त होण्यासाठी त्याने माणसामाणसातील भेद करणारे अडसर मोडून काढले पाहिजे.

२) धम्माला सद्धम्मरूप प्राप्त होण्यासाठी त्याने माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मावरून नव्हे तर कार्यावरून ठरवावे; अशी शिकवण दिली पाहिजे.

३) धम्माला सद्धम्मरूप प्राप्त होण्यासाठी त्याने माणसामाणसामधील समतेच्या भावनेची अभिवृद्धी केली पाहिजे.

**धर्म आणि धम्म:-**

**धर्म(Religion) म्हणजे काय?**[७]

**धर्माची पहिली अवस्था**:- प्रारंभ अवस्थेत आदिमानवाला वीज, पाऊस, पूर इत्यादी ज्या घटनांचे कार्यकारणभाव स्पष्ट करता नव्हते तेव्हा तो जे काही चमत्कारिक प्रयोग करीत असे त्यांना जादू म्हणत. प्रारंभी धर्म आणि जादूही एकरूपच होती.

**धर्माची दुसरी अवस्था**:- दुसऱ्या अवस्थेत धर्माने विश्वास, धार्मिक, कर्मकांड, विधी, प्रार्थना आणि यज्ञ असे स्वरूप धारण केले.

**धर्माचा केंद्रबिंदू:-** धर्मचा केंद्रबिंदू अशा विश्वासापासून सुरुवात होतो की, अशी एक शक्ती आहे जिच्यामुळे सर्व चमत्कार घडून येतात. परंतु ती आदिमानवाच्या ज्ञानसामर्थ्याच्या आणि समजण्याच्या पलीकडे आहे.अशा अवस्थेत

जादूचे महतत्व कमी झाले. प्रारंभी ही अज्ञान व अज्ञेय शक्ती सैतानी समजली जाई, परंतु ती पुढे कल्याणकारी समजली जाऊ लागली. ती कल्याणकारी शक्ती प्रसन्न करून घेण्यासाठी आणि सैतानी शक्तीला प्रसन्न करण्यासाठी विश्वास, कर्मकांड, विधी आणि यज्ञाची आवश्यकता भासली आणि सुरुवात झाली. यानंतर या शक्तीला ईश्वर किंवा निर्माता अशी संज्ञा देण्यात आली.

**धर्माची तिसरी अवस्था**:- या अवस्थेत 'देवानेच हे सर्व जग आणि माणसे निर्माण केली'अशी समजूत रूढ झाली. यानंतर माणसाला आत्मा आहे.तो अमर आहे आणि माणसाच्या इहलोकच्या कर्माबद्दल त्याला देवासमोर जाब द्यावा लागणार आहे अशी समजूत रूढ झाली. थोडक्यात अश्याप्रकारे धर्म विचारांचा विकास होत गेला. धर्म म्हणजे:- वरील सर्व विवेचनावरून, देवावर श्रद्धा, अत्म्यावर विश्वास, ईश्वरपूजा, चुकणाऱ्या आत्म्याची आत्मशुद्धी, प्रार्थनाविधी, कर्मकांड व यज्ञ-याग इत्यादींनी देवाला प्रसन्न करणे म्हणजे धर्म आणि हे सर्व आशय धर्म या शब्दाने व्यक्त होतात.

**धम्म धर्मापासून(Religion) वेगळा कसा?**

१) धर्म ही वैयक्तिक बाब असून ती स्वतापूरती मर्यादित ठेवावी. याउलट धम्म हा मूलतः आणि तत्त्वता सामाजिक आहे.

२) धम्म म्हणजे सदाचार. म्हणजेच मनुष्य जीवनातील सर्व क्षेत्रात माणसामाणसातील व्यवहार उचित असले पाहिजे.

३) म्हणजेच समाज धम्माशिवाय असूच शकत नाही.

४) जो समाज शासनाचे साधन म्हणून धम्माची निवड करणार नाही.असा समाज एकतर अराजकतेचा मार्ग किंवा हुकूमशाहीचा मार्ग शासनाचे साधन म्हणून निवड करेल. परंतु अराजकता आणि हुकूमशाही या दोन पर्यायांत स्वातंत्रता नसते.

५) तिसरा पर्याय म्हणजे समाज धम्माबरोबर धम्माचे उल्लंघन करण्याऱ्या लोकांना शासन करणारा मॅजिस्ट्रेट म्हणून धम्माचा स्वीकार करू शकेल. फक्त या तिसऱ्या पर्यायात मनुष्याचे स्वतंत्र टिकून राहू शकते. म्हणूनच ज्यांना स्वतंत्र पाहिजे असेल त्यांनी धम्माचा स्वीकार केलाच पाहिजे.

**धम्माचा दोन कोनशीला:- प्रज्ञा आणि करुणा**

१) प्रज्ञा म्हणजे काय?-प्रज्ञा म्हणजे सद्सद्विवेकबुध्दी, खुळया समजुतीला जागा राहू नये म्हणून तथागत बुद्धाने आपल्या धम्माच्या दोन कोनशीलात प्रज्ञेला पहिल्या कोनशीलेइतके महत्त्व दिले आहे.

२) करुणा म्हणजे काय ?-करुणा म्हणजे प्रेम, करूणेशिवाय समाज जगू शकत नाही किंवा त्याची उन्नती होऊ शकत नाही. म्हणूनच बुद्धाने आपल्या धम्मात करुणेला दुसऱ्या कोनशिले इतके महत्त्व दिले आहे. ही झाली बुद्धाच्या धम्माची व्याख्या. अर्थात प्रज्ञा आणि करुणेचे अपूर्व मिश्रण म्हणजेच तथागत बुद्धाचा धम्म होय. म्हनूणच धर्म आणि धम्मात महदंतर आहे.

**धम्माचा आणि धर्माचा विषय[८]:-**

**पोठ्ठपाद सुत्तात वर्णीतधर्माचे विषय(दस अव्याकतानि)**:- १) हे जग शाश्वत आहे काय? २) हे जग शाश्वत नाही काय?३) ह्या जगाचा अंत आहे काय? ४) हे जग अनंत आहे काय? ५)आत्मा आणि शरीर ह्या दोन वस्तू एकच आहेत काय? ६)आत्मा आणि शरीर ह्या दोन भिन्न वस्तू आहेत काय? ७) ज्याला सत्य सापडले त्याला मरणोत्तर अस्तित्व आहे काय? ८)ज्याला सत्य सापडले त्याला मरणोत्तर अस्तित्व नाही काय? ९) ज्याला सत्य सापडले त्याला मरणोत्तर अस्तित्व आहे आणि नाही असे आहे काय? १०) ज्याला सत्य सापडले त्याला मरणोत्तर परत अस्तित्व नाही अथवा त्याला मरणोत्तर अस्तित्व नाही असे नाही काय? या प्रश्नासंबंधी तथागताने आपले मत व्यक्त केलेले नाही.

कारण या प्रश्नांच्या उत्तरापासून काहीच लाभ नाही. याचा धम्माशी काहीही संबंध नाही. तसेच सदाचाराच्या कोणत्याही घटकाशी यांचा संबंध नाही. त्यापासून अनासक्ती, रागद्वेषापासून मुक्ती, शांती, शमन, सत्यज्ञान,अष्टांग मार्गाच्या उच्चतर अवस्थांचे ज्ञान किंवा निर्वाण साधत नाही. म्हणूनच मी यावर आपले मत व्यक्त केलेले नाही.

**धम्माचा विषय**९**:-** तथागत बुद्ध म्हणतात, "मी दुःख म्हणजे काय? दुःखाचे कारण काय? दुःखाचा निरोध म्हणजे काय? आणि दुःखाचा निरोध कसा करता येईल हे स्पष्ट केलेले आहे." कारण यापासून लाभ आहे. हा धम्माचा विषय आहे. सदाचरण , अनासक्ती, रागद्वेषापासूनपासून मुक्ती, शांती, शमन, सत्यज्ञान, अष्टांगमार्गातील उच्चतर अवस्थासंबंधी दृष्टी आणि निर्वाण साधता येते, म्हणून तर मी दुःख, दुःखाचे कारण, दुःखनिरोधाचे साधन यासंबंधी विधान केले आहे. यावरून धर्माचे प्रयोजन जगत प्रारंभाचे स्पष्टीकरण आणि धम्माचे प्रयोजन जगाची पुनर्रचना ही आहे.

**धम्म आणि नीती**१०**:** नीती म्हणजे धम्म आणि धम्म म्हणजे नीती. धम्मात जरी देवाला स्थान नाही तरी त्याचे स्थान नीतीने घेतले आहे. धम्मात प्रार्थना, तीर्थयात्रा, कर्मकांड, विधी अथवा यज्ञ यांना स्थान नाही. नीती हे धम्माचे सार आहे त्याशिवाय धम्म नाही. धम्मात माणसाने माणसावर प्रेम केलेच पाहिजे; यातून नीतीचा उगम होतो. त्यासाठी देवाच्या आज्ञांची आवश्यकता नाही. देवाला संतृष्ट करण्यासाठी काही माणसाने नीतीमान व्हायचे नाही तर स्वहितासाठी माणसाने माणसावर प्रेम केले पाहिजे.

**धर्म आणि नीती:-** वस्तुतः धर्मात नीतीला स्थान नाही. धर्माचे विषय म्हणजे देव, आत्मा, प्रार्थना, पूजा, कर्मकांड, विधी, समारंभ आणि यज्ञ हे आहेत. धर्माच्या व्यवहारात नीतीचे कार्य हे आकस्मिक किंवा प्रासंगिक आहे. म्हणून नीती ही धर्मात प्रभावशाली ठरत नाही. तो त्याला जोडलेला एक डबा आहे. वेळ पडेल त्याप्रमाणे तो त्याला जोडला जातो किंवा त्यापासून सोडविता येतो. आपल्या शेजाऱ्याशी चांगुलपणाने वागा; कारण तुम्ही दोघेही देवाची लेकरे आहात. ही धर्माची विचारसारणी आहे.धर्म हा एक त्रिकोण आहे. शांती आणि सुव्यवस्था राखण्यासाठीच धर्मात नीतीचा समावेश होतो. जेव्हा एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी संबंध येतो तेव्हा नीतीला प्रारंभ होतो.

**निष्कर्ष:-** डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी धम्म, अधम्म, सद्धम, सद्धम्माचा उद्देश, धर्म आणि धम्म यामधील फरक, धम्म धर्मापासून वेगळा कसा? प्रज्ञा आणि करुणा हे धम्माचे दोन आधारस्तंभ, धम्माचा आणि धर्माचा विषय, धम्म आणि नीती. इत्यादिंची अतिशय सविस्तरपणे आणि वैज्ञानिकदृष्टीने मांडणी केलेली आहे. अखिल विश्वातील मानव जर धम्म, अधम्म, सद्धम्म यांना सम्यकप्रकारे जाणून आपले माणसामाणसातील व्यवहार नीतीने आणि सद्सद्विवेकबुद्धीने करेल तर जगात शांती आणि सुव्यवस्था नांदेल. मनुष्य हा विज्ञानवादी बनेल आणि त्याला सम्यकदृष्टी प्राप्त होईल. यामुळे हा वैश्विक समाज एकूणच नैतिक मूल्यावर प्रतिपन्न होऊन समतेवर प्रतिष्ठित, स्वातंत्र्यावर प्रतिष्ठित, बंधुतेवर प्रतिष्ठित आणि न्यायावर प्रतिष्ठीत समाजरचना निर्माण होईल आणि या विश्वचे आनंदनवन होईल.

**संदर्भसूची**

१) बुद्ध आणि त्यांचा धम्म, डॉ बाबासाहेब आंबेडकर, पृ.१७६-१८०.
२) तेच, पृ.१८१-१९०.
३) तेच, पृ. १९१-२१६
४) तेच, पृ. १९१-२००.
५) तेच, पृ. २००-२१६.
६) तेच, पृ.२१७- २२१.
७) तेच, पृ.२२१-२३२.
८) तेच, पृ.२३२-२३९.
९) तेच, पृ.२४३- २४८.
१०) तेच, पृ. २४९.

# महात्मा फुले यांचे कृषी सुधारणा विषयक विचार

**प्रा.श्रीमंत तुकाराम कावळे**

अर्थशास्त्र विभागप्रमुख कै.शंकरराव गुट्टे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धर्मापूरी ता.परळी वै. जि.बीड

**प्रस्तावना :**

मानवी जीवन जगण्यासाठी मानवाला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मूलभूत घटकांवर आधारित आहे. म्हणूनच भारतातील बहुतांश लोकांचा व्यवसाय शेती हा आहे. या सर्वच भारताला कृषीप्रधान राष्ट्र म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे कृषी ही महत्वपूर्ण गरज असून भारतातमध्ये झाला तर देशाचा विकास होण्यास मदत होईल. आधुनिक कालखंडात विज्ञानाने बऱ्यापैकी प्रगती केली असली तरी पण उद्योगधंद्याचा विकास होऊनही भारताला मात्र कृषीप्रधान म्हटले जाते. 19 व्या शतकातील परिस्थितीवर, कृषीचा प्रभाव हा अर्थकारण, समाजकारण, राजकारण, धर्मकारण इ. सर्व घटकावर होताना दिसून येतो. कृषीला अधिक प्रभावी बनवण्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे. म्हणून म्हटल्या जाते की, जगातील प्रत्येक गोष्ट बदलण्याची ताकद पाण्यात आहे हे ओळखून मानवाने पाणी हे धर्म, अनेक क्षेत्रात विकासाची प्रक्रिया ठप्प झालेली होती. त्यात जलसिंचनातील वास्तव हे अतिशय प्रकर्षाने दिसून येते. तत्कालीन कालखंडात भारतातील जनतेने स्वतःच्या हितासाठी नद्या, नाले, महासागरांचा उपयोग केलाच पण शेती जलसिंचनासाठी कोणत्याही प्रकारची चिरकालीन व्यवस्था निर्माण केली गेली नव्हती. याचा परिणाम म्हणून प्रामुख्याने कोरडवाहू शेती, जलसिंचनाची अपुरी व्यवस्था, औद्योगिक समस्या पाणी पुरवठा, बेरोजगारी, उपासमार, दारिद्रय, लोकसंख्यावाढ, रोगराई, नापीक जमीन, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ई. समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. यावर मात करण्याचे दृष्टीकोणातून महात्मा फुलेचे विचार आजच्या काळातही महत्वपूर्ण आहेत.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

1) महात्मा फुलेंच्या विचारातील कृषीच्या सुधारणांचा आढावा घेणे.
2) महात्मा फुलेंच्या विचारातील कृषी विषयक उपाययोजना सुचविणे.
3) महात्मा फुलेंच्या विचारातील उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**महात्मा फुले यांचे जलसिचंना विषयक विचार :**

**कालव्यांची संकल्पना :**

फुलेंनी देशांच्या विकासाच्या दृष्टिकोणातून शेताजवळ कालव्याची निर्मिती केली जावी. म्हणून त्यांनी यापूर्वी देशातील विविध राजा-महाराजांनी कालव्याची कल्पना कशा पध्दतीने भारतात अमलात आणली होती हे ब्रिटिश शासन व्यवस्थेला सांगितले. अगदी तशाच पध्दतीने भारतात कालव्यांची निर्मिती केली तर शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल आणि देशाचा विकास गतिमान होईल. इतर देशाचे उदाहरण देताना फुले म्हणतात की, दुष्काळ टाळून जर शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर कालव्याशिवाय पर्याय नाही आजपर्यंत देशाच्या कोणत्याही भागात कालव्याचे जाळे विस्तृत प्रमाणात विणले गेलेले नाही हे खऱ्या अर्थाने देशातील राज्यकर्तंच्या नाकर्तेपण आणि शेतकऱ्यांचे द्रदैवच म्हणावे लागेल.

**जागोजागी धरणाची निर्मिती करणे :**

सरकारने जर जागोजागी बंधारे आणि कालव्यांची निर्मिती केली तर पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होईल. आणि भुगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल पाटबंधारे विभागाने पाणी आडवा पाणी

जिरवा हे ब्रीद वाक्य घेऊन काही प्रमाणात प्रयत्न केलेले दिसून येतात. भारतामध्ये पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन केले तर देशामध्ये पडणाऱ्या दुष्काळावर मात करता येईल. यामुळे उत्पादन वाढ होईल आणि आर्थिक विकासाची दरी कमी होईल.

**लहान, मोठ्या धरणांची निर्मिती :**

महात्मा फुले म्हणतात की, सरकारने ठिकठिकाणी लहान, मोठ्या धरणाची निर्मिती केल्यास पावसाच्या पाण्याची अडवणूक होईल आणि जमिनीची धूप कमी प्रमाणात होईल. जमिनीला भेगा पडणार नाहीत आणि उन्हाळयातही पाणी पुरवठा होईल तसेच बागायती क्षेत्रात वाढ होईल. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढेल. डोंगर खोऱ्यात टेकडयांच्या पायथ्यांशी तलाव निर्माण करावेत त्यामुळे पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब उपयोगात येऊन शेतकऱ्यांचे दुःख संपायला मदत होईल.

**कालव्यांची कमीत कमी खर्चाची निर्मिती :**

फुलेंच्या मते कालवे निर्माण करण्यासाठी जास्त खर्च येईल असे ब्रिटीशांना वाटू नये म्हणून फुले यांनी कमीत कमी खर्चात कालवे निर्मितीचा मार्ग सुचविला कालव्यांची निर्मिती केल्यामुळे स्वभाविकच शेतकऱ्यांवरील खर्च कमी होईल आणि उत्पादन क्षमता वाढेल सरकारच्या तिजोरीतून फार मोठी रक्कम पाण्यासाठी खर्च केली असे शासनाला वाटू नये.म्हणून फुले यांनी दुसरा मार्ग सांगितला. यामध्ये उपलब्ध साधन साम्रगी आणि मनुष्यबळाचा उत्तम उपयोग करुन कालव्यांची निर्मिती करण्याची ही योजना मांडली होती.

**मुठा नदीवर धरणांची निर्मिती :**

ब्रिटिश शासनाने शेतकऱ्यांसाठी मुठा नदीवर धरणांची निर्मिती केली. तेव्हा महात्मा फुल्यांना खूप आनंद झाला. त्यांच्या मते, या धोरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक, सामाजिक, परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. पण अंधश्रध्देच्या जाळयात अडकेले भारतीय शेतकरी धरणातील पाणी घेऊन पिकास देण्यास तयार नव्हते त्या काळात शेतकरी पावसाच्या पाण्यावर शेती करीत होते. त्याच काळात भारतात दुष्काळ पडला होता. दुष्काळामुळे पिके जळत होती. रोगराई वाढत होती, परंतू शेतकऱ्यांच्या मानगुटीवर वर्षानुवर्षे भटशाही केलेले साम्राज्य दुष्काळातही शेतकऱ्यांच्या मानगुटीवर बसलेले होते. भारतीय शेतकरी धरणातील पाणी घेण्यास घाबरत होते. फुले यांनी 1876 मध्ये स्वत: माजरीत जमीन घेऊन याच धरणाच्या पाण्यावर शेती करण्यास सुरुवात केली. शेतीमध्ये कोबी, फुलकोबी, बटाटे, संत्री व भाजीपाला तसेच फळांची शेती केली. ऊस गाळून गुळाचे उत्पन्न घेतले फुल्यांच्या हा उपक्रम पाहून दुसऱ्या शेतकऱ्यांच्या मनातील अंधश्रध्दा दूर होण्यास सुरुवात झाली.

**जमीनदार कुळासंबंधी फुले यांची भूमिका :**

जमीनदार आणि कुळे यांच्यामध्ये फुले सातत्याने कुळाच्या बाजूने होते. मग ते प्रश्न कोकणातील शेतीचा असो की जुन्नरमधील जमिनदारीचा जुन्नमधील जमीनदार कुळाकडून जमिनीचा खंड फार मोठ्या प्रमाणात वसूल करीत. फुल्यांनी तेथील कुळांना संघटित करुन जमिनीदारांविरुध्द लढ दिला. परिणामी शासनाने कुळाकडून जमीनदारांनी वसूल करावयाच्या खंडावर शासनाने कमाल मर्यादा घालून दिली.

**शेती सुधारणा आणि उत्पादनास प्रोत्साहन मिळावे यासाठी काही उपाय योजना :**

शेती सुधारणेच्या दृष्टीने जे विशिष्ट उपाय सुचविले.

1) शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती करण्याचे ज्ञान द्यावे आणि अत्याधुनिक यंत्रे व रासायनिक खते आदींच्या वापराविषयी त्यांना योग्य प्रशिक्षण द्यावे.

2) जनावरांची मोठ्या प्रमाणात कत्तल झाल्याने शेतीसाठी चांगली जनावरे मिळेनासी होतात आणि नैसर्गिक खताचा पुरवठा ही कमी होऊ लागतो. म्हणून निरोगी गायी, म्हैशी बैल इत्यादीच्या कत्तलीवर सरकारने बंदी घालावी.
3) युरोपियन लोकांप्रमाणे पाण्याचे नियोजन व शेतीविषयक ज्ञान शेतकऱ्यांना दिले जावे.
4) शेतकऱ्यांना नदी-नाले, कालवा, धरण आणि तलावातील पाणी मोफत दिले जावे.
5) महात्मा फुले यांनी नागरिकांसाठी शुध्द फिल्टर पाण्याची योजना मांडली.
6) तत्कालीन काळात पाणी फिल्टर करणारी नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याचा विचार करणारी पुणे नगरपलिका ही देशातील पहिली नगरपलिका आहे.

**शेतकऱ्यांच्या अडचणीविषयी शासनास सुचना :**

ज्योतिबा फुल्यांनी ग्रामीण भागातील वाढत्या दारिद्रयावर भरपूर चिंतन केले होते. याची तीन प्रमुख कारणे होती असे फुले म्हणतात.

1) आवर्षण, महापूर, अतिवृष्टी या समस्या नैसर्गिक आपत्ती.
2) शेतजमिनीच्या विकास कार्याकडे शासनाने पुर्ण दुर्लक्ष.
3) शेतकऱ्यात भरमसाठ वाढ.

**निष्कर्ष :**

1) महात्मा फुले यांनी सांगितलेली कृषी सुधारणा नीती अमलात आणणे काळाची गरज आहे.
2) महात्मा फुले यांची कालव्यांच्या संदर्भातील नीती अमलात आणणे काळाची गरज आहे.
3) महात्मा फुले यांची दुष्काळ निवारणांची नितीचा उपयोग करणे महत्वाचे आहे.

**संदर्भ :**

1) महात्मा फुले : आसूड, स.वा.पृ.क्र. 248, 264, 268.
2) ज्योतिराव फुले : गुलामगिरी, स.वा.पृ.क्र. 133, 134.
3) उत्तम कांबळे : महात्मा फुल्यांची जलनीती, सुगावा प्रकाशन, पुणे 8 मार्च 2010, पृ.क्र. 6.
4) कित्ता, पृ.क्र. 10.
5) हरी नरके : युगपुरुष महात्मा फुले, समिती महाराष्ट्र शासन, प्रशासन मुंबई, 11 मार्च 1993, पृ.क्र. 143.
6) नागनाथ कोत्तापल्ले : शेतकऱ्यांचा असुड, कौशल्य प्रकाशन, 26 जून 2010, पृ.क्र. 13.
7) कित्ता पृ.क्र. 12.
8) कित्ता पृ.क्र. 14.
9) महात्मा फुले, समग्र वाङमय, पृ.क्र. 318.
10) उत्तम कांबळे : महात्मा फुल्यांची जलनीती, सुगावा प्रकाशन, पुणे 8 मार्च 2010, पृ.क्र. 8.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजीक समता चळवळ

**डॉ. प्रमोद ना. घ्यार**
इतिहास विभाग प्रमुख कला वाणिज्य महिला महाविद्यालय बल्लारपूर जि. चंद्रपूर
pramodghyar52@gmail.com

**प्रस्तावना :–**

आपल्या समाजात अनेक रूढी व परंपरा असून त्यापैकी काही अनिष्ट रूढी व परंपरा आहेत, त्यापैकीच अस्पृश्यता ही एक आहे. या प्रथेमुळे मानवी मुल्यांचे अवमुल्यन झाले. माणुस म्हणून जगणे हा नैसर्गीक हक्क देखील या रूढीमुळे नाकारला गेला. विषमता हा समाजाचा पाया होवून जाती जातींमध्ये समाज विभागला गेला. आपल्या देशात फार पूर्वीपासून समाजामध्ये अस्पृश्यता रूजलेली असून तिचा उगम वैदिक काळापासून सापडतो. हिंदू समाज ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य व शुद्र या चार वर्णात विभागला गेला होता. या वर्णांचे व्यवसाय निश्चीत केले गेले होते. वर्णव्यवस्थेतून हळूहळू जातीव्यवस्था दृढ होत गेली. याचा परिणाम समाज एकसंघ न राहता जाती जातींमध्ये विभागला गेला. रोटी बेटी व्यवहार हा केवळ जाती अंतर्गत होत असल्याने या समाजास बंद वर्गाचे स्वरूप प्राप्त झाले. पुराणे, महाकाव्य, स्मृती इ. ग्रंथातून जाती व्यवस्थेविषयी नियम सागितले गेले. मनुस्मृतीने स्त्रीया, शुद्र यांना संपत्ती बाळगण्याचा हक्क नसल्याचे जाहीर केले, त्यामुळे हिंदू समाजात स्त्रीया व शुद्रांची स्थिती अत्यंत वाईट झाली. प्राचीन काळात भगवान बुध्द, वर्धमान महाविर व त्यांच्या अनुयायांनी या व्यवस्थेला विरोध केला. आपल्या देशात तत्वज्ञानाच्या दोन परंपरा आहेत. एक वैदिक परंपरा व दुसरी अवैदिक परंपरा, वैदिक परंपरा व अवैदिक परंपरा यांच्यात अनेकदा वैचारीक संघर्ष होत असत. चार्वाक, जैनवाद, बौध्द तत्वज्ञान, रामानुजाचार्य यांनी प्रस्थापीत वैदिक परंपरेला नाकारून स्वतंत्र पंथमार्ग निर्माण केले. या पंथांचे मुख्य तत्वज्ञान समानता होते. भागवत धर्मातील अनेक संतांनी जातीभेद, विषमता नष्ट व्हावी यासाठी प्रयत्न केले. यामध्ये रामानंद, चैतन्य महाप्रभु, कबीर, चोखामेळा, संत नामदेव, एकनाथ, संत तुकाराम इ. संतांचा समावेश होतो. अन्य संतांच्या तुलनेत कबीर हे अधिक विद्रोही व बंडखोर संत असून म.फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर देखील त्यांच्या जीवनाचा आणि काव्याचा प्रभाव पडलेला दिसून येतो. यातूनच बाबासाहेबांनी दलीत व अस्पृश्यांना सामाजीक न्याय मिळवून देण्यासाठी विविध चळवळी व आंदोलने केलीत.

## आंबेडकरी चळवळीची पार्श्वभूमी :–

इ.स. १९२० पासून बाबासाहेब सामाजिक जिवनात प्रमुख्याने सहभागी होवून आंबेडकरी चळवळीचा प्रारंभ झाला. या काळात इंडीयन नॅशनल कॉंग्रेसचे नेतृत्व म. गांधीकडे येवून राजकीय प्रश्नांइतकेच महत्व सामाजिक प्रश्नांना प्राप्त झाले. अस्पृश्यता निवारण हा एक कार्यक्रम म. गांधींच्या आग्रहामुळे कॉंग्रेसच्या कार्यक्रमाचा एक भाग बनला. या पार्श्वभूमीवर बाबासाहेबांनी त्यांची मानवमुक्ती चळवळ सुरू केली. एका बाजुला चळवळ संघटीत करणे, दुसऱ्या बाजुला ब्रिटीश सरकारशी लढा देणे व त्याचवेळी दलीतांच्या हक्कासंबंधी मान्यता मिळविण्यासाठी वातावरण तयार करणे यासाठी ही चळवळ कार्यरत होती. याविषयीची भूमिका त्यांनी 'बहिष्कृत भारत' या साप्ताहिकात मांडली. लोकशाही मार्गाने सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार असावा, जेणेकरून समतेचे तत्व राजकीय क्षेत्राात अंमलात येईल. समाजाची पुर्नरचना ही समतेवर आधारित असावी, यासाठी जनजागृती आंदोलनासोबतच कायदयाने ती करून घ्यावी असा प्रयत्न त्यांनी केला व त्यात ते यशस्वीसुध्दा झाले. 'ज्या तत्वावर तुमचा समाज उभा राहणार आहे, त्याची तजवीज कायदयाच्या रूपाने करणे अत्यंत आवश्यक आहे' असे त्यांचे मत होते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजीक समता चळवळ :–**

बाबासाहेबांनी सुरू केलेली चळवळ म्हणजे जात, वर्ग व वर्ण अंताची चळवळ होय. समाजात सामाजीक न्याय ही संकल्पना प्रस्थापित करण्याची चळवळ होय. समतेची जाणीव समाजात निर्माण करून समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करण्याचे कार्य त्यांनी या चळवळींच्या माध्यमातुन केले. महात्मा फुलेनंतर समता प्रस्थापीत करणारी चळवळ ही जनआंदोलन म्हणून पुढे आली. या चळवळीचे नेतृत्व त्या अनुषंगाने बाबासाहेबाकडे आले. १९२० पासून सुरू झालेली ही चळवळ आजपर्यंत सुरूच आहे. बाबासाहेबांनी याची सुरूवात 'बहिष्कृत हितकारीणी सभा' स्थापन करून केली. बौध्द धर्माचा स्वीकार करून या चळवळीचा उच्चांक गाठला. त्यांच्या आंदोलनाचे स्वरूप सामाजिक, शैक्षणीक, आर्थीक, राजकीय व धार्मीक असे व्यापक होते.

सामाजिक हक्क व मानवी प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी १९२६ मध्ये महाडच्या चवदार तळे सत्याग्रह केला. तसेच मानवी हक्क प्रस्थापीत करण्यासाठी सार्वजनीक ठिकाणे अस्पृश्यांसाठी खुले करण्याच्या हक्कासाठी १९३० मध्ये नाशीक येथे काळाराम मंदीर सत्याग्रह केला. या सत्याग्रहांमधून 'माणूस येथून समान असून जात, वंश, धर्म, स्पृश्य व अस्पृश्य याच्या आधारे माणसामाणसात भेदभाव करता येणार नाही' हा दृष्टीकोन ठसविण्यात आला. देवदर्शन हे निमीत्य असून समाजाने समतेचे तत्व स्विकारावे हा त्यामागील संदेश होता. पारंपारिक समाजव्यवस्था व त्यानुसार आचारविचार करणाऱ्या समाजाला जागृत करून त्यांना विचार करावयास प्रवृत्त करण्याचे कार्य या सत्याग्रहांनी केले. अस्पृश्यता व जातीव्यवस्था ही विषमतेची बीजे असून ती नष्ट करण्यासाठी सर्वच स्तरातून प्रयत्न होणे आवश्यक आहे ही जाणिव या सत्याग्रहामुळे समाजामध्ये निर्माण झाली. समतेच्या या चळवळीने पुढे राजकीय शक्तीचे रूप धारण केलेले दिसून येते. राजकीय हक्क मिळविण्यासाठी बाबासाहेबांनी या चळवळीचें रूपांतर स्वतंत्र मजूर पक्ष, त्यानंतर शडयूल्ड कास्ट फेडरेशन व पुढे रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया असे केले. राजकीय हक्क पदरात पाडल्याशिवाय दलीत पिडीत लोकांना समतेची वागणूक मिळणार नाही हे बाबासाहेबांना माहित होते. त्यासाठी त्यांनी राजकीय पक्ष निर्माण करून राजकीय लढे सुरु केले. भारतीय लोकशाहीची बिजे रूजविण्यात या राजकीय चळवळीचा फार मोठा वाटा आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता या लोकशाही मुल्यांचा आग्रह या चळवळीने धरला. बाबासाहेबांनी या देशातील सामान्य माणसाला त्याच्या हक्काबद्दल जागरूक केले व त्यासाठी लढण्याचे नैतिक बळ मिळवून दिले.

**साऊथबरो कमिटी :–**

इ.स. १९१९ मध्ये ब्रिटीश सरकारने भारतीयांना जादा राजकीय हक्क देण्यासाठी लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखाली 'मतदान कमिटी' भारतात पाठविली. या कमिटीपुढे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी मांडण्यासाठी विठ्ठल रामजी शिंदे व बाबासाहेब यांची सरकारने निवड केली. साऊथबरो कमिटी समोर बाबासाहेबांनी अस्पृश्यांना मतदानाचा हक्क पाहिजे, त्यांना निवडणूकीस उभे राहता यावे, त्यांच्या मतदारांना स्वतंत्र मतदारसंघ पाहिजे इ. मागण्या केल्या. परंतू या कमेटीसमोर विठ्ठल रामजी शिंदे व बाबासाहेब यांच्या मतांमध्ये भिन्नता निर्माण झाली. शिंदेंचा दृष्टीकोन बाबासाहेबांना मान्य झाला नाही.

**बहिष्कृत हितकारीणी सभा :–**

१९२० ते १९२३ या काळात 'मुकनायक' या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व त्यासाठी संघटीत होण्याची गरज स्पष्ट करण्यासाठी जनजागृतीचे कार्य बाबासाहेंबांनी सुरू केले. अस्पृश्यांच्या सर्वांगीण विकासाची धुरा वाहू शकेल अशी संस्था २० जुलै १९२४ रोजी मुंबई येथील दामोधर हॉल, परळ येथे स्थापन करून तिचे नाव 'बहिष्कृत हितकारीणी सभा' असे ठेवले. समाजाने बहिष्कृत केलेला असा समाजबाहय मानवीसमूह यांचे प्रतिनीधीत्व या संस्थेव्दारे आपण करीत आहो, याची जाणीव त्यामुळे व्यक्त झाली. बहिष्कृत वर्गात जागृती निर्माण करणे, त्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे, त्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे, आर्थीक उन्नतीच्या योजना तयार करणे इ. उद्देश संस्थेने समोर ठेवले.

बहिष्कृत वर्गाचा प्रश्न हा संपूर्ण समाजाचा प्रश्न आहे, त्याच्याकडे लक्ष दिले नाही तर देश पांगळा होईल असा इशारा बाबासाहेबांनी दिला. बाबासाहेबांनी या सभेव्दारे त्यांचे कार्य खेडयापाडयात पोहचविले. १० एप्रिल १९२५ रोजी मुंबई इलाखा प्रांतीक बहिष्कृत परिषद निपाणी जि. बेळगाव येथील अध्यक्षपदावरून बाबासाहेबांनी 'सामाजिक सुधारणांसाठी तयार व्हा' असा संदेश दिला. 'आम्ही आपले मानवजातीस प्राप्त असलेले समान हक्क मागत आहोत' अशी भूमीका घेऊन बहिष्कृतांचा लढा हा जागतिक मानवाच्या मुक्तीच्या लढयाचा एक भाग आहे, असे व्यापक स्वरूप त्यांनी मिळवून दिले. त्याचा परिणाम समाजावर दिसून आला. या बहिष्कृत हितकारीणी सभेचे ब्रिदवाक्य 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' असे होते. या सभेच्या वतीने 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक ३ एप्रिल १९२७ रोजी सुरू केले. 'आजकालचे प्रश्न' या सदरातून त्यांनी अनेक लेख लिहून चळवळीची भूमिका स्पष्ट केली.

**महाड चवदार तळे सत्याग्रह :—**

मुंबई कायदेमंडळात सिताराम बोले यांनी ४ ऑगष्ट १९२३ रोजी सार्वजनिक ठिकाणांचा अस्पृश्यांना उपभोग घेऊ द्यावा असा ठराव मांडला व तो पारित झाला. परंतू नंतर त्यावर फारशी अंमलबजावणी झाली नाही. बाबासाहेबांनी या ठरावाची अंमलबजावणी व्हावी व बहिष्कृत वर्गामध्ये जागृती निर्माण व्हावी, यासाठी बहिष्कृत सभेतर्फे महाड येथे अधिवेशन आयोजीत करण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष बाबासाहेब होते व त्यांच्या चळवळीचा हा पहिला प्रयोग होता. बाबासाहेबांसोबत हजारो अनुयायांनी महाडच्या चवदार तळयाचे पाणी प्राशन केले. परंतू त्यानंतर सवर्ण हिंदूंनी परिषदेतील लोकांवर हल्ला करून बेदम मारहाण केली. याचे बाबासाहेबांना खूप दुःख झाले. 'बहिष्कृत भारत' मध्ये त्यांनी तीन अग्रलेख लिहून समता प्रस्थपित करणे हे सर्वांचे ध्येय्य असले पाहिजे ही भूमिका मांडली. पुन्हा २५ डिसेंबर १९२७ रोजी महाडला सत्याग्रह परिषद आयोजित केली. परंतू कोर्टाचा मनाईहूकुम आल्याने त्यांना सत्याग्रह स्थगीत करावा लागला. मात्र या परिषदेत मनुस्मृतीचे दहन केले गेले.

**अस्पृश्यांच्या हक्काचा जाहिरनामा :—**

१९२७ च्या महाड सत्याग्रहानंतर सायमन कमिशनसमोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी करण्याची संधी बाबासाहेबांना मिळाली. बहिष्कृत हितकारीणी सभेच्या वतीने बाबासाहेबांनी सायमन कमिशनला दोन पत्रे दिली. त्यापैकी एक पत्र अस्पृश्यांच्या हक्कांसंबंधी तर दुसरे पत्र मुंबई प्रांतास कोणते राजकीय हक्क द्यावेत यासंबंधी होते. सायमन कमिशनने अस्पृश्यांना राजकीय हक्क देण्याची शिफारस केली.

**काळाराम मंदीर सत्याग्रह :—**

सामाजीक समता प्रस्थापीत करण्याच्या कार्याचा एक भाग म्हणून बाबासाहेबाच्या नेतृत्वाखाली १९३० साली झालेल्या नाशीक येथिल काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रहाचे फार महत्व आहे. महाडसत्याग्रहामुळे बाबासाहेबांच्या अनुयायांचे मनोधैर्य उंचावले होते. सत्याग्रहाने हिंदू समाजात एक विचाराची प्रक्रीया सुरू होवून धर्म, जात, वंश यापलीकडे माणूस म्हणून तो माणसाकडे पहायला शिकेल असे बाबासाहेबांना वाटत होते. मंदीरातील देवाच्या दर्शनाने अस्पृश्यांचा प्रश्न सुटणार नव्हता, परंतू मंदीरात जाण्याचा अधिकार नाकारला तर त्याविरोधात शस्त्र उगारले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.

या पार्श्वभूमीवर ३ मार्च १९३० रोजी दहा हजार अस्पृश्य काळाराम मंदीराच्या प्रवेशव्दाराजवळ आले, परंतू मंदीराची दारे बंद असल्याने चार दरवाज्यावर चार सत्याग्रहींच्या तुकडया ठाण मांडून बसल्या. १ एप्रिल १९३० रोजी रामनवमीचे दिवशी जेव्हा मंदीराचे दरवाजे उघडले तेव्हा सत्याग्रहींना पकडण्यात आले. या दिवशी बाबासाहेब व त्यांच्या अनूयायांवर दगड भिरकावण्यात आले, यामध्ये बाबासाहेबांसोबतच त्याचे अनुयायी जखमी झाले. तरीपण न डगमगता अहिंसक व शांततामय मार्गाने या हक्कांसाठी असंख्य स्त्री पुरूषांनी दिर्घकाळ लढा दिला. राजकीय व्यासपिठावर या सत्याग्रहाची नोंद घेतल्या गेली. संघर्षाशिवाय परिवर्तनाची लढाई शक्य नाही, याबद्दल बहिष्कृत वर्गाची खात्री पटली. समाजाला धर्म, रूढी, परंपरा

यासंबंधी पूर्ण विचार करावयास या चळवळीने भाग पाडले. अस्पृश्यता ही ईश्वरनिर्मीत नसून मानवनिर्मित आहे, मानवाच्या मनामध्ये परिवर्तन झाल्यास ती नष्ट होवू शकते, असा विचार करावयास या सत्याग्रहाने शिकविले. २४ सप्टेंबर १९३२ रोजी म.गांधी आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे करार होवून या करारानुसार अस्पृश्यांना कायदेमंडळात राखीव जागा मिळाल्या, याशिवाय सरकारी नोकरी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लढविण्याचा अधिकार, अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र आर्थीक तरतूद केली जाईल इ. कलमांचा समावेश होता.

**शेडयुल्ड कास्ट फेडरेशन :—**

१८ जुलै १९४२ रोजी बाबासाहेबांनी शेडयुल्ड कास्ट फेडरेशन या नव्या पक्षाची घोषणा केली. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भारतात क्रिप्स मिशन आले. या योजनेनुसार भारताला स्वातंत्र्य देतांना घटना समितीमध्ये हिंदू व मुस्लीम यांच्यासोबत अस्पृश्यांचा विचार केला पाहिजे असे मत बाबासाहेबांचे होते. अस्पृश्य वर्गाचे हितरक्षण करण्यासाठी देशातील तमाम अस्पृश्यांना एकत्र आणून आपले राजकीय हक्क मिळविण्यासाठी राजकीय संघटन आवश्यक बनले. या पक्षाचे पहिले अधिवेशन नागपूर येथे १८ व १९ मार्च १९४२ या दिवशी संपन्न झाले. याच अधिवेशनात पक्षाची अधिकृत घोषणा करण्यात आली. फेडरेशनचे पहिले अध्यक्ष म्हणून मद्रासचे एन.शिवराज यांची तर जनरल सेक्रेटरी म्हणून पी.एन. राजभोज यांची निवड झाली. शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचा हा लढा राजकीय असण्यासोबतच समाजात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सुध्दा होता.

**समारोप :—**

बाबासाहेबांच्या चळवळीचे महत्वाचे वैशिष्टय म्हणजे चळवळीत असलेला महिलांचा विशेष सहभाग होय. २० जुलै १९४२ रोजी नागपूरच्या मोहन पार्कवर समता सैनिक दलाचे अधिवेशन झाले. 'समतेसाठी सैनिक' ही कल्पना बाबासाहेबांनी मांडून समतेसाठी संघर्ष करण्यासाठी हे दल उभे केले. समतेच्या लढयात जेव्हा जेव्हा संघर्षाचे प्रसंग आले, त्यावेळी या दलाने महत्वाचे कार्य केले. भारतीय स्वातंत्र्यलढयाला समांतर अशी सामाजीक समतेची लढाई हा बाबासाहेबाच्या कतृत्वाचा महत्वाचा भाग आहे. पुढे १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत राहून अस्पृश्यांचा प्रश्न सोडविण्याची नवी जबाबदारी बाबासाहेबांकडे आली. १९४८ साली नेहरू मंत्रीमंडळात पहिले कायदामंत्री म्हणून त्यांची निवड झाली. भारताची राज्यघटना तयार करण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान असून त्यांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी घटनात्मक तरतूद करून समता संघर्षाच्या लढाईचा टप्पा पूर्ण केला.

**संदर्भ :—**

१) कीर धनंजय — डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र
२) गणविर रत्नाकर — महाड समता संगर
३) फडके भालचंद्र — डॉ. बाबासाहेब आंबेडकर
४) फडके य.वि. — आंबेडकरी चळवळ

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

**डॉ बी एस राजोळे**
सहाय्यक प्राध्यापक:वाणिज्य विभागशंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा

**प्रस्तावना:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधानाचे निर्माते, दलितांचे उद्धारक, समाजसुधारक, कायदेतज्ञच नव्हते, तर ते एक जगप्रसिद्ध अर्थतज्ञही होते. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन त्यांच्या संपूर्ण सामाजिक चिंतनाचा सार आहे. जी सामाजिक क्रांती ते करु पाहात होते. ते सर्व आर्थिक परिवर्तनच होते. त्यां च्या आर्थिक विचारां चा कें द्रबिंदू दलित, शोषित, पीडितां चा उद्धार व कल्याण हाच होता. ते ना पूंजीवादाचे समर्थक होते ना कट्टर समाजवादाचे. मध्यममार्गी होते. म्हणून ते 'सम्यक समायोजनाला' अधिक महत्त्व देत होते. त्यांनी न्यूनतम इच्छांवर आधारित जीवन उत्कृष्ट मानले. 'सम्यक आजिवीके' वर भर दिला. ते स्वतः आत्मसंयम, मितव्ययता आणि नियंत्रित इच्छांचे जीवन जगले. डॉ. आंबेडकर कायदेतज्ञ, इतिहासतज्ञ, राजनितिज्ञ, शिक्षणतज्ञ तसेच धर्म आणि समाजशास्त्राचे जाणकार असल्यामुळे त्यांनी अहिंसावादी राज्य व समाजवादाची संकल्पना प्रस्तुत केली, डॉ. आंबेडकरांचे आर्थिक प्रारूप आर्थिक, सामाजिक, भौतिक, धार्मिक, तंत्रज्ञान आणि मानवतावादी मूल्यांचे मिश्रण आहे. त्यांनी आर्थिक तथ्यांचे विश्लेषण अनुभवावर व वैज्ञानिक मापदंडाच्या आधारावर केले म्हणून बाबासाहेबांचे संपूर्ण आर्थिक विचार वैज्ञानिक होते.

**संशोधनाची उद्दिट्योः**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर संशोधन करीत असतांना खालील उद्दिष्ट्यो ठरविण्यात आली.

1.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारवकार्यजाणून घेणे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अर्थतज्ञ**

डॉ. आंबेडकरांनी भांडवलाशाही व समाजवादी अर्थव्यवस्थांचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यापैकी कोणतीही अर्थव्यवस्था भारताला पोषक नाही असे त्यांचे मत झाले. त्यांच्या मते, भांडवलाशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमतेला व शोषणाला भरपूर वाव आहे तर समाजवादीअर्थव्यवस्थेत व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपीहोऊन रक्तरंजित क्रांतीची शक्यता असते,म्हणून त्यांनी मध्यममार्ग म्हणून मिश्रअर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. म्हणून मिश्रअर्थव्यवस्थेचा पाया हा डॉ. आंबेडकरांच्याआर्थिक विचारांचा परिपाक होय असे म्हणावेलागेल. त्यांच्या आर्थिक विचारांमुळे भारताचेपहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुबरेच प्रभावित झालेले होते, म्हणनूच स्वतंत्र भारताचे आर्थिक धोरण ठरविताना त्यांनी डॉआंबेडकरांच्या विचारांना अधिक महत्त्व दिल`वर्तमानातील भारतीय अर्थव्यवस्था ज्यास्थितीत आहे त्या स्थितीतही बाबासाहेबांचेआर्थिक विचार प्रासंगिक वाटतात. त्यांचेविचार एक शताब्दी पुढे होते. त्यांच्याआर्थिक विचारांचे गांभीर्य आजच्या आर्थिकआणि सामाजिक आवश्यकतेनुसार आहे.त्यांच्या विचारांची चर्चा आज जगातलेअर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. ज्या विकासाचाविचार आज आम्ही करीत आहोत, त्याचाबाबासाहेबांनी स्वातंत्र्यापूर्वीच प्रारंभ केलाहोता.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचारः**

आधारभूत मानवतावादी नैतिकमूल्ये त्यांच्या आर्थिक विचारांना प्रभावित करतात.डॉ आंबेडकरांनी आपल्या आर्थिक तंत्रात व्यापार, बँकिंग, रुपया, कृषी, जातीगत अर्थनीती, औद्योगिकरण, मजुरी, श्रमिकांचे कल्याण, राज्यसमाजवाद, भूमीसुधार, राजस्व इ. वर आपले विचार व्यक्त केले. हे मांडताना त्यांनी धर्म, नैतिकता, संस्कृती, राजनीती, कायदा, सामाजिक व्यवहार सारख्या बाबींवरही पूर्ण लक्ष ठेवले. विकासाची अर्थनीती स्वातंत्र्योत्तर भारताचे विकासविषयक आर्थिक धोरण काय असावे याचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी 'स्टेट्स अॅन्ड मायनॉरिटीज' या ग्रंथात केले आहे. या संदर्भात त्यांनी गरीबी हटाव, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता यावर भर दिला. त्यांनी मर्यादित राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला. शेतजमीन आणि अवजड उद्योगधंद्यावर सामूदायिक मालकी असावी, उत्पादनाचे लोकशाही पद्धतीने भेदभाव न करता वाटप व्हावे अशी त्यांची भूमिका होती. राज्य संस्थेने योग्य पद्धतीने आर्थिक व्यवहारांचे नियोजन करावे की, ज्यायोगे खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील व संपत्तीचे समान वाटप होईल असे विचार मांडले.

**शेतीविषयी आर्थिक विचार :**

भारतातील लहान धारणक्षेत्रे ही भारतीय शेतीतील गंभीर समस्या असून लहान धारणक्षेत्रे विखुरलेली असल्याने ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे.शेतीहा भारतातील सर्वात मोठा व्यवसाय असून त्यावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या जास्त तर दुसरीकडे शेतीची उत्पादकता कमी आहे. या संदर्भात त्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले. पहिला प्रश्न म्हणजे धारणक्षेत्राचे विखंडन मूळातच का होते ? दुसरा, 'किफायतशीर धारणक्षेत्र' कसे ठरवयाचे ? आणि तिसरा, विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्राच्या समस्येवरील उपाय कोणता ? वारसाहक्क हे जमिनीच्या विभाजनाचे मूळ कारण नसून शेतीवर असणारा लोकसंख्येचा अतिरिक्त भार हेच मूळ कारण आहे. शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा निम्न असतो म्हणून लोक लहानलहान तुकडे करण्याचे पत्करत नसून उपजीविकेचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने त्यांना तसे करणे भाग पडते. दुसरा कोणता मार्ग असता तर त्यांनी हे तुकडे करणे सोडून दिले असते असे त्यांचे मत होते. या सर्व समस्यांवर उपाय म्हणजे 'औद्योगिकरण'. औद्योगिकरणामुळे शेती क्षेत्रातील बेकार श्रमिक बिगर शेतीक्षेत्रात सामावून घेतले जातील. उपजिविकेसाठी त्यांना इतरांवर अवलंबून रहावे लागणर नाही. हे श्रमिक स्वतः काम करून राष्ट्रीय उत्पन्नात भर घालतील व शेतजमिनीवरील भार कमी होईल, परिणामी विभाजन व विखंडन कमी होईल. अशारीतीने भारतीय शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी 'औद्योगिकरण' हा एकच प्रभावी व खात्रीशीर उपाय त्यांनी सांगितला.

**जमीन महसूलविषयी आर्थिक विचारः** उत्पन्नावर जमीन महसूल आकारणे अन्याय आहे असे आंबेडकरांचे मत होते. सर्वांकडून सारखा कर वसूल करणे योग्य नाही. काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे, म्हणूनच जमीन महसूल संहितेचे 107 वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तीकराच्या कक्षेत आणला पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले.

**सहकारी शेतीविषयी आर्थिक विचारः**

विखुरलेल्या व लहान धारण क्षेत्राच्या समस्येवर उपाय म्हणून त्यांना सहकारी शेती योग्य वाटत होती. एका विशिष्ट आकाराची सहकारी शेते अस्तित्वात आणल्यास छोटया शेतकऱ्यास विनाशापासून वंचित करता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकी हक्क कायम राहील. शेतकऱ्यास त्याच्या धारणक्षेत्राला लागून असलेल्या धारणक्षेत्रास जोडल्याशिवाय जमीन कसता येणार नाही. सहकारी शेत जसे मोठया आकारमानाचे असेल तसे ते एकसंघही असेल.

**सामुदायिक शेती विषयी आर्थिक विचारः**

कूळ कायदे व जमिनीच्या एकत्रीकरणाने भूमिहीनांचे प्रश्न सुटणार नाहीत. डॉ. आंबेडकरांच्या मते, पडीत जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचा प्रश्न सुटू शकेल. जमीनदारीचे उच्चाटन झाल्यानंतर शेतकऱ्याला जमीनीची वैयक्तिक मालकी न देता सरकारने जमीनीचे मालक व्हावे या दृष्टीने सामुदायिक शेतीवर त्यांनी भर दिला.

शेती हा 'शासकीय उद्योग' असावा असे आंबेडकरांचे मत होते. शासनाने सर्व जमीन ताब्यात घेऊन ज्यांची जमीन घेतली असेल त्यांना नुकसान भरपाई द्यावी नंतर गावातील जमिनीचे भाग करून ते ग्रामस्थांना विशिष्ट अटींवर कसण्यासाठी द्यावेत. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार असून शेतीतील उत्पादन वाढीसाठी यंत्रप्रधान शेती, विस्तृत शेते, सहकारी व सामुदायिक शेतीचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांच्या स्वतंत्र मजदूर पक्षाच्या जाहिरनाम्यातही या बाबींचा उल्लेख आढळतो.

**चलनविषयकविषयी आर्थिक विचारः**

1947 साली 'हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी ॲन्ड बँकिंग' यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर मूलगामी विचार मांडले आहेत. भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती हा वाद निर्माण झाला त्यावेळी दोन पर्याय उपलब्ध होते. पहिला पर्याय–सुवर्ण परिणाम, ज्यामध्ये सोन्याच्या नाण्यांचा वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो व दुसरा पर्याय–सुवर्ण विनियम परिमाण, ज्यामध्ये कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो आणि कागदी रूपये घेऊन ठरावीक दराने सोने देण्याची सरकारने हमी घेतलेली असते. प्रा. केन्स व इतर अर्थतज्ञांनी सुवर्ण विनिमय परिमाण लवचिक असल्याने व या व्यवस्थेत चलननिर्मिती ही देशातील सोन्याच्या साठयावर अवलंबून नसल्याने ही पद्धती भारतासाठी योग्य आहे, असे प्रतिपादन केले. परंतु डॉ. आंबेडकरांनी याला प्रखर विरोध केला. त्यांच्या मते, या व्यवस्थेत चलननिर्मिती लवचिक असल्यामुळे ती अनिर्बंध होऊ शकते. त्यातून भाववाढ निर्माण होऊन रूपयाची किंमत घसरू शकते. सुवर्ण विनिमय परिमाण असताना भारतात अशी भाववाढझाली याचे साधार विवेचन डॉ. आंबेडकरांनी दिले. त्यांना सुवर्ण परिमाण पद्धती हीच भारतासाठी योग्य असून त्यासाठी ऐतिहासिक पुरावे देऊन सुवर्ण परिमाण पद्धतीत भारतात किमती कशा स्थिर होत्या हे दाखवून दिले. चलननिर्मिती करणाऱ्या (रिझर्व्ह बँक) संस्थेच्या चलन निर्मितीवर परिणामकारक अंकुश असण्याची आवश्यकता आहे, असा युक्तिवाद 1926 मध्ये नेमलेल्या 'हिल्टन यंग कमिशन' पुढे साक्ष देतानाही त्यांनी केला. आंबेडकरांच्या चलनविषयक मतांचा विचार न करता भारत व इतरत्र केन्स यांच्या भूमिकेचा स्वीकार केला. परंतु आजची परिस्थिती पाहता त्यांची भूमिका निश्चितच योग्य होती असे म्हणावे लागेल. आज केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट वाढत असून रिझर्व्ह बँकेला पतपुरवठा वाढवावा लागतो. त्यामुळे चलन फुगवटा व त्या अनुषंगाने येणारी भाववाढीची समस्या याला तोंड द्यावे लागत आहे. चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश ठेवण्यासंबंधीची त्यांची भूमिका भविष्याचा वेध घेणारी होती यात शंका नाही.

**सार्वजनिक आय.व्यय विषयी आर्थिक विचारः**

'ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी' व दि इव्होल्यूशन्स ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या दोन्ही प्रबंधात त्यांचे सार्वजनिक आय.व्यय विषयक विचार आढळतात. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था यामध्ये सन 1792 ते 1858 मध्ये कसे बदल झाले व ते भारतीयांना कसे अन्यायकारक ठरले याविषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. ब्रिटिश शासन या ना त्या मार्गाने स्वतःचा फायदा करून घेत व त्याची झळ भारताला सोसावी लागे. जवळ.जवळ साठ वर्षांच्या कालखंडात भारतीय जनतेची प्रचंड आर्थिक पिळवणूक करण्यात आली. 1858 मध्ये इंडिया कंपनी बरखास्त झाल्यानंतर कर्जाचा बोझा दरिद्री भारतावर टाकून अन्याय केला आहे तसेच महसूलाचा विनियोग भारताशी संबंधित नसलेल्या बाबींवरही करण्यात येत आहे हे त्यांनी दाखवून दिले. दुसऱ्या प्रबंधातून ब्रिटिश केंद्रसरकार आणि त्या काळची घटक राज्ये यांच्यातील आर्थिक संबंधाविषयीचे विचार व्यक्त होतात. 1833 ते 1921 या प्रदीर्घ कालखंडात हे आर्थिक संबंध कसे विकसित होत गेले याविषयी त्यांनी सविस्तर विवेचन केले आहे.

**जल संपत्ती व विद्युत धोरण या विषयी डॉ. आंबेडकरांचे आर्थिक विचार :**

देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारे महत्वाचे घटक या अनुशंगाने जल संपत्ती व विद्युत धोरण या विषयी डॉ. आंबेडकरांचे विचार अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी जल संपत्तीचे नियोजन व विद्युत धोरण या संदर्भात महत्वाचे कार्यही केले आहे राष्ट्रीय दृष्टिकोनातून जल संपत्तीचे नियोजन करण्यासाठी 1945 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सेंट्रल वाटर कमिशनची स्थापना केली. त्यांच्या मते, "आपल्या देशातील नैसर्गिक संपत्तीचे नियोजन करुन त्या संपत्तीचा योग्य उपयोग केला तर देशाचा विकास होऊशकतो". मंत्री पदावर असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे वाटर रिर्सोसेस आणि इलेक्ट्रिक पावर या दोन कमिट्याांचा अतिरिक्त भार होता. या कमिट्यांचे डॉ. आंबेडकर प्रमुख होते. विद्युत विकासाच्या कार्यात देखिल डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य महत्वाचे आहेत. विद्युत बाबत राष्ट्रीय धोरण डॉ. आंबेडकरांनी तयार केले होते. विद्युत शक्तीच्या संदर्भात धोरण ठरविण्यासाठी कमेटी सप्टेंबर 1943 मध्ये नियुक्त करण्यात आली. यात विद्युत राष्ट्रीय मालकीची असावी, विद्युतीच्या विकासासाठी केंद्रीय संघटन निर्माण व्हावे असे महत्वाचे निर्णय विद्युत शक्तीच्या संदर्भात घेण्यात आले आणि ते राबविण्यात डॉ. आंबेडकरांची महत्वाची भूमिका होती.

**श्रमविभागणी विषयी आर्थिक विचारः**

हिंदू समाजव्यवस्थेतील चातुर्वर्ण्य पद्धती ही श्रम विभागणीच्या तत्त्वावर आधारलेली आहे. यावर टीका करताना त्यांनी ही श्रमविभागणी नसून श्रमिकांची विभागणी आहे व ती अमानवी आहे असे सांगितले. जगात इतरत्र कोठेही अशी श्रम विभागणी नाही. यामुळे भारताचा आर्थिक विकास व प्रगती खुंटली आहे. या व्यवस्थेने श्रमशक्ती व भांडवल यांची उपयुक्तता ज्या ठिकाणी जास्त आहे त्या ठिकाणी वापरले जात नाही हे स्पष्ट केले.

**महिला विकास विषयी आर्थिक विचारः**

डॉ. आंबेडकरांनी आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानाला महत्त्वपूर्ण मानले आहे. म्हणूनच त्यांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना स्वतंत्र अधिकारच मिळवून दिलेले आहेत. कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांवर आधारित नवीन समाजरचना निर्माण व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांचे असे मत होते की, देशातील सक्षम, बुद्धीमान, कौशल्यपूर्ण मानवसंपत्तीच्या निर्मितीत मातांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे स्पष्ट मत होते की, महिलांना आर्थिक स्वातंत्र्यापासून, आत्मनिर्णयाच्या अधिकारापासून वंचित ठेवले तर राष्ट्राच्या आर्थिक विकासाला मर्यादा पडतील म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी आर्थिक अधिकार, आर्थिक संरक्षण व मजुरी संबंधी कायद्यात तरतूदी केल्या आहेत. सद्यःस्थितीतील महिलांना जे व्यावसायिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत आहे, त्याची सशक्त आधारशीलाच डॉ. आंबेडकरांनी ठेवली आहे. यावरून असे लक्षात येते की डॉ. आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उद्धारक होते.

**निष्कर्ष :**

डॉ. आंबेडकरांची दृष्टी अतिशय सूक्ष्म होती. त्यांचा अभ्यास सखोल होता. सखोल अभ्यासामुळेच ते जगाच्या आर्थिक परिवर्तनाशी अवगत होते. भारतीय समाजात असलेली गरीबी व विषमता दूर करण्यासाठी त्यांनी ठोस उपाय सांगितले. शेती संदर्भातील विशेषतः छोटया धारणक्षेत्राच्या बाबतीत मांडलेले विचार आजच्या परिस्थितीत उपयुक्त ठरतात. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांच्या आधारे जर आपण धोरणे आखलीत तर निश्चितपणे ग्रामीण भागातील शोषितांना त्यांचा न्याय हक्क मिळेल. आजही भारताच्या राज्यघटनेत राज्य सरकार व केंद्रसरकार यांचे हितसंबंध ठरविण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोग नेमावा लागतो. डॉ. आंबेडकरांचे या संदर्भातील विचार पायाभूत मानावे लागतील. डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांमध्ये स्वार्थाला कोणतेही स्थान नव्हते. त्यांच्या जीवनाचा उद्देशच कमजोर वर्गाचा उद्धार करणे हा होता. त्यांच्या मते, विकासाच्या नैतिकतेचा मापदंड सामाजिक न्याय आहे. जोपर्यंत देशामध्ये बहुसंख्यांक लोकांना रोजगार व रोटी मिळणार नाही तोपर्यंत सामाजिक न्याय हा केवळ देखावा आहे. डॉ. आंबेडकरांच्या संपूर्ण विचारांमध्ये मानवतावादी सूत्रच सर्वत्र आढळते. त्यांनी खऱ्या स्वरूपात मानवतावादाच्या उपलब्धीसाठी श्रमाचे महत्त्व स्वीकारले आहे. ते मानवतावादी भावनांच्याप्रती समर्पित असे क्रांतीकारी अर्थतज्ञ होते.

**संदर्भ :**

1. प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, 'आर्थिक विचारांचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै 2009, पृ. क्र. 260.271.
2. प्रा. रायखेलकर, डॉ. दामाजी, 'आर्थिक विचारांचा इतिहास' विद्या बुक्स पब्लिशर, औरंगपुरा, औरंगाबाद, जून 2011, पृ. क्र. 305.311. 3. डॉ. वा. भा. पाटील, 'भारतीय राजकीय विचारवंत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर 1998, पृ. क्र. 196.197.
3. डॉ. जाधव नरेंद्र, डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. क्र. 361.376.
4. प्रा. टी. एन. गवळी, संपादक, बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक म.रा. मुंबई 2011.
5. सुर्या, डॉ. अनिल, 'प्राचीन.अर्वाचिन भारतीय स्त्री आणि हिंदू कोड बिल', सुगावा प्रकाशन, पुणे 2010.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले, शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार

**सहा प्रा. डॉ. माधव नरहरी कांबळे**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट जि. लातूर
Email. madhavkamble358.2012@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय देणाऱ्या महापुरुषाचा भारतीय समाजक्रांतीचे जनक म्हणून महात्मा फुले यांचा उल्लेख केला जातो सामान्यांचा असामान्य दृष्ट आणि करता राजा म्हणून राजश्री शाहू महाराज यांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल तर आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना स्थान द्यावे लागेल या तीन महापुरुषांनी धर्मभेद जातिभेद लिंगभेद वर्ग आणि वर्गमूळ नाकारून मानवी समतेची समतेचा पुरस्कार करणारी विचारसरणी भारतीयांना दिले आहे महात्मा फुले यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी शिक्षणासोबत मानवतावादाचा पुरस्कार केला तर राजश्री शाहू महाराजांनी शक्ती आणि सत्ता यांचा योग्य वापर करून अस्पृश्यता नष्ट करण्यासोबतच शिक्षण देण्याचा प्रयत्न केला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता हा गुन्हा ठरवून राज्यघटनेत अस्पृश्यांना कायद्याने संरक्षण व शिक्षण देऊन भारतात समता आणि बंधुता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो त्यामुळे या तिन्ही महापुरुषांचे सामाजिक धार्मिक राजकीय व शैक्षणिक कार्य अत्यंत मूलगामी असल्याचे स्पष्ट होते.

**संशोधनाचे उद्देश:-**

१) महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचाराचा सद्यस्थितीत स्वीकार करणे का गरजेचे आहे याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:-**

सदर संशोधनासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अंगीकार करण्यात आला असून महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचाराशी निगडीत दुय्यम स्रोतांचा उपयोग करून सदर संशोधन कार्य पुर्ण करण्यात आले आहे.

**भारतात शिक्षणाची सुरुवात :**

प्राचीन काळी भारतात सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार होता त्याकाळी जातीभेद, वर्णभेद, धर्मभेद अथवा लिंगभेद नव्हता परंतु बदलत्या वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेत होऊन शिक्षणाचा अधिकार केवळ ब्राह्मणवर्गापुरताच मर्यादित राहिला व इतर तिन्ही वर्गांना म्हणजेच क्षत्रिय, वैश्य व शुद्र यांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला त्यामुळे बहुजन वर्ग शिक्षणापासून कोसो दूर राहिलेला दिसून येतो. इ.स. 1818 साली पेशवाईचा अस्त होऊन ब्रिटिश कंपनी सरकारचा अमल भारतात चालू झाला. एल्फिन्स्टन या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भारतात पाश्चात्य शिक्षणाचा पाया घातला घातला खरा पण त्याची दृष्टी वरच्या वर्गात पाश्चात्य विद्येचा प्रसार व्हावा अशीच होती. त्यांना अस्पृश्यांच्या शिक्षणाबद्दल उत्कंठा अथवा रस नव्हता त्यामुळे अस्पृश्यांच्या शिक्षणाची सुरूवात होण्यास 1852 साल म्हणजेच महात्मा फुले यांचे युग उजाडावे लागले.

**महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य:**

तत्कालीन सामाजिक विषमतेचे सूक्ष्म अवलोकन व त्याची समीक्षा करून ज्याने या सामाजिक विषमतेविरुद्ध बंड पुकारून हजारो शूद्रातिशूद्रांना समतेच्या ध्वजाखाली आणले तसेच सामान्य जनतेच्या दुःखाला

आणि त्याला दैन्याला वाचा फोडली असा महापुरुष म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले हे होत. शूद्रातिशूद्रांच्या गुलामगिरीच्या मुळाशी अज्ञान हे कारण असून महात्मा फुले या शूद्रातिशूद्रांना या मानसिक गुलामगिरीतून मुक्त करू पहात होते. त्यांच्या ज्ञान जागृती केल्याशिवाय ही मानसिक गुलामगिरी नष्ट होणे शक्य नव्हते म्हणून महात्मा फुले यांनी शिक्षणास अनन्यसाधारण महत्त्व दिल्याचे दिसून येते. ते ज्ञानाबद्द्ल म्हणतात,

विद्येविना मती गेली |
मतीविना नीती गेली |
नीतीविना गती गेली |
गतीविना वित्त गेले |
वित्ताविना शूद्र खचले |
इतके अनर्थ एका अविद्येने केले |

वरील विचारावरून महात्मा फुले यांना शिक्षणाचे महत्त्व किती वाटत होते हे समजू शकते. ब्रिटिश शासनाच्या शैक्षणिक धोरणाबद्दल महात्मा फुले मुळीच समाधानी नव्हते कारण ब्रिटिश शिक्षणविषयक धोरणाच्या मुळाशी झिरपण्याचा सिद्धांत होता. हा शिक्षणविषयक झिरप सिद्धांत महात्मा फुले यांना मान्य नव्हता कारण या सिद्धांतामुळे केवळ ब्राम्हण वर्गाचे भले होणार असल्यामुळे त्यांनी तो सिंध्दात नाकारला. वरिष्ठ वर्गाची शिक्षणातील मक्तेदारी पुढे ब्रिटिशांनीही चालू ठेवल्यामुळे शिक्षण व नोकरीत या उच्च वर्गाची मक्तेदारी निर्माण होईल त्यासाठी महात्मा फुले यांनी प्राथमिक व उच्च शिक्षणाच्या धोरणात फेरबदल करण्याविषयीची मागणी हंटर कमिशन समोर मांडली. त्यांनी या हंटर कमिशन समोर बहुजनाच्या शिक्षणाविषयी ज्या सूचना केल्या त्या अत्यंत प्रगल्भ होत्या त्यामुळे महात्मा फुले यांचे शैक्षणिक चिंतन अत्यंत सखोल व मूलगामी स्वरूपाचे होते हे स्पष्ट होते.

प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले जावे ही मागणी करणारे ते पहिले भारतीय होते. प्रशिक्षित शिक्षकांच्या वेतनात वाढ करावी, कनिष्ठ वर्गातील शिक्षक तयार करावेत, खेड्यातील मुलांना शेतीचे आणि तांत्रिक शिक्षण द्यावे तसेच शिक्षणाने अंधश्रद्धा आणि दुराग्रह यातून विद्यार्थ्यांना मुक्त करावे अशा मौलिक सूचना त्यांनी केल्या आहेत. शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी नसून ते सर्वांना मोफत मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन ज्ञान व विचारांची वृध्दी व्हावी यासाठी महात्मा फुले यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान मौलिक स्वरूपाचे आहे. आज शिक्षणाचे खाजगीकरण करून परत एकदा बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित करणारी मनू व्यवस्था लादण्याचा प्रयत्न करणारी शासनव्यवस्था हाणून पाडणे हीच महात्मा फुले यांना खरी श्रद्धांजली ठरू शकेल.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य:**

' राजदंड हा शोभेसाठी आणि मिरवण्यासाठी नसून तो रयतेच्या सेवेसाठी असतो ' हे सूत्र ज्यांनी आयुष्यभर पाळले ते म्हणजे लोकराजा राजश्री शाहू महाराज होत. शाहू महाराज केवळ संस्थानिक म्हणुन मोठे ठरत नाहीत तर त्यांनी आपल्या संस्थानिकात केलेल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक कार्यामुळे मोठे ठरतात. त्यांनी कोल्हापूर संस्थानात कला, विद्या, व्यापार, उद्योग, शैक्षणिक व अनेकविध क्षेत्रातील गुणीजनांना प्रोत्साहन देऊन मोठे गेले आहे. केवळ दिखाऊ कार्यापेक्षा चिरस्थायी व कल्याणकारी कार्याला त्यांनी नेहमीच महत्त्व देऊन त्यांचा सन्मान करून आधार दिला आहे.

बहुजन समाज सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार केला. त्यासाठी त्यांनी कोल्हापूर संस्थानात जाती-धर्माच्या विद्यार्थ्यासाठी वेगवेगळे वसतिगृह स्थापन केले. एवढ्यावरच ते न थांबता त्यांनी इसवी सन 1902 मध्ये आपल्या राज्यातील सरकारी नोकरीत मागास वर्गासाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला होता. 1913 मध्ये आदेश

काढून खेड्यामध्ये चावडी, धर्मशाळा, मंदिरे  यामधून शाळा सुरू केल्या होत्या. 1917 मध्ये काढलेल्या जाहीरनाम्यानुसार प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले होते. शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि त्यांचा लाभ सर्व जातीच्या लोकांना मिळावा यावर महाराजांचा कटाक्ष होता. शाळा, महाविद्यालय, वसतिगृह, शिष्यवृत्या एवढेच करून महाराज थांबले नाहीत तर छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या शाळा-महाविद्यालयात उत्तमोउत्तम शिक्षकवर्ग जाणीवपूर्वक आणला. डॉ बाळकृष्ण यांच्या सारख्या शिक्षणतज्ञाची नेमणूक केली. याबाबत त्यांनी कधीही जातीपातीचा विचार केला नाही.

बाम्हणाची विद्या ही फक्त मराठा समाजाला नव्हे तर अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या सर्व समाजाला विद्येचा लाभ मिळावा त्यांची सामाजिक प्रतिष्ठा वाढावी आणि अस्पृश्यतेचा कलंक घालवावा यासाठी शाहू महाराजांनी जे प्रयत्न केले ते विशेष मोलाचे होते. छत्रपती शाहू महाराजांनी महार वतने व रामोशी यांना पाटलाकडे वर्दी देण्याची पद्धत बंद केली. कोणत्याही क्षेत्रातील ते गुणी लोक असतील त्यांना कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांना आश्रय दिला त्यांच्या जवळ असलेले कसब, गुण आणि कर्तव्य यांचा सन्मान केला त्यामुळे महाराजांना अशा गुणवान, कर्तृत्ववान व्यक्ती बद्दल अस्था होती हे स्पष्ट होते.  समाजातल्या रंजल्या-गांजल्या बद्दल कणव असतल्यामुळे समाजातील गुणी कर्तृत्ववान लोकांना महाराजांचा नेहमीच आधार होता. राजश्री शाहू महाराज हे केवळ वारसाहक्काने राजे नव्हते तर ते खरे लोककल्याणकारी लोकराजा होते.

**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार:**

' शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा ' हा सामजिक क्रांतीचा मूलमंत्र देणारे व शतकानुशतके मुलभूत आणि शैक्षणिक हक्कापासून वंचित असनाऱ्या अस्पृश्य समाजाला मानवतेचे हक्क देणारे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या चिंतनात शिक्षणाला प्राधान्य व आग्रक्रम दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षण हे जागतिक परिवर्तनाचे साधन आहे असे सांगितले आहे शिक्षणामुळे व्यक्तीची विचार करण्याची प्रवृत्ती प्रगल्भ होते व आपल्या हिताच्या दृष्टीने तो विचार करू लागतो. तसेच शिक्षणामुळे मनुष्य जागृत होतो व त्याला आपल्या हक्काची आणि अधिकाराची जाणीव होते त्यामुळे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ठाम भुमिका होती.  शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्यामुळे समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे शिक्षणानेच व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला मदत होते तसेच प्रज्ञा शील आणि करुणा या गुणांची पारख होते प्रत्येकाच्या अंगी जोपासना होण्यासाठी शिक्षणाची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या शैक्षणिक केल्याचे दिसून येते. शाळा म्हणजे उत्तम व कर्तव्यदक्ष नागरिक घडविणारे विद्या मंदिर असून त्यावर विद्या मंदिराचे पावित्र्य राखण्याची गरज त्यांना वाटत होती त्यासाठी शिक्षकांनी स्वतःचे चारित्र्य निष्कलंक व पवित्र ठेवले तरच विद्यार्थीही चारित्र्यसंपन्न गुणवंत करतील यात शंकाच नाही असे त्यांना वाटत होते शिक्षक हा समाज व देशाचा मार्गदर्शक व सारथी असल्याने शिक्षण क्षेत्र न्याय मूल्यावर आधारित असले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती.

प्राथमिक शिक्षण राष्ट्राच्या प्रगतीचा पाया असल्यामुळे प्राथमिक शिक्षण सक्तीचे करून समाजातील निरक्षरता घालवावी यासाठी त्यांनी आग्रह धरला होता. प्राथमिक शिक्षणाबरोबरच महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणाविषयीचे विचारही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहेत. विद्यापीठीय शिक्षण केवळ बेरोजगार तरुण काढण्याचा कारखाना न ठरता, बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल होण्याची गरज त्यांना वाटत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः उत्तम प्राध्यापक असल्यामुळे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन ही प्राध्यापकांची निष्ठाक्षेत्रे त्यांनी मानली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अस्पृश्य शिक्षणासोबतच स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून दिल्यामुळे आज सर्वच क्षेत्रात दलित, पददलित, वंचित स्त्री जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी अशा विविध मानाच्या पदावर काम करताना दिसत आहेत. बाबासाहेबांनी विचाराला कृतीची जोड देऊन नवनवीन शाळा, महाविद्यालय, वस्तीग्रह, वाचनालय, समाज केंद्र वर्ग सुरू करून बहुजन वर्गाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी चंदनाप्रमाणे ते स्वतः आयुष्यभर सजले आहेत. 8 जून 1945 रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून 20 जून 1946 रोजी सिद्धार्थ महाविद्यालयास सुरुवात केली. 1950 ला औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय सुरू केले याशिवाय मुंबई, महाड, पंढरपूर, नाशिक व नांदेड अशा विविध ठिकाणी संस्थेच्या शाखा स्थापन करून महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली करून दिली आहेत. यामुळे बहुजन समाजाच्या प्रगती व परिवर्तनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान मौलिक स्वरुपाचे आहे हे कोणीही नाकारू शकत नाही.

**सारांश:**

महात्मा फुले राजश्री शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याच्या काळात मांडलेले विचार अत्यंत मौलिक स्वरूपाचे असून आजच्या परिस्थितीतही ते तंतोतंत लागू पडतात. महात्मा फुले यांनी स्त्री व अस्पृश्यसाठी खुले केलेले शिक्षण खरंच आज शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे संपते की काय असा प्रश्न उभा टाकला आहे. शिक्षणाचे खाजगीकरण करून गरिबांना मिळणारे मोफत शिक्षण घाट चालला आहे अशी परिस्थिती देशात निर्माण होत आहे. राजश्री शाहू महाराजानी बहुजनांना शिक्षण देऊन प्रशासन व राजकारणात आणण्याचा जो प्रयत्न केला होता त्याच बहुजनांना जातीय दंगली, मोर्चे व पक्षीय राजकारण यात गुंतऊन त्यांना संपवण्याचा प्रयत्न केला जातो आहे. तेव्हा बहुजन समाजातील तरुणांनी जातीय दंगली, मोर्चे पक्षीय राजकारण यात न अडकता राजश्री शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार आत्मसात करुन प्रगति केली पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराची गरज देशाला तर आहेच परंतु जगालाही त्यांच्या विचारांची गरज पटली आहे त्यामुळे त्यांनी निर्माण केलेल्या संविधानाची अंमलबजावणी देशात 100% करून समाजातील सर्व घटकांना विकासाची समान संधी उपलब्ध करून देऊन वरील तिन्ही महापुरुषांना अपेक्षित असलेला समताधिष्ठित, सत्य व न्यायावर आधारलेला सशक्त आणि प्रजासत्ताक भारत निर्माण करून त्यांचे स्वप्न पूर्णत्वास नेऊ या.

**संदर्भ ग्रंथ सुची:**

1) अनिल शिंगारे, महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

2) बोराळकर कृ. वि., भारतीय राजकीय विचारवंत शशिकांत पिंपळापुरे विद्या बुक पब्लिकेशन औरंगाबाद

3) नागोराव कुंभार, सामाजिक कार्याच्या दिशा, प्रबोधन प्रकाशन, लातूर 2000

4) हरिभाऊ पगारे, महात्मा फुले, राजश्री शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैचारिक प्रवास, रघुवंशी प्रकाशन, पुणे 1975

5) आर. एस कांबळे, विचारशलाका उच्च शिक्षण विशेषांक, समाज विकास प्रतिष्ठान, 2007

6) व्ही. एन. स्वामी, महाराष्ट्रातील समाज सुधारक विद्याभारती प्रकाशन, लातूर 2007

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व कायदे

**महेश मुकुंद कुंभार**
इतिहास विभाग,संशाधक विद्यार्थी,छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब

बहुजन समाजाच्या सर्व दु:खाचे मुळ त्यांच्या अज्ञानात व अध्दश्रेध्दते आहे. आणि त्यावर शिक्षणा शिवाय दुसरा उपाय नाही. असे महात्मा फुले यांचे मत होते. म्हणून शुद्रातिशुद्रांसाठी त्यांनी शाळा सुरु केल्या. अस्पृश्य् मुलामुलींची शाळा, बालहत्या प्रतिबंधक गृह, सत्यशोधक समाजाची स्थापना या महात्मा फुले यांच्या मुलगामी स्वरुपाच्या चळवळीमुळे महाराष्ट्रातील समाज जागृत होण्यास फार मदत झाली. हजारो वर्षे धार्मिक अंधश्रध्दा व रुढीपंरपरेत खितपत पडलेल्या समाजात नवी चेतना निर्माण करण्याचे काम या चळवळीने केले. म्हणुन महात्मा ज्योतिराव फुले यांना महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीचे अग्रणी म्हणून मानाचे स्थान आहे. यानंतर महाराष्ट्रात राजर्षी छत्रपती शाहूच्या रुपाने एक नवीन नेतृत्व् सामाजिक चळवळीला मिळाले. राजर्षी छत्रपती शाहुच्या काळापर्यंत सामाजिक परिवर्तनाचे फक्त् विचार मांडण्यात आले होते. या विचारांना राजाश्रय नसल्याने फक्त् विचारांचीच पेरणी समाजात करता आली होती. महात्मा फुले सर्वाजनिक सत्यधर्म् सांगितला होता. पण राजसत्ता हातात नसल्याने इच्छा व तळमळ असुनही त्यांना तो प्रत्यक्ष आणता आला नाही. परंतु त्यांनी वैचारिक क्रांतीची बिजे मात्र पेरली होती. राजकीय इच्छाशक्ती झाली की कोणतेही परिवर्तन शक्य् असते. त्यानुसार राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांनी राजकीय शक्तीच्या माध्यमातुन जनतेच्या मानवी हक्कांचे संरक्षण करुन सामाजिक समता प्रस्थापित केली.

अस्पृश्यता नष्ट् करण्यासाठी राजर्षी शाहु महाराजांनी राजसतेचा उपयोग केला अस्पृश्यता निर्मुलनाच्या दृष्टीने राजर्षी शाहुंनी 6 सप्टेंबर 1919 रोजी एक जाहिरनाम मंजुर करुन तो 8 ऑक्टोंबर रोजी करवीर गॅझेटमध्ये प्रसिध्द् केला. त्या जाहिरनाम्यामध्ये संस्थानातील सर्व सार्वजनिक विहिरी, सरकारी व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा संस्थानांच्या इमारती, सरकारी वसतिगृहे , पाणवठे हे अस्पृश्यांना खुले करण्यात आले. या ठिकाणी कोणतेही अस्पृश्यता पाळु नये सर्वांना सामाजिक समतेने वागवावे जे ग्रामाधिकारी हया आज्ञेचा भंग करतील त्यांना हया गैरवर्तणुकी बद्दल जबाबादार धरण्यात येईल असे जाहिर केले.

शोषित, पिडित, दलित  व अस्पृश्यांची सेवा हीच मानव सेवा म्हणून अस्पृश्यांच्या मुक्तीचा विडा उचलेलेल्या राजर्षी शाहूंनी 27 जुलै 1918 रोजी अस्पश्यता मुक्तीचा पहिला आदेश काढला. त्यानुसार  अस्पृशयांवर गावकामगारावर अन्याय करणारी हजेरी पदध्दत् बंध केली. हजेरी पध्दतीमुळे बाहेर कितीही मजुरीचा दर असला तरी त्याला दुसरीकडे मजुरीला जात येते नव्हते. या हजेरी पध्दतीमुळे त्या व्यक्तीच्या वयक्तीक आयुष्याला काही महत्व् राहत नव्हते. म्हणून राजर्षीनी हजेरी पध्दत् बंद केली. हजेरी प्रथेप्रमाणे अस्पृयांवर व विशेषता महार जातीवर ‘वेठवरळा’ ही अमानुष पध्दत् लादली गेली होती. या पध्दतीनुसार पाटील व कुलकर्णी हे गाव कामगार सरकारी अधिकारी महारास अनेक प्रकारची कामे सांगुन  फुकटात  राबवुन घेत असत. एक प्रकारे हे महारकीचे वतन म्हणजे सामाजिक गुलामगिरीचे होते. इ. स. 1920 मध्ये माणगाव परिषेदेत भाषण करतांना महार वतन वेठवरळा पध्दत् बंद केली. महार वतन खालसा केल्याने गावचा महार गावच्या सक्तीच्या नोकरीतून मुक्त् होणार असल्याने व त्याच्या जागी रोखीने वेतन देऊन कामगार ठेवावा लागणार असल्याने खजिन्यावर त्याचा ताण पडणार हे उघड होते. सरकारी अधिकाऱ्यांनी महाराजांच्या निदर्शनास आणल्यावर त्याचा सल्ला धुडकावीत ते उदगारले, “माझा

खजिना या बाबतीत जरी रीता झाला तरी त्याची मला पर्वा नाही। पण माणसाला माणुसकीपासून वंचित करणारी ही रुढी मला मोडावयाची आहे. जे महार वतन खालसा करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला इ. स. 1918 मध्येच खालसा केले होते. त्यावेळी कुप्रसिध्दी असलेली आणखी एक पध्दत् म्हणजे वेठबिगार पध्दत् होती. या पध्दतीमुळे लोकांना जबरदस्तीने कामावर लावले जात होते. या पध्दतीच्या माध्यमातून फार मोठया प्रमाणावर शोषण होत होते. 3 मे 1920 च्या राजर्षी शाहु महाराजांच्या कोल्हापूर संस्थानाच्या अंतर्गत वेठबिार पध्दत् बंद करण्यात आली. भारत सरकारने वेठबिगार प्रतिबंधक कायदा इ.स. 1976 साली केला पण राजर्षी छत्रपती शाहु महाराजांनी हा कयदा 58 वर्षी  पूर्वी बंद केला होता. हे महाराष्ट्रातील भुषणावह  आहे. अशा प्रकार विविध मार्गाने राजर्षी शाहु महाराजांनी जातीप्रथा निर्मुलन  व अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य केले.

तत्कालीन जाती धिष्टीत समाज व्यवस्थेचा एक महात्वाचा निबंध म्हणजे जाती आधारित व्यवसाय बंदी होती. या निर्बधानुसार प्रत्येक जातीला रुढी परंपरेने जो व्यवसाय दिला होता तोच करायची सक्ती होती. म्हणजे महाराने महारकी, सुताराने सुतारकी, लोहाराने लोहारकी, कुंभाराने कुभारकीचीच कामे करायची त्यामुळे समाजात साचेबध्द पणा आला होता जातीचा सोडून इतर व्यवसाय करणे जणु गुन्हाच समजला जात होता. याला अलुतेदारी – बलुतेदारी पध्दत् म्हटले जात होते. 22 फेब्रुवारी 1918 मध्ये एक जाहिरनामा काढुन राजर्षी शाहु महाराजांनी ‘बलुतेदारी’ पध्दत् बंद केली. यानुसार कोणत्याही व्यक्तीला कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य् मिळाले. राजर्षी शाहु महाराजांचा हा नियम म्हणजे सामाजिक गुलामगिरीची समाप्ती होती. अशा प्रकारे राजर्षींनी जाती व्यवस्थेला तडा देऊन मागास जातीची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता केली. आपल्या समाजात परंपरेने मागासवर्गीय लोकांना बरेच व्यवसाय करण्याची बंदी घातली होती. त्यामुळे मागासवर्गीय लोकांचा आत्म् विशवास कमी झाला होता. म्हणून राजर्षी शाहु महाराजांनी मागासवर्गीय समाजातील सुशिक्षितांना वकिलीच्या सनदा देऊन त्यांना या प्रतिष्ठीत व्यवसायात प्रवेश दिला.

30 मे 1920 ला नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषदेच्या अध्यक्ष पदावरुन बोलताना शाहु महाराज म्हणतात, अशा वकिलीच्या सनदा देण्यात माझा हेतु एवढाच आहे की, जे धंदे अस्पृश्य् वर्गास रुढीने कायद्याने अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत ते त्यास मोकळे  करुन द्यावेत त्यांची स्थिती सुधारुन त्यांच्यात आपण इतर माणसाच्या बरोबरीने आहोत असा आत्मविश्वास  उत्पन्न् करावा  अशा प्रकारे राजर्षी शाहु महाराजांनी कृतीशील पध्दतीने समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न् केला. राजर्षी शाहु छत्रपतीच्या हाती राज्यकारभाराची सुत्रे येण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानातदरबार व खाजगी कारभार यामध्ये ब्राम्हणाचीच मिरासदारी बनली होती. “इ.स. 1894 मध्ये कोल्हापूर संस्थानाच्या सेवेमध्ये ब्राम्हण् अधिकाऱ्यांची संख्या 60 होती तर ब्राम्हणेत्तर् अधिकारी फक्त् 11 होते. आणि कोल्हापूरच्या महाराजांच्या खाजगी सेवेमध्ये ब्राम्हण् अधिकारी 46 होते तर ब्राम्हणेत्त्र अधिकारी फक्त् 7 होते.

**सारांश :-**

राजर्षी शाहू महाराजांनी समाजसुधारणेसाठी सर्व मार्गांचा वापर केला होता. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी वेगवेगळे कायदे करुन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, सुधारणा घडवून आणल्या.

**संदर्भ :-**

1) राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ, जयसिंगराव पवार

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य

**प्रा.डॉ.भास्कर मुरलीधर आहिरे**
मराठी विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले महामानव होते. बाबासाहेब हे अष्टपैलू व्यक्तिमत्व असणारे समाजवीर होते. परंतु समाज सुधारक, राजकीय विचारवंत,शैक्षणिक विद्वत्तेचा महामेरु, पत्रकार,अशा अनेक उपाध्या मिळविण्यामागे त्याचा खूप मोठा त्याग असतो. म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे जीवन असेच आहे. डॉ.बाबासाहेबांचे जीवन हे अतिशय खडतर परिस्थिती मध्ये गेले होते. थोडक्यात त्यांच्या जीवनाचा खडतर प्रवास पुढील प्रमाणे सांगता येईल.

हजारों वर्षापासून अस्पृश्य समाजाला अपमान,अवहेलना,दु:ख,वेदना,दारिद्रय, शोषण, पिळवणूक छळ सहन करावा लागत होता. हा समाज निमूट पणे अन्याय सहन करीत होता. कोणीही अन्यायाविरुध्द आवाज उठवित नव्हते. गुलामगिरी जणू आपला हक्कच आहे. या भावनेतून कोणीही बंड करीत नव्हते. तोंड असून बोलत नव्हते ओठ असून शब्द फुटत नव्हते. डोळे असून काहीच पाहू शकत नव्हते. कान असून ऐकू शकत नव्हते असे हे दु:ख कसे आणि कधी दूर होणार.कधी आपण स्वतंत्र होणार कधी आपण हक्काने जगणार कधी आपल्यात स्वाभिमान मिळणार अशा विवंचनेत हा समाज पुरता बुडाला होता.

असाच एक सोन्याचा दिवस उगवला अंधारात प्रकाश सापडला. १४ एप्रिल १८९१ या दिवशी भिमाबाईच्या पोटी पुत्र जन्मला ते बाळ म्हणजे भिवा होय.पुढे चालून हे हुशार बाळ महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर झाले आणि जगभरात किर्ती झाली. बाबासाहेबांनी आपल्य वाणीने, ज्ञानाने आणि कर्तृत्वाने मानव जातीला नवा प्रकाश दिला. त्यांचे दु:ख,अज्ञान,दैन्य, दूर केले त्यांचे मानवी हक्क आणि प्रतिष्ठा त्यांना मिळवून दिली. त्यांच्या वडिलांचे नाव रामजी होते. रामजी हे उद्योगी,महत्वाकांक्षी आणि शिस्तीने वागणारे गृहस्त होते. त्यांची आई भीमाबाई सहन शिल स्वभावाच्या होत्या. रामजी बाबा लष्करी शाळेत नोकरी करीत होते. ते सुभेदार पासून मेजरपदापर्यंत पोहचले.भिमाई आणि रामजी बाबांचे भीमा हे चौदावे बाळ होते. भीमराव हे शेंडेफळ होते. रामजी बाबा लष्करातून निवृत्त झाले तेव्हा आनंदा आणि भिमराव कोकणातील शाळेत जाउ लागले. भीमरावांची शाळेची सुरुवात येथूनच झाली. कुटूंब मोठे होते. तुटपुंजी पेन्शन कसाबसा प्रपंच चालत होता. पुढे त्यांनी कुटूंब साता-याला हलविले इथे मात्र त्यांच्यावर अतिशय दु:खाचा डोंगर कोसळला आजारपणामुळे भीमाबाई स्वर्गवासी झाल्या. नंतरच्या काळात सगळया भावडांचा सांभाळ आत्या मिराबाईने केला. मिराबाई हया धाडसी,कर्तव्यदक्ष आणि बोलक्या स्वभावाच्या होत्या. भीमराव मीरा आत्याचे लाडके होते. रामजी बाबा हे व्यासंगी स्वभावाचे असल्यामुळे शिक्षणाविषयी त्यांच्या मनात तळमळ होती त्यांना नेहमी वाटत होते आपल्या मुलांनी खूप शिकावे त्यांचे चारित्र चांगले घडावे. याची ते सतत काळजी घेत होते. ते मुलाकडून अभ्यास करुन घेत होते. भिमरावांची बुध्दी तरतरीत होती शरीर प्रकृती

ही चांगली होती त्यांना समाजातील अनिष्ट रुढीचे अनुभव येउ लागले. वरिष्ठ व कनिष्ठ हा भेदभाव त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला सार्वजनिक पाणवढयावर पाणी भरु न देणे,शाळेत सवर्ण मुलासोबत बसता येत नव्हते. गावाच्या वेशीबाहेर,अस्वच्छ ,रोगट वातावरणात छोटयाशा खोपटयात रहावे लागे.हे सगळे आघात भिमराव सहन करीत जगत होते आणि ह्या रुढी प्रथा,छळ, शोषण बंद झाले पाहिजे ह्या विचाराने त्यांचे मन पेटत होते आणि त्यांनी मोठे झाल्यावर हा अंधार दूर करण्याचे ठरविले.

डॉ.बाबासाहेब उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले तेथे त्यांनी उच्च शिक्षण घेतले तेथील माणुसकीची भावना जात,धर्म,पंथ,उच्च,कनिष्ठ,कोणताही भेद नव्हता त्यामुळे भारतात जावून आपल्याला ह्या अनिष्ठ चालीरिती विरुध्द लढा द्यावया त्यांनी ठरवून घेतले आणि लवकर ते परदेशातून भारतात आले आणि त्यांनी आपल्य कार्याला सुरुवात केली.डॉ.बाबासाहेबांनी सामाजिक चळवळीचे पहिले पाउल उचलले. “ बहिस्कृत हितकारीणी सभा “ या संस्थेची स्थापना केली. स्वाभिमान, स्वावलंबन, आणि स्वतःचा उध्दार स्वतः करा हा त्रिमंत्र बाबासाहेबांनी आपल्या बांधवापुढे ठेवला.

**महाडचा मुक्ती संग्राम :**

आपल्या बांधवांचा उध्दार करायचा असेल तर शिक्षण महत्वाचे आहे. शिक्षणा शिवाय त्यांची प्रगती होणार नाही. परंतु गरिबीमुळे शिक्षण घेता येत नाही. त्यांची राहण्याची,खाण्याची सोय नाही म्हणून त्यांनी वसतीगृहे सुरु केले. प्रौढ आणि तरुणामध्ये सुधारणा व्हावी म्हणून त्यांनी रात्रीचे प्रौढ वर्ग सुरु केले.बाबासाहेब खेडयापाडयात जावून दलित समाजाचा स्वाभिमान जागवू लागले. यातून डॉ.बाबासाहेबांनी महाड येथील पाण्याचा सत्याग्रह करायचा ठरविले आणि ते सत्याग्रहा कडे पाउल उचलू लागले. महाड येथे हजारों कार्यकर्ते,महिला,वृध्द जमले. डॉ.बाबासहेब आंबेडकरांनी दलितांना भाषणातून हक्काची जाणीव करुन दिली. तळयातील ओंजळभर पाणी बाबासाहेबांनी भरले.भारताच्या इतिहासातील दलित बांधवासाठी हा क्षण मंगल क्षण होता. भारतात नवीन युग सुरु झाले. ह्या घटनेने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा सुगंध सर्वत्र पसरु लागला. त्यांचे अनुयायी त्यांना आदराने बाबासाहेब म्हणू लागले.

**शिवजयंती उत्सव :**

छत्रपती शिवजयंती उत्सवात डॉ.बाबासाहेबांनी भाषण केले महाराजांचे गुणगान गाईले महाराजांचे चरित्र त्यांचे कार्य आणि धोरण यांचा गौरव केला. महाराजांनी
कधी भेदभाव केला नाही. आता तरी भेदभाव दुर करावा असे त्यांनी हिंदू समाजाला
आवाहन केले.

**गिरणी कामगार संप :**

मुंबई मध्ये याच काळात गिरणी कामगारांच संप सुरु होता. ह्या संपामुळे दलित कामगारांचे खूप हाल होत होते बाबासाहेबांनी या संपात काळजी पूर्वक लक्ष घातले आणि कामगारांना सल्ला दिला ते म्हणाले “ आज आपल्या मनात राष्ट्रीय भावन निर्माण होण्याची गरज आहे. आपण प्रथम भारतीय आहोत असेच नेहमी मानले पाहिजे. राष्ट्भिमान वाढीस लागावा हा विचार त्यांनी मांडला यावर विरोधकांनी त्यांचे विचार ऐकून राष्ट्प्रेम पाहून त्यांच्यावर स्तुती सुमने उधळली. तेव्हा पासून बाबासाहेब राजकीय विचावंत,राष्ट् घडविणारे सच्चे मार्गदर्शक अशी त्यांना मान्यता मिळाली.

**शिक्षण प्रसार :**

दलित जनतेत शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना केली आणि ही संस्था दलितांच्या प्रगतीचे साधन बनली या संस्थेने सर्वांगिंण शिक्षण दिले. सरकारी मदत आणि दानशुर व्यक्तिकडून मिळालेली मदत यावर या छात्रालयाचा खर्च चालू होता.समाज शिकला तर पुढे जाईल म्हणून बाबासाहेबांनी दलितांच्या शैक्षणिक प्रगती बरोबर राजकीय हक्क मिळवून दिले ते अनेक भाषणातून दलितांना उपदेष देत होते ते म्हणत " माझा बांधवांनो तुम्ही आपली गुलामगिरी नष्ट करा अपमान जनक जीवन जगणे नामर्दपणाचे आहे छळ सोसा,त्रास सहन करा पण ही दृष्ट रुढीची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी छातीचा कोट करुन उभे रहा " यातून त्यांनी दलित,कामगार,शेतकरी,विद्यार्थी यांच्या प्रश्नांना वाचा फोडली.

**नाशिकचा मंदीर प्रवेश :**

अस्पृश्य समाजाला पाण्याला स्पर्श करण्याचा अधिकार नव्हता तसेच त्यांना मंदीरात जावून देव दर्शन करण्याचा अधिकार नव्हता. म्हणून बांबासाहेबांनी दलित समाजाला मंदीर प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदीराचा दरवाचा ठोठावला.नाशिक हे हिंदू धर्माचे पावन क्षेत्र होते. हजारों दलितांनी मंदीर प्रवेशासाठी सत्याग्रह केला दगड,गोटयांचा मारा सहन केला परंतु मंदीर प्रवेश करुन दलितांना मंदीर प्रवेशाचा हक्क मिळवून दिला. अशा अनेक कार्यातून बाबासाहेबांनी आपल्या समाजाला न्याय मिळवून दिला आहे त्याच बरोबर बाबासाहेबांनी आपल्या बांधवांना नवा प्रगतीचा,प्रकाशाचा,समतेचा आणि माणुसकीचा मार्ग दाखविला.चळवळी,उठाव,मोर्चे,सत्याग्रह, अशा ह्या सततच्या दगदगीमुळे बाबासाहेबांची तब्येत ढासळली होती अथक परिश्रमामुळे त्यांची प्रकृती खूपच खालावली उपचार चालू होते परंतु गुण येत नव्हता अखेर ६ डिसेंबर १९५६ या दिवशी या महामानवाने जगाचा निरोप घेतला. महामानवाचे महानिर्वाण झाले. माणुसकीच्या हक्कासाठी आयुष्यभर लढलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चिरंतन स्मृती आजही भारतीयांच्या मनात कायम आहेत , कायम राहतील अशा महामानवाच्या स्मृतीला आमचे शतशरु अभिवादन.

**संदर्भ सूची :**

1. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर : डॉ.प्रशांत गेडाम
2. माझी आत्मकथा अर्थात महामानवाची गौरव गाथा - संपादक-ज.गो.संत
3. डॉ.आंबेडकरांचे अष्टपैलू व्यक्तिदर्शन - धनंय कीर
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : एक समाजशास्त्रीय विश्लेषण डॉ.विजया खंडाळे - इंगोले
5. जती संस्थेचे उच्चटन : डॉ.बी.आर. आंबेडकर

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# निवडक दलित कवियित्रींच्या कवितांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**ललिता मानसिंग गोपाळ**
संशोधक, मराठी भाषा व वाङ्मय विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
Email Id : lalitagopal1@gmail.com

**प्रस्तावना:**

१९६० नंतर मराठी साहित्याच्या प्रवाहात एक अनोखा वेदनादायी प्रवाह सामील झाला, ज्याला आपण दलित साहित्य प्रवाह म्हणून ओळखतो. दलित साहित्याचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून, त्यांनी गुलामगिरीमध्ये खितपत पडलेल्या समाजसमूहाला त्यांच्या विद्वत्तेच्या प्रभावाने स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. पशुवत जीवन जगणाऱ्या या समाजाची तत्कालीन उच्चवर्णीय समाजाकडून कायम उपेक्षाच होत होती. गुलामगिरीच्या साखळदंडात तो बांधला गेलेला होता. माणूस म्हणून त्याचं अस्तित्व तत्कालीन समाजव्यवस्थेने नाकारले होते. त्यामुळे त्यांच्यासोबतचा व्यवहार हा अत्यंत पाशवी स्वरूपाचा होता. अशा अज्ञान, दारिद्र्य व गुलामगिरीच्या खाईत पडलेल्या समाजाचे आत्मभान जागविण्याचे क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. परिणामी आत्मभान जागृत झालेला माणूस या विषमतेविरुद्ध बंड पुकारु लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावाने हा समाज परंपरेने लादलेले अन्याय, अत्याचार व गुलामगिरीविरुद्ध संघर्ष करू लागला. माणूस म्हणून त्याचं अस्तित्व जेव्हा नाकारलं जातं व समाजाकडून त्याचा जेव्हा अतोनात छळ होतो, तेव्हा अशा अवस्थेत तो बाबासाहेबांच्या प्रेरणेनेमधून त्याच्या व्यथा, वेदनांची वाट साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करतो, तेव्हा हा साहित्यप्रवाह दलित साहित्य म्हणून नावारूपाला आलेला आहे. या साहित्यप्रवाहामुळे मराठी साहित्य अधिकच समृद्ध झालेले आहे व आजही ते समृद्ध दिशेनेच वाटचाल करत आहे. दलित साहित्यात लेखक वेदना, विद्रोह व नकार या तीन मूल्यांना महत्त्व देतो. ही तीन मूल्ये दलित साहित्याची तत्त्वत्रयीच मानली पाहिजे. दलित साहित्य हे प्रामुख्याने दलितांच्या लढ्यांमधून, आंबेडकरी चळवळीतून उदयाला आलेले आहे. दलित साहित्याच्या वेदनादायी विश्वाची मांडणी अनेक लेखकांनी, कवींनी त्यांच्या साहित्यातून केलेली आहे. त्याचप्रमाणे स्त्री लेखिकांनी व कवियित्रींनीही दलित साहित्य लेखनात पुढाकार घेतलेला आहे.

## निवडक दलित कवियित्रींच्या कवितांमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर

दलित साहित्यामध्ये कवितेचा प्रभाव हा जनसामान्यांवर अधिक होत गेला. त्यामुळे दलित कवितेचे स्वरूप हे प्रचलित मराठी कवितेपेक्षा भिन्न स्वरूपाचे आहे. ही कविता मानवी जीवनातील गंभीर विषयाला हात घालते. समतेचे मूल्य समाजात रुजावे म्हणून या कवितांमधून दलित मनाचा आक्रोश व्यक्त होतो. अशा या दलित कवितेची नेमकी भूमिका काय? दलित कविता का निर्माण झाली? दलित कवितेच्या निर्मितीचा हेतू काय? यासंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, “दलित कवितेचे नाते परिवर्तनवादी तत्त्वज्ञानाशी आहे. हे तत्वज्ञान फुले-आंबेडकरांच्या विचारातून आणि मुक्तीलढ्यातून सिद्ध झाले आहे. शोषणाधिष्ठित समाजव्यवस्था उखडून टाकण्यासाठी दलित-शोषित समाजाने जागृत होऊन आणि संघटित होऊन आपल्या न्याय अस्तित्त्वासाठी संघर्ष चालू ठेवला पाहिजे, याची जाणीव डॉ. आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाने दिली. सांस्कृतिक वर्चस्व गाजवणाऱ्या वर्गाचे साम्राज्य झुगारून देण्यासाठी दलित कवितेने संघर्षाची, विद्रोहाची भूमिका घेतली.”[१] यावरून दलित आंबेडकरी तत्त्वज्ञान आणि दलित कविता यांच्यात किती घनिष्ठ नाते आहे, याचा प्रत्यय येतो.

दलित कविता मानवी भाव-कोमलतेपेक्षाही मानवी जीवनातील विदारक सत्याची, वास्तविकतेची जाणीव घडवून आणत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने हेच विदारक वास्तव शब्दबद्ध करण्याचे सामर्थ्य काही कवियित्रींच्या लेखणीला बळकट करते. त्यातून त्यांची कविता अवतरत असली, तरी ती मानवी जीवनातील दाहक अनुभवांना उजेडात आणते. प्रज्ञा लोखंडे, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, मीना गजभिये, उमा गवई, संध्या रंगारी, सुषमा अंधारे, विमलताई झाल्टे यांच्या कवितांनीही दलित साहित्याला अधिक बळकट केले आहे.

प्रज्ञा लोखंडे या साहित्यिक वारसा असणाऱ्या दलित कवितेच्या तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवियित्री म्हणून ओळखल्या जातात. त्या त्यांच्या या 'अंत:स्थ' या कवितासंग्रहात डॉ. आंबेडकर या कवितेत म्हणतात की,

"चैत्यभूमितल्या ओसंडत्या गर्दीत,
मेणबत्तीतून सांडणाऱ्या लख्ख् उजेडात,
माझं बोट बापाच्या मुठीत बंद होतं,
मला आठवतं, बाबासाहेब,
तेव्हापासूनच
तुझं नाव मी माझ्या काळजावर कोरलं होतं."[२]

डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या अमृतवाणीने चैत्यभूमीतल्या लाखो दलितांचा उद्धार केला. त्यांना नवचेतना दिली, जगण्याचं बळ दिलं, त्यांच्यासाठी स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला. त्यामुळे लाखो दलितांनी बाबासाहेबांच्या त्या वाणीला कृतीत आणलं. अशाच या अवस्थेत कवियित्री तिलाही बाबासाहेबांच्या स्वाधीन करते. कारण याच एका महामानवाने मानवी जीवनाचा उध्दार केला आहे, असे तिला वाटते. त्यामुळे तिने या महामानवाचे नाव तिच्या काळजावर कोरले आहे, असे ती म्हणते.

हिरा बनसोडे यांच्या 'फिर्याद' या काव्यसंग्रहातील कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी म्हणतात की,
" महापुरुष,

ज्यांनी तुझ्या मार्गात काटे पेरले,
आज ते तुला फुलं वाहतात,
नि तुझा जय-जयकार करतात,
तेव्हा मात्र कमाल झाली..."[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनदेखील संघर्षमय होते. त्यांच्या मार्गामध्ये, कार्यामध्ये ज्या-ज्या लोकांनी अडथळे निर्माण केले, ते सुद्धा आज बाबासाहेबांचा जयजयकार करत आहेत. थोडक्यात बाबासाहेबांच्या कार्याला ज्यांनी कठोर विरोध केला, ते विरोधक सुद्धा बाबासाहेबांच्या चरणी नतमस्तक झालेले आहेत, हे सामर्थ्य केवळ बाबासाहेबांसारख्या महापुरूषामध्येच आहे.

पुढे संध्या रंगारी त्यांच्या 'आघात' या कविता संग्रहात भीम जन्मापूर्वीची स्त्री जीवनाची व्यथा मांडताना म्हणतात की,

"बाबा
तुम्ही जन्मास येण्यापूर्वी
आम्ही माणूस बनण्यासाठी,
जेव्हा-जेव्हा प्रयत्न केलेत,
तेव्हा तेव्हा आमच्यावर,

इथल्या बेईमान संस्कृतीने केला हल्ला"[४]

दलित म्हणून आम्हाला वाळीत टाकले गेले होते, तेव्हा आमच्यामधील माणूसपण ही नाकारलं गेलं होतं, आमच्याकडे केवळ शूद्र व खालच्या जातीचे म्हणून पाहिले जात होते. येथील समाज संस्कृती आमची विटंबनाच करत होती. आम्ही माणूस असतानाही आमचा विटाळ पाळला जात होता.

विमलताई झाल्टे त्यांच्या 'माणुसकी' या कवितासंग्रहात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना म्हणतात की, "माणुसकीचा लढा,

भीमरायाने लढविला,
सनातन्यांना ठोकरून,
तयावर विजय मिळविला,
इतिहास हो घडविला,
समाज हा जागविला,
भीमा महाडाचा इतिहास,
साऱ्या विश्वात हा गाजला."[५]

माणसाला माणूस म्हणून वागविण्यासाठी मानवमुक्तीचा अखंड लढा देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कार्याने जो इतिहास घडविला तो अनमोल आहे. महाडच्या तळयाचे पाणी सर्वांसाठी खुले व्हावे व अस्पृश्यांनाही या पाण्याचा वापर करता यावा, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या सत्याग्रह केला होता. तो सत्याग्रहसुद्धा एक ऐतिहासिक व अविस्मरणीय अशाच स्वरूपाचा सत्याग्रह आहे, असे विमलताई झाल्टे यांच्या कवितेमधून व्यक्त करतात.

डॉ. बाबासाहेबांनी दलितांविषयी असणाऱ्या तळमळीने लाखो दलितांचा उद्धार केला. तत्कालीन विषमतेला छेद दिला व क्रांतीचा झेंडा रोवला. यासंदर्भात डॉ. ज्योती लांजेवार यांच्या 'शब्द निळे आभाळ' या कवितासंग्रहात म्हणतात की,

"बाबासाहेब....
क्रूर सनातनी संस्कृतीला,
काळया कठीण कातळाला,
तू दिलीस धडक,
आयुष्य हरवून बसलेल्यांना,
सुखाची झुळुक,
क्रांतीचा देऊनी वसा,
हताश झालेल्यांना दिलासा."[६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या सनातनी संस्कृतीला विरोध केला, त्या विरुद्ध बंड पुकारले, माणसाचं माणूसपण गमावून बसलेल्या इथल्या अन्यायग्रस्त, पीडित, शोषित बनलेल्या समूहाला बाबासाहेबांनी लढण्याचे बळ दिले. आमच्यामधील स्वाभिमान जागा केला व क्रांतीचा वसा घेऊन हताश झालेल्या मनाला दिलासाही दिला. या भावगर्भ शब्दांत ज्योती लांजेवार बाबासाहेबांची थोरवी गातात.

पुढे बाबासाहेबांची भूमिका केवळ दलित समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारतासाठी किती महत्त्वाची ठरली, याविषयी डॉ. ज्योती लांजेवार म्हणतात की,

"अरे या भारताला...

खरी एकात्मता, तर तूच ती शिकवली,
इथल्या आभाळाला... तर
तूच हवेत कवेत घेतलेस,
या मातीवर तुझे अनंत उपकार,
म्हणून आम्ही,
तुझाच करतो जयजयकार करतो."७

भारत हा बहुभाषिक, बहुसांस्कृतिक देश आहे. भारतात जातिव्यवस्थेला महत्त्वाचे स्थान आहे, म्हणून या जातिव्यवस्थेत उच्च-नीचतेची बंधने पाळणाऱ्यांची संख्याही भरमसाठ होती. अशा अवस्थेत या विभागलेल्या समाज समूहाला एकात्मतेच्या माळेत गुंफले ते केवळ बाबासाहेबांनीच. त्यांच्या सामर्थ्यामुळे लाखो दलितांना गुलामगिरीतून मुक्त केले, त्यांना माणूस म्हणून जगण्याचे व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य दिले. त्यामुळे जो समाजसमूह अन्याय, अत्याचारास सामोरे गेलेला आहे, म्हणून त्या-त्या समाजसमुहावर बाबासाहेबांचे अनंत उपकार आहेत, असं कवियित्री याठिकाणी सांगते.

डॉ. बाबासाहेबांचे अस्तित्व मानवी जीवनामध्ये किती मोलाचे आहे? या विषयी उषा हिंगोलेकर त्यांच्या 'मुद्रालेख या कवितासंग्रहात म्हणतात की,

"हे युगंधर तू करून दिलीस,
जाणीव गुलामगिरीची,
म्हणून नाकारतोय अंधारवास."८

बाबासाहेबांनी गुलामाला तो गुलाम असल्याची जाणीव करून दिली, त्यांचा स्वाभिमान जागवला, त्याचं माणूस म्हणून असणाऱ्या अस्तित्वास महत्व दिलं. त्यामुळे इथल्या सनातनींविरुद्ध, उच्च व भ्रष्ट समाजसमूहाचा अंधारवास नाकारण्याचं बळ आमच्यात आलं, असं त्या मार्मिक पद्धतीने सांगतात. उषा अंभोरे त्यांच्या 'हुंकार वेदनेचे' या कवितासंग्रहामधील कवितेत डॉ. बाबासाहेब आंबेडकराविषयी म्हणतात की,

"गावाकुसाबाहेर वस्ती अंधाराची,
तुझ्या जन्माने चाहूल लागली प्रकाशाची,
वस्तीवर उगवला प्रकाशमान तारा,
अढळपदी जाऊन दिला आम्हा निवारा."९

गावकुसाबाहेर एका भयान अज्ञानाच्या, अन्यायाच्या, गुलामगिरीच्या शोषणाच्या अंधारात असणाऱ्या दलित समूहाला भीम जन्मामुळे स्वातंत्र्याची, मानवमुक्तीची प्रकाशज्योत मिळाली. कारण अशाच एका सामान्य वस्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या सूर्याचा जन्म झाला. त्यांनी त्यांच्या प्रकाशाने हजारो वर्षांपासून कंठत बसलेल्या समाजालाही प्रकाश दिला.

**सारांश**

जरी स्त्रीला समाजव्यवस्थेकडून हीनवले गेले, तरी तिला जातीव्यवस्थेने पछाडलेल्या समाजाने तिचा अमानुष पद्धतीने छळ केला. त्यामुळे तिच्या जीवनात दुःखाचा डोंगर तयार झालेला होता. समाजातील दुय्यम स्वरूपाच्या स्थानाने तिचा श्वास गुदमरत होता. स्त्रीला घाणेरडी व निकृष्ट प्रतीची कामे करावी लागत. तिची समाजात होणारी विटंबना ही संपता संपत नव्हती. सनातन्यांकडून दलित स्त्रीवर, तिच्या कुटुंबावर अन्याय, अत्याचार होतंच होते. एकीकडे भुकेचा प्रश्न संपलेला नव्हता, तर दुसरीकडे दलिताच अमान्य केलेलं अस्तित्व यामुळे हा समाज समूह कचाट्यात सापडलेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने, तत्त्वज्ञानाने हा समाज जेव्हा

न्हावून निघाला, तेव्हा त्याचं आत्मभान जागे झाले व त्यातून अवतरल्या दलित कविता. या दलित कवितेची भाषा अलंकारिक नाही, तर ती माणसाच्या अंतर्मनाची भाषा आहे. या भाषांमधून दलितांच्या वाट्याला आलेले भोग व पद्दलित म्हणून त्यांचं जगणं, वेशीबाहेर जगण, त्यांचं शोषण, त्यांचे दुःख, त्यांची घुसमट, त्यांच्या व्यथा, वेदनांची वाट मोकळी झाली. स्त्रियांवर होणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक अन्यायाविरुद्ध निषेध त्यांच्या कवितांमधून व्यक्त होतो. स्त्री जीवनातील विदारक वास्तवता हा जरी तिच्या कवितेचा विषय असला, तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे तिच्या कवितेचा भागच झालेला आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**

१. फडके भालचंद्र, डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, अंजीरा कमर्शियल आर्ट प्रिंटर्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती - जून 1989, पृ. क्र. 81.

२. लोखंडे प्रज्ञा, 'अंत:स्थ', मासन्मान प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती -1993, पृष्ठ क्रमांक – 28.

३. बनसोडे हिरा, 'फिर्याद', समाज प्रबोधन संस्था प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती -1984, पृष्ठ क्रमांक – 8.

४. रंगारी संध्या, 'आघात', शब्द प्रकाशन, नांदेड, प्रथम आवृत्ती – 1992, पृष्ठ क्रमांक- 59.

५. झाल्टे विमलताई, 'माणुसकी', पृष्ठ क्रमांक – 5.

६. लांजेवार ज्योती, 'शब्द निळे आभाळ', संकल्प प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती -1992, पृष्ठ क्रमांक १८.

७. तत्रैव - पृष्ठ क्रमांक – 33.

८. हिंगोलेकर उषा, 'मुद्रालेख', सुविद्य प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती -2007, पृष्ठ क्रमांक – 14.

९. अंभोरे उषा, 'हुंकार वेदनेचे', अनिकेत प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती - 1998 पृष्ठ क्रमांक - ४०.

# राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य

**प्रा. डॉ. आवारे चंद्रसेन सावळाराम**
मराठी विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता. जि. बीड

महाराष्ट्र हे कृषी प्रधान राज्य आहे. सुपीक जमिन, अनेक नद्यांमुळे महाराष्ट्र राज्य शेतीबाबत सुजलाम–सुफलाम झाले आहे. त्याच बरोबर महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची, समाज सुधारक व विचारवंताची भूमी आहे. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, शरद पवार आदी राज्यकर्ते, समाजसुधारक व विचारवंत या भूमीने भारत देशाला दिले आहेत. महाराष्ट्रात बहुजन समाज बहुसंख्येने राहत असणारा, परंतू अतिशय वाईट अवस्था प्राप्त झालेल्या शेतकरी वर्गाविषयी या सर्व विचारवंताना चिंता वाटत होती. शेती आणि शेतीवर उपजिविका करणारा शेतकरी वर्ग त्यांच्या अस्मियतेचा विषय होता. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून येवून त्यांनाही सन्मानाने जगता यायवे, यासाठी वरील सर्व समाज सुधारकांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केलेले दिसून येतात. राज्यपदाचा वापर जनकल्याणासाठी व सर्वसामान्य गोर–गरीब जनतेसाठी करावयाचा असतो. अशा प्रकारचा चांगला आदर्श राजर्षी शाहू महाराजांनी घालून दिला आहे. राजर्षी शाहूंनी राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक अशा सर्वच आघाड्यावर पुरोगामी धोरणे राबविलेली पहावयास मिळतात. कामगार, कष्टकरी, शेतकरी, शुद्रातीशूद्र, स्त्री हा राजर्षी शाहूंच्या चिंतनाचा विषय होता. या सर्वच पिडीत घटकांच्या उध्दारासाठी त्यांनी सतत प्रयत्न केलेले दिसून येतात.

छत्रपती शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानांचे प्रमुख मानले जात होते. शाहू महाराजांचा जन्म कागल येथील घाटगे घराण्यामध्ये 26 जुलै 1874 रोजी झाला. शाहू महाराजांची कारकिर्द अतिशय चांगली आणि उल्लेखनीय स्वरूपाची राहीलेली आहे. कोल्हापूर संस्थानचे चौथे राजे शिवाजी यांचा अहमदनगर येथे इंग्रजांच्या कैदेत असतांना मृत्यू झाला. त्यांना औरसपुत्र नसल्याने त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी कागद येथील घाटगे घराण्यातील जयसिंगराव घाटणे यांचे थोरले अपत्य यशवंततराव यास 17 मार्च 1884 रोजी दत्तक घेण्यात आले. 2 एप्रिल 1894 रोजी शाहु महाराजांनी कोल्हापूर राज्याची अधिकार सुत्रे आपल्या हातात घेतली. आपल्या सत्तेचा वापर त्यांनी लोक कल्याणासाठी केला. याचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात अनेकविध सुधारणा घडून आल्या. यामध्ये सर्वात महत्वाची कामगिरी म्हणजे महात्मा ज्योतीबा फुले यांच्या नंतर निष्प्राण होत चाललेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीला त्यांनी नवसंजीवनी देऊन तिच्यात नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीचे ते मार्गदर्शक बनले. समाजातील सामाजिक विषमता दूर करून बहूजन समाजातील लोकांना न्याय मिळवून देणे हे ब्राम्हणेत्तर चळवळीचे उद्दीष्टे होते. शाहू महाराजांच्या प्रेरणेने 1911 मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. एवढेच नव्हे तर त्यांच्याच प्रयत्नांने 1918 मध्ये कोल्हापूर येथे आर्य समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. शाहू महाराजांच्या कार्याविषयी बोलावयाचे झाले तर बहूजन समाजातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी त्यांच्या राहण्याची सोय व्हावी म्हणून वस्तीगृह काढले. त्याच बरोबर गरजूवंत मुलांना शिष्यवृत्ती देण्याचे धोरण त्यांनी आखले. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. यासाठी त्यांनी मोफत शिक्षण देण्याचा कायदा केला. सामाजिक विषमता व अन्यायाविरूध्द त्यांनी फार मोठा संघर्ष केला. समाजातील जाती–भेद, अस्पृता, सरकारी नोकऱ्यात राखीव जागा मिळाल्या पाहीजेत यासाठी प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर बहुजन समाजातील मुलांना शासकीय नोकऱ्यात 50 टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा शाहू महाराजांनी केला.

**शोध निबंधाची उदिष्ट्यो : –**

1) राजर्षी शाहू महाराजांच्या शेती विषयक कार्याचा अभ्यास करणे.
2) शेतकऱ्यांच्या शिक्षण विषयक धोरणांचा आढावा घेणे.
3) राजर्षी शाहू महाराजांच्या पाणी व्यवस्थापना विषयी जाणून घेणे.
4) शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

शोध निबंधाची गृहितके : –

1) राजर्षी शाहू महाराजांनी शेतीविषयक अनेक सुधारणा केलेल्या आहेत.
2) शाहू महाराजांनी आदर्श जलव्यवस्थापनाचा उत्तम नमुना सादर केलेला आहे.
3) शेतकऱ्यांच्या विविध समस्या व त्याच्या निवारणासाठी राजर्षी शाहूंनी अथक प्रयत्न केलेले आहे.

**संशोधन पध्दती** : –

प्रस्तुत शोधनिबंधात वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व तुलनात्मक अभ्यासपध्दतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम साधनसामग्री म्हणून म्हणून प्रकाशित संदर्भ ग्रंथांचा उपयोग करण्यात आला आहे.

**राजर्षी शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार व कार्य : –**

कोल्हापूरच्या संस्थानच्या इतिहासातच नव्हे तर भारतीय इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य महत्वपूर्ण आहे. याच बरोबर शेती विषयक कार्य ही उल्लेखनीय आहे. ज्यावेळी कोल्हापूरच्या संस्थानाची सुत्रे राजर्षी शाहूंनी हाती घेतली त्यावेळी प्रजेला उद्देशून त्यांनी जो जाहीरनामा काढला, त्यातून त्यांची प्रजेविषयीची तळमळ स्पष्ट होते. 'आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितासंबंधीची एकसारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानाचा सर्व बाजूंनी विकास व्हावा अशी आमची उत्कट ईच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे आप्तजन, जहागीरदार, सरदार, मानकरी, इनामदार, कमानदार, सर्व दर्जाचे सेठ, सावकार व इतर प्रजाजन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हांस आवश्यकता आहे. आज आमचा राज्यकारभार दीर्घ काळापर्यंत टिकून तो सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जग चालकांच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो.'

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात शेती हा प्रधान व्यवसाय होता पण शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन झाले होते. वाटणी व्यवहारानी अशा लहान तुकड्यांची निर्मिती झाली होती. ती बदलावी आणि त्याचे रूपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे हा त्यांचा विचार होता. म्हणजेच शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्यांची प्रगती होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. ते मत त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवले होते. माणगावच्या परिषदेमध्ये भाषण करताना ते म्हणाले, ''तुम्ही साधारण माणसे दहा एक्कर जमीन वाट्याला येईल, असे तुमच्या मालकीचे तुकडे करा आणि हे उत्पन्न तुमच्या वडील असणाऱ्या व्यक्तीकडे चालवायला द्या, म्हणजे सर्वांना अर्धपोटी रहावे लागते ते वाचेल.'' त्यासाठी त्यांनी 1913 ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. त्यामध्ये वाटणी करता येणार नाही असे ठरले. त्यांनी सर्वांसाठी एक महत्वाचा संदेश दिला. ते म्हणत – 'कृषी कर्मापासून दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख तर होतेच शिवाय सर्व मनुष्य जातीलाही सुख मिळते. कृषी कर्म करताना क्षात्र धर्माला बाधा येते ही समजूत निखालस खोटी आहे. ज्यावर माणसाची व समाजाची सुव्यवस्था आणि उन्नती अवलंबून आहे, ते कर्म कमीपणाचे आहे ही समजूत वेडगळपणाची आहे. हे असे उभे कर्म करणारा माणुस, समाज खऱ्या अर्थाने क्षत्रिय होय. अन्न माणसाला जगविते, त्याचे पालन पोषण करते तसेच त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असा संदेश देते. श्रमाची प्रतिष्ठा जगात फार मोठी आहे. शेती करणे ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे.'

आपल्या कोल्हापूर संस्थानातील शेतकरी हा दारिद्र्या व अज्ञानानी पिचलेला आहे. तो सावकाराच्या ओझ्याखाली दबला आहे. म्हणून शेतकरी सावकारशाहीतून मुक्त झाला पाहिजे. शेतीतील अधिक उत्पन्न वाढीसाठी व शेतकऱ्यांचे दारिद्र्या नष्ट होण्यासाठी शेतीमध्ये सुधारणा करून शेतीस पाणीपुरवठा झाला पाहिजे याची तळमळ त्यांना होती. ती तळमळ त्यांनी कृतीत आणून तत्कालीन शेतकरी, कष्टकरी व कामगार वर्गाला त्यांनी फार मोठा दिलासा दिल्याचे दिसून येते.

1) 1897 सालच्या दुष्काळाची झळ संस्थानाला लागली होती. त्यातून मार्ग काढण्यासाठी महाराजांनी मोठ्या प्रमाणात कामे काढली, अन्नछत्रे सुरू केली. शेतकरी सावकारी पाशात अडकला होता त्याला कर्जे दिली व त्यांची जमीन सावकाराकडून सोडवून घेतली. शेतकऱ्यांच्या जनावरांची काळजी महाराजांनी घेतली. त्यांना चारा व पाण्याची सोय करून जंगले त्यांना खुली करून दिली. शेतकऱ्यांच्या शेतसाऱ्यात सुट दिली.

2) शेतकरी शेतीमध्ये नियमित घेत असलेल्या पीकापेक्षा वेगळेपणा म्हणून सन 1908 साली महाराजांनी चहाची लागवड केली. तसेच रेशीम मिळविण्यासाठी तुतीच्या लागवडीचा प्रयोग केला. पन्हाळ्याच्या परिसरात कॉफीच्या लागवडीचा प्रयोग त्यांनी यशस्वी केला. तसेच त्यांनी वाखासाठी अंबाडीची लागवड केली. अशा विविध प्रकारच्या नगदी पीकांची उत्पादने घेवून शेतकऱ्यांचे दारिद्र्या कमी करण्याचा यशस्वी प्रयत्न महाराजांनी केला. जो प्रयोग आज पुर्ण देशात करण्याचा प्रयत्न होत आहे.

3) सन 1918 साली महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट करण्याचा कायदा केला. जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना वतनदारी, इनामदारी जाचक ठरत होती. कुलकर्णी व इनामदार हे शेतकरी वर्गाची पिळवणूक करत होते. या कायद्यापुरते महाराजांनी कुलकर्ण्याकडील काम काढले व ते त्यांनी तलाठ्याकडे दिले. त्यांनी आता नवीन तलाठी पध्दती सुरू केली. या कायद्यामुळे कुलकर्णी वर्गानी फार मोठे आंदोलन सुरू केले. त्याकाळात निघत असलेल्या जातीनिष्ठ वृत्तपत्रात महाराजांवर मोठ्याप्रमाणात टीका झाली पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उलट हा कायदा स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही सरकारलाही पसंत पडला. मुंबई सरकारने सन 1950 पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतने नष्ट करण्याचा कायदा केला. त्यामुळे 1 मे 1951 पासून मुंबई प्रांतात कुलकर्णी वतन नष्ट झाले आणि तलाठी पध्दती सुरू झाली. यावरून असे म्हणता येईल की भविष्यकालीन प्रगतीचा अचूक वेध महाराजांना होता. म्हणूनच ते द्रष्टे राजे होते हे स्पष्ट होते.

4) शाहू महाराजांनी महार वतने नष्ट केली. त्यावेळी गुलामाप्रमाणे उपयोग करून घेण्यासाठी ग्रामीण भागात महार वतने प्रचलित होती. या वतनासाठी महारांना जनावरांप्रमाणे वागवले जात असे ते महाराजांनी बंद केले. त्यांच्या जमीनीचा परतावा केल्या. त्यांच्याकडून सक्तीने काम करून घेण्यास महाराजांनी 25 जून 1918 रोजीच्या कायद्याने बंदी केली. त्याचवेळी बलूतेदारी पध्दतीने ही थैमान घातले होते. ती पध्दत बंद करण्याचा कायदा महाराजांनी सन 1919 साली केला. यावरून असे दिसते की, महाराजांनी मजूरापासून ते मोठ्या शेतकऱ्यांपर्यंत त्यांना स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला व तो कमालीचा यशस्वी झाला. आता शेतकरी सावकारी पाशातून मुक्त होवून शेतीमध्ये आनंदाने कष्ट करू लागला. अशी पार्श्वभूमी तयार झाल्यानंतर कृषीमध्ये उत्पन्न वाढवायचे असेल तर त्यासाठी पाण्याची आवश्यकता आहे हे ओळखून महाराजांनी आपले लक्ष तिकडे लावले.

5) त्यासाठी त्यांनी राधानगरी धरणाचे बांधकाम केले. जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठीच्या योजना आखण्याचे महाराजांच्या विचाराधीन असताना कोल्हापूरच्या पश्चिम दिशेस 1907 साली महाराजांनी योजना आखली. त्यासाठी विचारविनीमय सुरू झाला. जागेची पाहणीकरून

1908 साली पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने या धरणाचे काम सुरू झाले. श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या नियंत्रणाखाली कामास सुरवात झाली. हे धरण बांधताना महाराजांना खूप कष्ट पडले कारण हे धरण बांधत असाताना अनेक मत–मतांतरे झाली पण महाराज हटले नाहीत. त्यांनी चिकाटीने काम सुरू ठेवले. सन 1917 पर्यंत या धरणाचे काम बरेच पूर्ण झाले. त्याला 26 लाख रूपये खर्च झाले होते. यानंतर आर्थिक संकटामुळे महाराजांना हे काम बंद ठेवावे लागले. नंतरच्या काळात छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळात 1958 साली हे काम पूर्ण झाले.

या धरणामुळे शेतीस मोठ्याा प्रमाणात पाणी मिळू लागले. शेतकरी सधन होवू लागला. ऊसाचे क्षेत्र वाढले, पैसा मोठ्याा प्रमाणात मिळू लागला. भोगावतीचा काठ हरितक्रांतीचा भाग झाला. त्यातून मोठ्याा प्रमाणात विद्युत निर्मिती होवू लागली. कोल्हापूर संस्थानातील अनेक मोठ्याा गावांना याच धरणाची वीज आजही पूरविली जात आहे. या धरणातून सांगली, मीरज, इस्लामपूर या भागास वीजपुरवठा होतो. ह्याा धरणाचे पाणी नदीकाठच्या खालच्या बाजूस पाटबंधाऱ्यासाठी उपयोगात आणले जात आहे. याशिवाय महाराजांनी पाणीपुरवठ्यासाठी अनेक योजना आखल्या होत्या, त्या आता साकार होत आहेत.

सध्या कोल्हापूरचा शेतकरी समृध्द होत आहे. कारण कोल्हापूर जिल्ह्याच्या सर्वच लहान मोठ्याा नद्यांवर अनेक धरणे बांधली आहेत? चोहोंकडे बागायती शेती दिसत आहे. शेतकरी आनंदी आहे. सारा भारत देश कौतुकाने याकडे पाहात आहे.

शेतकरी सावकारी पाशातून मुक्त करून शेतीला पाणी पुरवठ्याच्या सुविधा झाल्यानंतर शेतीमालाला बाजारपेठ आवश्यक होती. त्याचीही महाराजांनी व्यवस्था केली. ऊसाचे पीक मोठ्याा प्रमाणात येत होते. त्यापासून गुळ तयार होवू लागला म्हणून यापुर्वीच त्यांनी 1895 साली शाहूपूरी व्यापारपेठेची स्थापना केली होती. पुढे त्याचे रूपांतर शाहू मार्केट यार्ड मध्ये झाले. आज मोठ्याा प्रमाणात कोल्हापूर जिल्ह्याात व महाराष्ट्रात साखर कारखाने दिसतात. विशेषतः हे कारखाने सहकारी तत्वावर चालत आहेत व ते अत्यंत यशस्वीरित्या वाटचाल करीत आहेत, याची बीजे शाहू महाराजांनी त्याच काळात रूजवलेली होती.

**निष्कर्ष :–**

1. राजर्षी शाहू महाराजांचे विचार व सामाजिक, शैक्षणिक कार्य अनन्यसाधारण असून शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी अत्यंत महत्वाचे व उपयोगी ठरते.
2. शाहू महाराजांनी भारतीय अर्थ व्यवस्थेत असणारे शेतीचे महत्व शिक्षणाच्या माध्यमातून पटवून दिले. शेती करण्यामागची कमीपणाची भावना व न्यूनगंड दूर करून शेती व्यवसायाला प्राधान्य दिले.
3. प्रयोगशील व आधुनिक शेती संदर्भात अनेक उपाययोजना करून नवनवीन तंत्रज्ञान व प्रयोगामुळे जमिनीच्या प्रतवारीनूसार पीकांची निवड केल्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली.
4. शेतीस बारमाही पाणीपुरवठा व्हावा यासाठी छोटे मोठे तलाव, विहीरी, कालवे यांची निर्मिती करून पाटबंधारे विभागाच्या माध्यमातून मोठ्याा अशा राधानगरी धरणाची उभारणी केली, परिणामी शेतीच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.
5. राजषी शाहू महाराजांनी शेतीसाठी विविध प्रयोग करून जुन्या अवजारांच्या ठिकाणी नविन अवजारे आणण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यासाठी त्यांना तज्ञांची प्रात्यक्षिके, प्रदर्शने, शेती संस्था असे उपक्रम सुरू करून शेती व्यवसायाला चालना व बळ दिले.
6. शाहू महाराजांना शेतकरी, पद–दलिताबद्दल सहानुभूती होती. बहुजनांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शिक्षण संस्था, वसतिगृहे काढून ब्राम्हणेत्तर चळवळ आणि अस्पृश्यता निर्मूलन चळवळ एकाचवेळी एकाच तत्वावर सुरू करून समाजात जागृती घडवली.

**सारांश : –**

भारत देशातील समाज सुधारकांच्या यादीत राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अग्रस्थानी आढळून येते. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, स्त्री शिक्षण, अस्पृष्यता, जातीभेद, शेतकरी वर्ग आणि बहूजन वर्ग या सर्वांच्या बाबतीत स्वतःला पूर्णपणे झोकून देवून कार्य केलेले दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुता तसेच एकात्मता या गोष्टी त्यांनी आपल्या कृतीतून समाजाला दाखवून दिल्या. त्यांनी या देशाला समतेचा संदेश देवून जातीभेद, वर्णभेद, अस्पृष्यता या व्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने आणाऱ्या गोष्टी जाणीवपूर्वक नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजात खऱ्या अर्थाने लोकशाही मुहूर्तमेठ रोवणारे एक महान समाजसुधारक व जाणता राजा म्हणून त्यांनी तत्कालीन प्रजेत आपली ओळख निर्माण केलेली होती.

**संदर्भ ग्रंथ : –**

1. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ – महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, 2001.
2. डॉ. रमेश जाधव – लोकराजा शाहू छत्रपती – सुरेश एजन्सी पुणे, 2005
3. डॉ. दा. धो. काचोळे – समाजशास्त्रीय विचारांचा मुलाधार – कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2005.
4. तु. का. नाईक – छत्रपती राजर्षी शाहू महाराज – मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे.
5. माधवराव बागल – बहूजन समाजाचे शिल्पकार
6. धनंजय कीर – प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती – व्याख्याने, 1970.

# छत्रपती शाहू महाराज एक आदर्श राजा

**हनुमंत व्यंकटी घाडगे**

milind.ghadge28@gmail.com

**प्रस्तावना :-**

शाहू महाराजांचा जन्म २६ जून इ.स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंत, त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानाचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले, व 'शाहू' हे नाव ठेवले. सन १८८९ ते १८९३ या चार वर्षांच्या कालखंडात धारवाड येथे शाहू महाराजांचा शैक्षणिक आणि शारीरिक विकास झाला.

**शोधनिबंधाचीवैशिष्ट्ये:-**

१. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्य यांचा अभ्यास करणे

२. शाहू महाराजांच्या परिवर्तनवादी विचारांचा अभ्यास करणे

३. शाहू महाराजांच्या सामाजिक दूरदृष्टीचीचिकित्सा करणे

**शोधनिबंधाचे गृहितके:-**

१. तत्कालीन कालखंडामध्ये सामाजिक विषमता होती

२. अनिष्ट रूढी परंपरा समाजामध्ये सुरू होत्या

३. भारतीय समाजामध्ये अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर होती.

**छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक योगदान:-**

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी इ.स. १९१६ साली निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापनकेली.

शाहू महाराजांचे शिक्षणब्रिटिश अधिकारी फ्रेजर यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये व धारवाड येथे झाले. अभ्यास व् शैक्षणिक सहलीद्वारे मिळालेले व्यवहारज्ञान यामुळे शाहूराजे यांचे व्यक्तिमत्व विकसित झाले होते. १८९६ चा दुष्काळ व नंतर आलेली प्लेगची साथ या काळात त्यांची कसोटी लागली आणि त्याला ते पूर्णपणे उतरले. दुष्काळी कामे, तगाईवाटप, स्वस्त धान्यदुकाने, निराधार आश्रमाची स्थापना हे कार्य पाहता 'असा राजा होणे नाही' असेच प्रजेला वाटते. छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी, तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठीही सहकार्य केले होते. त्यांनी चित्रकार आबालाल रहिमान यांच्यासारख्या कलावंतांना राजाश्रय देऊन प्रोत्साहन दिले. शाहू महाराजांना 'राजर्षी' ही उपाधी कानपूरच्या कुर्मी क्षत्रिय समाजाने दिली.

**धर्मनिरपेक्ष राजा:-**

स्वातंत्र्यापूर्वी कैक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. म्हणूनच त्यांचा देशभरात 'महाराजांचे महाराज' असा गौरव

होतो. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकाराचा पूर्णपणे वापर केला म्हणूनच ते लोककल्याणकारी राज्यकर्ते ठरले. त्यांच्या कार्याचा गौरव समकालीन लेखकांनी व इतिहासकारांनी केलेला आहे

शाहूमहाराजांनी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. शाहू राजांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी तळमळ होती. म्हणून कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. तसेच ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रू. दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले, तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. अस्पृश्यांना शिवण यंत्रे देऊन स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले राजवाड्यातील कपडे त्यांच्याकडून शिवून घेण्यास सुरुवात केली गंगाधर कांबळे या व्यक्तीला कोल्हापुरात मध्य वस्तीत चहाचे दुकान काढून दिले अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना पैलवान चांभार यांना सरदार अभंग यांना पंडित अशा पदव्या दिल्या अस्पृश्य सुशिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली.

**छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यता निवारण कार्य**

अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा समर्थपणे चालवणारा राजा म्हणून आपली ओळख निर्माण केली. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उध्दार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रिडा व आरोग्य इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले.

त्याकाळी धर्माच्या नावाखाली देवांना मुले-मुली वाहण्याची विचित्र पद्धत भारतात चालू होती. परंतु राजांनी आपल्या संस्थानात जोगत्या-मुरळी प्रतिबंधक कायदा करुन ही पद्धत बंद पाडली. जातिभेदाचे प्रस्थ नष्ट व्हावे म्हणून आपल्या संस्थानात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशर मान्यता दिली. तसा कायदा पारित केला आणि याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना आपल्या चूलत बहीणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. एवढेच नव्हे तर संस्थानात जवळजवळ १०० मराठा-धनगर विवाह घडवून आणले. अशा अनेक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्त्रियांना सन्मानाची वागणूक व दर्जा मिळवून दिला.

**जातीयता नष्ट करण्याचे कार्य**

तत्कालीन परिस्थितीमध्ये जातिव्यवस्थेची शिकार झालेल्या अनेक जमाती त्या काळात चोऱ्या, दरोडे अशा चुकीच्या मार्गांचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण, सत्ता व संपत्तीचा अधिकार नाकारला, त्यामुळे त्यांचे जीवन नैराश्यमय झाले. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोऱ्या, दरोड्यांचा मार्ग अवलंबला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकामगाराकडे हजेरी लावावी लागत असे. शाहू राजांना या लोकांविषयी कणव होती. कारण ते खऱ्या अर्थाने वंचितांचे राजे होते. त्यामुळे शाहूंनी हजेरी पद्धत बंद केली. या जाती जमातींच्या लोकांना एकत्रित करून गुन्हेगारीपासून त्यांना परावृत्त केले. त्यांना संस्थानात नोकऱ्या दिल्या. त्यांच्यातून पहारेकरी, रखवालदार, रथाचे सारथी निर्माण केले. त्यांना घरे बांधून दिली. वणवण भटकणाऱ्या लोकांच्या राहण्याची सोय झाली. पोटापाण्याची सोय झाली. त्यामुळे गुन्हेगार म्हणून शिक्का बसलेल्या लोकांना माणूस म्हणून समाजात सन्मानाने वावरता येऊ लागले.

**शाहू महाराजांचे इतर कार्य:-**

गुन्हेगारांना शासन करणारा सत्ताधीश सर्वत्र पहायला मिळेल. मात्र त्यांना प्रेमाने, मायेने आपलेसे करुन समाजात सामाजिक दर्जा देणारा व त्यांच्यात स्वाभिमान निर्माण करणारा राजा विरळाच. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली.

सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे ही महत्त्वाची जबाबदारी राजर्षी शाहू महाराजांनी पार पडली त्यांच्या नेतृत्वाखालीच संपूर्ण कोल्हापूर

संस्थानांमध्ये सत्यशोधक चळवळ उभी राहिली आणि ती नेटाने पुढे नेण्याची कामगिरी देखील पार पाडली गेली. पुढे या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली यासाठी त्यांनी शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारलेे. दलित पीडित उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला यामागे खरी प्रेरणा ही राजर्षी शाहू, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची होते. बाबासाहेब आंबेडकरांना माणगावच्या परिषदेमध्ये "दलितांचा नेता" व "भारतीय अग्रणी नेता" म्हणून घोषित केले. यापुढील काळामध्ये बाबासाहेबांनी दलित उपेक्षित समाजाचे नेतृत्व करावं असे आवाहनही महाराजांनी केले. शाहू यांनी सर्व उपेक्षित समाजातील व अस्पृश्य वर्गातील लोकांना आपल्या संस्थानामध्ये आरक्षणाद्वारे नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला यादृष्टीने संपूर्ण भारतामध्ये आरक्षणाचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन शाहूराजांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले.

शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले.महाराजानी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीराना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध चांगले होते. डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक ३१ जानेवारी १९२० ला प्रथम प्रकाशित केले. परंतु आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद पडले. परंतु हे राजर्षी शाहू महाराजांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली. राजर्षी शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. त्यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील घाटगे घराण्यात झाला. महाराजानी सुमारे २८ वर्षे राज्यकारभार केला. त्यांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची दुष्ट पद्धत १९१९ मध्ये बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा, बहुजन विद्यार्थ्यांंसाठी वैदिक पाठशाळा, संस्कृत भाषेच्या विकासासाठी संस्कृत शाळा असेही उपक्रम त्यांनी राबवले.

**शैक्षणिक कार्य**

शाहू महाराजांनी खालील शाळा सुरू केल्या.

१. प्राथमिक शाळा २. माध्यमिक शाळा ३. पुरोहित शाळा ४. युवराज/ सरदार शाळा ५. पाटील शाळा ६. उद्योग शाळा ७. संस्कृत शाळा ८. सत्यशोधक शाळा ९. सैनिक शाळा १०. बालवीर शाळा ११. डोंबारी मुलांची शाळा
१२. कला शाळा

वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रखर झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले.

**संदर्भग्रंथ**

1. भगत, रा. तु. (२०१६). राजर्षी शाहू छत्रपती - जीवन व शिक्षणकार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन्स.
2. जाधव, नरेंद्र (१९८०). महाराष्ट्रातील मानचिन्हे. पुणे: मॅजेस्टिक प्रकाशन.
3. नांदेडकर, प्रा. डॉ. व. गो. (२०११). राजकीय विचार आणि विचारवंत. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
4. भगत, प्राचार्य रा. तु. (२०१६). राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन.
5. भगत, प्राचार्य रा. तु. (२०१६). राजर्षी शाहू महाराज - जीवन व शिक्षणकार्य. कोल्हापूर: रिया पब्लिकेशन, कोल्हापूर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचा साहित्यिक अभ्यास

**डॉ. रामहरी मधुकर सूर्यवंशी**
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय, लोहारा, तालुका - लोहारा, जिल्हा उस्मानाबाद,
E-mail : rmsp1979@gmail.com.

**गोषवारा** :

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला सामाजिक न्याय व समता मिळवून देण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. सामाजिक न्याय ही संकल्पना सर्वसमावेशक स्वरूपाची असून राज्यात राहणाऱ्या समाजातील सर्व व्यक्तींना राजकीय, आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य मिळून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाल्यास सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होते. सामाजिक न्याय हा समाजातील सर्व व्यक्तींना कोणताही भेदभाव न करता प्राप्त होतो. सामाजिक न्याय नेहमी व्यक्तीचे व समाजाचे कल्याण साधत असल्याचे दिसून येते. सामाजिक न्याय हा एक प्रकारे व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करतो तसेच प्रत्येकाला मानवी अधिकार मिळवून देतो. मानवी अधिकार हे व्यक्तीला जीवन जगण्यासाठी अत्यंत आवश्यक असतात. सामाजिक न्याय साधला गेला तरच मानवी अधिकारांचे रक्षण होते. मानवी अधिकारांना राज्यात महत्त्व दिले गेले तरच सामाजिक न्याय प्रस्थापित होतो. अशाप्रकारे सामाजिक न्याय व मानवी अधिकार यांचा अत्यंत जवळचा संबंध असल्याचे दिसून येते. मराठी साहित्यात शाहू , फुले, आंबेडकर यांच्या विचार व कार्यावर मोठ्या प्रमाणात लिखाण झाले आहे.

**महत्त्वाचे शब्द** : समानता, सामाजिक न्याय, सामाजिक, आर्थिक, राजकीय, व्यक्तीहित, संकल्पना, अधिकार, इत्यादी.

**प्रस्तावना :**

खऱ्या अर्थाने उदारमतवादी, लोकशाहीवादी असलेल्या समाजात असहमती व्यक्त करणारे प्रश्न उपस्थित केले गेले, तर भुवया उंचावल्या जात नाहीत; उलट, अशा प्रश्नांची कसून तपासणी करणं, त्यांची चर्चेद्वारे तड लावणं, अशा गोष्टींना प्रोत्साहन दिलं जातं. प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार आता सार्वजनिक आहे आणि कुणीही नागरिक तो अधिकार बजावू शकतो. पूर्वी असा अधिकार समाजातील केवळ सामर्थ्यवानांना होता, परंतु, आता हा अधिकार सर्व नागरिकांना आहे – किमान तत्त्वतः तरी. पूर्वीच्या काळी अशा अधिकाराबाबत वारंवार वाद जरूर व्हायचे, परंतु, सहसा ते सार्वजनिकरित्या वादाचे मुद्दे बनत नसत – जसे आजच्या काळात होतात.

भारतीय संविधानाने भारतीय नागरिकांना स्वातंत्र्य, समता, न्याय व अधिकार मिळवून देण्यासाठी कायदेमंडळ, न्यायमंडळ व कार्यकारी मंडळ या तीन संस्थांना विभक्त केले असून त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र व स्वायत्त दर्जा दिला आहे. या तिन्हीही संस्था आपले कार्य प्रामाणिकपणे तसेच तटस्थपणे पार पाडीत असतात. त्यासाठी संविधानात तरतूद केली आहे. कोणत्याही देशाच्या मानवाधिकार रक्षण या तिन्ही संस्था कशा काम करतात यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. भारतातही स्वांतत्र्योत्तर काळानंतर या तिन्ही संस्थांनी प्रामाणिकपणे आपले कार्य पार पाडून मानवाधिकार रक्षण करण्याचे कार्य केले, मात्र याला १००% यश मिळाले असे म्हणता येणार नाही. भारतात मानव अधिकार पूर्णपणे लोकांना मिळू शकले नाही याचे सर्वात महत्त्वाचे कारण भारताची सामाजिक व्यवस्था आहे. भारतात मोठ्या प्रमाणावर अनेक जाती धर्माचे लोक राहतात. त्यातही अनेक उपजाती मोठ्या

प्रमाणावर आहेत. शासनाच्या तीन संस्थांनी करून सामाजिक एकता व न्याय स्थापन करून मानव अधिकारांचे रक्षण केले. मात्र भारताची सामाजिक व्यवस्था प्रतिकूल असल्याने त्यांना पूर्णपणे यश आले असे म्हणता येणार नाही.

भारतीय संविधानातील मूल्य नेहमीच मानव अधिकारांना जिवंत ठेवण्याचे कार्य करतात. भारतीय संविधानात त्यासाठी अन उल्लंघनभारतीय संविधानाने भारतातील प्रत्येक व्यक्तीच्या मानव अधिकाराचे रक्षण व्हावे यासाठी प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार दिले आहेत. त्यासाठी भारतात लोकशाही शासनव्यवस्था स्थापन करण्याची तरतूद केली. त्यामुळे भारतात अंतिम अधिकार हा लोकांकडे राखून ठेवला आहे. प्रत्येक व्यक्ती हा लोकशाहीत समान असून एक व्यक्ती एक मूल्य यांची प्रतिष्ठापना भारतीय संविधानाने केली. भारतात कोणालाही विशेष अधिकार देण्यात आलेले नाहीत. मात्र तरीही देशात पूर्वीपासून सामाजिक स्थितीमुळे अभिजन वर्ग व घराणेशाही यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. देशाच्या सर्व संस्थांवर अंकुश ठेवण्याचे कार्य हे वर्ग पार पाडत असल्याचे दिसतात. सर्व निर्णय प्रक्रिया प्रभावित करण्याचे काम काही घराणेशाही तील लोक व प्रस्थापित करताना दिसतात. आजही भारतीय राजकारणात या लोकांचा फार मोठा बोलबाला आहेत. सामान्य लोकांना निवडणुकीला उभे राहणे खुप अवघड असून पैश्या अभावी कोणताही उमेदवार निवडून येऊ शकत नाही. भारतातील सर्व मानाची व महत्वाची पदे विशिष्ट लोकांना सहज प्राप्त होत असल्याने आजही भारतात लोकशाही असली तरी प्रत्येकाला समान न्याय मिळत नसल्याने समता प्रस्थापित झालेली नाही. त्यामुळे मानव अधिकारांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत असल्याचे दिसते . आजही भारतात मुठभर लोकांना बहुसंख्य लोकांवर आपले अप्रत्यक्ष वर्चस्व प्रस्थापित केल्याने मानव अधिकारांना धोका निर्माण झाला आहे.जातीव्यवस्था, धर्मभेद व प्रादेशिकता वाद मानव अधिकारांना मोठा धोका असल्याचे दिसते. या सर्व घटकांनी मानव अधिकारांना अक्षरशः पायाखाली तुडवले जात असल्याचे दिसते. आजही यामुळे व्यक्ती व्यक्तीमध्ये मोठ्या प्रमाणावर भेदभाव केला जात असून त्यामुळे मानव अधिकारांना गालबोट लागत असल्याचे दिसून येते.

**राजर्षी शाहू महाराज यांचे विचार व कार्य** :

राजर्षी शाहू महाराज हे थोर समाजसेवक राज्यकर्ते होते. त्यांनी जातीवाद अमान्य करून सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. बहुजन समाजाला रोजगार मिळवून दिला. राज्यात आर्थिक व सामाजिक मागास लोकांना आरक्षणाची सोय करून मुलांसाठी मोफत शिक्षण व वसतिगृहाची स्थापना केली. महाराष्ट्रात पुरोगामी विचारांची बीजे त्यांनी रोवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वेळोवेळी सहकार्य केले. त्यांचे नेतृत्व त्यांनी मान्य करून दलितांना न्याय मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला .

**महात्मा फुले यांचे विचार व कार्य :**

महात्मा ज्योतिराव फुले हे थोर समाजसेवक होते. शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. सर्व जाती धर्माच्या लोकांना शिक्षणाची दारे खुली केली. बहुजन समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केले. लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. अनेक प्रकारचे पोवाडे तयार केले. सार्वजनिक सत्यधर्म नावाचा ग्रंथ त्यांनी लिहिला. बहुजन समाजाच्या उद्धारासाठी महात्मा फुले यांनी भरीव योगदान दिले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य** :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरुवातीपासून दलीत उद्धाराचे कार्य केले. दलितांना न्याय मिळवण्यासाठी अनेक प्रकारची आंदोलने, चळवळी केल्या. चवदार तळे सत्याग्रह, मंदिर प्रवेश यासाठी आंदोलन करून दलितांना त्यांचा हक्क मिळवून दिला. भारताच्या सामाजिक रचनेत मोठे बदल घडवून आणले. सातारा येथे असताना गाडगेबाबांची प्रकृती साथ देत नव्हती . तेव्हा बाबांनी आर्वजून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना भेटीचा निरोप

पाठाविला. निरोप मिळताच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपली कामे बाजूला ठेवून सातारा गाठले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पाहताच गाडगेबाबांना खूप समाधान वाटले. त्यानी आपल्या उशिखालून कांही दस्त काढले .ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या हातात देत गाडगेबाबा म्हणाले' सायबा ही लाख मोलाची दौलत हाय. तवा ही दौलत योग्य माणसाच्या हातात देऊन मी मोकळा होणार .म्हणून सायबा तुला बोलावलो बघ.हे दस्ताची योग्य पुर्तता केल्याली हाय तवा ही दौलत तुझ्याकड दिलो तर मी मोकळा .'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दस्तऐवज पाहिला तर त्यांना आश्चर्य वाटले कारण तो दस्त सातारा येथिल जमिनीचा होता .त्या सर्व जमिनीचे सर्व अधिकार गाडगेबाबांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना दिले होते.दान मिळालेल्या जमिनीचा योग्य कामासाठी वापर व्हावा हिच बाबांची इच्छा ओळखून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कर्मवीर भाऊराव पाटलांना निरोप दिला आणि ती सर्व जमिन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गाडगेबाबांच्या समक्ष कर्मवीरांना बहाल केली.आज तिथे छत्रपती शिवरायांच्या नावाने चालविलेली रयत शिक्षण संस्था आहे ती याच जागेवर. रयत शिक्षण संस्थेच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मोठा वाटा आहे असे दिसते.

**संशोधनाचे उद्देश :**

१. भारताची सामाजिक स्थिती अभ्यासणे.
२. महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचे अध्ययन करणे.
३. राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार व कार्याचे अध्ययन करणे.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याचे अध्ययन करणे.

**निष्कर्ष :**

१. भारताची सामाजिक स्थिती विषमतेवर आधारलेली असल्याचे दिसते.
२. महात्मा फुले यांचे विचार व कार्य महिला सबलीकरण, शेतकऱ्यांचा उद्धार, बहुजन कल्याण यांच्याशी निगडित दिसते.
३. राजर्षी शाहू महाराज यांचे बहुजन समाजाच्या विकासासाठी महत्वपूर्ण योगदान दिले गेले असल्याचे दिसते.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांची व राष्ट्राची उन्नती यासाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

**संदर्भ :**

१. फुले ज्योतिबा, शेतकऱ्यांचा आसूड.
२. फुले ज्योतिबा, सार्वजनिक सत्यधर्म , ग्रंथ.
३. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, भारतीय संविधान.
४. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, बुद्धा अँड हिज धम्मा.
५. दैनिक लोकसत्ता वर्तमानपत्र,२०२१.
६. दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्र, २०२०.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री उन्नती संबंधीची भूमिका

**प्रा.महेंद्र पद्माकरराव देशपांडे**
विभाग प्रमुख इतिहास विभाग स्वामी रामानंद महाविद्यालय, अंबाजोगाई
Mahenradeshpande२०६१९६६)gmail.com

**प्रस्तावनाः**

आधुनिक भारतीय विचारांच्या जडण घडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वाटा मोठा आणि महत्वपूर्ण आहे. करोडो उपेक्षितांना दलितांना सन्मान, प्रतिष्ठा मिळाली पाहिजे अशी बाबासाहेबांची भूमिका होती. बाबासाहेबांनी हिंदू धर्मातील हिंदू समाजातील कनिष्ठ म्हणून ओळखल्या गेलेल्या लोकांचा उन्नतीवर आपले लक्ष केंद्रीत केले होते. त्यांच्या हक्कांसाठी प्रस्थापितांविरूध्द सर्वच पातळयांवर लढा दिला. बाबासाहेब अत्यंत ज्ञानी, विव्दान, व्यासंगी होते अर्थशास्त्रे, राज्यशास्त्रे, इतिहास या विषयांचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. एक क्षेष्ठ कायदे पंडित धडाडीचे व बुध्दिमान राजकीय नेते एक चांगले घटानातज्ञ म्हणून त्यांची ओळख आपणाला आहेच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात सामाजिक क्रांती घडवून आणली बुध्दानंतरची दुसरी क्रांती म्हणून याला म्हटले जाते. भारतीय स्त्री स्वातंत्र्याच्या इतिहासात राजाराम मोहन रॉय, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा फुले, पंडिता रमाबाई, धोंडोकेशव कर्वे यांच्या बरोबरीनेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य होते असे दिसून येते. पददलीतांच्या उत्थानासाठी कार्य करणारे धर्म योध्दा म्हणून बाबासाहेबांना म्हटले तर वावगे ठरत नाही. स्त्री यांच्या उन्नतीसाठी; भारतीय समाजातील स्त्रीयांच्या सन्मासाठी हिंदू कोडविधेयक परित करण्यात त्यांचा अत्यंत महत्वाचा वाटा होता. दलितांचे, स्त्रीयांचे उध्दारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ओळखले जातात. ज्ञान आणि कृतीशिलता हे डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होते. भारतातील अदिवासी, अस्पृश्य इतर मागास वर्गीय, स्त्रिया शेतकरी-शेतमजुरांचा प्रचंड कणवळा त्यांना होता. या उपेक्षीतांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी जीवनभर प्रयत्न केले.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये :**

1. डॉ. बाबासाहेबांच्या समाजिक कार्यावर प्रकाश टाकणे.
2. स्त्री सन्मानासाठी केलेले कार्य समजून घेणे.
3. अपेक्षित वर्गातील स्त्रीयांना मुख्यप्रवाहात आणण्याचा केलेला प्रयत्न जाणून घेणे.
4. हिंदूस्त्रीयांना आर्थिक अधिकार प्राप्त व्हावेत म्हणून केलेले प्रयत्न समजून घेणे.
5. स्त्री-पुरुष समानतेला दिलेले महत्व जाणून घेणे.

**गृहितके :**

1. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीचे स्थाम दुय्यम स्वरूपाचे होते.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या प्रत्यक्ष कृतीतून स्त्रीयांच्या उध्दारासाठी कार्य केले.
3. हिंदू कोड बीलच्या माध्यमातून भारतातील हिंदू समाजातील स्त्रीयांना हक्काची सनद बहाल केली.
4. स्त्रीयांच्या सन्मानासाठी त्यांनी स्त्री- शिक्षणाचा पुरस्कार केला.
5. स्त्रीयांच्या उध्दारासाठी अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरांच्या विरोधात बाबासाहेबांनी रणशिंग फुकले होते.

**संशोधनाची व्याप्ती/मर्यादा :** प्रस्तूत लघुशोध निबंधात केवळ डॉ. बाबासाहेबांच्या स्त्री विषयक कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत विषय परिपुर्तीसाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला गेला आहे.

**प्रारंभिक जीवन व कार्य :**

अशा थोर महामानवाचा जन्म इ.स.१८९१ मध्ये १४ एप्रिल १८९१ या दिवशी मध्यप्रदेशातील महू येथे भीमरावांचा जन्म झाला.

प्राथमिक शिक्षण उशीरा सुरू झाले. परंतु १९०४ वडिलांबरोबर मुंबईला आल्यानंतर इ.स १९०७ बाबासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. अस्पृश्य जातीतील विद्यार्थी म्हणून त्यांचे खुप कौतूक झाले. बाबासाहेबांनी मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. इ.स. १९१३ बी.ए. पास झाले. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांच्या शिष्यवृत्तीमुळे बडोदा संस्थानात नौकरीसाठी जावे लागले. अस्पृश्यतेचे चटके त्यांना सहन करावे लागले ही नौकरी सोडून भिमराव कोलंबिया (अमेरिका) विद्यापीठात शिक्षणासाठी गेले इ.स १९१५ एम.ए. (अर्थशास्त्र) झाले. उच्च १९१६ कुशाग्र बुध्दीचा बाबासाहेबांनी भारतीय रूपयाचे अर्थशास्त्र या विषयावर पी.एच.डी ही पदवी मिळविली. त्यानंतर बाबासाहेबांनी कायद्याच्या अभ्यासास प्रारंभ केला. १९१८ मुंबईतील सरकारी कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नौकरी पत्करली परंतु भारतातील लाखो दलितांच्या अंधःकार मय जीवनागुळे बाबासाहेब अत्यंत अस्वस्थ झाले होते. अस्पृश्यांच्या जीवनात ज्ञानाचा, उन्नतीचा प्रकाश निर्माण झाला पाहिजे. या समाजाला समानतेची वागणूक मिळाली पाहिजे. या जाणिवेतुन बाबासाहेबांनी नौकरीचा राजीनाम देऊन १९२० "मूकनायक" हे नियतकालिक काढले. दलित समाजामध्ये जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू केले. १९२० बॅरिस्टर होण्यासाठी बाबासाहेब लंडनला गेले. बाबासाहेब अधिकाधिक ज्ञान घेण्यासाठी असूसलेले होते. शिक्षणा विषयी त्यांना अपारप्रेम होते. शिक्षणातूनच माणसाच्या विकासाचा मार्ग निश्चित होता. अशी त्यांची धारणा होती. शिक्षण घेत असताना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. प्रसंगी उपाशी, अर्धपोटी राहून बाबासाहेबांनी शिक्षण घेतले. दिवसातले अठरा अठरा तास बाबासाहेब अध्ययन वाचन करित असत. बाबासाहेबांचा हा विशेषगुण घेण्यासारखा आहे. दलित बांधवांना "शिका संघटीत व्हा, व संघर्ष करा" असा ओजस्वी संदेश बाबासाहेबांनी दिला होता.

**डॉ. आंबेडकरांची स्त्री विषयक भूमिका :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील जागतिक पातळीवरील महिलांविषयक प्रश्नांचा सुक्ष्म अभ्यास केला होता. आयुष्यभर त्यांनी स्त्री सुधारणेचा व स्त्रीमुक्तीचा पाठपुरावा केला होता. स्त्रीला सामाजिक, कौटूंबिक, धार्मिक, व्यावसायिक, सांस्कृतिक आणि राजकिय क्षेत्रातही सन्मानाने व स्वाभिमानाने जगता आले पाहिजे, वावरता आले पाहिजे अशी त्यांची ठाम भूमिका होती. स्त्रियांच्या गुलामगिरी विरूध्द त्यांची भूमिका होती. सर्व हिंदू जातीतील स्त्रियांची कुटुंबातील स्थिती व समाजात असणारी स्त्रीयांची प्रतिष्ठा या बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बारकाईने निरीक्षण चिंतन केले होते.

**भारतीय समाज व स्त्रीया :**

भारतीय स्त्रीया या पिढ्यान पिढ्या कधी वडील, कधी पतीवर कधी मुलांवर अवलंबून होत्या. आर्थिक दृष्ट्या तर भारतीय स्त्रिया फारच परावलंबी होत्या. पतिच्या मृत्यूनंतर तर स्त्रियांची अवस्था फारच वाईट होई. वडिलांचा, सासऱ्यांचा तिला आधार घ्यावा लागे. पण तेही मिळेल याची शाश्वती नव्हती. अत्यंत अपमानास्पद व परावलंबी जिणे स्त्रियांना जगावे लागे. स्त्रीची मुक्ती करण्याचे ध्येय डॉ. आंबेडकरांनी ठरविले होते. मुलगा-मुलगी असा भेद करू नये. मुलांप्रमाणे मुलीला शिकवून स्वाभिमानाने व स्वतंत्र बाण्याने जगण्यास शिकवावे अशी त्यांची भूमिका होती. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांमधला स्त्री म्हणून जगण्याचा स्वाभिमान जागृत केला. स्त्री-पुरुष दोघेही समान आहेत. किंबहुना स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठच आहे. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वारंवार सांगितले

होते. पूर्वी स्त्रियांना कसलेच अधिकार, सवलती नव्हत्या त्या मिळवून देण्यात बाबासाहेबांचा सिहांचा वाटा होता. आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रारंभापासूनच अस्पृश्य आणि दलित समाजातील स्त्री पुरुषांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले होते. स्त्रिया जर शिकल्या तर त्यांच्यातील अंधश्रध्दा कमी होईल त्या डोळस बनतील व आपल्या मुलाबाळांवर ब्राह्मणांच्या स्त्रियांप्रमाणे चांगले संस्कार करतील अशी त्यांची भूमिका होती.

स्त्रियांची उन्नती झाली पाहिजे या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आस्था वाटत होती. एखाद्या समाजाची प्रगती त्या समाजात स्त्रियांचा दर्जा किती उच्च असतो यावर अवलंबून असते. असे त्यांचे मत होते. स्त्री व पुरुष यांना समान अधिकार असावेत असे त्यांना वाटत होते. स्त्रियांनी शिक्षण घ्यावे, स्वच्छता पाळावी, दुर्गुणांपासून मुक्त व्हावे. सद्गुणी व्हावे अशी त्यांची भूमिका होती. भारतीय समाज व्यवस्थेत स्त्रीचे स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. भारतीय समाजात स्त्रिला समानतेचे स्थान कोणत्याच धर्माने दिले नव्हते. स्त्रीचे अस्तित्वच पुरुष प्रधान संस्कृतीने नाकारले होते व तिला अधिकाधिक दास्यत्वाच्या बंधनात जखडले होते. याच पुरुषप्रधान संस्कृतीने मनुस्मृतीतील वचनांच्या आधारे स्त्रियांना स्वातंत्र्या पासून कायम वंचित ठेवले होते. डॉ बाबासाहेबांचे पहिले गुरु तथागत गौतम बुध्दांनी अडीच हजार वर्षापूर्वी स्त्रीपुरुष समता व स्त्री मुक्तीचा विचार जनमानसात रूजविला होता. स्त्रीला ज्ञानार्जन करण्याचा अधिकार दिला होता. कबीरांना बाबासाहेब गुरुस्थानी मानित त्यांनीही स्त्रीला सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान दिले होते. तर महात्मा फुले यांना बाबासाहेबांनी गुरु म्हटले होते. त्यांनी देखील स्त्रीमुक्तीसाठी मनुस्मृती जाळून टाकावा असा विचार मांडला होता. बाबासाहेबांनी या गुरुच्या विचारांना प्रमाण मानून स्त्री मुक्तिचा वसा घेतला होता.

**स्त्री सन्मानाविषयी बाबासाहेबांची भूमिका :**

स्त्रीयांच उन्नती विषयी बाबासाहेब आग्रही होते. १९२७ च्या महाडच्या परिषदेत स्त्रीयांशी संवाद साधताना डॉ. बाबासाहेबांनी दलित स्त्रीयांना त्यांच्या उन्नतीसाठी काही चांगल्या बाबी स्वीकारण्याचा आग्रह केला होता. स्पृश्य हिंदू स्त्रियांप्रमाणे वेशभुषा करा, स्वतःस अस्पृश्यमानू नका जुन्या व गलिच्छ चालीरीती सोडून द्या, घरात अमंगल गोष्ट होवू देवू नका, मुलींना शिक्षण द्या, ज्ञान आणि विद्या या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत ही बाबासाहेबांची भूमिका होती. स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती किती झाली. ठरविता येते अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे मात्र गुलामा सारखे वागण्यास खंबीर पणे नकार द्यावा व समानतेसाठी आग्रह धरावा. सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक, व राजकीय न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रध्दा याचे स्वातंत्र्य, संधीची समानता बंधुभाव व व्यक्तीची प्रतिष्ठा यांची जोपासना ही भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये आहेत. ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी घटनेने नागरिकांना काही मूलभूत हक्क दिलेल आहेत. हे हक्क पुरुषांबरोबर स्त्रियांनाही देण्यात आले आहेत. घटनेतील १४ व्या कलमानुसार कायद्यासमोर स्त्री पुरुष दोन्ही समान आहेत. तर घटनेतील ३२६ व्या कलमानूसार प्रौढ मतदानाचा हक्क दिला जाताना स्त्री-पुरुष असा भेदभाव कला जाणार नाही असे नमूद केले आहे. भारतातील स्त्री मुक्ती चळवळ मुख्यतः महात्मा जोतीबा फुले यांनी सुरू केली. १९ व्या शतकात जोतिबांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार पुढे आणला. महात्माफुले यांच्या विचारांना पोषक आणि पुढे नेणारे विचार लोकहितवादी, सुधारकाग्रणी गोपाळगणेश, आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, ईश्वरचंद्र विद्यासागर, राजाराम मोहन रॉय, डॉ. राममनोहर लोहिया, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताच्या घटनेत स्त्री पुरुष समतेची जाहिर नोंद करून अतिशय महत्त्वाची कामगिरी केली.

**हिंदू कोडबील व डॉ. बाबासाहेब :** डॉ. आंबेडकर यांनी आयुष्यभर अस्पृश्य समाज व स्त्रियांच्या हक्कांसाठी संघर्ष केला. स्त्री ही समाजामध्ये व कुटूंबामध्ये महत्त्वाची जबाबदारी पार पाडत असताना सुध्दा तिला गौण व दुय्यम स्थान

देण्यात आले होते. हिंदू संहिता विधेयकाच्या मार्फत स्त्रियांची गुलामगिरीतून सुटका करण्याचे विधेयक इ.स १९४८ मध्ये त्यांनी विधीमंडळासमोर मान्यतेसाठी मांडले. हिंदू संहितेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हात लागताच तिचे ते प्रवक्ते होताच विधेयकाचे समर्थक व विरोधक असे दोन गट पडले. १७ सप्टेंबर १९५१ या दिवशी या विधेयकावर लोक सभेत चर्चा झाली परंतू हे विधेयक परित होवू शकले नाही. त्यामुळे बाबासाहेबांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पुरुषप्रधान संस्कृतीच्या गुलामगिरीत अडकलेल्या स्त्री वर्गाला मुक्त करण्यासाठी त्यांनी हिंदू कोडबिल संसदेत मांडले. हिंदू कोडबिल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पडलेले एक सुंदर स्वप्न होय. त्यांच्या संपूर्ण क्रांती कार्यात त्यांनी हिंदू कोड बिलाला अधिक महत्त्व दिले होते. मनुस्मृतीच्या माध्यमातून विवाहाच्या आधी आणि विवाहानंतर स्त्रियांना फक्त पुरुषावर अवलंबून ठेवले होते. सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या स्त्री ही पूर्णतः परावलंबी होती. एक भाणूस म्हणून विकसित होण्याचा कोणताही अधिकार स्त्रीयांना नव्हता. विवाह संस्थेतून तिच्यावर अनेक बंधने लादण्यात आली होती. एवढेच नव्हे तर तिची निंदा करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोडबील तयार करून हिंदू स्त्रीयांच्या स्वतंत्रतेचा जाहिरनामाच तयार केला होता. स्त्रियांना धार्मिक, सामाजिक, आर्थिक रवातंत्र्य मिवून देण्याचे साधन होते असे म्हणता येते. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्वावर आधारित समाजाची निर्मिती व्हावी, सामाजातील जात, धर्म आणि लिंग भेदावर आधारित भेदाभेद नष्ट व्हावा. समताधिष्ठित लोकशाही मुल्यांवर आधारित समाज निर्मितीचे स्वप्न साकार व्हावे अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

**निष्कर्ष :**

1. सामाजिक क्रांती घडवून आणण्याचा बाबासाहेबांनी प्रयत्न केला होता.
2. हिंदू कोडबीलाच्या माध्यमातून स्त्रीयांचा दर्जा सुधारण्याचा प्रयत्न केला होता.
3. स्त्रीने पुरुषाच्या बरोबरीने स्वतःला समजावे ही त्यांची भूमिका होती.
4. स्त्रीयांनी शिक्षण घेवून स्वतःची उन्नती साधावी अशी त्यांची भूमिका होती.
5. अनिष्ठ प्रथा, रूढी, अंधश्रध्दा याला मुठमाती देवून स्त्रीने माणूस म्हणून जीवन जगावे अशी त्यांची भूमिका होती.

**संदर्भ ग्रंथ यादी :**


1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग (२) पृ. ४२६/४२७ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती.
2. भारतीय समाज विज्ञान कोष खंड ५ संपादक स.मा.गर्गे मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे पृ. १३८.
3. भारतीय सामाजिक विचारवंत ले.डॉ.दा.धो. काचोळे कैलास पब्लिकेशन्स पृ. ३१८-३१९.
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ले. धनंजय कीर पॉप्युलर प्रकाशन पृ.१०९.
5. स्त्री मुक्तीचे प्रणेते-डॉ.बाबासाहेब आंबेडकर ले.प्रा.मिलींद वाव्हळे कैलाश पब्लिकेशन्स पृ.४५६/४५७.
6. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास डॉ. किशोरकुमार गव्हाणे/ डॉ.एस.पी.शिंदे एज्युकेशनल पब्लिकेशन्स अँड डिस्ट्रिब्युटर्स पृ.२६२/२६३.
7. हिंदू कोडबिल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ले.डॉ. निशा शेंडे कैलाश पब्लिकेशन्स पृ ३६२/३६३.
8. महिला व ओ.बी.सी.वर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका ले.डॉ.प्रशांत पगारे कैलाश पब्लिकेशन्स पृ.२९३.
9. भारतीय इतिहासातील स्त्रिया व स्त्री जीवन ले.डॉ.एस.एस.गाठाळ कैलाश पब्लिकेशन्स . २६२.
10. आधुनिक भारताचा इतिहास ले.डॉ.बी.एल.ग्रोवर डॉ.एन.के.बेल्हेकर निरजा प्रकाशन नवी दिल्ली.

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक धोरण : एक चिंतन

**डॉ. मिनाक्षी प्रल्हादराव शिंदे**
सावित्रीबाई फुले कनिष्ठ महाविद्यालय कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यानंतर सामाजिक बदलास सुरुवात झाल्याचे दिसून येते. ब्रिटिशांच्या सत्तेमुळे पेशवाईचा शेवट होउन सामाजिक, राजकीय जीवनाला नवी दिशा मिळून आधुनिक विचारांना सुरुवात झाली. परंतु या बदलाचा फायदा प्रामुख्याने वरिष्ठ वर्गालाच झाला. महाराष्ट्रातील समाजात वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेतील कडक निर्बंधाना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. समाजात चालिरिती, रुढी—परंपरा, धार्मिक आचार—विचारांचा प्रभाव समाज मनावर विशेष पडलेला होता. अंधश्रद्धा, अधार्मिक दृष्टीकोन यामुळे सामाजिक क्षेत्रात अनेक प्रकारचे स्तोम माजले होते. त्यामुळे बहुजन समाजाच्या परिस्थितीत मात्र फारसाबदल झाला नव्हता. म्हणून बहुजन समाजाची वरिष्ठ वर्गाच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी सर्वप्रथम महात्मा ज्योतीबा फुलेंनी प्रयत्न केले आणि त्यांनी बहुजन समाजाला त्यांच्या वास्तव परिस्थितीची जाणीव करुन दिली. समाज परिवर्तनाचे 'सत्यशोधक समाज' माध्यमातून कार्य केले आणि बहुजन समाजात जागरुकता निर्माण होउन हा समाज आपल्या न्याय हक्कासाठी सजग झाला. परंतु म.फुले हे थोर समाजसुधारक आपल्यातून निघून गेल्यानंतर त्यांचे अपूरे राहिलेले कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. म्हणून राजर्षी शाहू महाराजांना महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा वारसदार मानले जाते. राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे राजे होते. परंतु त्यांच्या कर्तृत्वाने ते संपूर्ण देशातील बहुजन समाजाचे नेते नव्हे तर ते कुलदैवत बनले होते.

**राजर्षी शाहू महाराजांचा जीवन परिचय :**

छत्रपती शाहू महाराज हे जन्मत: राजघराण्यातील नव्हते ते कागलच्या घाटगे घराण्यातील होते. त्यांचा जन्म २६ जुलै १८६४ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव श्रीमंत राधाबाई साहेब तर वडीलांचे नाव श्रीमंत जयसिंगराव घाटगे असे होते. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. यशवंतरावांना १७/०३/१८८४ रोजी चौथे शिवाजी महाराज यांच्या महाराणी आनंदीबाईसाहेब यांनी दत्तक घेतले व त्यांचे नाव 'शाहू छत्रपती' ठेवले. त्यांचे शिक्षण राजकोट येथील कॉलेजात सन १८८५ ते १८९१ या काळात युरोपियन शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी, राज्य कारभार, इतिहास या विषयाचे शिक्षण घेतले. तसेच कुस्ती, शिकार व घोडयावर बसणे इत्यादी खेळांमध्ये त्यांनी प्राविण्य मिळविले. १९०२ मध्ये ते इंग्लंडला गेले असताना केंब्रीज विद्यापीठाने त्यांना एल.एल.डी. ही पदवी देवून सन्मान केला. यानंतर शाहू महाराजांनी २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. संस्थानची सूत्रे हाती घेताच राज्याचा रथ धार्मिक स्वातंत्र्याच्या, सामाजिक समतेच्या, आर्थिक सुधारणांच्या, शिक्षण व ज्ञानप्रकाशाच्या दिशेने हाकण्याचा प्रयत्न केला.

समाजाच्या विकासासाठी ज्याप्रमाणे सामाजिक समता आवश्यक असते त्याचप्रमाणे आर्थिक विकासही आवश्यक आहे. समाजाच्या आर्थिक विकासावरच इतर क्षेत्रातील सर्वांगिण विकास अवलंबून असतो. याची जाणीव महाराजांना होती, म्हणूनच शाहू महाराजांनी आर्थिक विकासासाठी शेती, उद्योगधंदे, व्यापार व सहकार इत्यादी क्षेत्रात अनेक उपाय योजना केल्या. या उपाययोजनांद्वारे समाजाचा कायापालट घडवून आणण्याचे कार्य केले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक सुधारणांचा आढावा घेणे.
2. राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक धोरण व जनहिताची भूमिका आर्थिक धोरणातून अभ्यासणे.
3. राजर्षी शाहू महाराजांच्या शेतीविषयक विकासात्मक दृष्टीकोन अभ्यासणे.

**मर्यादा व संशोधन पद्धती :**

राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व्यापक असल्यामुळे सदर शोधनिबंधात फक्त राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणांचा विचार करण्यात आला आहे. सदर संशोधन कार्य दुय्यम साधनसामग्रीचा वापर करून ज्यात प्रकाशित ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे व संबंधित विषयाशी निगडीत साहित्याचा वापर केला आहे.

**राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक विचार :**

राजर्षी शाहू महाराजांना आर्थिक विकासाबद्दल प्रचंड ओढ होती. त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक धोरणे स्पष्ट स्वरूपाची होती. त्यांच्या धोरणात कृती होती. शाहू महाराजांनी त्यांच्या आर्थिक धोरणाची प्रमुख दोन तत्वे निश्चित केली होती. १. समाजाधिष्ठित सामाजिक न्याय, २. समतोल आर्थिक विकास. ही तत्वे महाराजांच्या सार्वजनिक धोरणांशी सुसंगत होती. या तत्वामध्ये न्याय, शिस्त आणि क्षमता या मूलभूत कल्पना होत्या. त्यासाठी महाराजांनी प्रथमत: प्रशासकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण देणारी 'पाटील स्कूल्स' स्थापन केले. त्यांना जुनी चौकट आर्थिक विकासाला अडथळा निर्माण करणारी वाटत होती. म्हणून त्यांना अनुभव, निरिक्षण, अवलोकन आणि प्रत्यक्ष व्यवहारातील अडचणी इत्यादी बाबी अपरिहार्य वाटल्या. खर्चात काटकसरीचे तत्व वापरून भांडवल वाढीस चालना दिली. छत्रपती शाहू महाराजांनी शेती, उद्योगधंदे, व्यापार, सहकार, दुष्काळ निवारण इत्यादी गोष्टींना प्राधान्य देवून महत्वपूर्ण कार्य केले.

**शेती क्षेत्राचा विकास :**

राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात शेतीला प्राधान्य दिले. शेतीतील उत्पन्न वाढल्याशिवाय शेतकरी सुधारणार नाही आणि शेतकरी सुधारल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही, असे ते म्हणत. राजर्षी शाहू महाराजांनी जेंव्हा राज्याची सूत्रे हाती घेतली तेंव्हा जनता दु:खी, कष्टी, दुर्बल, दुष्काळग्रस्त झाली होती. त्यासाठी जनतेला अन्न व जनावरांना चा—याची व्यवस्था व्हावी व अन्नधान्याची निर्यात व्हावी यासाठी शेतीचा विकास झाला पाहिजे म्हणून शाहू महाराजांनी विशेष प्रयत्न केले. शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे ती ओलिताखाली आणण्याची गरज होती. यासाठी २ फेब्रुवारी १९०२ रोजी पाटबंधारे विषयक धोरण जाहीर करून शेतीला कायम स्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना आखण्यास सुरूवात केली. १९०२ मध्ये पाटबंधारे विभागातर्फे केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे १९०७ मध्ये भोगावती नदीवर त्याकाळचे भारतातील सर्वात मोठे राधानगरी धरण बांधण्याचे निश्चित करून प्रत्यक्षात १९०९ मध्ये बांधकामास सुरूवात केली. या धरणाबरोबर बंधारे, तलाव, कालवे व विहिरी बांधण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन व अर्थसाहय दिले. दरबाराच्या मदतीने २०००० विहिरी आणि ४० तलाव खोदण्यात आले. त्यामुळे हजारो एकर क्षेत्र ओलिताखाली येण्यास मदत झाली. १८९३—९४ मध्ये ओलिताखाली असलेल्या जमिनीचे क्षेत्र १२९४१९६ एकर होते. १९२१—२२ मध्ये १४२६५६५ एकरपर्यंत वाढविले. जमिनीचे लहान—लहान तुकडे करू नये यासाठी १९१३ मध्ये कायदा केला. १९१५—१६ मध्ये नद्यापासून ४००१५, विहिरीपासून ३९८४५ एकर असे एकूण ७९८६० एकर जमिनीला पाणीपुरवठा करण्यात आला. शेतीमध्ये उत्पादन वाढविण्यासाठी केवळ पाणीपुरवठा आवश्यक नसून त्याबरोबर बि—बियाणे, किटकनाशके याचा शेतक—यांनी वापर करावा म्हणून कोल्हापूरात १९१२ मध्ये 'शेतीसंस्था' स्थापन करण्यात आली. यामध्ये सुधारीत शेती उपयोगी अवजारांचे केंद्र उभारण्यात आले. या केंद्रामध्ये सुधारीत शेतीचे प्रयोग करून दाखविण्यासाठी एका व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. जनतेला चांगल्या शेतीमालाची व जनावरांची माहिति व्हावी यासाठी प्रदर्शने भरविण्यात आली. खेडेगावातील शाळातून शेतीविषयक शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली. अल्प अटीवर शेतक—यांना कर्ज मिळण्याची तरतूद केली. चहा, कॉफी, रबर, राळ, ताग, बटाटे, कापूस इत्यादी नवीन पिकांची लागवड केली. या पिकांखेरीज हिरडा, जांभूळ, साग, आंबा, फणस व मोहू इत्यादींची लागवड केली. एवढेच नाही तर शेती व जोडधंदा म्हणून दुग्धविकास व पशुपालन, कुक्कुटपालन, बदकपैदास यासाठी प्रोत्साहन व अर्थसाहय केले.

**उद्योग क्षेत्राचा विकास :**

शेतीप्रमाणेच महाराजांनी उद्योग क्षेत्रातही औद्योगिक सर्वेक्षण करून घेतले होते. त्यांच्या आधारावर मोठया कल्पकतेने अनेक उद्योगधंदे सुरू केले. १९०४ मध्ये महाराजांनी डी. एस. शाळीग्राम या व्यक्तीची 'इंडस्ट्रीयल इन्स्पेक्टर' म्हणून संस्थानात नेमणूक केली. जंगल संपत्तीवर आधारित शाळिग्रामनी 'सुगंधी औषध तेलउद्योग' व 'काष्ठार्क तेल उद्योग' या तेलाचे उत्पादन सुरू केले. १९०५ पर्यंत संस्थानात सुगंधी तेल उद्योग, मधूमक्षिका पालन उद्योग, काष्ठार्क उद्योग, सुती कापड उद्योग सुरू केले. १९०६ मध्ये 'दि शाहू छत्रपती स्पिनिंग अ‍ॅड विव्हिंग मिल्स' या गिरणीची स्थापना केली. राजर्षी शाहू महाराजांच्या मते, एकाच ठिकाणी उद्योगाचे केंद्रीकरण न होता विकेंद्रीकरण व्हावे. त्यामुळे आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण होणार नाहीत.

स्न १९०८—०९ मध्ये इचलकरंजी येथे जिनिंग मिल सुरू करण्यात आली. १९१२—१३ मध्ये संपूर्ण कोल्हापूर संस्थानामध्ये कोल्हापूर येथे २, इचलकरंजी येथे १, शिरोळ येथे १, चिखली येथे १ व गडहिंग्लज १ अशा एकूण ६ जिनिंग मिल उभारण्यात आल्या. १९१२—१३ साली 'शाहू विव्हर्स असोसिएशन' ची स्थापना करण्यात आली. येथे १६० कामगार स्त्री—पुरूष विणकर सभासद होते. यामध्ये साडया, चादरी व चोळीचे खण इत्यादीचे उत्पादन करण्यात आले. उद्योगांचा विकास घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी बहुमोल आर्थिक साहय केल्यामुळे आज इचलकरंजीला महाराष्ट्राचे 'मॅचेस्टर' म्हणून ओळखले जाते.

**व्यापार क्षेत्राचा विकास :**

शेती, उद्योगामध्ये व कारखान्यामध्ये उत्पादन मोठया प्रमाणावर झाल्यामुळे व्यापाराचा प्रश्न निर्माण झाला. निपाणीसारखी बाजारपेठ कोल्हापूरात सुरू करावी यासाठी आवश्यक असलेल्या सवलती संस्थानाकडून देण्यात येतील असे सांगितले. १८९५ मध्ये कोल्हापूर येथे 'शाहूपूरी बाजारपेठ' स्थापन करण्यात आली. व्यापारामध्ये देखील विकेंद्रीकरण धोरण राबवून व्यापाराला चालना देण्यासाठी जयसिंगपूर व गडहिंग्लज येथे व्यापारपेठ स्थापन करून जयसिंगपूर येथे तंबाखू व गडहिंग्लज येथे मिरची, गुळ व भूईमूग यांची बाजारपेठ विकसित झाली. महाराजांच्या या धोरणामुळे १८९४—९५ मध्ये संस्थानची असणारी ६ लाख रूपये निर्यात पुढे १९२१ मध्ये ३० लाख रूपयांपर्यंत गेली.

**दळणवळण क्षेत्राचा विकास :**

उद्योगधंदे आणि व्यापार यांच्या वाढीसाठी दळणवळणाच्या साधनांचे विशेषत: रस्ते, रेल्वे यांचे अनन्यसाधारण महत्व असते हे लक्षात घेउन संस्थानात रस्त्याचा व रेल्वेचा विकास घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. महाराजांनी त्यांच्या कारकीर्दित १८५ मैल लांबीचे नवे रस्ते तयार केले. या रस्त्यामुळे लहान—लहान खेडी शहरास जोडण्यास मदत झाली. १८८८ मध्ये कोल्हापूर शहर मिरज रेल्वे जंक्शनला जोडणा—या रेल्वे मार्गाचे काम महाराजांच्या हस्ते सुरू झाले. १८९१ मध्ये हे काम पूर्ण झाले.

**सहकार क्षेत्राचा विकास :**

राजर्षी शाहू महाराजांनी जनतेमध्ये सहकार रूजावा व त्यातून त्यांचा उद्धार व्हावा यासाठी प्रयत्न केले. समाजात शासकीय यंत्रणेद्वारे उद्योग सुरू करण्याऐवजी लोकांनी पुढे होउन सहकारी तत्वावर सुरू करावेत असे त्यांना वाटत होते. यासाठी १९१२ मध्ये सहकारी कायदा करून 'बलभीम को—ऑपरेटिव्ह सोसायटी' व 'अर्बन को—ऑपरेटिव्ह बॅक' ची स्थापना केली. या सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे. ग्राहक भांडार, सहकारी संघ, साखर कारखाने उभे करावेत यासाठी शाहू महाराजांनी मोठया प्रमाणात अर्थसाहय केले. १९२०—२१ मध्ये कोल्हापूर संस्थानात सहकारी संस्थांची संख्या ३७ पर्यंत पोहचली होती.

**दुष्काळ निवारणार्थ योजिलेले उपाय** राजर्षी शाहू महाराजांच्या कारकिर्दीत सन १८९६—९७, १८९९—१९०० आणि १९१८—१९ या काळात दुष्काळ पडले होते. दुष्काळी कामावरच्या मजूरांची आणि कुटूंबियांची योग्य काळजी घेण्यात आली होती. मजुरांचे शोषण होउ नये, त्यांना योग्य वेतन मिळावे, दुष्काळी कामे व्हावीत यासाठी खबरदारी घेतली जात अस. तलाव व विहिर खोदाई, सडकांची दुरूस्ती तसेच एक मोठा धरण प्रकल्प याच काळात घेण्यात आला. याच बरोबर जनतेला कर्ज देणे, गुरे पोसणे, जनावरांस चारा पुरवणे, सरकारी जमीनी चरण्यास देणे, इत्यादी उपाययोजना महाराजांनी केल्याचे दिसून येते. जे अपंग, निराधार व वृद्ध आहेत अशांसाठी राहण्याची व जेवण्याची सोय व्हावी म्हणून ठिकठिकाणी आश्रम उभा केले. दुष्काळी कामावर आपल्या आई—वडिलांबरोबर असलेल्या लहान मुलांसाठी बालकालये उभारली. त्यांच्यासाठी दूध व खाउची मोफत सोय केली. नोकरचाकरांना महागाई भत्ता दिला. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांचे शंभर वर्षापूर्वीची आर्थिक धोरणे पुन्हा प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता आहे. कारण नवीन आर्थिक धोरण म्हणजे जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाच्या या काळात सहकाराचा स्वाहाकार बनला असून सर्वसामान्य जनतेचे हित जोपासण्या ऐवजी सहकारी बॅका, सहकारी साखर कारखाने दुष्ट राजकारण्यांचे अड्डे बनत आहेत. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात वाढती लोकसंख्या, पाणीप्रश्न, बॅक घोटाळे, शेतीचे मागासलेपण, दारिद्रय, बेकारी, आजारी कारखाने या सारख्या स्वरूपाच्या आर्थिक व सामाजिक समस्या वाढत आहेत.

**निष्कर्ष :**

1. राजर्षी शाहू महाराजांनी नवीन शेती तंत्राचा वापर करून आधुनिक शेतीकडे वळवून एक हरितक्रांती केली. राधानगरी धरण, कालवे, बंधारे, विहिरी इत्यादी पाण्याचे स्त्रोत निर्माण करूण नवीन पिकाचे उत्पादन घेउन कोरडवाहू शेती ओलिताखाली आणून आर्थिक विकासाला चालना दिल्याचे दिसून येते.
2. उद्योगाच्या आणि व्यापाराच्या विकासासाठी सुतगिरण्या, जिनिंग मिल असे १९०५ ते १९१२—१३ या वर्षात वृद्धीसाठी 'शाहूपूरी बाजारपेठ' स्थापन केली आणि उद्योग व व्यापाराचे विकेंद्रीकरण केल्याचे दिसून येते.
3. शेती व उद्योगांच्या वाढीसाठी शाहू महाराजांनी १८५ किमी लांबीचे रस्ते बांधून खेडे शहरांना जोडली तर कोल्हापूर ते मिरज रेल्वे मार्गाचे काम केले.
4. राजर्षी शाहू महाराजांनी सहकारी चळवळीच्या विकासासाठी 'बलभीम को—ऑपरेटिव्ह सोसायटी' व 'अर्बन को—ऑपरेटिव्ह बॅक' स्थापन करून त्यात १९२०—२१ पर्यंत कोल्हापूर संस्थानात सहकारी संस्थांची संस्था ९७ पर्यंत वाढल्याचे निदर्शनास येते.
5. राजर्षी शाहू महाराजांनी दुष्काळग्रस्तांसाठी अन्नधान्यांचा पुरवठा, रोजगार, जनावरांना चरण्यासाठी जमिनी दिल्या व आर्थिक सहकार्य करून जनतेला दिलासा दिल्याचे दिसून येते.

**शिफारसी :**

1. आजही महाराष्ट्रातील बहुतांश शेतीचे क्षेत्र कोरडवाहू आहे ते ओलिताखाली आणण्यासाठी शाहू महाराजांच्या शेती विकासाच्या पद्धतीनुसार पाण्याच्या स्त्रोताचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.
2. सहकारी चळवळीसमोर भ्रष्टाचाराचे खुप मोठे आव्हान उभे राहिले आहे. तसेच शेतकरी आत्महत्येची ही मोठी समस्या बनली आहे. त्यासाठी शाहूंच्या विचारांची गरज असून शेतक—यांसाठी कृषीविषयक बॅकामार्फत कर्जात सुट देवून अवजारे, बि—बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा सवलतीच्या दराने पुरवठा केला पाहिजे.
3. भारतीय अर्थव्यवस्थेत बेरोजगारीची समस्या मोठया प्रमाणावर भेडसावत आहे. ती कमी करण्यासाठी उद्योगधंदे व व्यापारास प्रोत्साहन देवून विविध उद्योग स्थापन करून बेकारांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे.
4. देशात सातत्याने दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागते. अशावेळी शाहू महाराजांनी मजूरांना विविध कामे, कर्ज, गुरांचा सांभाळ, चा—याची व्यवस्था, सहकारी जमीन चारण्यास देणे यासारख्या उपाययोजनांची अंमलबजावणी सद्य:स्थितीत केली पाहिजे.

**संदर्भ :**

१. डॉ. किशोरकुमार गव्हाणे, डॉ. एस. व्ही. शिंदे, १८००—१९६०, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास.
२. पाटील व्ही. बी., महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास.
३. वीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती एक समाजक्रांतीकारक.
४. लठ्ठे आ. बा., श्री शाहू महाराज यांचे चरित्र.
५. डॉ. एस. एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास
६. साळुंखे पी. बी. संपा., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ.
७. प्रज्ञावंत गौतम संपा., शाहू महाराज.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-28
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# मराठी काव्य आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**डॉ.तुळशीराम उकिरडे**
सहाय्यक प्राध्यापक,मराठी विभाग, तेरणा महाविद्यालय,उस्मानाबाद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेने प्रभावित होवून दलित कवी मराठी साहित्यामध्ये परीवर्तनवादी विचार मांडू लागला.समाज परिवर्तनाचे वारे चोहीकडे वाहू लागले . दलित समाज विकासापासून कोसो दूर , दबलेला , पिचलेला , अंधारात खितपत पडलेला,दारिद्र्य अवस्थेत पशुमय जीवन जगत होता . जाती व्यवस्थेने लादलेल्या जुलमी बेड्यामध्ये गुरफटलेला . दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अखंड आयुष्य वेचले . दलित कवींच्या कवितेतून जातीयता , गुलामगिरी , अन्याय , अत्याचार , शोषण,दारिद्र्य, वाट्याला आलेले अमानवी जीवन ,भूक या बाबी प्रकर्षाने जाणवतात. अस्पृश्यता ही मानवी जीवनाला लागलेली वाळवी . दलितांच्या वाटेला आलेले जीवन पशुपेक्षाही भयावह होते,जनावरांना माणसापेक्षा चांगली वागणूक मिळत होती . परंतु या भारत भूमीवर जातिव्यवस्थेच्या विळख्यात अडकलेला , परंपरेने घातक रूढी घालून दिला मोठा वर्ग गावकुसाबाहेर पशुत्वाचे जीवन जगत होता .या जुलमी रूढी - परंपरेविरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बंड पुकारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म हिंदू धर्मातील महार जातीमध्ये झाला. लहानपणा पासूनच जातीयतेचे चटके त्यांना सहन करावे लागले . त्यांनी प्रत्यक्ष जवळून जातीयता अनुभवली . वर्गाच्या बाहेर बसून शिक्षण घेतलेला हा ज्ञानवंत या भारतभूमीवर सात कोटी दलितांना न्याय ,हक्क मिळवून देण्यासाठी आपले पूर्ण आयुष्य सार्थकी लावतो .दलितांना न्याय मिळवून देण्यासाठी हिंदू धर्मातील रूढी , परंपरेच्या विरोधात धर्मांतराची घोषणा करतात. जातिव्यवस्थेने दलितांची प्रगती खुंटीत केली होती .पाण्याला स्पर्श करण्याचा अधिकार नाही.मंदिर प्रवेश नाही. गावकुसाबाहेर पशुतुल्य जीवन जगणाऱ्या दलितांच्या जीवनात नवचैतन्य फुलवण्याचा प्रयत्न करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होऊन अनेक कवी लिहिते झाले . दलितांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचे ,त्यांना वाचा फोडण्याचे काम काव्याच्या माध्यमातून कवी करतात. दलित कविता मानव मुक्तीचा ध्यास घेते . माणसांना माणूस म्हणून जगण्यासाठी ,समाज प्रवाहामध्ये समाविष्ट करण्यासाठी ती किंकाळी फोडते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बांधवांना आपल्या उन्नतीसाठी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा " हा मोलाचा मंत्र दिला . शिक्षण घेतलं तर सामाजिक प्रगती साधली जाईल , हे त्यांना सर्वश्रुत होतं. समाज प्रवाहामध्ये तुमची प्रगती करायची असेल तर शिक्षण घेणं गरजेचं आहे . शिक्षणाच्या माध्यमातून मानवाची आत्मोन्नती होते . मानसिक ,वैचारिक उन्नती होते . शिक्षणामुळे आपला समाज प्रगतीपथावर जाऊ शकतो , हा विचार मनामध्ये रुजविला . गावकुसाच्या बाहेर वाड्या-वस्त्यामध्ये असणारा दलित बांधव बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन लिहू लागला .अन्याय अत्याचार , सामाजिक समतेचा विचार मांडू लागला. अत्याचारा विरोधात न्याय मागू लागला. तीव्र लढा उभा करू लागला . डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारी समाज व्यवस्था निर्माण करू लागला . दुःख ,वेदना आक्रोश , विवंचना ,दारिद्र्य , स्त्री अत्याचार ,अन्याय ,उपासमार, जातीयता ,जातीमुळे होणारे शोषण या अनेक प्रश्नांचा वेध अनेक कवी काव्याच्या माध्यमातून अधोरेखित करू लागला.

दलित कविता म्हणजे काय हे समजून घेणं महत्त्वाचे ठरते . दलित कवितेविषयी म .सु. पाटील 'दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' या ग्रंथामध्ये आपले मत नोंदवतात," कविता ही दलित नसते. ती कविता असते अगर नसते. ती बरी कविता असते किंवा वाईट असते . दलित कवी हा , कविता लिहिणारे जे जे कोणी आहेत त्यांचा एक वेगळा वर्ग . मात्र कवी दलित म्हटला तरी तो सर्वप्रथम कवी असला पाहिजे. त्याशिवाय त्याचे लेखन कविता या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मय प्रकारात बसणार नाही. त्याच्या ठायी कवित्वासाठी आवश्यक त्या शक्ती असायला हव्यातच, म्हणजे कवीची संवेदनशीलता आणि प्रतिभा त्याच्या ठाई असल्याशिवाय कविता या वाङ्मय प्रकारात अनुस्यूत असलेल्या किमान अटी तो पुऱ्या करू शकणार नाही . त्यानंतर त्याचे दलित असणे यासाठी महत्त्वाचे कि, त्यामुळे त्याच्या संवेदनशीलतेला एक विशिष्ट रूप लाभत असते"(प्र.क्र.१२) या मताचा परामर्श असे लक्षात येते की , कवी दलित असला पाहिजे. तो ज्या समाजात जीवन जगतो आहे,त्याच्या वाट्याला आलेल्या वेदना काव्यातून मांडू शकणार नाही.ते काव्य वेदनेच्या ,दुःखाच्या भट्टीतून तावून सुलाखून निघालेले असेल.खरा इतिहास तो काव्यातून प्रकट करेल.

कवयित्री संध्या रंगारी 'क्रांतिसूर्य' या कवितेत म्हणते,

"क्रांतिसूर्य तू मावळूनही
आज
चिरंतर उगवलेला
सुर्यच आहेस."

अंधारात हजारो वर्षांपासून खितपत पडलेल्या दलित बांधवांना प्रकाशमान करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. दलितांच्या जीवनात प्रकाश पेरून सन्मानाने जगण्याची उर्मी दिली.दलितांना प्रकाशमान करणारा क्रांतिसूर्य आहे,ही उदात्त भावना कवयित्री संध्या रंगारी काव्यातून प्रकट करते.

कवी कुसुमाग्रज 'अनावरण'या कवितेत म्हणतात,"नाही बाबासाहेब तुम्ही हा विषय कवितेत मावणारा नाही." किती सहज ,ओघवत्या शैलीत कुसुमाग्रज वर्णन करतात की , बाबासाहेब तुम्ही कवितेत मावणारा विषय नाहीत. एक विशाल व्याप्ती आणि कवेत न मावणारा विषय आहात ,अशी मोठेपणाची थोरवी गातात . कवी वामन कर्डक,'तुझे रान भीमा' या काव्यात म्हणतात, बाबासाहेबांमुळे दलितांच्या जीवनात परिवर्तन झाले,समाधानाचे जीवन वाट्याला आले ,

"तुवा पेरलेले ते तरारून आले
उभे शेत हिरवे नवे रूप ल्याले
तुझी आण भाकू,खडे आज ठाकू
तुझे रान राखू आणि सुख चाकू
सुखाचाचं ठेवा मिळाला महान
तुझ्या लेकरांना."

ओसाड जमिनीत हिरव्यागार झाडांची वनराई बहरलेली आहे.ओसाड जमीनीने हिरवा शालू अंगावर पांघरलेला आहे,सगळं शेत हिरवंगार वाटतं आहे.सगळीकडे आनंदाला बहर आला आहे.ही जी किमया आहे हे , जे परिवर्तन झालं आहे , ते फक्त बाबासाहेबांच्या पुण्याईमुळे . दलितांच्या जीवनात बाबासाहेबांच्या कार्यामुळे

हिरवळ पसरली आहे, परिवर्तन झाले आहे.समाज सुधारू लागला . हिरवं पिक जोमाने वाढत आहे , त्याची गोड फळं समाज चाखू लागला ,याचे सर्व श्रेय बाबासाहेबांना जाते ,असे कवी काव्यातून अधोरेखित करतो.

कवी श्याम कुरळे 'बाबा' या कवितेत बाबासाहेबांना उद्देशून म्हणतात,"तुझ्याच जन्माने झाली ,दलितांची मुक्ती तूच आमुचा मुक्तीदाता,अन तूच आमुची शक्ती." आमचा दाता,पालनकर्ता तूच आहेस.सर्व जुलुमी बेड्यातून ,साखळदंडातून तूच आम्हाला मुक्त केलं आहेस.गुलामीतून मुक्त करणारा तूच मुक्तीदाता आहेस.तू जन्माला आलास आणि आमच्या जीवनाचं सोनं केलंस . हजारो वर्षापासून गुलामीत स्वत्व हरवून जीवन जगणाऱ्या दलितांना तुझ्या प्रखर बुद्धिमत्तेच्या बळावर मुक्त श्वास घेण्यास बंदिवासातून मुक्ती मिळवून दिलीस. कवी नामदेव ढसाळ,'डॉ.आंबेडकर'या कवितेत म्हणतात,

"जो पाय पुसण्यावर बसत नाही
जो नूतन वर्षाच्या फुलपाखरांसारखा उडतो नि प्रकाश पसरवतो
जो रुळाबरोबर वाढत जातो
जो युनिव्हर्सिट्व्याचे चिरेबंद ढिले करतो
जो स्वतंत्रेकडून स्वतंत्रतेकडे जातो
असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी
तो तू,तोच तू आमचा"

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना समाजात समता हवी होती.कवी म्हणतो,तूच आमच्या जगण्याच्या आशेचा किरण आहेस,रथाचा सारथी आहेस.

माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या संस्कृतीवर बाबा आमटे लिहिताना म्हणतात ,

"हे महामानवा
तर आमच्या अस्मितेची कणसं
तशीच भाजली गेली असती युगेयुगे
येथल्या धगधगत्या यज्ञाच्या वस्तीवर"

कवी वास्तव परिस्थितीचे चित्रण काव्यातून रेखाटतो.येथील व्यवस्थेने घालून दिलेल्या कठोर अनिष्ट रूढी ,प्रथा,परंपरेच्या जुलमी विळख्यात आम्हाला आयुष्य जगावे लागले असते. जाचक बंधनात अडकलेल्या समाजाला मान आणि सन्मानाचे जीवन बहाल करण्यासाठी बाबासाहेबांनी संघर्ष केला. कवी किरण भिंगरदेव 'महामानव'कवितेत म्हणतात ,

"भीमराव तव भीमगाथा
शिल्पकार तू घटनेचा
तुझ्या हातांनी रचिला गेला
दीपस्तंभ भारताचा"

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय घटनेचे शिल्पकार आहेत.त्यांनी संविधानाच्या माध्यमातून या भूमीवरील सर्व घटकांना समानतेच्या परीघाखाली आणले .स्वातंत्र्य,समता,बंधूभाव ही मूल्ये जनमानसात रुजवली.कवी दिनबंधू शेगावकर'भिमबा' कवितेत अंधश्रद्धेवर प्रहार करताना म्हणतात

"भीमबा तुझ्या गुणाने,मन माझे दंग झाले

कुणी दगड जागविले,कुणी भिंत चालविली
ठेऊ किती भरोसा,कुणी म्हैस बोलाविली
पण सत्य करणी तुझी,तू दलित जागविले"

कोणी दगड जागविले,भिंत चालविली या गोष्टींवर मी कसा विश्वास ठेवू.विज्ञानाच्या बळावर विकसित झालेलं मन,तर्कनिष्ठ गोष्टींची मनाला झालेली सवय, उघड्या डोळयांनी मी न पटणाऱ्या अंधकारमय गोष्टी पाहतो तेंव्हा मन विचलित होतं. कवी म्हणतो , हे सगळं विश्वसनीय वाटत नाही. परंतु तू मात्र दलितांचे आत्मभान जागे केलेस.मुक्या समाजाला वाचा फोडलीस. दलितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार बहाल केलास, हे सत्य आहे.त्यामुळे कवी म्हणतो,मी फक्त तुझ्यावर विश्वास ठेवतो.

कवी हरिभाऊ तोरणे म्हणतात,

'केले जागृत पाजूनी अमृत सुप्त समाजाला
ज्ञानदीप लावूनी घोर अंधारही घालविला
चैतन्याचा प्रवाह खळखळसमाजि वाहविला
स्वाभीमान धगधगीत अग्नी कुंडही पेटविला
जन्मसिद्ध मनुष्य हक्क हा पाठही शिकविला"

आम्हीही माणसं आहोत,आम्हाला जगण्याचा अधिकार आहे .माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्रदान केला.

सीमा साखरे,'दीक्षाभूमीवर भेटलेली बाई'या कवितेत म्हणतात,

'मरगळलेल्या कोटी-कोटी लोकांना
बाबांनी संघर्षासाठी ललकारलं
या साऱ्या माणसा-बायकांच्या
पायात बाबांनीच बळ दिलं"

निद्रिस्त असणारा दलित समाज डॉ.बाबासाहेबांच्या विचाराने जागृत झाला. माणूस म्हणून जगू लागला .

वामन निंबाळकर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर'या कवितेत म्हणतात, 'बाबासाहेब हे महापुरुषा
मी फक्त तुलाच महापुरुष म्हणतो कारण

इथल्या मुक्यांच्या तोंडी तू
क्रांतीगीतांचे धुंद स्वर दिले
त्यांना मुखर केले

त्यांच्या अंधार वाटेवर सूर्याचे रोपन केले." कवितेचा सूक्ष्मपणे अभ्यास केला, तर असे दिसून येते की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अज्ञानात असलेल्या दलित समाजाला जगण्याचे बळ दिले.

निष्कर्ष:-

१) शिक्षणाशिवाय पर्याय नाही,शिक्षण घेतले तरच समाजसुधारणा शक्य आहे ,हा मूलमंत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजमनात रुजविला.

२)स्वातंत्र्य,समता,बंधुभाव या मूल्यांचा अंगीकार केला.दलित समाजाचे आत्मभान जागृत केले.

३)हजारो वर्षापासून विकासापासून कोसो दूर असणाऱ्या दलित समाजाला नवी दिशा दिली.

४)जातीयतेमुळे गावापासून दूर असणाऱ्या दलित समाजाला समाजप्रवाहात समाविष्ट केले.

५)माणसाला माणूस म्हणून जगण्याचा नवा मूलमंत्र दिला.

**संदर्भ :-**

१)डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,धनंजय कीर,पापुलर प्रकाशन,पुणे,प्र.आ.१४एप्रिल१९६६

२)युगप्रवर्तक आंबेडकर,दत्ता गायकवाड,सुविद्या प्रकाशन,सोलापूर प्र.आ.२०१६

३)दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र,म.सु.पाटील,पद्मगंधा प्रकाशन,पुणे,प्र.आ.२६मार्च२०१०

| Chief Editor | Editor |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot<br>No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

## Editorial Board

Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]
Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]
Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]
Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]
Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]
guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam
Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]
Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]
Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]
Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]
Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]
Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]
Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]
Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]
Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102